# देवी श्री अहल्याबाई.

954.73

D.V.POTDAR
D00328

12

पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—
(१) विविधज्ञानविस्तार ऑफिस फणसवाडी मुंबई नं० २
(२) अनंत आत्माराम मोरमकर ४०२ ठाकुरद्वार मुंबई नं. २

# देवी श्री अहल्याबाई

## होळकर.

D.V.POTDAR
D00328

# देवी श्री अहल्याबाई

## होळकर

हिचें

## सचित्र चरित्र.

लेखकः—'पुरुषोत्तम.'

प्रकाशकः—

अनंत आत्माराम मोरमकर, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई.

मार्च १९१३. ] [ आवृत्ति पहिली.

किंमत २ रु.

[ प्रकाशनाचे सर्व हक्क कर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

के. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

म/२०९

कथा सुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती ।
दुहोत भलते सदा, न तरि लेशही आटती
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती ॥

मोरोपंत.

हें पुस्तक
वि. बा. पंडित
यांनीं आपल्या
श्रीलक्ष्मी-
नारायण छा. छा.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... ... | १७ —३१ पृष्ठ. |
| होळकरांचा अभ्युदय ... ... ... ... | १ |
| अहल्याबाईचें पूर्वचरित्र ... ... ... ... | ३० |
| मल्हाररावाचे शेवटले दिवस ... ... ... | ६२ |
| मालेरावाचा मृत्यु ... ... ... ... | ७६ |
| चंद्रचूडाचें कारस्थान ... ... ... ... | ८८ |
| बाईचा कारभार ... ... ... | १०२ |
| राज्य—व्यवस्था ... ... ... ... | १२७ |
| अहल्याबाई आणि तुकोजी ... ... ... | १४५ |
| राज्य—व्यवस्था ( पुढें चालू ) ... ... ... | १७१ |
| लढाया व राज्यांतील बंदोबस्त ... ... ... | १९७ |
| स्वरूपवर्णन व दिनचर्या ... ... ... | २३२ |
| मुक्ताबाईचें सहगमन ... ... ... | २४६ |
| अवतार-समाप्ति ... ... ... | २६१ |
| आख्यायिका ... ... ... | २७९ |
| अहल्याबाईचें धर्म जीवन ... ... ... | २९९ |
| पुरवण्या ... ... ... | ३२५-३४८ |

# समर्पण

श्री० सौ० चंद्रावती महाराणी
साहेब होळकर

ज्यांनीं
आपल्या उदार, सात्विक, सरल, इत्यादि
सद्गुणयुक्त स्वभावामुळें
आपल्या प्रजाजनांत स्वत:विषयीं अल्प काळांतच
प्रेमभाव उत्पन्न केला,

त्यांस
त्यांच्या कुळांतील या
अलौकिक व आर्यावर्तास अत्यंत पूज्य असलेल्या

थोर साध्वीचें चरित्र
त्यांच्या उदार परवानगीनें,
अत्यंत नम्रतापूर्वक अर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

**देवी श्री अहल्याबाई** हिच्यासंबंधाची एकंदर माहिती चरित्रकारानें पुढील प्रस्तावनेंत व चरित्रांत दिली आहेच. ह्मणून तिच्याबद्दल येथें ज्यास्त पाल्हाळ करीत बसण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

या चरित्राचे कर्ते रा० "**पुरुषोत्तम**" यांचे बरेच लेख मराठींतील भारदस्त मासिक पुस्तक जें **विविधज्ञानविस्तार** यांत तसेंच 'मासिक मनोरंजनां'त प्रसिद्ध झालेले पुष्कळांच्या अवलोकनांत आलेच असतील. शिवाय, त्यांचीं मैत्रेयी आणि कात्यायनी आणि 'कथामकरंद' हीं स्वतंत्र प्रसिद्ध झालेलीं पुस्तकेंही महाराष्ट्र वाचकांच्या परिचयाचीं आहेत. तेव्हां मराठी वाङ्मयास केवळ अपरिचित अशा लेखकाची कृती आह्मी वाचकांपुढें ठेवीत नाहीं. तेव्हां त्यांची लेखनपद्धति कशी काय असेल, हें निराळें लिहिण्यास नकोच.

अहल्याबाईचें चांगलेंसें चरित्र मराठींत नसावें ही खेदाची गोष्ट होय. परंतु प्रस्तुत चरित्रलेखनानें रा. '**पुरुषोत्तम**' यांनीं ही उणीव बऱ्याच अंशानें भरून काढली आहे, असें वाचकांस वाटल्यावांचून राहणार नाहीं.

रा० '**पुरुषोत्तम**' यांच्या हातून अशींच उत्तरोत्तर चांगली महत्त्वाचीं पुस्तकें बाहेर पडोत, अशी इच्छा करून, पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें आज वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तानें पुस्तक छापून तयार होऊन बाहेर पडल्याबद्दल ईश्वराचे मनःपूर्वक आभार मानितों.

**प्रकाशक.**

... म. म. डॉ. द. वा. पोतदार
10127
954-73/Pur
21 - 25/3/94

# निवेदन.

श्री० सौभाग्यवती **महाराणीसाहेब होळकर** सरकार यांची **"मराठी भाषेस उत्तेजन"** ह्मणून एक जाहिरात मला चैत्राचे शेवटास (शके १८३४) पहावयास मिळाली. या वेळीं माझी मानसिक व शारीरिक स्थिति बरीच अस्वस्थ असल्यानें आपण बक्षिसासाठीं कांहीं प्रयत्न करावा असें माझ्या मनांत मुळींच नव्हतें. या मानसिक अवस्थेचा मला कांहीं विसर पडावा ह्मणून रा० रा० **श्रीधर नारायण देव** यांचा, या प्रसंगीं मीं कांहीं लिहावें, असा फारच आग्रह पडला. त्यांचा तो प्रेमळ आग्रह पाहून मी या प्रसंगीं लिहिण्यास उद्युक्त झालों. या कामीं मला रा० **बाळकृष्ण नारायण देव** यांनीं पूर्ण साह्य करण्याचें कबूल केलें.

अहल्याबाईच्या चरित्रांचीं पुढें जी याद दिली आहे, त्यापैकीं बहुतेक सर्व पुस्तकें मी आधींच वाचलीं होतीं.पण चरित्रकाराला जें वाचन व त्याच्या मनाची तयारी पाहिजे ती माझ्यांत मुळींच नाहीं. वास्तविक पाहतां चरित्रकाराचें मन आपल्या विषयांत पूर्णपणें मुरलें पाहिजे अथवा तो विषय त्याच्या अंतःकरणावर खोदला गेला पाहिजे. स्पंज पाण्यांत टाकला असतां तो ज्याप्रमाणें पाणी शोषून थपथपलेला असतो, अथवा गाई रानांतून चरून आल्या असतां त्यांचे स्तन थपथपलेले असून वासरांस पाहतांच त्यांना ज्याप्रमाणें पान्हा फुटतो, त्याप्रमाणें इतिहासकाराचें मन आपल्या विषयानें भरलेलें असून प्रसंग यावयाचाच काय तो अवकाश, कीं लागलीच त्याचा नैसर्गिक झऱ्याप्रमाणें प्रवाह सुरू झाला पाहिजे. त्याला आपल्या अगदीं लहान सहान गोष्टींचीही व्यवस्थित रितीनें माहिती असून कोणचाही विषय केव्हांही पुढें उभा राहिला असतां तो त्यास पटकन् सांगतां आला पाहिजे. आपलें म्हणणें सामान्य जनांसही सुगम व्हावयास व त्यांतील प्रसंगांचें प्रत्यक्ष चित्र डोळ्यांपुढें उभें राहावयास त्याचें भाषेवर अगाध प्रभुत्व पाहिजे. एखाद्या फार मोठ्या व उत्तम व्यवस्था लाविलेल्या दुकानाप्रमाणें त्याचे डोक्यांत आपल्या विषयाची व्यवस्थेशीर मांडणी झाली पाहिजे. म्हणजे, गिऱ्हाईकानें काय पाहिजे हें

मागण्याचा अवकाश, कीं, लागलीच त्याला त्याची इच्छित जिन्नस देतां येते. गिऱ्हाईकांस प्रसन्न ठेवण्यासाठीं व त्यांचें मन आकर्षण करण्यासाठीं दुकानदारांस ज्याप्रमाणें आपल्या जिव्हेवर प्रभुत्व ठेवावें लागतें, त्याप्रमाणेंच इतिहासकारांस आपल्या भाषेवर प्रभुत्व ठेवतां आलें पाहिजें. मेकॉलेनें लोकांस आपल्या हातांतील कांदबऱ्या खालीं ठेवावयास लावून त्या ऐवजीं आपला इतिहास हातीं घ्यावयास लाविला, याचें कारण, त्याचें भाषेवर असामान्य प्रभुत्व होतें, हेंच होय! हे विचार मनांत उभे राहिले, म्हणजे कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तटाणी असा विचार मनांत येऊन माझा मोठा हिरमोड होऊन जाई. पण मला रा० देवांचा आश्रय असल्यानें मी हें काम कसेंबसें करीत होतों. वास्तविक त्यांनीं पाहातां मला या तीरापासून पैल तीरापर्यंत हाताला धरून नेलें. मी नवशिक्या पोहणाऱ्याप्रमाणें उगीच हातपाय हालवीत होतों! रा० देवांची माझ्यासारख्यानें तारीफ करणें म्हणजे लहान तोंडी मोठा घांस घेण्याजोगा होणारा प्रकार आहे. पण त्यांच्या सहावसावरून मला असें वाटतें कीं, इतिहासकारांस आपल्या विषयाची जशी माहिती पाहिजे, तशी ती त्यांस आहे. त्यांचे ऐतिहासिक विषयावर टीकात्मक व चरित्रात्मक पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले असून त्यांची विद्वानांत फार चहा आहे. असो. वास्तविक पाहातां लिहिणें असें असावें कीं, एकदां वाचतांच त्यांतील प्रसंगांचें प्रत्यक्ष चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें पाहिजे. पण या पुस्तकांत याची पदोपदीं वाण भासेल. पुस्तक लिहून तें कांहीं काल तसेंच पडल्यानंतर जर वाचावयास घेतलें, तर त्यांतील बरेचसे दोष खुद्द लेखकालाही दिसूं लागतात. पण या पुस्तकलेखनास कालाची मर्यादा असल्यानें मला हा लाभ घेतां आला नाहीं. त्याचप्रमाणें या पुस्तकास पृष्ठांचीही मर्यादा होती. कमेटीस ज्यास्तींत ज्यास्त १५० पानाचें पुस्तक पाहिजे होतें. पण या अटींत 'दिडशें' असे मोघम शब्द असल्यानें मला त्या शब्दाचा फायदा घेतां आला! कारण, माझ्या लेखाचीं फुलस्केप साईजचीं बारीक अक्षरांचीं अवघी ११० पृष्ठें (याशिवाय पुरवण्या व परिशिष्ट *) झालीं. तथापि कालाची मर्यादा मला ओलांडतां येईना. यामुळें

*परीशिष्टांत आख्यायिका होत्या. पण हें पुस्तक छापवितांना त्याची रचना एका निराळ्या भागांत केली आहे. त्याचप्रमाणें इतर लहानसहान बरेच फेरफार केले आहेत. अकरावा भाग फारच मोठा होता त्याचे ११ ते १३ असे तीन भाग पाडले आहेत. पुढील प्रस्तावना पुस्तकाबरोबरच लिहिली आहे, हें कांहीं

जो भाग विस्तृत पाहिजे, तो लहान झाला असेल व लहान भाग विस्तृत झाला असेल; हे व असेच दुसरे पुष्कळ दोष यांत असतील. मला वेळ मनाजोगता मिळाला असता तर म्हणजे मी मोठें चांगलें पुस्तक लिहितों, अशांतला कांहीं भाग नाहीं. पण या पुस्तकाच्या गुणावगुणांबद्दल वाचकवर्ग निकाल देतील, तेव्हां या संशयाचा थोडाही फायदा न देण्या इतके ते निष्ठुर खचित होणार नाहींत.

हें पुस्तक छापविण्यापूर्वी मीं तें रा. देव यांस दाखविलें होतें. तेव्हां त्यानीं मला यांत संदिग्ध-संशय उत्पन्न करणारीं अशीं कित्येक वाक्यें दाखविलीं, तीं मीं सुधरवली आहेत. याप्रमाणें मला त्यांचें अथपासून इतिपर्यंत इतकें साह्य झालें आहे कीं, तें माझ्याशिवाय इतरांस समजणें कठीण आहे.

हें पुस्तक लिहीत असतांना मला माझे हितेच्छु मित्र रा० पुरुषोत्तम गणपतसिंह डॉक्टर, बी. ए., यांनीं पुष्कळ सूचना केल्या, त्याचप्रमाणें यांतील बहुतेक उतारे रा० वामन नारायण देव व पुरुषोत्तम श्री० देव यांनीं उतरवून दिले म्हणून त्यांचेही आभार मानणें रास्त आहे.

प्रस्तुत पुस्तक श्रीमंत महाराज होळकर सरकार हे विलायतेस जाण्यापूर्वीच त्यांच्या अवलोकनांत यावें म्हणून जरा घाईनें छापविण्यांत आलें. " श्री लक्ष्मीनारायण छापखाना " हा अगदीं बाल्यावस्थेंत असतांनाहीं या पुस्तकाचें छपाईचें, चित्रांचें व बांधणीचें काम सुबकतेनें व तेंही अडीच महिन्यांत काढून दिलें, याबद्दल छापखान्याचे मेहनती व उत्साही व्यवस्थापक रा० अनंत आत्माराम मोरमकर यांचा मी फार आभारी आहें. रा० रा०आ० सो० तेलंग यांनीं या पुस्तकाचीं 'मुद्रितें' आपल्या थोर स्वभावास अनुसरून त्यांच्यावर दैविक आपत्ती आली असतांही किंचितही खळ पडूं न देतां तपासलीं व कित्येक उपयुक्त सूचना केल्या, याबद्दल त्यांचे मीं जितके आभार मानावे तितके ते थोडेच होणार आहेत. तथापि हें काम फारच घाईनें निघाल्यामुळें यांत कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत त्यांपैकीं महत्त्वाचीं अशीं पुस्तकाचे शेवटास जोडलेल्या शुद्धिपत्रांत दिलीं आहेत.

हें पुस्तक अशा रितीनें पुढें यावयास कितीही कारणें असोत, पण त्याचा जन्म व्हावयास मुख्य कारण श्रीमंत सौभाग्यवती महाराणी साहेब

---

सांगावयास नकोच. त्यांत थोडी भर घालून ती बहुतेक जशीच्या तशीच छापली आहे.

**होळकर सरकार** याच होत. त्यांच्या कृपेनेंच हें पुस्तक आज लोकांपुढें मांडण्याचा सुयोग येत आहे, हें कोणासही सांगावयाचें प्रयोजन नाहीं. या प्रसंगीं मराठी भाषेच्या अभ्युदयचिंतकांच्या वतीनें व तिऱ्हाईत या नात्यानें माझी **म**हाराणी साहेबांस हीच विनंती आहे कीं, त्यांच्या कृपाछत्राचा आसरा लेखकवर्गास असाच वारंवार मिळो.

या पुस्तकांतील तीन फोटो **इं**दूर येथील सुप्रसिद्ध चित्रकार व माझे स्नेही रा० **प्र**तापराव ऊर्फ **ना**नासाहेब **जा**धव यांनीं काढून दिले आहेत. त्यांत **बा**ईचा फोटो काढावयास त्यांस फार परिश्रम पडले. तथापि त्यांनीं माझें काम नेहमींच्या कळकळीनें केलें याबद्दल मी त्यांचा फार अभारी आहे.

# प्रस्तावना.

आपल्या देशाच्या वाङ्मयांत इतर भागांची उन्नति थोडीबहुत झालेली असो, पण ती इतिहास आणि अर्थशास्त्र या दोन विषयांची फारशी झालेली नाहीं, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. आमच्या देशांत चरित्रनायक होण्यास कोणी पात्र झालें नाहीं असें नाहीं. आमच्याकडे पुष्कळ लोक चरित्रनायक होण्यास पात्र झाले. पण आजही जरी पाहिलें, तरी त्यांत अपात्र लोकांचीच चरित्रें बरींचशीं लिहिलीं जाऊन जे खरे मार्गदर्शक लोक आहेत व होते, ते तसेच राहिले ! सध्यांच्या काळांत लहानसहान लोकांसही नांवाजलेले लोक चरित्रकार मिळावे, व दादाभाई, रानडे, मंडलीक, तेलंग यांच्यासारखे लोक मागें राहावे, हें आमचें मोठें दुर्भाग्य होय. इंग्रजी विद्येचा इकडे जारीनें प्रसार सुरू झाला, पण इंग्रजांच्या अंगचे जे सद्गुण त्यांची मात्र इकडे वानवाच आहे. मोर्ले साहेबांस इतका दांडगा उद्योग असूनही ते ग्लॅडस्टन साहेबासारख्यांचें चरित्र त्यांच्या मृत्यूनंतर चारपांच वर्षांचे आंतच लिहितात. तेंही लहानसहान नव्हे, तर चांगलें दीड दोन हजार पृष्ठांचें! ह्मणजे सारेंच आश्चर्य! पण आमच्याकडे चरित्रकारांच्या अनास्थेमुळें रानड्यांसारख्यांचेंही नीटसें चरित्र लिहिलें जाऊं नये, हें कशाचें बरें द्योतक ह्मणावें? सुधारलेल्या काळांत सुशिक्षित समाजांत जर ही स्थिति दिसते तर मग मागसलेल्या काळांत याहून अधिक शोचनीय स्थिति असावी, यांत कांहीं आश्चर्य वाटावयास नको. मागल्या काळचे इतिहास ह्मणजे राजतरंगिणीसारखें पुस्तक होय. चमत्कार केल्याशिवाय व्यक्ति चारित्रनायक व्हावयास पात्रच होत नाहीं, ही त्या वेळची समजूत होती. आतां, अशा या चमत्कारजन्य चरित्रापासूनही त्या काळच्या स्थितीचें बरेंच ज्ञान होतें हा भाग निराळा; पण त्याला कांहीं सीमा आहे. एकंदरींत त्या काळच्या इतिहासास फारसें महत्त्व देतां येत नाहीं हें खरें. आमच्या जुन्या लोकांची माहिती जर पाश्चात्य अथवा इतर विदेशीय लोकांच्या लेखांत न सांपडती, तर त्या लोकांची गणना, होऊन न

होऊन सारखे, अशा असंख्य प्राणिवर्गांतच होती. अशा स्थितींत त्यांपैकीं कांहीं लोकांस विदेशीय लोक चरित्रकार मिळावे हें त्यांचें मोठें भाग्यच म्हणावयाचें ! नाहीं तर दोन चार चमत्कारजन्य चुटक्यांशिवाय फारच थोडा मजकूर ह्या लोकांच्या वांट्यास येता. अशा प्रकारचे जे आमच्यांत फारच थोडे भाग्यवान् लोक आहेत, त्यांत अहल्याबाईची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. अशा लोकांस परदेशीय ग्रंथकार आपले चरित्रकार मिळावे, तेव्हां त्यांची योग्यता तशीच कांहीं असली पाहिजे यांत मुळीं सुद्धां शंका नाहीं.

वास्तविक पाहातां ज्या मनुष्याचें चरित्र लिहावयाचें, त्यानें सामाजिक, धार्मिक अथवा राजकीय गोष्टींत काय केलें, त्यांच्या काळीं परिस्थिति कशी होती, तो आपल्या परिस्थितीस कितपत बळी पडला, त्यानें आपल्या परिस्थितीस कितपत चलन दिलें, तें चलन द्यावयास त्यास काय काय प्रयत्न करावे लागले, या व इतर गोष्टींचा त्यांत खल झाला पाहिजे. तर तें चरित्र मनोरंजक व ज्ञानदायक होतें. नाहीं तर त्यापेक्षां एखादी कादंबरीच लिहावी ! पण विवक्षित काळची खरी स्थिति दर्शविणारी कादंबरी लिहिण्यांत कौशल्य व पूर्व कालाशीं उत्तम परिचय लागतो. या दृष्टीनें पाहातां कादंबरी व चरित्र यांत बरेंच साम्य आहे.कारण अशा कादंबरीपासून तत्कालीन ऐतिहासिक स्थिति काय होती, हें चांगलें निदर्शनास येतें. पण अशा कादंबऱ्याही आमच्याकडे फारच थोड्या झाल्या आहेत. त्यांतही रा० हरि नारायण आपटे यांच्या कांहीं कादंबऱ्या वजा केल्या, कीं यथातथ चित्रें वठलेल्या कादंबऱ्या आमच्या वाङ्मयांत नाहींत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. यथातथ स्थिति दर्शविणाऱ्या कादंबऱ्या व चरित्रें यांत वर सांगितल्याप्रमाणें जरी साम्य आहे, तरी खऱ्या गोष्टींचा मनावर जो परिणाम होतो, तो कांदबऱ्या वाचून कधींही होणें नाहीं. ही चरित्रांतील उणीव अंशतः भरून यावी, या हेतूनें हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे, याची स्वतः लेखकासच शंका आहे. पण 'प्रथम प्रयत्न' या नात्यानें याचें परीक्षण होऊन 'अशा दिशेनें प्रयत्न चालू ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं' असा विद्वानांनीं आपला अभिप्राय दिला व वाङ्मयउपवनांत पुढें फिरण्याचें तिकिट—'पास'--दिलें, म्हणजे माझ्या श्रमांचें सर्वथैव साफल्य झालें असें मला संतोषपूर्वक वाटेल. आतां हें चरित्र कोणत्या ग्रंथधारें लिहिलें आहे तें सांगतों.

१ अहल्याबाईच्या चरित्रास खरा आधार म्हटला म्हणजे **सर जॉन मालकम** यांच्या A Memoir of Central India या प्रसिद्ध पुस्तकाचा होय. **मालकम** साहेबांच्या कानीं **अहल्याबाईची** स्तुति पूर्वीच गेली होती. कारण, तिचें नांव तिच्या हयातींतच साऱ्या हिंदुस्थानांत दुमदुमत होतें. पण **अहल्याबाईविषयीं** लोक ज्या गोष्टी सांगत, त्यांत कांहीं फारसें तथ्य असेल असें त्या साहेबांस पहिल्या प्रथम वाटलें नाहीं. कारण, लोकांस गोष्टी फुगवून सांगावयाची संवयच असे,व प्रत्यक्ष पाहावें तर कांहीं निराळाच प्रकार आढळून येई. असा त्याचा इकडील अनुभव होता. पण पुढें जेव्हां या साहेबाला मध्यहिंदुस्थानांत यावें लागलें, तेव्हां त्यानें या सर्वविश्रुत बाईच्या चरित्रासंबंधानें फार बारकाईनें चौकशी केली. हा साहेब **अहल्याबाईविषयीं** जसजसी अधिक माहिती मिळवूं लागला, तसतसा तो तिच्या कीर्तीस अधिकाधिक लुब्ध होऊं लागला. **मालकम** साहेबाच्या ठिकाणीं अंधश्रद्धा मुळींच नसून त्याची चिकित्सां बुद्धी, सत्याची आस्था व त्या पायीं लागणारी चिकाटी ही अत्यंत दांडगी असल्यानें त्यानें **अहल्याबाईची** माहिती जातीनें व ठिकठिकाणीं हिंडून फार श्रमानें मिळविली.**मालकम** साहेब हा आमच्या लोकांत अत्यंत लोकप्रिय असल्याकारणानें त्याच्याविषयीं लोकांत फारच आदर होता. यामुळें तोही आपल्या मंडळींत फारच मोकळेपणानें वागे. व लोकांनींही त्याला या बाईची माहिती मोकळे मनानें दिली आहे.त्या वेळीं **अहल्याबाईच्या** वेळचे लहानमोठे बरेच अधिकारी हयात असल्यानें त्यास तिची माहिती फारच चांगल्या रीतीनें व विश्वासार्ह अशी मिळाली. त्याची शोधकबुद्धि दांडगी असल्यानें त्यानें ही हकीकत फारच प्रयासानें मिळविली आहे. तो म्हणतो—

Aware of the partiality which was to be expected from infomation supplied by members and adherents of the Holkar family, regarding Ahalya Baee, facts were collected from other quarters to guard against the impressions, which the usual details of her administration are calculated to make. It was thought that the picture had been overcharged with bright colours, to bring it more into contrast with the opposite system that has since prevailed in the countries she formerly governed; but although inquiries have been made among all ranks and all classes, nothing has beeu discovered to diminish the eulogiums or rather bless-

ings, which are poured forth whenever her name is mentioned. The more indeed inquiry is pursued, the more admiration is excited.

या उताऱ्यावरून मालकमसाहेबानें अहल्याबाईची माहिती किती कष्टानें, काळजीनें व सत्याच्या जिज्ञासानें मिळविली हें व त्यावेळीं बाईविषयीं लोकमत काय होतें हें अत्यंत स्पष्ट होतें. हें पुस्तक वाचून रा० पारसनीस म्हणतात—

'ते तरवारबहादुरीमध्यें व मुत्सद्देगिरीमध्यें सारखेच निष्णात असल्यामुळें त्यांनीं जिज्ञासाबुद्धीनें व **राजकीय हेतूनें** माळवा प्रांतावर एक विस्तृत रिपोर्ट लिहिला. तोच पुढें इतिहासरूपानें प्रसिद्ध करण्यांत आला.

या वाक्यांतील " राजकीय " या शब्दाचा अर्थ काय ? रा. पारसनीस यांनीं ' राजकीय हेतु ' हे शब्द मोठे चमत्कारिक ठेवले आहेत. ' राजकीय ' हा शब्द ऐकला कीं, सरलता व सत्यता हीं सोडून कांहीं " काळेंबेरें " डोळ्यापुढें उभें राहातें. साहेबबहादुरांच्या हेतूबद्दल वरील उताऱ्यांत त्यांचे उद्गार आहेतच. हा साहेब किती स्पष्टवक्ता होता, त्याची सत्यप्रियता कशी होती, त्याचें धोरण किती उदात्त व उदार होतें, हें पाहावयाचें असेल तर त्यानें आपल्या इतिहासाच्या दुसऱ्या भागाच्या शेवटीं 'Let us therefore calmly proceed in a course of gradual improvement–' या उताऱ्यांत प्रदर्शित केलेले विचार पाहावे.

आतां हेही विचार "राजकीय हेतूनेंच " काढले आहेत असें म्हणणारा जर एखादा बहाद्दरगडी मिळाला तर "त्याचें हृदय क्षणभरही धरणें " कठीण आहे. या थोर मुत्सद्द्याचें चरित्र अत्यंत वाचनीय आहे. आमच्याकडे इतकीं भारूडभर चरित्रें होतात त्यांत या साहेबाचें चरित्र † प्रसिद्ध होऊं नये, हें मराठी भाषेचें दुर्भाग्य होय. असो.

वरील वाक्य लिहिण्यांत आपला कांहीं "राजकीय " ( पोलिटिकल ) हेतु नाहीं हें सांगण्यासच की काय रा. पारसनीस त्यापुढेंच म्हणतात––

' ह्या रिपोर्टामध्यें त्यांनीं अहल्याबाईची माहिती फार शोधपूर्वक लिहिली आहे. ' पुढें पहा––

'त्या वेळीं अहल्याबाईच्या वेळचे भारमल दादा, विठ्ठलपंत जोग वगैरे जुने लोक हयात होते; त्यांच्या तोंडच्या प्रत्यक्ष माहितीवरून व मुद्दाम तयार करविलेल्या बखरीवरून त्यांनीं अहल्याबाईचा वृत्तांत लिहिला आहे.'

---

† नाहीं म्हणावयास रा० ओकांच्या " महन्मणी मालेंत " या साहेबाचें लहानसें चरित्र आहे.

पण हें वाक्य **मा**लकम साहेबाच्या म्हणण्याशीं फारच विसंगत आहे. या वाक्यावरून काय अनुमान काढावयाचें ? इतक्या कसोशीनें, काळजीनें व सत्यापलाप होऊं न देतां **मा**लकम साहेबानें आपलें पुस्तक लिहावें व त्यावर रा. **पा**रसनीस यांनीं आपली लेखणी इतकी सैल सोडावी, तेव्हां इतिहासशास्त्र म्हणजे काय, हाच प्रश्न उपस्थित होतो ! ते पुढें म्हणतात—

"तो सुरस व आदरार्ह झाला आहे ह्यांत शंकाच नाहीं. परंतु त्याचें **इतिहास दृष्टीनें** निरीक्षण केलें तर त्यांत **अ**हल्याबाईच्या चरित्राचें खरें स्वरूप व त्यांतील **उत्कृष्ट** गुणांचें ( हे **दे**वाजीरावाच्या पत्रांत दिलेले कीं काय ! ) सरस चित्र ह्मणावें तसें उतरलें नाहीं, असें ह्मणावें लागतें. **अ**हल्याबाईचीं राजकारणें, तिचा व पेशवे दरबारचा संबंध, तिचें मुत्सद्दी धोरण... तिची राजनीति ...होळकरांचे गृहकलह, त्यापायीं झालेलें मराठ्यांच्या राजसत्तेचें अपरिहार्य नुकसान, ( असें जर होतें, तर मागच्याच ओळींत लिहिलेलें तिचें मुत्सद्दी धोरण व तिची राजनीति यांची तारीफ ती काय ? )...वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा ह्या चरित्रांत नुस्ता उल्लेखही नाहीं. ह्यापेक्षां **इतिहासदृष्टीनें ' हो**ळकरांच्या कैफियती ' मधील **अ**हल्याचरित्र अधिक महत्त्वाचें आहे; परंतु तें अपूर्ण आणि विसंगत आहे."

अशा अपूर्ण आणि विसंगत कैफीयतीपेक्षांही **मा**लकमचें चरित्र **इतिहासदृष्टीनें** हिणकस होतें व त्याचें चित्र सरस नव्हतें, तर त्या साहेबाच्या आधारानें इतर इंग्लिश लोकांनीं जीं चरित्रें लिहिलीं आहेत, त्यांतील उतारे देत बसण्यांत व स्तुति करण्यांत रा० **पा**रसनीस यांस कां बरें महत्त्व वाटावें ? ज्यांना तिचें यथार्थ स्वरूप कळलें नाहीं, त्यांचे उतारे देत बसण्यांत अर्थ काय ? वरील वाक्यांत " उल्लेखही " हा जो शब्द आहे त्यांतल्या '**ही**' चें महत्त्व काय ? हा उल्लेख **मा**लकम साहेबानें केला नाहीं म्हणून त्याचें चरित्र कमी प्रतीचें होतें काय ? बरें तें तसें होतें म्हणावें तर तें यथार्थ आहे असें रा. **पा**रसनीस हे स्वतःच म्हणतात ! पुनः आम्हांस असें सांगावयाचें कीं, **मा**लकमचा विषय ह्मणजे नुसतें **अ**हल्या–चरित्र नव्हता. मग त्यानें त्यांत प्रत्येक गोष्टीचा उल्लेख कोठवर करावा ? त्यास माहीत नसलेल्या गोष्टी पुष्कळ असतील, पण त्यायोगें जोंपर्यंत त्याच्या चरित्रावर निराळा ' प्रकाश ' पडत नाहीं, तोंपर्यंत तें अपूर्ण आणि विसंगत कैफियतीपेक्षां 'इतिहासदृष्टीनें' कमी प्रतीचें कां बरें व्हावें ? **मा**लकम साहेबानें **अ**हल्याबाईचें स्वतंत्र चरित्र लिहिलें नसून तें मध्यहिंदुस्थानच्या इतिहासाचा

एक भाग आहे. "इंग्लिशमेन ऑफ लेटर्स" या मालेंत सर लेस्ली स्टीफन्स या विख्यात ग्रंथकरानें जॉनसन् साहेबाचें चरित्र लिहिलें आहे. तें पुस्तक लिहिण्याचा हेतु मनांत न आणतां,त्यांत "बॉसवेल" मधला अमूक भाग नाहीं, असें म्हणून त्या उभय पुस्तकांची तुलना करणें, हा प्रकार चुकीचा होणार आहे. याप्रमाणें मालकम साहेबाच्या पुस्तकांतील व्यंगें काढून रा० पारसनीस पुढें म्हणतातः—

सर जॉन मालकमप्रभृति ग्रंथकारांनीं अहल्याबाईचें केलेलें स्तुतिस्तोत्र... हें किती यथार्थ आहे हें या पत्रांवरून सिद्ध होतें.

या वाक्यांचा वरील वाक्याशीं मेळ बसवावा कसा ? रा० पारसनीस यांस बाईच्या चरित्राची नवीन सामुग्री मिळाली. त्या आनंदाच्या भरांत आपलें भान विसरले असतां त्यांनीं हा लेख लिहिला असावा. नाहीं तर त्यांनीं एकाच लेखांत, इतक्या जवळ जवळ व इतकीं परस्परविरूद्ध विधानें खचित केलीं नसतीं. या आनंदाच्या भरांत मालकमनें अहल्याबाईची स्तुति स्तोत्र केलें आहे तें व त्यास आपलें दिलेलें अनुमोदन हेंही रा० पारसनीस विसरले आहेत! कारण त्यांनीं या बाईचें जें चित्र § रेखाटलें आहे, तें मालकमच्या चित्राहून फारच निराळें आहे. रा० धुरंधरकृत अहल्याबाईचें चित्र जितकें खऱ्या अहल्याबाईपेक्षां निराळें आहे, तितकेंच रा० पारनीसकृत बाईचें चरित्र मालकमकृत चरित्रापेक्षां निराळें आहे ! ! मग तीं दोन्हीं यथार्थ कशीं व्हावीं? मालकमसाहेव ह्मणतो—

The facts that have been stated of Ahalya Baee rest on grounds that admits of no scepticism. ( पुढील वाक्य या वाक्यावर टीप ह्मणून दिलें आहे. ) Independently of the numerous and authentic sources from which these facts are drawn, my duty led to my making, in detail, settlements and agreements with the same classes; and the minute evidence I have obtained regarding the acts and measures of the internal administration of Ahalya Baee, places its real character beyond all doubt.

( P P. 193-194. )

---

§ पान २३० वरील टीप पहा.

या वाक्यांतील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे. यावरून योग्य मत देण्याचा अधिकार, सत्यप्रियता, व इतिहास लिहिण्याची योग्यता, हे सारे गुण साहेब मजकुरांत उत्तम प्रकारें वास करीत होते याची चांगली साक्ष पटेल. या गुणांपैकीं नानांनीं पाठविलेल्या वकिलांत व देवाजीराव यांत जे गुण होते, ते मालकम साहेबापेक्षां फारच कमी होते. कारण त्या वकिलांनीं आपलीं पत्रें इतकी न्यायबुद्धि जागृत ठेवून निःपक्षपातानें लिहिलेलीं नाहींत. त्यांपैकीं पुष्कळ पत्रांत ग्राह्यांश आहे. पण जेथें त्यांनीं अहल्याबाईच्या व्यवस्थेंत दोष उत्पन्न होतो असे आरोप घेतले आहेत, तेथें त्या मुद्द्यांचा–असे मुद्दे फार थोडे आहेत ह्मणून व त्यांचा मालकमकृत पुस्तकांत किंचित्ही मागमूस नाहीं ह्मणून–दोन्ही बाजूंनीं विचार झाला पाहिजे. आपण स्वतः त्यास " अस्सल " पत्रव्यवहार ह्मटल्यानें त्यास कोणत्याही रीतीनें अस्सपणा प्राप्त होत नाहीं. असो. हा भाग बराच वाढला. पण रा. पारसनीस यांच्या लेखानें अहल्याबाईच्या चरित्राचा फार विपर्यास केल्यामुळें इतकें लिहिणें प्राप्त झालें.

मालकमसाहेबानें इतके परिश्रम करून या साध्वीचें चरित्र मिळविलें, हे त्याचे आह्मांवर अतोनात उपकार झाले. या ज्ञान-दानाची फेड कशानेंही भरून येणार नाहीं. हें चरित्र जर प्रसिद्ध न होतें, तर रामशास्त्री प्रभुणे यासारख्या लोकांची जी स्थिति झाली व आजही होत आहे तीच या साध्वीच्या चरित्राचीही झाली असती. दुसरें, रा. पारसनीस यांचें " सत्यस्वरूप " फारच एकांगी झाल्यानें तुकोजी अगदीं खालीं गेला असता तो वर यावयास मुकता, व त्याच्या कपाळीं कृतघ्न व राज्यबुडव्या हा कायमचा शिक्का मात्र लागता. आमच्याकडे इतिहासाची सामुग्री जितकी शुद्ध पाहिजे तितकी मिळत नसल्यानें कांहीं पाश्चात्य ग्रंथकार किंवा अर्धवट माहिती मिळवून इकडचे आधुनिक ग्रंथकार मागील व्यक्तींच्या कपाळीं जें काय लिहितील तें खरें ! मग प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें त्यांच्या जरी कपाळीं निराळेंच लिहिलें असलें, तरी तें त्यास मागें घ्यावें लागतें ! असा या शिक्यांचा अजब प्रभाव आहे ! पण त्यास कांहीं इलाज नाहीं. दादोजी कोंडदेवासारखा कारकून घरीं शिकवावयास असूनही ग्रँन्ट डफनें शिवाजीच्या कपाळीं जो टोणपेपणाचा शिक्का मारला आहे, तो अजूनही निघतां निघत नाहीं. डफ साहेबानें हें विचित्र विधान सहज केलें–व कांहीं एक आधार न देतां केलें आहे ! तो काफीखानाचा आधार

वारंवार घेतो, पण येथें त्यास तो घ्यावासा वाटला नाहीं. काफीखानानें शिवाजीच्या तोंडीं—

If I live, reach home, and write to you in my hand, then convey Sambha to me by the road and in the manner I shall indicate."

असें वाक्य घातलें आहे. तें प्रो० जदुनाथ सरकार यांनीं आपल्या शिवाजी या लेखांत घेतलें आहे. पण त्यावर सरकार निःशंकपणें टीप देतात—

I presume, Khafikhan forgot (!) that Shiva was illiterate. But he may have meant affixing the seal.

Modern Review, August 1907.

ह्मणजे दोन आणि दोन चार हें जितकें खरें तितकेंच शिवाजी टोणपा हें खरें ! रा० राजवाडे यांनीं शिवाजीच्या साक्षरतेचे उत्तम लेख लिहिले आहेत. पण ते कोणासाठी कोण जाणे ! जे रानडे, भांडारकर, तेलंग, टिळक यांनीं इंग्रजीमध्यें ग्रंथ लिहीले ह्मणून त्यांस नांवें ठेवणार, ते स्वतः इंग्रजीमध्यें किती लिहिणार हें उघडच आहे ! त्यांनीं या गोष्टी मुळीं देवाधीनच ठेवल्या आहेत. लोकांस कांहीं नवीन कळावें ही जर त्यांची इच्छा असेल, व ती असलीच पाहिजे, तर त्यांनीं आपल्या आग्रही स्वभावास कांहीं तरी निराळें वळण द्यावें अशी त्यांस सविनय सूचना आहे. एकंदरींत सांगावयाचें तें हेंच कीं, आमच्याकडील थोर लोकांच्या चरित्राचा जो गोंधळ झाला आहे, तो कांहीं विचारावयास नको. मालकमसाहेब जर या साध्वीचें चरित्र न लिहिता, अथवा तें लिहून त्यांत आपल्या परिश्रमाचा तो जर त्यांत उल्लेख न करता, तर या साध्वीच्या चरित्राचे फार हाल झाले असते. अशा स्थितींत मालकमसाहेबाच्या परिश्रमाची तारीफ करावी किंवा बाईच्या नशिबाची स्तुति करावी, काय करावें तें सुचत नाहीं. बिल्हण कवीनें ह्मटलें आहे कीं—

लंकापतेः संकुचितं यशो यत्। यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः ॥
स सर्व एवाद्यकवेः प्रभावः ........................... ॥

हेंच थोड्या बहुत फेरफारानें या विख्यात आंग्ल इतिहासकाराविषयीं आह्मांस म्हणावेंसें वाटतें. अहल्याबाईच्या चरित्रासंबंधानें जे थोडे बहुत इतर प्रयत्न झाले आहेत, ते याच ग्रंथाधारें झाल्यामुळें या ग्रंथास अग्रमान दिला पाहिजे हें उघड आहे.

(२) ग्रॅन्ट डफच्या इतिहासांत या बाईबद्दल थोडी माहिती आहे.

( ३ ) जी. आर. ॲबेरे मॅके या नांवाचा एक युरोपिअन गृहस्थ इंदूर येथील राजकुमार कॉलेजाचा प्रिन्सिपॉल होता. त्यानें The Chiefs of Central India या पुस्तकांत अहल्याबाईची माहिती फार चांगल्या रीतीनें व चटकदार दिली आहे. ती बहुतेक मालकम साहेबाच्या ग्रंथाधारेंच दिली आहे.

( ४ ) सर रॉबर्ट हॅमिल्टन यांच्या कारकीर्दीत मिसेस जोना बेली या एका आंग्ल कवयित्रीनें "अहल्याबाई" या नांवाचें एक अत्यंत सुंदर व मधुर काव्य लिहिलें आहे. हें काव्य मालकम साहेबाच्या ग्रंथाधारेंच लिहिलें आहे. या काव्यांतील एक उतारा तेराव्या भागाच्या शेवटीं दिला आहे. व एक पुरवणींत दिला आहे.

( ५ ) Heroines of Ind या नांवाचें एक पुस्तक कलकत्त्याचे जाडे विद्वान् व फारच दांडगे ग्रंथकार जे बाबू मन्मथनाथ दत्त, M. A., M. R. A. S. यांनीं लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं या बाईचें १० पृष्ठांचें चरित्र लिहिलें आहे. त्यांतील अल्प स्वल्प दोष वजा जातां हें पुस्तक बरें झालें आहे.

(६) सेन्ट्रल इंडिया गॅझेटिअर या मालेंत इंदूर संस्थानासंबंधीं एक पुस्तक आहे, त्यांत या बाईचें एक लहानच पण सुंदर चरित्र आहे.

( ७ ) सुमारें चार पांच वर्षांपूर्वीं Dawn या मासिक पुस्तकांत मीं या बाईचें एक लहानसें चरित्र वाचलें आहे. पण तो अंक सध्यां हातीं नसल्यानें त्याविषयीं कांहीं लिहितां येत नाहीं.

( ८ ) 'रिप्रेझेन्टिटव्ह मेन् ऑफ सेन्ट्रल इंडिआ' या पुस्तकांत मध्यहिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाडे यांची त्यांच्या पूर्वजांसह सचित्र माहिती आहे. या पुस्तकाचा सुमारें अर्धा भाग शिंद्यांनीं व्यापला आहे. पण त्यांच्याच तोडीचे होळकर यांची या पुस्तकांत यथायथाच माहिती आहे! ही उणीव अंशतः 'सॅव्हेनूर ऑफ इंदूर' या पुस्तकानें भरून आली आहे. या पुस्तकांत अहल्याबाईसंबंधीं कांहीं हकीकत दिली आहे.

याशिवाय लहानमोठ्या चरित्रांत व इतिहासांत तिचा थोडा बहुत वृत्तांत दिला आहे. एका विख्यात आंग्ल लेखकानें ह्मटलें आहे—*

It is strange that so great a name as that of Ahalya Baie should have no mention in the pages of modern Indian history.

* विविधज्ञानविस्तार, वर्ष, १९०७, पान १३९.

इतिहासाचा हेतु लक्षांत घेतां या लेखकाचें ह्मणणें सर्वथैव खरें आहे, असें ह्मटलें पाहिजे. लहानसहान इतिहासकार तर सोडूनच द्या, पण बिव्हरीजसारखे हिंदुस्थानच्या इतिहासावर नऊनऊशें पृष्ठांचे तीन लठ्ठ भाग लिहिणारेही अहल्याबाईविषयीं सारा अर्धापानभर मजकूर देतात ! व तोही धड नीट नाहीं ! सर लोपर लेथब्रिज, रमेशचंद्र दत्त, हरप्रसाद शास्त्री यांनीं थोडाबहुत मजकूर तरी दिला आहे. पण अलीकडचे इतिहासकार तर तिचें नांवच गाळतात ! ही मात्र खरी सुधारणा ! हैदर, टिपू यांसारख्या लोकांस वाटेल तितकी जागा मिळते, पण ती अहल्याबाईस मिळूं नये हा उलटा न्याय होय. ही गोष्ट विदेशीय ग्रंथकारांची–विशेषतः इंग्लिश इतिहासकारांची–झाली. पण आमच्याकडील इतिहासकारांची तर याहूनही अधिक शोचनीय स्थिति आहे. त्यांच्या पुस्तकांत प्रसिद्ध पुरुषांत उमीचंद, मीरकासीम इत्यादि लोक हक्कानें बसतात ! पण त्या लोकांत या बाईस स्थळ नाहीं ! पण हें एका अर्थी अभिनंदनीयच आहे. कारण, प्रसिद्ध पुरुषांत जेथें उमीचंदाची गणना होते, तेथें हे लोक अहल्याबाईची योजना करीत नाहींत, ही त्यांची गुणग्राहकताच समजावयाची ! अलीकडील सुप्रसिद्ध इतिहासकार रा. सरदेसाई यांनीं " शालोपयोगी भारतवर्षांत " तिच्याविषयीं दोन चार ओळी लिहिल्या आहेत. पण या पुस्तकापेक्षां सर रोपर यांचे पुस्तक लहान असूनही त्यांत या बाईविषयीं अधिक व सहृदय मजकूर दिला आहे. ही गोष्ट व ह्या बाईचें महत्त्व लक्षांत आणून रा. सरदेसाई हे आपल्या पुस्तकांच्या पुनरावृत्तींत या बाईस अधिक जागा देतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. आतां या विषयावर मराठींत काय काय प्रयत्न झाले तें सागतों–

१. या विषयावर पहिल्या प्रथम साधारणपणें आमच्या माहितींत कैलासवासी पंडित कृष्णशास्त्री चिपळूणकर या पहिल्या पिढींतील ग्रंथकारानें " अनेक विद्यामूलतत्त्वसंग्रह " या पुस्तकांत " अहल्याबाई होळकरीण " या विषयावर अकरा पानांचा एक सुंदर, उपयुक्त व मनोरंजक निबंध लिहिला आहे. त्यापूर्वी ह्मणजे इ. स. १८५३ सालीं ग्रॅन्ट डफ याच्या इतिहासाचें मराठी भाषांतर शिळा छापखान्यांत छापून निघालेलें आमच्या पाहण्यांत आलें आहे. पण त्यांत अहल्याबाईसंबंधाचा उल्लेख असूननसून सारखाच असल्यानें शास्त्रीबोवांच्या लेखानेंच ह्या बाईच्या चरित्राची मराठी भाषेंत भर पडली. तसें कविवर्य मोरोपंत यांनीं मराठीं भाषेंत तिचें नांव अजरामर केलेंच होतें. पण चरित्रात्मक असा पहिला लेख शास्त्रीबोवांचाच होय. शास्त्रीबोवांनीं हा लेख मालकम साहेबाच्या ग्रंथाधारें मोठा आटपशीर व उत्कृष्ट असा लिहिला आहे.

२. त्याच वर्षी ह्मणजे इ. स. १८७१ सालीं श्री० तुकोजीराव महाराज होळकर यांनीं आपल्या शिक्षणखात्याचे अधिकारी ( नंतर जज्ज, दिवाण, रावबहादूर, इ० ) रा० विनायक जनार्दन कीर्तने यांच्याकडून सर जॉन मालकम याच्या इंग्रजी पुस्तकाचें आधारें " मध्याहिंदुस्थानचा इतिहास " मराठींत आणवला. आपल्या घराण्याचा इतिहास चांगला लिहून निघावा, ह्मणून महाराजांनीं एक कचेरीही स्थापली होती. पण त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें तो बेत तसाच राहिला. महाराजांना अहल्याबाईचा अत्यंत अभिमान होता. "मध्यहिंदुस्थानचा इतिहास" हें त्याचें अल्प द्योतक आहे.

३. " काव्येतिहाससंग्रह" या अत्युत्तम मासिक पुस्तकांत 'होळकरांची कैफियत' छापून निघाली. त्यांतील अहल्याबाईचे कारकीर्दीतील ३६ बंद गाहाळ झाले होते ! रा० साने यांनीं या मासिकांत जीं पुस्तकें छापविलीं तीं अत्यंत काळजानें, टापटिपीनें व टिपा देऊन छापविलीं ही गोष्ट रा० पारसनीस यांनीं मनांत वागवून " इतिहास-संग्रह " छापवला, तर तो सामान्य वाचकांस मनोरंजक व उपयुक्त होईल. हे बंद रा० पारसनीस यांनीं "इतिहाससंग्रहां "त छापवून महाराष्ट्र वाचकांवर मोठे उपकार केले आहेत, यांत शंका नाहीं. ही कैफीयत गोविंदपंताचा (हा बाईचा खाजगी कारभारी होता. याचा उल्लेख पुढें चरित्रांत आला आहे. ) मुलगा गोपाळपंत गानु यानें लिहिली. गोपाळपंत हाही आपल्या बापाप्रमाणेंच मोठा चांगला मनुष्य होता. याने अहल्याबाईचे दिवस पाहिले असून तो तुकोजीराव महाराजांच्या अज्ञान दशेंत " काउन्सील ऑफ रिजन्सी " मध्यें होता.

४. हिंदुस्थान कथारस या शालोपयोगी पुस्तकांत होळकरांच्या वंशावर एक व अहल्याबाई होळकरीण इच्यावर एक असे दोन पाठ घातले आहेत. हें पुस्तक रा० विनायक कोंडदेव ओक यांनीं लिहिलें आहे, इतकें सांगितलें ह्मणजे त्यासंबंधानें अधिक लिहिणें नको.

५. रा. गजानन चिंतामण देव,बुक-सेलर, पब्लिशर, नाटककार इ० यांनीं या साध्वीचा शतसांवत्सरिक योग साधून " अनेक इंग्रजी व मराठी ग्रंथाधारें " एक चरित्र लिहिलें आहे. गजाननरावांनीं आपल्या चरित्राच्या आधारास कोणते इंग्रजी व मराठी ग्रंथ घेतले आहेत तें हरि जाणे ! या पुस्तकांत इतकी अजब माहिती आहे कीं, ती रा० पारसनीस, बा० ना० देव इ० मोठ्या लेखकांच्या अवलोकनांत वा इतरत्र आढळली नाहीं, मग ती आमच्या पाहण्यांत

कोठून असणार ! या पुस्तकाचा जन्म कल्पनासृष्टींतच झाल्यानें त्याला ऐतिहासिक दृष्ट्या मुळींच किंमत नाहीं. त्यापेक्षां रा० देव हे अहल्याबाईवर संगीत नाटक रचते तर बरें होतें !

६ वे० शा० रा० रा० राजारामशास्त्री भागवत यांनीं तीन लहान चरित्रें एकत्र छापविलीं आहेत. त्यांत या स्त्रीचें एक लहानसें चरित्र आहे. ( बाकीचे दोघे: शिदोजी निपाणकर व रत्नाकरअप्पा. ) हें चरित्र नुसत्या कैफियतीच्याच आधारें लिहिलें असल्यानें तें तुटक, क्लिष्ट व अस्पष्ट असें झालें आहे. हें पुस्तक लिहितांना शास्त्रीबोवांनीं मालकमचें पुस्तक कां पाहिलें नाहीं कोण जाणे !

७. मराठींतील प्रसिद्ध ग्रंथकार रा विनायक रामचंद्र टिकेकर उर्फ 'धनुर्धारी' यांनीं ' महाराष्ट्र कुटुंबसंग्राह्य पुस्तकावलींत " या बाईचें एक लहानसें चरित्र लिहिलें आहे. रा० टिकेकर हे सुभेदार मल्हारराव होळकर या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत ह्मणतात, " थोडक्यांत चटक लागून जास्त व संपूर्ण माहिती वाचावी अशी जिज्ञासा अगोदर उत्पन्न करणें एवढाच अशा प्रकारचीं पुस्तकें लिहिण्याचा उद्देश आहे, तो साधण्याकडे लक्ष देणें आवश्यक होय. " कै. धनुर्धारी यांचा उद्देश चांगला सिद्धीस गेला आहे. ह्या पुस्तकाचें नांव 'आमच्यांतील एक अमोलिक स्त्रीरत्न—देवी अहिल्याबाई होळकरीण' असें आहे.

८. इंदूर येथील ' इंग्रेजी मदरशाचे ' माजी शिक्षक कै० अनंत केशव चितळे वाईकर, संपादक माजी ' कादंबरीकल्पद्रुम' 'यांनीं भारतवर्षीय युवतिरत्नमाला' या नांवाचें एक उपयुक्त पुस्तक लिहिलें आहे. त्यांत या साध्वीचें चरित्र आहे. हें पुस्तक कुलीन स्त्रियांनीं तर एकदां अवश्य वाचावें.

९. रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांनीं "ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती " या संग्रहणीय पुस्तकांत या बाईची अल्प माहिती दिली असून शिवाय दोन गोष्टी दिल्या आहेत.

१०. रा. हरि मोरेश्वर शेवडे यांनीं अहल्याचीरत्र—काव्य लिहिलें आहे.

११. रा. गोविंद एकनाथ गोसावीकृत "श्रीमति अहल्याबाईसाहेब होळकर' हें काव्य प्रासादिक व मधुर आहे.

हीं शेवटलीं दोन पुस्तकें अर्थात् पद्यमय आहेत. त्यांतील कविकल्पना एकीकडे राहोत पण तीं रा. ग. चिं. देव यांच्या पुस्तकाच्या आधारानें लिहिलीं असल्यानें त्यांत खोटी माहिती बरीच आली आहे.

१२. रा० बा० ना० देव यांनीं इंदूर येथील ब्राह्मसमाजांत अहल्याबाई होळकर या विषयावर एक व्याख्यान दिलें होतें तें त्यांनीं १९०५ सालीं विविधज्ञानविस्तार या जेष्ठ व श्रेष्ठ मासिकाच्या नवव्या अंकांत छापविलें. हा निबंध मोठा भारदस्त असून त्यांत अहल्याबाईच्या कारकीर्दीचा अनेक बाजूंनीं विचार केला आहे. त्यामुळें तो फारच उत्तम वठला आहे. रा० देव यांनीं या बाईच्या चरित्राची मीमांसा व उपपत्ति फारच मार्मिक रीतीनें केल्यामुळें आजपर्यंत मराठींत या विषयावर जितके ह्मणून प्रयत्न झाले, त्या साऱ्यांत हा निबंध फारच चांगला साधला आहे.

१३. वरील निबंधाच्या प्रेरणेनें रा० पारसनीस यांनीं " अहल्याबाईच्या चरित्राचें सत्यस्वरूप" हा निबंध विस्ताराच्या १९०७ सालींच्या पांचव्या अंकांत प्रसिद्ध केला. रा० पारसनीस यांचे इतिहासासंबंधीं अविश्रांत परिश्रम प्रसिद्धच आहेत. व्यवसाय बाहुल्यामुळें व घाईघाईनें प्रस्तुतचा निबंध लिहिला असल्यामुळें हा निबंध त्यांच्या लौकिकास साजेलसा वठला नाहीं. त्यांतही विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, या नेमस्त ग्रंथकारानें तुकोजीविरुद्ध व अहल्याबाईविरुद्धही आपलें शस्त्र इतक्या जहालीनें चालविलें आहे कीं, तितकें तिच्या शत्रूंनींही चालविलें नाहीं! रा० पारसनीस यांचा लेखनव्यवसायांतील नेमस्तपणा इतका घसरावा, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय.

१४. रा० बा० ना० देव यांनीं १९११ सालीं वरील मासिकांत व वरील विषयावर पुनः एक निबंध लिहिला आहे. त्यांत रा० पारसनीस यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाचें अत्यंत मार्मिकतेनें, पायाशुद्धा रीतीनें व सप्रमाण खंडण केलें आहे.

रा० देव यांचे दोन्ही निबंध अत्यंत वाचनीय झाले आहेत, हें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. इतिहासाचा अभ्यास करणारांनीं ते अवश्य वाचण्याजोगे आहेत.

१५. रा० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं माजी " सरस्वतीमंदिर " या द्वैमासिकांत " होळकरांच्या वंशावळी " हा लेख लिहिला आहे. त्यांतील वंशावळीचा व प्रशस्तीचा या लेखकास पुष्कळ उपयोग झाला आहे.

१६ " महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें " भाग पहिला. या पुस्तकांत पुणें दरबारचा वकील विठ्ठल शामराज ह्याचीं पत्रें आहेत. त्यांतील पक्षाभिमान सोडला, तर हीं पत्रें फारच मार्मिक असून त्यांत बारीकसारीक गोष्टीही दिल्या

आहेत. त्याची वर्णन करण्याची हातोटी चांगली असून पत्रें रसभरित आहेत. हा लेखक धोरणी व दूरदृष्टीचा आहे.

१७. "महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें" भाग दुसरा. हीं पत्रें केसो भिकाजीनें लिहिलीं आहेत. हींही पत्रें चांगलीं आहेत.

ह्या दोन्ही लेखकांची कांहीं पत्रें एकाच विषयावर आहेत. ह्या पत्रांतील व कैफियतींतील कांहीं भाग एकाच विषयावर असल्यानें, त्याची छाननी करणें अवश्य आहे. व तें काम रा० पारसनीस, सरदेसाई, राजवाडे, यांसारख्या कोणी तरी मोठ्या गृहस्थानेंच हातीं घेतलें पाहिजे. रा० पारसनीस यांनीं पहिला भाग छापवितांना बहुतेक सालाच्या आरंभीं कांहीं सूचना केल्या आहेत. पण दुसरा भाग छापवितांना त्यांनीं हा क्रम सोडला आहे, असलीं पुस्तकें वाचावयाची इतर लोकांसही गोडी उत्पन्न व्हावी,यासाठी रा० साने यांनीं ज्याप्रमाणें आपण प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत टीपा देऊन तीं सुलभ केलीं आहेत, त्याप्रमाणें रा० पारसनीस यांनींही टीपा देऊन आपलीं पुस्तकें सामान्य वाचकांस उपयुक्त करावींत, अशी त्यांस माझी विनंती आहे. आज वाचकवर्गास आपली जबावदारी नीट कळत नाहीं, अशा वेळीं ते या मौल्यवान् पुस्तकाकडे कितीसे पाहणार, हें स्पष्टच दिसत आहे. अशा वेळीं, मला वाटतें, जुनीं पत्रें प्रसिद्ध करणारांनीं आपल्या वांट्यास आणखी थोडी झीज व जबाबदारी घेतली पाहिजे. याशिवाय दुसरा कांहीं मार्ग असल्यास तो घ्यावा. वरील पत्रांत 'इकडील मजकूर,' 'गुलजारखानाचा मजकूर' इत्यादि वाक्यें आहेत, तीं ठळक टाईपांत द्यावीं, म्हणजे वाचकांची अधिक सोय होईल असें वाटतें. या सूचनांच रा० पारसनीस यांनीं अवश्य विचार करावा.

१८. रा. रावजी विठ्ठल पुणेकर यांनीं या विषयावर एक चरित्र प्रसिद्ध केलें आहे. हें पुस्तक बरेच वर्षांपूर्वी छापलें असून मीं त्याची स्तुतिही ऐकली आहे. पण या पुस्तकाचा मी बराच शोध करूनही मला तें पाहावयास मिळालें नाहीं.

याप्रमाणें मराठी भाषेंत मला माहित असलेलीं पुस्तकें सांगण्यांत आलीं. याशिवाय अहल्याबाईचीं इतर भाषेंत चरित्रें लिहिलीं आहेत. हिंदी क्रमिक पुस्तकांत व गृहलक्ष्मी या हिंदी मासिकांत तिचें चरित्र आलें आहे. त्याचप्रमाणें प्रसिद्ध बंगाली लेखक बाबू एन्. एन्. घोष यांनीं तिचें बंगाली भाषेंत चरित्र लिहिलें आहे.

याशिवाय तिचा संबंध ज्या पुस्तकांत आला आहे, तीं पुस्तकें व या चरित्रांत ज्या व्यक्तींचा संबंध आला आहे, त्यांची चरित्रें, हें पुस्तक लिहितांना मला फार उपयोगीं पडलीं आहेत. त्यांचा नामनिर्देश करून आधींच पुष्कळशी अडलेली जागा आणखी अडवीत नाहीं.

अहल्याबाईसंबंधीं इतकीं पुस्तकें मराठींत असतां आणखी हें नवीन पुस्तक लिहिण्याचें प्रयोजन काय, असा जर कोणीं वरील यादी वाचून प्रश्न केला, तर त्यास माझें उत्तर असें आहे, या चरित्राची निवड करण्याचें मोठें कारण **आवड** हें आहे. अहल्याबाईसारखी आसेतुहिमाचल भारतवर्षास ललामभूत होऊन बसलेली स्त्री, तिचें चरित्र कोणास वर्णावेंसें वाटणार नाहीं ? गीतेवर इतक्या टीका झाल्या तथापि त्या आणखी सारख्या होतच आहेत ! याचें जें कारण तेंच हें चरित्र पसंत करण्याचें कारण आहे. ( २ ) मराठींत तिच्या संबंधानें इतकें लिहिलें आहे, पण तें एकत्र असें एकाही पुस्तकांत नाहीं. शिवाय तिचें एकही लहानसहान चरित्र आज विकत मिळत नाहीं. ( ३ ) अजूनपर्यंत प्रकाशित न झालेला भागही या चरित्रांत आला आहे.

या लेखांत कैफियतींतील, महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांतील व इतर पुष्कळ पुस्तकांतील उतारे घेतले आहेत. त्यांपैकीं कांहीं उतारे जसेच्या तसेच घेतले आहेत, कांहीं उताऱ्यांत ' बाई बोलली जे ' यांतील ' जे ' ऐवजी ' कीं ' घातलें आहे, कांहींत थोडे शब्द पुढें मागें केले आहेत व कांहीं मोठे भाग पूर्वीचीच भाषा कायम ठेवून अलीकडील पद्धतीनें लिहिले आहेत. कैफियतींतील (व क्वचित इतर ठिकाणचेही ) उतारे सुगम व्हावे, यास्तव कंसांत शब्द घातले आहेत, कांही जागीं कंसांत अर्थ दिला आहे, व कांहीं जागीं टीपेंत दिला आहे. कांहीं उताऱ्यांत जाड अक्षरांत वाक्यें घातली आहेत, तीं मुळ पुस्तकांत नाहींत. याप्रमाणें लहान सहान फेरफार केले आहेत.

**मुंबई** आषाढ शुद्ध ८.
शके १८३४.

**पुस्तककर्ता**

कै. द वा. पोतदार;
संग्रह



श्रीमंत महाराजाधिराज राजराजेश्वर सवाई
तुकोजीराव होळकर.

# देवी श्री अहल्याबाई.

भाग पहिला.

## होळकरांचा अभ्युदय.

वीरो महान् योधगणेषु मुख्यो । बलाधिपः शास्त्रविधानसुज्ञः ॥
सदा यशस्वी सततं समर्थो । मल्हारिरावो विदितः पृथिव्याम् ॥

होळकरांचें राज्य मुख्यत्वेंकरून मध्यहिंदुस्थानांत माळवा व नेमाड या प्रांतांत आहे. या घराण्याचा मूळ पुरुष मल्हारराव होळकर हा होय. होळकरांचे पूर्वज पहिल्या प्रथम *मथुरेंत रहात असत. नंतर ते मेवाड येथें कांहीं दिवस राहून नंतर दक्षिणेंत आले. होळकरांच्या जातीसंबंधानें अलीकडे एक वाद उत्पन्न झाला आहे. यासंबंधानें रा० राजवाडे यांनीं माजी

* Indore State Gazetteer Vol II, p. 12.

" श्रीसरस्वतीमंदिर " या द्वैमासिकांत* 'होळकरांच्या वंशावळी' हा लेख लिहिला आहे. त्यांतून एक महत्त्वाचा उतारा येथें घेतों. रा० राजवाडे यांना ह्या वंशावळी महेश्वर येथें सांपडल्या.—

" पैकीं पाहिली वंशावळ जुनी व अस्सल असून दुसरी नवी आहे.........दुसरी वंशावळ तुकोजीराव महाराजांच्या आज्ञेवरून बनविली आहे.........दुसऱ्या वंशावळीचा हेतु होळकर रजपूत आहेत, असें दाखविण्याचा आहे. (दुसऱ्या वंशावळींत नीट मेळ बसत नाहीं याचें रा० राजवाडे यांनीं चांगलें विवरण केलें आहे. पण तें येथें स्थलसंकोचास्तव देतां येत नाहीं.) परंतु हें मत अहल्याबाई होळकरणीस पसंत नव्हतें. तिच्या आज्ञेनें 'अहल्या कामधेनू' नांवाचा धर्म-ग्रंथ झाला. त्यांत अहल्याबाईच्या शूद्रत्वासंबंधाचा ऊहापोह केला आहे. "

पहिल्या वंशावळींत ह्मटलें आहे:—

श्री कुलस्वामी देव खंडेराव व ह्माळसाबाई व बानाबाई, गड जेजुरी, जानोबाई, तळ कोंकण. धरमपुरीं भवाणी, तुकाई तुळजापूरची. तिसरी, यमाई कवठ्याची. चौथी, राजोबाई कवड्या डोंगरची. बीरोबाह्मळोबा दोडिदाणुरीचा. बहिरोबा सोनेरीचा. वहेरजी नायकजी चिंगयादेव तळकोंकणचा. बोहोळ मुरमाची सटवाई. वाफगांवची उदेगिरी सटवाई. माणकेश्वरची सटवाई. आहायरानीं महाराना देव खंडेरावाचे गोंधळांत कुंभारांनीं ढाहग वाजवावी. कुळ, वीरकर. वीरवाल्ह्याचा वीरकर. दुसरें आडनांव होळकर. कुळगोत्र, जयवसी देवरुसी, कपिला गोकुळ मथुरा. दुसरी वस्ती, चितोडगड. तिसरी वस्ती, मुंगीपयठण. चौथी, वीरवोहोळ. पांचवी वस्ती, वोहोळ

* ज्येष्ठ शाके १८२७, वर्ष ५, अंक २.

मुरुम, मोगलाई आहे. सहावी वस्ती, वाफगांव, पाटिलकी आहे. सातवी वस्ती, कातराबाद माडवगण, पाटिलकी आहे. आठवी वस्ती, चांदवड. नववी वस्ती महेश्वर नर्मदाकांठीं. दहावी वस्ती इंदूर.

"आतां वंशवेल:- बाजू मूळ पुरुष मळिवाचा;....खंडूजी घरीं स्त्री गंगाबाई दुसरें नांव जिऊबाई गवळ्याची. कुळीं पुत्र मल्हारी, घरीं स्त्री गौतमाबाई, दुसरी बनाबाई, तिसरी द्वारकाबाई, चौथी हरकूबाई, खांडाराणी. कुळीं पुत्र खंडेराव महाराज, कन्या उदाबाई, दुसरी सीताबाई. खंडेराव महाराजघरीं स्त्री अहल्याबाई सिंद्याची; दुसरी पाराबाई वाघाची; तिसरी प्रीताबाई; चौथी सुरताबाई; पांचवी पोपाबाई खांडाराणी. कुळीं पुत्र मालेराव महाराज, कन्या मुक्ताबाई ताईसाहेबा. मालेराव महाराजघरीं स्त्री मयनाबाई बाहाडाची, दुसरी प्रीताबाई वाघाची. मालेराव महाराज कयलासवासी जाहले तेव्हां पुढें वंश नाहीं असें जाणून, अहल्याबाई याणीं ज्यानोजी बावाचा मुलगा नामें तुकोजी याजला वोटींत घेऊन गादीवर बसविलें....."

या उताऱ्यावरून होळकरांची थोडीबहुत पूर्व माहिती व त्यांची वंशावळ कशी काय लिहिली आहे, हें वाचकांस कळेल. रा. राजवाडे यांच्या मतें दुसऱ्या वंशावळींतील पहिलीं तेरा नांवें चुकलीं आहेत व इंदूर संस्थानचे "गॅझेटिअर" मध्यें हीं पहिलीं तेरा नांवें गाळलीं आहेत.

होळकरांचें घराणें वीस पंचवीस ठिकाणीं पसरलें आहे. पण त्यांपैकीं प्रस्तुत घराण्याचे पूर्वज हे पहिले वाफगांवीं रहात असून नंतर ते फलटन परगण्यांत पुण्यापासून चाळीस मैलांवर नीरा नदीचे कांठीं होळ ह्मणून जें एक खेडें आहे तेथें आले. यांचें पहिलें नांव वीरकर असें होतें. नंतर त्यांचें होळ या गांवावरून

होळकर असें सार्थ नांव पडलें. या होळ गांवीं खंडोजी या नांवाचा एक गृहस्थ रहात असे. तो चौगुला–ग्रामाधिकारी–होता. याची जात धनगर. याची माहिती मुळींच मिळत नाहीं. तथापि त्या वेळची चौगल्यांची स्थिति पाहतां खंडोजी हा मोठा साधा गृहस्थ असून त्याचें नांव गांवांतील चार संभावित लोकांत मोडलें जात असावें. या चौगुल्याला मल्हारी या नांवाचा एकुलता एक मुलगा होता. त्याचा जन्म रामनवमीस ह्मणजे चैत्र शुद्ध नवमी संवत १७५० दुपारीं बारा वाजतां ( १५ अथवा १६ मार्च इ. स. १६९३ ) झाला. खंडोजी हा आपला, मुलगा अवघा तीन वर्षांचा असतांनाच वारला. ही संधि साधून त्याच्या भाऊबंदांनीं त्याचें सारें कांहीं गिळंकृत केलें. पण हें कांहीं आमच्या समाजांतील भाऊबंदकीच्या विरुद्ध नव्हे. इतकेंच नव्हे, तर खंडोजीच्या भाऊबंदांनीं असें जर केलें नसतें, तर तें मात्र आमच्या स्वभावाविरुद्ध झालें असतें ! अशा दुःसह स्थितींतही खंडोजीची बायको जीवाई ही सासरीं राहिली असती; पण हे भाऊबंद, असल्या भाऊबंदकींत, प्रसंग पडल्यास आपल्या एकुलत्या एक पोराचा प्राणही घेण्यास कमी करणार नाहींत, या भीतीनें ती निराश्रित बाई आपला भाऊ जो भोजराज त्याच्या घरीं मुलासह गेली.

खानदेश जिल्ह्यांत सुलतानपूर ह्मणून एक परगणा आहे. त्या परगण्यांत तळोदें ह्मणून जें गांव आहे तेथें साबाजी बावा या नांवाचा चौगुला होता. त्याचा मुलगा वर सांगितलेला भोजराज हा होय. त्याचें कंठाजी कदम बांडे यांच्या पागेंत पंचवीस स्वारांचें पथक होतें. त्यानें आपल्या बहिणीची निराश्रित स्थिति लक्षांत आणून तीस आपल्या भाचासह घरीं ठेविलें. मल्हारीनें आपल्या

मामाच्या घरीं मेंढरें चारावयाचें काम कांहीं काल केलें. या वेळीं तो सुमारें आठ वर्षांचा होता. एके दिवशीं नित्याप्रमाणें मेंढरें चारावयास नेलीं असतां, तें पोर ऐन दुपार ह्मणून थकलें व विश्रांतीसाठीं ह्मणून एका विस्तीर्ण वृक्षाखालीं निजलें.† आधींच उन्हानें

† रा० एकनाथ शास्त्री यांनीं आपल्या "सुभेदार मल्हाराव होळकर" या काव्यांत या प्रसंगाचें फारच चांगलें वर्णन केलें आहे. त्यांतील एक लहानसा उतारा येथें दिल्यावांचून राहवत नाहीं.

श्लोक.

छाया असे गर्द बहु तयाची। घेण्या विसावा निजण्या सुखाची॥
वाटे असे ही स्थित काय थेट। तेजोनिधीच्या मधिं एक बेट॥१३
येथें दुपारीं श्रमुनी उन्हानें। त्रासूनि रानीं बहु घालण्यानें॥
केलें असे ज्यास बहु निचेष्ट। मल्हारि तो ये हरण्यास कष्ट॥ १४
शिलेवरी ठेवुनि मस्तकातें। घे झोंप तो गाढ निवांत तेथें॥
भासे शिलाग्रीं मुखपद्म त्याचें। छायासरीं स्थापित काय साचें १५
कांहीं घडींनीं रवि तो नभांत। होई जरासा कलथा गतींत॥
खालीं तदा तो तिरपीं कहारीं। बाणाप्रमाणें किरणें झुगारी॥ १६
प्रतापशाली अपुल्या प्रमाणें। होणार हा स्वीय पराक्रमानें॥
सामर्थ्य त्याचें बघण्या ह्मणोनी। जागें करी कीं रवि त्या करांनीं १९
स्पर्धा रवीची जणु देखुनी ही। वल्मीकवासी फणि दीर्घदेही॥
फणा उभारूनि बहिःप्रदेशीं। येई हळू डोलत त्याजपाशीं॥ २०॥
ह्या बालकाच्या बहु तापलेल्या। घर्मप्रवाहामधिं न्हाणलेल्या॥
मुखारविंदावरतीं फणेस। धरूनि छाया करि नाग त्यास॥ २१
मारीत होता किरणस्वरूपी। मुखास जे बाण रवि प्रतापी॥
त्या वारण्याला जणुं काय ढाला। फणी करी हा स्वफणा विशाला२२
पुढें नृपाचें पद पावणार। ह्मणून आतांच भुजंग थोर॥
करी फणाछत्र शिरावरी तो। कीं पुच्छ तें चामर हालवीतो॥ २३

पृष्ठ ३—४.

दमलेला, तशांत तो पोरवयाचा मल्हारी त्या वृक्षाच्या गार सावलींत निजला असतां लागलींच झोंपीं गेला. त्या झाडाखालीं जवळच एक वारूळ होतें. त्यांतून एक मोठा नाग बाहेर आला व त्यानें त्या मुलाच्या तोंडावर आपली फ़डा धरली. इतक्यांत त्याची आई त्याच्याकरितां भाकरी घेऊन तेथें आली. पण तो प्रकार पहातांच ती घाबरली व धांवतच जाऊन आपल्या भावास व इतर मंडळीस घेऊन तेथें आली. ती मनुष्यांची गर्दी पाहून नाग वारुळांत गेला. नंतर ते लोक मल्हारीजवळ गेले. आपल्या मुलास कांहींएक दुखापत झाली नाहीं हें पाहून त्या माउलीचा आनंद त्रैलोक्यांत मावेनासा झाला. तिनें मल्हारीस तेथेंच खाऊं घातलें व दूधभाताचें जेवण केलें ! हा अलौकिक प्रसंग पाहून त्या भोळ्या बाईस राहवेना. तिनें आपल्या ओळखीचे व ममतेचे जे चार चौघे ह्मातारे धनगर होते, त्यांस ही सारी हकीकत सांगितली व त्यांस–" याचा अर्थ काय ?–" असा शेवटीं प्रश्न केला. ते बिचारे बोळून चाळून धनगर ! ते काय सांगणार ? " त्यांच्या उपमा अन्यत्रांस, ते तर प्रत्यक्षच ! " त्यांतही एकानें त्या बाईस, असें सुचविलें कीं, " बाई, तूं ही गोष्ट ब्राह्मणास पूस. तो तुला यांतील इंगीत सांगेल. " मग तिनें एका ब्राह्मणास एकांतीं विचारिलें. ब्राह्मणानें* तिला सांगितलें कीं, "बाई, हें मूल पृथ्वीपति होईल. हा दहा वर्षांचा होई तावत्काल यास फार संभाळावें. पुढें हा पृथ्वीस संभाळून तुला पृथ्वीपतीची आई ह्मणवील."

* इंदूर येथील दिवाणाच्या घराण्यांतील मूळ पुरुष रामाजीपंत हा मल्हारजीच्याच वेळीं उदयास आला. दिवाणाच्या घराण्याची जी कैफियत आहे तींत, हा वर सांगितलेला ब्राह्मण ह्मणजे दुसरा तिसरा कोणी नसून रामाजीपंतच होय असें ह्मणून मल्हारजीच्या प्रथम गोष्टीपर्यंत त्यांनीं आपला पिढीजाद संबंध लाविला आहे !

नागानें तोंडावर फडा धरणें हा अजूनही चांगला शकून समजतात. चमत्कारिक गोष्टी सर्व प्रकारच्या लोकांत घडतात. पण मोठ्या लोकांच्या चरित्रांत त्यांस अमरत्व येतें. फळें चांगलीं येऊं लागलीं कीं, मग साधारणपणें त्याच्या बीजाची व परिस्थितीची तारीफ करितात व ह्मणूं लागतात, "वः तो मोठा चांगला फलभारांनीं युक्त असा वृक्ष व्हावयाचा होता हें तेव्हांच दिसत होतें!" आह्मां मानवांच्या चरित्रांतही हाच नियम लागू आहे. एखादा मनुष्य मोठा झाला कीं, "वः त्याचे पाय पाळण्यांतच दिसत होते!" असे उद्गार निघून त्याच्या बाळपणच्या साऱ्या गोष्टी सर्वतोमुखीं होऊं लागतात. बाकी तशा गोष्टी इतर लोकांच्या संबंधांत घडत नाहींत, असें मुळींच नाहीं. पण तो स्वतः लोकांपुढें नसल्यानें त्याचें चरित्र मागें राहतें; व क्षितिजाकडे एखादी व्यक्ति जात असतां तीं लहान होतां होतां जशी सर्व दृष्टिआड जावी तद्वतच इतर लोकांच्या गोष्टींचें होतें. पण मनुष्य मोठा झाला कीं, त्याच्या संबंधीं सर्व प्रकारच्या गोष्टी पुढें येऊं लागतात. असो. आतां सांगितलेल्या गोष्टींशी शकुनाचा संबंध असल्यानें मल्हारजीवर घरच्या मंडळीची फारच मर्जी बसली. त्या दिवसापासून त्याच्या मामानें त्यास रानांत जावयाचें मना केलें. इतकेंच नव्हे, तर त्यानें आपली मुलगी जी गौतमा तिशीं लागलेंच त्याचें लग्न लावून टाकलें. [ ज्येष्ठ शुद्ध १३ ]. या वेळीं मल्हाररावाचें वय केवळ आठ वर्षांचें असून गौतमा ही त्याच्यापेक्षां सव्वा वर्षानेंच कायती लहान होती. या लग्नाची हकीकत कैफियतींत आहे ती येथें देतों. त्यावरून घरांत जावानणंदांचें सूत कसें काय असतें, बायकांच्या भांडणांचें मूळ कसें असतें, वगैरे आजलाही पुष्कळ ठिकाणीं दिसणारे प्रकार त्या गोष्टींत ठळकपणें दिसून येतील.

"आपली कन्या गौतमाबाई होती ती याजला द्यावी हें मनांत वागवून बायकोस विचारिलें. बायकोनें कांहीं नाक मुरडिलें. तें कांहीं एक मनांत न आणितां आपली मूल गौतमाबाई मशारनिल्हेस दिली. समयीं समर्पक लग्नाचा उत्साह होऊन पुढें घोड्याचे निर्वाहाचें कठीण पडलें. मामी मागें पुढें कुरकूर करूं लागली. हें मल्हारजी होळकर यांस न सोसवे."

नागानें तोंडावर फडा धरल्याची गोष्ट आणखीही मोठ्या लोकांसंबंधीं सांगतात. पण तें उन्नतीचें दर्शक ह्मणून पूर्वचरित्रांत घालतात कीं काय न कळे. परंतु मल्हारजीसारखा घरदार नसलेला मुलगा, व तोही अल्पवयाचा. असें असतांना भोजराजानें त्यास आपली मुलगी बायकोच्या इच्छेविरुद्ध देणें, ह्मणजे ह्या नागाच्या गोष्टीच्या बुडाशीं "नऊ हात ढलपा एक हात लांकूड" याप्रमाणें कां होईना पण कांहीं तरी तथ्य असावें, असें वाटतें.

ही गोष्ट व तीस अनुलक्षून असलेला शकुन हा प्रकार खरा असो वा खोटा असो, बाकी मल्हारजीच्या भाग्योदयास आतां आरंभ झाला, हें मात्र खरें. त्याचा मामा जो भोजराज त्यानें त्यास आपल्या पथकांत एक असामी दिली. तेथें मल्हारजीनें आपल्या गुणानें लोकांच्या असें लौकरच निदर्शनास आणून दिलें कीं, त्या काळीं पुढें यावयास जे गुण लागतात, ते सारे आपणांत चांगल्याच प्रकारें वास करीत आहेत. त्यानें लहानपणींच चांगलीं शौर्याचीं कामें केलीं. आनंदमय ज्या गोष्टी आहेत त्या एकापेक्षां एक वरचढ अशा जरी घडतात, तरी त्यांत पहिल्या गोष्टीस विशेष महत्त्व असतें. त्याप्रमाणें पाहतां मल्हारजीची पहिली व ह्मणून विशेष महत्त्वाची अशी शूरत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, खानदेशांत अणकाई या नांवाचा एक किल्ला

आहे तेथें त्यानें विजय संपादन केला, ही होय. आरंभावरून जर पुढील निदान ठरवावयाचें असेल, तर मल्हाररावाच्या समरांगणावरील कारकीर्दीस आरंभ चांगल्या प्रकारें झाला, असें ह्मटलें पाहिजे. यानंतर पुढें लवकरच निजामउल्मुल्काशीं मराठ्यांचा जो सामना झाला, त्यांत मल्हारजीनें निजामाच्या एका मोठ्या पुढाऱ्यास कंठस्नान घातलें. बाजीराव लहान असतांनाच त्याची व मल्हारजीची एक लहानशी झटापट झाली, त्याची समग्र हकीगत होळकरांच्या कैफियतींत दिली आहे. तीवरून मल्हारजीचा आततताईपणा व समेट करावयाची तयारी या दोन गोष्टी चांगल्याच प्रकारें दिसून येतात. या पूर्ववयांतील लहानशा गोष्टींत मल्हाररावाचा सारा स्वभाव चांगल्या रीतीनें प्रतिबिंबित झाला आहे. या गोष्टीवरून व त्याच्या शौर्यावरून तो श्रीमंतांच्या लक्षांत चांगलाच राहिला असावा. निजामउल्मुल्काच्या लढाईनंतर लवकरच श्रीमंतांच्या फौजेची व बांड्यांच्या फौजेची तापी नदीच्या कांठीं कलागत लागली, ती मल्हारजीनें मोठ्या शौर्यानें व चातुर्यानें मिटविली. हें पाहून श्रीमंतांनीं त्यास कदमबांडे यांच्याकडून मागून घेतलें; व आपल्या चाकराचा पेशव्यांच्या पदरीं चांगला भाग्योदय होईल, हा विचार करून कंठाजीनेंही त्यास श्रीमंतांकडे जावयास मोठ्या आनंदानें अनुमति दिली. मल्हारजी आपल्या सैन्यांत येतांच श्री० बाजीरावानें त्यास पांचशें स्वारांची मनसब दिली. याप्रमाणें मल्हारजी ५ मोहरम ११२६ या अरबी सनांत (इ. स. १७२५ जून) प्रथम सरंजामी सरदार झाला. वास्तविक पाहतां हा सन्मान प्राप्त व्हावयास आपणास कंठाजी कारण झाले, ह्मणून त्यांच्या स्मरणार्थ कृतज्ञ मल्हाररावानें बांड्याचा झेंडा ज्या रंगाचा होता त्याच रंगाचा आपला झेंडा केला.

या वेळीं मराठी राज्याची स्थिति काय होती, हें सांगणें आवश्यक आहे. ती हकीगत थोडक्यांत सांगणें हें काम फारच दुर्घट आहे; तथापि ती हकीकत सांगण्याचा येथें कसाबसा प्रयत्न केला आहे. इ. स. १६८० सालीं शिवाजी वारला. पण मरतेसमयीं त्यानें मराठी राज्यांत जी दुही माजली होती ती फारच कमी करून सर्व लोकांचें तोंड 'एकी' कडे केलें. मराठे लोक अनेक वर्षें पारतंत्र्यांत राहिल्यानें ते जागे होऊं लागले. तशांत त्यांचीं मनें साधुसंतांच्या उपदेशानें सरळ होऊन आपसांतील तेढ कमी झाली होती. अशा वेळीं या एकीचें कार्य करावयास कोणी अलौकिक पुढारी पाहिजे होता. तें काम शिवाजीकडे आलें. शिवाजीच्या वेळीं परिस्थिति अत्यंत अनुकूल असल्यानें व आपल्यास बळकटी कशानें येईल याविषयींचा त्याचा दूरदृष्टीपणा अत्यंत सूक्ष्म असल्यानें मराठी राज्याची घटना फारच अलौकिक झाली. संतांच्या उपदेशानें लोकांचीं मनें तयार झालीं व शिवाजीच्या कर्तृत्वशक्तीनें त्यांचें कार्य अघटित झालें. या काळांत मराठ्यांनीं जें अलौकिक कार्य केलें, त्याची थोरवी मोठमोठे आंग्लइतिहासकारही गातात. जमिनीची मशागत उत्तम झाली व त्यांत वृक्षाचें रोपणही चांगलें झालें! मग फळें सुंदर यावीं हा सृष्टिक्रमच होय! या अल्प काळांत इतकीं सुंदर, सोज्ज्वल व देदीप्यमान् रत्नें चमकलीं कीं तितकीं रत्नें उभ्या मराठी राज्यांत चमकलीं असतील किंवा नाहीं, याची शंकाच आहे. या वृक्षास उपटून टाकण्याचें काम महामहत्त्वाकांक्षी जो अवरंगझेब बादशहा त्यानें सारखें तीस वर्षें केलें! पण शिवाजी गेला होता ह्मणून काय झालें? त्यानें वाढीस लावलेला वृक्ष चांगला जोमदार असून जमिनीची लागवड फारच चांगली झाली होती. या योगानें त्या महाप्रतापी बादशहा-

च्या प्रखर तापासमोरही हा वृक्ष ऐन आपत्तींत तीस वर्षें तगून राहिला. याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे जमीनीची परिस्थिति व वृक्ष लावण्याची कुशलता हेंच होतें. तो वृक्ष चांगला कसदार असून त्या कुशल बागवानामागेंही उत्तम फळें देत होता. शिवाजीला परिस्थिति उत्तम प्राप्त झाल्यानें व त्यानें आपलें काम अत्यंत कुशलतेनें केल्यामुळें, त्यानें जें जें कार्य म्हणून हातीं घ्यावें, त्यांत त्यास सिद्धि ही ठेवलेलीच. या कारणानें त्या अलौकिक पुरुषाची गणना महात्म्यांत होऊं लागून त्याविषयीं लोकांच्या मनांत इतका विलक्षण सद्भाव जागृत झाला कीं, शिवाजीनंतरही त्याचें नुसतें नांव ऐन आपत्तींत कार्य करीतच होतें. त्या काळीं लोकांचे सात्त्विक भाव जागृत असल्यानें प्रत्येक प्रकारचे लोक आपलें काम निरिच्छतेनें व निरलसपणें करीत होते. अवरंगजेबानें ही जी दुराग्रहपूर्वक लढाई चालविली होती, त्यापायीं मोंगल राज्याची पूर्वकळा नाहींशी होऊन त्याचा नाश झाला. त्याची अर्धांगवायु झाल्याप्रमाणें स्थिति झाली. मराठ्यांतील जोम कमी व्हावा, लोकांची आपसांत कलागत लागून यादवी सुरू व्हावी, व दोघांच्या भांडणांत आपला नफा व्हावा, ह्या हेतूनें बादशहाचे सरदार त्यास नेहमींच बोध करीत कीं, शाहूस सोडावयाची वेळ कायती हीच आहे! पण बादशहाची साठी उलटल्यानें त्याची बुद्धि आतां 'नाठी' झाली होती. ती कांहीं आतां काम करीना. दिल्लीचें तख्त प्राप्त करून घेण्यासाठीं ज्यानें भयंकर कारस्थानें रचलीं होतीं, तो बादशहा आतां राहिला नव्हता. त्यानें दुराग्रहानें आतां लढाई चालविली होती. तींत तो इतका फसला कीं, बुडत्याचा पाय खोलांत, असें जें म्हणतात त्याप्रमाणें तो शेवटीं शेवटीं तर मराठ्यांच्या हातांत सांपडतां सांपडतां अगदीं थोडक्यांत

वांचला ! याप्रमाणें दिल्लीपति मराठ्यांच्या हातीं यावयास प्रस्तुत प्रसंगापासूनच सुरुवात झाली! बादशहानें इकडची पृथ्वी तिकडे ठेवली. पण त्याला डोंगरांतले उंदीर सांपडेनात! शेवटीं तो मोठ्या हाल अपेष्टांत 'माझा जन्म फुकट गेला' असें ह्मणत देवाधीन झाला! मराठ्यांच्या मागची साडेसाती आतां उतारावर लागली. पण त्यांचे स्वग्रह बिघडले! ते इतके कीं, पूर्वींची साडेसाती या नीच ग्रहांपेक्षां हजार वाटेनें बरी. हे अंतस्थ खडतर ग्रह त्यांचे बोकांडीं इतके बसले कीं शेवटीं त्यांचा नाश झाला तेव्हां त्यांचा तळीराम गार झाला. अवरंगझेबाचे सल्लामसलतगार त्यास जी युक्ति अमलांत आणावयास सांगत होते, तीच युक्ति त्यांनीं आतां अमलांत आणली. त्यांनीं शाहूस सोडून दिलें! तो दक्षिणेंत येतांच एका पक्षास आनंद झाला खरा, पण ताराबाईस दुःसह दुःख झालें. यामुळें मराठ्यांत दुफळी झाली. हा वेळपर्यंत एकोप्यानें काम करणारे जे उत्तम लोक होते, त्यांच्यांतच वितुष्ट माजून परस्परांत फूट झाली! त्यांचीं तोंडें एकीकडे होतीं; पण आतां त्यांच्या पाठी एकीकडे झाल्या! यामुळें आपलें सामवायिक हित कशांत आहे, इकडे त्यांचें स्वाभाविकपणें दुर्लक्ष झालें. इतका वेळ ते ज्या कारणामुळें एकत्र झालें, तें कारण आतां नष्ट झालें. इतका वेळ ते समदुःखी असल्यानें सारे एकोप्यानें अवरंगजेबाशीं झुंझत होते. तशांत शिवाजीनें मराठी राज्याचा गाडा 'एकी'कडे वळविल्यानें त्यांनीं आपलें काम अत्यंत निरिच्छेनें केलें. पण आतां बादशहा गेला इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत फूट पडावयास शाहू आला! इतका वेळ जे उत्तम लोक एकोप्यानें व एकदिलानें काम करीत होते, त्यांपैकीं कांहीं शाहूच्या पक्षास मिळाले व कांहीं ताराबाईच्या पक्षास

जाऊन मिळाले. या वेळेपासून त्यांच्यांत दुहीचें बीजारोपण होऊं लागलें! तशांत जमिनीची लागवड होण्याचें काम बंद झालें. त्यांत स्फोटक द्रव्यें पडावयास सुरुवात झाली. यावेळीं जमिनीची लागवड उत्तम व्हावयास—ह्मणजे लोकांतील दुही कमी व्हावयास—सुशिक्षण अथवा संतउपदेशामृत पाहिजे होतें. शिवाजी राजापासून तों बाळाजी विश्वनाथापर्यंत मराठ्यांचा जो इतिहास आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे. शरीरांत जसें 'हृदय' अथवा आशियाखंडांत अफगाणिस्तानाची जशी रचना आहे, त्याचप्रमाणें मराठ्यांच्या इतिहासांत या भागाची रचना आहे. हा भाग इतिहासभक्तानें अवश्य मनन करण्याजोगा आहे. असो. आतांच उपरिनिर्दिष्ट जो ताराबाईचा पक्ष होता त्यानें व स्वतः ताराबाईनें मराठ्यांच्या इतिहासांत इतका धुमाकूळ माजवून दिला कीं, त्यापायीं मराठ्यांचें त्याच वेळीं वाटोळें व्हावयाचें. पण पेशव्याच्या अलौकिक चातुर्यानें तें खूळ दबल्यासारखें झालें. पण तो त्यांच्यामागें ससेमिरा राहिल्यानें त्यांच्या नाकीं नऊ आले. अवरंगझेब बादशहाच्या धाडीनें सर्व लोक समदुःखी होऊन एकोप्यानें काम करीत होते. पण ती धाड आतां गेली. त्यामुळें त्यांस शैथिल्य येऊन दुही जोरावयास लागली. जो तो आपलें स्वहित पाहूं लागला. तशांत शाहूची सुटका ह्मणजे दुष्काळांत तेरावा महिना झाला! शिवाय या तीस वर्षांच्या "स्वतंत्रतेच्या" युद्धामुळें मराठे लोकही टेंकीस आले होते. त्यांनाही त्या युद्धाचा परिणाम थोडा फार जाचक झाला. या सर्व खांचांतून व खंदकांतून मराठी राज्याचा शकट पूर्ववत् चालवावयास प्रतिशिवाजीच पाहिजे होता. पण ही कर्तृत्वशक्ति शाहूंत नव्हती. यावेळीं एक अगदीं त्रयस्थ गृहस्थ फारच पुढें आला. तो बाळाजी विश्वनाथाशिवाय दुसरा कोण असणार? बाळाजी हा शिदीच्या

जाचास कंटाळून कोंकणांतून देशावर आला. तो हळुहळू धनाजीच्या मर्जीत उतरून पुढें लवकरच शाहूचा उजवा हात झाला. शाहूंत शिवाजीची कर्तबगारी नसल्यानें व राजारामांतील राज्यरक्षणविषयक गुण नसल्यानें त्याचीं कामें बाळाजीच्या हातून होऊं लागलीं. याप्रमाणें राजाचें काम पेशव्याकडे आलें. ह्मणजे मराठी सत्तेचें एक पाऊल खालीं पडलें ह्मणावयाचें! ही वेळ फारच धामधुमीची होती. शिवाजीच्या वेळीं स्वार्थत्यागासारखे सद्गुण लोकांत वास करीत होते. आतां दुहीमुळें महत्त्वाकांक्षा व चुरस हे दुर्गुण त्यांच्यांत वास करूं लागले. जे ते धडपड करून पुढच्या ओळींत येण्याची खटपट करीत होते. आतां जीवनार्थ कलहाचीं स्फोटक द्रव्यें तयार होऊं लागलीं. अशा स्थितींत दुही मिटवून लोकांचा संग्रह करणें आवश्यक होतें. शिवाजीच्या काळीं राज्याची घटना निरपेक्ष बुद्धीनें झाली. आतां लोकांस लाලूच दाखविण्याची पाळी आली! यामुळें शिवाजीच्या पद्धतीनें राज्यशकट चालविणें कठीण झालें. तशांत शाहूराजाची योग्यता बेताचीच होती. यामुळें या राज्याची वासलात लावणें सर्वथैव बाळाजीच्या हातीं होतें. कारण शाहूचें सर्व काम बाळाजी करावयास लागला होता. पण अशा स्थितींत समाधानाची गोष्ट ही ह्मटली पाहिजे कीं, प्रस्तुतच्या बिकट मार्गांत या मोडकळीस आलेल्या मराठी राज्याचें जूं बाळाजीच्या खांद्यावर पडलें. तो हा मार्ग आक्रमावयास ‘ नर-ऋषभ ’ होता. मराठ्यांचे सात्त्विक गुण अजून जागृत होते. मात्र ते लोक आपसांतील दुहीमुळें व शैथिल्यामुळें विस्काळित झाले होते. अशी फूट असतांना शिवाजीच्या राज्यघटनेचा पाया घालणें दुरापास्त होतें. ह्मणून त्यानें मराठ्यांचे सात्त्विक गुण

कायम ठेवून त्यांचा संघ करून एक प्रचंड शक्ति निर्माण करावयाचें ठरविलें. बाळाजीनें बुद्धि व स्वदेशभक्ति या शक्तींच्या बळावर सर्वांस एकत्र करून मराठी राज्याचा गाडा पुनः चांगल्या रीतीनें चालविला. दुहीचें तोंड 'एकीकडे' करावयास्तव त्याला त्यास जहागिरी द्याव्या लागल्या. पण त्यांचें प्रस्थ वाढूं नये ह्मणून त्यानें त्यांस फारच लहान जहागिरी दिल्या होत्या. त्यानें मुख्य मुख्य मंडळीच्या असें निदर्शनास आणून दिलें कीं, या प्रसंगीं सर्वांनीं एकविचारानें व एकजुटीनें राहणें फार फायद्याचें आहे. त्यानें अधिकार व द्रव्य यांच्यावर पूर्णपणें पाणी सोडून कशाचाही काडीइतका लोभ न धरतां सर्वांच्या साह्यानें मराठ्यांचें संरक्षण करून त्यांची उन्नति केली. शिवाजीच्या वेळीं परिस्थिति चांगली असल्यानें तिचा ओघ चांगल्या मार्गास लावावा ह्मणून त्यानें परकीयांशीं लढण्याचा प्रसंग न आणतां राज्यास चांगली बळकटी यावी ह्मणून राज्यघटनेकडे अधिक लक्ष देऊन त्याप्रमाणें उत्तम मार्ग आंखून दिला. पण आतां परिस्थिति बदलल्यानें बाळाजीस तोच मार्ग घेतां येईना. तथापि आपलें लक्ष तिकडेच ठेवून त्यानें राज्यघटना केली. त्यानें आपले वाडवडील व स्वदेश यांचा योग्य अभिमान जागृत करून एक प्रचंड संघशक्ति निर्माण केली. या संघांत बरेच दोष होते, हें बाळाजी जाणून होता. त्यांपैकीं बरेच दोष बाळाजीनें काढले. पण पुढील पेशव्यांस त्याचें धोरण ठेवतां आलें नाहीं. त्यांनीं आपल्या राज्याकडे—जीवाकडे—लक्ष न देतां बाहेरील वाढीकडेच ज्यास्त लक्ष दिलें. त्यामुळें मराठी राज्यांतला ' राम ' दिवसें दिवस क्षीण होत चालला. पण इकडे बाह्य शरीर मात्र दिवसें दिवस वाढावयास लागलें. तशांत पेशव्यांच्या जिवास जीव देणारे भानूसारखे प्राणसखे चमकत असल्यानें व होळकर शिंदे इत्यादिकांसारखे एकनिष्ठ सेवक स्वामीकार्य करावयास तत्पर

असल्यानें हें शरीर बाहेरून टवटवीत दिसत होतें. पण बोलून चालून हा प्रकृतीचा विस्तार होता. जीव मात्र बिचारा आंतल्या आंत झुरत होता! याप्रमाणें साधारणपणें त्या वेळची परिस्थिति होती. बाळाजी विश्वनाथाचें राज्य-शरीर-विस्ताराकडे लक्ष नसून राज्य रचनेकडे—जीवाकडे—लक्ष होतें. पण तो काळ आतां नव्हता. आतां राज्यविस्ताराकडे लक्ष असल्यानें त्या धामधुमींत व धडपडींत जो पुढें येईल तो राजकारणी पुरुषच काय तो संस्थानाचा अधिपति होई; बाकी गोष्टींत तो कसाही असो. याप्रमाणें त्या वेळीं परिस्थिति होती. आतां मल्हारजीविषयीं मागें जें सांगितलें त्यापुढें काय झालें तें पहावयाचें.

गिरधर बहादर या नांवाचा एक मोठा शूर व कुशल नागर ब्राह्मण बादशहाकडून माळव्याचा अधिकारी नेमला गेला होता. तो पेशव्यांचें माळव्यांत कांहीं चालूं देईना. ह्मणून श्रीमंतांनीं इ० स० १७२४ सालीं होळकर, शिंदे व धारचे पवार यांस माळव्यांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करावयास पाठविलें. त्यांत चिमाजी व मल्हारजी यांनीं पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणें स्वारी केली. इ० स० १७२४ सालीं गिरिधरबहादर हा सागरपुरच्या लढाईंत मारला गेला. तेव्हां त्याचा * भाऊ दयाबहादर हा त्याचें काम पाहूं लागला. दयाबहादर हाही आपल्या भावाप्रमाणें कर्तृत्ववान् असल्यामुळें तो मराठ्यांचें कांहीं चालू देईना. पण त्याचें आणि मराठ्यांचें तिरलें येथें युद्ध झालें ( १२ आक्टो. १७३१ ) त्यांत तो मारला गेला. यामुळें

---

* रा० पारसनीस यांनी ग्रॅन्टडफच्या आधारें दयाबहादरास गिरधरबहादराचा पुतण्या केलें आहे ( ब्रह्मेंद्र स्वामीचा पत्र व्यवहार पृष्ट ६८ ) पण त्यानें पुतण्या हा शब्द मुळींच वापरला नसून "Relation" हा शब्द वापरला आहे! ( १८२६ ची प्रत पान ५१३ भाग पहिला. )

माळवा प्रांत हा मराठ्यांच्या हातीं आला. यानंतर श्रीमंतांची स्वारी लवकरच आग्रा दिल्लीपर्यंत भडकली. त्यांनीं उत्तरेंत मोगलांचा पराभव केला. हा प्रकार पाहून मोगल घाबरले व त्यांनीं हैदराबादचा वृद्ध निजाम--हा त्या वेळीं ९४ वर्षांचा होता !—यास आपल्या साह्यास बोलाविलें ( १७३८ ). हा निजाम मोठा शूर व कारस्थानी असे. पण त्याचा असा कांहीं चमत्कारिक योग होता कीं, त्याची आणि पेशव्यांची जेव्हां जेव्हां ह्मणून गांठ पडे, तेव्हां तेव्हां त्यास श्रीमंतापुढें नेहमीं हात टेकावेच लागत ! निजाम हा बादशहाच्या वतीनें हैदराबादेहून मराठ्यांशीं युद्ध करावयास आला खरा, पण मराठ्यांनीं त्याचा भोपाळ येथें फार मोठा पराभव केला. या सर्व लढायांत श्रीमंतांस मल्हारजीचें फारच साह्य झालें.

इ० स० १७२८ त मल्हारजीला नर्मदेच्या उत्तरेस खानदेशांत बारा परगणे मिळाले व ही संख्या चार वर्षांचे आंतच चौऱ्यायशींपर्यंत गेली ! यावरून त्याची कामगिरी किती थोर व महत्त्वाची होती, व ती त्यानें कशी काय शेवटास नेली, हें चांगलेंच लक्षांत येतें. माळवा प्रांत हातीं आल्यावर पेशव्यांनीं मल्हारजीसच त्या प्रांताची देखरेख करावयास ठेविलें. अर्थात् त्याचें लक्ष पुण्याकडून हळूहळू उठून तें माळव्याकडे लागावें हें स्वाभाविकच आहे.

मल्हारजी उदय पावूं लागतांच त्यानें सीरवीच्या ठाकराची मुलगी हरकाबाई ईस आपली खांडाराणी केलें. ह्यावरून त्यास उच्च जातींत शिरण्याची इच्छा उत्पन्न झाली असावी असें वाटतें. कारण ती बाई सोनगीर रजपूत होती. ह्या बाईला मावशीबाई असें ह्मणत. मावशीबाई ही मोठी कारस्थानी असून तिची अहल्याबाईस मोठी मदत असे, व ती तिच्याशीं फार ममतेनें वागत असे.

या खांडा राणीशिवाय मल्हारजीनें आणखीही बायका केल्या होत्या, त्यांची याद 'वंशवेलां'त आलीच आहे. मल्हारजीला पुष्कळ बायका होत्या खऱ्या, पण त्या सर्वांत गौतमाबाई ही त्याची पट्टराणी होती. मल्हारजीचे लग्नांत तिचें वय ६ वर्षे ९ महिने कायतें होतें. अशीं लग्नें पुढें सुखदायक होतात किंवा नाहीं हा मोठा प्रश्न आहे, पण तो मल्हारजीच्या संबंधीं तरी आतां चांगला सुटला आहे. गौतमाबाई ही फार चांगली स्त्री असून ती पुष्कळदां आपल्या नवऱ्याबरोबर युद्धांतही जात असे. अशा प्रसंगीं ती त्याच्या मागें काळजीप्रमाणें नसून उलट ती त्यास काळजीमुक्त करावयास उपयोगी पडे. या गौतमाबाईचें वर्णन रा० गोसावी यांनीं केलें आहे तें असें:—

**स्रग्धरा.**

**मामाला एक कन्या सकलगुणवती प्रौढही अंबुजाक्षा ।**
**तेजस्वी धैर्यशाली धनगर असुनी सद्मकृत्यांत दक्षा ॥**
**नामें जी गौतमा ती नव-नृपति अशा मातुलें भागिनेया ।**
**देऊनी तुष्ट केली सतनय भगिनी आणखी आत्मजाया ॥**

**गीति.**

**समरोत्साही जाया समरोत्साह्यास लाभली बरवी ।**
**विजयीं उत्साह करी अजयीं पतिला लढाइला फिरवी ॥**

ही बाई अत्यंत पतिनिष्ठ असून आपल्या कर्तव्यांत नेहमीं जागरूक असे. पेशव्यांचे गुरु महापुरुष जे ब्रह्मेन्द्रस्वामी (इ. स. १६४९-१७४५) त्यांच्या ठिकाणीं ह्या बाईचा पूर्ण भाव होता. तिच्या नांवानें स्वामीस लिहिलेलें एक पत्र त्यांच्या चरित्रांत दिलें आहे. स्वामींच्या निधनकाळीं अहल्याबाईचें वय लहान होतें, पण तिला लहानपणापासून पारमार्थिक

विषयाची गोडी लागावयास अशा सत्पुरुषांच्या भेटी हें एक कारण असावें. गौतमाबाई स्पष्टवक्ती व सत्याची अभिमानी असल्यानें प्रसंगवशात् मल्हारजीची कानउघडणी करावयास मागें पुढें पाहात नसे.

बाळाजी विश्वनाथानें छत्रपति शाहू याच्या अमलाखालीं जे मोठमोठे लोक होते, त्यांची चांगली जूट केली. त्या वेळीं सर्वांचा भाव शिवाजी महाराजांच्या गादीकडे असे. पण या सर्व मंडळीस एकत्र करून सुरळीतपणें कामकाज करावयाचें ही शक्ति शाहू महाराजांत नव्हती. मग राज्य चिरस्थायी करावयास जी रचना करावी लागते, ती करावयाची शक्ति कोठून असणार? पेशव्यांनीं आपल्या अलौकिक बुद्धीनें ही जूट एकत्र करून त्यापासून पुष्कळ कार्य केलें खरें, पण त्यास चिरस्थायीपणा जेणेंकरून येईल असें एखादें कार्य त्यांच्या हातून झालें नाहीं. त्यांच्यापैकीं पुष्कळांनीं निःस्वार्थतेनें छत्रपतीच्या नांवानें राज्य केलें खरें, तरी त्यांच्या कर्तृत्वशक्तीनें अथवा छत्रपतीच्या कमकुवतपणानें त्यांचें प्रस्थ माजलें, व ते स्वतःच मराठी राज्याचे चालक होऊन बसले. पेशव्यांनीं मराठी सत्तेचें प्रस्थ माजविण्यासंबंधानें जीवापाड परिश्रम केले, व तें त्यांनीं माजविलेंही; पण त्याबरोबरच त्यांनीं आपलें स्वतःचेंही प्रस्थ माजविलें! हा प्रकार इंग्लंडच्या इतिहासावरून अधिक स्पष्ट रीतीनें सांगतां येईल. चॅथम, पिट्, ग्लॅडस्टन, बीकन्सफील्ड इत्यादिकांनीं इंग्लंडचें वैभव वाढविलें, व हेस्टिंग्ज आणि क्लाइव्ह यांनीं हिंदुस्थानांत तेंच केलें; पण आपआपला कार्यभाग आटपला, कीं मग ग्लॅडस्टन कोण व क्लाइव्ह कोण? तसें त्यांनीं केलें नाहीं. शिवाजीनें आपलें राज्य आधीं व्यवस्थित करून मग त्यांत अष्टप्रधानांच्या नव्या पद्धतीचें बीजारोपण केलें. पण तिकडेही जर कोणाचें नीट लक्ष गेलें नाहीं, तर मग हजारों कोसांवरून आलेले

विदेशी लोक या परदेशांतही आपआपला राज्यकारभार किती व्यवस्थित रीतीनें व सुरळीत प्रकारानें करीत आहेत, हें पाहावयाचें कोणीं? आपण ह्मणजे राज्यसत्ता बळकवावी हा पहिल्या पेशव्याचा हेतूही नव्हता. पण अधिकार, जागा आणि जाती या वंशपरंपरा चालावयाच्या दुष्ट व घातुक साधनानें आह्मांस आपलें हित साधतां आलें तर नाहींच, पण त्यायोगें इतिहासांत जो धुमाकूळ उडवून दिला आहे, तो कांहीं सांगतां पुरवत नाहीं. हें सांगावयाचें कारण हेंच कीं, पेशव्यांनीं जें केलें तेंच पुढें होळकर, शिंदे, गायकवाड, पवार, भोंसले इत्यादिकांनीं केलें. ज्याप्रमाणें सूर्याचे किरण सूर्यकांत मण्यांतून जाऊन केंद्रांत मिळतात व पूर्वीची असमर्थता सोडून साधारण जिन्नस जाळावयास समर्थ होतात, त्याप्रमाणें मराठी सत्तेचें झालें नाहीं. कारण त्या राज्याची रचना सूर्यकांत मण्याप्रमाणें नव्हती. त्यामुळें त्यांच्या प्रभावाचीं किरणें एकत्र होऊन जो परिणाम व्हावयाचा तो कांहीं झाला नाहीं. पेशव्यांनीं आपल्या सरदारांस वाढवून मराठ्यांच्या राज्याचा विस्तार केला खरा, पण त्यामुळें प्रत्येकाचें लक्ष आपआपल्या प्रांताकडे लागलें. त्यामुळें आपणांस एकत्र राहून कांहीं कार्य करावयाचें आहे, इकडे कोणाचें लक्ष लागेना. ह्या प्रांतविस्तारांतच भावी अधःपतनाचीं चिन्हें बीजरूपानें दिसतात. हा राज्यविस्तार करण्यापेक्षां आपल्या राज्यास स्थाइकत्व कशानें येईल, याचा विचार करण्याकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. ज्याचें त्याचें लक्ष आपल्या संस्थानाकडे लागल्यानें जितकीं संस्थानें तितकीं केंद्रस्थानें झालीं. त्यामुळें उद्दिष्ट कार्य करावयाचें सामर्थ्य मराठी राज्यास राहणें शक्य नव्हतें. ह्मणजे पुढें जो मराठी सत्तेचा ऱ्हास झाला, त्याचीं कारणें सध्यांच उदयास येऊं लागलीं होतीं! व याच कारणांमुळें सवाई बा-

जीरावाचा पुढें उजेड पडला ! हें या चरित्रांत सांगावयाचें कारण, त्यावेळची परिस्थिति लक्षांत येऊन ज्यांनीं असा मार्ग स्वीकारला, त्यांना याबद्दल कितपत जबाबदार धरावें, शिवाय, एका लेखकानें पेशवाई बुडावयाचें पातक अहल्याबाई आणि तुकोजी यांच्यावर लादलें आहे, त्याचीहि यथार्थता वाचकांस कळावी, हें होय. असो. ही जी वर सांगितलेली राजकीय परिस्थिति होती, ती उत्पन्न करावयाचा दोष हा कोणा एकावर लादतां येत नाहीं. कारण, तो आमच्या हिंदुलोकांच्या स्वभावाचाच दोष होय. त्याचें पातक एखाद्या व्यक्तीवर लादतां येणार नाहीं. नाहीं तर, शिवाजीनें जो कित्ता घातला होता, तोही आमच्या लोकांनीं वळवूं नये, याचें कारण तरी काय ? आमचे लोकच असे ! तशांत, त्यानंतर त्यांना बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, नानासाहेब, अथवा थोरले माधवराव यांच्याप्रमाणें चतुर कर्णधार मिळाला नाहीं. पण याचें कांहीं आश्चर्यही नाहीं. एकाच वंशांत किती पिढ्या असे कर्तृत्वी पुरुष व्हावयाचे ! पुनः, जे कर्णधार मिळाले ते फार दिवस लाभले नाहींत ! जणूं काय मराठ्यांच्या महानौकेस योग्य माहितगार, चतुर, प्रसंगावधानी व दूरदर्शी नावाड्या फार दिवस लाभूं नये, असा ईश्वरी संकेतच होता ! त्यामुळें आंत बसलेल्या लोकांनीं आपल्यासाठीं नवीन नवीन व लहानमोठ्या होड्या त्या महानौकेंतून बाहेर टाकल्या; व त्या नांवेचा मुळीं संबंधच तोडून टाकला ! यामुळें ती बिचारी हेलकावे खात खात खडकावर जाऊन आदळली व तिचा नाश झाला. पण हा सारा प्रकार सृष्टीच्या नियमाप्रमाणेंच झाला. त्यांत 'दुर्दैव' असें ह्मणावयास फारशी जागा नाहीं. आह्मीं आमच्या हिताहिताकडे लक्ष दिलें नाहीं, त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. त्यांत थक्क होण्याजोगें चमत्कारिक अथवा नवीन असें कांहींच नाहीं.

पेशव्यांनीं आपल्या हाताखालच्या सरदारांस जे मुलुख दिले, त्यांचे त्यांस मालक केलें नाहीं. पेशव्यांनीं आपल्या सरदारांशीं असा नियम केला होता कीं, त्यांनीं ( सरदारांनीं ) आपल्या सैन्याच्या पोषणार्थ जमिनीचें अर्धे उत्पन्न घेऊन बाकीचें उत्पन्न पुण्याकडे पाठवावें. या सरदारांनीं आपल्याकडे सोंपविलेल्या गांवांचें जर नीट संरक्षण केलें नाहीं, तर त्या गांवकऱ्यांस आपल्या मालकाविरुद्ध पेशव्यांकडे गाऱ्हाणें करितां येत असे. पेशव्यांनी प्रसंगानुरूप अशीं गांवें जप्तही केलीं होतीं. पण हा प्रकार पुढें पुढें बदलत गेला. ज्याप्रमाणें छत्रपति निर्बळ होऊं लागतांच पेशव्यांचें प्रस्थ माजलें, त्याप्रमाणें पेशवे निर्बळ होऊं लागतांच त्यांच्या सरदारांचें प्रस्थ माजलें व ते पेशव्यांस डोईजड झाले. आपलें खरें व निरंतरचें हिताहित कशांत आहे, हें न कळणाऱ्या लोकांत असेच प्रकार घडावयाचे. पेशवे ब्राह्मण ह्मणून त्यांनीं छत्रपतीस मागें टाकलें नाहीं, अथवा पेशव्यांचे सरदार हे मराठे ह्मणून त्यांनीं भट पेशव्यांस मागें टाकलें नाहीं. राणोजी शिंदे वारला तेव्हां ( इ. स. १७४५ ) मल्हाररावाकडे ७४॥ लाखांचा मुलुख होता ! पण त्यापैकीं होळकरांनीं ३७। लाख आपणाकडे ठेवून बाकीचे ३७। लाख पुण्याकडे पाठवावे असें होतें. पण पुढें होळकर हळूहळू या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं लागले. अशा प्रकारांत आपल्या स्वतःसाठीं कांहीं राहत नाहीं ह्मणून त्यावेळीं ‘खानगी’ हें एक निराळें प्रकरण काढलें. याचा विचार पुढें केला आहे. या प्रकारामुळें दिवसेंदिवस राष्ट्रोदरांत कमी कमी खुराक जाऊं लागला. या योगानें त्यास चिमटा बसून त्याच्या इतर अवयवांचीही वाढ खुंटली. ज्या संस्थानचे राजे लोक राज्य ही आपली खाजगी मालमत्ता आहे, तें आपलें एका व्यक्तीचें

धन आहे, असें समजतात, त्या संस्थानची वाढ होऊन तें टवटवीत कसें रहावें? याप्रमाणें त्या वेळची साधारणपणें परिस्थिति होती.

वर सांगितल्याप्रमाणें, मराठ्यांच्या प्रभावाचीं किरणें केंद्रस्थानांत एकत्र न होतां, तीं ज्याप्रमाणें साध्या काचांतून भिन्न भिन्नच जातात त्याप्रमाणें, त्यांच्या प्रभावाचें एकीकरण न होतां, ते भिन्नच राहिले. त्यामुळें एकी जाऊन त्या प्रभावाचा वास्तविक जो परिणाम व्हावयाचा तो न होतां, फारच कमकुवत परिणाम होऊं लागला. पण हा कमकुवतपणा आमच्या स्वभावदोषानेंच उत्पन्न झाला हेंही वर सांगितलेंच आहे. या स्वभावामुळें हा कमकुवतपणाचा प्रकार येथेंच, ह्मणजे मराठी राज्यापुरता, न थांबतां तो पुढेंही अर्थात् दिसत होता. हे नवीन उत्पन्न झालेले सरदार ज्याप्रमाणें आपआपलें हित पाहूं लागले, त्याचप्रमाणें त्यांचे कारभारी व भाऊबंद हेही आपआपलें हित पाहूं लागले! इतकेंच नव्हे, तर ही सांथ लहानसहान अधिकाऱ्यांपर्यंत जाऊन पोहोंचली व ज्याप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांच्या मूळ मराठी राज्याचे दोन भाग झाले, त्याप्रमाणेंच या संस्थांनापैकीं कित्येकांचे अनेक भाग झाले, व कांहीं तर कायमचीं लुप्तच झालीं! ही स्वहित पाहण्याची सांथ लहानसहान अधिकाऱ्यांपर्यंत जाऊन पोहोंचली!! गंगाधर यशवंत हा होळकरांचा पुष्कळ वर्षें सेवक होता. याच्या कामाची व्यवस्थाही मोठी चोख असे. मल्हारराव जेव्हां अधिकारावर चढला, तेव्हां त्यानें गंगाधर यशवंतास आपला कारभारी केला. त्यानें हें कारभारीपणाचें काम पुष्कळ वर्षें केलें. तो आपल्या कामांत अत्यंत दक्ष असून मल्हाररावांच्या हितास फारच जपत असे. असली विश्वासू (!) व अनुभविक मंडळी ऐनवेळीं आपल्या प्रभूचें नुकसान करून स्वतःची तुंब-

डी भरण्याचा प्रयत्न करीत असत! यावरून त्या वेळच्या वातावरणाची बरीच कल्पना होईल. पण अशा प्रकारचे दिवाण नुसत्या होळकरांच्याच वाट्यांस आले नाहींत, तर ते शिंदे, गायकवाड, पवार इत्यादिकांच्याही वांट्यास आले होते. तेव्हां अशाप्रकाराबद्दल एकट्या गंगाधर यशवंतासच दोष देणें वाजवी होणार नाहीं. पुनः असें पहा कीं, यास तो तरी काय करणार? त्याच्या भोंवतालची मंडळी जें 'बाळबोध' वळण वळवीत होती, तेंच वळण त्यानेंही वळविलें! या गृहस्थानें होळकराच्या घराण्याची आहुती देण्याचा प्रयत्न कसा केला होता याचें वर्णन पुढें एका सबंध भागांत केलें आहे. आपलेंच हित पाहणें हा त्या काळाचा गुण होता, असें ह्मणणें ज्यास्त सयुक्तिक होईल. त्या काळच्या कोणत्याही एका विवक्षित व्यक्तीस घेऊन त्यास एखाद्या दोषाबद्दल सर्वथैव जबाबदार धरून त्या दोषाचें पातक त्या एकट्यावरच लादणें कधींही रास्त होणार नाहीं. ताराबाईनें पेशव्यांशीं वैर मांडलें तेव्हां या गंगाधर यशवंतानें ताराबाईस फितूर होऊन तिला पेशव्यांचे विरुद्ध साह्य करावयाचें कबूल केलें; इतकेंच नव्हे, तर त्या कटांत आपल्या धन्यास खेंचावयाचीही त्यानें खटपट केली! यावरून त्याजवर आपल्या धन्याचा बोजा कितपत होता व तो त्यास कसें समजत होता, हें चांगलें दृष्टोत्पत्तीस येतें. याप्रमाणें पेशव्यांपासून त्यांचे सरदार दूर व त्या सरदारांपासून त्यांचे अधिकारी दूर, अशी मराठी सत्तेचीं भिन्न भिन्न केंद्रस्थानें होऊं लागलीं.

मल्हारजीचा उदय होऊं लागला, त्याच सुमारास शिंदे, गायकवाड, पवार इत्यादि अनेक सरदारांचा उदय होऊं लागला. परंतु पुढें लवकरच आपसांतील चुरशीचा उदय होऊं लागल्यानें या बलाढ्य सरदारांचें आपसांत मोठेसें चांगलें नसे. शिवाजीच्या अष्टप्रधानांनीं मराठी

राज्यास ज्याप्रमाणें बळकटी आणली, त्याप्रमाणें या सरदारांच्या हातून स्वराज्यास बळकटी आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर या सरदारांमुळें राष्ट्रपुरुषाच्या वाढीबरोबरच त्याच्या अवयवांचा प्रमाणशीरपणा नाहींसा झाला व त्यांचा लवकरच झोंक जाऊं लागला. या सरदारांचें आपसांत बरें नव्हतें; पण सर्वच सरदारांचें आपसांत वैर होतें, असें-ही नव्हे. ते एकमेकांच्या उपयोगी पडत. महादजीस दौलत मिळूं नये, असें राघोबाच्या मनांत फार होतें व त्याप्रमाणें त्यानें आपणाकडून खटपट चालविली. पण त्या प्रसंगीं मल्हाररावानें राघोबापाशीं आपली बरीच भीड खर्च करून शिंदे घराण्याची दौलत महादजीस मिळवून दिली. या सरदारांवर जोंपर्यंत थोरले माधवरावाप्रमाणें राजकार्यधुरंधर पुरुष देखरेख करणारे होते, तोंपर्यंत हे सरदार आपआपलें नेमलेलें काम एकविचारानें व एकमतानें करीत व त्याचा इष्ट परिणामही होत असे. पण जेव्हां यांच्यावर देखरेख करणारा नाहींसा झाला, तेव्हां सारे बेजबाबदार झाले. अशा प्रसंगीं स्वामिकार्य ही भावना मनांत आणून त्याप्रमाणें वर्तन ठेवणारा व प्रजेस संतोष देणारा हा केवढा बरें थोर समजला पाहिजे? अशा थोर लोकांतच अहल्याबाईची प्रमुखत्वानें गणना होते.

मल्हाररावाचा भाग्योदय होऊं लागतांच त्याला विक्रम संवत् १७८० आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशीं (इ. स. १७२३) ह्मणजे दसऱ्याचे दिवशीं मुलगा झाला. पुत्रसुख हें परमसुखांपैकीं प्रथम सुख समजलें गेलें आहे. तशांत हिंदुलोकांत पुत्रप्राप्तीचें तर महत्त्व अतोनातच आहे. तें सुखही आतां मल्हारजीस प्राप्त झालें. खंडोबा हा होळकरांचें आराध्य दैवत असल्यामुळें मल्हारजींनीं आपल्या प्रथम पुत्राचें नांव खंडेराव ठेवावें, हें स्वाभाविकच आहे.

खंडेरावाचा लहानपणचा वृत्तांत उपलब्ध नाहीं. त्याचे दिवस लहानपणापासूनच वडिलांबरोबर लढाईंत गेले. त्यावेळीं युद्धकला हेंच मुख्य शिक्षण होतें व तें खंडेरावास प्राप्त झालें होतें. त्या काळीं त्यास इतर शिक्षणाचा अभाव असावा हेंही स्वाभाविकच आहे. त्याला आसपासची संगत चांगली नव्हती. तशांत तो थोराचा मुलगा असून तरणाबांड मनुष्य! अशा लोकांचें वर्णन "यौवनं धन संपतिः" या सुप्रसिद्ध श्लोकांत आलेंच आहे. त्या नियमास खंडेराव हा अपवाद नव्हता. तशांत, आपण साधारण लोक जे दुर्गुण समजतों, ते श्रीमंतांत आजलाही सद्गुण समजतात! व मोठमोठे सुशिक्षित (!!!) लोक मद्यपानादि प्रकारांत आजला गुंग झालेले पाहिले, म्हणजे ते अथवा तसले गुण खंडेरावांत होते याचें आश्चर्य वाटत नाहीं. त्याची आसपासची संगत वाईट, व थोराचा मुलगा असल्यानें तो जें करी तेंच चांगलें, असें म्हणणारे लोक त्याच्या भोंवतीं जमलेले! तेव्हां त्याची काय स्थिति झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल. खंडेरावाच्या वर्तनाचें वर्णन पुढील भागांत आणखी केलें आहे. तथापि त्याचें खुशालीरामानें जें वर्णन केलें आहे, तें येथें दिल्यावांचून राहवत नाहीं. तें वर्णन खुशालीरामानें मोठ्या खुबीनें केलें असून त्याची शब्दरचना मोठ्या चातुर्यानें केली आहे. तो म्हणतो:—

खंडेरावाभिधानप्रगुणगुणयुतो दिव्यश्रृंगारभोगी।
तत्पुत्रो गौतमायां सकलजनहितो धर्मपत्न्यां बभूव ॥
चातुर्थैकाभिविज्ञो विविधभटयुतः सर्वदा दानशीलो।
मानी वीरो मनस्वी मनुजपतिकुले माननीयो गुणज्ञः ॥

मल्हारजीस या पुत्राशिवाय दोन कन्या होत्या. त्यांपैकीं एकीचें नांव उदाबाई व दुसरीचें नांव सीताबाई. उदाबाई ही वाघमारे यास

दिली होती. ही बाई मोठी कारस्थानी होती. तिचें अहल्याबाईशीं मोठें सख्य असून तिच्याठाईं मोठी भक्ति होती. ती आपल्या भावजयीच्या फार उपयोगी पडे.

मल्हाररावाची स्त्री जी गौतमाबाई हिचें वर्णन वर आलेंच आहे. ती बाई सुभेदारास सर्वथैव शोभेशीच असून त्यांस नेहमीं सल्ला-मसलत सांगणारी होती. ही बाई प्रसंग पडल्यास आपल्या नवऱ्यास बोलण्यास मुळींच माघार घेत नसे. यामुळें तिचे प्रसंगीं सुभेदाराशीं दोन हातही होत. याविषयींची एक मोठ्या गमतीची गोष्ट सांगण्यांत येते. या गोष्टींत त्यांचें उभयतांचें स्वभावचित्र अगदीं यथार्थ वठलें आहे. ती गोष्ट अशी. इ. स. १७६०त दुराणी व दत्ताजी शिंदे यांचें घनघोर युद्ध होऊन त्या युद्धांत दत्ताजी कामास आला व जनकोजी फार जखमी झाला. हें वर्तमान मल्हाररावानें ऐकतां क्षणींच अंबारींतच घालून घेतलें, व गंगाधर तात्या शहाजणें वाजवीत होते तें मना केलें. याप्रमाणें तो डेऱ्यांत जाऊन शोक करता झाला. हा प्रकार पाहून गौतमाबाईस फार राग आला. तिनें सुभेदारांच्या वर्तनाचा निषेध केला. ती त्यांस म्हणाली, "सुभेदार, तुमचें वृद्धपण झालें. शिंदे यांचीं मुलें ह्मणजे काय? त्यांच्या ओठावरचा अजून जारही वाळला नाहीं! असें असतांही त्यांनीं एवढा पराक्रम करून धारांगणीं देहही टाकले. एरवीं हा मृत्युलोकच आहे. जन्मास आलेला प्राणी वांचत नाहीं. पण इहलोकीं कीर्ति करून मग परलोकाचें साधन करणें हें मात्र फार कठीण आहे. हें एवढेसें मूल जनकोजी शिंदे पहा! यानें केवढा पराक्रम केला! तुमचे दिवस समीप आले. तरीही पण हिंमत धरून मारतां मारतां मरावें. हा प्रलाप मी करावा व तो पुरुषांनीं ऐकून

घ्यावा हें शोभत नाहीं ! प्रस्तुत शिंद्यांचीं मुलें जखमी होऊन आलीं आहेत. तर असेंच त्यांच्या समाचारास जाऊन त्यांचें समाधान तरी करावें. नुसतें बसून कसें चालणार!"

या भाषणानें म्हातारा चिरडीस गेला व तो आपल्या बायकोच्या अंगावर वसकन् जाऊन म्हणाला, "मला वाटतें, तुझे चित्तांत मी मरावें असें आहे!"

सुभेदारास आपल्या बायकोच्या भाषणावर जेव्हां कांहींच उत्तर करितां येईना, तेव्हां "शेषं कोपेन पूरयेत्" प्रमाणें त्यांनीं असलें भाषण केलें. पण त्यामुळें गौतमाबाईस राग येऊन ती फणफणत ह्मणाली, "सुवासिणी असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण असेल! अहेवपणें हळद-कुंकु-मंडित मरावें. परंतु जैसें पूर्व आचरण असेल, तैसें घडेल. आपले पदरीं लौकीक भारी. तुम्हीं आतां क्षत्रियांचें कर्तव्य आरंभिलें आहे. मागचें आपलें घोंगडी मिळावयाचें स्वकर्म करीत असतां, तर गोष्ट निराळी. मग वांचावयाची इच्छा खुशाल धरली असती तर शोभलें असतें. बाण सतीचें घेतलें जसें सांभाळावें. तसेंच धर्मशास्त्र आहे."

हें झणझणीत भाषण ऐकून मल्हारराव तसाच रागारागानें उठला व घोड्यावर स्वार होऊन जनकोजीकडे सरळ निघाला. या उदाहरणावरून गौतमाबाईची योग्यता किती थोर होती हें दिसून येतें. या बाईचा इतिहास आज आह्मांला उपलब्ध नसावा, हें मोठें दुर्दैव होय.

मल्हाररावाचें बहुतेक सारें आयुष्य लढायांतच गेलें. त्या सर्वांचा येथें उल्लेख करावयाचें प्रयोजन नाहीं. तथापि इतकें सां-

गावयास चिंता नाहीं कीं, तो एकंदर लहानमोठ्या बावन लढायांत होता. त्यांपैकीं ज्या लढायांत अहल्याबाई प्रत्यक्ष होती, त्या लढायांचा इतिहास येथें सांगणें अवश्य आहे. पण चरित्रनायिकेसंबंधीं अजून कांहींहीं सांगितलें नाहीं व तें सांगणें आतां लांबणीवर टाकतां येत नाहीं. पण त्यासही नव्या भागांतच आरंभ करणें अधिक चांगलें. अर्थात् या लढायांची हकीकत तिसऱ्या भागांत सांगावयाचें अभिवचन देऊन तूर्त येथेंच विश्रांति घेतों.

भाग दुसरा.

# अहल्याबाईचें पूर्वचरित्र.

* गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं नच वयः ।

भवभूति.

मागल्या भागांत होळकरांच्या घराण्याचा अभ्युदय कसा काय झाला, त्या वेळची राजकीय स्थिति कशी होती व मल्हाररावांचें थोडेंबहुत चरित्र, इतका भाग आला. या भागांत चरित्रनायिकेचें पूर्व चरित्र सांगावयाचें योजिलें आहे.

अहल्याबाईचा बाळपणचा वृत्तांत आह्मांस कोठेंच उपलब्ध झाला नाहीं, व तो आतां कोठें अस्तित्वांत असेल असें वाटतही नाहीं. आमच्याकडील इतर थोर लोकांच्या इतिहासाची जी गति झाली, तीच या बाईच्या बाळपणच्या वृत्तांताची झाली. तिच्या चरित्राची बरीचशी सामुग्री बाळगणारे रा० पारसनीस यांनींही याबद्दल निराशेचे उद्गार काढिले आहेत. नाहीं ह्मणावयास तिच्या बाळपणचा यथासांग वृत्तांत

---

*लोकीं गुणीचे गुण पूज्य होती । प्रमाण नाहीं वय लिंग जाती ॥

प. गोडबोले.

तिच्या एका चरित्रांत दिला आहे. पण त्याचा जन्म कल्पनासृष्टींत झाल्यानें तो अर्थात् सारा खोटा आहे. फार काय, तिच्या बापाचें नांव, रहावयाचें गांव अर्थात् त्या स्थळाचें कादंबरीस शोभेसें वर्णन इत्यादि सारा भाग असत्य आहे.

अहल्याबाईचा मृत्यु इ० स० १७९५ त झाला. त्यावेळीं तिचें वय सुमारें साठ वर्षांचें होतें, असें मालकम साहेबानें, त्यास जी माहिती मिळाली तीवरून, लिहिलें आहे. यावरून तिचा जन्म इ० स० १७३५ त झाला असावा, असें लोक अनुमान बांधीत. यावर रा० पारसनीस ह्मणतात "इ.स. १७८०च्या एका अस्सल पत्रामध्यें आपल्या वयास ५५ वर्षें झालीं असे अहल्याबाईचे स्वमुखोद्गत उद्गार आहेत, त्यावरून तिचा जन्मकाल आणखी दहा वर्षें मागें न्यावा लागतो. ह्मणजे तिचा जन्म इ० स० १७२५ त झाला असावा असें मानणें भाग पडतें." * पण यावरून तिचा जन्म १७२५ तच झाला, असें खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. फार तर यावरून असें अनुमान काढतां येईल कीं, तिचा जन्म इ० स० १७२५ च्या सुमारास झाला. कारण ३९ वर्षें वयाचा, फार काय पण प्रसंगीं ३६ वर्षांचा मनुष्यही ह्मणतो कीं, मला आतां चाळीशी लागली! यावरून खऱ्या वर्षांत व अनुमानानें काढलेल्या वर्षांत चार वर्षांची चूक असण्याचा संभव आहे. रा० पारसनीस यांनीं एप्रील २२ इ० स० १७८१ चें एक अस्सल पत्र त्याच अंकांत दिलें आहे. त्यांत बाईनें ह्मटलें आहे— "आमचे वडिलापासून चाल चालत आली कीं, राज्याचें कल्याण तेंच आचरण करावें; दुसरी गोष्ट कैसी घडेल? **वयासही पंचावन वर्षें जाहलीं. पुढें अवधीही थोडकीच राहिली. आजपर्यंत**

* विविधज्ञानविस्तार, वर्ष ३८, अंक ५, पृष्ठ १४६.

**ईश्वरें उत्तम रितीनें चालविलें. पुढेंही चिंता त्यासच आहे. जेथें जेथें जाईन तेथें भगवंत परिणाम उत्तमच करील. कारण कीं, धनी आणि भगवंत एकरूप जाणोन वर्तणूक जाहली आहे."**

हा उतारा जरा वाजवीपेक्षां जास्त घेतला आहे, पण त्यांत चरित्र-नायिकेच्या पावित्र्याचा सुगंध पसरला असल्यामुळें, तो ज्यास्त उतरून घ्यावयाचें धाडस केलें आहे. असो. या उताऱ्यावरून तिचा जन्म इ. स १७२६ च्या आसपास कोठें तरी झाला आहे, हें मात्र खास. या बाईचा जन्म इ. स. १७३५त झाला नसून तो त्यापूर्वीं कांहीं वर्षें झाला आहे, यास इतरही पुरावे आहेत. ते असेः—

१ अहल्याबाईस मालेराव या नांवाचा एक मुलगा होता. त्याचा जन्म देपाळपुरीं इ. स. १७४५त झाला. अर्थात् या वेळीं तिचें वय दहा वर्षांपेक्षां अधिक पाहिजे. यावरून तिचा जन्म इ. स. १७३५त झाला नाहीं, हें पर्यायानें आलेंच.

२ अहल्याबाईचें लग्न शके १६५५ ह्मणजे इ. स. १७३३त झालें. अर्थात् तिचा जन्म १७३६त होणें कधींही शक्य नाहीं.

३ पण इतका खटाटोप कशाला? तिचा जन्म शकलेखनींही सांपडतो. त्यावरून तो इ० स० १७३५ त झाला नाहीं हें सिद्ध करणें सोपें आहे.

आतां, तिचा जन्म शक लेखीं कसा काय आढळतो, तें सांगतों. सुभेदार मल्हारराव हा इ० स० १७४३ च्या सुमारास नाशीकच्या यात्रेस गेला. त्या वेळीं त्याच्याबरोबर घरांतील लहानापासून तों थोरापर्यंत सारे लोक गेले होते. त्यानें त्या क्षेत्रीं आपला एक

उपाध्याय केला. या उपाध्यायास त्यानें कांहीं वर्षासनही करून दिलें होतें. तें वर्षासन यशवंतरावाच्या कारकीर्दींत बंद झालें. कारण, त्या-वेळीं स्वतः यशवंतरावाचेच देव देव्हाऱ्यांत नव्हतें, मग त्या उ-पाध्येबोवांस कोण विचारणार? पुढें, थोरले महाराज कै. तुकोजी-राव यांच्या कारकीर्दींत होळकरांचें बस्तान चांगलें बसलें. ही संधि साधून नाशिककर भटजींनीं आपलें चंबूगवाळें आंत टाकून दिलें. मल्हाररावानें आपणास उपाध्याय कसें केलें, तो कोणकोणासह या-त्रेस आला, त्यांची माहिती, जन्मशक वगैरे जी हकीकत सुभेदारानें त्यास लिहून दिली होती, ती सारी भटजीबोवांनीं महाराजांकडे पाठ-वून आपला उपाध्येपणा कायम ठेवण्याबद्दल त्यांस विनंती केली. म-हाराजांनीं तें सारें प्रकरण पाहून त्याच्या वर्षासनापैकीं कांहीं भाग पुनः सुरू केला. मल्हारजींनीं उपाध्यायास जी हकीकत उतरवून दिली आहे, तींत आपल्या बरोबरील मंडळीचे जन्मशक वगैरे माहिती उतरवून दिली आहे. त्या यात्रेंत तुकोजी हा सुभेदाराबरोबर होता, त्याचीही माहिती त्यांत आहे. पण आपले डोळे जिच्या हकीकतीकडे लागावयाचे, त्या स्त्रीची माहिती त्यांत फारच थोडी आहे. उघडच आहे, अहल्याबाई ही बोलून चालून हिंदुसमाजांतील सून, त्यांत तिचें अल्पवय. तिचें महत्त्व त्यावेळीं घरांत बेताचेंच असणार. तिला जें महत्त्व प्राप्त झालें होतें तें यानंतर; व गोष्टीस जें अमरत्व येतें, तें तो मनुष्य मोठा झाल्यावर येतें. त्या वेळीं तिला महत्त्व नव्हतें, व त्या वेळची हकीगत सांगणारा नंतर कोणी भेटला नाहीं. यामुळें तिचें लहानपणचें चरित्र अप्रसिद्धच रहावयाचें. त्या हकीगतींत तिच्या जन्माची तीथ, वार वगैरे कांहींएक नाहीं; मात्र लग्न-समयीं तिचें वय किती होतें हें मात्र दिलें आहे! ती आपल्या ल-



कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

ग्रांत आठ वर्षांची होती. तिचें लग्न इ. स. १७३३त झालें. अर्थात् तिचा जन्म इ. स. १७२५ त झाला असें ठरतें. ह्मणून रा. पारसनीस यांचें अनुमान चुकीस पात्र असूनही तें खरें झालें आहे.

अहल्याबाईच्या जन्मतिथीबद्दल इतकें लिहिलें. पण तिच्या माहेरची माहिती यापेक्षांही अल्प आहे. माणकोजी शिंदे या नांवाचा गृहस्थ जिल्हा अवरंगाबाद, तालुके बीड, गांव चोंढे येथें पाटील होता. या माणकोजीच्या पोटीं या विख्यात स्त्रीरत्नाचा उदय झाला. याशिवाय तिच्या बाळपणची कांहींएक माहिती मिळत नाहीं. तिच्या पूर्वेतिहासावर आतां अप्रसिद्धीचें आवरण पडल्यामुळें तो काय असावा हें समजणें अशक्य झालें आहे. पण तिच्या उत्तर आयुष्यावरून व त्या वेळीं घडलेल्या कांहीं गोष्टींवरून तिच्या पूर्वचरित्राबद्दल कांहीं अनुमानें बांधतां येतात; व अशीं अनुमानें बांधणें चुकीचें होणार नाहीं. कारण एखादें फळ बरें किंवा वाईट आहे हें जर एकदा समजलें तर त्याच्या बीजाबद्दल, त्यावर लागवडीचा जो परिणाम झाला त्याबद्दल, अनुमानें बांधणें चुकीचें होणार नाहीं. पण उलट पक्षीं, एखादें बीज कसें आहे हें जरी आधीं कळलें, तरी त्यापासून फळ कसें उत्पन्न होईल, हें मात्र सांगतां येणें कठीण आहे. कारण भविष्य काळच्या गोष्टी कोणी सांगाव्या? यापैकीं पहिल्या अनुमानपद्धतीनें पाहातां मल्हाररावाचे पूर्वज ज्याप्रमाणें मोठे संभावित पाटिल होते, त्याप्रमाणें माणकोजीही त्यांच्या तोलास साजेसे संभावित व कुलीन पाटील असावेत. त्या काळीं कुळकर्ण्यास चांगलें लिहितां येई व पाटलास लिहिणें चांगलें समजे. अर्थात् तें माणकोजीसही चांगलें समजत असलें पाहिजे. मल्हारराव सरंजामी सरदार असतां त्यानें पाटलास आपले व्याही केलें, यावरून मुलगी मनांत भरण्याजोगी असून

तिचे ग्रहही चांगले असावे, असें अनुमान करण्यास जागा आहे. अहल्याबाईच्या नवऱ्याचें वर्तन बेताल असे. पण ती या बेताल आचरणांत त्याच्या तंत्रानें कधींही चालली नाहीं, यावरून ती मोठी पापभीरु व नवऱ्यास इतक्यापुरतें तरी न जुमानण्याजोगी बाणेदार व सत्त्वशील बायको असावी. ती लहानपणापासून मोठी हुशार, आपल्या कामांत दक्ष, पापभीरु, सन्मार्गशील, व विकारवश आणि दुराग्रही लोकांवर विलक्षण दाब ठेवणारी, अशी असावी. ती माहेरीं असतांनाच तिला लिहितां वाचतां येत होतें किंवा नव्हतें, हें कळण्यास मार्ग नाहीं. पण तिला माणकोजीच्या घरीं पुराणें ऐकण्याची गोडी लागण्याचा संभव आहे. तिला पुराणांतलें मर्म चांगलें समजे. मुक्ताबाई–तिची मुलगी–जेव्हां सती गेली, त्यावेळीं एका शाह्यानें तिला पत्र पाठविलें. त्याचा भावार्थ असा आहे कीं, "आपल्या शांतवनार्थ अमूक एक गोष्ट सांगावी, तर ती आपल्यास विदितच आहे! तर मग आह्मीं आपलें शांतवन तरी कसें करावें?" हें पत्र ह्मणजे अलीकडे दुःखनिवारणार्थ जीं व्याख्यानें होतात अथवा लेख लिहितात, त्याचा मासला खचित नव्हे. तिला परमार्थपर भाषण उत्तम प्रकारचें समजे, इतकेंच नव्हे, तर ती त्यावर चांगलें भाषण करी. याचा एक दाखला खालीं दिला आहे. तिला पुराणांतलें मर्म चांगलें समजे, इतकेंच नव्हे, तर तिला पुराणाची फार आवड असे; ती इतकी कीं, तें श्रवण करणें हा एक तिचा रोजचा अबाधित कार्यक्रम झाला होता. तिला कवितेंतलें रहस्य चांगलें समजे. यावरून व पुराणश्रवणाच्या आवडीवरून असें वाटतें कीं, तिला वाचण्याचा व ऐकण्याचा नाद लहानपणापासूनच लागला असावा. गौतमाबाईची ब्रह्मेन्द्रस्वामींवर चांगली निष्ठा होती. अशा सत्पुरुषांच्या उपदेशाचा परिणाम अहल्याबाईवर लहान-

पणापासूनच झाला असावा. पण त्यास प्रत्यक्ष पुरावा कोठें सांपडत नाहीं. ती संस्कृत पुराणें वाची व तिला त्यांचा चांगला अर्थ कळत असे. तिला ऐश्वर्य, ऐन तारुण्य व अप्रतिबंध अधिकार अशा एकापेक्षां एक एक अधोगतीस नेणाऱ्या खंबीर गोष्टी साध्य असतां ती सात्त्विकपणापासून यवभरही ढळली नाहीं, यावरून तिचे पाय सन्मार्गांत किती बरें अचल असावेत? वरील गोष्टी अनुकूल असतां; त्यास विवेकाची जोडी मिळाल्याशिवाय कधींही सुपरिणाम होणार नाहीं. यौवन, धन व प्रभुत्व यांची एके ठिकाणीं सांगड पडली असूनही तिनें साध्वीप्रमाणें आचरण करणें, नम्र राहणें, साधें असणें, हें सारें खरोखरच अवर्णनीय होय. कारण, वरील तिन्ही गोष्टी अनुकूल असतां आपणास चांगले लोक कितीसे आढळतात? या गोष्टी ऐकून, पाहून अथवा वाचून ऐन वेळीं कधींही आचरणांत आणतां येत नाहीं. अशा गोष्टींकडे लहानपणापासूनच ध्यान असल्याशिवाय मन सुसंस्कृत कसें राहणार? पण या साऱ्या गोष्टी या सतीच्या अंगीं होत्या, यावरून ल- लहानपणापासूनच तिचें लक्ष सात्त्विक गोष्टींकडे असावें व तिला परमेश्वरभजनाची जिवंत आवड असावी, असें ह्मणावें लागतें.

अहल्याबाईच्या इतर आप्त लोकांबद्दल उल्लेख सांपडतात. तिचे भाऊ तिजबरोबर येऊन जाऊन राहत याचा उल्लेख सांपडतो. या लोकांबद्दल तिचे स्वतःचे उद्गार आढळतात, पण तिचे वडील व मातोश्री यांच्या संबंधानें कांहींही उल्लेख आढळत नाहीं. मग अहल्याबाईचा उदय होण्यापूर्वींच तीं गत झालीं कीं काय नकळे. अहल्याबाईची एक बहीण खानदेशांत दिली होती. तिचा महादजी शिंदे या नांवाचा एक भाऊ होता, तोही तिच्याजवळच येऊन जाऊन असे. तो देशीं इ. स. १७८४ त वारला. तिचा आणखी एक वडील भाऊ

होता, तो इ. स. १७८६ त वारला. या भावासंबंधानें महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत असा उल्लेख आहे:—

'राजश्री त्रिंबक अनंत गोडबोले, श्रीमहायोत्रस जावयानिमित्य महेश्वरास कार्तिक वद्य १३ आले. ते दिवशींच बाईचा बंधु एक उरला होता, तो मृत्यु पावला. त्याजकरतां ते दिवशीं भेट झाली नाहीं. तीन दिवस गेल्यानंतर मार्गशीर्ष शु॥ १ भेट झाली. मीच दर्शनास घेऊन गेलों. एक पाताळ चोळी देऊन भेट केली. **उभयतांचें भाषण उत्तम पारमार्थिक झालें.** तदनंतर ते दिवशींच, बाई त्यास शिधा व सामान देऊं लागली, परंतु त्यांनीं घेतलें नाहीं. समागमें इतर लोक होते, त्यांचा शिधा सुमारें वीस माणसें व घोडीं दोन, परभारें त्यांचा दाणाचारा घेतला.'

हाच मजकूर केसो भिकाजीनें पुनः पुढच्याच पॅरिग्राफांत लिहिला आहे.:—

'........बाईचा बंधु एक वडिल राहिला होता, तो येथें आणला होता. तो मृत्यु पावला. दोन चार दिवस ( बाई ) श्रमीच होती. आतां स्वस्थ आहेत.'

**भाग २, पृष्ठ ११३.**

यांपैकीं पहिल्या उताऱ्यावरून हेंही दिसून येईल कीं, तिचें पारमार्थिक गोष्टींकडे चांगलें लक्ष असून त्यांत ती बरीच प्रवीण होती. या बाईच्या बाणेदारपणाद्दल तर वाटेल तितकीं उदाहरणें देतां येतील. उदाहरणार्थ पुढील उताराच पहा. बाईचें आणि तुकोजींचें ( अर्थात् नारो गणेशामुळें ) कांहीं वाकडें आलें होतें. अशा प्रसंगीं बाळारावाची आणि तिची भेट झाली, हा पुढील उताऱ्याशीं संबंध आहे.

'बाईंनीं फडणीसास सांगितलें जे, " चौ पांचा वर्षांचा हिशेब बाळारावांस दाखवा "........त्यास फडणिसांनीं बाळारावांस हिशेब दाखविला. समजावून दिल्हा. बाई बोलली जे, " हा वेळपर्यंत आह्मीं हिशेब तुह्मांस नाहीं दाखविले. सुभेदारांचे वेळेस तुमचे हिशेब आह्मांकडे आले. कितीकदां आह्मीं पाहिले आहेत. परंतु सांप्रत तुकोजी बावा विजयध्वज दौलतकर्ते पैदा झाले, त्यायोगेंकरून तरी हिशेबाचे महजब घरोघर देणें आह्मांस प्राप्त झालें! बरें, भगवत् इच्छेस उपाय नाहीं! परंतु बाळाराव, तुह्मांस कळलें असूं द्या, अद्याप तुकोजी बावांनींही कोठें पराक्रम करून अधिकोत्तर मेळविलें नाहीं. राणोजी शिंद्याच्याच दौलतीवर उड्या मारितात. जयाजी शिंदे मेल्यावर दत्ताजी शिंद्यानें कशी लढाई केली; तदोत्तरही कसे पराक्रम केले; तसे तुह्मीं अगर तुकोजी बावांनी कोठें काय पराक्रम केले आहेत? आणि सांप्रत धनी लहान, मुत्सद्यांचा कारभार; राज्यांत मातबर सरदार तुह्मीच दोघे. तेही समयानरूप समजूनच तुह्मांशीं वर्ततात. **कैलासवासी श्रीमंत रावसाहेब * होते, ते वेळेस त्यांचे दावही तसेच होते. तुमच्या वर्तणुकीही तशाच होत्या.** असो. इतकें बोलावयास कारण हेंच कीं, तुकोजीबावांचें इतकें दिवस वांकडें पाऊल पडलें नांहीं. परंतु चारपांच वर्षें उभयतांच देशीं होते, तेथें उभयतांची मसलत जशी जाली असेल, तशीं यांचीं पावलें पडत जातात. असो. काय चिंता आहे? **तुमचें मानस असेल कीं, बाईस चहूंकडून उपद्रव जाल्यानें, सारेच बंदोबस्त आपण केल्यावर बाईंनीं काय करावयाचें आहे? परंतु तुम्हांसही कळलें असूं द्या, मी सुभेदाराची सून आहें. केवळ तुकोजीबावाच दौल-**

---

* रावसाहेब पेशव्याबद्दल बाईचें हें जें मत होतें, तें लक्षांत घेण्याजोगें आहे.

तीचे धनी आणि मी कशांत कांहीं नाहीं, असें समजूं नका. तुकोजीबावा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत. त्यांनीं निमकहरामीचे फंद आह्मांसीं केल्यास, पुढें सुखरूप दौलत करूं ह्मणतील, तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील. आजकाल पाटीलबावांचा दम तुकोजीबावा फार राखितात. आणि पाटीलबावांच्याही चित्तांत फार फंद असेल, तर उभयतांही फौज सुद्धां मजवर चालून यावें. सुभेदारांचे पुण्यप्रतापें येथेंही कोणी बांगड्या* लेऊन बसलें नाहीं. श्रीमार्तंड समर्थ आहे. जें ईश्वर घडवील तें खरें!"

इतकें बाई बोलल्यावर बाळारावांनींही फार नम्रतेचीं उत्तरें केलीं कीं, "उभयतांसही वडील आपण आहेत. जितकीं आपण रागें भरून आज्ञापिलें, त्याचे लेशही पाटीलबावांच्या चित्तांत नाहींत असें असतां कितीकांनीं कितीक गोष्टी विपर्यास आपणास समजाविले असतील. ते किमपी ध्यानांत न यावे. सुभेदारांचे जागां व राणोजीबावांचे जागां उभयतांसही आपण वडील आहेत." असें फार बाळाराव बाईंशीं ममतायुक्त बोलले.

'बाई बाळारावाशीं बोलली जे, "बहुत ममता पुरस्कर बोलतां. परंतु दोन्ही ज्ञानें तुह्मांस पाठ आहेत. वरतें तोंडानें बोलत जावें, पायानें पाय तुडवीत जावें. हातपाय जोडून आदब करीत असावी, हे तालीम तुह्माजवळून शिकणारांनीं शिकून जावी. असो. तुकोजीबावांनीं इतकें जें केलें आहे, तें तुमच्या मुखांतरें पुण्यांतही श्रीमंतांजवळ बंदोबस्त केलाच असेल. येविशीं पुण्याहून धन्याचेंच पत्र आह्मांस आणा कीं, सुभेदाराचे तुह्मीं कांहीं नव्हां. त्यांचे दौलतीचे वारिस-

* हें बाईचें वीर पुरुषास साजेसें भाषण लक्षांत घेण्याजोगें आहे.

दारी तुह्मांस पोंहचत नाहीं. सर्वविशीं मुगुटमणी तुकोजीबावा आहेत. **तुह्मीं उठून काशीयात्रेस जाणें. असें धन्याचें व कारभाऱ्याचें पत्र, शंभर स्वार, एक कारकून येऊन, त्यांनीं आम्हांस उठून जा म्हटलें म्हणजे आम्ही तुमचे आज्ञेचा उजूर करणार नाहीं. त्यांचीच आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे. "**

बाळाराव बोलले जे, " श्रीमंत धनी, ते आमचे ओंजळीनें पाणी पितात कीं काय ?"

बाई बोलली जे, " तेही काय करतील ? आजचा काळ असाच आहे. "

अशीं फार बोलणीं झालीं. मग बाळारावही बाईच्या संतोषानुरूप बोलून बाईस संतोष करून निरोप घेतला. निरोपसमयीं बाईंनीं वस्त्रें पैठणी तिवट व शालजोडी व जामेवार व किनखाप अशीं चार वस्त्रें बाळारायास व आबाजी नाईकांसही याप्रमाणेंच व दहापांच गृहस्थांस पैठणीं दोन दोन वस्त्रें दिल्हीं. बाळारायांस एक सोन्याचें कडें देऊन बिदा केलें.'

**महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें**, भाग पहिला, पान ५२-५३.

या उताऱ्यावरून या बाईचा बाणेदार स्वभाव, आपल्या सासऱ्याविषयीं विलक्षण आदर व अभिमान, दरबारांत वागण्याची पद्धत, इत्यादि पुष्कळच गोष्टी आढळून येतात. या व इतर पुष्कळशा गोष्टींवरून तिचा बाळपणाचा इतिहास जाणण्याची उत्कट इच्छा होते. पण आतां त्यावर विस्मृतीचें आवरण पडल्यामुळें त्याबद्दल अनुमानें काढीत बसण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं !

म/४०१

या बाईनें आपल्या जन्मभूमींत एक मंदिर व घाट बांधला आहे. तें मंदिर महादेवाचें असून तो आज अहिल्येश्वर या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यास होळकर सरकारांतून अजूनही सालिना सुमारें आठशेंचें उत्पन्न आहे. या गांवची पाटिलकी अद्याप शिंद्यांच्याच वंशजाकडे आहे.

मल्हाररावाचें स्वतःचेंच लग्न आठव्या वर्षी झालें होतें. मग आतां तर त्यांची चांगली स्थिति असून ते थोर पदावर चढलेले. तेव्हां त्यांनीं आपल्या मुलाचें लग्न लवकरच करावें यांत कांहींही आश्चर्य नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर तें आजलाही जनरूढीविरुद्ध फारसें नाहीं ! मग तेव्हां तर तें मुळींच नव्हतें हें स्पष्टच आहे. त्यांनीं आपल्या मुलाचें लग्न* त्याच्या दहाव्या वर्षी, ह्मणजे शालिवाहन शके १६५५त केलें. अहल्याबाई ही लग्नांत अष्टवर्षा–ह्मणजे शास्त्राप्रमाणें 'लग्नाला योग्य जाहली' होती.

लग्न झालें तेव्हां अहल्याबाई फारच लहान. गौतमाबाई हीही फारच चांगली सासू. घरचा लौकिक फार, तेव्हां तिचें बाळपण चांगल्या

---

* रा. पारसनीस यांनीं इतिहाससंग्रह (पुस्तक ४ थें, जोड अंक १,२,३) या मासिकांत खंडेरावाची लग्नचिठ्ठी छापविली आहे. ती छापण्यापूर्वी खंडेरावाची स्त्री अहल्याबाई होळकरीण ही प्रसिद्ध स्त्री होय, अशा अर्थी त्यांनीं एक वाक्य घातलें आहे. त्यामुळें ती लग्नचिठ्ठी ह्मणजे अहल्याबाईच्या लग्नाची आहे, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे. त्या लग्नचिठ्ठीला शक नाहीं. अहल्याबाईच्या लग्नाचा जो महिना असावयाचा तो महिना आणि लग्नचिठ्ठींतील महिना जुळत नाहीं. शिवाय खंडेरावाचीं लग्नेंही बरींच झालीं. यामुळें ती चिठ्ठी अहल्याबाईच्या लग्नाचीच आहे, असें कदापि ह्मणतां येणार नाहीं.

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

स्थितींत गेलें असावें, असें वाटतें. त्यांच्या गृहसौख्यासंबंधाचें पुढील काव्यात्मक वर्णन वाचनीय असल्यामुळें येथें दिलें आहे.

गौतमा सुमति अंगनोत्तमा ।
भक्तिमान परमा, सुरोत्तमा ॥
पूजिण्यास नमण्यास मानसें ।
ती सदा पतिसमीपची असे ॥ ६ ॥
तैशी स्नुषा अल्पवयी अहल्या ।
साध्वींत साध्वी सुकृती अतुल्या ॥
शिवार्चना सासुसमीप मौनें ।
बसे सदा प्रेमळ मानसानें ॥ ७ ॥
पूजा अटोपुनि करूनि बहूत दानें ।
पत्नी स्नुषा सुत बरोबर आवडीनें ॥
घेऊनि एकवट तो मग भोजनार्थ ।
थाळ्यावरी बसतसे बहुशा सुखांत ॥ १० ॥
मध्यें विनोदपर गोष्टि तदा करीत ।
पत्नीस स्नुनुस सुनेप्रत लाजवीत ।
तो भोजनास अटपोनि, रिघे स्वचित्तें ।
अंतर्गृहामधिं विराम करावयातें ॥ ११ ॥

पण हें बालपणचें सौख्य अहल्याबाईस फार दिवस लाभलें नाहीं.

वरील उतारा 'थोरले मल्हारराव होळकर सुभेदार' यांजवरील काव्यांतून * घेतला आहे.

खंडेरावाच्या वर्तनासंबंधानें थोडे बहुत उद्गार मागें आलेच आहेत. पण ते येथें आतां जरा विस्तारानें सांगावयाचे आहेत. मालकम साहेबांच्या पुस्तकांत खंडेरावासंबंधानें मुळींच वर्णन नाहीं व तें इतत्रही फारसें कोठें सांपडत नाहीं. यामुळें बरेचसे लेखक, तो अहल्याबाईचा नवरा—अर्थात् तो चांगला असलाच पाहिजे, या अनुमानधक्यानें त्याची फार तारीफ करतात. पण तसें जर असतें तर या बाईच्या सुखांत दुधांत साखरेची भर पडली असती. पण वास्तविक प्रकार तसा मुळींच नाहीं. खंडेरावाचा आणि तिचा बराच विजोड होता. यामुळें तिच्या चरित्रमहिम्यास अधिक महत्त्व व एक प्रकारची विलक्षण शोभा आली आहे, असें आह्मांस वाटतें. दमयंती, तारा अथवा वसंतसेना यांच्या वर्तनास कली, विश्वामित्र अथवा शकार यांनींच ज्यास्त महत्त्व आणलें आहे. विष्णूसारखा अनायासेंच पति लाभला, त्यांत लक्ष्मीची कसली स्तुति करावयाची? पण मंदोदरीसंबंधानें असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. रावणासारखा नवरा असूनही तिनें आपली सात्विक वृत्ति सोडली नाहीं; इतकेंच नव्हे, तर ती नवऱ्यास चांगला उपदेश करीत असे. ह्मणून तिचें वर्तन वाखणण्याजोगें असून ती सर्वांच्या स्तुतीस पात्र झाला आहे. नवरा प्रत्येक प्रकारें चांगला व बायकोस सुख देणारा असला, तर त्या बाई-

---

* हें सुंदर काव्य कै० एकनाथ अण्णाजी जोशी ( १८५०–८३ ), इंदूर इंग्लिश शाळेचे मास्तर, या तरुण शीघ्रकवि शास्त्रीबोवांनीं केलें. आजपर्यंत आधुनिक कवींच्या काव्यांच्या वेच्यांचीं किती तरी पुस्तकें निघालीं, पण या प्रासादिक व रसभरित काव्याला त्यांत स्थळ मिळालें नाहीं! वेचक मंडळींचें इकडे लक्ष जाईल अशी उमेद आहे.

च्या शीलाची तारीफ कशास्तव करावयाची? आतां, अशा परिस्थितींतील बाई, ही स्वतः सुखी होईल हें खरें; पण तिची स्तुति करण्याचें फारसें प्रयोजन नाहीं. आम्हांस तर असें वाटतें कीं, खंडेरावाच्या अयोग्य वर्तनामुळेंच अहल्याबाईच्या शीलास अधिक महत्त्व व तेजस्विता आली आहे. खंडेरावासंबंधानें होळकरांच्या कैफियतींत म्हटलें आहेः—

'बाईसाहेब होळकरांचे घरांत आल्यापासून समजूं लागल्यावर खंडेराव होळकर यांचें जहाला सरदारी चलण **त्यांत घुटी प्राधान्य. खर्च वगैरे अव्यवस्थित. आचारही सदरहू अन्वयें. यामुळें वृत्तीस उदास राहून सासू सासऱ्यांचे सेवनीं तत्पर असून अंबादास पुराणीक याजपासून परत्रसाधनाची कांहीं व्यवस्था ग्रहण करून सासुरवासी सबब चोरून जपून युक्तीनें त्या वस्तूचें दास्य करीत राहिल्या.** महिन्यांतून दोन वेळ तीन वेळ खंडेराव महाराजांकडील बलावण्याचा प्रसंग येईल, ते दिवशीं खाशांनीं सर्व गोष्टींत व्रतस्थ रहावें. थाळाही दुवक्तीं हिकडून जावा. प्रहर रात्र जाहल्यानंतर बाईसाहेबांनीं डेऱ्यांत जाऊन सहा घटका रात्र रहातांना निघून ( परत )यावें, अशी रूढ. यांत ईश्वरी कृपें करून एक पुत्र कन्या मालराव बावा व मुक्ताबाई जाल्यीं. ........ **खावंद या प्रकारचे,** परंतु ( स्वतः बाईसाहेब या ) **स्नान संध्यादि आचाराविषयीं सबाह्य एकरूप.**

होळकरांची कैफियत, पान ६६.

या उताऱ्यावरून या साध्वीचें संसारसुख कोणच्या प्रकारचें होतें, तिचें घरांतील वर्तन किती लीनतेचें होतें, तिनें आपल्या पतीवर नैतिक वर्चस्व कसें ठेविलें होतें, त्याचप्रमाणें तिचें ऐहिक जीवित किती

कष्टमय होतें, तें सारें दिसून येतें. पुढें तिच्यावर जीं ऐहिक दुःखें यावयाचीं होतीं, त्यांची ही जणूं काय प्रस्तावनाच होती. नवऱ्याचें आपल्यावर प्रेम नसलें म्हणजे जीवाची काय दशा होते, तो जीव आंतल्या आंत कसा तळमळतो, याची कल्पना हिंदु स्त्रीच करूं जाणे! त्याचें ज्यास्त विवरण येथें नको. पण अशा स्थितींतही तिची आपल्या पतीवर अढळ भक्ति होती. यावरून, नवरा सांगेल ती पूर्वदिशा असें ती मानीत असे, असें मात्र समजावयाचें नाहीं. आपल्याकडे अशी समजूत आहे कीं, नवरा हा आपला देव, व तो काय वाटेल तें सांगो तें निमुटपणें ऐकलेंच पाहिजे. पण अहल्याबाईचें आपल्या पतीशीं अशा प्रकारचें तादात्म्य झालें नव्हतें. ती परमेश्वरविषयक जीं कामें आहेत, तीं आपलें आद्य कर्तव्य समजे. मग तें कार्य करतांना प्रत्यक्ष नवरा जरी आड आला तरी ती त्यास जुमानीत नसे. यामुळें तिचा आपल्यापुरता खंडेरावावर चांगला दाब असे. असें बाणेदार वर्तन असावयास तिची किती तयारी असली पाहिजे, हें कांहीं सांगावयास नकोच. आपली स्वतंत्रता पतीस सर्वथैव देऊन टाकावयाची, अथवा अहल्याबाईसारखें वर्तन ठेवावयाचें, यांत ज्यास्त मनोवेधक व उच्च प्रतीचें चित्र कोणचें आहे, हें वाचकांनींच ठरवावें.

मल्हारराव व गौतमाबाई यांचा जोडा कांहींसा प्रेमळ असल्यानें व लहानपणीं त्यांनीं स्वतः दुःखें अनुभविल्यामुळें, त्यांना आपल्या मुलाचें वर्तन न आवडून त्यांचा सुनेकडेच अधिक ओढा लागला. तशांत ती सद्गुणी असल्यामुळें त्यांचें तें प्रेम दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत गेलें. मल्हारराव जसजसा वृद्ध होऊं लागला तसतसें त्याचें आपल्या सुनेवरील प्रेम वृद्धि पावूं लागलें. अहल्याबाई ही जात्याच मोठी बुद्धिमती, हुशार, कुशाग्र, सद्गुणी, व धर्मपरायण असल्यानें तिनें आ-

पला भार सर्वथैव परमेश्वरावर ठेवून ती आपल्या सासूसासऱ्यांची त्यांच्या वृद्धपणीं मुलाप्रमाणें सेवा करूं लागली. तिचा चरित्रप्रभाव असा कांहीं विलक्षण होता कीं, खंडेराव हा वरकड कसाही असो बाकी त्याची मात्रा अहल्याबाईपुढें बिलकूल चालत नसे, हेंही येथें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. ती ज्या दिवशीं आपल्या नवऱ्याकडे जात असे, त्या दिवशीं त्याला सर्व गोष्टींत व्रतस्थ राहावें लागे. फार काय, पण त्या दिवशीं त्याचें जेवणही तिच्याकडूनच जाई. याप्रमाणें त्याला त्या दिवशीं आपल्या सर्व अव्यवस्थित वृत्तीस रजा द्यावी लागे. खंडेरावासारख्या बेताल मनुष्यावर अहल्याबाईचा हा लहानसहान का परिणाम ? जेथें त्याचा आणि अहल्याबाईचा संबंध येई, तेथें तो नेहमींच तिला नमून वागे. कसाही कां पति असेना पण तें आपलें एक सौभाग्य आहे व तें तसें असलेच पाहिजे,: नाहीं तर लोक त्या सौभाग्यहीन स्त्रीला डोकें वरती काढावयास अवसर देत नाहींत व तिच्या जन्माची राख रांगोळी करितात ! यापेक्षां प्रत्यक्ष चितेंत लोटणें एक वेळ हितकारक आहे. आतां ज्या विधवा बायांची परिस्थिति चांगली आहे, त्या बायांस परिस्थितीचा खुशाल फायदा मिळो, बाकी आमच्या लोकांनीं विधवांचे फारच हाल केले आहेत. कसाही कां असेना, पण पति हा असलाच पाहिजे, ह्मणजे लोकांत तिला वावरायास मिळतें व त्या प्रमाणांत तिला सुख मिळतें हें खरें. पण असा दुर्वृत्तही पति नसणें, ह्मणजे दुःखाचा कडेलोट होणें होय, ही जी आपली समजूत आहे, त्या दृष्टीनें पाहिलें तर परमेश्वरानें हें पतिसौख्य तिला फार दिवस लाभूं दिलें नाहीं. मग त्या स्त्रीरत्नाची तेजस्विता वाढावयास तो असले प्रसंग आणीत असल्यास नकळे. कारण अशा ऐहिक दुखांःनीं शेवटपर्यंत तिची पाठ पुरविली होती.

अहल्याबाईस पुराण ऐकण्याचा नाद लहानपणापासूनच होता. तशांत नवऱ्याचें आचरण वर सांगितल्याप्रमाणें असल्या कारणानें तिला परमार्थाची गोडी अधिक लागून तिची सात्त्विक वृत्ति दिवसेंदिवस वृद्धि पावत चालली. तिनें लहानपणींच अंबादास पुराणिकाचा गुरुमंत्र घेतला होता. यामुळें ती लहानपणापासूनच विरक्त होती.

त्यावेळच्या चौगुल्यास साधारणपणें लिहितां वाचतां बरें येई. पण माणकोजीनें आपल्या मुलीस लिहिणें वाचणें शिकविलें कीं नाहीं हें कळावयास मार्ग नाहीं. तथापि उपलब्ध असलेल्या माहितीवरून इतकें म्हणावयास चिंता नाहीं, कीं तिला पूर्ववयांतच लिहिणें वाचणें समजूं लागलें. ती मोडी अक्षरही लिहीत असे. तिचें अक्षर साधारण होतें. तिला पुराण ऐकण्याची गोडी असल्यानें तिच्या अंगीं लवकरच बहुश्रुतपणा व चतुरस्रता आली. तिला चांगल्या लिहिण्यांतलीं वर्मे कळूं लागलीं. ती स्वतःही मोठें मार्मिक व खोंचदार लिहीत असे. रामायण व महाभारत सांगणारे व ऐकणारे आतांही कांहीं कमी लोक नाहींत, पण आमच्याकडे श्रवणमाहात्म्यच जरा अधिक आहे! अमुक कथा एकदां ऐकली म्हणजे बेचाळीस कुळांचा उद्धार होतो ही दृष्टि मनांत ठसवून श्रोते लोक आपल्या कानावर कथा 'ओतून' घेतात. पण या कथा मोकळ्या अंतःकरणानें ऐकल्यास त्या अंतःकरणावर उमटून त्याचा परिणाम काय होतो, हें शिवाजी, बाजीराव अशा सारख्यांच्या चरित्रावरून चांगलें लक्षांत येतें. अहल्याबाई ही मोकळ्या अंतःकरणाची श्रोती व वाचक होती. यामुळें 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' न राहून ती बाणेदार, सात्त्विक व उत्तम शीलाची बनली. तिनें आपल्या वर्तनानें बायका म्हणजे पुरुषांपेक्षां

कमी प्रतीच्या होत ही जी आपली प्रचलित समजूत तिला हरताळ लावून, आपल्या वर्तनानें पुष्कळशा पुरुषांसही सहज लीलेनें लाजविलें. ती "गृहिणी सचिवः सखी मिथः" या उच्च वर्गांतली होती. अहल्याबाईची पारमार्थिक बाजू पाहिली असतां तिला पुष्कळ अंशीं कात्यायनीची उपमा अधिक शोभते. व तिचें संसारी वर्तन पाहिलें म्हणजे लक्ष्मी, पार्वती, रुक्मिणी, सत्यभामा, तारा, द्रौपदी इत्यादि ज्या पौराणिक स्त्रिया आहेत, त्यांत अहल्याबाईचें द्रौपदीशीं ज्यास्त साम्य सांपडेल, असें आम्हांस वाटतें.

मल्हाररावानें तिची कुशाग्र व तीक्ष्ण बुद्धि आणि कामांतील हुशारी पाहून तिच्यावर फार लौकर सरकारी कामें सोंपविलीं, असें म्हणण्यास सबळ आधार आहे. * कैफियतींत म्हटलें आहेः—

'थोरले सुभेदार यांचा—अहल्याबाईवर—पूर्ण लोभ. कशीही तबियत बेज्याह असल्यास बाईसाहेबांचा निरोप गेला असतां त्याप्रमाणें व्हावयाचें. दौलतींत उत्पन्नाविशीं सुभेदाराचें प्रारब्ध व पराक्रम; परंतु व्यवस्था करणें नफा नुकसानी पहाणें हें कारभारी यानें बाईसाहेबांचे आज्ञेनें करीत असावें. असाच ओघ. याचप्रमाणें गौतमाबाईसाहेबांचा लोभ करणें. **बाईसाहेबांचे ( काम ) करण्याची रीत प्रखर.**

---

* यासंबंधानें Indore State Gazetteer (Vol. II, P. 19) या पुस्तकांत म्हटलें आहे—

The records also show clearly that Malhar Rao I was in the habit of leaving matters at home in the charge of his daughter-in-law when he was at a distance, and there is no doubt that it was thus that she acquired her administrative experience.

**धणीपणाचें वारें कांहींएक न ठेवितां कोणतेंही ( काम ) करणें तें करावें.**

**होळकरांची कैफियत, पृष्ठ ६६.**

ती अठ्ठावीस एकूणतीस वर्षांची असतांनाच तिच्या नांवानें पत्रें सुरू झालीं. यावरून ती यापूर्वीं निदान चार पांच वर्षें तरी—म्हणजे चोवीस वर्षांची असतांना—आपलें कामकाज करावयास समर्थ असली पाहिजे. अर्थात् राज्य चालविण्यास जे गुण लागतात, त्यांचा उदय तिच्या अंगीं यापूर्वींच झाला असला पाहिजे. आतां हा उदय कसा झाला, त्यांत मल्हारराव व गौतमाबाईचें साह्य किती झालें, हीं राजकीय कामें अहल्याबाई कशी काय शिकली, हें ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें आहे. पण ती माहिती आजला अनुमानपद्धतीशिवाय अन्य रितीनें मुळींच उपलब्ध नाहीं. मल्हारराव जीं जीं कामें तिच्यावर सोंपवी, तीं तीं कामें ती फारच चातुर्यानें करी. ती लवकरच मल्हारजीच्या कसोटीस उतरली. इतकेंच नव्हे, तर ती त्याच्या जोडीनें काम करूं लागून पुढें पुढें तर सूनबाईनें सासऱ्यावर कडी केली! तिचें वर्तन इतकें सरळ होतें, व तिचें काम इतकें चोख होतें कीं, सुभेदार ह्मणजे जमदग्नीचा अवतार आणि स्वच्छंदी वृत्तीचा ना, पण त्याची प्रकृति कितीही बेज्याह असली तरी अहल्याबाईनें त्याच्यापुढें प्रकारणांचा सांगोपांग विचार मांडला. ह्मणजे तो लागलाच पूर्ववृत्तीवर येत असे. तरी तो क्वचित् प्रसंगी तिच्यावर रागावेही. पण त्याचा हा राग ह्मणजे मत्सरग्रस्त नसून त्याच्या मुळाशीं प्रेमच होतें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एकदां अहल्याबाई मथुरेंत एक दोन दिवस अधिक राहिली. तेव्हां तेथें दोन दिवस ज्यास्त कां लागले याबद्दल म्हाताऱ्यानें लागलीच तिची पाठ पुरविली! मल्हाररावाचा ज्याप्रमाणें तिच्यावर लोभ होता, त्याप्रमाणें

गौतमाबाईचाही तिजवर लोभ होता. गौतमाबाई ही होळकरांच्या घराण्यांतील जीजाबाईच होय. तिच्यांत आणि जीजाबाईंत बरेंच साम्य होतें. त्याचप्रमाणें येसूबाई आणि अहल्याबाई यांच्यांतही पुष्कळ साम्य होतें. त्यांच्या नवऱ्यांत तर फारच साम्य होतें. संभाजी हा खंडेरावापेक्षां शूर होता, बाकी व्यसनाच्या बाबतींत ते एकमेकांस कांहीं हार जाणारे नव्हते. या स्त्रियांचे सासऱ्यांतही साम्य होतें. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं मराठी राज्याची स्थापना केली. मल्हाररावानें होळकरशाहीची स्थापना केली. दोघेही गनीमी काव्यानें लढण्यांत अत्यंत कुशल होते. अहल्याबाईचें खंडेरावावर ज्याप्रमाणें वर्चस्व असे, त्याप्रमाणेंच येसूबाईचें संभाजीवर असे. तिनें सांगितलेली गोष्ट संभाजी सहसा अमान्य करीत नसे. तिनें एकदां बाळाजी आवजी चिटणीसप्रकरणीं संभाजीची मऊ शब्दानें संभावना केली, तेव्हां तो म्हणाला, “ शिक्षेचा हुकूम दिल्यानंतर मला फार वाईट वाटलें! मी पुन: त्या प्रकरणाची चौकशी करतों, तों त्यांचा वध आधींच झाला होता!” ह्या बाईबद्दल लक्ष्मण कृष्ण चिपळूणकरांनीं ह्मटलें आहे:—

’ह्या बाईच्या समंजसपणाच्या व शहाणपणाच्या गोष्टी आपल्या पाहण्यांत आल्या आहेतच. हिच्या उपदेशाप्रमाणें संभाजी महाराज वागले असते, तर वीरसिंह शिवाजी महाराजांच्या पुत्रावर, यवनांनीं नाहीं नाहीं ते हाल करून ठार मारावें व तो तमाशा हजारों लोकांनीं पहावा, असा लज्जास्पद प्रसंग आला नसता. संभाजी महाराजांनीं बाळाजी आवजीसारख्या हुशार, अनुभविक व स्वामिभक्त नोकरांस हत्तीचे पायीं बांधून मारिलें, त्या वेळीं या बाईनें आपल्या पतीची चांगलीच कानउघाडणी केली. संभाजी सर्वथा व्यसनांध

झालों, व ह्याच्या हातून शिवाजी महाराजांनीं इतक्या कष्टानें उभारलेली स्वराज्यरूपी इमारत ढांसळून पडणार, अशी बालंबाल खात्री झाली तेव्हां, येसूबाई राणीसाहेबांनीं आपले बंधु शिरके यांशीं कारस्थान सुरू केलें होतें; पण संभाजीचे मरणामुळें कीं काय कोण जाणे, सर्व कांहीं उलट झालें. ज्यानें श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या उपदेशमुक्ताफलाचा अव्हेर केला, त्यास आपल्या स्वतःच्या बायकोनें सांगितलेल्या हिताच्या गोष्टीची पर्वा काय? असो; **पण जिच्या शहाणपणाचा उपयोग संभाजी महाराज जिवंत असतांना झाला नाहीं, तिचा समंजसपणा त्यांच्या वधानंतर महाराष्ट्र मंडळास फार उपयोगी पडला. राजाराम महाराज व मराठे सरदार मंडळी ज्या मसलती करतील, त्यांच्या विरुद्ध येसूबाई न गेल्यामुळें, मराठ्यांच्या या वेळच्या अलौकिक पराक्रमास मोठी मदत झाली.** '

महाराष्ट्राचा इतिहास, पृ. ४१६-४१७.

यावरून या उभयतां बायांत किती साम्य होतें, त्यांनीं राष्ट्राचे हितास्तव कसे प्रयत्न केले, हें वाचकांच्या सहज लक्षांत येणार आहे. संभाजीच्या वधानंतर येसूबाईवर जसा प्रसंग आला होता, तसाच प्रसंग मालेरावाच्या मृत्यूनंतर अहल्याबाईवर आला होता. त्यांतून ती कशी पार पडली हें पुढें सविस्तर सांगितलेंच आहे. असो. मल्हारजीची खांडाराणी हरकूबाई हिचीही अहल्याबाईवर पूर्ण कृपादृष्टि होती. हरकूबाई ही राजकारणांत अभिप्राय देण्यास योग्य असून थोर अंतःकरणाची बाई होती. या बाईचें अहल्याबाईस गंगाधर यशवंत–प्रकरणीं फार साह्य झालें.

मागें ( पान ४८ ) जो कैफियतींतील उतारा दिला आहे, त्यांत फारच अर्थ भरला आहे. त्यांत अहल्याबाईच्या कामकाजाची रीत स्पष्ट रीतीनें सांगितली आहे. ती हाताखालच्या लोकांस धनीपणाच्या तोऱ्यानें वागवीत नसे; इतकेंच नव्हे, तर आपण धनी ह्मणून कधींही चहूंचा आकडा ठोकून स्वस्थ न बसतां कोणतेंहीं कामकाज करावयाचा प्रसंग येवो तें ती स्वतः जातीनें करीत असे. हा कचेरींतील कामकाजाचा भाग झाला. पण ती लहानपणापासूनच युद्धावरही जात असे. तेव्हांपासून तिला युद्धाच्या मांडण्या, त्यांतील डावपेच इत्यादि प्रकार अवगत होऊं लागले. कित्येक प्रसंगीं तर तिनें युद्धप्रसंगीं कांहीं कामगिऱ्याही केल्या आहेत. तिला युद्धकलेचें ज्ञान चांगल्या प्रकारचें असावें, असें मानण्यास सबळ कारणें आहेत. याप्रमाणें आपली सून प्रत्येक कामांत दक्ष आहे असें पाहून व पुत्राचा तो अव्यवस्थितपणा पाहून मल्हारजीचें अहल्याबाईवर पुत्रवत् प्रेम वसलें. अहल्याबाईच्या मनांत सुभेदाराबद्दल किती आदर व अभिमान होता, याचें उदाहरण मागें आलेंच आहे. '**तुह्मांसही कळलें असूं द्या मी सुभेदाराची सून आहें !**' असे उद्गार या वीरस्नुषेच्या भाषणांत वारंवार आढळतात. सुभेदार अहल्याबाईस आपल्याबरोबर पुष्कळदां नेई,—मग तो काशीयात्रेस जाण्याचा प्रसंग असो, कीं युद्धास जाण्याचा प्रसंग असो. यामुळें अहल्याबाईचा पुष्कळ प्रवास होऊन तिला भूगोलाचेंही पुष्कळ ज्ञान झालें. या प्रवासामुळें तिच्या स्वभाववैचित्र्यांत आणखी भर पडली.

याप्रमाणें सुभेदार गृहसौख्य व मान यांचा उपभोग घेत असतां त्यास इ. स. १७४५ त देपाळपुरास नातू झाला. त्याचें नांव मालेराव असें ठेवलें. मालेरावानंतर त्याच्या पाठीवर तीन वर्षांनीं तिला एक

मुलगी झाली. या मुलीचें नांव मुक्ताबाई असें ठेविलें. मुक्ताबाईस ताईसाहेब असें ह्मणत. तिचें लग्न * यशवंतराव फणशे या नांवाच्या एका गृहस्थाशीं झालें. यशवंतराव फणशे याजपाशीं पंधराशें सैन्य होतें. अहल्याबाईस कधीं काम लागल्यास तो आपलें सैन्य त्या

* या लग्नासंबंधी The Heroines of Ind या पुस्तकांत खालीं लिहिल्याप्रमाणें माहिती सांपडते.

When she assumed the Government, the whole country was infested with robbers, Thugs and dacoits; there was no peace anywhere; life and property were very unsafe. **Rani Ahalya** declared in open court, that whoever would be able to clear this kingdom of the robbers, she would give him her daughter in marriage. One Yeshwant Rao, a young noble, took upon himself this important task and he was successful in his undertaking. So long **Rani Ahalya** was alive, there was not a single case of dacoity in any part of her vast kingdom. As promised she married her daughter princess Mukta to Yeshwant Rao, the hero, who extirpated all robberies and dacoities from the kindom of Indore ( p. 131 ).

याचा सारांश इतकाच कीं, जेव्हां तिच्या राज्यास धाडेत्यांपासून फार नुकसान होऊं लागलें, तेव्हां तिनें भरदरबारांत जाहीर केलें कीं, "ठग, धाडेती व चोरटे यांचा सुळसुळाट जो कोणी कमी करील त्यास मी आपली मुलगी मुक्ता देईन." हें काम यशवंतरावानें आपल्या डोक्यावर घेतलें व तें त्यानें पूर्णपणें सिद्धीस नेलें. तें पाहून तिनें वचन दिल्याप्रमाणें आपली मुलगी त्या योद्ध्यास अर्पण केली.

ह्या गोष्टीस काय आधार असेल तो असो. पुनः ठग चोरटे वगैरेंचा सुळसुळाट तिनें स्वतःच मोठ्या चातुर्यानें नाहींसा केला आहे; त्याचें वर्णन पुढें येईलच. मग यशवंतरावानें त्यांचा एखादा धाडा परतवून राजकन्या पटकावली असल्यास न कळे!

कामगिरीवर पाठवी. पण तो स्वतः युद्धास जावयास टाळाटाळच करीत असे. तो कामकाज उरकण्यास उच्च प्रतीचा नसून आपल्यावर आलेला प्रसंग साजरा करणारा होता. मुक्ताबाईस इ. स. १७६७ त मुलगा झाला. त्याचें नांव धोंडीबा ऊर्फ नथ्याबा असें होतें.

मल्हाररावानें आपला नातू जो मालेराव याचें पुष्कळ कौतुक केलें. पण तो आपल्या कुलाच्या सोज्वल कीर्तींत भर टाकीलच, असा कांहीं त्याचा भरंवसा नव्हता.

वर सांगितल्याप्रमाणें अहल्याबाई आपल्या सासऱ्याच्या देखरेखी-खालीं कामकाज पहात असतां तिचा सौभाग्यरवि अस्तास जाण्याची वेळ येऊन पोहोंचली! इ० स० १७५४ सालीं डीगेजवळ कुंभेरीच्या किल्ल्यास मराठ्यांच्या सैन्याचा वेढा पडला. या लढाईंत मल्हाररावा-बरोबर अहल्याबाई नुसतीच नव्हती, तर ती त्यास युद्धाचे कामीं साह्य करीत होती. पण याच सुमारास खंडेरावाचें घुटी घेणें वाढत चाललें! त्याला ' घुटीची ' फारच दांडगी संवय लागली होती. तो त्यांत नेहमीं दंग असावयाचा. वास्तविक पहातां तो म्हणजे या वेळीं प्रत्यक्ष रणांगणावर होता. या वेळीं तरी त्यानें हा नशा टाकावयाचा! पण त्या धुंद असलेल्या गृहस्थानें हा विचार करावयाचा तरी केव्हां? एकं-दरींत तो योगायोगच म्हणावयाचा! त्याचा आणि अहल्याबाईचा वियोग होण्याची वेळ येऊन ठेपली! गरीब बिचारी अहल्याबाई! ती या प्रसंगीं काय कार्य करीत होती व तिचे पतिराज काय करीत होते! सध्यां खंडेरावांची स्थिति ह्मणजे मुंग्यांस पंख फुटल्यासारखी झाली. तो बेहोष असतांच "भोजन करून मोर्चियांत निशाणापाशीं आला. तों एकाएकीं प्रळय-वीज पडते तैसें होऊन जेजालेची गोळी अकस्मात लागून मोर्च्यांत ठार झाला. (तो) शुभ्रवर्ण चक्षु होऊन

गतप्राण पडला ! हें वर्तमान मल्हारराव यांस कळतांच (तो) घाबरा झाला. (कारण) त्यास पुत्र (काय तो) तेवढाच! त्याची गति अशी झाली हें जाणोन मल्हारराव यास असें झालें कीं, पर्वत मस्तकीं कोसळतो किंवा अंगावर विद्युल्लता पडते! तैसें (मल्हार-रावास) होऊन (तो) देहभान विसरला. "* तो एकुलत्या एक अशा पुत्राच्या शोकानें वेडा होऊन तंबूतून उघडाबोडका सारखा पळत सुटला! † तेव्हां रघुनाथराव व आणखी लहानथोर सरदार त्यांच्या भोंवतीं जमले व त्यांनीं त्यास ब्रह्मज्ञानाच्या व हिंमतीच्या गोष्टी सांगावयास सुरवात केली.

खंडेरावाच्या मृत्यूमुळें‡ अहल्याबाईच्या सौभाग्यावर घालाच पडला. त्या दुःखामुळें तिनें पतीबरोबर सहगमन करावयाचें ठरविलें. त्या वेळीं सहगमनाची चाल बरीच प्रचारांत असल्यानें पुष्कळशा स्त्रिया सती जात. मोठे लोकांनीं सती न जाणें म्हणजे तर मोठ्याच हीनतेची गोष्ट समजली जात असे. त्या वेळीं सती जाणें हें बरेंच प्रचारांत असल्यान तें कोणास कठीण वाटत नव्हतें; व पुष्कळ स्त्रियांनाही तें कठीण वाटत

---

* भाऊसाहेबांची बखर, पान ३.

† या लढाईसंबंधानें 'पेशव्यांच्या शकावलींत' (पान १२९) ह्मटलें आहे– 'खानदेशाहून दादासाहेब हिंदुस्थानांत दत्ताजी शिंदे व मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांस बराबर घेऊन अजमीर प्रांतीं गेले. तेथें लूट करून चौथ व सरदेशमुखी घेतली व जागोजागीं खंडणी घेऊं लागले. परंतु जाट लोक युद्धावांचून खंडणी देईनात. त्यांचा किल्ला कुंभेरी होता. त्या किल्ल्यांत ते लोक शिरून लढूं लागले. त्या लढाइत खंडराव होळकर मयत जाले. त्यांचे क्रियेस दहा हजार रुपये सरकारांतून दिल्हे. छ जमादिलावल (२४ मार्च १७५४).'

‡ एकनाथशास्त्री यांनीं या प्रसंगाचें फारच सुंदर वर्णन केलें आहे, तें बरेंच मोठें असल्यानें पुरवणी 'अ' मध्यें दिलें आहे.

नसे. त्या आपण होऊनच सतीं¶ जात. त्या वेळच्या लोकांची मुळीं कल्पनाच ही होती कीं, सहगमनामुळें ती व पति या उभयतांसही स्वर्गप्राप्ति होते. सतीची मोठी परीक्षा म्हणजे सहगमन करणें ही होय. जी स्त्री नवऱ्याबरोबर सती जाते, इतकेंच नव्हे, तर पति गेला हीं अक्षरें नीट कानीं पडावयाच्या आधींच जिचें प्राणोत्क्रामण होतें, ती पहिल्या प्रतीची पतिव्रता स्त्री होय. हें त्या वेळीं स्त्रियांच्या पातिव्रत्याचें माप होतें. यामुळें कित्येक प्रसंगीं स्त्रियांस केवळ अब्रू वांचविण्यास्तव लाजेखातर सती जावें लागे!! तशांत अहल्याबाई ही नखशिखांत पतिव्रता व पहिल्या प्रतीची धर्मश्रद्धालु असल्यानें तिनें सहगमनाची तयारी जारीनें सुरू केली. पण हा प्रकार पाहून पुत्रशोकानें आधींच पोळलेल्या सुभेदारास आगींतून निघून फोपाट्यांत पडल्यासारखें झालें. कारण, त्याचें अहल्याबाईवर अगदीं पुत्रवत् प्रेम होतें. व तीही त्याचें सर्व कांहीं अगदीं पुत्राप्रमाणेंच करीत असे. त्याची सारी भिस्त तिच्यावरच काय ती होती. कारण, त्या वेळीं मालेराव फारच अल्पवयी होता, व तो स्वतः वृद्ध झाला होता. ती सती गेल्या-

---

¶ असा जरी त्या वेळीं प्रकार होता, तरी लोक आपली अब्रू राखण्यास्तव बलात्कार कांहीं कमी करीत नसत! कित्येक लोक आपला लौकिक जाऊं नये म्हणून सती पाठवावयाच्या स्त्रीस कैफ घालीत व तीस जिवंत जाळीत! तिनें चितेंतून पळूं नये, म्हणून तिच्या भोंवतीं कुंपण घालीत व क्वचित् प्रसंगीं ती चितेंतून बाहेर पडल्यास तिला लांकडानें ढोसून पुनः चितेंत घालीत! कारण सतीनें परत येणें हें फारच वाईट समजलें गेलें आहे! आमचे धर्मपुरस्कृत धर्ममार्तंड अशा मुक्या जनावरांच्यामागें लागण्यापेक्षां जे लोक धर्माचें सोंग घेऊन धर्मबाह्य आचरण करणारे होते, त्यांस छळते तर धर्मांत कांहीं सुधारणा तरी होती. पण असें करण्यास जें नीतिधैर्य व स्वार्थत्याग लागतो तो आणावयाचा कोठून? ही सतीची चाल बंद करण्यासाठीं मागें पुष्कळांनीं खटपट केली; पण अशा रीतीनें बलात्कार करणाऱ्या लोकांस शिक्षा वगैरे ठेवून तिचा नायनाट इंग्रज सरकारानेंच केला.

वर आपली व आपल्या संस्थानाची पुढें काय वाट होणार, याचें चित्र त्याच्या डोळ्यापुढें उभें राहतांच त्यानें एकदम बसकणच घेतली. या नवीन उपस्थित झालेल्या विघ्नामुळें त्याला पुत्रशोकाचें बरेंच विस्मरण पडलें. पुत्राच्या मृत्यूमुळें त्याचे पाय तुटल्यासारखे झाले खरे, पण आतां आपला जिच्यावर सारा भार ती आपली लाडकी सूनही सहगमनाची तयारी करिते, हें पाहून त्याची कंबर मोडली व तो अगदीं गांगरून गेला. तो सहगमनाचा प्रकार पाहून सुभेदारानें पोटांत डोकी घातली व तो ह्मणाला, "बाई! मला उन्हाळा करित्येस कीं काय ? तूं माझे पाठीवर आहेस, तर अहल्या मेली व खंडू आहे हा मला भरंवसा. व माझी हीच खात्री आहे कीं, माझा मुलगा राहिला. माझी सारी दौलत राज्य संभाळावयाची तें काम तूंच माझा खंडू आहेस असें समजून मी तुझ्याकडून करीत होतों व स्वतः उत्पन्ना-चींच काय ती काळजी वहात होतों. पण आतां हें माझें सारें सौभाग्य कायम ठेवणें तुझ्याच हातीं आहे. याचा अवश्य विचार कर व ह्या ह्मातार्‍याची तुला कींव येऊं दे."

याप्रमाणें मल्हाररावानें तिला फारच गळ घातली. तें पाहून तिनें केवळ लोकहितास्तव सहगमन तहकूब केलें. ही गोष्ट फारच चांगली झाली. नाहीं तर हें रत्न अग्निमुखीं पडून त्याचा कधींच कोळसा झाला असता. मग कोठली त्याची कांति व कोठली त्याची तेजास्विता? हा अलौकिक तारा त्याच वेळीं जर क्षितिजापलीकडे जाता, तर मग होळकरशाहीची काय दशा झाली असती, हें सांगणें फारच कठीण आहे. कारण, सुभेदाराच्या मृत्यूनंतर होळकरशाहीवर जे आघात पडले, त्यांतून ती जी जगली ती केवळ याच स्त्रीरत्नाच्या तेजस्वितेमुळें, हें अगदीं उघड आहे. इतकेंच केवळ नव्हे, तर अहल्याबाईच्या

मृत्यूनंतरही होळकरशाहीवर फारच आणीबाणीचे प्रसंग आले. त्यांतून न ती केवळ अहल्याबाईच्या पुण्यप्रभावानेंच सुरक्षितपणें पार पडली. ह्मणून अहल्याबाईचें सती जाणें ह्मणजे होळकरशाहीच्या सौभाग्यावरच तो घालाच होता, असें ह्मणणें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. एकंदरींत तो प्रसंग पाहिला ह्मणजे—

**अनुकूळ दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम।**

असें मोरोपंताप्रमाणें ह्मणावेंसें वाटतें. परमेश्वरसत्तेपुढें बिचाऱ्या दुर्दैवाचें तें कितीसें चालणार! या सती जाण्यासंबंधानें कैफीयतींत ह्मटलें आहे:—

'सहगमन तहकूब जहालें. नीट जहालें. कारण सुभेदार यांनीं पैसा उत्पन्न करून मागें टाकावा. त्याची व्यवस्था चार माणसांचें संरक्षण बाईनें करावें असा ओघ चालत आला. (पान ३८).'

'खंडेराव महाराज कुंभेरीवर कामास आले, ते समयीं सहगमनाचा निर्धार, परंतु सुभेदारांनीं बहूतच ग्लानि केली,....तेव्हां बाईसाहेबांनीं सुरत सांभाळल्यावर (वृत्तीवर आल्यावर) इष्ट आराध्य सुभेदारच असें मानून काळ काहाडला. तेव्हां (बाईसाहेबांस) संकोच प्राप्त होऊन (त्यांनीं आपली सती जाण्याची) मनेच्छा रहित केली. सुभेदारांची सर्वोपरी झक्ली (स्वछंदी वृत्ति). त्यांत दबावून आदि पश्चात् विचाराच्या गोष्टी बोलणें असें पुण्य भीड अहिल्याखेरीज दुसरे कोणाची नव्हती (पान ६७).'

अहल्याबाईनें सती न जाण्यांत जो मनोनिग्रह दाखविला, तो अत्यंत वाखाणण्याजोगा आहे. त्या वेळच्या समजुती * पाहतां तिनें

* असें जरी आहे तरी खुशालीरामानें तिच्या सती न जाण्याची तारीफच केली आहे. पुरवणी (आ) पहा. त्याचप्रमाणें बाणभट्टानें चंद्रापीडाचे तोंडीं जे उद्गार घातले आहेत, तेही पहावयाजोगे आहेत. तो ह्मणतो—

**यदेतदनुमरणं नाम तदतिनिष्फलम्। अविद्वज्जनाचरित एष मार्गः, मोहविलसितमेतत्, अज्ञानपद्धतिरियम्, रभसाचरितमिदम्,**

लोकांच्या भडिमारास न भितां आपला बेत फिरविणें ह्मणजे फारच मोठें नैतिक धैर्य दाखविणें होय. एकदां आपलें पूर्वीचें मत बदलणें हें फार सोपें आहे; पण त्याप्रमाणें आचरण करणें हें महा दुर्घट काम आहे. पण अहल्याबाईचें जीवन धर्ममय होतें. तिचें जें आंत तेंच बाहेर असल्यानें तिनें आपल्या असाधारण पुण्यमय जीवनानें लोकांस माना डोलावयास लाविलें. अहल्याबाई ही जर त्या वेळीं सती जाती, तर तिचें नांव मुक्ताबाई किंवा सत्त्वशील रमाबाई ( रावसाहेब पेशव्यांची पत्नी ) यांच्यापेक्षां अधिक न होतें. ती मोठी साध्वी होती, चांगली होती, यापेक्षां तिचें चरित्र फारसें मोठेंही होतेंना. अशा दृष्टीनें पाहिलें असतां ती सती गेली नाहीं, ही फारच चांगली गोष्ट झाली. दुसरें, पुष्कळ पुरुषांचा स्त्रियांवर असा आरोप असतो कीं, "सरते शेवटीं बायका त्या बायकाच ! त्यांना आमची कधीं तरी सर येणार आहे का ? व 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें मनुवचन कधीं खोटें कां व्हावयाचें ?" विविक्षित कालचीं वचनें परिस्थिति बदलली असतांही उराशीं बाळगणें ह्मणजे प्रगतीच्या मार्गांत मोठें विघ्न आणणेंच आहे. पुनः स्त्रीपुरुषांत तोच परमात्मा वास करतो, असें जर आहे,

---

क्षुद्रदृष्टिरेषा, अतिप्रमादोयम्, मौर्ख्यस्खलितमिदं यदुपरते पितरि भ्रातरि सुहृदि भर्तरि वा प्राणाः परित्यज्यन्ते। स्वयं चेन्न जहति न परित्याज्याः। अत्र हि विचार्यमाणे स्वार्थ एव प्राणपरित्यागोयमसह्यशोकवेदनाप्रतिकारत्वादात्मनः । उपरतस्य तु न कमपि गुणमावहति। न तावत्तस्यायं प्रत्युज्जीवनोपायः। न धर्मोपचयकारणम्। न शुभलोकापार्जनहेतुः । न निरयप्रतीकारः । न दर्शनोपायः। न परस्परसमागमनिमित्तम्। अन्यामेव स्वकर्मफलपरिपाकोपचितामसाववशो नीयते भूमिम् । असावप्यात्मघातिनः केवलमेनसा संयुज्यते । जीवंस्तु जलाञ्जलिदानादिना बहूपकरोत्युपरतस्यात्मनश्च। मृतस्तु नोभयस्यापि।

तर स्त्रियांनीं प्रत्येक कार्यांत पुरुषांच्या मागें कां रहावें ? काळवेळ, प्रसंग व परिस्थिति प्राप्त झाली, ह्मणजे स्त्रियाही पुरुषांच्याच जोडीनें काम करतात, हें अहल्याबाईनें जगाच्या निदर्शनास फारच चांगलें आणून दिलें. स्त्रीशिक्षणद्वेष्टयांनीं या दृष्टीनें या बाईच्या चरित्राचा विचार करावा, अशा योग्यतेचें तें खचित आहे.

खंडेरावाच्या इतर बायका सती गेल्या. त्याप्रसंगीं एकंदर चौदा जीव गेले. त्यांत एक कुत्रीही गेली ! इतर सटरफटर बायका व कांहीं मुसलमानिणीही सती जाव्या व अशा स्थितींत अहल्याबाईनें सती जाऊं नये, हें आणखी कठीण काम होतें. खंडेरावाची उत्तर-क्रिया मथुरेंत झाली. त्याप्रीत्यर्थ पेशव्यांनीं मल्हारजीस दहा हजार रुपये दिले. त्यानें स्वतः पंचवीस हजार रुपये खर्च करून आपल्या पुत्राची उत्तरक्रिया केली व कुंभेरीस त्याची एक सुंदर छत्री * बांधली.

---

* मल्हारराव होळकर, खंडेराव होळकर इत्यादि सरदार जरी बाहेरगांवीं मृत्यु पावले, तरी त्यांच्या छत्र्या इंदुरांतही आहेत. या छत्र्या ज्या जागीं आहेत त्या जागेस छत्रीबाग ह्मणतात. अलीकडील मात्र कांहीं मंडळींच्या छत्र्या शहराच्या मध्यभागीं नदीकांठीं बांधल्या आहेत. मल्हारजी होळकर व खंडे-राव यांच्या छत्र्यांसंबंधानें केसो भिकाजीच्या पत्रांत ( २५ जून १७८४ ) पुढील उल्लेख आहे.–

‘इंदुरीं मल्हारजी होळकर सुभेदार व खंडेराव होळकर यांच्या सुरती ( मुरती ? ) पाषाणाच्या संगमरवरी करून स्थापल्या. गांवचे रांगडे ब्राह्मण व बैरागी गो-सावी व देशस्त ब्राह्मण व जमीदार वगैरे दहाबारा हजार पात्र जेऊं घातलें. कमाविसदार व सावकार व जमीदार यांस शेले पागोटीं शेंपन्नास दिलीं व शा-लेचे फर्द पंधरा सावकारांस दिले. याप्रमाणें स्तुतिकीर्त संपादून कूच केलें. ’

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग २, पान ५५.

त्या छत्रीचा खर्च चालण्यास्तव आपले अंकित जे भरतपूरकर जाट यांजकडून मल्हाररावानें पांच गांवें देवविलीं, तीं महत्पूरच्या लढाई-पर्यंत चालली होती.

मल्हारजी अहल्याबाईस पूर्वीपासूनच राज्यकारभाराचें काम सांगत असे. पण आतां त्यानें तिच्या नांवानें कागदपत्रें जारी करावयास सुरवात केली. तथापि तिच्या कामावर त्याचीच एकंदर देखरेख असून ती त्याच्या सल्ल्यानें कामकाज पहात असे. ती संस्थानचें कामकाज पाहूं लागल्यानें तिचें नांव हळूहळू चहूंकडे होऊं लागलें. तिचें नांव पुणें दरबारांतही गेलें व तेथें तिच्या चातुर्याची व दिव्य कीर्तीची लवकरच प्रसिद्धि झाली.

भाग तिसरा.

# मल्हाररावाचे शेवटले दिवस.

नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न, उद्दंड आडनांवांचीं ॥
न बुडविति नवा तारिति चित्रें बरवींहि आडनावांचीं ॥३६ ॥

मोरोपंत–वनपर्व, अ० ४.

अहल्याबाई सती जावयाची तयारी करीत असतांना (इ. स. १७५४) मल्हारजीनें जे उद्गार काढले, त्यांवरून अहल्याबाईची कामकाजांतील पारंगतता त्यास पुष्कळच आधीं दिसून आली असावी असा तर्क निघतो. इ. स. १७५४ च्या सुमारास ती राज्यकारभारांतली सारीच व्यवस्था पाहात असे. तिचें नांव कागदोपत्रींही लिहिलें जाऊं लागलें. खंडेराव असतांना अहल्याबाई मल्हारजीबरोबर कधीं कधीं युद्धास जात असे. कारण उघडच आहे कीं, त्याच्याबरोबर खंडेराव असे. पण आतां खंडेराव गत झाल्यामुळें ती संस्थानांतील अंतर्व्यवस्था पहावयास मागेंच राहात असे. मल्हारजी फक्त युद्धप्रसंगाची व उत्पन्नाची काळजी करीत असे, बाकी सारा कारभार अहल्याबाईच्या हातींच आला. तिच्या कारभारासंबंधीं इंदूर स्टेस्ट गॅझेटिअरमध्यें जें ह्मटलें आहे, त्याचा सारांश असा आहे कीं, “सर-

जॉन माल्कम यानें अहल्याबाईच्या कारकीर्दीचा फार प्रशस्त शब्दांनीं गौरव केला आहे. त्यानें तिच्या सत्तेखालीं असणाऱ्या प्रांतांचें जें चित्र रेखाटलेलें आहे, तें जरी थोडें भपकेदार असलें, तरी त्या वेळच्या कागदपत्रांवरून तिच्या असाधारण सामर्थ्याची व आपली प्रजा सुधारण्याविषयीं तिनें जे परिश्रम केले त्यांची सहज साक्ष पटते. इतका प्रयत्न करूनही तिच्या महालावर पुष्कळदां धाडें पडत. हा प्रकार विशेषतः तिच्या घरांतल्या मंडळीकडून झाला आहे. याचप्रमाणें शेतकरी पळून गेल्याचा व गांवें उजाड झाल्याचा उल्लेखही त्यांत पुष्कळ * आहे. मल्हारजी हा जेव्हां जेव्हां बाहेर जात असे, तेव्हां तेव्हां तो आपला सर्व कारभार सुनेवरच सोंपवून जाई. याप्रमाणें तिनें राज्यकारभाराचें शिक्षण आपणास प्राप्त करून घेतलें यांत मुळींच शंका नाहीं. त्या वेळचे कागदपत्र पाहिले म्हणजे, तोफांच्या गाडीचे नवीन पाटे घेणें अथवा संस्थानच्या बगीच्यांस लागणाऱ्या बैलजोड्या घेणें इत्यादि लहानसहान गोष्टींपासून तों पुणें, हैद्राबाद, दिल्ली येथें अत्यंत महत्त्वाच्या राजकीय गोष्टींपर्यंत सर्व प्रकारचे उल्लेख व तिच्या विविध--दानधर्माच्या सविस्तर हकीकती वगैरे भाग स्पष्ट दिसून येतात."

मल्हाररावाच्या कारकीर्दींत राज्याचा बंदोबस्त चांगला होता, याचें पुष्कळसें श्रेय अहल्याबाईस दिलें पाहिजे हें उघड आहे. इतकेंच नव्हे, तर मल्हारजीचे शेवटले दिवस पेशव्यांशीं मिळून मिसळून

---

* यावरून तिच्या कर्तृत्वास बाध येतो असें मुळींच नव्हे. शेतकरी पळून जाण्याच्या व गांवें उजाड पडण्याच्या गोष्टी या प्रस्तुत कालींही पुष्कळ दिसून येतात. याचें 'ईश्वरी क्षोभ' हें एक मोठें कारण आहे. तिच्या कारकीर्दींत धाडे पडत, यावरून तिच्या राज्यांत बेबंद बादशाही होती असेंही मुळींच नव्हे. कारण राज्यांत उत्तम प्रकारचा बंदोबस्त असतां धाडे पडतांना आजलाही दिसतात.

वागण्यांत गेले, या श्रेयांतील बराचसा वांटा अहल्याबाईस द्यावा लागतोच, असें आतां दाखवावयाचें आहे.

बाजीरावानें मल्हाररावास वाढविलें व त्याच्या देखरेखीखालींच मल्हारजी असल्यानें तो बाजीरावास दबून असे. पण बाळाजीच्या वेळेस स्थिति निराळी होती. मल्हारजी या वेळीं शिरजोर झाला होता. याचा कांही दोष पेशव्यांकडेही आहे; पण त्या दोघांची आपसांत दिलसफाई नव्हती हें खरें. मल्हारजी बाळाजीशीं जरी दबून राहिला नाहीं, तरी पेशवाई जेणेंकरून संपुष्टांत येईल असें त्यानें वर्तन केलें नाहीं. पण थोरले माधवरावाच्या वेळीं हा प्रकार बदलला. त्या तरुण पेशव्यानें आपल्या नैतिक आचरणानें सर्वांच्या मनांत आदर उत्पन्न करून सर्वांचे नेत्र पुनः उच्च मार्गाकडे लावले. राघोबाचा राक्षसभुवनाच्या लढाईंत पराभव झाला. निजामाचा कारभारी जो विठ्ठल सुंदर त्यानें दादास कैद केलें. ही वार्ता तरुण पेशव्यास कळतांच त्यानें दादाच्या सुटकेसाठीं दौड मारली. वास्तवीक पाहातां हा काळ ह्मणजे दुहीचा, पण त्या चोहोंकडे कांटेरी झाडें उगवलेल्या काळांत माधवरावासारखा मधून मधून नेत्रमनोहर सुंदर गुलाबवृक्ष चमके. तो दादाच्या सुटकेस जात असतां त्याला वाटेंत मल्हारजी होळकर भेटला. तो पेशव्यास म्हणाला, " माघारे चला. पुण्याचें राज्य करूं. " त्या वेळेस या नीतिधैर्याच्या मेरूनें उत्तर केलें,— " काका! भाऊसाहेब यांस आपण मागें बुडविलें असें ऐकत होतों. पण तें आज खरें झालें ! "

हें उत्तर ऐकतांच मल्हाररावाची वृत्ति पालटली. तो ह्मणाला, ' बाळा ! आतां चलावें आणि माझी तलवार पहावी. " *

---

* पेशव्यांची बखर, पान ८४.

या प्रसंगानंतर मल्हारजी माधवरावास नेहमीं वचकून असे. दादासाहेब अधिकारावर असूनही त्याच्या मनावर आपला दाब ठेवण्यास समर्थ झाले नाहींत. पण माधवराव बंदिवासांत असूनही त्यानें त्या वृद्ध भीष्माचार्याचें मन आपल्या नैतिक वर्चस्वानें सहज हातांत घेतलें. यापुढें मल्हारजीनें इमानेंइतबारें व अंग न चोरतां पेशव्याची चाकरी करण्याचा निश्चय केला. माधवराव हा नजरबंदींत असतांना त्याला खर्चाची फार तारांबळ पडे. ह्मणून त्यानें होळकरापाशीं लाख अर्धा लाख रुपये खर्चास मागितले. ह्या वेळीं खजिना अहल्याबाईच्या पूर्णपणें स्वाधीन होता. पैसा देणें न देणें हें सर्वथैव तिच्याच हातीं होतें. माधवरावानें इतर लोकांकडे मागणी न करतां होळकराकडे केली, यावरून त्याला होळकराचा व त्यांतही अहल्याबाईचा भरंवसा वाटत होता, असें वाटतें. अहल्याबाई होळकराचा सारा कारभार पहाते ही गोष्ट जगजाहीर होती, यावरून वरील अनुमानास बळकटी येते. माधवराव कैदेंत असूनही त्याला होळकराकडून पांच लाख रुपये मिळाले * यावरून त्याची लोकांत असलेली कदर व दादांची कर्तृत्वशून्यता किती होती हें दिसून येते. ह्मणून असेंही वाटतें कीं, ती रुपयांची मदत करतांना माधवरावाशीं आपला स्नेहसंबंध असावा असाही अहल्याबाईचा उद्देश असावा. तिच्या मनांत जर हे रुपये द्यावयाचे नसते तर तिनें तें काम सहज फेंटाळून लावलें असतें. कारण घरांतला सर्व कारभार तिच्याच हातांत होता, पण होळकराकडून पेशव्यास रुपये मिळाले, यावरून पेशव्याशीं सलोख्यानें वागावें, असा तिचा विचार दिसतो. हे रुपये अर्थात मल्हाररावाकडून माधवरावास मिळाले, तेव्हां त्याचीही वर

* होळकरांची कैफियत, पान ४५.

सांगितल्याप्रमाणें बुद्धि झाली असावी असें वाटतें. होळकराच्या राज्यकारभाराची परिस्थिति पहातां या गोष्टीचें बरेंचसें श्रेय अहल्याबाईस मिळालें पाहिजे. अहल्याबाई माधवरावाचे बायकोस-रमाबाईस-नजराणा ह्मणून ह्मणा अथवा आदराचें दर्शक ह्मणून ह्मणा कांहीं जिन्नस पाठवी. या दोन्ही साध्वी बायांचा आपसांत फार प्रेमभाव होता. माधवरावाच्या नैतिक वर्चस्वानें सुभेदारांत बदल झाला असें जर ह्मणावयाचें, तर तो अहल्याबाईच्याही वर्तनानें झाला, असें कां बरें ह्मणूं नये? तिचे गुण दिवसेंदिवस जसे अधिक अधिक उदयास येऊं लागले व सुभेदारास जसजसें अधिक अधिक वृद्धत्व प्राप्त होऊं लागलें, तसतसें तिचें आचरणही त्यांच्या मनावर परिणामकारक होऊं लागावें हें स्वाभाविकच आहे. पुनः मल्हारराव हा स्वभावतः गुणग्राहक होता. पण तो जरा शिरजोर असल्यानें व त्यांत पेशव्यानेंही त्याच्याशीं जसें आचरण ठेवावें तसें न ठेवल्यानें, नानासाहेबाच्या कारकीर्दींत तो डोईजड झाला. पण पुढें पुढें हा प्रकार अगदीं बदलला हें त्याच्या आचरणावरूनच स्पष्ट दिसत आहे. व हा प्रकार बदलावयास घरांत अहल्याबाई व बाहेर माधवराव हे उभयतां कारण झाले, असें वाटतें.

अहल्याबाईचें आपल्या प्रजेशीं जें आचरण असे, त्यावरून तिच्याबद्दल लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न झाला. मोगलाईचा अंमल असतांना पुष्कळशा संस्थानांस आपल्या माजी धन्यास जबर खंड द्यावे लागत. पण तीं संस्थानें जेव्हां होळकरांच्या हातीं आलीं, तेव्हां त्यांनींही संस्थानाच्या मानानें जरी जबर खंड ठेविले होते, तरी ते पूर्वींच्या खंडापेक्षां निम्मे होते ! यावरून त्या संस्थानांस पूर्वी किती जबर खंड द्यावे लागत, याचें अनुमान सहज कारितां येतें. या जबर

खंडांच्या मोगलाईमुळें त्यांस मोगल नकोसे झाले व ते आपण होऊनच मराठ्यांस साह्य करूं लागले.

अहल्याबाई खंडेरावाच्या मृत्यूनंतर मल्हारजीच्या हयातींत कांहीं वेळां युद्धांत गेल्याचा दाखला सांपडतो. त्यांपैकीं एक सरहिंदचें युद्ध, दुसरें बक्सारचें व तिसरें कोऱ्याचें युद्ध. यांपैकीं बक्सारचे युद्धाची हकीकत होळकरांच्या कैफियतींत आहे. ती येथें सांगितली पाहिजे. कारण, त्या युद्धाची व अहल्याबाईनें स्वतःच्या देखरेखेखालीं जें युद्ध केलें, त्याची वाचकांस तुलना करतां येऊन मल्हारजीच्या वेळीं युद्धांत शिपायांची कशी दैना झाली, हें त्यांस कळावें. मराठी राज्याबाहेर जीं संस्थानें होतीं, त्यांस लढाईचे कामीं साह्य करावयाचे मराठ्यांस अनेक प्रसंग येत. त्या वेळी—साह्य करतांना—त्यांचे हेतु बाजीराव, नानासाहेब इत्यादिकांप्रमाणें राज्यविस्ताराचे नसून, ज्यास साह्य करावयाचें त्यापासून चापून खंडणी घ्यावयाची इतकेच असत. आपल्या राज्यास बळकटी यावी व राज्यांत चांगली व्यवस्था लागावी, याचा ते मुळींच विचार करीत नसत. त्यांच्यांत सर्वदूर मूर्तिमंत अव्यवस्थितपणा माजावयाचा! पण इंग्रजांची युद्धाची टापटीप व त्यापासून होणाऱ्या लाभाची व्यवस्था अत्यंत चोख असे. त्यामुळें मराठ्यांचें पुष्कळसें सैन्य असूनही इंग्रजांपुढें त्यांचें कांहीं चालत नसे. याचें कैफियतींतच अन्य प्रसंगाचें वर्णन आहे. पण तिकडे सध्यां वळतां येत नाहीं. सध्यां आपणास बक्सारच्या युद्धाकडे वळावयाचें आहे.

या अत्यंत प्रसिद्ध युद्धाची सविस्तर माहिती देण्याचें येथें प्रयोजन नाहीं. हें युद्ध इंग्रज व सुजाउद्दौला यांच्यामध्यें १६ आक्टोबर इ० स० १७६४ रोजीं झालें. त्यांत इंग्रजांचा विजय होऊन सुजाउद्दौल्याचा पूर्ण पराभव झाला. या युद्धांत होळकरांचा जो संबंध आहे तो आपणास पहावयाचा आहे.

सुजाउद्दौल्याला इंग्रजांनीं लुटलें. त्याची आणि मल्हाररावाची अनुप शहरीं गांठ पडली असतां त्यानें मल्हाररावापाशीं मदतीची याचना केली. त्यानें सुभेदारास बरीच रकम देऊं करून तो त्यास घेऊन इंग्रजांवर गेला. मल्हारराव या वेळीं लढाईवर होता, तरी मुबलक रुपये फौजेस द्यावे हें त्याचे मनास येईना. लढाईचा मोसम. लढाईस अग्रेसर होऊन गंगोबातात्यास जाणें प्राप्त झालें. पण फौज बेदील असल्यामुळें त्यांचें कांहीं चालेना. यामुळें तो स्वतःच बेदील झाला. चोहोंकडून लढाईचे तोंड सुरू झालें. इंग्रज लोक मागें लागले, तेव्हां सर्व लोक बेजार झाले. पण सैन्यास पैसा देण्याचें होळकराचे मनांत येईना. यामुळें तात्यांनीं त्रासरूप होऊन शंखभट उपाध्ये होते, त्यांजपाशीं जाऊन गाऱ्हाणें सांगितलें कीं, "फौज घेऊन पुढें मरणें मला, लोकांस जखमा झाल्या. अशा वेळीं त्यांस पैसा देऊं म्हटल्यास कांहीं हातीं नाहीं. यास काय करावें ? तुह्मी तरी यजमानास दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून लोकांस दोन रोजमुरे देववा. मग शत्रूचें पारिपत्य करणें माझ्याकडे लागलें."

शंखभटानीं तात्याचें ह्मणणें कबूल केलें. तो सुभेदाराकडे गेला आणि त्यांस फजीत करून ह्मणाला कीं, " रुपये आपले बापाचे कीं काय ? ज्यांच्या जिवावर रुपया मिळतो त्याजला जखम झाली असतां तीवर हळद फटकूं लावूं ह्मटलें तरी पैसा नाहीं ! तेव्हां फौजेची हामराई ( एकी ) राहते कशी ? अशा कृतीपुढें राखणारानें काय करावें ?"

यावर सुभेदारांनीं सांगितलें, "उद्यां लढाई करावी व अस्तमानीं दोन रोजमुरे ध्यावे !"

खरोखर सुभेदाराचा हा मारवाडीपणा फारच अस्थानीं होता ! यामुळें युद्धांत पराभव होऊं नये तर काय व्हावें ? पण त्या काळीं

याचा कोणी फारसा विचार केला नाहीं. असो. ती सुभेदाराची खातरजमा पाहून गंगोबानें मोठ्या मिन्नतवारींनें फौज जमा करून युद्ध आरंभिलें. सात पलटणें कापून काढलीं. मग काल वचन मिळाल्याप्रमाणें तो अस्तमानीं रोजमुरा मागावयास मोठ्या आस्थेनें व खात्रीनें गेला. पण मल्हारराव उलट त्याच्यावरच रागावून ह्मणाला, "रोजमुरा कशाचा द्यावा? चार पलटणें अवशिष्ट राहिलीं आहेत त्यांचें पारिपत्य होईल तेव्हां रोजमुरा मिळेल!"

या बोलण्यानें तात्या व फौज फारच उदास झाली. शिपायांची अंत पाहाण्याची शिकस्त झाली. याचा परिणाम हाच झाला कीं, त्यांना त्या लढाईंतून पळ काढावा लागला! वाटेंत यमुना नदी लागली. ती सारखी भरून वाहात होती. पण मराठ्यांस पायउतार वाट ठाऊक असल्यानें ते नदी ओलांडून गेले. मागें इंग्रज लागले होते. पण नदीस पूर आला असल्यानें ते परतून गेले.

या युद्धावरून आमच्या लोकांची त्या वेळीं किती अधोगति झाली होती, हें स्पष्ट दिसून येणार आहे. या युद्धांत अहल्याबाई ग्वाल्हेरीस होती. तिच्याकडे आपल्या सैन्यास रसद व दारूगोळा पोंचवावयाचें काम होतें तें तिनें उत्तम प्रकारें केलें. पण याशिवाय तिनें लढाईंत इतर साह्य काय केलें तें समजत नाहीं.

मल्हारराव हा आपल्या कर्तबगारीनें अजापालकाचा बलाढ्य सरदार झाला. त्यानें स्वपराक्रमानें पावणेदोन कोटींचा मुलूख (सव्वा कोटीचा मुलूख + खंडणी, जाहगीरी वगैरे) मिळविला. मल्हाररावाचें वजन उत्तरहिंदुस्थानांत फार असे; व पुढें पुढें तें पेशव्यापेक्षांही अधिक वाढलें. पहिल्या पहिल्या उत्तर हिंदुस्थानांतल्या बहुतेक कामगिऱ्यांत त्याचें चांगलें साह्य झालें, यामुळें बाजीरावाची त्याच्यावर

फारच मेहेरबानगी होती. तो स्वतःही सत्तेच्या ऐन शिखरावर पोंहोंचला असतां पेशव्यांचे हुकूम अदबीनें पाळीत असे. पण नानासाहेबांच्या कारकीर्दींत तो बराच शिरजोर होता. तरी तो त्यांच्या हिताआड आला नाहीं. बाजीरावाच्या वेळीं त्याच्या हातून जी सेवा झाली, ती नानाच्या वेळीं झाली नाहीं. त्याचें प्रसंगावधान मोठें विलक्षण होतें. मराठ्यांचें रोहिल्यांशीं जेव्हां युद्ध झालें, तेव्हां त्यानें चार पांच हजार गुरांच्या शिंगांस मशाली बांधून तीं गुरें एका दिशेस पिटाळलीं. एका दिशेस झाडा-झुडपांस मशाली * बांधल्या आणि आपण तिसऱ्याच दिशेनें शत्रूवर हल्ला केला. व याप्रमाणें त्यानें विजय संपादन केला.

मल्हारराव आपणास पेशव्याचा चाकर ह्मणवीत असे खरा, पण आपलें संस्थान हें मूळ मराठी सत्तेहून निराळें आहे, ही भावना त्याच्या अंगीं चांगलीच होती. पण त्याप्रमाणें त्यानें कृति केली नाहीं. शेवटीं शेवटीं तर तो मराठ्यांच्या जुटांत अग्रगण्यच होता. मल्हारजी हा मुत्सद्देगिरींत महादजीपेक्षां जरी कमी असला, तरी तो एकंदरींत कमी धोरणी व मसलती नव्हता. तो रजपूत राजेरजवाडे यांच्याशीं मोठ्या धोरणी पुरुषासारखा वागे. तो बोलण्यांत फार तडकफडक असल्यानें त्याच्या मनांत फारसा कपटभाव नसे. तो आपणास शिलेदार समजून त्याप्रमाणें वागे व हीच समजूत अहल्याबाईनें राघोबाशीं भांडतांना व्यक्त केली आहे. त्याचें व नानासाहेबांचें आपसांत चांगलें नव्हतें खरें, पण त्यानें त्यांच्याशीं वैरभावही माज-

---

* प्रसिद्ध कार्थेजियन युद्धांत असाच प्रकार झाला. यावरून संकटकालीं मनुष्यांना तेच उपाय सुचतात, व मनुष्यस्वभाव सर्वदूर तोच आहे, अशा गोष्टीचें हें एक उदाहरण आहे, असें ह्मणावें लागतें.

विला नाहीं. त्याच्या हातून मराठी सत्तेस मोठा धक्का बसेल अशी आगळिक झाली आहे, तरी एकंदरींत तो त्या काळच्या चांगल्या पुरुषांत गणला जावयास चिंता नाहीं. गनीमी काव्यानें युद्ध करण्याच्या कामीं तरी त्याचा हात धरणारा तेव्हां कोणीच नव्हता बाजीरावानें मल्हाररावाकडे माळव्याची सुभेदारी दिल्यापासून लोक त्यास 'सुभेदार' म्हणत. पण त्यानें आपणास कधींही मल्हारराव असें संबोधिलें नाहीं. हें आपण स्वतः होऊनच आपणापुढें राव व पंत लावणारानें फार लक्षांत घेण्याजोगें आहे. तो आपणास मल्हारजी असेंच म्हणवी. तो बऱ्याच वेळां मोठा उदारपणा व दयाळूपणा दाखवी. एखाद्या शिपायाची मर्दुमकी पाहून तो खुश झाला, म्हणजे म्हणे, " भरा, याची ढाल रुपायांनीं भरा. " तो आपल्या जातवाल्यांवर व मराठ्यांवर विशेष प्रेम करी. त्याच्या संगतीनें पुष्कळसे मराठे धनगर झाले ! त्यानें आपले पुष्कळसे भाईबंद दक्षिणेंतून इंदुरांत आणले व तेथें त्यांना चांगलें स्थाईक केलें. ह्या भाउबंदांच्या राहावयाच्या ठिकाणास अजूनही बारभाईची छावणी म्हणतात. ह्या बारभाईंतच बुळे, बारगळ, भागवत, लांबहाते, (अहल्याबाईचे माहेरचे) शिंदे इत्यादि मंडळी होती. या बरोबर आणलेल्या मंडळींतून बहुतेक लोक होळकरांच्या अत्यंत उपयोगीं पडले; व अजूनही त्यांचे वंशज तेथें आहेत. खंडेराव आदि मंडळीस मुसलमानिणींपासून जी संतति झाली, तीही त्याच मंडळींत असे. स्वतः मल्हारजीनें मुसलमानिणीशीं विवाह केला नाहीं. या बरोबर आणलेल्या लोकांतून कांहीं लोक तर फारच वाढले. त्या मंडळींत तुकोजी या नांवाचा एक गृहस्थ होता, तो फारच पुढें आला. त्यानें सुभेदाराची अत्यंत प्रामाणिकपणानें, मनोभावानें व एकनिष्ठपणें कामगिरी केली. त्याची एक-

निष्ठ कामगिरी मनांत आणून मल्हाररावानें त्याचें पुत्रवत् पालन केलें व त्याची पहिल्या सरदारांत योजना केली. त्याची त्यावर फारच ममता होती. या मनुष्याचें आडनांव होळकर असेंच होतें. मल्हारजी हा निष्कपटी व सरळ अंतःकरणाचा होता. महादजी हा मतलबी व कावेबाज होता. दोघेही फारच साधे असत. मल्हाररावाचें खरें मन माधवरावानें ओळखलें होतें. त्याचें एक पत्र पुढें दिलें आहे त्यावरून हें कळून येईल.

मल्हाररावानें किती लढाया केल्या हें मागें सांगितलेंच आहे. त्यांपैकीं या चरित्रांत ज्या महत्त्वाच्या लढाया होत्या त्या सांगितल्या. आतां त्याचे शेवटले दिवस सांगून हा भाग आटोपता घेऊं.

पानपतच्या घनघोर प्रसंगानंतर आपलें पूर्व वैभव उत्तरेस पुनः संस्थापित करावें, अशा बेतानें राघोबा, होळकर, शिंदे इत्यादि मंडळी निघाली. वाटेंत मल्हारजीची प्रकृति बिघडली. तो हवा पालटावयास म्हणून ग्वाल्हेरीजवळ अलमपुर नांवाचें एक गांव आहे, तेथें गेला. “ अलमपुरचे मुक्कामीं सुभेदाराचे कानास ठणका लागला. तथापि राजकारण हेंच कीं, फिरंग्याचें पारपत्य करावें. दुसरें कुंभेरीस खंडेराव होळकर कामास आले त्याचा मोबदला जाहला नाहीं, तो करावा. या दोन गोष्टी अंतःकरणीं डांचत होत्या. त्या मनचे मनांत राहून ईश्वर नेमितानुसार शके १६८७ वैशाख * वद्य ११ प्रहर दिवस चढतां ( सुभेदार ) पंचत्व पावले. दादासाहेब व महादजी शिंदे व मालेरावबाबा जवळ होते. आसन्नकाळीं सुभेदारांनीं मालेरावबाबाचे हात दादासाहेब व महादजी शिंदे

---

* बखरींत भाद्रपद महिना दिला आहे. पण तो पक्षाचा असावा. त्याच काळीं लिहिलेलें थोरले माधवरावाचें पत्र पुढें दिलें आहे तें पहावें.

यांच्या हातांत देऊन शेवटीं तुकोजी होळकर यांचेही हातांत मालेरावबाबा याचे हात दिले. ते समयीं तुकोजी होळकर यांनीं उभें राहून विनंती केली कीं, 'मी चाकर मनुष्य, माझे हात बाबासाहेबांचे हातांत देऊन सर्वोपरी निर्वाहाची सोय करावी. तें न होतां हें काय?' तेव्हां सुभेदार बोलले, 'माझें नांव व श्रीमंतांची चाकरी तूंच करशील.' असें बोलून (सुभेदाराची) समाप्ति झाली. नंतर उत्तर कार्य सुभेदाराचें त्याच ठिकाणीं जाहलें. दाहावे दिवशीं पिंडास कावळा शिवेना. तेव्हां दादासाहेबांनीं मालेराव बाबाकडून पाणी सोडविलें कीं, 'जाटाचें पारिपत्य मी करीन' (पण) पिंडास काकस्पर्श न होय. मग दादासाहेबांनीं जातीनें उदक सोडलें, तथापि काकस्पर्श जाहला नाहीं. मग महादजी शिंदे यांजकडून (उदक) सोडविलें, तथापि स्पर्श न होय. शेवटीं आणखी तुकोजी यांकडून सोडविलें. त्यांनीं उदक सोडतांच (काक) स्पर्श जाहला. (हा प्रकार पाहून) सर्वांस आश्चर्य जाहलें. नंतर त्रयोदशांत कर्म होऊन त्या ठिकाणीं छत्री बांधावयाचा मनसबा सिद्ध करून दतियेवाले † बोंडसे, सेवडेवाले होतेच. त्यांजपासून तीस हजार रुपयांचें गांव घेऊन, कारकून ठेवून, छत्री बांधावयास प्रारंभ केला." ‡

मल्हाररावाच्या मृत्यूमुळें पेशव्यांचें पुष्कळच नुकसान झालें. कारण, पानपतच्या युद्धानंतर तो पेशव्याशीं पुनः पूर्वींप्रमाणें चांगला

† बोंडसेः—हे बुंदेलखंडांत झांशीजवळ एक संस्थान असून त्यास बोरछा असें म्हणतात,

‡ होळकरांची कैफियत, पान ३४.

वागूं लागला होता.* तो बाजीरावाच्या वयाचाच असल्यानें त्याचीं मुलें होळकरास काका ह्मणत. याच कारणास्तव सुभेदाराच्या कारभाऱ्यानें श्रीमंताच्या एका मुलास, पुतणेपणाचा हक्क लावून चुलत्याची गादी घेण्याची मसलत दिली! श्रीमंताचीं मुलें मल्हाररावाशीं धनीपणाचें नातें ठेवीत नसत. पेशव्यांच्या घरांत त्याचा फार वचक होता. पण आतां त्यांच्या घरांत मोठें माणूस कोणीच नसल्यानें व सुभेदाराचा बराच असलेला दाब निघून गेल्यानें त्यांना आतां अधिकारानें बोलावयास कोणी राहिला नाहीं. मल्हारजी जातांच राघोबानें—त्या परप्रत्ययनेय बुद्धीच्या मनुष्यानें—आपली पहिली चुणूक होळकरासच दाखविली!

---

* ही गोष्ट थोरले माधवरावांच्या पत्रांत चांगली व्यक्त झाली आहे. तें पत्र ( १० जून इ. स. १७६६ ) असें—

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठलराव शिवदेव उमदेतुलमुल्कबहादूर स्वामि गोसावी यांसीं:—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत जाणें. विशेष मल्हारजी होळकर यांस वैशाख शुद्ध ११ रोजीं देवाज्ञा झाली. याचें वर्तमान येथें आलें. श्रवण होऊन चित्तास परम खेद झाला. मातबर सरदार मोठे दाबाचे होते. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. त्यांचा भावी पदार्थ तसाच होता. परंतु तीर्थरूपांचें जाणें हिंदुस्थानास होऊन परस्पर भेटी होऊन मल्हाररावाचा काळ झाला. त्याचा सुकृतांशच. असो. तुह्मी हिंदुस्थानचे अमीरांचे व सार्वभौमाचे मनसुबीयास माहीत. तिकडील मनसुबे तुमचे हातें झाले व पुढेंही उमदे उमदे मनसुबे करून हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा ही तुमची उमेद आहेच, तदनुरूप तीर्थस्वरूपासी विनंती करणें. जें उचित करणें तें करालच व ज्यांत लौकिकास्पद तेंच तीर्थरूपाचे आज्ञेप्रमाणें करून दाखवाल. विशेष काय लिहिणें. तुम्हांकडील पत्रें येत नाहींत हें काय? हिंदुस्थानचें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. रवाना चंद्र २ मोहोरम. बहुत काय लिहिणें हे विनंती. पै वस्ती चंद्र सफर सन सवांसितैन.

या प्रसंगीं अहल्याबाई माळव्यांतच होती. तिला मल्हारजीची डांक नेहमींच येत असे. ती दहा बारा दिवसच काय ती बंद होती. इतक्यांत ध्यानीं मनीं नसतां सुभेदाराचा अल्प अवधींत काळ झाला. आतां तिला ममतेनें वागविणारा व आपलें असें म्हणणारा कोणी राहिला नाहीं. वडील माणसाचें एकप्रकारचें छत्र असतें, तें आतां निघून गेलें. ती मल्हाररावासमोरच सारा राज्यकारभार करी.तो तिनें अजून केवळ आपल्याच जबाबदारीवर केला नव्हता. तशांत मालेराव वयांत आला होता, तरी तो आपली जबाबदारी ओळखणारा नसून होतकरूही नव्हता. या आपल्या नातवासंबंधानें सुभेदारांनीं एके प्रसंगीं उद्गार काढले होते कीं, "आतां आमचें एक मूल, तेंही पिशाच्चवत् आणि आमचें वार्धक्य."* पण अशा बिकट स्थितींतही तिनें—त्या अबला स्त्रीनें—आपल्या गुणांचें तेज कसें पाडलें, हें आतां पाहावयाचें आहे. सोन्याचें खरें तेज अग्नीच्या साह्यानें कळतें, त्याचप्रमाणें मनुष्याची परीक्षा संकटांनीं होते. म्हणूनच कीं काय, तिच्यावर संकटें टपून बसलीं होतीं. या संकटपरंपरेंत तिची तेजस्विता कशी काय प्रकाश पावली, हें आतां आपणांस पाहणें आहे. पण त्यापूर्वीं येथें विश्रांति घेतली पाहिजे.

* भाऊसाहेबांची बखर, पान ३७.

भाग चवथा.

# मालेरावाचा मृत्यु!

मातुलो यस्य गोविंदः पिता यस्य धनंजयः ।
अभिमन्युर्मृतश्चापि भविष्यं केन वारितम् ॥
अवश्यं भावि भावानां प्रतीकारो भवेद्यदि ।
तदा दुःखैर्न युज्येत नलरामयुधिष्ठिरः ॥

मल्हारराव होळकर वारले तेव्हां रघुनाथराव दादासाहेब हा माळव्यांतच होता, हें मागल्या भागांत सांगितलेंच आहे. त्यानें मल्हाररावामागें माळव्याच्या सुभेदारीचें काम त्याचा नातू जो मालेराव त्यास इ. स. १७६६ जून तारीख ३ रोजीं दिलें. या प्रसंगीं मालेराव एकवीस वर्षांचा होता. लहानपणीं कोणाच्या हातांत अधिकार आले नाहींत असें नाहीं. माधवराव पेशवा झाला, तेव्हां तो अवघा सतरा वर्षांचा होता! ह्मणजे याच वेळीं अधिकारावर असणारे श्रीमंत जवळ जवळ मालेरावाच्याच वयाचे होते. हा प्रकार होळकरांच्या घराण्यांतही होताच. स्वतः अहल्याबाई ही राजकीय कामें

पाहूं लागली, तेव्हां आपल्या मुलाहून फारशी मोठी नव्हती. पण राजकारण करावयास मुख्य जे गुण लागतात, ते गुण मालेरावांत नव्हते. त्याची आक्रमशक्ति बेताचीच असून तो बराच स्वच्छंदी होता. त्याला जनावरांचा पुष्कळ नाद असून तो वाघ चित्ते यांच्यासारखीं जनावरें नेहमीं बरोबर बाळगी. तो जेव्हां जेव्हां आपल्या वृद्ध आजोबाबरोबर हिंडे, तेव्हां तेव्हां आपला हा श्वापदांचा सारा संसार—पसारा बरोबर घेऊन हिंडे ! त्याच्या मनोरंजनासाठीं इंदुरांत शिवाजीजंग आणि जुनें इंदूर यांच्या दरम्यान नदीकांठीं मोठा थोरला हत्तीपाळा बांधला आहे. त्यांत नदीचें पाणी सोडून तो हत्तींच्या क्रीडा पाहात बसावयाचा. हा पाळा अजूनही बऱ्या स्थितींत आहे. या श्वापदांच्या क्रीडेपुढें त्याला राज्यकारभार कोठला सुचावयास! हा त्याचा प्रकृतिगुणच ह्मणावयाचा. वडील त्याप्रकारचे व चिरंजीव असल्या वृत्तीचे! एकंदरींत अहल्याबाईस ऐहिक सुख फारच बेताचें होतें, यांत मुळींच शंका नाहीं. मालेरावासंबंधीं स्वतः मल्हाररावासही भरंवसा नव्हता. त्याच्या संबंधानें सुभेदाराचें काय मत होतें, तें मागें आलेंच आहे. सुभेदाराची ही वृद्धावस्थेंतील स्थिति फार कींव येण्यासारखी होती.

मालेरावाच्या नांवानें सुभेदारी झाली खरी, पण खरा राज्यकारभार त्याची आईच पाहात होती. अहल्याबाईला राज्यकारभाराचें पुष्कळसें शिक्षण मल्हाररावाच्या समोरच मिळालें होतें. ती त्याच्या हयातींत राज्यकारभार पाही, पण त्यावर मल्हाररावाची देखरेख होती. आतां सारा राज्यकारभार तिला स्वतंत्रपणें पाहाणें भाग पडलें. असें जरी होतें, तरी पूर्वशिक्षणामुळें व स्वतःच्या कर्तृत्वशक्तीमुळें तिनें तो राज्यशकट आपल्या मृत्यूपर्यंत सुरळीतपणें चालविला. मालेराव

वयानें लहान होता व अहल्याबाईचा शक्तिप्रभाव व तिच्या कीर्तीचा लौकिक जगजाहीर असल्यानें पेशव्यांनीं मालेरावास सरंजाम देते-वेळीं खुद्द अहल्याबाईस एक पत्र लिहिलें. तें फार महत्त्वाचें अस-ल्यामुळें येथें देण्यांत येत आहे. पेशवे आपल्या पत्रांत अहल्याबाईस ह्मणतात—

"सरकारच्या हिशेबाचा मागील फडशा कारकीर्द कैलासवासी मल्हारजी होळकर व सन खमस व सीत दुसाला करून देऊन, फारखती घेऊन, मालेराव होळकर तुम्हांकडे आले आहेत. सविस्तर गंगाधर यशवंत सांगतील, त्याप्रमाणें तजवीज करून आपला सर्व बंदोबस्त महाल, गांव, खेडीं यांचा यथापूर्व करणें; आणि मातबर फौज सरंजामाची ( देऊन ) कार्तिकमासीं मशारनिल्हेची रवानगी जलद इकडे करणें. वरकड कोणे गोष्टीची चिंता न करणें. आज-पर्यंत कैलासवासी मल्हारजी होळकर ह्यांनीं सेवाचाकरी करून सर्व प्रकारें आपल्या स्वधर्माची शर्थ केली. मालेराव निष्ठेनें तशीच सेवा करतील. त्यांचा पूर्ववत्प्रमाणें मानमरातब रक्षून हिंदुस्थानचीं कामकाजें त्यांच्याच हातून घेतलीं जातील."

यावरून पेशव्यांचा अहल्याबाईवर किती भरंवसा होता तें दिसतें. व पेशव्यांच्या दरबारांत तिला किती विलक्षण मान होता हेंही दिसून येतें. अशा प्रकारचें वजन असावयास तिचें सुभेदाराच्याच हयातींत कामकाज किती चोख असावें, याचीही कल्पना करतां येते. वास्त-विक पाहातां माधवरावानें ही कामकाजाची सनद मालेरावास नांवाची दिली असून खरा अधिकार अहल्याबाईसच दिला होता.

असो. मालेराव गादीवर बसल्यानंतर सारा दहा महिनेच काय तो होता. पण या अल्प अवधींतही त्यानें वेडेपणाचे लहरींत लोकांस

बरेंच छळलें. अहल्याबाईसारखें सर्वांगसुंदर रत्न व मालेरावासारखा दाणा मुलगा, हा योगायोग मोठा विचित्र, अपूर्व व दुर्दैवाचा होय. तिचा पति पूर्वींच गेला. त्यानंतर तिला पुत्रसुख तरी मिळावयाचें होतें, पण तेंही मिळालें नाहीं. इतकेंच नव्हे, तर हा मुलगाही फार दिवस वांचला नाहीं.

मालेराव गादीवर येण्यापूर्वीं त्याच्या वेडेपणाचीं चिन्हें दृग्गोचर झालीं नव्हतीं. तो आणि त्याचा वेडेपणा हे दोघेही आपल्या गादीवर एकदमच बसले ! जणूं काय त्याच्या डोक्यावर अभिषेक होत असतांना वेडेपणानें त्याच्या मस्तकांत आपला शिरकाव करून घेऊन स्वतःही अभिषेक करून घेतला. मालेरावास वेडेपणाच्या लहरी येत खऱ्या; पण तो स्वभावतः क्रूर, दुष्ट अथवा अत्याचारी नव्हता. तथापि तो असावा तितका जाणताही नव्हता. तशांत त्यास पुढें पुढें वेडेपणाच्या लहरी येऊं लागल्यानें त्याच्या वेडेपणाचा इतरांसही त्रास होऊं लागला. अहल्याबाई ही आपला काळ धर्मपरायणता, परोपकार यांत विशेषेंकरून घालवी. ती ब्राम्हणांस विशेष पूज्य मानी. म्हणून ब्राम्हणवर्ग हा त्याच्या उपहासास विशेषें करून पात्र झाला होता. तो ब्राम्हणांस वस्त्रें, जोडे, भांडीं इत्यादि जिन्नस दान द्यावयास मोठ्या अगत्यानें बोलावी, पण तीं दानें त्यांस देण्यापूर्वी तो त्यांत विंचवासारखे विषारी प्राणी घाली. मग लोभी ब्राम्हणानीं हीं दानें घेतलीं व त्यांस दंश झालेले ह्या स्वारींनीं पाहिलें कीं त्यास वाटे, झालें ! आपलें काम सोळा आणे फत्ते झालें ! मग त्यास आनंदाच्या उकळया फुटत. त्याला बाराव्याचे व इतर लोंचट भिक्षुक खरा प्रकार कळला असूनहीं लोभानें तीं दानें घ्यावयास मिळत ! व मग त्याच्या नांवानें इवळत बसत ! या कृत्याबद्दल मालेरावास

पुष्कळ ग्रंथकारांनीं नांवें ठेविलीं आहेत, पण त्यांनीं अशीं नांवें ठेवण्यापूर्वी हें लक्षांत घेतलें पाहिजे होतें कीं, मालेरावाची बुद्धि गेली होती. हीन स्थितीचे पुष्कळ प्रकार आहेत; पण त्यांतही दुसऱ्यास दुःख देण्यांत आनंद मानण्याची स्थिति येणें, बुद्धीचा ऱ्हास होणें, ही फारच हीन व शोचनीय स्थिति होय. हा प्रकार लक्षांत घेतला, म्हणजे मग त्याला फारसा दोष देतां येत नाहीं. शिवाय आजलाही पुष्कळ शहाणेसुर्ते धनिक आपल्या आश्रितांस केवळ मौजेखातर वाटेल तसे छळणारे आढळतात. आम्हीं असे एक श्रीमंत पाहिले आहेत कीं, ते आपला आश्रित जेवावयास सोवळें नेसला, कीं मग त्याच्या धोतरांत चाकराकडून आंब्याचा रस पिळवीत! (दिवाळीच्या दिवसांत विंचू, चिचुंद्र्या अथवा फुलबाजा सोडीत! म्हणजे जसा हंगाम व प्रेमभाव उकळत असेल तसें करीत.) मग तो आश्रित आपलें रसमय धोतर नेसूं लागला कीं, तो रस त्याच्या अंगास चिकटे! हा प्रकार झाला कीं, लागलीच श्रीमंत आपल्या स्नेह्याच्या हातावर 'खाशी'!—म्हणून टाळी देत! असे व या पलीकडचे पुष्कळ खासे गडी आजही सांपडतात. मग मालेराव हा तर बोलून चालून वेडाच. त्याला त्याच्या या कृतीबद्दल काय बोल लावावयाचा आहे? हे पुत्राचे चाळे पाहून अहल्याबाईचें कपाळ उठे. यापासून तिला अतोनात दुःख होई. या प्रकारांत तिचें दुःख दुहेरी असे. एक तर प्रजेचा विनाकारण छळ होत असे त्याबद्दल; व दुसरें, स्वतःच्या मुलाच्या वेडेचाराबद्दल. असे प्रकार झालेले ऐकले कीं तिनें कपाळास हात लावून म्हणावें, "माझेंच मुळीं नशीब खोटें! नाहीं तर असला कुलदीपक पुत्र माझ्या पोटीं कशाला जन्मास येता!"

महेश्वरास एक जरतारी काम करणारा गृहस्थ राहत असे. त्याच्या संबंधानें मालेरावास अशी शंका आली कीं, त्याचा आणि आपल्या

वाड्यांतील दासीचा कांहीं संबंध आहे. ह्यामुळें त्याला फारच संताप आला. तो आधींच वेडा, तशांत या प्रकारानें फारच बहकून गेला. ह्मणून अहल्याबाईस त्याची फारच भीति वाटूं लागली. कारण, तो कोणत्या प्रसंगीं काय करील याचा कांहीं सुद्धां नेम सांगतां येण्यासारखा नव्हता. ह्मणून तिनें त्यास नजरबंद ठेवलें होतें (ही नजरबंद श्रीमंत लोकांची होती). इकडे त्या मनुष्याची चवकशी चाललीच होती. तो मनुष्य तेथेंच आसपास आला, ही संधि साधून तो तेथून हळूच बाहेर आला व त्याकडे कोणाचें लक्ष जातें न जातें तोंच त्यानें वेडाचे भरांत त्या मनुष्याचा खून केला ! या प्रकारानंतर तो मनुष्य आपल्या विरुद्ध चाललेल्या चौकशींत निरपराधी ठरला, हें पाहून मालेरावास चैन पडेनासें झालें. आपण निरपराधी मनुष्यास ठार मारलें याचा त्यास आतां पश्चात्ताप होऊं लागला. तशांत त्याचा मेंदू अशक्त झाल्यानें त्याची व त्या मनुष्याची या झटापटींत जी बोलाचाली झाली, तींतील तो वाक्यें बडबडूं लागला. तो मनुष्य हातघाईवर येऊन त्यास ह्मणाला असेल, " तूं मला आंता ठार मारीत आहेस, पण सांभाळ ! मी समंध होऊन तुझ्या मानगुटीस बसेन ! " हीं व अशाच प्रकारचीं दुसरीं कांहीं वाक्यें तो वेडाचे भरांत बडबडे. तशांत ठार झालेला गृहस्थ हा मांत्रिक आहे अशी समजूत असल्यानें लोक ह्मणूं लागले कीं, मालेरावास भूतानें पछाडलें. कारण, तो वेडाची लहर आली कीं, " मी तुझा भयंकर रीतीनें सूड उगवीन ! " असें बडबडे,

अहल्याबाईचा भुताखेतांवर पूर्ण विश्वास असल्यानें, त्या भुतानें आपल्या मुलाचा पिच्छा सोडावा, म्हणून तिनें नानाप्रकारचे उपाय केले. ती आपल्या मुलाच्या बिछान्याजवळ अहोरात्र बसून राही. मालेराव हा जेव्हां वेडाचे भरांत वरील वाक्यें बडबडूं लागे,

तेव्हां दुःखिताच्या दुःखाकडे पाहून तळमळणाऱ्या या साध्वीचें अंतः-करण पुत्राच्या तसल्या हाल अपेष्टा पाहून खळबळून जाई. आपल्या मुलाची दैना व हतबल स्थिति पाहून तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागत. ती साध्वी घटकांच्या घटका परमेश्वराचा धांवा करी. मालेराव जेव्हां ओरडूं लागे, "मी तुझा सूड उगवीन," तेव्हां ती त्याच्या अंगांतील समंधास संबोधून म्हणे, "तूं माझ्या मुलाचा पिच्छा सोड. मी तुझ्यासाठीं एक देऊळ बांधतें, व तुझ्या कुटुंबास कांहीं जमीन करून देतें." परंतु तो समंध देवळांत राहा-वयाचें कोठलें कबूल करणार! तो तिची विनवणी ऐकेना. तो म्हणे-'मी निरपराधी असतांना मला तुझ्या मुलानें कां मारिलें? मला आतां दुसरें कांहींएक नको. मी जीवास एक जीव बळी घेईन तेव्हां तृप्त होईन!'

याप्रमाणें मालेरावाचे शेवटीं शेवटीं फार हाल होऊन तो ता० २७ मार्च इ० स० १७६७ रोजीं इंदुरांत वारला! आपल्या प्रत्यक्ष पोटच्या मुलाच्या मरणानें, दुसऱ्यासाठीं तळमळणाऱ्या या मातोश्रीस काय वाटलें असेल, याचा वाचकांनींच विचार करावा! पण केवळ आपल्या कर्तव्याकडे व जगाच्या रहाटीकडे लक्ष देऊन तिनें हें हृदय भेदक दुःख कसेंबसें मोठ्या कष्टानें गिळलें. * या प्रसंगीं पुष्कळ

* वरील गोष्ट झाल्यानंतर १७ वर्षांनीं पुढील हकीगत घडली. ( ता० ३१ जून इ० स० १७८४. पान ६० वरील टीप पहा. त्यानंतर सहा दिवसांनीं ) केसो भिकाजीनें ( म० द० बातमीपत्रें भा. २, पृष्ट ५७ ) लिहिली आहेः—

अलीकडील वर्तमान, चंद्र ६ बुधवारीं बाई इंदुरास दाखल जाली. बाहेर बागांत राहिली आहेत. तेथें गौतमा बाईची छत्री व मालेराव होळकर याची छत्री, दोन्ही छत्र्यांचे जवळ राहिलीं आहेत. येथें आली ते दिवशीं जमीदार व कमाविसदार वगैरे रयत भेटीस आले होते, परंतु भेट कोणाची झाली नाहीं. मालेराव बाचें स्मरण होऊन खेद बहुत केला.

वाचकांस प्रसिद्ध मुत्सद्दी जो ग्लॅडस्टन याचें अथवा आपले परमपूज्य पितामह दादाभाई यांचें स्मरण होईल.

मालेरावाच्या मृत्यूनें कांहीं अदूरदृष्टि स्तुतिपाठकांच्या असबंद्ध स्तुतीमुळें अहल्याबाईवर फार मोठें किटाळ आलें. अशा साध्वीच्या चरित्रांत अशा प्रकारच्या वेड्यावांकड्या गोष्टीचा उल्लेख करण्याचा प्रसंग पुढील लेखकांस यावा, हें त्यांचें दुर्भाग्य होय. परंतु त्याचा उल्लेख करणें हें चरित्रकारांचें कर्तव्य असल्यानें तो येथें अवश्य केला पाहिजे. तें किटाळ म्हणजे हेंच कीं, तिनें आपल्या मुलास मारविलें– व कांहींच्या मतें तर त्यास हत्तीच्या पायीं दिलें! ही दुसरी हत्तीच्या पायीं देण्याची गोष्ट जर खरी असती तर ती कधींच लपून राहाती ना. इतकेंच नव्हे तर ही गोष्ट मराठ्यांच्या कोणच्या ना कोणच्या तरी दप्तरांत सांपडली असती. पण 'नुसतें मारिलें' असा जर तिजवर आरोप केला, तर मात्र ह्या गोष्टीचा विचार झाला पाहिजे. कोणच्याही गोष्टीचा कोणावरही आरोप तेव्हांच करतां येतो, पण तो खोडून काढणें हें मात्र फार कठीण काम असतें. ही गोष्ट तिच्या हयातींतच पसरली होती. ती इतकी कीं, या गोष्टीवर पुष्कळशा इंग्रज गृहस्थांचाही विश्वास बसला होता. या गोष्टीचा जन्म, नेहमीं दान घेऊन पुष्ट झालेल्या मंदमतींच्या कल्पनेंतच झाला असला पाहिजे. ते लोक चकाट्या पिटीत असतांना म्हणाले असतील, " कायहो पुण्यात्मा! आपला मुलगा ब्रम्हवृंदास छळतो, म्हणून तिनें प्रत्यक्ष पोटच्या पोरास कीं हो मारलें!" यापासून पुढें हत्तीच्या पायीं दिलें, ही सुधारून वाढविलेली आवृत्ति निघाली असावी! अशा लोकांस, आपण असल्या गोष्टी बोलून तिच्यावर कोणचा आरोप करितों, त्याचा पुढें काय परिणाम होईल, याचा गंधही

नसावा. चंद्रावरचे डाग त्यास आणखीही शोभा आणीत असतील; पण त्यास कांहींतरी सीमा आहे. पुनः असें कीं, जिची कीर्ति अत्यंत धवल तेथें लहानसा जरि कलंक असला, तरी बाकीचा भाग फारच उज्ज्वल असल्यानें तोच तेवढा डाग पाहाणाराच्या डोळयांस दुःसह होतो. अर्थात् त्या डागामुळें शोभा याबयाची एकीकडेच राहून त्यास विद्रूपता मात्र येते. अहल्याबाईचें सारेंच चरित्र इतकें उदात्त, थोर, दयामय व पापभीरु आहे कीं, तिच्या हातून अशा गोष्टी घडणें मुळींच शक्य नाहीं. तिनें प्रसंगवशात् महान् महान् अपराध्यांसही सोडलें, मग ती हिंदु स्त्री, थोर अंतःकरणाची अहल्याबाई, जिची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ या पृथ्वीवर राहावयाची, ती आपल्या प्रत्यक्ष पोरास—मग तो कितीही वेडा झालेला असो, त्यास—मारावयाचें असलें अघोर कर्म कधीं तरी करील काय ? असलीं उदाहरणें आमच्याकडे काय, आणि दुसरीकडे काय,फारच दुर्मिळ असावयाचीं. पानपतच्या लढाईत आपलीं बायकामुलें मारल्याचीं उदाहरणें आहेत. पण त्यावेळीं आपल्या मंडळीच्या शत्रूच्या हातून होणाऱ्या विटंबनेपेक्षां येथेंच आपण त्यांना, मारणें अधिक बरें वाटणें स्वाभाविक आहे. एकंदरींत तो काळ प्रसंग अगदीं निराळा होता. आनंदीबाईसारख्या दुष्ट स्त्रियांनीं राज्यलोभास्तव आपल्या पुतण्यास मारिलें खरें. पण तसाही प्रसंग अहल्याबाईवर नव्हता. कारण, ती स्वतःच सर्व प्रकारें राज्याचीं सूत्रें चालवीत असल्यानें, तिचा असला हेतु असणें स्वप्नांतही शक्य नाहीं. मग अहल्याबाईकडून ही गोष्ट घडावी कशी ? तिचें सर्व चरित्र जर लक्षपूर्वक पाहिलें, तर वरील बडबडींत कांहीं तथ्य आहे असें वाटत नाहीं. या गोष्टीचा माल्कम साहेबानें अत्यंत बारकाईनें व जातीनें शोध केला व आपली खात्री

करून घेतली कीं, या गोष्टींत मुळींच तथ्य नाहीं. या संबंधाची माहिती त्याच्याच शब्दांत देणें अत्यंत अगत्याचें आहे. तो ह्मणतो, " * **मालेरा-वाच्या** मरणाची हकीकत कित्येक युरोपियन लोकांस कळली व ती त्यांना खरी वाटली. या गोष्टीचा अहल्याबाईच्या नांवाशीं संबंध असल्या-कारणानें, **तिची होईल तितकी चौकशी करणें, हें मला आपलें कर्तव्य वाटलें.** व त्याप्रमाणें मी त्या गोष्टीची बारीक चौकशी केली. याचा परिणाम ह्मटला ह्मणजे त्या अपराधांतून ती पूर्णपणें निर्दोष ठरते. हा गुन्हा ह्मणजे असा होता कीं, कसेंही का कारण असेना, त्यामुळें ती कोणाच्याही क्षमेस पात्र झाली नसती. **मालेराव** वेडाच्या लहरींत जीं दुष्ट कृत्यें करीत असे, त्यामुळें तिच्या अंगावर कांटा उभा राही, याबद्दल शंका नाहीं. त्याची प्रकृति बरी होण्याबद्दल ती निराश झाल्यानें तिला असें वाटूं लागलें असावें कीं, हा गेला ह्यामुळें माझी, त्याची आणि देशाची एक प्रकारें पुढील अनर्थांतून

*यावेळीं साहेब मजकुराचे मुळांतले उद्गार दिल्यावांचून रहावत नाहीं. ते ह्मणतात--

This report of the death of **MallaRao** has been stated to several Europeon inquirers, by whom it was believed. I thought it a duty, as connected with the memory of **Ahalya Baee,** to make the most minute investigation of the fact; and the result has been a conviction of her complete innocence of a crime, which no circumstances could have excused. I have no doubt she was led by horror at his cruel acts of insanity and a despair of his recovery, to look upon his death as a fortunate event for him, herself and the country; but such a feeling is an honour, instead of a disgrace, to her character. (Vol I, p. 151).

सुटकाच झाली. पण अशा वाटण्यानें तिला कलंक तर लागत नाहींच, तर तें एक प्रकारचें भूषणच आहे."

मालेराव तर गेला व त्याचें चरित्र व शेवटली शोचनीय स्थिति पाहतां, तो गेला हें एक प्रकारें बरेंच झालें म्हणावयाचें. कारण, त्यामुळें प्रजेच्या नशीबीं असा राजा आला नाहीं हे तर खरेंच, पण त्यापेक्षां मोठें महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे त्यामुळें अहल्याबाईसारखें सर्वांग-सुंदर रत्न लोकांपुढें आलें, हें होय. व तिला आपल्या कुळाचा अत्यंत अभिमान असल्यानें पुढें येणें भागच पडलें. अहल्याबाई पुढें आली ही गोष्ट फारच चांगली झाली. कारण, ती पुढें आली म्हणूनच तिचें शौर्य, संस्थान सुरळीतपणें चालविण्याचें तिचें चातुर्य, कायदेकानू जाणणारास साजेसे तिचे आलौकिक गुण, सर्व प्रजेचेंच काय पण सर्व आर्यवर्ताचें आपल्याकडे मन आकर्षून घेण्याइतकें तिचें दातृत्व, प्रजेच्या टायीं स्वभावतः असणारें तिचें अद्भुत वात्सल्य तिचें असाधारण साधुत्व व अढळ परमेश्वरभक्ति, हे गुण प्रत्ययास आले. मोठमोठ्या इतिहासकारांनींही स्त्रियांच्या राजकास्थानाबद्दल नालस्तीचें उद्गार काढले आहेत. पण त्यावेळीं, स्त्रियांनीं जो अनाचार केला तो पुरुषांच्या साह्याविरहित केला नाहीं, हें ते कसे विसरतात हरी जाणे ! प्रमिलाराणीप्रमाणें अथवा मच्छींद्र ज्या स्त्रीराज्यांत गेला होता तेथील राणीप्रमाणें सर्वथैव स्त्रियाच राज्य करीत नव्हत्या. अशा स्थितींत राजकीय घडामोडींबद्दल निव्वळ बायकांस जबाबदार धरणें हे पक्षपाताचें होईल. आमच्याकडे पुरुषांच्या मानानें स्त्रिया राज-कारणांत कमी पडतात; तेव्हां या थोड्या संख्येंत वाईट राज्यकर्त्रांची संख्या तेव्हांच लक्षांत येते, हा भाग निराळा. बाकी ज्या प्रकारच्या-ज्या गुणांनीं मंडित असलेल्या-राजकारणीं स्त्रिया अनर्थकारक वाट-

तात, त्या प्रकारचे--अर्थात् त्याच गुणांनीं मंडित असलेले व त्याच परिस्थितींत असलेले—जर पुरुष शोधून काढले, तर ते म्हणजे मोठे कर्तृत्ववान् निघाले, अशांतला कांहीं भाग नाहीं. तेही तितकेच अनर्थकारक निघाले. अशी वास्तविक स्थिति असतां निव्वळ स्त्रियांस नांवें ठेवणें, म्हणजे तो एक प्रकारचा दुराग्रहच होय. राजकारण उत्तम रीतीनें करावयास व्यसनहीनता, निस्पृहता, परिस्थितीचें पूर्ण ज्ञान, निरभिमानता, प्रजेच्या हिताशीं तादात्म्य इत्यादि गुणांची मुख्यतः जरूरी आहे. हे गुण ज्या व्यक्तींत आहेत ती व्यक्ति, मग ती स्त्री असो वा पुरुष असो, आपलें राज्य व्यवस्थित रीतीनें चालवावयास पात्र असावयाचीच. ह्या विधानाची सत्यता, व वरील विधानाची असमर्थता दाखवावयास अहल्याबाई समर्थ आहे. अहल्याबाईंत वरील गुण चांगल्या प्रकारें वास करीत असल्यानें ती आपल्या प्रजेस कामधेनूप्रमाणेंच होती. मालेराव गेला, तेव्हांपासूनच कांहीं लोकांनीं तिला मागें दडपण्याचा फार प्रयत्न केला. पण या काळ्याकुट्ट ढगांना अहल्याबाईनें आपल्या प्रतापानें कसें पळवावयास लावलें, हें मोठें पहावयाजोगें आहे. वास्तविक पाहतां गंगाधर यशवंत म्हणजे कसलेला व होळकरशाहींत काळ्याचे पांढरे झालेला पुरुष; पण त्यास या स्त्रीनें कसें चुरमुरे खावयास लाविलें, हें पहावयाजोगें आहे. पण हा भाग आजच्या कथाभागांत येत नसल्यानें, त्यास पुढें लोटणें गैरवाजवी होणार नाहीं.

भाग पांचवा.

# चंद्रचूडाचें कारस्थान.

अन्तर्दुष्टः क्षमायुक्तः सर्वानर्थकरः किल ।
शकुनिः शकटारश्च दृष्टान्तावत्र भूपते ॥
नियोगार्थग्रहोपायो राज्ञां नित्यपरीक्षणम् ।
प्रतिपत्तिप्रदानं च तथा कर्मविपर्ययः ॥

हितोपदेश.

मालेराव वारला तेव्हां आतां गादीवर कोणास बसवावें, असा प्रश्न साहजिकच उभा राहिला. अहल्याबाईस दुसरा मुलगा नव्हता. एक मुलगी होती पण तिला आपल्याकडील धर्मशास्त्राप्रमाणें गादीवर बसण्याचा अधिकार नव्हता. या प्रसंगीं अहल्याबाईचा काय विचार आहे तो कोणास कांहीं कळेना. अशा वेळीं आज चाळीस वर्षें ज्यानें इमानें इतबारें नोकरी केली, त्या

*गंगाधर यशवंताची मति फिरावी हा एक प्रकारचा कालमहिमाच म्हणावयाचा, दुसरें काय? मालेराव मृत्यु पावल्यानें 'बाईसाहेब शोकार्णवांत. तेव्हां मनुष्यमात्र शोकांत. अशा संबंधांत गंगाधर यशवंत यांचे बुद्धीस विपर्यास' आला. त्याला वाटलें, आपली संधि साधण्यास वेळ हीच आहे. या वेळीं एखादा अज्ञान मनुष्य गादीवर बसवून तो सज्ञान होईतोंपर्यंत आपण राज्यकारभार चालवावा व राजरोसपणें स्वतःची चंगळ उडवावी. वास्तविक पाहतां गंगोबातात्या कोट्याधीश असून त्याच्या गोमय पुतळ्याही केव्हांच देवास घाटावर गेल्या होत्या. पण त्याची वांचावयाची व लांडे कारभार करावयाची इच्छा किती प्रबल होती तें पहा! लोभ म्हणतात तो हाच.

---

* प्रसिद्ध इतिहासकार हेन्री बिव्हरिज—कलकत्त्याच्या रॉयल एशिआटिक सोसायटीचे माजी अध्यक्ष–यांच्या A Comprehensive History of India या पुस्तकांत गंगाधर यशवंतासंबंधानें खालील भ्रामक व चुकीचें विधान केलें आहे.

By the selection of Gangadhar Jeswant, the able Brahmin minister of **Mahlar Rao**, as her Dewan, and of Tookojee as her Commander-in-chief, she secured an administration which under her immediate superintendence secured the prosperity and happiness of her subjects (Vol. II, P. 472).

आतां मालकम साहेब वरील भांडणाचा उल्लेख करून जरी ह्मणतो कीं, तिनें गंगोबा तात्यावर पुनः मेहेर नजर केली, तरी बीव्हरिज् साहेबांचें वरील वाक्य वाचून गंगोबाची वास्तविक योग्यता लक्षांत येत नाहीं. शिवाय त्यामुळें अहल्याबाईचें महत्त्व पुष्कळच कमी होतें. व तिनें गंगोबाला कामावर ठेविलेंही नाहीं.

गंगोबाचा याप्रमाणें विचार झाला खरा. पण आपली आकांक्षा पूर्ण कशी व्हावी हा तात्यास आतां प्रश्न पडला. त्याला याबद्दल अहल्याबाईजवळ बोलतां येईनाच. बरें, यासंबंधीं रावसाहेबांजवळ गोष्ट काढावी, तर त्यांचें तात्याशीं मुळींच सूत नव्हतें. * अर्थात् अशा प्रसंगीं तात्यासाहेबांस उपयोगीं पडणारे घरभेदू दादासाहेब दिसले. दादासाहेब यावेळीं स्वतःच पेशवाई करावयास हपापले होते. यामुळें रावसाहेबांचें व त्यांचें पटेना. अर्थात् अशा प्रसंगीं तात्यास रघुनाथाचें स्मरण व्हावें, हें कांहीं गैरवाजवी नव्हतें. चंद्र-चूडानें " दादासाहेबांकडे * प्रेष पाठविला कीं, ' ही दौलत बैतलमालीं झाली. त्यांत आपण सुभेदाराचे चिरंजीव हें जयवन्य ‡. ते पक्षीं आपण दरमजल येऊन दौलत समेटावी. येथें शोकानें गालव § होऊन मनुष्य मात्र गिरफदारींत× आहे. आपलें येणें सत्वर झालें असतां समय आहे. " या भावें ( तात्या साहेबांचा दादा साहेबांस ) प्रेष+ गेला.

या गंगोबाच्या ह्मणण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, आपले सुभेदार काका हें सुप्रसिद्धच आहे ! तशांत येथें गादीस वारस कोणी नाहीं. यामुळें या गादीवर तुमचा हक्क आहे. या प्रसंगीं अहल्याबाई माले-रावाच्या दुःखांत असल्यामुळें सर्व प्रजा शोकसागरांत बुडाली आहे. तरी आपण तेथें जेवत असल्यास तें पुढें सरकवून येथें हात धुवा-

---

* हा गंगाधर यशवंत भरदरबारांत रावसाहेब पेशव्यास पोर समजून मोठ्या शिष्टाईनें एके प्रसंगीं म्हणाला कीं, ' जुने डोळे नवीन चाळे पाहतात आहेत. ' तो अपमान त्या तरुण पेशव्यास मुळींच न खपून त्यांनीं तेथल्या-तेथें गंगोबाच्या तोंडांत दिली ! हें रावसाहेबाचें पाणी पाहून सर्व दरबारची मंडळी चकित झाली व लागलीच सर्वदूर त्यांची जरब बसली.

* निरोप † बिनवारसी ‡ प्रसिद्ध § व्याप्त × सकटांत + होळकरांची कैफियत, पान ३५.

वयास यावें. कारण येथें हात मारावयास चमचमीत भोजन आहे! हे तात्याचें आमंत्रण दादांनीं मनोभावानें घेतलें. कारण, त्यांची तृष्णा अजून कोठें तृप्त झाली होती? ह्मणून हें आयतें आमंत्रण पाहून त्यांच्या तोंडास पाणी सुटलें. गंगाधराचें व रघुनाथाचें जमलें. व ही हरि—हर भेट घ्यावयास ह्मणून रघुनाथरावांनीं आपला तळही हालविला.

हें वर्तमान इकडे शिवाजी गोपाळ वगैरे मंडळीस समजतांच ते लोक हरकूबाई व उदाबाई यांच्याकडे गेले व आतापर्यंत जी हकीगत झाली ती त्यांस सांगते झाले. कारण त्या दिवसांत बाईसाहेबाशीं बोलावें असें कोणाचें पुण्य नव्हतें. म्हणून ते त्या उभयतां बायांस म्हणाले, 'या गोष्टी आतांच बाईसाहेबांपाशीं बोलून त्यांचा आजपासूनच कांहीं धरबंद केल्यास सोईचें पडेल. नाहीं तर उशीर लागून कार्याचा घात होईल व मग तुम्हां आम्हांस पुढें दाणे भरडावे लागतील! असा प्रसंग येऊं नये म्हणून वेळींच ही गोष्ट कानावर घालण्यास आलों आहोंत.'

हें भाषण ऐकून त्या बाया म्हणाल्या, 'तुम्ही म्हणतां तें सारें खरें. पण आम्हीं बाईसाहेबांपाशीं जाऊन काय बोलावें? *धरबंदाची †पेरवी कशी करावी, हें आम्हां बायकांस कसें कळणार? तें तुम्ही आम्हाला सांगा म्हणजे मग आम्ही त्याप्रमाणें बाईसाहेबांपाशीं बोलूं.'

तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, "बाईसाहेबांस असें सांगा कीं, 'सध्यां शोकाचें गांठोडें एकीकडे बांधून ठेवून तूर्त आंगीं हिंमत धरावी. सरंजामी इतलाखी यांच्याकडे जासूद पाठवून त्यांस जमा करावें. भोंसले, गायकवाड, दाभाडे, यांजला सांडणीस्वारा समागमें रवानग्या व्हाव्या कीं, "कैलासवासी सुभेदार यांनीं श्रीमंताचे दौल-

* आळा पडायाजोग्या उपायाची † पेशी.

तीचा पाया खोदून वीट आपले हातें टाकून इमारत उभी केली. या प्रसंगीं आम्हावरी गहजब. तेपक्षीं दौलत जगवून आम्हास *हमराई करून सेवा चाकरी घ्यावी. तें एकीकडेच राहून आमच्या दौलतीविषयीं पापबुद्धि धरली आहे! आमच्या नशीबीं जें काय असेल तें आम्ही भोगूं. परंतु हें लक्षांत असूं द्या कीं, आज आमच्यावर असा प्रसंग आला आहे पण उद्यां तो तुमच्यावर येईल. याचा नीट विचार करा. व असले प्रकार वारंवार होऊं नये म्हणून आमच्या मदतीस फौज पाठवून द्यावीं." अशा अर्थाचीं पत्रें तमाम लहानमोठे सरदारांस पाठवून द्यावीं. उत्तमपक्ष, म्हणजे गादीची मालकी नथ्याबा फणशे यास मिळावी. पण तो फारच अल्पवयी. गादीवर बसणारा खांद्यावर बांसडा घेण्यास समर्थ पाहिजे. यास्तव सुभेदारानें देहावसानाचे प्रसंगीं मालरावबाबाचा हात तुकोजीचे हातांत दिला. जाटाचे पारिपत्याची इच्छा सुभेदाराचे मनांतच राहिली. त्याविषयीं तुकोजी होळकरानें पाणी सोडतांच पिंडास काकस्पर्श झाला. ह्या सर्व गोष्टींवरून आम्हांस असें वाटतें कीं, त्यांना गादीवर बसवावें. ह्मणजे कसलीही अडचण न राहून सर्व कार्यभाग सुरळीत होईल. या गोष्टी आज विषतुल्य वाटतात, पण परिणामीं अमृतोपम होतील. ह्मणून या समयीं बुद्धीचें दार्ढ्य करून तुकोजी होळकरास पाचारण करावें. पत्राच्या रवानग्याही आजच जहाल्या पाहिजेत. हा सर्व प्रकार वेळींच कानावर घातला आहे. उद्यां ह्मणाल, 'कोणीं मेल्यानें आम्हांस सुचविलें नाहीं!' यास्तव ही विनंती केली आहे."

हा सारा मजकूर ऐकून अहल्याबाई व उदाबाई ह्या लागलीच बाईसाहेबांकडे गेल्या. व त्यांस सारा मजकूर समजवून म्हणाल्या,

---

* मदत.

"¶ ब्राह्मण हरामखोरीस आला आहे. वेळींच सावध होऊन प्रसंगा-प्रमाणें वागल्यास ठीक; नाहीं तर पुढें तुम्हां आम्हांला दाणे भरडावे लागतील. म्हणून सावध व्हावें ही नेकसल्ला."

अहल्याबाईनें हें सारें शांत चित्तानें ऐकून घेतलें व नंतर ती म्हणाली, "उभयतांस येथें बोलावून आणावें."

त्यावरून शिऊ बाबाजी व राजाराम आत्याजी यांना बोलावून आणलें. अहल्याबाईनें हा वेळपर्यंत काय झालें हें आपणास कळलें नाहीं असें भासवून आणि ग्लानी व ‡ गिरफदारी कांही एक न दाखवितां धनीपणाचे जबरेनें ती म्हणाली, "¶ मेल्या ब्राह्मणांनें हरामखोरी आरंभिली आहे. परंतु मी बायको मनुष्य, मी काय करणार हें मनांत आणूं नका! मीं खांद्यावर ‡ बांसडा टाकून उभी राहिलें, म्हणजे मग श्रीमंतांचे दौलतीस अवघड पडेल. ही दौलत आमच्या वडिलांनीं भाडभवई § करून मिळविली नाही! तर तरवारीचे अनु-मानें शरीर खर्च घातलें आहे. आम्ही सिलेदार.वडिलांचे चाकरीप्रमाणें चाकरी घेतल्यास हजर आहोंत. पण तुमची आमची धुणीपाणी † संपली असल्यास मोगलांचीं चाकरी करूं अथवा फिरंग्याची चाकरी करूं. अगर पाहिजे तें करूं. पण ब्राह्मण ¶ म्हणतील, दौलतीचा अभिलाष धरूं तर तें कालत्रयीं घडणार नाहीं."

हें बोलणें चार चौघांनीं ऐकावें अशा तऱ्हेनें बोलून कानांत खुणा करून सांगितलें कीं, "भोंसले, गायकवाड, दाभाडे वगैरे मराठेमंडळ यांजला गुप्त पत्रें लिहून सांडणीस्वार बिदा करावे. व सांडणीस्वारांची डाक बसवून तुकोजी होळकर यास सहावे दिवशीं

¶ गंगाधर. यशवंत ‡ दुःख, संकट. ‡ भाला. § खुषमस्करी व नाचेपणा † ऋणानुबंध.

मजपाशीं आणावें. हीं दोन्ही कामें आज करा. पण मंत्रभेद न होण्याविषयीं फार जपावें. ''

इतकीं अक्षरें श्रवण करून उभयतां बाहेर आले. थोर अंतःकरण, पेरल्या पदार्थास फळें सत्वर आलीं. सरदारांस कागदाच्या रवानग्या स्वाराबरोबर होऊन, सांडेच्या डाकेचा बेत करून उदेपुरास तुकोजी होळकर यांस पत्रें गेलीं कीं, '' फौज जेथील तेथें मुस्तकीम * ठेवून तुह्मी जेवीत असल्यास पाणी प्यावयास येथें आह्मापाशीं यावें. ''

आतां इकडे गंगोबाचे काय बेत चालले होते, ते पाहूं. आपणास राघोबाची अनुमति आहे असें तात्यास कळतांच त्यास वाटलें कीं, झालें. आपलें कार्य झालें ! तथापि त्यास अहल्याबाईची आतां कींव आली कीं काय, ह्मणून तो तिच्याकडे गेला. त्याला वाटलें, आपण तिला दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगाव्या व आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या हातीं राज्यकारभार घ्यावा. पण या सामदामाच्या गोष्टी जर तिला न रुचल्या, तर अंतीं आपणास फायदा करणारें व तिला कडु वाटणारें राम-रघुनाथ-बाण औषध देण्याचें सांगावें. मग तिनें निराशेनें आपल्या म्हणण्यास रुकार दिलाच पाहिजे. पण कारभारी साहेबांची ही सारी अटकळ अगदींच चुकली. दिवाण साहेबांचें तें मान भावी भाषण ऐकून ती धीराची व मानी बाई त्यास म्हणाली, '' हा बेत होळकरांच्या इभ्रतीस डाग लावणारा असल्यानें मी त्यास आपलें अनुमोदन कधींही देणार नाहीं. आमच्या या गृहकृत्यांत-राघोबा झाला म्हणून काय झालें !-त्यास हात लावावयाचा काय अधिकार ? माझा मालेरावबाबा गेला, तेव्हांच सुभेदारांचा वंश बुडाला ! आतां त्यांच्या मागें ज्या दोन पुरुषांचा हक्क होता, त्यांपैकीं मी एकाची बायको व एकाची आई आहें. यामुळें होळकरां-

* कायम.

च्या गादीवर बसणारा मुलगा पसंत करणें न करणें याचा मलाच अधिकार आहे. व मजवर कसलेंहीं संकट आलें तरी हा माझा वाजवी अधिकार बजावण्यास मी कालत्रयीं किंचित्‌ही माघार घेणार नाहीं."

असें होतें, तरी गंगाधर तात्या 'ही बाई मनुष्य. हिला कोण सल्ला देणार व कोण मदत करणार? अशा भरंवशावर होते.' त्यांनीं दादासाहेबांच्या मदतीनें लढाईची तयारी जारीनें चालविली. दादासाहेब आपणावर चाल करून येणार, हें पाहून तिनें त्यास मोठ्या चातुर्याचा, मार्मिक व मुत्सद्देगिरीचा निरोप पाठविला कीं "आपण स्त्रीबरोबर युद्ध करूं नका. नाहीं तर तुमच्या नांवास जो कलंक लागेल, तो कशानेंही कालत्रयीं निघणार नाहीं. मी तर बोलून चालून स्त्रीच! माझा जर युद्धांत पराभव झाला, तर मला कोणीही नांवें ठेविणार नाहींत. पण जर यदाकदाचित् युद्धांत तुमचा पराभव झाला तर सर्व जगांत तुमचें हंसें मात्र होईल. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरें. कारण, तें तुम्हांसच हितावह आहे. आमचें त्यांत कांहीएक नुकसान नाही."

अहल्याबाईनेंही आपल्याकडून लढाईची तयारी चालविली. या कामीं तिच्या लोकांनींही चांगलाच उत्साह दाखविला. असें ह्मणतात कीं, तिनें युद्धप्रसंगीं आपले दोनशें स्त्री घोडेस्वार पुढें आणले. तें पाहून राघोबा बुचकळ्यांत पडला. त्या दिवसापासून राणीसाहेबांची स्वारी बाहेर पडतांना त्यांच्या पुढें स्त्रिया स्वार असावयाच्या. ही चाल होळकरांच्या घराण्यांत परवांपर्यंत होती.

या प्रसंगीं राघोबाबरोबर महादजी शिंदे होता. त्यानेंही दादासाहेबांस स्पष्ट सांगितलें कीं, अशा कामीं आपणाला आमच्याकडून

साह्य होणें नाहीं. महादजी शिंद्यास गादी मिळावयाचे प्रसंगीं राघोबा फार आड आला होता. त्या समयीं मल्हारजीनें महादजीची बाजू घेतली होती. तो प्रसंग मनांत आणून या प्रसंगीं महादजीबावांनीं आपल्यापरी सुभेदारांच्या सुनेस साह्य केलें. या वेळीं दादोबा वाघोलीकर यानें हीं सारीं गुप्त कारस्थानें नाना फडणविसाच्या करवीं रावसाहेबांच्या कानीं घालून होळकरांचें राज्य जप्त करण्याची सूचना केली ! ह्मणजे, असें केलें असतां सर्वच आपआपल्या जागीं थंड होतील ! परंतु ही सूचना श्रीमंतांस पसंत पडली नाहीं. "कारण एक तर आतां होळकरांचा दक्षिणेंतील सरंजाम जप्त केला ह्मणजे त्याच्या व्यवस्थेकरितां १०।१२ लाख रुपयांची जरूर लागेल, आणि सध्यां तर वसूलाचा हंगाम निघून गेला. तेव्हां सरकारास त्यापासून तूर्त कांहीं किफायत होणार नाहीं. दुसरें, असें केल्यानें तीर्थरूप दादासाहेबांस होळकरांच्या दिवाणांनीं आपल्याकडे शिलशिला लाविला ह्मणून ही जप्ती मुद्दाम केली, असें वाटून फार विषाद वाटेल; तिसरें, गंगाधर यशवंत हे निदान वरपांगीं तरी आपल्या बाजूची कळकळ दाखवितात, त्यांना आह्मी त्यांच्या ह्या राज्यकारणाविरुद्ध आहों असें वाटून ते एकदम तीर्थरूपाच्या पक्षास जाऊन मिळतील. ह्या सर्व कारणांस्तव ही मसलत नेकसलाह नाहीं. ह्याप्रमाणें ही गोष्ट श्रीमंतांनीं नाकारली. पण नाना फडणविसास लिहिलें, " ज्यांनीं सरकारचा राजरोसपणें विश्वासघात केला आहे, त्याचें यथास्थित शासन करण्याचा पुष्कळ अवधी आहे." इकडे श्रीमंतांस अहल्याबाईचीं गुप्त पत्रें आलीं कीं, दौलत व सरदारी माझ्या हातीं रहावी. थोरले माधवरावाचें आणि होळकरांचें आधींपासूनच चांगलें होतें. अहल्याबाईसही त्याचा पूर्ण भरंवसा होता. तिचीं त्यांस पत्रें

आल्यामुळें ह्या प्रकरणांत त्यास प्रत्यक्ष हात घालावयास सांपडून त्यानें अहल्याबाईची बाजू आतां उघडउघड उचलली. त्याचें बाईस उत्तर आलें कीं, " तुमचे दौलतीविषयीं जो पापबुद्धि ठेवील, त्याचें पारिपत्य बेलाशक करावें. तुम्हांकडील मुखत्यार दोघे हुजूर पाठवावे." महादजी गादीवर बसला तेव्हांचेंही राघोबाचें वर्तन त्यास आवडलें नव्हतें. याप्रमाणें राघोबा हातीं घेतलेल्या कामाबद्दल निराश होऊं लागला. त्यानें ह्या प्रकरणांत मागें पाय घेण्याचें ठरविलें.

इकडे वर सांगितल्याप्रमाणें अहल्याबाईचा निरोप पावतांच तुकोजी होळकर फारच तातडीनें सहा दिवसांत आला. भोसल्याकडील फौज हुसंगाबाद रेवा दक्षिणतीरीं दाखल होऊन, छावणी केली होती तेथून त्यांच्याकडून सांडणीस्वार आला. वरकड सरदारांचे जाब आले कीं, " मल्हारजी होळकराचा उपकार ज्याच्यावर नाहीं, असा कोण आहे? आम्ही सर्व त्याचे ऋणीच आहोंत. प्रसंगास आम्ही आपल्या जवळच आहोंत, असें समजावें. " अशी सर्वांची हमराईचीं उत्तरें येऊं लागलीं.

आपल्यावर आलेला प्रसंग पाहून तुकोजी होळकर यानें दादासाहेबांकडे सांडणीस्वार पाठविला कीं, " क्षिप्रा उतरलां असतां तुमची आमची तरवार चालेल. याचा विचार करून मग पाऊल टाकणें. "

हें पाहून दादासाहेबांस विचार पडला कीं, "¶आपण जर दुसऱ्याचें घर लुबाडावयास गेलों, तर ते आपले प्राण जाईतोंपर्यंत

¶ कैफियतींत (पा. ३७) मूळ वाक्य असें आहेः- " दादासाहेबांस

प्रयत्न व परिश्रम करण्यास चुकणार नाहींत. आपले मालक देशीं. त्यांनाही आमचें करणें संमत नाहीं. सध्यां यांच्या घरावर उपद्रव असल्यानें, त्यांनीं दुसऱ्यांची मदत घेतलीच असेल. बरें, आशा दुराशा मनांत धरून व आगळीक करून कार्यभाग साधला, तरी लौकिक नाहीं! पण उलट स्वार्थ मात्र न साधल्यास अर्थ नाहीं! शिवाय, मल्हारजी होळकर यांचा व आमचा ऋणानुबंध नष्ट होऊन अशा वेळीं त्यांच्या संबंधीं मनांत पाप आणल्याबद्दल जगांत तोंड काळें होऊन कोठेंही पत राहणार नाहीं." इतक्या थरावर गोष्टी नेऊन मग त्यांनीं हा पोक्त विचार केला व तुकोजी होळकर याच्याकडे कारकुनाच्या हातीं निरोप पाठविला कीं, "मालरावबाबा वारले यास्तव आम्ही आपल्याकडे मातंगपोशीस येत असतां तुमचे बुद्धीस विपर्यास येऊन तुम्हीच आम्हांला असा वेडा वांकडा निरोप पाठवितां याला काय म्हणावें!"

तुकोजीकडून दादासाहेबांस वरील निरोपास साजेसेंच उत्तर गेलें, तें असें, "आपण मातंगपोशीविषयीं कृपा केलीत, तर मग ही फौज जमा करावयाचें कारण काय बरें? आपण पालखींत बसून एकटे

---

विचार पडला कीं, दुसऱ्याचें घर घेऊं जातां प्राण जाय तोंपर्यंत कस्त करण्यास चुकणार नाहीं." यावेळीं, इंग्रजांनीं दुराग्रहानें अमेरिकेविरुद्ध युद्ध चालविलें असतां, प्रसिद्ध राजकार्य धुरंधर चॅथम यानें जें भाषण केलें, त्यांतील एक वाक्य दिल्यावांचून राहावत नाही. तें वाक्य अगदीं असेंच आहे.

"If I were an American as I am an Englishman, while a foreign troop was landed in my country, I never would lay down my arms–never, never, never!"

यावें. आमची फौज, घरदार, दौलत आपले वेगळी आहे कीं काय? आमचें घर आपलेंच आहे. आपण येथें खुशाल व आनंदानें यावें."

आतां केलेल्या सोंगाची पूर्ण बतावणी केली पाहिजे, असा विचार करून दादासाहेब पालखींत बसले, व दहापांच सरदार शागीर्द-पेशा इतक्यानिशीं होळकराकडे आले. त्यावेळीं तुकोजी होळकर हे त्यास सामोरे जाऊन पायउतारा झाले व त्यांनीं दादासाहेबाच्या पायावर डोकें ठेविलें. उभयतांही फार श्रमी झाले. ते तसेच कूच करून इंदूरास आले. स्वार शागीर्दपेशा जिकडील तिकडे लावून दोघे शागीर्द व स्नानसंध्येचा सरंजाम सुद्धां बाईसाहेबांचे बंगल्या-पाशीं डेरा देऊन राहिले. ते इंदूरास महिनाभर *होते. पांच चार बैठ-कींत सेव्यसेवकत्वप्रकरणीं बाईसाहेबांपाशीं बोलणीं झालीं. अह-ल्याबाई बायको माणूस खरीच, परंतु शूद्र होत्साती स्नानसंध्याशिष्ट सांप्रदाय यांत ब्राह्मणासारखी. ज्ञातीसंबंध नाहीं. तशांत अहल्याबाईनें मल्हाररावासमोर व त्याचे मागेंही उत्तम रीतीनें राज्य चालविलें. येणें-करून बाईसाहेबांचे तेजापुढें दादासाहेबांचें कांहीं एक वर्चस्व दिस-ण्यांत आलें नाहीं. पेशव्यांनीं तुकोजी होळकर यांस ता. १० जून इ. स. १७६७ रोजीं सरदारीचीं वस्त्रें दिलीं. दादासाहेब तेथें बरेच दिवस राहून नंतर उज्जनीस जाऊन सत्वासचे घाटानें गेले. राघोबा ता. ३० मार्चला ( १७६७ ) इंदूरला होता. नंतर तो गुजराथच्या वाटेनें एप्रिलच्या सुमारास दक्षिणेस गेला.

या सर्व हकीकतीवरून, येसूबाई आणि अहल्याबाई यांची मागल्या भागांत जी तुलना केली आहे, ती यथार्थ आहे असें वाचकांस वाटेल, हा भरंवसा आहे. असो.

---

* असें कैफियतींत म्हटलें आहे.

आतां हा भाग आटोपण्यापूर्वी अहल्याबाईचा विश्वामित्राप्रमाणें छल करणारा जो गंगाधर यशवंत, त्याचें या भानगडींत काय झालें तें सांगून हा भाग आटोपता घेऊं.

मालेरावानंतर हें राजकारण करून गंगाधर यशवंतानें आपली चाळीस वर्षांची नोकरी मातीमोल करून टाकिली. त्यानें आपल्या आचरणास फार हीनता आणली. पुढें तो ' आपण देवदर्शनास जातों " म्हणून दक्षिणेंत आला. पण हा म्हातारा केव्हां कोणच्या प्रसंगीं काय करील, व दादासाहेबांस हा आणखी कांहीं उपद्व्याप करावयास लावील, म्हणून रावसाहेबांनीं त्याच्यावर देखरेख ठेवण्यास चार ठेविला. दुसऱ्यांच्या बातम्या गुप्तपणें काढून घेण्याची रावसाहेबांस फारच चांगली हातोटी साधली होती. तात्या इकडे तिकडे फार हिंडले, पण त्यांची कोठेंही डाळ शिजेना. मग त्यांनीं * कषाय वस्त्रें परिधान करून दोघे खिजमतगार मात्र बरोबर घेऊन ते आणकाइचे† किल्ल्यास गेले. किल्ल्याचे दरवाजापाशीं जातांच, दोघे खिजमतगार होते, त्यांनीं ‡ दरवाणकरास सांगितलें कीं, "हा गंगाधर तात्या, सरकारचा हरामखोर, तुमचे जिमेस आहे." तेव्हां तात्यांनीं सरोष खिजमतगारांकडे पाहिलें. तेव्हां हुजरे यांनीं उत्तर केलें कीं, "रागेंरागें काय पहातोस ? तुझे मागें आज आठ महिने खराब होत आहोंत ! आम्हां उभयतांस श्रीमंतांनीं तुझ्यामागें पाठविलें होतें. आम्ही तुझ्याबद्दल रोजची खबर श्रीमंतांस पोंचवीत होतों. आज आमचें खरें स्वरूप प्रकट करून

---

* भगवीं.

† हा किल्ला खानदेशांत आहे. येथेंच होळकरांनीं प्रथम विजय मिळविला. अशा रीतीनें येथें होळकरांच्या दिवाणास येण्याचा प्रसंग यावा, हा कालमहिम होय ! ‡ द्वारपाळ.

तुला किल्लेदाराचे जिम्मेस करतों, पुढें तुमचे प्राल्ब्धीं जें असेल तें होईल." असें ह्मणून त्यांनीं झालेलें वर्तमान श्रीमंतांस निवेदन केलें. त्यांनीं गंगाधर यशवंताचें स्वहस्तें पारिपत्य करून त्यास कैदेंत ठेविलें. तथापि श्रीमंताचे घरची कैद व इतर ठिकाणची कृपा हीं बरोबर होणार नाहींत. स्नानसंध्या, नित्य भोजनाची टापटीप, वस्त्र-पात्रादि कांहीं एक कमी नाहीं.तात्यांनीं कोणाकडे जाऊं नये व त्यांच्या-कडे कोणी येऊं नये, इतकी मात्र त्यास अटक केली होती. पुढें आपले रुपये पेशवे घेणार, असें जेव्हां त्यास समजलें, तेव्हां ते यापेक्षां दानधर्मांत गेलेले काय वाईट, असा विचार करून त्यानें ९६ लक्ष ३२ हजार रुपये दानधर्मांत खर्च केले ! हे रुपये दानधर्मांत खर्च झाले खरे, पण त्याचा हेतु पहातां ही गोष्ट 'देवाय न धर्माय'अशीच झाली ! हा प्रकार ह्मणजे जन्मभर उंदीर मारून मग पश्चात्तापानें केदारेश्वराची यात्रा करणाऱ्या बोक्याप्रमाणेंच होय !

पुढें नारायणरावाच्या मृत्यूनंतर रघुनाथराव जेव्हां पेशवा झाला, तेव्हां त्याच्यासाठीं ज्यांनीं मेहनत व साहस केलें आणि हालअपेष्टा भोगल्या, अशी मंडळी त्याच्या भोंवती जमली. त्यांत अर्थात् गंगाधर यशवंत हे होतेच. त्याप्रसंगीं दादासाहेबांनीं त्यास असें सांगितलें कीं, "तूं मजकरितां फार क्लेश पावलास हें सारें माझ्या लक्षांत आहे. होळकराची दिवाणगिरी तुला पुनः मिळेल. मात्र हें काम आजच होणार नाहीं. सोयीसोयीनें होईल." *

यावेळीं गंगाधर यशवंताला आपली पुढील भवितव्यता माहीत नव्हती. पण त्यापुढील दिवस आतां आपणाला भूत काळाचे असल्यानें, त्यावरून असें म्हणावयास चिंता नाहीं कीं, चंद्रचूडाचें कारस्थान होळकरापुरतें तरी पुढें वाढलें नाहीं, तें येथेंच संपलें.

* ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग चौथा, पान २००३.

भाग सहावा.

# बाईचा कारभार.

राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच न द्यावें ॥
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १९ ॥
लोक पारखून सोडावे । राजकारणें अभिमान झाडावे ॥
पुनः मेळवून घ्यावे । दुरिल्या दोरें ॥ २० ॥

दासबोध, दशक ११, समास ५.

मागील भागांत सांगितलेल्या गोष्टी घडल्यापासून अहल्याबाईचा लौकिक पूर्वीपेक्षां अधिक पसरला. तिचें नांव पूर्वीं महशूर होतेंच, पण त्यास आतां अधिक महत्त्व येऊं लागलें. तिचे चातुर्याची चोहोंकडे तारीफ झाली. आपल्या हातीं पूर्णपणें राज्यकारभार येतांच तिनें सुभेदारीवर तुकोजीचें नांव लागू केलें. कारण, तिला धर्मशास्त्रदृष्ट्या राज्यासनावर बसतां येत नव्हतें. ह्या कामीं

*तुकोजीनें तिला फार साह्य केलें. राज्यकारभारांत त्याचा हात कितपत होता, ह्याचे वर्णन पुढें एका भागांत केलें आहे.

अहल्याबाईच्या कारकीर्दीचे साधारणपणें दोन भाग करतां येतील. एक खंडेरावाच्या मृत्यूपासून तों मल्हाररावांच्या मृत्यूपर्यंत, व दुसरा भाग मल्हाररावांच्या मृत्यूपासून तों तिच्या स्वतःच्या मृत्यूपर्यंत. ह्यांपैकीं पहिली कारकीर्द अजून तरी फारशी उपलब्ध नसल्यानें त्यासंबंधीं फारसें लिहितां येत नाहीं. जी थोडी बहुत माहिती होती, ती वर आलीच आहे. आतां तिच्या दुसऱ्या कारकीर्दीबद्दल म्हणजे इ. स. १७६६ ते १७९५ पर्यंत लिहावयाचें.

अहल्याबाईच्या राज्यकारभारांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या, त्यांचा आतां विचार करावयाचा. तिच्या राज्यव्यवस्थेसंबंधी पुढील भागांत दोन शब्द लिहिले आहेत. ह्या भागांत तिच्या राज्यांत घडामोडी कशा झाल्या, तिचें संस्थान व इतर संस्थानें यांच्या दरम्यान काय काय प्रकार झाले, तिचे इतर राजकारणपटु लोकांशीं दोन हात कसे झाले, इत्यादि गोष्टी आम्हांस सांगावयाच्या आहेत. पण अशा गोष्टी तिच्या कारकीर्दीत फारशा घडल्या नाहींत. उघडच आहे,

* राज्यकारभारांत कागदोपत्रीं तुकोजीचेंच नांव असे. अहल्याबाईकडून जे कागदपत्र जात, त्यांवरही " तुकोजी होळकर याजकडून " अशा अर्थाचें वाक्य असे. मग तें पत्र प्रत्यक्ष तुकोजीस असलें तरी चिंता नाहीं ! मात्र खालीं " चि. तुकोजी होळकर यास असें कळविण्यांत येतें कीं " अशा अर्थाचा मजकूर असे. येथें हेंही सांगणें आवश्यक आहे कीं, अहल्याबाईस ' महाराणी ' 'मासाब' वगैरे विशेषणें लावीत नसत. तर दरबार, महाराज वगैरे पुरुषार्थी शब्दच वापरीत. यास प्रत्यक्ष पुरावा पाहिजे असल्यास अकराव्या भागांत दिलेला प्रभाकर कवीचा पोवाडा पहावा.

तिचें राज्य म्हणजे सत्ययुगास शोभणारें; त्यांत मानवी संसारमय गोष्टी म्हणजे, आपण होऊन दुसऱ्याशीं केलेले कलह, परराज्याचा हव्यास व त्या पायीं लढाया इत्यादि प्रकार कोठून आढळणार ? तिच्या राज्यांत लढाया व कलह हे बोटावर मोजण्या इतकेच झाले. हा प्रकार तिच्या उत्तम कारकीर्दीचें द्योतक नव्हे काय ?

अहल्याबाईस माणसांची निवड चांगली असे. त्यामुळें एकदां नेमलेला मनुष्य बदलण्याचा प्रसंग तिजवर सहसा येत नसे. त्याच कामावर एक मनुष्य सारखा पुष्कळ वर्षें असणें हा त्या मनुष्याचा व राज्याच्या चांगुलपणाचा कस होता. * ह्या दृष्टीनें पहातां तिचें राज्य सुव्यवस्थित रीतीनें चाललें होतें, असें म्हटलें पाहिजे. ‡ **गोविंदपंत गानु**

---

* या संबंधानें **मालकमनें** आपला इकडील अनुभव असा सांगितला आहे कीं,

We shall find no correct standard by which to estimate a government in India, than the permanence or instability of its ministers, and the reputation of its provincial and other public officers. It is a criterion by which the natives always judge of thəir governors. ( pp. 179–80 ).

‡ या **गोविंदपंता**संबंधानें **प्रशस्तींत** म्हटलें आहे—

**गोविंदपंत सन्नाम्ना तथास्याः सचिवोऽपरः ।**
**विदितोमात्यवर्गेषु सदाचारपरायणः ॥**
**नित्यं देवतनार्चनेतिनिरतः शास्त्रार्थवेत्ता गुणी ।**
**सद्विद्याभिपरः परोपकृतिकृत् विद्वज्जनालंकृतः ॥**
**श्रीमत्स्वामिनिकार्यभारनिपुणः स्वाचारनिष्ठोव्रतः ॥**
**गोविन्देति सुधीः सदा विजयतां पापातिभीतो भुवि ॥ २ ॥**

या नांवाचा एक मनुष्य तिच्या कारकीर्दीत चांगलाच उदयास आला. तो मोठा सज्जन असे. तो खाजगीचें काम पाही. त्यानें कित्येक दिवस कारभाऱ्याचेंही काम केलें होतें. तो त्या बाईचा मंत्री असे. तिनें खंडेराव या नांवाचा एक मनुष्य इंदुरास नेमला होता. तो आपल्या वसूलबाकीच्या कामांत मोठा वाकबगार असे. त्याच्या अमदानींत आपली प्रजा फार सुखी व संतुष्ट आहे, हें पाहून तिला भारी समाधान होई. याप्रमाणेंच इतर कामगारांचें होतें. गंगाधर यशवंत याच्या मुलाचे गुण लक्षांत आणून तिनें त्यास पुण्याच्या दरबारीं वकील नेमिलें. तिनें चंद्रचूड घराण्याचें नुकसान करून त्यांच्याशीं व्यर्थ वैर माजविलें नाहीं. यशवंत गंगाधराच्या नेमणुकीनें तिनें दोन गोष्टी साध्य केल्या. एक तर चांगला व वाकबगार मनुष्य कामावर नेमून आपला कार्यभाग उरकला. दुसरें, तिनें प्रजाजनांचा लोभ संपादन केला. प्रजाप्रेम ही राज्याची बळकटी आहे, त्याकडे तिनें कधींहीं दुर्लक्ष केलें नाहीं. व तिनें आपले सारे बेत सिद्धीस गेलेले पाहून गंगाधर यशवंतावरही मेहेरनजर केली. त्याच्या मुलावर श्रीमंतांचीही पूर्ण कृपा होती. आपला कार्यभाग आटोपल्यावर मग त्या मनुष्याशीं अथवा त्याच्या निरपराधी वंशाजाशीं वैरभाव न माजविणें हें मोठेपणाचें व मुत्सद्देगिरीचेंही लक्षण

---

**सदा भक्तिशीलः सदा धर्मशीलः।सदामन्त्रकार्यार्थ विज्ञानशीलः॥**
**सुमन्त्री दयालुर्गुणज्ञो विवेको।सुगोविन्दनामा सदा नीतिशीलः॥२**

तसेंच मालकमनें ह्मटलें आहेः—“**Ahalya Baee** had the same minister, ( Govind Pant Gunoo ) a Brahmin of excellent character, throughout the whole period of her reign. ( p. 180 ).

आहे. तिचें राज्यकारभारासंबंधीं वर्तन म्हणजे—

ओंव्या.

उत्तम गुण तितुके घ्यावे। घेऊन जनास शिकवावे ॥
उदंड समुदाय करावे। परि गुप्तरूपें ॥ १८
अखंड कामाची लगबग। उपासनेस लावावें जग ॥
लोक समजोन मग। आज्ञा इच्छिती ॥ १९
आधीं कष्ट मग सुफळ। कष्टचि नाहीं तें निष्फळ ॥
साक्षेपेंविण केवळ। वृथा पुष्ट ॥ २०
लोक बहुत शोधावे। त्यांचे अधिकार जाणावे ॥
जाण जाणोनि धरावे। जवळीं दुरीं ॥ २१
अधिकारपरत्वें कार्य होतें। अधिकार नसतां व्यर्थ जातें
ह्मणोनि शोधावें चित्तें। नानाप्रकारें ॥ २२
अधिकार पाहोनि काम सांगणें। साक्षेप पाहोनि विश्वास
धरणें ॥ आपला मगज * राखणें। कांहीं तरी ॥ २३

दासबोध, दशक १०, समास १०.

या समर्थवाणीच्या धोरणावर होतें.

अहल्याबाईनें आपल्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें आल्याबरोबर त्याची काय व्यवस्था केली, हें थोडक्यांत वर सांगितलेंच आहे. या व्यवस्थेंत तुकोजीवर जीं कामें सोंपविलीं होतीं, त्यांचें दिग्दर्शन पुढें एका भागांत केलें आहे. पण येथें इतकें सांगावयास चिंता नाहीं कीं, बाईनें घरांतला कारभार आपणाकडे घेतला व

* मान

बाहेरचा कारभार तुकोजीच्या हातीं दिला. तथापि त्याच्या कारभारावर तिनें आपलीच देखरेख ठेविली. अहल्याबाइ मराठ्यांच्या युद्धांत कधीं गेली नाहीं, तरी ती त्यांच्या युद्धासंबंधीं व इतर गोष्टींत तुकोजीस आपल्या मसलती सांगे. पण त्यास वारंवार बाहेर रहावें लागत असल्यामुळें—एकदां तर तो दक्षिणेंत सतत बारा वर्षें होता—आपल्या जबाबदारीवर बरीचशीं कामें करावीं लागत. तथापि जेव्हां संस्थानाविषयीं प्रश्न उद्भवे, तेव्हां तो घडलेला प्रकार अहल्याबाईस लिहून कळवी, व ती त्यास ज्याप्रमाणें वागावयास सांगे त्याप्रमाणें तो त्या वेळीं वागे. युद्धविषयक गोष्टी, तह, परराज्यांचे संबंध इत्यादि कामें ती स्वतःच पाही. म्हणजे, महत्त्वाचीं व जोखमीचीं कामें ती स्वतःच पाहात असे. तुकोजी होळकरानें पुष्कळ युद्धें केलीं. त्यांपैकीं बोरघाटचें युद्ध, टिपूशीं युद्ध इत्यादि युद्धें सर्व प्रसिद्धच आहेत. त्यांचें वर्णन करावयाचें हें स्थल नव्हे. ती त्यास युद्धाचे बाबतींत आपल्या सल्लामसलती सांगे, याबद्दल महेश्वरच्या बातमीपत्रांतही उल्लेख आहे. तुकोजीचें टिपूशीं युद्ध होत असल्याचें पत्र बाईस आलें. त्यावेळीं तिनें आपल्या कारकुनास केसो भिकाजी समोरच पत्र लिहावयास सांगितलें. तो मजकूर केसो भिकाजीनें (पुणें दरबारचा वकील यानें) आपल्या धन्यास लिहिला आहे, तो असा—

"टिपूचें करणें कृत्रिम फार आहे. तुम्हांकडे कागदपत्र पाठवीत जाईल. त्यास तुम्हीं बहुत सावध रहावें. फंदफितूर कोणाचा ऐकत न जावा. तुह्मांस बदनाम करील असा जो असेल, त्यास दूर ठेवावें. पेंचांत पडाल अशी वर्तणूक न करावी."

'महेश्वरदरबारचीं' बातमीपत्रें, भाग दुसरा, पान ११६.

याप्रमाणें ती त्याला आपल्या मसलती सांगे. ती पुणें दरबारांत आपलें मत नेहमीं कळवी. याबद्दल नानांनीं बाईची फार तारीफ केली आहे.

तुकोजीचें मुद्रेवर—अर्थात् सुभेदारीवर—नांव मात्र होतें. बाकी राज्याचीं खरीं सूत्रें तिच्याच हातीं होतीं. व लोकही तिलाच महेश्वरची महिषी ( पण असा शब्द तेव्हां प्रचारांत नव्हता ) समजत. तिच्या दरबारांत परराज्यांतील जे वकील होते ते व परराज्यांतील राजे, मांडलिक व इतर लोक तिलाच राणी समजत. पुणें, हैदराबाद, श्रीरंगपट्टण, नागपूर, लखनौ, कलकत्ता इत्यादि प्रमुख ठिकाणीं होळकराकडून जे वकील लोक नेमले जात, तेही तीच नेमीत असे. याशिवाय लहानसहान संस्थानांत व राजेरजवाड्यांच्या कचेरींत तिनें आपले गुमास्ते नेमिले होते. हे गुमास्ते, लहान-सहान संस्थानांतून जी खंडणी गोळा करावयाची, त्यासाठींच विशेषत: असत.

अहल्याबाईच्या हयातींत जाट, नजीब उद्दौला, रजपूत वगैरेशीं जीं युद्धें झालीं त्यांत, नाराणरावांच्या मृत्यूनंतर बारभाईचें जें कारस्थान झालें त्यांत, राघोबामुळें इंग्रजांशीं जीं युद्धें झालीं त्यांत, टिपूसुलतान, हैदर अल्ली यांजबरोबर झालेल्या लढायांत, त्याप्रमाणेंच महादजीशीं जी चकमक झाली तींत, अहल्याबाई प्रत्यक्ष नव्हती; पण ह्या कारभारांत तिच्यावतीनें तुकोजी असे. या प्रसंगीं इतर लोकांशीं सख्य करून तुकोजीस राघोबाप्रमाणें आपल्या राज्यावर हल्ला करितां आला असता; पण त्यानें आपल्या स्वत:च्या महत्त्वाकांक्षेसाठीं अथवा स्वार्थासाठीं घरांत दुफळी पाडून आपलें व होळकरशाहीचें नुकसान

केलें नाहीं. असें असून अहल्याबाई आणि तुकोजी यांच्या गृहकलहानें पेशवाई बुडाली, असें ह्मणणें कितपत न्याय्य आहे, याचा विचार वाचकांनींच करावा.

अहल्याबाईचें राजकारण कसें असे, ती इतर मुत्सद्यांशीं कशी वागत असे, तिचा आपल्या संस्थानांतील बंदोबस्त कसा काय असे, याचें कैफियतींत वर्णन केलें आहे. ह्मणून आह्मी त्यांतील एक उतारा येथें घेतों. हा उतारा मनोरंजकही आहे. त्यांतील प्रसंग हरिपंततात्या फडके व अहल्याबाई यांच्या भेटीच्या वेळचा आहे. हरिपंत तात्या हे त्या वेळच्या मंडळींत मोठे मिळून मिसळून वागणारे असून सर्वांशीं 'साधकता' ठेवणारे असे होते. ते कोणाशीं वैर करावयाचा प्रसंग न आणतां सर्वांशीं सलोख्यानें वागत. यावेळीं जमल्यास अहल्याबाईकडूनही कांहीं लाभ झाल्यास पहावा, ह्मणून ते बाईच्या भेटीस आले होते. हा त्यांच्या भेटीचा प्रसंग आहे.

सुभेदार इंदुरास गेले. हरिपंततात्या ( आपली ) फौज—ते या वेळीं राघोबाच्या मागें लागले होते—खानदेशांत पुणें मार्गाकडे रवाना करून सडे, अहल्याबाई पुण्यवान व कारस्थानीं दोन्ही अंगें (जनकाप्रमाणें) एकसारखीं,तेव्हां दर्शन घेऊन जावें, या भावीं महेश्वरास आले. बाईसाहेबांची भेट जाहली. शिष्टाचार आदरसत्कार बहुत उत्तम जाहला. तात्यांचे मनांत बाईसाहेबासारखें मनुष्य, यांचें ( आणि ) आपलें कांहीं प्रामाण्य असावें. असें मनांत येऊन ( त्यांनीं आपल्या मनोगताबद्दल ) कृष्णाजी मुरार यांसी बोलण्याचा व्यूह काढला. त्यांनीं ( तात्यास ) स्पष्ट उत्तर दिलें की, ( आपण ह्मणतां ) अशी गोष्ट बाईसाहेबांपाशीं आह्मी कोणींही बोलण्याइतकें कोणाचेंही पुण्य नाहीं. येथें त्यांचे मुखावाटे आज्ञा होईल तितका व्यवहार

करून आहों. ( बाईसाहेबांस ) अगोदर पुत्रशोक. त्यांत ( त्यांनीं आपलें ) राज्य दुसऱ्याचे स्वाधीन केलें. त्यांत मनस्वी किलाप (कलुषितपणा. ) मातुश्रीच्या स्वभावांत पीळ. सूर्योदयापासून तों पुनःसूर्योदयापर्यंत [ त्यांच्या ] सदाचरणाच्या घटका नेमलेल्या. त्यांत अवकाश करून ( त्यांनीं ) हाक मारिली असतां ( त्यांच्याकडे ) जाऊन (त्या) प्रश्न करतील, तितकी विनंती करावी. ( त्यांच्याशीं ) अधिक बोललें असतां ( त्यांची ) मर्जी कोणे कलास जाईल हीं भीति. उदार ह्मणोन गवताची पेंढी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाहीं ! हा विषय आपण समक्ष बोललें असतां रुकार अथवा अन्य विचार काय निष्पन्न होईल तो खरा. ”

याप्रमाणें कृष्णाजी मुरारानें मध्यस्थी करण्याचें काम मोठ्या सफाईनें टाळलें. हरिपंतासही वाटलें कीं, अशा स्थितींत मध्यस्थी करण्यापेक्षां आपण स्वतःच बोलणें बरें. कृष्णाजी मुरारानें ही गोष्ट बाईसाहेबांच्या कानीं घातली. व वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं तात्यास उत्तर केलें. पण—

हें त्याचे गळीं उतरोन तिसरे दिवशीं फराळास बोलाविले होते, पांचशें खाशांचा बेत. त्याचा समारंभ उत्तम प्रकारचा सिद्ध होऊन हरिपंततात्या मंडळीसह ( समारंभास ) आले. मंडळी कचेरींत बसवून जातीनें आंगरखा पागोटें काढून बाईसाहेबांचे स्नानसंध्येचे बंगल्यांत आले. तों (इकडे) बाईसाहेबांची ( ही ) स्नानसंध्या संपून देवघरांतून बाहेर आली. तात्यास पाहिल्यावर गालिचा मखमली बसावयास टाकून हरिपंत तात्यांनीं ( तेथें कोणी तरी असावें ह्मणून ) दादाजीस हाक मारिली. त्यास ( बाईसाहेबांस तात्यांचा ) बोलण्याचा ओघ दादाजी-

कडून अगोदर समजलाच होता. दादाजी आल्यावर बंदी करून तात्यांनीं आपल्या बोलण्याचा व्यूह काढला. (पण त्या द्रोणाचार्याच्या व्यूहांत अहल्याबाई सांपडण्याजोगी असती, तर तिचें राज्य अभिमन्यूप्रमाणेंच अल्पायुषी झालें असतें.) तात्यांचें म्हणणें ऐकलें तेव्हां मातुश्रीसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "(तात्या), आपलें बोलणें मुत्सद्दी काव्याचें. आमचा विषय पहातां गैरसमजुतीबद्दल आमच्या उपमा अन्यत्रांस देतात, ते आम्ही * प्रत्यक्ष! त्यांत बायका-माणसें! आमची समजूत ती काय? आम्हांस जें बोलणें तें उघड बोलावें. त्याचें उत्तर करूं."

याप्रमाणें अहल्याबाईसमोर लांबून लांबून बोलण्यानें चालत नाहीं असें जेव्हां पाहिलें, तेव्हां तात्यांनीं (आपलें येण्याचें प्रयोजन) स्पष्ट बोलून दाखविलें. त्याचें उत्तर, "तात्या, ईश्वरइच्छेंकरून मजवर सर्वोपरी गहजब. अशांत म्यां दौलत दुसऱ्याचे स्वाधीन करून राहिलें. (व राहिलेलें) आयुष्य तें परत्रेचे (परमार्थ) विचारांत काढावें, अशा भावीं नर्मदातीरीं क्षेत्र पाहून दिवस लोटितें. तथापि आमचा हा विचार कैलासवासी मल्हारजी होळकर यांनीं श्रीमंतांचे गादीशीं केला. त्यांत आम्हीं बांधलेले आहोंत. जागजागांत असे विचार घडूं लागले असतां आमचे बुद्धीनें बेल म्हणजे भाजी आणि भंडार म्हणजे त्याचें साधन, असें आहे. आपण श्रीमंतांचे दौलतीचे खेरखुवाह, आपण वेगळें बोलणें बोलतां हेंच अप्रशस्त."

---

* अहल्याबाईचें हें भाषण किती तरी मुत्सद्देगिरीचें आहे. अशाच अर्थाचें एक वाक्य मागेंही (पान ६) आलें आहे. त्याचा भाव असा: पुष्कळ सांगूनही जेव्हां एखाद्याची समजूत पटत नाहीं, तेव्हां त्यास म्हणतात, 'तूं शुद्ध धनगर आहेस.' पण या गोष्टींत 'ते (धनगर) तर आम्ही प्रत्यक्षच आहोंत, तेव्हां आमची समजूत पडावी कशी?'

असल्या भावीं सडेतोड उत्तरें केलीं. यांत हरिपंत तात्यांचे मनांत वैषम्य तर आलेंच, परंतु तात्यांची साधकता विशेष. यामुळें तो संबंध सोडून अन्यत्र गोष्टी बोलण्यांत ( येत असतां ते ) पोटांत कळ निघाली म्हणून पाव घटका तेथेंच निद्रा करून (नंतर ) बोलले कीं, " उपद्रव विशेष होत चालला. आज्ञा होईल, तर मी डेऱ्यांत जाईन." बाईसाहेबानीं " बहुत उत्तम आहे " असें म्हणून त्यांस बिदा केलें. ते [ आपल्या सर्व ] मंडळीसह गोटांत गेले.

याप्रमाणें त्या दोघांचें भाषण झालें खरें. पण अहल्याबाई थोर मनाची व तात्यांची साधकता चांगली म्हणून ते परस्परांविषयीं कलुषित भाव मनांत ठेवून निराळे झाले नाहींत. बाईसाहेबांनीं तात्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेवला होता. कैफियतकार पुढें म्हणतात——

'पांचशें पात्रांचा समारंभ. पात्रें वाढून सिद्धता झाली होती. मंडळी गेल्यावर आपले पदरची मंडळी मुत्सद्दी, भिक्षुक पागे वगैरे [ लोक ] बोलाऊन फराळास घातले. त्याजकडेसही दहींपोहे, लोणचीं, पापड, वडे ऐशा बंग्या भरून शागीर्दां हातीं पाठऊन दिल्या.'

या नंतर कृष्णाजी मुरार आपला वरचष्मा करावयास पुनः तयारच ! कारण——

'त्याजवर तिसरे दिवशीं कृष्णाजी मुरार यांनीं [ तात्यांस ] विनंती केली कीं, " ये विषईचे मनोधर्म [ आधींच ] सुचविलेच होते. मालेरावबाबा कैलासवासी झाल्यापसून ( बाईसाहेबांचा ] स्वभाव कोणाचेही हातीं नाहीं. [ त्या ] पुण्यवान, धैर्यवान; यामुळें [ त्यांचे ] दिवस श्रमानें निघतात. त्यांत आपलें येणें या ठिकाणीं कशास ? तो योग झाला असतां त्यांत मन ओळखीचें कारण काय (असा आपमतलबी)

पणाचा विषय–वैयक्तिक जाहगीर मागणें–बोलण्यांत कां आंणलात) आपले सारखें मिष्टास व दुसऱ्याचें मनोधोरण हें श्रीमंताचे राज्यांत धोंडाळल्यानेंही मिळावयाचे नाहींत. ते पक्षी रंगाच्या मोटा बांधून कूच करावें (हताश व फजीत होऊन, वाटाण्याच्या अक्षता घेऊन परतणें) हें नेकसल्ला. तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें, आपण ह्मणतां तसेंच होईल.

'(तात्यांची प्रकृति बरी नसतां ते महालांतून आले. ह्मणून बाईसाहेबांच्या आज्ञेनें) दादाजी (त्यांची) प्रकृति पुसून आले. दुसरे दिवशीं हरिपंततात्या वाड्यांत आले. (त्यांची) एकांतीं बाईसाहेबाशीं कितीएक बोलणीं होऊन (त्यांनीं त्यांच्यापाशीं) बिदा मागितली. (बाईसाहेबांनीं तात्यास) वस्त्रें, अलंकार देऊन बिदा केलें. ते पुण्यास आले.'

या गोष्टीवरून अहल्याबाईची मुत्सद्दीगिरी चांगली दिसून येते. त्याचप्रमाणें मराठी राज्यांतले मोठे मोठे लोकही आपला स्वार्थ साधावयास दुसऱ्याकडे संधानें लावावयास कसे जात हेंहीं दिसतें. त्या लोकांस राज्याच्या हिताआधीं आपलें हित दिसे. त्यामुळें मूळ राज्यास त्या प्रमाणांत कमकुवतपणा येऊं लागला. अशा गोष्टींत भावी अधःपतनाचीं चिन्हें स्पष्ट दिसून येतात.

याप्रमाणेंच पुढील उतारा पहावा.

''महादजी शिंदे गुजराथेंत न जातां मागें राहिले होते. ते मागून उज्जनीस आले. तुकोजी होळकर गुजराथची स्वारी करून खानदेशांत होते. त्याकडे महेश्वराकडे जाणें वांकडें. कारण सहा महिने दिवाणगिरी दादाजी गंगाधर यानें केली. तें बाईसाहेबांच्या इतल्यानें जावें. पुन्हां नारो गणेश याची मुक्तता व कारभार सुरू झाला. त्याचा इतला सगळा मातोश्री साहेबासीं नाहीं. (आपण

केलेल्या व्यवस्थेंत तुकोजीनें आपणास न कळवितां फरक केला.) यामुळें बाईसाहेबांचें अंतःकरणीं संशयाचे पर्वत; तेव्हां महेश्वरीं जाऊन सफाई होणें इतकें पुण्य कोणाचेंही नाहीं. तथापि शेमरोडाचे घाटीं परभारें इंदुरास आले. मग महादजी शिंदे यांस इंदुरास बोलाऊन तुकोजीनें त्यांशीं बोलणें केलें कीं, ' तुम्ही आमचे बंधु; ते पक्षीं मातुश्री साहेबांकडे जाऊन, आपसांतील सफाई करावी.'

"पण हें काम कांहीं सोपें नव्हतें. कारण, दोघांच्या भांडणांत आपण मधें पडण्याचा कारभार केला, तर अहल्याबाईस तें मुळींच रुचणार नाहीं, हें पाटिलबोवा जाणून होते. पाटीलबोवांनीं तुकोजीचें जेव्हां वरील भाषण ऐकलें, तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, ' श्रीमंत, मोगल, भोंसले, या प्रकरणीं अधिक उणें जाब असल्यास त्यांतील व्यवस्था आपले मनोगतानुरूप घडून येईल. पण बाईसाहेबांपाशीं जाऊन यश यावें, असें मनोत्साहास वाटत नाहीं. परंतु घरचें काम. ते पक्षीं जातों. ( काय ) घडेल तें खरें.'

" असें बोलून एक पालखी व चौघे खिजमतगार व दोन घोडे कोतवाल इतक्यांनिशीं महेश्वरास आले. ( हें ) बाईसाहेबांस समजतांच मुकुंदराव हरी दिवाण यांस सामोरें पाठवून ( त्यांस ) बहुत समारंभानें किल्ल्यावर आणोन वाड्यांतच राहावयाची (त्यांची)सोय केली. दुसरे दिसापासून संपूर्ण कारभार, ध्यावे देणें सुद्धां सोपला. जामदारखानेवाल्यास लाख रुपये पावेतों परवानगी कीं, " पाटिल बावांनीं लाख रुपये कोणास देवविले असतां द्यावे. आमचे परवानगीचा आक्षेप घेऊं नये. " असा बंदोबस्त करून त्रिकाल भोजन मुदपाकांत. त्यांत दोन प्रहरां पंक्तीस, प्रातःकाल, सायंकाळ मावशीबाईस आणून नानाप्रकारचीं खाणीं त्यांचीं व ब्राम्हणाचे पदार्थ करवून

आपण जवळ बसून भोजनास घालावें हा क्रम तीन महिने एकरूप चालला.

"पाटिलबावा बहुत प्रसन्न होऊन अशा माऊलीचे पोटीं जन्म घ्यावा अशा भावीं बोलण्यांत, परंतु ज्या कामाकरितां आले, त्या बोलण्याचा प्रारंभ केला असतां पाटिलबावांची रुरयात कांहीं येक न ठेवितां, कायम करून समेटचें पर्यवसानास येऊं दिलें नाहीं. शेवटीं पाटिलबावाही दिक होऊन बोलले कीं, 'बाईसाहेब, आपण इतकीं अंगवळणाचीं बोलणीं बोलतां, परंतु आह्मीं पुरुष आहोंत! आपले ढंगावर आलों असतां आपण काय कराल?'

"याचें उत्तर, 'जसे तुह्मीं आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या तोंडांत टाकून गिळून गेलां, * तोच बोध तुकोजी होळकरास करून उभयतां फौजबंदीनें येण्याचें करावें. इंदुरींहून तुमचें कूच, त्याच दिवशीं हत्तीचे पायांत अंडीं घालून तुमची खात्री करीन, तरच मल्हारजी होळकराची सून. तुमचे मनांत गुबार होता, तो तुह्मीं बाहेर काढला. या गोष्टीस चुकाल, तर तुह्मास मार्तंडाची शपथ.'

"मग पाटिलबावांनीं हंसण्यावर गोष्ट नेऊन मातुश्रीचें शांतवन केलें. तार ध्यानास आणिला. यश यावें ऐसें पाहून दिसण्यांत येईना. सबब आज्ञा घेऊन इंदुरास आले."

---

* बाईचे अशा प्रकारचे उद्गार 'महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत'हीं भा. १, पा. १०४) सांपडतात. "कोंण वेळेस बोलण्यांत आलें आहे कीं, शिंद्यांनीं बायकांच्या मेखा खांदाडीस दिल्या, तसें येथें होणार नाहीं. सुभेदाराच्या पुण्यप्रतापें जें घडणें तें यथायोग्यच घडेल." हा संबंध पान १५१ यांतही आहे.

ही गोष्ट महादजीची झाली पण विठ्ठल शामराजाचें पुण्याकडे पाठविलेलें पत्र पहाः—"कदाचित् सरकार आले, अगर आणिक कोणी बायको ह्मणून दाबाच्या गोष्टी सांगतील, तर तेंही सहन होणार नाहीं. सुभेदारापेक्षां अधिक दाब राखून आहेत. जी गोष्ट होणें ती आपला दाब राखूनच व्हावी. (भाग २, पान १९९).

या उताऱ्यावरून पाटिलबोवांचा नाटकीपणा, अहल्याबाईस न आवडणारा त्यांचा 'बीचमे मेरा चांदभाई' करण्याचा कारभार, त्यावर तिचें खरमरीत उत्तर,—हें सारेंच पहावयाजोगें आहे. पुढील उताराही फारच मनोरंजक आहे. या उताऱ्यांतील मजकूर वकीलाच्याच भाषेत सर्वथैव दिलेला नाहीं.

सांप्रतचें वर्तमान. राजश्री महादजी शिंदे छ १ मिनहूस येथेंआले. ते येथून दोन कोसांवर असतांच बाईनीं त्यांस घ्यावयास यशवंतराव फणसे, माधवराव गंगाधर, आपले बंधु महादजी व मुत्सद्दी वगैरे मिळून सुमारें दोन तीनशें लोक सामोरे पाठविले. या मंडळीच्या आणि पाटील बोवाच्या दोन कोसांवर भेटी झाल्या. वृषभ लग्नावर भेट व्हावी, असा निश्चय होतांच ही सारी मंडळी प्रहर सात घटका दिवस राहतां, वाड्यांत आली. ही मंडळी यावयाची म्हणून इकडे वाड्यांतही त्यांच्या स्वागतार्थ बिछायत वगैरे घालून आरास केली होती. बाई आपल्या जागींच बसली होती. पाटील बोवांनीं आपल्या बरोबरच्या लहानसहान मंडळीस गोटांत पाठवून आपण पन्नास लोकांनिशीं वाड्यांत आले. त्यावेळीं वाड्यांत बाई व मावशीबाई बसल्या होत्या. पाटीलबावांनीं बाईच्या पायावर डोकें ठेविलें व मावशीबाईस मुजरा केला. उभयपक्षीं क्षेमसमाचार विचारिले. त्यानंतर ते एक दीड घटका बाईशीं बोलत बसले होते. जातांना त्यांस विडे अत्तर देऊन मग निरोप दिला. निरोप देतांना बाई पाटीलबोवांस म्हणाली कीं, "आपण सारे मंडळीसुद्धां भोजनास हिकडेच यावयाचें करावें. लवकरच बोलावणें पाठवीन." तदोत्तर पाटीलबोवा गोटास गेले. भोजनाचा सरंजाम पाकनिष्पत वाड्यांतच केली होती.

महेश्वरच्या पश्चिमेस आंबराई पलीकडे जें स्थल आहे, तेथें रेवातीरीं पाटीलबोवांची उतरावयाची सोय केली होती. तेथें बाईनीं दोन डेरे व बिचोबा, राहुट्या, शमीने व फरासखान्याचा इतर सरंजाम आधींच पाठविला होता. तेथें पाटीलबोवा उतरले. येथून घास, लकडी, दाणा व ब्राम्हण मंडळीस दाणा वैरण, शिधे, मेजवानी सरंजाम, कारकून मंडळीस फराळाचें आदिकरून सर्व सामान पाठविलें. बाईनीं संध्याकाळीं भोजनास बोलावणें पाठविलें. पाटीलबोवा चार पांचशें लोकांसह भोजनास आले. स्वयंपाकांत दोन तीन पक्वान्नें व त्यांचें भक्ष असे पदार्थ केले होते. भोजनें सहा घटका रात्रपर्यंत झालीं. त्या समयीं बाईही जवळच बसली होती. भोजनसमारंभांत विसाजी शामराज, नारो गणेश व बाईंकडील इतर मंडळीही जवळच बसली होती. विसाजी शामराज म्हणाले, " आज पाटीलबावा वाट चालून आले आहेत, आपणासही श्रम झाले आहेत. शिवाय रात्रही फार झाली आहे. म्हणून भोजनोत्तर पाटील बावांस आज्ञा द्यावी. उदईक प्रहर दहा घटकांत आपण स्नान व पूजा उरकावी; पाटील बावाही लवकरच भोजन उरकून येतील. बोलण्याचा प्रसंग उदईक दोन अडीच प्रहरपर्यंत व्हावा. " हें भाषण उभयतां सरदारांनीं मान्य केलें. भोजनोत्तर ते एक घटकापर्यंत बसले. त्यानंतर विडे मिळाल्यावर पाटील बोवा सुमारें प्रहर रात्रीं आपल्या मंडळीसुद्धां गोटाकडे रवाना झाले.

छ २ रोज भृगुवारीं दीडप्रहर दिवसा पाटीलबोवा आपलें स्नान भोजन वगैरे उरकून वाड्यांत आले. त्यावेळीं बाई पुराण श्रवण करीत बसली होती. पाटीलबोवाही एक घटकापर्यंत बाईजवळ पुराण श्रवण करीत बसले होते. ( त्यांस असें बसण्याचा कदाचित्

कंटाळा येईल व ते संकोच वाटून कांहीं बोलणार नाहींत ह्मणून) बाईंनीं त्यांस सांगितलें, "तुह्मी बंगल्यांत जाऊन बसा. माझें पुराण ऐकणें झालें, व जेवण झालें ह्मणजे मग मी तुह्मांला कळवीन." हें ऐकून पाटीलबोवा तेथून उठून बंगल्यांत आराम करावयास गेले. तदोत्तर बाईचें पुराणश्रवण व भोजन झालें, तों दिवस प्रहर उरला. पाटीलबोवा या वेळीं काय करीत आहेत, याचा तिनें समाचार आणविला; तों कळलें कीं, ते निजले आहेत. हें ऐकून बाईही जरा लवंडली. तथापि ती कांहीं झोपीं गेली नाहीं, तर पडल्या पडल्या विसाजी शामराज यांच्याशीं बोलतच होती. त्यानंतर मुदपाकखान्यांत जाऊन पाटीलबोवांच्या भोजनाची तरतूद केली. तों घटका दिवस राहिला होता. मग भोजनाची तरतूद झाली. पाटीलबावांकडील खासा शंभर होते. रात्रीं सहा घटकापर्यंत भोजन झालें. विडे दिले. आतां कांहीं बोलावें, तर शुक्रवारची रात्र. यास्तव ते तसेच निरोप घेऊन गोटास गेले.

छ ३ रोजीं स्थिरवारीं बाईंनीं दोन प्रहरानंतर पाटीलबोवांस बोलावणें पाठविलें. ते एक घटका दिवस राहतां वाड्यांत आले. यावेळीं बाई जपास बसली होती. म्हणून पाटीलबोवा आणि आबा चिटणीस व राणेखान असे त्रिवर्ग बाईचा जप होईतोंपर्यंत खलबत करीत बसले होते. बाईचा जप रात्रीं दोन घटका झाला. त्यानंतर ती पाटीलबोवांकडे आली. मुदपाकखान्यांत भोजनाची सरंजामी झाली. चाळीस पन्नास लोकांसह भोजनें केलीं. तदोत्तर विडे वांटले. मग पाटील बोवांनीं बाईस वस्त्रें शुभ्र पोषाख, पैठणी पातळ व चोळी व शालजोडी तीन सनगें दिलीं. सौभाग्यवती मुक्ताबाई यांना पैठणी पेल्याचें पातळ तांबडें व चोळी खिनखाप व पासोडी

पैठणी, तिच्या दोघी लेकींस चोळी लुगडीं अशीं चार सनगें, मुक्ताबाईच्या भ्रतारास–यशवंतरावास व तिच्या पुत्रास–नथ्याबास–चार चार सनगें पैठणी व किनखाप जमेवार ऐसीं उभयतांस आठ सनगें, याप्रमाणें वस्त्रें दिलीं. मावशीबाईचेही घरीं पाटीलबावांस एक दिवस मेजवानी होणार आहे. रात्रीं वस्त्रें देऊन चार घटका बाई व पाटीलबावा यांनीं, आबा व राणेखान असे एकांतीं बसून कांहीं बोललीं. मग पाटील बावांनीं निरोप घेतला. आबा त्यांच्या बरोबरच गेले. पण राणेखानभाई व बाई हे उभयतां रात्रीं चारपांच घटका बसून बोलतच होते. या वेळीं वरकड सारी मुत्सद्दी मंडळी बाहेर बसली होती. नऊ घटका रात्र झाल्यानंतर राणेखान आपल्या गोटास गेले व बाई आपले निद्रेस गेली.

पाटीलबावांनीं पुण्याकडील वसईचें अस्ताव्यस्त वर्तमान जेव्हां बाईस सांगितलें, तेव्हां बाई फार श्रमी झाली व म्हणाली,–‘ वसईसाठीं कैलासवासी श्रीमंतांनीं फारच परिश्रम केले. पाण्यापरी पैसा खर्च झाला! असें तें स्थळ गेलें! केवळ त्यांच्यावरच मसलत पडली! आपणापैकीं तेथें कोणीच नाहीं! कारभारी आपले चित्तांत काय म्हणत असतील? आपल्याकडून कांहींच झालें नाहीं!’

यावर पाटीलबोवा म्हणाले, ‘ काय करावें? इकडेही हीं पलटणें आलीं आहेत. यांचा जर बंदोबस्त झाला नाहीं, तर ते या प्रांतीं उपद्रव करावयास चुकणार नाहींत. पुनः फौजेच्या देण्याच्या ओढी या प्रकारच्या! तेव्हां कसें बरें करावें?’

बाई म्हणाली, “ तुम्ही एक नव्हे तर अशा शंभर ओढी सांगा. पण एक वसई कायम असती, तर कांहीं चिंता नव्हती. परंतु आतां

तुमचीं हीं सारीं बोलणी व्यर्थ. असो. आपल्यास याचा शब्द लाग-णार, यास काय उपाय ? नबाबांनीं आपलें इमान राखिलें."

यानंतर नबाबाच्या थोरपणाच्या आणि इतर राजेरजवाडे यांच्या गोष्टी झाल्या. बाईचें व यांचें काय ठरतें तें पहावें. बाईचें मानस आहे कीं, पाटीलबावा काय सिद्धांत ठरवून जातात तें पहावें. तदोत्तर कांहीं फौजेची सरंजामी करून हिंदुस्थानाकडे पाठवावी. कांहीं फौज ठेवून माधवराव गंगाधर पुण्याकडे पाठवावे असेंही योजनेंत आहे. पहावें काय घडेल तें खरें. पाटीलबावांचें मानस फार करून उज्जनीस जाणार असें ऐकण्यांत आलें. बाईनें तर त्यांना, कांहींही उपाय करून, दक्षिणेस पाठवावयाचें अशा विचारानें येथें बोलाविलें आहे. पण पाटीलबावांची उज्जनीकडे जावयाची ओढ फार आहे. याप्रमाणें इकडील वर्तमान आहे. सुरतेकडील वर्तमान ऐकण्यांत आलें आहे कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेबांस हवालदिल झाला आहे. ते अन्योन्य भाषणें करितात. असें सावकाऱ्यांत आपल्यांत आपण बोलतात. सत्य मिथ्या देव जाणे.

छ ४ रोज रविवारीं संध्याकाळीं पाटीलबावा वाड्यांत आले आणि बाईस मुजरा करून बंगल्यांत जाऊन बसले. बाईचा नित्य-नेम दोन घटका रात्रीपर्यंत झाला. नंतर मुदपाकांत येऊन पाटील-बावांच्या भोजनाची तरतूद करविली. दोन घटका रात्रीनंतर पाटी-लबावांस बोलाविलें. तीस चाळीस लोकांसह भोजन झालें. जेवणा-च्या अगोदर पाटीलबावा बसले होते त्यावेळीं मी जवळच होतों. त्यांनीं हरि बावाजीकडील वर्तमान मला सविस्तर विचारिलें. मीं तें त्यांस विदित केलें. नंतर दादासाहेबांबद्दल भाषण झालें. तदो-त्तर भोजन करावयास बसले, त्या वेळीं बाईही जवळ येऊन बसली.

त्यांचें भोजन झाल्यावर कोठडींत बिच्छाईत टाकली. बाई, पाटील-बावा व राणेखान या त्रिवर्गांचें खलबत चाललें, तें सात घटकापर्यंत. या वेळीं वरकड मुत्सद्दी मंडळी बाहेरच बसली होती. अकरा घटका रात्र झाल्यावर त्यांचें खलबत संपलें. बारावे घटकेस बाई उठली. पाटीलबोवा आपले गोटास गेले. बाई आपले निद्रा-स्थलास गेली.

आज छ ५ रोजीं इंदुवासरीं पाटीलबावास मावशीबाईंचे येथें मेजवानी आहे. उदईक मंगळवारीं पाटीलबावा कूच करून उज्जनी-कडे जाणार, अशी बोलवा आहे.

या उताऱ्यावरून बाईचा सात्त्विक स्वभाव, कितीही मोठा मनुष्य आला तरी परमेश्वरविषयक जीं कामें करावयाचीं तीं कधींही न टाळावयाची उत्कट इच्छा, पाटीलबोवांचा तिच्या ठिकाणीं असलेला आदरभाव, हे सारे मनोहर भाग दिसून येणार आहेत. पाटीलबोवांचें आणि बाईंचें पुष्कळ सख्य असे. पण त्या उभयतांनींही त्याचा उपयोग आपल्या प्रभूशीं वैर साधण्यांत केला नाहीं.

मालकम साहेब म्हणतो कीं, अहल्याबाईस आपल्या राज्यांतील अंतर्व्यवस्थेंत महादजीचें पुष्कळ साह्य झालें. आरंभीं आरंभीं महा-दर्जींचे तिजवर बरेच उपकार झाले होते. तसेच होळकरांचेही पण महादजीवर उपकार होतेच. ती त्याच्याशीं शेवटपर्यंत स्नेहभावानेंच वागली. पण त्यांचा शेवटीं ( इ. स. १७९२ त ) एक मोठा खटका उडाला होता. त्याचा येथें उल्लेख केल्यावांचून राहावत नाहीं. तो प्रसंग असा.

पाटीलबोवा " अखेरचा रंग " साधावयास पुण्यास चालले होते. त्यांनीं " उज्जनी सोडते वेळी पुण्याच्या लोकांस चकित करण्यासाठीं

आपल्या बरोबर हजारों मौल्यवान् हत्ती, घोडे, तंबू, डेरे इत्यादि निवडक व उंची चिजा घेतल्या होत्या. आणि त्यांच्याबरोबर फौजेखेरीज एवढा मोठा लवजमा होता कीं, त्यांची स्वारी आपल्या मुलुखांतून गेल्यानें पिकापाण्याची दुर्दशा होईल म्हणून नागपूरच्या भोसल्यानें पाटीलबावांनीं दुसऱ्या मार्गानें पुण्यास जावें अशी विनंती केली!" * ते हर्दा हंड्याच्या घाटाकडून गेले. तेव्हां नेमावर महालापैकीं सत्वास महालीं बाईनीं एक गढी बांधून ठेविली होती. ती सोइस्कर पाहून खालीं केली व होळकरांचें ठाणें उठवून बऱ्हाणपुरचा रस्ता धरला! हें जेव्हां त्या बाईस कळलें तेव्हां तिला अतोनात संताप आला. त्या काळीं बाईसाहेब म्हणजे प्रत्यक्ष अहल्या. तिचे मुखावाटे अक्षरें निघालीं कीं, "हा मेला पुन्हां हिंदुस्थान पाहात नाहीं!" ×

होळकरांची गढी खाली करण्यांत महादजीचें अंग कितपत असावें, याची जबरदस्त शंका आहे. तो अहल्याबाईस फारच पूज्य मानी. ज्यानें दिल्ली येथील राज्यसूत्रें शहाणपणानें सर्वथैव आपल्या हातीं ठेविलीं, जो नानावर आपलें वजन कसें ठेवावें हें पूर्णपणें जाणून होता,तो महादजी ह्या वंदनीय बाईची मर्जी मोडावयास्तव असलें क्षुल्लक काम करील, हें संभवत नाहीं. ही गोष्ट त्याच्या विजयाच्या मदानें धुंद झालेल्या सेनेच्या हातून झाली असेल. असो. पाटीलबोवांशीं स्नेह राखल्यास काय अर्थ आहे, हें ती चांगलें जाणत असे. तथापि ती इतक्यासाठींच त्यांच्याशीं स्नेहभावानें वागत असे, असें मात्र नव्हे. पण पाटीलबोवासंबंधानें हें म्हणतां येईल,असें वाटत नाहीं.

* माधवराव शिंदे यांचें चरित्र, पान २४३.

× होळकरांची कैफियत, पान ५९. ही हकीकत कर्णोपकर्णी ऐकून महेश्वरकर वकीलानेंही दिली आहे. भाग २ रा, पान २०३.

कारण, ह्या पुण्यशील बाईशीं आपला स्नेह आहे, असें लोकांस आढळून आल्यास त्यापासून आपला काय लाभ आहे, हें ते पुरतेपणीं जाणून होते. पण या लहानसहान गोष्टी कशाही असोत, बाकी पाटीलबोवा अहल्याबाई ह्मणजे साक्षात् मातोश्री असें समजूनच तिच्याशीं वागत, पत्रव्यवहार करीत व बोलत.

या वर सांगितलेल्या भेटी राजकारणी पुरुषांच्या झाल्या. आतां एक इतर-खानगी-भेटीचें वर्तमान सांगतों. तेंही फार मनोरंजक असून त्यावरून त्या वेळच्या स्थितीचें बरेंचसें ज्ञान होणार आहे. त्या प्रसंगाचें वर्णन महेश्वरकर वकिलाच्या पत्राचे आधारें दिलें आहे.

“ सांप्रत अधिकोत्तरपैकीं, राजश्री पाटीलबावांची बहीण आनंदीबाई निंबाळकरीण ही त्यास याच मागें भेटावयास गेली. ती येथें रेवा दक्षिण तीरास चंद्र १६ रोज इंदुवारीं सहा घटका दिवस प्रथम प्रहरीं आली. तिच्या आगमनाची सूचना बाईस रात्रींच अगोदर आली होती. म्हणून इकडून आनंदीबाईस नर्मदा उतरावयास दोन तीन नावा पार पाठविल्या होत्या. ती तृतीय प्रहरीं रेवा उतरून उत्तर तीरास आली. अहल्याबाईनीं तिला उतरावयाची सोय महेश्वरच्या पश्चिमेकडील आंबराईंत एक डेरा, दोन तीन राहोट्या, चांदणी व कनाता देऊन केली होती. व सरंजामही दाणा, घास, लकडी व दोनशें मनुष्यांचा शिधा याप्रमाणें पाठविलाच होता. त्याच दिवशीं उभयतां बायांच्या भेटी व्हावयाच्या. परंतु त्या दिवशीं एकवीस घटकांनंतर व्यतीपात होता, तो दुसरे दिवशीं एकवीस घटकापर्यंत होता. यास्तव, दुसरे दिवशीं एकवीस घटकानंतर उभयतांच्या भेटी व्हाव्या, असा निश्चय ठरला. सोमवारीं रात्रीं आपल्या कारकुनासमागमें पन्नास मनुष्यांचा स्वयंपाक,

कांहीं पक्वान्नें, दोन तीन प्रकारचे भात, शाक-भाज्या वगैरे आनंदी-बाईकडे पोहोंचतें केलें. त्यांच्या बरोबर सरंजाम हत्ती दोन, स्वार दोनशें, पायदळ शंभर, याप्रमाणें होता.

"दुसरे दिवशीं प्रहर दिवस राहतां बाईनीं आपली नात सौभाग्यवती रमाबाई, व नातसून सौभाग्यवती बाळाबाई यांच्या बरोबर स्वार-प्यादे व ताशेमरफे गाडदी देऊन त्या बाईस येथून बोलाविणें पाठविलें. तिकडे आनंदीबाईही तयारच होती. ती आपल्या सरंजामानिशीं अहल्याबाईच्या भेटीस निघाली. इकडे बाईस बातमी आली कीं, पाटीलबोवांची बहीण शें दीडशें स्वार व शें दीडशें मनुष्य इतक्यासह येत आहे. म्हणून बाईनें पुढें सांगून पाठविलें कीं, वाड्यांत दाटी फार होईल. त्यावरून आनंदीबाईनें राऊत वगैरे दरवाजाजवळ ठेवले व आपण थोडक्या सरंजामानिशीं गडावर वाड्यांत आली. हा वेळपर्यंत आम्हीही बाईजवळच होतों. आनंदीबाई वाड्यांत येतांच मुत्सद्दी मंडळी व शागीर्दपेशास दूर केलें. बाईनीं मुत्सद्दयांस सांगितलें कीं, 'तुम्ही थोरल्या सदरेंत जाऊन बसा.' बाईनें आपल्याकडीलही शें दीडशें खासे खासे मराठे मातबर सदरेंत बोलाविले होते. बाईचे भाऊ महादजी पाटील, जांवई यशवंतराव फणशे व नातू धोंडिबा हे सारे इकडे बसले होते. तिकडे बाईकडे हरकूबाई, मुक्ताबाई व लांबहाते वगैरे मराठ्यांच्या बायका चाळीस पन्नास होत्या. आनंदीबाई आली, तेव्हां मुक्ताबाई व तिच्या मागें दोघी चौघी बायका या पुढें गेल्या व तीस भेटून हातीं धरून आणिली. ती जवळ आल्यावर तिला आधीं हरकूबाई भेटली. त्यानंतर बाई भेटली. हीं सर्व बिछाइतीवर बसलीं. बाई आपल्या पांढऱ्या घोंगडयांच्या आसन गादीवर बसली. त्यांचीं आगत

स्वागतपर भाषणें झालीं. आनंदीबाई नणंद व अहल्याबाई भावजय असें यांचें नातें. त्या अन्वयें हर्षविनोदांचीं भाषणें झालीं."

हा भेटीचा प्रकार पाहिला म्हणजे—

श्रीजनकसुता सीताप्रभृति सुखें भेटल्या स्वसा जावा ।
तत्संवाद वदावा, सज्जन पावुनि मह स्व, साजावा ॥१
भरताची मांडवी स्त्री, लक्ष्मणाचीहि उर्मिळा ।
श्रुतकीर्ति रिपुघ्नाची जगीं यद्रीति दुर्मिळा ॥ २ ॥
पडुनि गळां गहिवरल्या सीतेच्या कन्यका तशा गमल्या।
श्रमल्या विरहें, श्रीनें भेटुनि कुरवाळितां करें शमल्या॥३
म्हणति सुदिन भाग्यें आजि हें प्राप्त झालें ।
अमृत परमरुग्णा वांचवायासि आलें ॥
सुभगिनि! चवदा कीं कल्पसे अब्द गेले ।
स्वसम सखि निजेनें निष्ठुर स्वप्न केलें ॥ ४ ॥

हें मोरोपंतकृत " सीताराभायणां " तील चित्र डोळ्यापुढें उभें राहतें, व त्या प्रेमळ भेटीचें फार कौतुक करावेसें वाटतें. असो. वकील पुढें लिहितात—

इकडे आनंदीबाईबरोबर भले लोक व कारकून मंडळी आली. त्यांच्या इकडील सदरेमध्यें जे लोक बसले होते, त्यांच्या भेटी झाल्या. तदोत्तर हे नवे लोक बाईस मुजरा करावयास गेले. त्यांच्या बरोबर महादजी पाटील, फणशे व विनायक बाजी हेही गेले. ही सर्व मंडळी संध्याकाळपर्यंत बसली होती. आनंदीबाईंनीं अहल्याबाईस द्यावयास वस्त्रें आणलीं होतीं, पण बाईनीं तीं त्या दिवशीं घेतलीं नाहींत. तिनें दुसरे दिवशीं आनंदीबाईस जेवावयास राहविली. ते दिवशीं संध्याकाळीं निरोप घेऊन बिऱ्हाडास गेली. दुसरे दिवशीं वाडयांत हजार

मनुष्यांचा स्वयंपाक करविला. आनंदी बाईकडील पांचशें माणूस व तितकेंच यांच्या कडील, अशीं हजार मनुष्यांचीं तृतीय प्रहरीं भोजनें झालीं. आनंदीबाई या स्वयंपाकांत जेवली, व अहल्याबाई नित्यकृत ब्राह्मणांच्या स्वयंपाकांत जेवली. त्यानंतर उभयतां बायांचा चार घटकांपर्यंत एकांत झाला. चार घटका दिवस राहतां बंगल्यांत येऊन बसली. नंतर त्यांच्याकडील व आपल्याकडील लोक बोलाविले. आनंदीबाईनीं बाईस, हरकूबाईस व मुक्ताबाईस आधीं वस्त्रें दिली. बाईस पैठणी पातळ पदराचें शुभ्र व चोळी दिली. तसेंच हरकूबाईसही दिलें. मुक्ताबाईस पैठणी लुगडें, चोळी दिली. बाईचे बंधु महादजी, जांवई यशवंतराव व नातू नथ्याबा यांस शेले पागोटीं दिलीं. यानंतर अहल्याबाईनीं आनंदीबाईस वस्त्रें दिलीं. दोन अडीचशें रुपये किमतीचें शुभ्र पदराचें सोंवळें, चोळी, पांढरी शालजोडी असें आनंदीबाईस दिलें. त्यांच्या मावसबहिणीस पैठणी लुगडें चोळी, आनंदीबाईच्या लेकीच्या लेकी दोघी लहानाल्या त्यांस बुराणपुरी पोषाख दिले. कारकून मंडळी सात आठ असामींस व भले लोकांस शेले पागोटीं दिलीं. बाई सर्वत्रांशीं बहुमानानें बोलली व अंतःकरणपूर्वक आनंदीबाईशीं बोलून तिला बिदा केलें.

दुसरे दिवशीं त्यांचें कूच झालें. परंतु आनंदीबाई, राजश्री विसाजी शामराज, देवाजी लांबहाते, * गंगाभारती गोसावी व हरकूबाई यांच्या घरास सडी गेली. तिला बिदा करतांना इतक्यांनाही वस्त्रें दिलीं.

---

*या गंगाभारतीसंबंधानें 'महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें' भाग दुसरा ( पान ५७ ) यांत पुढील उल्लेख आहे—

गंगाभारती गोसावी मातबर, महेश्वरीं राहत होता. त्यास पालखी बाईनीं दिधली होती. ( तो ) सुभेदारापासून येथील दरबारचा. त्याचा काल चंद्र ९ शनवारीं ( जून इ. स. १७८४ ) झाला. त्यामुळें ( बाई ) श्रमीच झाली.

भाग सातवा.

# राज्य-व्यवस्था.

राजन्दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनां ।
तेनाद्य वत्समिव लोकममुं पुषाण ॥
तस्मिंश्च सम्यगनिशं परितुष्यमाणे ।
नानाफलैः फलति कल्पलतेव भूमिः ॥ *

भर्तृहरि.

गेल्या भागांत राजकीय पुरुषांच्या भेटींसंबंधानें लिहिलें आहे. आतांच्या भागांत अहल्याबाईच्या संस्थानांतील अंतर्गत व्यवस्थेसंबंधानें लिहावयाचें योजलें आहे.

अहल्याबाई स्त्री, तशांत लहानपणापासूनच कारभार पाहूं लागली; पण आपलें कामकाज करतांना तिच्यावर दुसऱ्याचें वृथा वर्चस्व

* प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा । नृपा तूं करीं सर्व सांभाळ यांचा ॥
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें । अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें ॥

वामन.

बसलें नाहीं. प्रसंगीं दुसऱ्याचें ऐकणें हा दोष मल्हारजींत होता. पण तो अहल्याबाईंत नसावा हें मात्र फारच आश्चर्यकारक होय. पण एका दृष्टीनें यांत कांहीं आश्चर्यकारक नाहीं. कारण, अशा प्रकृतीच्या लोकासंबंधानें भर्तृहरीनें--

**सिंहशिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु ॥**
**प्रकृतिरियं सत्त्ववतां न खलु वयस्तेजसो हेतुः ॥ ***

हे जे उद्गार काढले आहेत ते शब्दशः खरे आहेत. अहल्याबाईला न्यायाच्या अथवा इतर कामीं कोणाची भीड खपत नसे. यावरून ती हेकेखोर अथवा हट्टी होती, असें मात्र नव्हे. ती आपलेंच नुसतें चालवीत नसे, तर प्रसंगानुसार नाना फडणीस, मल्हारजी, हरिपंत इत्यादि तत्कालीन प्रमुख मंडळीस ती आपल्या कामकाजांत त्यांचें मत विचारी. पुराण ऐकणें संपलें कीं, ती चारचौघां मंडळीबरोबर महत्त्वाच्या विषयांवर खल करी, व त्यांत तिला जें बरें दिसे, तें ती करी.

त्या काळीं जमिनीची आजच्यासारखी रयतवारी–पद्धत नसून जमिनीची वसूली देशमुख, देशपांडे यांच्याकडून होत असे. पुष्कळ प्रसंगीं शाहाजोग मनुष्यास गांवेंही इजारें देत. पण या पद्धतीमुळें व्यक्ति स्वतः श्रीमंत होत व संस्थानांस उतरती कळा लागे. अहल्याबाई ही आपल्या प्रजेकडून नेमस्त कर घेई. पुष्कळ दिवसांच्या करारानें जमीन पट्ट्यानें देण्याची पद्धत अहल्याबाईनें काढली असें ह्मणतात ( मालकम–भाग २ ). ती बटाई पद्धतींत चवथा हिसा घेत असे. तिच्या वेळीं पीयन जमिनींचा एक ते दीड व अडाणाचा

* सिंहाचा जो बाल तोही चपेटा । मारी त्याला जो करी मत्त मोठा ॥
तेजस्वी जे वृत्ति ऐसीच त्यांची । तेथें कांहीं चाड नाहीं वयाची ॥

वामन.

चार ते पांच असा दर होता. ती आपल्या प्रजेकडून उत्पन्नाचा चवथा हिस्सा घेई. पाटील, पटवारी, जमीनदार यांचे हक्क व अशाच इतर गोष्टी ती आपल्या धार्मिक कृत्यांपैकीं एक भाग समजे. हें सारें 'मल्हारी मार्तंडाचें' काम आहे, असें समजून ती आचरण करी. लोकांच्या कामकाजाकडे लक्ष न देणें म्हणजे पाप करणें होय, असें ती समजे. हीच तिच्या राज्यव्यवस्थेची गुरुकिल्ली आहे.

अहल्याबाईचें आपल्या टाकेदारांशीं व अशाच प्रकारच्या इतर लोकांशीं जें वर्तन असे, तें मोठें सौम्य असे. यामुळें तिच्या हाताखालचे टाकेदार क्वचित् प्रसंगीं खंड देण्यास हरकत करीत. मऊ दिसलें कीं कोंपरानें खणावयाचें, हा एक जगाचा नियमच आहे. या सार्वत्रिक नियमास तिचे टाकेदार अपवाद कोठून असणार? हे लोक आपली खंडणी देण्यास अळंटळं करतात, ही गोष्ट तिच्या लक्षांत आली कीं तिनें त्या लोकांस सक्तीचीं पत्रें पाठवावीं. यामुळें टाकेदारांस दहशत बसून तिचें कार्य लागलीच होत असे. परंतु इतर मराठ्यांनीं आपल्या हाताखालच्या खंड देणारांस फारच छळलें, यामुळें ते लोक असंतुष्ट होऊन ते मराठ्यांचा हेवा मात्र करावयास लागले. हा प्रकार शेवटीं मराठ्यांस फारच अहितकारक झाला; कारण, त्या लोकांस मराठ्यांपासून फार जाच झाल्यानें ते मराठ्यांचे पक्के वैरी झाले. याप्रमाणें त्या वेळच्या पुष्कळशा प्रमुख सरदारांनीं खंड देणारांस आपले कायमचे शत्रु करून त्यांची एक प्रचंड संघशक्ति निर्माण केली. त्याचा यथासांग इतिहास **कर्नल टॉड** याच्या सुप्रसिद्ध "**राजस्थान**च्या **इतिहासां**"त पहावयास सांपडेल. पण अशा कृत्यांत अहल्याबाईनें कधींही हातभार लाविला नाहीं. तिनें आपल्या टाकेदारांस कधींही छळलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांची चांगली

भरभराट व्हावी हा तिचा मोठा हेतु होता. त्यांची भरभराट झालेली पाहून तिला फारच संतोष होत असे. त्यांच्या भरभराटीवर आपली भरभराट आहे, त्यांच्या संतोषावर आपलें स्थायिकत्व आहे, अशा स्वार्थमय हेतूनेंही इतर मराठ्यांनीं त्यांस वागविलें नाहीं, मग त्यांस निरिच्छ हेतूनें वागविण्याचें लांबच राहो. अहल्याबाईचें त्यांच्याशीं चांगलें वर्तन असे, याचें मुख्य कारण हेंच कीं, तिची वृत्ति ही स्वभावतःच सात्त्विक होती. तिच्या या धर्ममय आचरणाचा परिणाम त्या लोकांच्या मनावर फार होत असे. यामुळें ते लोक या बाईशीं फारच चांगल्या रीतीनें वागत.

अहल्याबाई माळवा व नेमाड—महेश्वरच्या आसपासच्या भागाचें काम पाही. ह्या कामाच्या विभागणीचें वर्णन पुढील भागांत केलें आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, ती बहुधां दोन भागांचें काम पहात असे. तिनें न्यायानें आणि सोईनें आपल्या प्रजेचें हित केलें व त्यांचें सुख वाढीस लावलें. या प्रांतांची व्यवस्था करावयास तिनें कधींही सैन्याचा उपयोग केला नाहीं. इतकेंच काय, पण स्वतः-जवळ सैन्यही ठेविलें नाहीं. होळकरांचें बहुतेक सारें सैन्य तुकोजी-बरोबर असून तिनें राज्याचा कारभार करावयास थोडीशी शिबंदी मात्र ठेविली होती. तिला आपला कारभार चांगला पार पाडावयास याशिवाय ज्यास्त सैन्य ठेवण्याचा प्रसंगच आला नाहीं. कारण, तिला लोक बिथरण्याची मुळीं भीतीच नव्हती. तिचें प्रजेशीं लपंडावीपणाचें वर्तन नसल्यानें, प्रजाही तिच्याशीं जितक्यास तितकें न वागतां, मोकळे-पणानें वागे. तिचें राज्य प्रजाप्रेमावर चाललें असल्यानें तिला आपल्या प्रजेची मुळींच भीति वाटत नव्हती. तिचें हें वर्तन अगदीं सत्ययुगास साजेसें होतें. सुधारलेल्या देशांत आजलाही हेच विचार प्रमुखपणें

दिसतात. प्रजाप्रेमाच्या बळावर राज्य करणें हें जें उत्तम राज्यकर्त्यांचें लक्षण, तें तिच्या आचरणांत चांगलें दिसतें. प्रजाप्रेमावर राज्य करण्याची तिची तयारी पाहिली म्हणजे—

**आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आम्हांस उत्तम फळ, असें आम्ही समजतों. रयतेच्या कल्याणाविषयीं आमच्या ज्या इच्छा आहेत, त्या सिद्धीस नेण्यास सर्वशक्तिमान् जो परमेश्वर तो आम्हांस व आमच्या अधिकाऱ्यांस सामर्थ्य देवो अशी प्रार्थना आहे.**

हा जो आपल्या राणीसरकारचा अठ्ठावन सालचा जाहिरनामा आहे, त्याचें स्मरण झाल्यावांचून खचित् रहाणार नाहीं. मोठ्यांचें सर्व कांहीं मोठेंच असावयाचें. अहल्याबाईला आपल्या प्रजेची तर भीति नव्हतीच, पण इतर राजेरजवाड्यांचीही तिला भीति वाटत नसे. तिच्या संस्थानावर परकीय राजेरजवाड्यांनीं कधींही स्वारी केली नाहीं, ही गोष्ट विचार करण्याजोगी आहे. तिच्या कारकीर्दींत चंद्रावंतांनीं बंड उभारलें खरें, पण त्यांत त्यांना अहल्याबाईविरुद्ध कांहीं करावयाचें नव्हतें. त्यांचें बंड जात्यभिमान व स्वसंरक्षण या हेतूनें प्रेरित होऊन झालें होतें. त्याचा अहल्याबाईच्या राज्यव्यवस्थेशीं मुळींच संबंध नव्हता. ती व्यक्तिविषयक गोष्ट असून त्यांत भानगडीच्या फार गोष्टी असल्यानें त्याचा विचार पुढें एका भागांत केला आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या, ह्मणजे चंद्रावंतांच्या बंडाचा आरोप तिजवर मुळींच येत नाहीं व तें बंड उभारल्याबद्दल चंद्रावंतांवरही दोष लादतां येत नाहीं! हें तिचे राज्यासंबंधीं झालें. पण परराज्याबद्दल ह्मणाल, तर तिनें

कधींही लढाई उकरून काढली नाहीं. कारण, तें ह्या साध्वीच्या स्वभावाविरुद्ध होतें. त्या वेळची तर अशी स्थिति होती कीं, जो तो आपल्या वरिष्ठास दूर सारून स्वतः बलाढय होण्याचा प्रयत्न करीत असे. इतकेंच नव्हे, तर स्वतःस चांगला खुराक मिळावा, ह्मणून ते लहान लहान संस्थानांस गिळंकृत करीत. पण अहल्याबाईचें वर्तन सर्वथैव ह्याविरुद्ध होतें. आपल्या आसपासचा समाज अधोगतीस जात असतां त्या प्रचंड ओघाबरोबर आपण न जाणें हें फारच कठीण काम आहे, व आपल्या परिस्थितीकडे आपण जर क्षणभर लक्ष दिलें, तर तें आपल्याही सहज लक्षांत येणारें आहे. या दृष्टीनें पहातां ह्या बाईची योग्यता फारच मोठी आहे. उदेपुर, जयपुर, जोधपुर, देवास, धार, बढवाणी, चरखारी, झाबवा इत्यादि लहानमोठीं संस्थानें तिच्याकडे आपले तंटे घेऊन येत. अशा गोष्टींबद्दल महेश्वरच्या बातमीपत्रांतही उल्लेख आढळतात. त्याची वाचकांस कल्पना करतां यावी, ह्मणून त्यांतील दोन उल्लेख येथें सांगतों.

पाटीलबोवांचा आणि गोहजवाल्यांचा लढा पडला होता. तेथील वकील जे वीरेश्वरपंत ते महेश्वरास आले. त्यांनीं येतांना अहल्याबाईस एक व माधवराव गंगाधर यांस एक, अशीं दोन पत्रें आणिलीं होतीं. बाईनीं त्यांना भेटीस बोलावून त्यांची एकांतीं भेट घेतली. त्या वेळीं तेथें वर सांगितलेले माधवराव हेही होते. बाईनीं त्यांचीं पत्रें पाहिलीं व ते 'जबानींही कित्येक मजकूर बोलले.' नंतर बाईनीं माधवराव यांस सांगितलें कीं, "वकिलांचें तपशीलवार वर्तमान ऐकून तें मजला समजावून सांगा."

माधवरावांनीं वीरेश्वरपंतास आपल्या घरीं बोलाविलें व त्यांस बाईच्या आज्ञेप्रमाणें तपशीलवार वर्तमान विचारिलें. वकील साहेब

म्हणाले कीं, "शेषईवर इंग्रजांचे मसलतीवर पाटीलबावा होते. ते समयीं मसलतीची कोणत्याही प्रकारें विल्हे लागेना. तदोत्तर पाटीलबोवांनीं गोहजवाले राणाजीस बोलावून इमान प्रमाण बेलभंडार होऊन उभयतांचा एक दिल झाला. राणाजींनीं इंग्रजास भयभीत दाखवून त्यांस तेथून उखळलें. पण ही मसलत एकीकडे झाल्यानंतर पाटीलबावा आमचेच मूळ खणूं लागले ! आम्ही त्यांस बहुत प्रकारें सांगितलें, परंतु ते न समजेत ! यास्तव, पाटीलबावांनीं (जो) बेलभंडार दिला आहे, तो श्रीमंताकडे न्यावा तर दूर पंथ ! इकडे पाटीलबावांनीं तर निकट केली आहे. यास्तव आपण वडील, वचनाचे साचे. कैलासवासी सुभेदारांनीं ज्यास वचनें बेलभंडार दिले, ते निभावून हिंदुस्थान हस्तगत ( आपलेंसें ) केलें. ती वहिवाट पाहून राजांनीं आपल्याकडे पाठविलें आहे. आम्हांस हातीं घेऊन पुढील कामें काजें आमचे हातें ध्या."

असें त्यांचें बरेंच भाषण झालें. तें माधवरावांनीं बाईस सविस्तर सांगितलें. बाईंनीं उत्तर केलें कीं, "पाटीलबावांस पत्र लिहा कीं, सर्वांशींच आपण वाईट झाल्यानें पुढें कोणी आपल्या बेलभंडारास पातेजून हिंदुस्थान हस्तगत ( आपलेंसें ) कसें होईल ? यास्तव, यांसीं प्रस्तुत सल्लख राखून पुढील कामें करा. पुढें प्रसंगोपात हे आपले टाफेखालींच आहेत. आतांच यांसीं बिघडूं नये. इंग्रजांचेंही पारिपत्य पुरतेपणें झालें नाहीं. यास्तव, प्रस्तुत राणाजीशीं सल्लख राखून पुढील कामें करा. राणाजीचा वकील येथें आहे. त्यास आम्ही आपल्या जवळ ठेवून घेतलें आहे. तुमचें उत्तर आल्यावर वकिलाबरोबर येथून कोणी भला माणूस देऊन तुम्हांकडे पाठवूं."

भाग १ ला, पान १२४

त्याचप्रमाणें दुसरे एके ठिकाणीं उल्लेख आहे—

'खेची राघोगडवाला, त्याचा पुतण्या चेतसिंग, त्यानें सिरोंज व भेलसें या प्रांतीं प्रळय मांडिला. मार्ग चालत नाहीं. हजार पांचशें जमाव जाहल्याखेरीज मार्ग शुद्ध चालत नाहीं. त्यामुळें खेचीचा वकील येथें बाईकडे आला आहे. आमचें संस्थान पाटीलबावांस सांगोन सोडवावें. त्यावरून बाईनीं वकिलास ठेवून घेऊन, राजश्री सुभेदारांस पत्रें लिहिलीं आहेत कीं, यांचा बंदोबस्त करून देणें.'

म. द. बा. पत्रें, भा. २ रा, पान १७०

याप्रमाणें ती त्यांची निरवानिरव करून देई. अशा प्रसंगीं त्यांची आपसांत कलागत लावून तिनें आपल्या पोळीवर कधींही तूप ओढलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर ती त्यांचा आपसांत चांगला मेळ लावून देई. वर सांगितलेलीं पुष्कळशीं संस्थानें तिला आपले गृह-कलहही कळवीत व सांगत " माझा मुलगा बिघडला आहे, त्याला व्यसन लागलें आहे, तो फार चाळे करतो. " यावर ती बाई त्यांचे गृहकलह मिटवून त्यांचें आपसांत जुळवून देई. या गोष्टीवरून पुष्कळशा लोकांस " एडवर्ड दि पीसमेकर " चें स्मरण झाल्या-वांचून राहावयाचें नाहीं. इतर संस्थानांत अशा प्रकारचे गृहकलह चालले असतां तिनें आपलें चंबुगवाळें कधींही आंत टाकलें नाहीं. कोणच्याही काळांत काय, असें वर्तन करणारे लोक फारच थोडे अस-तात. वरील हकीगतीवरून तिचे अवांतर संस्थानिकांशीं किती सख्य होतें व त्यांचा तिजवर किती भरंवसा होता, हें स्पष्ट दिसतें. त्यावे-ळच्या लोकांचा तिजवर नुसताच विश्वास नव्हता, तर ते तिचा शब्द म्हणजे वेदवाक्य समजत. तिजवर पर–संस्थानांतील लोकांचा अशा प्रकारचा विश्वास बसावयास तिचें स्वतःचें आचरण किती सोज्वल असेल बरें ? हें तिचें निर्लोभ वर्तन पाहून बाहेरचे लोकही

तिची मर्जी संपादावयाचा प्रयत्न करीत. अशा लोकांचा ती चांगल्या रीतीनें परामर्ष घेई. तिची निःस्वार्थता, तिचें नैतिक वर्चस्व, सारासारज्ञान हीं फार विचार करण्याजोगीं आहेत.

**शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।**
**मृदुवचनें बोलत जावें । कोणि एकासीं ॥**
**दुसऱ्याचे दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें ।**
**प्राणिमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥**

दशक १२, समास १०.

हें समर्थाचें वचन तिच्या आचरणांत स्पष्टपणें दिसून येतें. तिला आपल्या राज्यविस्ताराची हांव कधींही सुटली नाहीं.त्या वेळच्या इतर सरदारांनीं आपलें संस्थान विस्तृत करावयास ज्याप्रमाणें परक्यावरच काय, पण आपल्या भाऊबंदांवरही स्वाऱ्या केल्या, त्याप्रमाणें अहल्याबाईच्या हातून कधींही झालें नाहीं. तिनें वर सांगितलेल्या संस्थानांचे गृहकलहच मिटविले नाहींत, तर प्रसंगविशेषीं तिनें त्यांची दाद पुणें दरबारापर्यंत लावून त्यांस योग्य तो न्याय मिळवून दिला आहे. याबद्दल बाजीराव बर्व्याची हकीकत वाचण्यालायक आहे. ती फारच मोठी असल्यानें येथें समग्र देतां येत नाहीं. तथापि येथें मुद्याची गोष्ट देतों. बाजीराव हा दादाच्या पक्षाचा होता, ह्मणून त्याच्या मागें नाना लागले. तेव्हां तो महेश्वरास पळून आला. पण तेथेंही त्यास पुण्याहून पाचारण आलेंच. त्याचा असा विचार होता कीं, आपण बाईची एक दोन वर्षें एकनिष्ठेनें चाकरी करून तिची स्वतःबद्दल खातरी करावी, नंतर तिनें आपल्या विषयीं पेशव्याची खातरजमा करावी. यावर बाईनें त्याच्याकडील एका कारकूनाजवळ उद्गार काढले.—

" आम्ही श्रीमंतांस तुम्हांविषयीं कित्येक प्रकारें ममतापुरस्कर लिहिलें. त्यांनीं मान्य केलें. पांच हजार रुपये खर्चास देऊं म्हणून त्यांनीं पत्रीं लिहिलें आहे. असें असतां आतां तुम्ही फिरून गोष्ट सांगतां, यांत श्रीमंतांस आमचा बेइतबार भासेल. तुम्ही राज्यांतील राहणारीं माणसें. मातबरास ह्या गोष्टी योग्य नाहींत. तुम्ही त्यांस सांगा. आम्हीही आपला कारकून तुम्हांसमागमें देतों. तेही सांगतील. "

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, पान १११.

अशा प्रकारच्या उठाठेवी फारच थोड्या लोकांनीं केल्या. ती लहानसहान संस्थानास द्रव्य-साह्य करी, व कधीं कधीं तर आपल्या चांगल्या अधिकाऱ्यांकडून त्यांची उत्तम व्यवस्था लावून देई. तिच्याकडे ही जी मंडळी येत, त्यांची चिरकाल टिकणारी एकी करून त्यांचें मंडळ तयार कसें होईल व त्याचें राष्ट्रीय घटनेच्या कामीं काय महत्त्व आहे, हें तिला शिवाजी, अकबर, बाळाजी विश्वनाथ अथवा थोरले माधवराव यांच्याप्रमाणें समजलें नाहीं, हें कबूल करणें भाग आहे.

अहल्याबाई गनिमी काव्याच्या युद्धांत—लांडगेतोडींत—प्रवीण होती. ती लहानपणापासून मल्हाररावासारख्या योद्ध्याबरोबर हिंडत असल्यानें तिला त्यांची युद्धप्रसंगीं प्रत्यक्ष हालचाल पहातां येत असे. कित्येकदां तर ती स्वतःही युद्धांत होती याचें वर्णन मागें आलेंच आहे व पुढेंही येणार आहे. त्या प्रत्यक्ष प्रसंगांमुळें तिला युद्धविषयक ज्ञान प्राप्त झालें होतें. युद्धविषयक गोष्टी, तहनामे, करारनामे हेही तिला चांगले कळत असत. या बाबतींत प्रत्यक्ष तुकोजीची हालचाल तिच्या आज्ञेप्रमाणें असे. इतकेंच नव्हे, तर बाहेर

प्रांतांतील लोकही तिला या बाबतींत आपलें मत विचारीत. तिला युद्धाच्या भानगडी चांगल्या अवगत असत. तरी तिला एकंदरीत युद्धाचा कंटाळाच होता. होईल तितकें करून युद्धाच्या भरीस न पडतां अथवा युद्धाचा प्रसंग न आणतां ती आपला कार्यभाग साधीत असे. पण त्यावांचून आतां चालत नाहीं अशी तिची खात्री झाली, म्हणजे मग ती नाइलाजानें युद्धास आपली संमति देत असे. अशा प्रसंगीं तिचें वर्तन एखाद्या वीर स्त्रीप्रमाणें असे. याचें वर्णन प्रसंगानुसार पुढें येणारच आहे.

पेशव्यांनीं होळकरांस जी जाहागीर दिली, ती सैन्य बाळगण्यासाठीं दिली होती. पण त्या सैन्यावर पेशव्यांची प्रत्यक्ष देखरेख नसल्यानें तें सैन्य होळकरांचें झालें. हाच प्रकार पेशव्यांच्या इतर सरदारांचाही झाला. पण होळकरांचें हे सैन्य तिच्याजवळ नसे; तर तें तुकोजी जवळ असे, याचा उल्लेख मागें आलाच आहे. तिला सैन्य--सुधारणेबद्दल पुष्कळच समजे यांत शंका नाहीं. मराठे आपल्या सैन्यांत बाजारबुणग्यांची भरती फारच करीत. यामुळें त्यांचा पुष्कळसा दुर्लौकिक या खोगीरभरतीवरच अवलंबून असे. हे लोक पोटभरू असून जो अधिक पैसा देईल त्यास आपले धनी करणारे असल्यामुळें, ते वाटेल तेव्हां आपल्या एका धन्यास सोडून दुसरा धनी शोधीत. इतकेंच नव्हे, तर ते युद्धांत वाटेल तसें स्वेच्छाचारी वर्तन करीत. यामुळें मराठ्यांचा फार दुर्लौकीक झाला. असें होतें तरी मराठ्यांनीं हे बाजारबुणगे ठेवावयास कमी केलें नाहीं! यामुळें त्यांचा लौकिक कमी होऊन त्यांच्या शब्दास मान मिळेनासा झाला. अहल्याबाई पेंढारी लोकांच्या फारच विरुद्ध असून हे लोक सैन्यांत ठेवूं नयेत, असें तिचें मत होतें. म्हणून तिनें तुकोजी होळकरास

" पेंढारी लोकांस आपल्या सैन्यांत ठेवूं नकोस, कारण त्यामुळें आपला दुर्लौकिक होऊन पत नाहींशी होईल " अशा अर्थी अनेकदां पत्रें लिहिलीं आहेत. दुसरें : होळकर, शिंदे, गायकवाड, हे ज्या प्रमाणांत प्रबळ होत चालले, त्या प्रमाणांत पेशवे दुर्बळ होऊं लागले. पण ही स्थिति बाजीरावापासून तों रावसाहेब पेशव्यापर्यंत नव्हती. कारण, त्यांचें सैन्यबल भारी असल्यामुळें बाकीचे लोक त्यांना वचकून असत. त्यांच्या स्वतःच्याच मनगटांत जोर असल्यानें ते बाकीच्यांस तेव्हांच अंकित करून टाकीत. रावसाहेब पेशव्याचें पोरवय; पण त्याचा दरारा भारी असे. पानपतानंतर त्यानें उत्तर हिंदुस्थानांत फार मोठें सैन्य पाठविलें. त्यावेळीं पावसाळा जवळ आल्यानें नर्मदा, तापी, चंबल यांसारख्या प्रचंड नद्या ओलांडावयास जड जाऊं नये, म्हणून त्यानें सर्व सरदारांस लवकर कूच करावयास सांगितलें. पण महादजी बोवांनीं पेशव्यांच्या आज्ञेकडे जरा दुलक्ष करून कूच करणें लांवणीवर टाकलें. माधवराव थेऊरास जात असतां हा प्रकार त्याच्या लक्षांत आला. लागलीच तो महादजीची मुळींच भीड न धरतां त्यास म्हणाला, "पाटील, मी परत आल्यावर या तळावर जर का एक तंबू दिसला, तर तुमचा सर्व गोट लुटून जहागीरही जप्त करीन!" हें भाषण ऐकतांच पाटीलबोवांनीं लागलीच आपलें बाडबिस्तर उचललें. रावसाहेबांनंतर पेशव्यांचें हें सैन्यबल कमी झालें. यामुळें त्यांचा दरारा तितकाच कमी झाला. पेशव्यास भिणारे पूर्वींचे महादजी मग हळू हळू स्वतःच्या मनगटाच्या जोरावर पेशव्याशीं दोन हात करूं लागले! आपलें सैन्य कमी करून घेणें म्हणजे पाठीचा कणा मोडून घेणें होय. सैन्य कमी करणें हें फार घातुक आहे, असें अहल्याबाईनें पुणें दरबारांत अनेकदां कळविलें आहे. हें तिचें सैन्याबद्दलचें मत

महेश्वरच्या बातमीपत्रांतही व्यक्त झालें आहे. त्यांत पूर्वी पेशव्यास भिणारा महादजी त्यांसच डोईजड झाल्याचा उल्लेखही आहे. म्हणून आम्ही तो उतारा येथें घेतों:—

'पाटीलबावांकडील शिवाजी नारायण येथें आहेत. ते चंद्र २० रोजीं संध्याकाळीं बाईशीं बोलले जे, "पाटीलबावांनीं श्रीमंताजवळ अट घातली आहे कीं, ओसरीचा किल्ला खालीं करून द्यावा अगर नगरचा किल्ला द्यावा. या दोन्हींतून एक स्थळ दिल्याशिवाय उभयतांनींही तेथून कूच करूं नये." त्यास बाई बोलली जे, "सध्यां दोन्हींतून कोणतें स्थळ देतील?" त्यांनीं उत्तर केलें जे, "सध्यां नगर देणार. नगरचे किल्लेदारास शिवनेरचा किल्ला द्यावा असें ठरलें आहे." असें बाईनीं ऐकून घेऊन, दोंघटका मजला बोलावून, एकांतीं हें वर्तमान सांगितलें. बाई बोलली जे, "श्रीमंतांचें असें व्हावें, आणि ह्यांनीं ह्या अडी घालाव्या! वसईस इंग्रजांचा शह पडला आहे. त्या स्थळास उपद्रव करितात, आणि यांस श्रीमंतांच्या घरांत काय आहे तें आपण घेण्याची हांव सुटली आहे, असा जमाना आला! श्रीमंतांनीं कांहीं न केलें. संग्रहींची फौज व हुजरात तोडली. असो. भगवत् इच्छा! दैवाच्या गोष्टी आहेत.' *

त्याचप्रमाणें:—

'अहल्याबाई दोन चार वेळां बोलली जे, श्रीमंत फौजेची उपेक्षा करितात; परंतु गोष्ट कार्याची नाहीं. फौज चांगली पंचवीस तीस हजार जवळ असावी. हे चहूंकडून गडबड उडाली आहे. अशा समयीं आपण आपले फौजेविशीं बळकट असावें.' ‡

* महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें भाग १, पान ६८. ‡ भाग पहिला, पान २१.

यावरून सैन्याचें महत्त्व तिला उत्तम प्रकारें समजे हें उघडच आहे. अशीं उत्तम उत्तम राजकर्त्यांचीं कांहीं कांहीं लक्षणें तिच्या कारकीर्दींत बीजरूपानें सांपडतात. अहल्याबाईच्या या मताचा पुणें दरबारांत कांहीं परिणाम झाला नाहीं. यामुळें जे सरदार तेथील गादीचे पूर्ण अभिमानी होते, त्यांचे वंशज पुणें लुटावयास तयार झाले! पुणें दरबारानें सैन्य न ठेवण्याची पद्धत स्वीकारली होती. तीबद्दल अहल्याबाईनें वारंवार नापसंती व्यक्त केली, पण ती स्वतः सैन्य ठेवण्याचे भानगडीस पडली नाही, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

अहल्याबाईचें आणि तिच्या प्रजेचें आपसांत मातापुत्रांचें नातें होतें. त्या काळीं राजे लोकांनी पुढील कालाकडे दृष्टि ठेवून प्रजापालनांत लक्ष न घालतां स्वतःच्या महत्त्वाकांक्षा तृप्त करण्यांत तें घातलें. आपला स्वतःचा बडेजाव वाढवणें, स्वतःचें महत्त्व वाढवणें व केवळ स्वतःचीच भरभराट करणें हिकडे लोक लक्ष फार देत. या लोकांपैकी कांहींनीं आपल्या कारकीर्दींत प्रजेकडे लक्ष दिलें हा भाग निराळा, पण आपल्या पश्चात् प्रजेचें काय होईल हा विचार त्यांनीं केला नाहीं. प्रजाही राजास शहाणपणा शिकवूं शकते, ही गोष्ट त्या काळीं आमचे राजे शिकले नाहींत. शहाणपणाचा सर्व मक्ता सरदार लोकांनींच घेतला आहे, ह्याच समजुतीनें जणूंकाय प्रेरित होऊन ते स्वतःच्या बडेजावापेक्षां इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करूं लागले. याप्रमाणें त्या वेळीं लोक अधिक अधिक शिरजोर होऊं लागले. याचा परिणाम पुढें सवाई बाजीराव यांच्या कारकार्दींत चांगला दृष्टोत्पत्तीस आला, पण त्याचीं विष-बीजें सध्यांच पेरलीं गेलीं होतीं. हा विष-वृक्ष पुढें कसा काय वाढला, याचें ज्ञान सर्वांस आहेच; पण शेवटल्या प्रभूविषयीं अनंतफंदीचा येथें एक चुटका दिल्यावांचून राहवत नाहीं. तो म्हणतोः—

ओव्या.

वडिलांचे हातचे चाकर । त्यास न मिळे भाकर ।
अजागळ ते तूप साखर । चारून व्यर्थ पोसविले ॥ १ ॥
सत्पात्राचा त्रास मनीं । उपजे प्रभूच्या मनांतुनी ।
ज्या पुरुषास न पुसे कोणी। आधीं त्याला भजावें ॥ २ ॥
तट्ट ज्यास न मिळे कधीं । पालखी द्यावी तया आधीं ।
मडकें टाकून भांड्यांत गंधी । ताटवाट्या भोजना ॥ ३ ॥
द्रव्य देऊन आणिक आणिक । नवे तितके केले धनिक ।
जुन्याची तिंबून कणिक । राज्य आपुलें घालविलें ॥ ४ ॥
जो पायलीची खाईल क्षिप्रा । पालखी द्यावी तया विप्रा ।
निरक्षर एखाद्या विप्रा । उगाच क्षिप्रा चारावी ॥ ५ ॥
एके दिवशीं व्हावी खुशाली । स्वारीपुढें शंभर मशाली ।
एके दिवशीं जैशी निशा आली । मशाल एकही नसावी॥६॥
मेण्यांत बसावें जाऊन । कपाटें घ्यावीं लावून ।
स्वरूप कोणा न दावून । जागे किंवा निजले कळेना ॥७॥
हुताशनीच्या सुंदर गाठ्या । शेर शेर साकरांच्या पेट्या ।
विप्रकंठीं जैशा कंठ्या । उगाच घंट्या घालाव्या ॥ ८ ॥
तशाच राख्या जबरदस्त । सांभाळितां जड होती हस्त ।
दौलत लुटूनि केली फस्त । हस्त चहूंकडे फिरविला ॥ ९ ॥
तुरा शिरीं केवढा तरी । बहुचि मोठा चक्राकारी ।
हारगजरे नखरेदारी । सोंगापरी दिसावें ॥ १० ॥
हात हात रेशमी धोतरजोडे । चालतां ओझें चहूंकडे ।
आंगवस्त्र दहादां पडे । चरणीं खडे रुतताती ॥ ११ ॥
पोषाख दिधले बाजीरायें । मोच्यास पैसा कोठें आहे ।
तैसाच अनवाणी चालताहे । शास्त्री अथवा अशास्त्री॥१२॥

घडींत व्हावें क्रोधयुक्त । घडींत व्हावें आनंदभरीत ।
घडींत व्हावें कृपण बहुत ।। घडींत उदार कर्णापरी ।।१३।।
घडींत व्हावी सौम्यमुद्रा । घडींत यावा कोपरुद्रा ।
घडींत घ्यावी क्षणैक निद्रा । स्वेच्छाचारी प्रभू हा ।।१४।।

पुणें दरबारची काय किंवा इतर संस्थानाची काय, त्या वेळीं अशी स्थिति नव्हती. इतकेंच नव्हे, तर पुणें दरबारची व्यवस्था स्वतः नाना फडणीसाच्या हातीं असल्यानें त्याची अंतर्व्यवस्था टापटीपीची होती, पण मुळांत पायाच नीट नसल्यानें नानानें स्वतःच्या ह्या-तींत मात्र "खुप शर्थीनें राज्य राखलें," तेंच अहल्याबाईनें केलें. पण पुढें, सत्ता ही व्यक्तीच्या हातीं यावयाची असल्यानें व त्या व्यक्ति आपली महत्त्वाकांक्षा तृप्त करणाऱ्या असल्यानें संस्थानचा सारा जोम व्यक्तीवर अवलंबून राहिला. अशी स्थिति त्या वेळीं होती. अशा स्थितींत स्वार्थाकडे लक्ष न देतां, प्रजा हीच आपली संतती, असा विचार करणारे जे फार थोडे लोक आमच्यांत झाले, त्यांत अहल्या-बाईचें नांव निःसंशय रीतीनें आलें पाहिजे.

अहल्याबाईनें प्रजेचा पैसा आपला बडेजाव वाढविण्यांत किंवा आपली महत्त्वाकांक्षा तृप्त करण्यांत खर्च केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर तिनें प्रजेचा पैसा कधींही घेतला नाही. ( त्यांत 'नजर' घेण्याचा जो भाग आहे, तो अर्थात् वगळावयाचा. ) याबद्दल एक गोष्ट प्रसिद्ध आहे, ती अशीः--*

---

* ही गोष्ट माकलमसाहेबांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे. रा० लोक-हितवादी यांनीं "ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती" या पुस्तकांत "अह ल्याबाईचे शहाणपणा" विषयीं एक गोष्ट दिली आहे. ती याच गोष्टीचें रूपांतर आहे, किंवा ती निराळी आहे, हें कळत नाहीं. ही गोष्ट बाईंच्या आख्यायिका सांगतांना पुढें दिली आहे.

खरगोण गांवांत तापीदास व बनारसदास या नांवांचे दोघे बंधु सावकार सधन पेढीवाले होते. ते दोघेही पोटीं संतान नसतां एका मागून एक लवकरच मेले. त्यांच्याजवळ दोन लाख रुपये रोख असून तितकीच रकम लोकांकडे येणें होती. तापीदासाची बायको अहल्या-बाईकडे महेश्वरीं आली व तिनें तात्या जोगाच्या वडील भावाकरवीं बाईस कळविलें कीं, माझ्या नवऱ्यानें व दीरानें जी संपत्ति मिळविली आहे, ती मी आपल्या संरक्षणासाठीं देतें. पण अहल्याबाईनें ती घेण्याचें नाकारलें व तिला कळविलें कीं, "जर ती संपत्ति तुला नकोशी असेल तर तूं ती दानधर्मांत खर्च कर अथवा लोकोपयोगी सार्वज-निक काम करण्यांत खर्च कर. त्या योगें तुझ्या नवऱ्याचें नांव तरी मागें राहील."

तापीदासाच्या बायकोस तें ह्मणणें मानवलें. तिनें खरगोणासच नदीकांठीं एक घाट बांधून त्यावर गणपतीचें देवालय बांधविलें. हीं दोन्ही कामें अहल्याबाईनें प्रजेचा पैसा आपल्यासाठीं घेतला नाहीं, याचें स्मारक ह्मणून अजून दिसतात.

अहल्याबाईंत द्रव्य तृष्णा मुळींच वास करीत नसल्यानें तिनें प्रजेस बुडवून आपला खजीना कधींही वाढविला नाहीं. त्या वेळचे इतर राजे आपलें राज्य वाढवीत व प्रजेचें संरक्षणही करीत. पण या सर्व गोष्टींत आपला बडेजाव वाढावा, हा त्यांचा हेतु होता. प्रजासंरक्षण करण्यांत त्यांचा हेतु वात्सल्य नसून लोभ होता. ते लोक स्वतःच्या सुखासाठीं राज्य करीत. आपला जन्म प्रजेसाठीं आहे, अशी त्यांची भावना नसून प्रजा आपल्यासाठीं आहे, ही त्यांची भावना होती. खाटीक हा ढोरांचें मांस वाढण्यास्तव त्यांस ज्या उद्देशानें पोसतो, त्याच उद्देशानें ते आपल्या प्रजेचें संरक्षण करीत. पण जिचा आत्मा

प्रजेच्या हितांत तादात्म्यता पावला, तिला प्रजा आणि आपण हा द्वैतभाव कोठें राहिला ? आपल्या पुत्राचा उत्कर्ष पाहून आईला जसा आनंद होतो, त्याप्रमाणेंच आपल्या प्रजेचा उत्कर्ष पाहून तिला आनंद होत असे. सावकार, वाणी, व्यापारी, जमीदार, शेतकरी इत्यादि आपली प्रजा श्रीमंत होत आहे, हें पाहून त्या माउलीचें समाधान होऊन तिला आपण कृतकृत्य झालोंसें वाटे व ती प्रजेला अधिक ममतेनें वागवी. तिनें आपला खजिना मल्हाररावाप्रमाणें भरून तो उगीच 'वाया' दवडला नाहीं. अशा राज्ञीला आजही देवी, साध्वी, मातोश्री, हीं उपपदें लोकांनीं लावावीं व तिच्या ठायीं असलेला आपला पूज्यभाव व्यक्त करावा, हें स्वाभाविक आहे. अहल्याबाईनें आपला पैसा दानधर्मांत खर्च केला. याबद्दल शेवटल्या भागांत विवरण केलें असल्यामुळें तो विषय येथें आणणें बरें नव्हे.

अहल्याबाईजवळ जाती व वर्णभेद नसे. ती ब्राह्मणांस पूज्य मानी हा भाग निराळा, तथापि तिच्यांत कोणच्याही जातीबद्दल दुराग्रह अथवा मत्सरभाव नव्हता. ती आपल्या सर्व प्रजजनांस सारख्याच रीतीनें वागवी. निजामशाहीसारख्या परराज्यांतले मुसलमान लोकही पुष्कळदां " आह्मी तुमच्या राज्यांत राहावयास येतों," असें तिला सांगत. टिपूच्या राज्यांतले ब्राह्मण महेश्वरांत आल्याचा उल्लेख महेश्वरच्या बातमीपत्रांतही आहे. त्यांत ह्मटलें आहे—

टिपू, हैदरखान याचा लेक, विजापुरचें ठाणें घेऊन, पादशहा आपण ह्मणवून, गज सवा गजाचा व मोहर पंधरा माशांची व रुपया एकवीस माशांचा केला, ह्मणून त्या प्रांतींचे ब्राह्मण येथें आले, त्यांनीं वर्तमान सांगितलें. भाग २ रा, पृष्ठ ४७.

यावरून तिची प्रजा किती सुखी होती हें दिसतें.

भाग आठवा.

# अहल्याबाई आणि तुकोजी.

विधिनैवोपनीतस्त्वं चक्षुर्विषयमागतः ।
अपि प्राणानहं जह्यां न तु त्वां शरणागतम् ॥६॥*

मृच्छकटीक, अंक ७.

गेल्याचे मागील भागांत (पान १०२) सांगितलेंच आहे कीं, अहल्याबाईस धर्मशास्त्रदृष्टया राज्यासनावर बसतां येत नसल्या कारणानें तिनें सुभेदारीवर तुकोजीचें नांव लागू केलें. तुकोजी होळकर आणि मल्हारराव यांचें नातें होतें किंवा नाहीं, हें सांगतां येणें फारच कठीण आहे. तथापि या उभयतांचें जवळचें नातें नव्हतें, इतकें मात्र बरेंच निश्चयपूर्वक सांगतां येईलसें वाटतें. मल्हारावाच्या मृत्युप्रसंगीं (पान ७३) "मी चाकर मनुष्य—" इत्यादि तुकोजीनें काढलेले उद्गार वाचून असें

* दैवेंचि गांठ पडली, आतां मी मन तुझें न मोडीन ॥
सोडीन प्राणातें, परि तुज शरणागता न सोडीन ॥

परशुरामपंत.

वाटतें कीं, त्यांचें जवळचें नातें खास नसावें. "त्याचप्रमाणें तुकोजी बावा हे माझे हातचे कामास लावलेले आहेत," हे अहल्याबाईचे उद्गार ( पान ३९ ) वरील विधानास आणखी बळकटी आणतात. अशा प्रकारचे आधार आणखीही देतां येतील. तुकोजी होळकर हा मल्हाररावाच्या नात्याचा नव्हता असें मालकमही ह्मणतो.† पण होळकरांच्या घराण्याची जी एक वंशावळ पहाण्यांत येते, तींत तुकोजीचा आणि थोरल्या सुभेदाराचा संबंध जोडलेला दिसतो. ती वंशावळ—

मल्हारजी.

| | |
|---|---|
| महाजी | हिंगोजी |
| सेवाजी | खंडोजी |
| बीराजी | मल्हारराव |
| जानूजी | खंडेराव ( पत्नी अहल्याबाई ) |
| तुकोजी | |

या वंशावळीवरून तुकोजी हा मल्हाररावाचा नातू लागतो. पण ही वंशावळ बरीच अलीकडची असल्यानें तिच्या खरेपणाबद्दल शंका येते. महेश्वरास जी वंशावळ सांपडली तींत वरील नांवें

† As this chief is the grand-father of the representative of the house of Holkar, he is always termed by the present minister and others, a relative of the great Mulhar Row; but this is not the fact. ( Vol. 1, PP. 163 ).

नाहींत. "पेशव्यांच्या शकावलींत" तर स्पष्ट म्हटलें आहे कीं, "असें सांगून आपला **पालक पुत्र** तुकोजी याजबरोबर वीस हजार फौज देऊन, शिंद्याजवळ जाऊन, मल्हारराव देशीं आले." * यावरून व मालकम साहेबांच्या लिहिण्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, मल्हारराव व तुकोजी यांचें कांहीं नातें नसावें. या तुकोजीच्या मुलाचें जेव्हां लग्न झालें, तेव्हां केलेला पिढीचा उच्चारही लक्षांत घेण्यासारखा आहे. या संबंधीं महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत लिहिलें आहे—

राजेश्री मल्हारराव होळकर यांचे लग्न माघ वद्य ४ शुक्रवारीं सायंकाळचें लागलें. अहल्याबाई यांचे बंधु महादजी शिंदे यांच्या लेकीची लेक, इच्याशीं लग्न लावलें त्या वेळीं पिढीचा उच्चार येणें-प्रमाणें केला:—

१ मल्हारजी होळकर.
१ खंडेराव होळकर.
१ मालराव होळकर यांचे पुत्र मल्हारराव.

येणेंप्रमाणें ब्राह्मणाकडून बोलविलें आहे.

भाग २ रा, पृष्ठ १४२.

यावरून हेंही दिसून येईल कीं, तुकोजीचें ‡ दत्तविधानही झालें नाहीं. तथापि तो मल्हाररावाचा पुत्र असें समजून त्याच्या नांवें

---

* खंड २ रा, पृष्ठ १४९.

‡ होळकरांच्या वंशावळींत म्हटलें आहे कीं, "पुढें वंश नाहीं असें जाणून अहल्याबाई यांणीं जानोजी बावाचा मुलगा नामें तुकोजी याजला वोटींत घेऊन गादीवर बसविलें." ह्या वंशावळीस असें म्हणावयास काय आधार आहे, तें समजत नाहीं. या विषयाचा स्थलसंकोचास्तव येथें ऊहापोह करतां येत नाहीं.

सुभेदारी चालली यांत शंका नाहीं. रावबहादूर वाड यांनीं तयार केलेल्या " पेशव्यांच्या डायरींत " पुढील मजकूर आहे—

'तुकोजी बिन मल्हारजी होळकर यांनीं हुजूर मौजे थेऊर, तर्फ सांडस, प्रांत पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, आपले तीर्थरूप मल्हारजी होळकर मौजे अलमपूर, परगणे वोरच्छा, तालुके झांशी येथें कैलासवासी जाहले.'

**सवाई माधवराव पेशवे** व्हॉल्युम १, पृष्ठ २२१.

मल्हाररावानें आपले जे जातभाई माळव्यांत आणले, त्यांपैकींच तुकोजी हा एक होता. तुकोजी हा शिपाई गडी म्हणून त्याची मल्हाररावांजवळ मोठी मान-मान्यता होती. यामुळें सुभेदारानें त्याच्याकडे हुजूर पागेचें काम सोंपविलें होतें. त्या वेळीं त्याचा असा मोठा लौकिक होता कीं, तो मोठा साधा, सरळ, भोळा व शिपाई गडी आहे. व हाच लौकिक त्यानें जन्मभर कायम ठेविला. त्यानें सुभेदारांच्या हाताखालीं मोठमोठीं कामें करून त्याची मोठी कृपा संपादन केली होती. मल्हारजीही त्याच्यावर किती मेहेरनजर ठेवी व त्याचा त्याच्यावर किती विश्वास होता, हें त्यानें अंतसमयीं त्याच्या हातांत आपल्या नातवाचा हात दिला, यावरून दिसतें. त्याच्यावर ज्याप्रमाणें मल्हारजीची मेहेरबानगी व विश्वास होता, त्याचप्रमाणें तो अहल्याबाईचाही होता. तिनें त्याच्यावर पुष्कळसा अधिकार सोंपविला. तुकोजीच्या संबंधानें प्रशस्तींत म्हटलें आहे:----

**शूरो योधगणे सदा हि विजितो मल्हारिरावप्रिये**
**धर्मिष्ठो द्विजदेवभक्तिनिरतः ख्यातो महीमण्डले ॥**
**सान्यो भूपतिमण्डलीषु सततं मन्त्रार्थज्ञानोचितः**
**शास्ता शस्त्रकलासु योऽतिनिपुणः श्रीमान् तुकूजीनृपः १॥**

श्रीम्हाळसापतिपदाब्जनिविष्टचेता
मल्हारिरावपदसंस्थितभाग्यशीलः ॥
वीराहिवीर इति यो हि तुकूजिनामा
नित्याश्रयोथ पृथुराजसमानलीलः ॥ २ ॥
श्रीमन्मल्हारिरावस्य स्नुषा या पुण्यकारिणी ॥
तस्याः पुत्रो यमः साक्षात्सदाद्वेषपरायणः ॥ ३॥
विनयावनतः सम्यक् स्वामिनीभक्तितत्परः ।
मानी शूरतमो नित्यं तुकूजी विजितो भनः ॥ ४ ॥

या उताऱ्यावरून तुकोजीची बरीच योग्यता लक्षांत येईल. हा भाग खुशालीरामानें अहल्याबाईसमोरच लिहिला आहे. तुकोजीनें अहल्याबाईशीं जर कृतघ्नपणाचें वर्तन केलें असतें, तर त्यानें आपली लेखणी इतकी सैल सोडली नसती, हें खचित आहे.

तुकोजीची अहल्याबाईच्या ठिकाणीं अत्यंत श्रद्धा होती. तो तिच्यापेक्षां दोन तीन वर्षांनीं मोठाच होता. तथापि तो तिला ' आई ' असें म्हणे, व त्याचें वर्तन बाईसाहेबांशीं दासानुदासासारखें असे. तो तिला आईप्रमाणें मानी; पण तो आपल्यापेक्षां वडील असल्यानें अहल्याबाई त्यास मल्हाररावाचा पुत्र समजे. राजमुद्रेवरही ' खंडोजीसुत तुकोजी होळकर ' असें नांव नसून

**'श्रीम्हाळसाकांतचरणीं तत्पर-मल्हारजीसुत तुकोजी होळकर'**

असें होतें.

या मुद्रेचें काम अहल्याबाईच्या सांगण्यावरून झालें होतें, हें येथें सांगितलें पाहिजे. तिनें आपणांस ह्या योग्यतेस चढविलें व तिचा आपणावर पूर्ण विश्वास आहे, इतक्यांतच तुकोजीचें समाधान असे.

त्यानें तिच्याशीं प्रथमपासून जें धोरण ठेविलें होतें, तें कधींही बदललें नाहीं. अहल्याबाईनें आपण होऊनच त्याची निवड केली होती म्हणून ती त्याचा बडेजाव करी. ह्यावरून तिनें त्याचें डोईजड प्रस्थ केलें होतें, असें मुळींच नव्हे; तर प्रसंग पडल्यास तिनें त्याची चांगली खरडपट्टी काढण्यास मुळींच कमी केलें नाहीं. तुकोजीनें देवीदास सावकराच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोस दत्तक घेण्याचा अधिकार न देतां तिचा ऐवज सरकारजमा करावयाचें मनांत आणलें होतें, तेव्हां तिनें त्याची लवमात्र भीड न धरतां चांगली कानउघाडणी केली.

अहल्याबाई आणि तुकोजी होळकर हे दोघेही कामकाज पाहूं लागल्यापासून संस्थानच्या कामाची दोन ठिकाणीं विभागणी झाली. तुकोजीनें सैन्य सांभाळलें. यामुळें त्याचें बहुतेक आयुष्य पेशव्यांच्या वतीनें लढण्यांत गेलें. मराठ्यांस जेव्हां जेव्हां लढाईवर जावयाचा प्रसंग येई, तेव्हां तेव्हां अहल्याबाई आपल्या तर्फेनें तुकोजी होळकरास पाठवी. तिनें त्यास निवडलें याचें मोठें कारण हेंच कीं, त्यानें आपल्या सैन्याचें आधिपत्य करावें. तो वारंवार युद्धास जात असे व सैन्यावर देखरेख ठेवी हें खरें, तथापि तो दक्षिणेकडे असला कीं, सातपुड्यापलीकडे होळकरांचा मुलुख असे, त्याचीही तोच व्यवस्था पाही. होळकरांच्या राज्याचे साधारणपणें तीन भाग पाडतां येतील. एक सातपुड्याच्या दक्षिणेकडचा; दुसरा, सातपुड्याच्या उत्तरेचा म्हणजे महेश्वरच्या आसपासचा, यास आपण मधला भाग म्हणूं; तिसरा, महेश्वरच्या पलीकडचा—राजपुतान्याच्या लगतचा, यास आपण उत्तरेकडचा भाग असें म्हणूं. या भागांतच होळकरांस खंडणी देणारे लोक रहात. तुकोजी होळकर हा जेव्हां दक्षिणेकडील भागाचें काम पहात असे, तेव्हां अहल्याबाई मधल्या भागाचें काम व उत्तरेकडील भागाचें काम

पाही. या वेळीं खंडणी देणारे लोक आपली खंडणी तिच्याकडेच पाठवीत. पण तुकोजी होळकर हा जेव्हां उत्तरेकडील भागांत असे, तेव्हां बुंदेलखंडांतील वसूल, राजपुतान्याकडील खंडण्या वगैरे काम–जें तो दक्षिणेंत असतांना अहल्याबाई पाही, तें–तो पाही. या वेळीं अहल्याबाई मध्यभागाचें व दक्षिणचें असें दोन्ही ठिकाणचें काम पाही. तो दक्षिणेंत असला कीं ती उत्तरचें काम पाही व तो उत्तरेस असला कीं ती दक्षिणचें काम पाही. पण माळव्यांतलें म्हणजे मध्यगाभाचें काम पहाण्याचा प्रसंग तुकोजीवर कधींही आला नाहीं. याप्रमाणें साधारणपणें त्यांची आपसांत अधिकार--विभागणी झाली होती. तुकोजी कारभार पाही, पण त्यावर देखरेख अहल्याबाईचीच होती. तथापि तो नेहमी बाहेर रहात असल्यानें, त्याला अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींखेरीज करून स्वतःच्या जबाबदारीवर बऱ्याचदां कामें करावी लागत.

अहल्याबाईनें याप्रमाणें सोय पाहून, अधिकाराची विभागणी केली, पण संस्थानचा खजिना तिनें आपल्याकडेच ठेविला होता. ही संस्थानची तिजोरी बरीच मोठी असून तिनें तिचा व्यय आपल्या प्रजेच्या व हिंदुस्थानच्या एकंदर हितार्थ केला. याशिवाय, तिच्याकडे बरीच मोठी खाजगी होती. तिचाही बंदोबस्त तीच ठेवी. ह्या खाजगीचा खर्च व तिजोरीचा खर्च ती आपल्या इच्छेप्रमाणें करी. बाकी राहिलेला जो राज्याचा भाग–ह्मणजे दौलत–त्याचें उत्पन्न एकंदर राज्याचा खर्च भागविण्यांत जाई. अहल्याबाईच्या कारकीर्दींतील जमाखर्चाचा बंदोबस्त मोठा चोख असे.

तुकोजी होळकर हा लढाईच्या कामांत फार हुशार, पण इतर कामांत साधा, छक्केपंजे न ओळखणारा व आडमुठा शिपाई गडी होता. तो

मोठा तरवारबहाद्दर व सरळमार्गी मनुष्य होता, असा त्याचा सर्वदूर लौकिक आहे. तो अहल्याबाईचा स्वभाव संभाळून तिच्याशीं मोठ्या कृतज्ञबुद्धीनें राहिला. कांहीं उपद्व्यापी मंडळींनीं त्याचें आणि अहल्याबाईचें मन कलुषित केलें होतें. असें होतें, तरी तो तिला अत्यंत पूज्य मानी. त्यांचा कांहीं काल बेबनाव झाला होता, व ही गोष्ट मालकम साहेबानेंही नमूद केली आहे. या बेबनावाचा उल्लेख बखरींत आहे. तो * असा:—

"तुकोजी होळकर इंदूरमुक्कामीं असतां बाईसाहेबांचे मनांत मोठा विकल्प आला. कारण दौलत ईश्वरइच्छेनें आपले हातें दुसऱ्याचे घरांत घातली, तथापि ( तुकोजी होळकराचा ) कारभारी माझा कारकून केला ( याचा उद्देश इतकाच कीं त्यायोगें तरी ) त्यानें मन मजकडे ओढेल. ह्मणून हा बेत केला. ( पण ) त्यानें वस्त्रें घेतांच चांचणूक दाखविली ! तेव्हां दौलतीचा आमचा संबंध अर्थांत राहिला नाहीं. इत:पर सर्व ईश्वरानें सोडविलेंच आहे. तत्पक्षीं महेश्वर नर्मदातटाक पुण्यक्षेत्र आहे, तेथें स्नानसंध्या करून सार्थकाचा विचार करावा, (असा) आमुचा मनोधर्म दौलत तुमचे स्वाधीन केलीच आहे. वडिलांचा लौकिक संरक्षण यजमान श्रीमंत यांचा लोभाचा ओघ शुष्क न पडावें यास जपावें. आमचा परामर्ष कराल न कराल याचें चेष्टित दिसतच आहे."

हे अहल्याबाईचे विचार गंगेप्रमाणें निर्मळ असून तिचा उपदेश प्रेमळ आहे. यावरून तिचा आपल्या घराण्याविषयींचा अभिमान, तिची पेशव्यांबद्दलची निष्ठा व सात्त्विक स्वभाव, यांची ओळख तेव्हांच पटते. पण अहल्याबाईचीं—

*होळकरांची कैफियत, पान ४७.

" हीं अक्षरें तुकोजी हाळकर सुभेदार यांनीं श्रवण करून आपले गालांत मारून कंपित होऊन बळकट बाईसाहेबांचे पाय धरले. (त्यांनीं) उत्तर केलें कीं, ' महाराज कैलासवासी सुभेदार असतां भाऊबंदकी एकीकडे ठेवून गुलामजादानांत[1] या वृत्तीनें हुकूम बजावित आलों. त्यांचे कूर्मदृष्टीचें[2] हें फळ. तथापि सुभेदारही हरएकविषयीं आपले भरंसियावर निश्चिंत होते. प्रसंगीं सुभेदारांचे आशीर्वादाचा अनुषंग पाहून मजला माणूस केलें. तेव्हां माझे सुभेदार व मातुश्री प्रत्यक्ष आपणच आहांत. दौलत प्रकरणीं राजकारण श्रीमंतांचें लक्ष संपादणें यांतील राखणें जोखणें कारभारी यांच्या विचारें करणें प्राप्त. परंतु आपले चरणाशीं प्रतारणेचा विचार साक्षात् आपला **मार्तंड येऊन बोलला असतां पायाशीं अंतर होणार नाहीं,** (मग) प्राण जावो किंवा राहो. ही गोष्ट महाराजांनीं खचित मनांत वागवून कूर्मदृष्टी ठेवावी. यांत दौलतीचें व माझें कल्याण. '

"या भावीं बहुत खात्री केली. मग मातुश्री साहेबांचे मनांत वागून उत्तर केलें कीं, ' बोलण्यांत अर्थ नाहीं, दिसण्यांत येईल तें खरें. बोलण्याप्रमाणें चालणें जाहलें असतां ईश्वर उपेक्षा करित नाहीं.'

' असें बोलणें मातोश्रीचें महेश्वरीं होऊन देशीचे व माळव्यांतील दरोबस्त महाल यांची देखरेख मातुश्री साहेबांकडे ठेवून कारभारास नारो गणेश यांचे भाचे मुकुंदराव हरि यांची योजना होऊन, मशारनिल्हेचें अल्प वय, तेव्हां तडजोडीचें माणूस कृष्णाजी मुऱ्हार पारनेरकर, बुळे यांचे सरदारीचे दिवाण, यांजकडे सोंप केली. नंतर मातुश्री साहेबांची आज्ञा घेऊन हिंदुस्थानांत रवाना जाहले. '

---

१. गुलामजादा=दासिपुत्र. २. कृपादृष्टी.

या उताऱ्यावरून तुकोजी होळकर हा अहल्याबाईस किती मान देत असे व तो तिची आज्ञा झेलण्यास किती तत्पर असे, हें स्पष्ट दिसून येतें. ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां आणखी एक फारच लहान पण अत्यंत महत्त्वाचा उतारा घेतों. गेल्याचे मागील भागांत आम्ही (पान ११३) शिंद्याच्या भेटीबद्दल कैफियतींतील जो उतारा दिला आहे, त्याच्याच पुढचा पुढील भाग आहे.

"जाहलें वर्तमान सांगितलें. नारो गणेश यांनीं पाटीलबावांशीं वेगळे वाटे बोलले कीं, "उभयतां सरदारांचें संमत पडेल, तर आठ दिवसांत बंदोबस्त करितों." हें बोलणें पांच विस्वे महादजीबावांसही रुचलें. मग सुभेदार यांचें मानस महादजीबावांनीं पाहिलें. (कारण ते मोठे धूर्त व धोरणी पडले. पण सुभेदार होते सरळ मार्गाचे. तशांत त्याची बाईच्या ठिकाणीं अत्यंत दांडगी निष्ठा होती. म्हणून) तेथें सुभेदारांचें एकच उत्तर पडलें कीं, "बाईसाहेबांच्या पायाशीं हरामखोरी मजकडून एकरूप व्हावयाची नाहीं. कदाचित् ढंगदोषें * करून तिंचे मनांत मजविषयींही पाप आलें असल्यास मी हात बांधून रुबरू जाईन. मग (माझा) ती प्राण घेवो वा कैदेंत ठेवो. तें मजला कबूल आहे. परंतु (माझ्याकडून) हरामखोरी माझे प्राणांत प्राण आहे, तोपर्यंत होणार नाहीं."

असा सुभेदाराचा दृढनिश्चय पाहून पाटीलबावा नारो गणेशाशीं बोलून उज्जनीस गेले.

या उताऱ्यावरून अहल्याबाईच्या ठिकाणीं तुकोजीची भक्ति किती दांडगी होती, हें स्पष्ट दिसून येतें. ही अहल्याबाईच्या ठिकाणीं

* ढंगदोष याचा अर्थ "ढवळ्याशेजारीं बांधला पोंवळा, वाण नाहीं पण गुण लागला," ह्या म्हणीसारखा आहे.

त्याची निष्ठा पाहिली कीं, तुकोजीविषयीं कोणाचेही मनांत आदर उत्पन्न होईल. मराठी राज्यांत या वेळीं चोहोंकडे भाऊबंदकी माजून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. जो तो आपल्या हितासाठीं झटत होता. पण अशा प्रकारचें वारें होळकरांच्या घराण्यास फारच थोडें लागलें होतें. व जें थोडें बहुत लागलें होतें, त्याच्या मुळाशीं इतर लोकांप्रमाणें स्वार्थ नसून प्रजाहित हेंच होतें. त्यांच्या तीस वर्षांच्या उभ्या कारकीर्दींत सांगण्यासारखे कलह अगदीं झाले नाहींत. कधीं कांहीं प्रसंगीं त्यांच्यांत गैरसमजुती उत्पन्न होवोत, पण त्यांस केव्हांही उग्र स्वरूप प्राप्त झालें नाहीं. ही गोष्ट मालकमसाहेबांसही आश्चर्यकारक वाटली. "यास्तव या उभयतांशीं ज्यांचा परिचय होता, अशा पुष्कळ लोकांपाशीं मी याबद्दल अत्यंत बारकाईनें चवकशी केली. पण आपल्याला त्यांच्या इतिहासाबद्दल ज्या गोष्टी कळतात, त्यांतील सत्यास बळकटी यावी अशीच त्यांनीं मला हकीगत सांगितली" अशा अर्थीं त्यानें उद्गार काढले आहेत.* हीं त्यांचीं आपसांत शांततेचीं वर्षें गेलीं, ही गोष्ट उभयतांसही फारच भूषणावह आहे. मात्र यावरून या उभ्या तीस वर्षांत तुकोजीचें आणि बाईचें किंचिन्मात्र भांडण झालें नाहीं, असा त्याचा शब्दशः अर्थ करावयाचा नाहीं. त्यांचें मन कांहीं काळपर्यंत कलुषित झालें होतें, पण त्यांत कांहीं फारसा अर्थ नाहीं. तुकोजीचा मुख्य कारभारी जो नारो गणेश याचें आपल्या धन्यावर प्रथम प्रथम फार वजन असे. या दिवाणानें तुकोजीचें मन आपल्या अगदीं कह्यांत ठेवलें होतें. तुकोजी हाही भोळसर मनुष्य असल्यानें त्याच्यावर नारो गणेशाचें वर्चस्व लागलेंच बसलें. आपलें हित

---

१. मालकम साहेबाचें पुस्तक, पान १७४.

कशांत आहे हें तुकोजीस मुळींच कळत नसे. तशांत त्याला दुसऱ्याच्या तंत्रानें चालण्याची संवय असल्यानें तो नारो गणेशाच्या कुटिल कारस्थानास बळी पडला. अशा प्रकारच्या ठेंचा त्याला पुष्कळ लागल्या. पण तो जात्याच समोर पाहून चालणारा असल्यानें त्याला खालीं पाहावयाचे प्रसंग अनेकदां आले आहेत. तुकोजीस अहल्याबाई-पासून कसलेंही कार्य साधावयाचें नव्हतें. कारण, त्याची अहल्या-बाईच्या ठायीं अत्यंत जाज्वल्य निष्ठा होती. पण ही निष्ठा म्हणजे राखेचें आवरण असलेल्या विस्तवाप्रमाणें होती. तुकोजीभोंवतीं भोळसरपणाचें आवरण असल्यानें त्याला नारो गणेशाचीं कारस्थानें मुळींच कळत नसत. पण तुकोजीबुवा पुरते भोळे असून त्यांना वळवावयाचें काम त्यांचा दिवाण करतो, हें अहल्याबाई पूर्णपणें जाणून होती, हें वर दिलेल्या उताऱ्यावरून सहज दिसून येईल.

तुकोजी आणि अहल्याबाई यांच्या वादाचा विषय फौजेचा खर्च हा असे. या संबंधीं बाईचें असें मत होतें कीं, सुभेदार (थोरला) हा ज्याप्रमाणें आपल्या फौजेच्या खर्चाचा बोज संस्थानावर पडूं देत नसे, त्या प्रमाणें तुकोजीनेंही करावें. पण सुभेदाराची कला तुको-जीस साधत नसल्यानें त्यानें बाईपाशीं वारंवार पैसे मागावे. हा त्यांच्या वादाचा मुख्य विषय होता. तथापि अहल्याबाई त्यास खर्चास वारंवार पाठवी. याचा उल्लेख महेश्वरदरबारच्या बातमीपत्रांत पुष्कळदां आला आहे.

पेशव्यांच्या गृहकलहास जेव्हां प्रारंभ झाला, तेव्हां नानास तुकोजीची मदत लागूं लागली. पण त्यास पैशाचा नीट पुरवठा नसल्याकारणानें तो मोठ्या कचाट्यांत सांपडला. अहल्याबाई त्यास पैशाचा पुरवठा वारंवार कां करीत नसे, याचें कारण वर सांगित-

लेंच आहे. दुसरें कारण असें कीं, तिचा पैसा दानधर्मांत व प्रजेची आबादी करण्यांत खर्च होत असे. अहल्याबाई तुकोजीस पैसा नीट देत नसे, याचें कारण तिला पैसा सांठवावयाचा होता, अथवा श्रीमंताचें कार्य हाणून पाडावयाचें होतें, अशांतला मुळींच भाग नव्हे. कारण तिची श्रीमंताच्या ठिकाणीं निष्ठा फारच दांडगी होती. याचें वर्णन अकराव्या भागांत केलेंच आहे. तथापि तें मुद्यापुरतें येथेंही केलेंच पाहिजे. तुकोजी स्वामिकार्यास जात असतां बाईच्या भेटीची इच्छा करीत होता, तेव्हां बाई ह्मणाली*—

'आपल्या घरास येयास त्यांस कागदपत्र कशास पाहिजे! तथापि आमचे भेटीस तुह्मी या, असें मी तरी कशास पत्र पाठवूं! त्यांनीं अमान्यच केलें, तर असो! मुख्य गोष्ट स्वामिकार्य आधीं. त्यांनीं पुण्यास श्रीमंतांकडेस जावें. स्वामिकार्य करून मग येथें यावें. आह्मी त्यांचेच आहों. धन्याचा संतोष राखून यावें हें उचित आहे. मग आह्मांसही भेटावें. घरही आपलें. काय सांभाळणें तें सांभाळावें. यांत उत्तम आहे, प्रस्तुतच त्यांचें मानस येथें येयाचें असल्यास चाळीस पन्नासानिशीं त्यांनीं यावें. घर त्यांचें आहे.'

याविषयीं पुढें "आख्यायिका" सांगतांना एक गोष्ट दिली आहे. यावरून तिची स्वामिनिष्ठा किती तीव्र होती, हें दिसून येतें. बाई तुकोजीस साह्य करीत नसे, यावरून तिची श्रीमंताविषयीं निष्ठा कमी झाली होती, अशांतला बिलकूल भाग नाहीं. पण बाई त्यांस पैसे पाठविण्यास कुरकुर करीत असे, हेंही कांहीं अगदीं खोटें नव्हे. या कुरकुरीचें कारण हेंच कीं, इंदूर हें 'आपलें संस्थान आहे' हा भाव तिच्या मनांत जागृत होता. त्यावेळीं सर्वांचीच स्थिति अशी असल्यानें

* महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भा. १, पान ६०.

त्याबद्दल तिला व्यक्तिविषयक दोष देणें वाजवी होणार नाहीं. बाईस हा जो पैसा पाहिजे होता, तो स्वतः साठीं अथवा खजिन्यासाठीं नको असून दानधर्मासाठीं पाहिजे होता. असो. या वेळीं तुकोजीही परभारें श्रीमंतांच्या कार्यास गेला. त्या वेळीं 'तो आपल्याकडे न येतां परभारें पेशव्याकडे गेला' म्हणून मधें विष ओतावयास लोक तयारच! याविषयीं पेशव्यांचे विठ्ठल शामराज यास पत्र* आलें आहे, तें फार वाचनीय आहे:—

'अहल्याबाईनीं तुम्हास सांगून लेहविलें त्यावरून मशारनिल्हेस लवकर बोलाविलें. सरकारमसलतीचे समई आले. परंतु त्याची व अहिल्याबाई यांची भेट झाली नाहीं.... तुकोजीबावा येथील आज्ञेवरून निघाले नाहींत. ( ते ) इंदुराहून निघाल्यावर त्यास 'येथील ( महेश्वरांत--बाईची-- ) अमर्यादा न होतां सरकार चाकरीवर न्यावें,' म्हणून अहिल्याबाईनीं तुम्हांकडून लिहविलें. त्याजवरून त्यास लिहिलें. ते येतात असें असतां, अहिल्याबाई मनांत वांकडें कां आणतात !'

वगैरे या पत्रांतील व पुढील पत्रांतील मजकूर वाचण्याजोगा आहे. त्याचप्रमाणें तुकोजीनें कांहीं कामदार दूर केले त्याबद्दल बाईस फार वाईट वाटलें. पण 'तुकोजीच्या करण्यांत घालमेल करू नये.' कारण त्यायोगें तुकोजींचा लौकिक कमी होईल. "मागें मामलतीचे घालमेली व जपत्या होऊं लागल्यास त्यास चाकरीची उमेद कैसी होईल ? (ते) सरकारांत मसलतीचे उपयोगी काय पडतील ?.... त्यास विरुद्ध वाटे असें केल्यानें सरकार काम नासतें. हें समजोन कोणतीहि घालमेल

* मराठ्यांच्या इतिहासाची साधनें, खंड १०, पान १८८.

करूंच नये"*"येथें तुम्हाविशीं दुसरा विचार नाहीं. व ते येथें आल्यावर तुमची मर्यादा करीत जा[1] असाच त्यास उपदेश होईल," हें श्रीमंताचें म्हणणें व त्यावर "....आम्ही तुम्हास सांगितलें आहे आणि आतांही सांगतों कीं, श्रीमंतांची आज्ञा आम्हांस लक्षोपलक्ष वेळ शिरसा वंद्य आहे. सरकारचें पत्र आलें त्यापासूनच आम्हीं घालमेल मना केली. एक देपाळपुर व देवळें या दोहीं महालीं कमाविसदार पहिले होते, तेच आम्हीं बहाल केले. कां कीं देपाळपुरचा कमाविसदार तीस चाळीस वर्षांचा, तो दूर करावयास कारण कांहीं नव्हतें.[2]" वगैरे बाईचे जाबसाल हे सर्व भाग मूळांतच पहावे. त्यावरून मधले लोक, मनें कलुषित कशी करतात तें दिसून येईल. व श्रीमंताची थापथूप, बाईची प्रजेबद्दल काळजी वगैरे सर्व भाग उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतील. कोणी तरी मध्यस्थ घालून बाई व तुकोजी यांचें सख्य करावें ह्याबद्दल पुष्कळ प्रयत्न झाले. पैकीं एका प्रसंगीं बाईनें काय उद्गार काढले ते सांगतों.[3]

बाईचें मानस नारोपंत आपल्या कारभारांत किमपि नसावा तत्रापि, श्रीमंत नानासाहेबांच्या व पाटीलबावांच्या विद्यमानें आपल्या मनोदयानरूप जें घडणें तें घडावें, असें मानस आहे. तुकोजीबावांस दूर करून दुसरा प्रकार करावा, असें किमपि नाहीं. ये गोष्टीचा अंतर्बाह्य पुर्तेपणें बारीक शोध करावयाचा तो केला. मुख्य नारो गणेश कारभारांत नसावे. पूर्ववत्प्रमाणें आपले आज्ञेंत चालावें.

बाईचे आणि तुकोजीचे भांडणांत नाना फडणविसानें हात घालण्याचें मनांत आणलें होतें. त्यांना बाईकडून पैशाचा नीट पुर-

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १० पा. १८८

१ म. इ. सा. खंड १०, पान १८९, २ म. द. बातमीपत्रें, भा. १, पान १००. ३ म. द. बा. भा. १, पान १९८.

बठा होत नव्हता, तशांत त्यांची बाईसंबंधीं कांहीं गैरसमजूत झाल्यानें त्यांनीं बाईविरुद्ध बाजू उचलली. त्या वेळीं, राणेखानभाई—ज्यानें पाटीलबोवास पानपतच्या होमकुंडांतून वांचवलें—यानें आपलें मत नानास कळविलें होतें तें फारच महत्त्वाचें आहे. त्यावरून बाईच्या सामर्थ्याची योग्यता सहज लक्षांत येणार आहे. राणेखानभाईच्या म्हणण्याचा इत्यर्थ हा आहे:—"नाना कदाचित् म्हणत असतील कीं, 'काय चिंता आहे? या प्रसंगीं महेश्वरास पांच हजार फौज पाठविली कीं झालें! बाईचा इतका बाऊ कशास?' पण अशा भरंवशावर जाऊं नका. तुम्ही सारे शहाणेच अहांत; पण तुमच्या सर्वांपेक्षां ती अधिक शहाणी आहे! तुम्ही तिच्याशीं पुढें कसे वागणार, याचा तिनेंही कांही विचार करून त्याप्रमाणें तजवीज केलीच असेल. ती गाफील राहणारी थोडीच आहे! म्हणून सांगावयाचें तें हेंच कीं, तुम्हांस कांही जरी करावयाचें असेल, तरी त्यांत बाईचें मनोगत राहिलें पाहिजे. यांत सुपरिणाम आहे. बाई महेश्वरीं नर्मदातीरीं आहे या भरंवशावर जाऊं नका! तिच्या हाताखालीं एक दोन जागा मातबर आहेत. तिला तुमचा जर संशय आला, तर ती कोणासच बधावयाची नाहीं. धन व बुद्धी या दोहोंची तिजजवळ समृद्धी आहे. युक्तीच्या वाटेनें व तिच्या मनोदयाप्रमाणें चालाल तर त्याचा चांगला परिणाम होईल."

नाना जेव्हां बाईच्या विरुद्ध झाले, त्या वेळीं बाईनें आपला पक्ष चांगलाच सांवरून धरला. तिची तयारी किती होती, तिचें म्हणणें किती न्यायाचें होतें, हें महादजी शिंदे व राणेखानभाई यांनीं नानास अनेकदां कळविलें. त्या म्हणण्याचा इत्यर्थ वरच्या मतांत आलाच आहे. हीं सारीं पत्रें मुळांत पाहिली पाहिजेत. त्या सर्वांचा यथासांग

सारांश देऊं म्हटलें, तरी तो प्रस्तुतच्या भागांत देणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे. नाना सरकारांतून बाईचा बंदोबस्त करणार होते. पण त्यांना जेव्हां सारा प्रकार कळला, तेव्हां त्यांस आपलें वागणें अप्रशस्त वाटलें व त्यांनीं आपला विचार सोडून दिला.

खरें पाहिलें तर बाई आणि तुकोजी यांचा वास्तविक विरोध चार पांच महत्त्वाच्या प्रकरणांत झाला. त्याचा थोडक्यांत तपशील असा आहे. इ. स. १७६७ सालीं पेशव्यांनीं नारो गणेशास तुकोजीचा कारभारी नेमलें. या वेळीं बाईच्या हाताखालीं तिचा अत्यंत विश्वासांतला शिवाजी गोपाळ हा होता. याचें नांव पांचव्या भागांत आलेंच आहे. या गृहस्थापुढें आपलें तेज पडणार नाहीं, या भयानें नारो गणेशानें त्याला पुणें दरबाराकडून पुण्यास बदललें. हें काम त्यानें इतक्या शिताफीनें केलें कीं, आपल्या कृतीचा गंधही बाईस लागूं दिला नाहीं. वास्तविक पहातां शिवाजी गोपाळ हा बाईच्या हाताखालचा. त्याची बदली करावयास त्यास तिची परवानगी पाहिजे होती. पण या प्रकरणांत त्यानें तिला मुळीं मंजुरीच विचारली नाहीं. या कृत्यामुळें तिच्या मुख्य अधिकारपदास बाध आला. पण तुकोजीस इतका दूरवर पोंच नसल्यानें त्यानें या कृत्यास आपली संमति दिली. यामुळें उभयतांत विरोध आला. पुढें इ. स. १७७५ त राघोबाचें कारस्थान झालें. त्यांत ही स्वारी आपल्या मालकासह शिरली! पुढें या कटाचा पाडाव झाल्यानें इतर लोकांबरोबर नारो गणेशास बिनभाड्याचें घर पाहावें लागलें! या दिवाणाच्या गैरहजिरींत त्याचें काम बाईच्या संमतीनें दादाजी करीत असे. दादाजीनें हें काम सहा महिने केलें. पण त्याच्या गोत्राचा तुकोजीशीं मेळ पटेना. हें पाहून नारो गणेशास बंदीतच देव पावलासा

वाटला. त्यानें पाटीलबोवांस एक लाख रुपयांची लांच देऊन आपली सुटका करून घेतली! इतकेंच नव्हे, तर त्याच्याच सूत्रानें व वशित्यानें तो पुनः पूर्वपदीं विराजमान झाला! पण या सर्व गोष्टींची खबर तर बाईस दिली नाहींच, मग तिची संमति घेणें लांबच राहिलें! तुकोजीच्या या अज्ञानपणामुळें त्याच्याकडून बाईविषयीं मर्यादातिक्रमण झालें, व त्यामुळें या उभयतांच्या विरोधाचा दुसरा प्रसंग आला. त्यांच्या विरोधाचा तिसरा प्रसंगः–इ स. १७७५–८२ मराठ्यांच्या पहिल्या युद्धांत होळकरांच्या सैन्याचा खर्च रास्त प्रमाणाबाहेर झाला. तेव्हां त्यास मर्यादा घालणें, हें अर्थात् बाईस भाग पडलें. पण या प्रसंगीं ही मोहीम ऐन रंगावर आल्या कारणानें सध्यां सैन्यांत काटकसर करणें, म्हणजे अपजय होण्याची फार भीति होती. म्हणून ती काटकसर पुणें दरबारास दुःसह वाटून त्यांचा रोख बाईकडे वळला. वस्तुतः पाहिलें तर हा दोष पुणें दरबारचा, अथवा बाईचा नसून तो तुकोजीचें अकर्तृत्व व नारोबाचा आप्पलपोटी कावेबाजीपणा, या कारणांच्या संयोगाचें फल होता. मल्हारजीच्या फौजी खर्चाचें मान फार नेमस्त असून त्यानें त्याचा बोजा संस्थानावर पडूं दिला नाहीं. त्यामुळें खजीना भरपूर राहून प्रजेंत आबादी आबाद राही. पण तुकोजीस ती शिस्त साधत नसल्यामुळें त्यास खर्चाबद्दल वारंवार मागणी करावी लागे. व बाईस आपल्या प्रजेच्या हितास्तव त्याचा प्रतीकार करणें भाग पडे. अशा प्रसंगीं पुणें दरबारास तुकोजीची बाजू उचलून बाईविरुद्ध जाण्याचा घाट घालावा लागे. पण शेवटीं उभयतांची तडजोड करून या वादाचा निकाल लावण्यांत येई. तोच प्रसंग सध्यां आला. ह्यामुळें उभयतांत विरोध उत्पन्न झाला. याशिवाय लहानमोठे विरोधाचे प्रसंग अनेक आले.

इ. स. १७८८–९२ या काळांत उत्तर हिंदुस्थानांतील मोहिमी, लाखेरीची लढाई, नारो गणेशावर तुकोजीनें केलेली सक्ती व बेशिस्त वर्तणूक, इत्यादि प्रकरणांत त्यांचें आपसांत थोडेंबहुत वांकडें आलें. पण त्याचें स्वरूप इतकें उग्र व गंभीर नसून तें विशेष लक्षांत घेण्याजोगेंही नाहीं. अशा प्रश्नांचा निकाल तडजोड करण्यांतच होत गेला. असे मतभेदाचे, पक्षाभिमानाचे व हिताहितवाचक प्रश्न राजकारणांत नेहमीं टाळतां येणें शक्य नाहीं. याची प्रचीती पहावयास दूर जावयास नको. कारण, सध्यां शांतिप्रिय सुधारलेल्या पाश्चात्य राज्यांचें राजकारण थोडें जरी पाहिलें, तरी त्यांत पक्षाभिमानाचे परिणाम रगड झालेले दिसतात. मग त्या गडबडीच्या व अस्ताव्यस्त काळांत हे वरील विरोध कांहीं प्रसंगीं हातघाईवर येऊन त्यांचें अव्यवस्थित स्वरूप दिसावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आतां एवढें खरें कीं, पाश्चात्य राजकारण बरेंच सौम्य व मर्यादित आहे. पण हा परिणाम शांतताकाळ व परिस्थिति यांचा होय. पूर्वींचा आमचा काळ नानाविध घालमेली, घडामोडी, उलटापालटी,–या व अशाच इतर गोष्टींनीं परिप्लुत असे. त्यामुळें आपल्याकडील राजकारणांचा रंग विदेशी राजकारणापुढें जरी भडक रंगाचा दिसला, तरी आपली त्यावेळची परिस्थिति लक्षांत घेतां खऱ्या वस्तुस्थितीबद्दल तज्ज्ञास भ्रम पडण्याचें कारण नाहीं.

महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत वरील गोष्टींचें जें चित्र दिसतें, तें कांहींसें भ्रामक वाटतें. सध्यांचीं वृत्तपत्रें, वर्तमानसार, एखाद्याचीं अवास्तव स्तुति, वगैरे प्रकार जितके वस्तुस्थितिदर्शक व यथार्थ असतात, तसाच भाग वरील बातमीपत्रांत पुष्कळ आहे. पाहण्यांत व ऐकण्यांत किती अंतर असतें, हें कांहीं सांगावयास नकोच. त्याचा अनुभव प्रत्येकाला असेलच. ज्या वेळीं एखाद्या प्रश्नाचा फार खल

चाललेला असतो, त्या वेळीं वातावरण क्षुब्ध होऊन दोन्ही पक्षांत वाटेल तशा अफवा सुरू होतात. हा मजकूर प्रसिद्ध वर्तमानपत्रांतही दिसतो. अशा प्रसंगीं एकाच पक्षाच्या वर्तमानपत्राच्या फायली चाळून हा मजकूर त्या काळींच लिहिलेला आहे, एवढ्या सबबीवर तो 'अस्सल' असें पुढें जर कोणी म्हणूं लागला व तो त्या मजकुरास 'इतिहासांत' टाकूं लागला, तर त्याचा विचार झाला पाहिजे. तशांत वरील बातमीपत्रांतही कांहीं मजकूर तर शुद्ध बाजारगप्पा म्हणूनच दिला आहे. पण साधार म्हणून दिलेल्या पुष्कळशा गोष्टी पक्षपात, पक्षाभिमानबुद्धि व एकतर्फी वकीली बाण्यानें लिहिलेल्या असून, त्या पुणें दरबारासंबंधीं पक्षपातीपणाच्या वाटतात. आपल्या धन्याची आवड-निवड पाहून मग पत्र लिहावयास घेतलें असें वाटतें. यामुळें त्यांतील चित्रपट बरोबर आहे, असें म्हणतां येत नाहीं. व त्यांतला शब्दार्थ वेदवाक्यतुल्य न मानतां, त्यास सत्याची कसोटी लावून त्यांतील भावार्थ पाहिला तर आम्हीं वर दिलेली स्थिति त्या पत्रांतही प्रतिबिंबित झाली आहे, हें सहज दिसून येईल.

तुकोजीच्या उदयाचा कळस मल्हारजीच्या वेळीं व त्याच्याच हाताखालीं झाला. तो अगदीं खालच्या दर्जावरून वाढतां वाढतां त्याचा दुय्यम बनला. या अवधींत त्याच्या सद्गुणांच्या विकासास मात्र अवकाश सांपडून दोष प्रगटण्याचा योग आलेला दिसत नाहीं. मल्हारजीसारख्याच्या बावनकशी कसास त्याची स्वामिसेवा चांगली उतरून तो त्याचा "पालकपुत्र" बनला. तो त्याचा "हुकुमबंद्या गुलामाप्रमाणें" एकनिष्ठ होता. त्यावर मल्हारजीची मर्जी इतकी बहाल होती कीं, त्यानें अंतकाळीं "माझें नांव व श्रीमंतांची चाकरी

तूंच करशील," असें बोलून दाखविलें. पण सुभेदाराचा हा निव्वळ श्रम होता. तुकोजीची योग्यता उपनायक होण्यापर्यंतच होती. त्याचा अवतार स्वतंत्र कर्तबगारी–फौजी किंवा मुलकी–प्रीत्यर्थ नव्हता. पण दुर्दैवानें त्याला उपनायकाचा नायक होण्याची पाळी येऊन तो त्या पदीं जातांच पदभ्रष्ट होऊं लागला. त्याचा प्रकाश सूर्यादि ताऱ्यांप्रमाणें स्वयंप्रकाशित नसून तो चंद्राप्रमाणें परप्रकाशित होता. यामुळें परप्रकाशावांचून त्याचें चालण्याजोगें नव्हतें. त्याच्यांत स्वतःचा ह्मणून जो जोम–व्यक्तिप्रभाव–होता, त्याचाही ओघ सात्त्विक प्रदेशांतून वाहत होता, असें ह्मणणें फार कठीण आहे. अशा नाजूक प्रसंगीं त्याच्या सभोंवतीं स्वार्थी, पिशुन व कुटिल मंत्रिमंडळाचा गराडा पडून नारो गणेशानें "प्रथमग्रासे मक्षिकापातः" प्रमाणें राजकीय गोष्टींत फार मोठी व अन्यायाची उपरिनिर्दिष्ट ढवळाढवळ केली. इतकेंच नव्हे, तर तुकोजीच्या पोंचटपणामुळें या चुकीची आठ वर्षांनीं दुसऱ्यांदा पुनरावृत्ति झाली ! ! तुकोजीबावा हा मुलकी व फौजी खर्चांत इतका अजाण होता कीं, त्याचा हा खर्च अवाच्या सवा होऊन त्यास या बाबींत बाईशीं घासाघीस करण्याचे प्रसंग वारंवार येत. अशा शोचनीय प्रसंगीं या हृदयशून्य व विवेकभ्रष्ट मध्यस्थांनीं पराचा कावळा करून उभयतांत वैमनस्य उत्पन्न करण्यांत आपली पुण्याई व शहाणपण खर्च केलें ! अशा प्रसंगीं त्यांचे डावपेंच ओळखून त्यांस ताळ्यावर आणण्याची अथवा निदान दूर करण्याची कर्तबगारी तुकोजींत नव्हती. त्यामुळें ही अनिष्ट बाचाबाची टाळतां येणें त्यास शक्य नव्हतें. या उभयतांच्या सामन्यासंबंधीं एक गोष्ट मोठी लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ती ही कीं, एका पक्षास नारो गणेशासारखा कुटिल मनुष्य

फौजेसह होता व दुसऱ्या पक्षास धर्म व नीति यांचें बळ होतें. पण या द्वंद्वयुद्धांत पशुबळास धर्मबळाशीं सामना करण्याचें केव्हांही धैर्य झालें नाहीं. यावरून असें उघड दिसतें कीं, तुकोजीचें मन पापभीरु असून त्याची महत्त्वाकांक्षा केव्हांही अनावर झाली नाहीं. त्याचा स्वभाव फारच सरळ व भोळा होता, पण तो पराकाष्ठेचा किंकर्तव्यतामूढ असून, त्याचें राजकीयनीतीमत्ता अथवा पापपुण्य यांबद्दलचें ज्ञान फारच कोतें होतें. दुसऱ्याचे ओंजळीनें पाणी पिण्याचा त्याच्यांतील दोष त्यास पावलोपावलीं नडे. ही परप्रत्ययनेयबुद्धि त्याच्या चांगुलपणाच्या वारंवार आड येत असल्यानें त्याच्या चांगल्या गुणांचा विकास सुभेदारानंतर झाला नाहीं. त्याच्या जीवनकार्याच्या पूर्वार्धांत (इ. स. १७४०–६६) त्याचा व त्याबरोबरच संस्थानचा जितका भौतिक उत्कर्ष झाला, तितकाच त्याच्या उत्तरार्धांत (इ. स. १७६७–९७) त्याच्या सरदारी दर्ज्याचा अपकर्ष होत जाऊन शेवटीं शेवटीं तर तो प्रथम पदावरून घसरून त्यास दुसरें पद मिळालें. तुकोजी नायक पदवीवर चढला खरा, पण स्थानमाहात्म्य व पूर्वार्जित लौकिक यांच्या साह्यानें त्यानें आपणांस कसेंबसें सावरलें;–अथवा ह्या माहात्म्यलौकिकांनीं त्याला सावरलें हें ह्मणणें अधिक सयुक्तिक होईल. पण त्याला मात्र आपलें स्थानमहात्म्य व पूर्व लौकिक यांचा सांभाळ नीटपणें करितां आला नाहीं. मग ह्या उभयतांचें संवर्धन करून तें लोकसंग्राहक करणें तर फारच दूर राहिलें. याप्रमाणें त्याच्या राजकारणाचें वर्णन झालें. आतां त्याची फौजेची कारकीर्द पाहिली, तर तिचीं पहिलीं वीस पंचवीस वर्षें कशीं बशीं गेलीं. पण शेवटी तर ती इतकी बेताल झाली कीं, तिला सांवरतां सांवरतां त्याची पुरेवाट झाली. शेवटीं बाईच्या पुण्यबलाच्या टेक्यामुळें तुकोजीच्या जीवमानापर्यंत हें फौज-

बळ व दौलत तगली. पण त्याच्यामागें घरभेदामुळें त्याला शेवटीं 'राम' ह्मणण्याचा प्रसंग आला!

रामचंद्र निळकंठ, प्रल्हाद निराजी वगैरे पुरुष हे ज्याप्रमाणें आपल्या काळचे—राजारामाच्या काळीं--साधक कोटींतील प्रतिनिधि झाले, त्याचप्रमाणें नारो गणेशाच्या वर्गातले कामगार हे प्रस्तुत काळचे बाधक कोटींतील प्रतिनिधि होत, असें ह्मणावयास हरकत दिसत नाहीं.

नारोबा हा मोठा मासलेवाईक कुटिल पुरुष होता. आपल्या मालकास हातांतलें खेळणें करून त्याला बोटावर नाचविण्याची कला त्यास अप्रतीम साधली होती. तो जोंपर्यंत कामावर होता, तोंपर्यंत बाई व तुकोजी यांच्यांत यादवी माजविण्यास तो कायावाचेंमनेंकरून झटला, व दोघांनाही भुरळ पाडून त्या उभयतांचे आपण हितकर्ते व हिताचिंतक आहोंत असें दाखविण्यांत त्यानें आपल्या मतलबी वेदांताची शर्थ केली. पण बाई त्याच्या बारशास जेवली असल्यानें ती मुळींच फसली नाहीं. तथापि तुकोजी मात्र ती सावध करीत असतांही बऱ्याच पेचांत आला. या कामांत नारोबास तात्पुरतें यश आलें, तरी तें फारसें टिकलें नाहीं, व त्यास शेवटी हार घेणें भाग पडे. पण ही मशकाप्रणें घाणीवर बसावयाची त्याची द्वाड खोड कधींही गेली नाहीं. राघोबा व नारोबा यांचें घरभेदूपणाचें एकच गोत्र असल्यानें तो भरारीच्या राज्यघातकी कटांत जाऊन मिळाला; इतकेच नव्हे, तर त्यानें आपल्याबरोबर आपल्या मालकासही खेंचलें! पण पाटीलबोवानें तुकोजीस या कचाटींतून मोठ्या शिताफीनें सोडवून त्यास सरळ मार्गास लावलें. *

* पाटीलबोवांनीं तुकोजीस अनेक प्रसंगीं उपदेशाचे शब्द सांगितले.

यात्रमाणें नारोबाचें चरित्र पाहतां त्यानें आपला राजकारणीं पूर्वज गंगोबा याचें स्वामिद्रोहविषयक चरित्र एकनिष्ठेनें आचरिलें यांत संशय नाहीं. या कामांत हे दोघे एका माळेचे मणी होते. पण गंगोबाचा कार्यप्रभाव, तेज, व्यवहारदक्षता, चातुर्य, धूर्तता व धोरण हीं नारोबांत तितकीं नव्हतीं, म्हणून त्याचा गंगोबाइतका निभाव लागला नाहीं. इतकेंच नव्हे, तर नारोबाचा अंतही अत्यंत दैन्यदशेंतच झाला! गंगोबाचा लौकिक सर्वतोपरी गेलाच, पण त्याच्या मागें त्याचा देह तरी सुमारें दहा अकरा वर्षें मोकळा होता. पण नारोबाचा लौकिक झाल्यानंतर त्याचा देह दीड दोन वर्षांतच बंदिवासांत पडला! यापूर्वी कांहीं काळ तो पाटीलबोवांच्या मोह-जाळ्यांत फसून अडकला असतांना, त्याला तुकोजीनें पकडलें. मग

---

त्यांपैकीं एके प्रसंगींचें त्यांचें भाषण सारांशानें सांगतों. "पहिले मल्हारबा व राणोजी शिंदे हे दोघे एक विचारानें व एकनिष्ठपणें सेवा करून मातबरीस आले व कीर्तीस पात्र झाले. त्या थोर पुरुषांचे तुम्ही आम्ही वंशज. त्यांच्या-प्रमाणें एकनिष्ठपणें सेवा करावी. मल्हारबाची रीत ही कीं, सरकारचाकरी चांगली करावी. जें काम धन्याच्यानें होत नाहीं तें काम करून दाखवावें. मग मागणें तें मागावें. धन्याचे विरुद्ध कांहीं करूं नये. हें सारें तुम्हांला ठाऊक असून तुम्ही खुळांत शिरतां हें चांगलें नव्हे. खावंदाविरुद्ध वागल्यानें कोणाचाही निभाव लागला नाहीं. पहिल्यापासून शिंदे होळकर यांचा जोडफळांचा सांधा एक विचारें चालेल तसे तुम्ही आम्ही होतों. पण आतां आमची दृष्टि वडि-लांचे नीतीवर व तुम्ही विरुद्ध मार्ग धरला, तेव्हां द्वैत वाढलें. एक तुम्ही बग-लेस मारावे आणि एक आम्हीं मारावे, व परस्परांत याप्रमाणें विरुद्धें वाढवावीं, हीं परिणामें शुद्धाचीं नव्हत. जेणेंकरून इहलोकीं कीर्ति व परलोकीं गति त्या, गोष्टी कराव्या. उत्तम पक्ष आम्ही म्हणतों त्याप्रमाणें—म्हणजे वडिलांचे निष्ठेप्रमाणें निश्चय करून आमचे मतास मिळावें. हा सनातन राजमार्ग...राज्याचा नाश झाल्यावर तुमच्या आमच्या दौलती कोठें राहतील? खुळास मिळून नाशाचे निमित्तधारी होतां...

मात्र तुकोजी पूर्णपणें जागा झाला! त्याला बाईच्या गुरुमंत्राची ओळख पूर्णपणें पटली! त्याच्या डोळ्यांत कडक अंजन पडलें. पण आतां " बैल गेला झोपा केला " अशी गत झाली. बाईच्या सावधानी सूचक मंत्रोपदेशानें त्याला इतकें कळलें नाहीं. पण आपल्या या दिवाण बहाद्दरानें आपणांस सफाय लुटलें व बुडविलें याचें इंगित त्याला आतां कळून त्याच्या अंतर्यामीं एकदम प्रकाश पडला! पण हा झालेला नाश आतां भरून काढणें त्याला अशक्य झालें. कारण, ती वेळ केव्हांच निघून गेली होती. ह्मणून ' शेषं कोपेन पूरयेत् ' याचा प्रयोग त्यानें नारोबावर इतक्या अविचारानें व असभ्य रीतीनें केला कीं, त्यामुळें त्याची " जीविताशाऽपि दुर्लभा " होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. त्याच्या दुर्दशेस पारावार नाहींसा होऊन त्याचे हाल कुत्रें खाईना! चोहोंकडे हाहाकार उडाला. तेव्हां ज्या साध्वीविरुद्ध आतांपर्यंत कारस्थानें रचण्यांत त्याचा जन्म गेला, तिलाच या निसरड्या पदभ्रष्टानें लिहिलें, "सांपडलों हातीं काळाचिया, आतां धावणें, न धांवलांत तर प्राण वांचत नाहीं!" आणि त्याचे सर्व मागील अपराध पोटांत घालून तीच शेवटीं त्याच्या रक्षणार्थ धांवली व प्रस्तुतच्या पेंचांतून त्याला बाहेर काढलें. तिनें तुकोजीच्या बेशिस्त व असभ्य देहदंडाचा फारच कडक रीतीनें निषेध करून त्यास :" ज्याचा त्यापरी राजदंड " करण्याची राजाज्ञा दिली. तेव्हां या दिवाणाला पंधरा लाख रुपये दंड व आजन्म बंदिवास ही शिक्षा झाली. व त्याची जहागीर धनदौलत वगैरे जी हातीं लागली, ती चट सारी जप्त केली. पण नारोबानें आपली ठेव मात्र गडप केली. त्याचा मुद्दा पत्ता देखील तुकोजीस लागूं दिला नाहीं तो नाहींच! असा तो बिलंद होता. त्यानें बंदींत असतांनाच मध्यंतरीं आपल्या धन्यावर

वशीकरणप्रयोग करून पाहिला. पण तो लागू पडला नाहीं, इतकेच नव्हे, तर जोरानें मागें फिरला! हें पाहतांच या वृद्ध कपीनें मरतांना देखील आपल्या मालकास उपमर्दकारक निरोप पाठविला व मग प्राण सोडला! यावरून त्यानें आत्महत्या केली असावी, असें वाटतें. पण तसा कोठें स्पष्ट उल्लेख आढळत नाहीं. अशा कर्त्या व अपकारक कामगाराचा इतके दिवस उदय व उत्कर्ष व्हावा, त्यास प्रमुखपद मिळून तें इतका काळ टिकावें, हें आमच्या राजकीय अधोगतीचें मोठें लक्षण होतें. त्या वेळीं राजकीय शरीरप्रकृति निकोप नसून तिला विलक्षण आजार झाला आहे, व त्या आजारांत तिचें पतन होणार याचीं हीं पूर्वचिन्हें होतीं.

या तुकोजी—नारो गणेश प्रकरणांत बाईचा जो कार्यभाग झाला, तो तिच्या धार्मिक स्वभावास साजेसाच होता. तिचें वर्तन—

“ **उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः** ” इत्यादि. या सर्वप्रसिद्ध वचनांत सांगितल्याप्रमाणें अथवा या भागाच्या शिरोभागीं दिलेल्या चारुदत्ताच्या उक्तीप्रमाणें होतें.

भाग नववा.

# राज्य-व्यवस्था.

(पुढें चालू.)

**देवि अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या।**
**न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥**

हे जे मोरोपंतांनीं अहल्याबाईसंबंधीं उद्गार काढले आहेत, ते आजलाही खरे आहेत. मोरोपंतांनीं आपल्याकडून 'कलिमाजि' हे शब्द जरी सावधगिरीनें घातले आहेत, तरी कविचूडामणींनीं तिचे एक एक गुण मनांत आणून तिला 'गोत्रजन्या' 'धराजन्या' असेंही म्हटलें आहे. तें कांहीं असो, पण अहल्याबाईच्या न्यायीपणाबद्दल सर्वत्र ख्याति आहे. त्या वेळीं आजच्यासारखे लेखी कायदे नव्हते. न्यायबुद्धि ही कायद्यांचीं पुस्तकें वाचून उत्पन्न होते अथवा जागृत होते, अशांतला मुळींच भाग नाहीं. पण कायद्याचीं पुस्तकें वाचून आपला पक्ष खरा आहे हें सिद्ध करावयाची बुद्धि होते, हें मात्र खरें आहे! त्या वेळीं कायद्याच्या पुस्तकांचें जरी ज्ञान नसलें, तरी सारासारविचारशक्ति ही सर्वत्र मनुष्यांच्या ठायीं वास करीत

असल्यानें मागचे लोक त्या बुद्धीचा उपयोग करून आपल्या प्रजेस न्याय देत. कारण, न्याय काय आणि अन्याय काय, ह्यांतील तीव्र भेद कळावयास सारासारविचारबुद्धीच प्रखर पाहिजे. कायदे हे तरी लेखी पुस्तकांवरून थोडेच केले आहेत! सारासारविचारशक्ति व शिक्षण यांच्या संयोगानें मनुष्यांत जी धारणशक्ति उत्पन्न होते, तिच्या परिपक्व स्थितींत कायद्यांचा जन्म होतो. अहल्याबाईची धारणाशक्ति दांडगी असल्यानें तिला योग्य काय, अयोग्य काय, हें तेव्हांच समजे. तिला अन्यायाचा मूळापासूनच तिटकारा असल्यानें ती आपलें काम उत्तम न्यायाधिशाप्रमाणें करी. तिच्या कानावर ज्या फिर्यादी येत, त्या ती जातीनें ऐकत असे. तथापि काम तुंबून राहूं नये यासाटीं व राजकार्याच्या सुलभतेसाठीं कमाविसदार, वहिवाटदार लोक नेमलेलेच असत. मल्हारजीच्या प्रखर कारकीर्दीनंतर अहल्याबाईच्या राज्यांतील अंतर्व्यवस्थेचें वर्णन करावयाचें म्हणजे तें—

स हि सर्वस्य लोकस्य युक्तदण्डतया मनः।
आददे नातिशीतोष्णो नभस्वानिव दक्षिणः ॥ ८ ॥
मन्दोत्कंठाः कृतास्तेन गुणाधिकतया गुरौ।
फलेन सहकारस्य पुष्पोद्गम इव प्रजाः ॥ ९ ॥
नयविद्भिर्नवे राज्ञि सदसच्चोपदर्शितम्।
पूर्व एवाभवत्पक्षस्तस्मिन्नाभवदुत्तरः ॥ १० ॥ *

रघुवंश, सर्ग ४.

---

* यथान्याय दंडी रघु स्वप्रजांतें, ह्मणूनी बहू आवडे तो तयांतें।
अती तीक्ष्णही सौम्यही जो न देखा, सुखा दक्षिणेचाचि दे वायु लोकां ॥८
झाला सद्गुणयुक्त तो निजपित्यापेक्षां, प्रजा यास्तव।
त्याला त्याहुनि मानुनी करिति त्या सोत्साह त्याचा स्तव; ॥

या कविकुलगुरूच्या शब्दांतच केलें पाहिजे. कारण, हें रघूचें वर्णन अहल्याबाईस शब्दशः लागू आहे.

अहल्याबाईकडे जर कोणीं जाऊं ह्मटलें, तर त्याला कसल्याही प्रकारचा प्रतिबंध नसे. इतकेंच नव्हे, तर त्याला आपलें गाऱ्हाणें आपल्या मनाप्रमाणें तिच्यापुढें सांगावयास सवड होती. ती त्याचें ह्मणणें चित्त देऊन ऐके व त्यावर आपल्याला जें कांहीं न्याय दिसेल तें ती निर्भीडपणें करी. तिच्याकडे कामाची जरी अतोनात गर्दी असली, तरी ती आपल्या प्रकृतीकडे मुळींच लक्ष न देतां कामकाज पाही. प्रजेच्या हितासाठीं आपला जन्म आहे, व प्रजाहित हेंच आपलें कर्तव्य आहे, असें ती समजत असल्याकारणानें कोणाचेंही कां काम असेना, तें तिच्याकडून निरलसपणें होत असे. आपल्या प्रजेस न्याय मिळावा ही तिची फार मोठी इच्छा होती. ब्रॅडला साहेबाला कोठेंही बेड्यांचा खळखळ आवाज ऐकूं आला कीं ज्याप्रमाणें त्याचें अंतःकरण खळवळून जाऊन त्याला असें वाटूं लागावें कीं या बेड्या आपल्याच पायांत आहेत, किंवा गुलाम हे शब्द ऐकतांच ज्याप्रमाणें लिंकनच्या जिवाचें पाणी पाणी होऊन जात असे, त्याच-प्रमाणें अन्याय हे शब्द कानीं पडतांच तिच्या जीवाचें होत असे. याप्रमाणें प्रजाहितासाठीं तत्पर असलेली बाई दारावर 'अन्यायाची' गडबड चालली असतां, आजारानें बिछान्यावर कशी बरें पडून राहील? 'अन्याय' हा शब्द ऐकला कीं, ती तात्काल फिर्याद ऐकावयास उठे.

---

पुष्पाहूनि फलीं रसालतरुच्या सोत्कंठ होती नर।
यासाठीं न दिसे तयास बघतां दृष्टांत भूमीवर ॥९॥
भलें बुरें हे जनि दोन पक्ष, नीतिज्ञ त्या दाखविती समक्ष।
त्यांतोनि आद्या रघु भूप घेई, त्यजी दुजा जाणुनि तो अपायी ॥ १०

गणेशशास्त्री लेले.

ही गोष्ट तिच्या स्वतःच्या संस्थानापुरतीच नव्हती, तर ती अन्य संस्थानांसंबंधीही आहे. याचें विवेचन मागें आलेंच आहे. तिच्या संस्थानाबाहेरचे व इतर ठिकाणचे लोक आपलें खाजगी भांडण अहल्याबाईकडे आणीत. याचा उल्लेख महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांतही आहे. त्यांतलें एक उदाहरण येथें देतों:—

'हरिपंत व सदाशिवपंत यांनीं राजश्री रघुनाथ हरी पान्होळकर यांची व त्रिंबकराव सदाशिव या उभयतांचे घरवांटणीचा पूर्वी फडशा करून ठेविला होता. त्यापैकीं पेटेचा व देवाच्या उपकर्ण्याचा लढा राहिला. त्याकरितां त्रिंबक सदाशिव झांशीस गेले, पण तेथें त्यांचा निकाल झाला नाहीं. ह्मणून ते तेथून महेश्वरास आले. येथें त्यास बाईनीं ठेवून घेतलें. हें वर्तमान रघुनाथ हरीस कळलें. यावर त्यांनीं आपल्याकडून राजश्री धोंडोपंत व नरसिंगराव जाबसालास येथें पाठविले. उभयतांचा वाद प्रतिवाद उदंडच झाला. निकाल होतोसा दिसत नाहीं. पुढें पंचाईत वे॥ राजश्री धोंडो दिक्षित पटवर्धन यांस सांगितली.'

भाग २ रा, पान १७०.

यावरून इतर संस्थानांत तिला किती मानमान्यता होती, हें कळतें. तिला आपल्या संस्थानांतील बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष पुरवूनही इतर संस्थानांतील गोष्टीकडे लक्ष पुरवितां येत होतें, यावरून तिच्या राज्यांत कोणत्या प्रमाणांत शांतता वास करीत होती, हें दिसतें. इतर संस्थानांतील लोक तिच्याकडे न्याय मागावयास येत, हें एक वेळ राहो; पण अधिकारानें तिच्यावर असलेल्या पुणें दरबारांत जर कोणास अन्याय झालासा वाटला, तर ते लोकही अहल्याबाईकडे धांव घेत ! राजाच जर प्रजेविरुद्ध उठला, तर त्यावेळीं अहल्याबा-

ईला शरण जावें असें होतें. नानांना एक दोनदां व्यापाऱ्यांची शंका येऊन त्यांनीं त्या व्यापाऱ्यांच्या जमाखर्चाच्या वह्या भर दरबारांत तपासल्या. त्यावेळीं, आपली पत जात आहे, अशा अर्थी त्या व्यापाऱ्यांनीं अहल्याबाईकडे विनंती केली. तेव्हां त्या बाईनें नानांची समजूत घातली कीं, "अशा प्रकारानें इतर व्यापाऱ्यांची पत नाहीशी होऊन तुमच्या व्यापारी मंडळास मोठा धक्का बसेल." शेवटीं नानासही बाईचें म्हणणें खरें वाटून त्यांनीं आपलें म्हणणें माघारें घेतलें. साधारणपणें असें दिसतें कीं, ज्यावेळीं आपलें कोणी ऐकत नाहीं, त्यावेळीं लोक देवाजवळ आपले गाऱ्हाणें सांगून त्यावर आपला भार टाकतात. पण असा प्रसंग येण्यापूर्वी त्या काळचे मराठी राज्यांतले लोक आपला भार अहल्याबाईवर टाकीत. तेव्हां अर्थात् लोकांनीं 'देवी अहल्याबाई' असा तिचा नांवाचा जयजयकार करावा, यांत आश्चर्य तें काय? पुणे दरबार अधिकारानें वरिष्ट होता, हें अर्थात् सिद्धच आहे. पण नैतिक दृष्टीनें पहातां अहल्याबाईनें आपल्या प्रभूवरही कडी केली, असें म्हणावयास चिंता नाहीं. अहल्याबाई ही सर्वांस आपलें मायपोट वाटे. तिच्याकडे न्याय मागावयास आलेले लोक कोणच्याही जातीचे असोत,-मित्र असोत, शत्रु असोत, तिनें त्यांच्याशीं आपपरभाव कांहीं ठेविला नाहीं. याप्रमाणें लोकहिताचे बाबतींत कनवाळु, परदुःखिताविषयीं दयाळु इतिसांत कितीसे बरें लोक असतील?

त्यावेळीं न्याय देण्याची पंचायत-पद्धत होती. त्या लोकांवर अहल्याबाईचा चांगला दाब असल्या कारणानें न्याय देणारे लोक बाईपर्यंत कागाळी जाऊं नये इकडे अधिक लक्ष पुरवीत. त्या वेळची ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे कीं, ज्या मनुष्यास न्याय हवा असे, त्यास आपला निकाल लावून घेण्यांत कसलाही खर्च करावा लागत

नसे. सध्याच्या पद्धतींत खर्च अधिक लागत असल्यानें, पैसा खर्च करावयास असमर्थ असलेले कित्येक लोक न्याय मागावयास पुढें जात नाहींत. गरिबीचे पायीं त्यांना कित्येक प्रसंगीं अपमान व शिक्षाही सोसावी लागते. अहल्याबाईचे वेळीं न्यायखातें ही उत्पन्नाची बाब नव्हती. तिच्या राज्यांत प्रजेला न्याय फुकट मिळे. राजाचा जन्म प्रजेसाठीं आहे, व प्रजापालन हें त्याचें धार्मीक कर्तव्य आहे, ही जी आमची पुरातन समजूत ती त्या बाईंत प्रमुखत्वानें वास करीत असे. तिच्या प्रत्येक कृतींत धर्माचें तत्त्व असल्यानें तिनें आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें पार पाडलेलें दिसतें, तिला भेटावयाची सर्वांस मोकळीक होती. या गोष्टीवरून आपणास भेटावयास आलेल्या मंडळीची आंत खबर लागावी म्हणून दारावर घांट बांधणारा मोगल बादशाह जो सेलीम त्याचें स्मरण होतें. तिच्याकडे कोणीही न्याय मागावयास आला, तर त्यास तिष्टत बसावें लागत नसे. तुकोजीनें युद्धसंबंधीं हालचाली उचलल्या व बाईनें अंतर्व्यवस्था चालविली. हा प्रकार—

धात्रा द्विधैव ननु धूर्जगतो विभक्ता । *

रघुवंश, सर्ग ५.

असा झाला. हा प्रजाभार तिनें चांगल्या रीतीनें उचलला. अहल्याबाई प्रजेसाठी स्वतः सहा घंटे कचेरींत बसून काम करी. याचें वर्णन पुढें बाराव्या भागांत केलेंच आहे. प्रजेचें हित आणि आपलें हित हें निराळें आहे असें ती समजत नसे. यामुळें तिच्या हातून प्रजेस

* क्षोणीरक्षणभार हा सकलही ध्यायास खांद्यावरी ।
दोघे पूरुष योजिले कमलजें,........॥

गणेशशास्त्री लेले.

चोख न्याय मिळे. प्रजेच्या हितांत ती आपलें स्वत्व इतकें विसरली कीं, क्वचित् प्रसंगीं तिच्या हातून पेशव्याशीं केलेले करारही मोडले जात. हा अर्थात् तिचा दोष होय. पण त्यावेळचे इतर लोक ज्याप्रमाणें केवळ स्वतःचा बडेजाव वाढविण्यास पेशव्यांशीं फटकून वागत, त्याप्रमाणें ती वागली नाहीं. पेशव्याशीं करार मोडण्यांत तिचा हेतु स्वार्थमय होता, असें कालत्रयीं ह्मणतां येणार नाहीं. तिनें आपल्या मनांत प्रजेबद्दल दुजेपणाचा भाव न ठेवल्यामुळें तिच्या हातून अन्यायाचें वर्तन झालें नाहीं.आपण व प्रजा हीं भिन्न आहेंत ही तिची भावना नव्हती. ही 'अहं'—मी—ची भावना उत्पन्न झाली कीं, 'माझें हित' व 'प्रजेचें हित' अशा दोन बाजू पुढें येऊन मन हें स्वाभाविकपणें 'माझ्या हिताकडे' वळून प्रजेकडे दुर्लक्ष होऊं लागतें. पण ही 'अहं'ची भावना या बाईंत मुळींच नव्हती. हरिपंततात्या आणि बाई यांच्या भेटीचें जें मागें वर्णन आलें आहे, त्यावरून हें दिसून येईल कीं, तिचें वर्तन मोठ्या मुत्सद्देगिरीचें असून तें आपल्या प्रजेस हितकारक असेंच होतें.

बाईची धारणाशक्ति व समजूत हीं फारच अवर्णनीय होती. ज्या गोष्टीचा प्रश्न उपस्थित होत असे, ती गोष्ट तिनें एकदां ऐकली कीं ती तिला चटकन् कळे. ती त्या गोष्टींतला 'राम' तेव्हांच समजत असे. यामुळें कसें कां प्रकरण असेना, ती त्यावर आपला अभिप्राय बिनचूक देई. आपला अभिप्राय व्यक्त करण्याची तिची शक्ति फार दांडगी होती. तिचे हुकूम मोठे मार्मिक असून ते उत्तम तऱ्हेनें व्यक्त केलेले असत. एके ठिकाणीं तिनें असा हुकूम दिला कीं, "अली बहादराची चूल आधीं पेटवून मग तुम्हीं आपली चूल पेटवीत जावी." हा बाईचा अभिप्राय पाहिला व त्याचप्रमाणें केसो भिकाजीनें बाईस कांहीं भीति वाटावी म्हणून श्रीमंताचें

नांव काढलें असतां तिची—‘पत्रेंहजारों ऐशीं येतात. मी काय करावें? उकळांत डोकें घातलें, यास कोठवर भिऊं?’—ही स्पष्टोक्ति पाहिली, म्हणजे त्या बाईची आपले अभिप्राय व्यक्त करण्याची पद्धत चांगलीच दिसून येते. ती ज्या ज्या प्रकरणांत म्हणून न्याय देत असे, तो सर्वांस मान्य होत असे. तिच्या न्यायीपणाबद्दल लोकांची नखशिखान्त खातरी होऊन गेली. तशांत ती जें कांहीं करते, तें केवळ परमेश्वराचें काम असें समजून करते, अशी लोकांची समजूत असल्यानें ते तिचा शब्द पवित्र मानून त्यास शिरसा मान देत. अर्थात् तिनें जो निकाल दिला, तो अवमानणें म्हणजे पाप करणें होय, अशी त्या लोकांची समजूत असावी, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तिनें जे निवाडे दिले आहेत, ते त्या वेळच्या उत्तम न्यायाधिशास शोभतील असेच आहेत. त्यावरून तिचें औदार्य, चातुर्य, व्यवहारज्ञान, निःपक्षपातीपणा व धर्मविषयक जागरूकता हे प्रकार तेव्हांच कळतील. अहल्याबाई स्वतःच म्हणत असे कीं, **“मी आज जें कांहीं सामर्थ्याच्या व सत्तेच्या बळावर करीत आहें, त्याचा मला परमेश्वरापाशीं जाब द्यावा लागेल.”** असें भाषण करणारे पायलीचे पंधरा सांपडतात; पण त्यांत अहल्याबाईसारखे जबाबदारलोक कितीसे असतात हें सांगावयास नकोच!

ती अत्यंत न्यायी होती, असें म्हटलें आहे खरें; पण त्याचा अर्थ ‘खुनास खून’ असा करावयाचा नाहीं. न्याय कशासाठीं करावयाचा याच्याकडे व लोकांनीं दुर्वृत्त नसावें याच्याकडे तिचें लक्ष असे. यामुळें पुष्कळसे गुन्हेगार लोक तिच्या हातून सुटले आहेत. तिला अनिवार राग आल्याचीं उदाहरणें फारच थोडीं आहेत. आतां आपला अगदींच इलाज चालत नाहीं, असा जेव्हां तिजवर प्रसंग येई, तेव्हांच तिला

राग येई; व तो कोणालाही येईल. ते कांहीं थोडे प्रसंग खेरीज करून, तिनें कोणाला कडक शासन केलें आहे असें कधीं झालें नाहीं. ज्या वेळीं तिचे सल्लागार लोक कडक शासन करावयाचा तिला उपदेश करीत, त्या वेळीं ही परदुःखानें तळमळणारी-धर्म व परोपकार यांत रत असणारी साध्वी म्हणे, 'ज्यावेळीं परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या जीवांचा प्राण घ्यावयाचा, त्यावेळीं आपण मर्त्यांनीं फारच सावधगिरी ठेविली पांहिजे.' या प्रसंगीं पुष्कळ वाचकांस महाराणी व्हिक्टोरिया व अमेरिकेचा परोपकारी अध्यक्ष अब्राहाम लिंकन यांचें स्मरण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांच्याही अगदीं अशाच गोष्टी आहेत. त्यांनाही त्यांचे मंत्री अशीच गळ घालीत. या लोकांचीं नांवें मात्र निराळीं, बाकी प्रसंग व उत्तरें अगदीं अशींच आहेत. महेश्वर, विलायत व अमेरिका यांत जरी अंतर असलें, तरी साधारणपणें लोकस्वभाव हा सर्वदूर सारखाच असल्यानें तोच प्रसंग आला असतां त्यांचें वर्तनही साधारणपणें एकसारखेंच व्हावयाचें.

त्या वेळीं संस्थानचे खाजगी व दौलत असे दोन फार मोठे भेद मानण्यांत येत. व ते अजूनही कांहीं प्रमाणांत आहेतच. 'खाजगी' ह्मणजे राजपत्नीच्या नांवानें असलेली व्यक्तिविषयक देणगी अथवा उत्पन्न. व 'दौलत' ह्मणजे सरकारी उत्पन्न. इंग्लंडमध्येंही राजाला 'खाजगी' असते. पण ती या प्रकारची नव्हे. तेथील राजाला वर्षाचें कांहीं उत्पन्न करून दिलें आहे, ती त्या राजाराणीची खाजगी होय. तिचा त्यानें वाटेल तसा उपयोग करावा. सरकारी पैशाचें 'मी अमूक करीन' असें जर तो ह्मणेल, तर तें कांहीं त्यास साध्य नाहीं. पण आपल्याकडे असा प्रकार नाहीं. याचें कारण, आपल्याकडे राजाची प्रजेवर अनियंत्रित सत्ता असते हें होय. इकडील राजे लोक स्वतःच्या हात-

खर्चासाठीं कांहीं घेतच, पण याशिवाय ते संस्थानचा कांहीं भाग आपल्या पत्नीच्या नांवावर टाकीत. हे राजे लोक स्वतःच्या हातखर्चातून वाटेल तसा पैसा खर्च करून केवळ आपल्याच चैनीखातर–खाजगी व्यक्ति या नात्यानें–दौलतींतलाही पैसा खर्च करीत. पेशव्यांनीं आपल्या सरदारांस जो मुलुख तोडून दिला होता, त्यावर त्यांचा मालकी नसे, हें मागेंच सांगण्यांत आलें आहे. ते सरदार लोक अर्धे उत्पन्न आपण घेत, व अर्धे पेशव्यांकडे पाठवीत. त्यांनीं नवीन मुलुख जिंकला कीं, त्याचीही हीच वाट लागत असे. यामुळें नवीन प्रांत मिळवूनही यांच्या पदरांत असें कांहीं पडेना. तें कांहीं पडावें, ह्मणून या खाजगीचा जन्म झाला! या खाजगीवर पेशव्यांचा कांहीं हक्क नसे. कारण, तें प्रकरण दौलतीचें नसून खाजगीचें होतें. व कोणाच्याही खाजगी प्रकरणांत दुसऱ्यानें हात कसा घालावा! याप्रमाणें पेशव्यांचे सरदार पेशव्यांशींच प्रतारणा करूं लागले. मल्हाररावानें सोळा कोटी रुपये खजिन्यांत टाकले ते कांहीं उगीच नव्हेत.पण ही जी खजिन्यांत भर टाकावयाची तिचा वास्तविक पाहातां उपयोग काय? त्या सोळाचे उद्यां बावीस झाले, तरी त्यापासून फायदा कोणास? खजीना पुष्कळ वाढला ह्मणजे सरकार श्रीमंत झालें, असें तर मुळींच नव्हे, पण असा खजीना वाढत गेल्यास त्यांत दोन तोटे मात्र आहेत. एक संस्थानची प्रगति बंद करणें, अथवा मागाहून एखादा उधळ्या किंवा अविचारी गादीवर बसला, तर त्याला दुर्गुणांकडे अधिक प्रवृत्त करणें, हे होत. मल्हाररावाच्या मागें अहल्याबाई अधिकारारूढ झाली, हा भाग स्वतंत्र आहे; पण त्याच्या मागें जर का मालरावबावा गादीवर येते, तर त्यांनीं आपल्या राज्यांत व राजधानींत पशूंच्या पेठाच वसविल्या असत्या,

असें त्यांच्या वृत्तांवरून ह्मणावयास फारशी चिंता नाहीं. खजिन्यांतला पैसा हें लोकांच्या परिश्रमाचें फळ होय. ह्मणून तो त्यांच्या हिताप्रीत्यर्थच खर्च करणें योग्य आहे, हें प्रत्येक न्यायी मनुष्य कबूल करील असें वाटतें. पुनः राजानें प्रजेचा पैसा प्रजेच्या कारणीं खर्च केला, तर त्यापासून पैसा अधिक मिळेल. कारण, असें केल्यानें प्रजाही प्राप्तीच्या लालसेनें आणखी मेहनत करून पैसा आणखी उत्पन्न करील व त्यायोगें राज्यासही टवटवी येईल. पैशाचा सत्कारणीं व्यय करणें म्हणजे पैसा उत्पन्न करणें होय! राजानें प्रजेचा पैसा आपला कधींही समजूं नये, तर तो प्रजेचाच समजून प्रजेच्याच हितासाठीं लावावा. हातानें सामुग्री मिळविली व ती पेटींत अथवा अन्य कोठें ठेविली, तर त्यापासून हाताचें कल्याण कधीं होणार नाहीं. ह्मणून हातानें ती सामुग्री अशाच ठिकाणीं—पोटांत—टाकली पाहिजे कीं, जेणें करून ती पुनः त्याला मिळेल. पण असें न करतां त्यानें ती जर आपल्या जवळच ठेविली अथवा अन्य कोणाला दिली, तर तिचा अपव्यय होऊन ती त्याच्या पचनीं कधींही पडणार नाहीं. त्याचप्रमाणें प्रजेच्या पैशाचें आहे. तो स्वतःचा अथवा भलत्या कोणाचा समजून उपयोग नाहीं. पण त्या वेळचे लोक राज्याचा पैसा हा प्रजेचा पैसा आहे, असें कधींच समजत नसत. जे ते आपल्यापरी खजीना भरून ठेवीत. त्यापैकीं कांहींचा पैसा त्यांच्या वंशजांनीं उधळला, व कांहींचा अन्य राजांनीं लुटला! पण अहल्याबाईनें आपल्या पैशाचा दुरुपयोग मुळींच केला नाहीं. दौलतीचा जो पैसा होता, तो तिनें प्रजासंरक्षणार्थ खर्च केला. प्रजा हें राज्याचें पोट; तें तिनें भरून राज्यास चांगलें बाळसें आणलें. इतकेंच नव्हे, तर प्रसंग पडल्यास ती खाजगींतला पैसा दौलतीच्या कामीं उपयोगांत आणी. इतर लोक

अशा वेळीं अडून बसत! अशा अडण्यानें आपलेंच अहित आहे, हें त्यांस कसें कळत नव्हतें तें हरि जाणे! एकाच मनुष्यानें दोन बायका कराव्यात, व आपलें अर्धांग एकेका अर्धांगीस वांटून द्यावें. मग एक दिवस एक अर्धांगी या मनुष्याच्या सुश्रूषेस नसतांना, दुसरीनें तें सवतीचें काम अशा सबबीवर दुसऱ्या अर्धांगाचें काम करूं नये, म्हणजे लवकरच त्यास अर्धांगवायु होऊन सवती बरोबर तिला स्वतः-सही शोक करण्याचा प्रसंग यावयाचा! मराठी राज्याची पुष्कळ अंशीं अशीच स्थिति झाली. अहल्याबाईनें आपल्या खाजगीचा पैसा आपल्या व इतर राज्यांत दानधर्मांत खर्च केला. आपल्या राज्यांत धार्मिक कार्यें करून तिनें प्रजेचें प्रेम तर संपादलेंच, पण परराज्यांत धार्मिक कृत्यें केल्यानें टिपूसारखे, जे इंग्रजांसारख्यांसही भीत नसत असे लोक व इतर मुसलमान व परधर्मी लोक यांचेंही प्रेम व पूज्य-भाव तिनें संपादन केला. त्यायोगें तिनें आपल्या राज्यासही बळकटी आणली. मुंबईस जे तिचे वकील असत, त्यांच्यापाशीं इंग्रज लोकही तिच्याबद्दल आपला आदरभाव व्यक्त करीत. असो. अहल्याबाईच्या वेळींही " दौलत " व "खाजगी " असे राज्याचे दोन भाग असत. पण तिनें त्या दोन्ही अंगांचें बेमालूम मिश्रण केलें होतें. आतां, आपल्या प्रजेचें कायमचें हित कशांत आहे, हें तिला उत्तम मुत्सद्या-प्रमाणें न कळे, तथापि तिनें आपला पैसा निर्लोभानें, निरिच्छेनें व थोर अंतःकरणानें प्रजेच्या हितास्तव, धार्मिक कृत्यास्तव व सार्व-जनिक हितास्तव खर्च केला ही गोष्ट निर्विवाद आहे. तिनें आपला ( दौलत+खाजगीचा ) पैसा सरकारी कामांत व राहिलेला ( दौल-तीचा ) पैसा एकंदर हिंदुस्थानांत सार्वजनिक कामें करण्यांत उप-योगीं आणला.

आतां सांगितलेला भेद हा एकप्रकारें सरकार आणि प्रजा यांतील भेद झाला. या उभयतांत आणखी एक प्रकारचा भेद पाहण्यांत येतो. तो एतद्देशीय काय किंवा विदेशीय काय सर्व संस्थानांतच दृष्टीस पडतो. तो भेद ह्मणजे, सरकारी काम आणि घरगुती काम यांत असलेला फरक होय. सरकारी काम कचेरींत अथवा घरींही व्हावयाचें. त्याचा संबंध फक्त संस्थानच्या कामाशीं असून त्यांत खाजगी संबंध मुळींच नसतो. पण हा प्रकार अहल्याबाईच्या वेळीं एक प्रकारें अस्तित्वांत नव्हता. तिला संस्थानच्या कामकाजाचे जे कागदपत्र येत, त्यांत सरकारी कामकाजाचा मजकूर असेच, पण त्यानंतर त्या वेळचे भोळे भावडे लोक " माझी आई ( अथवा जी कोणी व्यक्ति असेल ती ) आजारी आहे, घरांत मोठे हाल आहेत, " अशा अथवा इतर दुसऱ्याही घरगुती गोष्ट लिहीत. या कागदाचें जेव्हां बाईकडून उत्तर जाई, तेव्हां रीतीप्रमाणें सरकारी कामकाजाचें उत्तर लिहिलें जाई; नंतर त्या आजारासंबंधानें "गोमूत्रांत वीट टाकून शेक द्यावा, खाटेवर निजवावें" इत्यादि मोठ्या कळकळीचा व ममतेचा मजकूर लिहून येई! नागलवाडीच्या कमाविसदारानें अशाच प्रकारच्या एका पत्रांत लिहिलें होतें कीं, ' माझ्या पोटांत फार दुखत असतें.' ' त्या वेळीं 'पोट दुखत असल्यास आपण काय करीत असूं व आपल्यास बरें कशानें वाटे ' तो उपाय करावयास तिनें त्यास सुचविलें होतें! असा राजाचा व प्रजेचा मातापुत्राचा अथवा पितापुत्राचा संबंध अन्यत्र फारच थोड्या ठिकाणीं आढळून येईल. शाकुंतलांत सांगितल्याप्रमाणें—

**अतनुषु विभवेषु ज्ञातयः संतु नाम।**
**त्वयि तु परिसमाप्तं बन्धुकृत्यं प्रजानाम् ॥ ***

* ह्मणविति धनिकांचे बंधु लोकांत सारे। परि तुजसम नाहीं दीनबंधू असा रे॥
कृष्णशास्त्री राजवाडे.

ती खरोखरच 'दीनबंधु' होती. इतकेंच काय, पण ती आपल्या प्रजेची सख्या आईप्रमाणेंच आई होती. बाकी 'श्री मन्महाराणी मातोश्री साहेब' 'मासाहेब' ह्या कांहीं कमी सांपडत नाहींत. पण या बाई-विषयींची गोष्ट अगदीं स्वतंत्र आहे. संस्थान हें तिचें घर, प्रजा हीं मुलें, व ती स्वतः त्या प्रजेची मातोश्री होती. ती आपल्या प्रजेचा परामर्ष मोठ्या काळजीनें घेई. ती आपल्या प्रजाजनांतील पुष्कळ लोकांच्या घरीं जात असे. याबद्दल महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत रगड उल्लेख आहे. पण त्यापैकीं येथें एक अगदीं लहानसा उतारा घेतों.

'राजश्री विसाजी शामराज लांबहाते यांस दोन महिने शरीर स्वस्थ नाहीं. औषध उपाय करीत आहेत. बाईही दोन वेळां त्यांच्या परामर्षास गेली होती.'

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भा. १ पा. २१६.

मोरोपंतांनीं सुज्ञ राजाचें वर्णन केलें आहे—

**अभिषेकें जों ओले अलक शिरीं तोंचि आर्य आधीं ते ।**
**वारूनि प्रकृतीचें रंजन जे करिति कार्य आधींतें ॥**
**प्रथम स्वेंद्रियजेता तो नृप सर्वांहि पात्र होय जया ।**
**प्रणति करिति शत्रु,म्हणति कवि राज्यश्रीनिवासतोयजया॥**
**सम्यक् वर्तावें हा काम स्वमनांत जो करी धन्य ।**
**उपदेशिता हित अहित गुरु त्याला लोकसम नसे अन्य ॥**
**व्यसनातें स्पर्शेना धर्मीं रत नित्य जो बळश्रेष्ठ ।**
**सामंतापासुनि तो भय पावेना कधीं नृपश्रेष्ठ ॥**

यांतील सर्व गुण अहल्याबाईंत असल्यानें तिची कारकीर्द किती सुखाची झाली असेल, तें सांगावयास नकोच. मोरोपंतांनीं राजाचें पहिलें

कर्तव्य "स्वेंद्रियजेता" हें सांगितलें आहे. तें तर तिच्यांत उत्तम प्रकारें वास करीत असल्यानें ती आपल्या प्रजेस इतकी प्रिय झाली कीं, सांगतां सोय नाहीं. तिच्यावर लोकांचा किती विश्वास होता, त्याचप्रमाणें तिचें वाक्य म्हणजे तें वेदवाक्य कसें समजलें जाई, याचें वर्णन तर मालकम साहेबांनीं केलेच आहे. पण तिच्यावर लोकांचा विलक्षण विश्वास होता, याचें वर्णन महेश्वरच्या बातमीपत्रांतही आढळतें. त्यांत एके (भाग १ पा. ७५) ठिकाणीं असा उल्लेख आहे:—

"एके प्रसंगीं सारे मराठे व पागे मिळून बोलले जे, 'अन्यत्रासीं व शिंद्याशीं, एखादे वेळेस श्रीमंतांशीं, तुम्ही लढाई केल्यास आम्ही तुमचे चाकर आहों. तुम्हां पुढें मरूं. परंतु अहल्याबाईशीं तुम्ही लढाई करूं म्हणाल, तर आम्ही तुमचे चाकर नाहीं.'

अहल्याबाई प्रजेंत नेहमीं मिसळून, त्यांच्या सुखदुःखांत सामील होऊन आपल्या सर्व प्रजेचें प्रेम आपल्या ठायीं ओढून व अवांतर प्रदेशांत उज्ज्वल कीर्ति करून ती आपल्याच संस्थानाच्या नव्हे, तर सर्व आर्यावर्ताच्या प्रेमाचें व आदराचें केंद्रस्थान होऊन बसली.

समाजांतील व्यक्ति या नात्यानें अहल्याबाईची योग्यता फारच मोठी आहे. परस्पर प्रेमभाव वाढवून समाजास उत्तेजन देणें व त्यांच्यांत मिळून मिसळून वागणें, हे राजे लोकांत क्वचित् आढळणारे गुण तिच्यांत चांगल्याच रीतीनें वास करीत होते. वास्तविक पाहातां राजेलोक 'मी राजा' या नात्यानें प्रजेशीं अहंभावानें वागतात; पण अहल्याबाईंत अशा प्रकारचा अहंभाव नव्हता. ती आपणही तुमच्यापैकींच एक आहोंत अशा भावानें प्रजेशीं वागे. गंगा नदी इतकी पवित्र, पण तिनें आपणांत गटारें व कूप यांचा समावेश करून घेऊन

त्यांनाही आपलीच योग्यता आणली आहे. हा मोठेपणा अन्य नद्यांत नाहीं. त्यांच्या अंगीं दुसऱ्यास मोठेपणा आणण्याची योग्यता तर एकीकडेच राहो पण आपल्याशीं संबंध ठेवणारे नाले व तलाव यांचीही त्या वाढ खुंटवितात! उघडच आहे. स्वतःपाशींच मोठेपणा नाहीं, तर मग तो दुसऱ्यांस कोठून द्यावयाचा! या दोहोंत अहल्याबाईस अर्थात् भागीरथीची उपमा साजते. तिनें आपल्याबरोबर इतरांसही मोठे केलें. संतपणाचा हा जो मोठा कस तो तिला पूर्ण लागतो.

आतां अहल्याबाईच्या राजकीय धोरणाबद्दल दोन शब्द लिहून हा भाग आटोपता घेऊं.

अहल्याबाईची राज्यकर्त्री या नात्यानें योग्यता ठरवतांना, इतर कांहीं गोष्टींचा विचार आधीं केला पाहिजे. कवींनीं संसारास सागराची उपमा दिली आहे, ती यथायोग्य आहे. सागराचा ओघ ज्या प्रमाणें प्रचंड असतो, त्याचप्रमाणें या संसाराचा ओघही प्रचंडच आहे. सागराच्या प्रचंड ओघास बांध घालावयास पुष्कळ मंडळी तयार होतील, पण आमच्या मनोवृत्तीस बांध घालावयास कोणीही मिळणार नाहीं! आपण मानव लोक या परिस्थितींत पडलों आहोंत; व ती आपणाला जिकडे नेईल, तिकडे आपणाला आपल्या दुर्बलते-मुळें जावें लागतें. आतां, हा ओघ आपणास हितावह आहे काय, व तो आपणाला ज्या दिशेकडे जावयाचें त्याच दिशेकडे नेत आहे काय, याचा विचार करणारे फारच थोडे लोक असतात. ही विचार-जागृति असणें, हा एक प्रकारचा जिवंतपणाच होय. पण आपण आपला आरंभापासून तों आतांपर्यंतचा इतिहास पाहिला, आज शेंकडो वर्षांत सर्व प्रसंगांत आपण तेंच वळण वळवीत बसलों आहोंत हें जर पाहिलें, तर आपल्या वांट्यास हा जीवंतपणा जवळ

जवळ मुळींच आला नाहीं, हें कबूल केलें पाहिजे! आमच्यांत कांहीं अत्यंत थोर जीवंत महात्मे झाले, नाहींत असें नाही; पण त्यांना परिस्थिति अनुकूल नसल्यानें त्यांचें जीवित, त्यांचा उपदेश हीं लोकांपुरती जवळ जवळ तरी व्यर्थ झालीं! तुकाराम महाराजांचीं वचनें प्रभुपुत्र जीजस याच्या वचनास हार जाणारीं मुळींच नव्हेत. पण जीजसनें हजारों–काय अगणित–स्वदेशी व विदेशी लोक आपल्या पंथास लावले. पण आमच्याकडे तुकाराम महाराज हे स्वतःच देहमुक्त झाले. याचें कारण हेंच की, जीजसला जी परिस्थिति प्राप्त झाली होती, ती तुकारामबोवांस नव्हती. आपल्याकडे भास्कराचार्य, आर्यभट्ट यांच्यासारखे गणिती झाले, पण त्यांच्या ज्ञानाचा प्रकाश इकडे बेताचाच पडला! कारण, लोकांनीं तिकडे पूर्ण कानाडोळा केला. पण गॅलीलिओचें पहा. त्याच्याकडे लोकांचे डोळे लागल्यानें–त्याचा छळं झाला हा भाग निराळा व एकप्रकारें छळ झाला म्हणूनच दोन पक्षांची झुंझ होऊन–खरें ज्ञान लोकांपुढें आलें. लोक त्याचे चहाते झाले. पण अशा प्रकारची जागृति आमच्यांत नव्हती व अजूनही 'ती आहे' असें म्हणावयाची स्थिति आली नाहीं. नाहीं तर विद्यासागराचे बंगाल्यांतील प्रयत्न व विष्णुपंत पंडितासारख्यांचे इकडील प्रयत्न जेमतेमच फलयुक्त झाले नसते. आमच्याकडे तर असाही शोचनीय प्रकार दिसून येतो कीं, जो दुसऱ्यास 'ह्या मार्गास जाऊं नका' म्हणून सांगतो, तो स्वतः त्याच मार्गाला जातो! अशा परिस्थितींत जेव्हां एखादा जीवंत मनुष्य उत्पन्न होतो, तेव्हां त्याचे परिश्रम खडकावर टाकलेल्या बियाप्रमाणें निष्फळ व्हावेत ही गोष्ट सृष्टिक्रमास धरूनच आहे! आमचा स्वभाव 'गतानुगतिक' असून तो परिस्थितीबरोबर वाहणारा आहे. हा परिस्थितीचा

ओघ पालटावयास लोकांचीं मनें परिपक्व झालीं पाहिजेत. तीं परिपक्व झालीं, म्हणजे त्यांत किती सुंदर पेरणी होईल बरें ? शिवाजीच्या वेळीं हीं मनें चांगलीं परिपक्व असल्यानें त्याच्या पेरणीस सरस व सत्वर फळें आलीं. लोकांचीं मनें चांगलीं व्हावयास व तीं उच्च मार्गाकडे लागावयास संतांनीं आपलीं कामें केलीं पाहिजेत. तीं त्या वेळीं झालीं होती. ह्मणून सर्व कांहीं उत्तम प्रकारें चाललें होतें. पण यशावरून मनुष्याची योग्यता ठरवावयाची असल्यास मराठी राज्याचा बळकट पाया हां हां ह्मणतां घालणारा हाच यशस्वी व राजनीतिविशारद शिवाजी शेवटल्या बाजीरावाच्या वेळीं झाला असता, तर तो कवडीमोलाचा ठरता ! पण हा दोष शिवाजीचा ह्मणावयाचा कीं काय ? अर्थात् हा दोष त्याचा नव्हे. ह्मणून मनुष्याची योग्यता ठरवितांना, त्यावेळची परिस्थिति व त्यानें त्या वेळीं केलेला प्रयत्न, या दोन्ही गोष्टींचा पूर्णपणें विचार झाला पाहिजे. नुसता एक इकडचा व त्याच धोरणाचा दुसरीकडचा ( उदाहरणार्थ जीजस व तुकाराम ) असे दोन मनुष्य घ्यावयाचे व त्यांच्या अनुयायांच्या संख्येवरून त्यांस ' गुण ' द्यावयाचे ह्मटलें, ह्मणजे ती तुलना फारच चुकीची होईल. ह्मणून कोणत्याही मनुष्यांची तुलना करतांना अथवा त्यांची योग्यता ठरवितांना त्यांची परिस्थिति कोणच्या प्रकारची होती व त्यांनीं त्या परिस्थितींत काय काम केलें, हें पाहिलें पाहिजे. बाळाजीस शिवाजीइतकें यश आलें नाहीं, इतक्यावरूनच त्यास खालच्या पायरीवर बसवणें चुकीचें होईल. कारण, आचरण अथवा कृति करणें, इतकेंच काय तें मनुष्याचें हातचें आहे. पण पुढें यश येणें अथवा न येणें हें मात्र परिस्थितीवर अवलंबून आहे. मनुष्याची परीक्षा त्याच्या प्रयत्नास आलेल्या यशावरून ठरवितां येत नाहीं.

यास्तव परिस्थितींचा विचार आधीं झाला पाहिजे. आतां, त्या वेळची परिस्थिति पाहिली, तर ‘ नुकताच सांगितलेला जो जीवंतपणा ’ तो त्या वेळीं तर जवळ जवळ नव्हताच. अशा स्थितींत परिस्थितीचा विचार करणारा एखादाच जरी मिळाला, तरी तो फारच थोर समजावा लागतो. हेच थोर गृहस्थ जर मिळण्याची मारामार, तर परिस्थिति ओळखून ती हितावह नसल्यास त्या परिस्थितींचा प्रचंड ओघ फिरविण्याचा प्रयत्न करणारे, अर्थात वृत्तीस बांध घालणारे अत्यंत थोर अधिकारी कोठून सांपडणार ? याप्रमाणें प्रचंड ओघ अगदीं विरुद्ध दिशेस नेणारा,–लोकांची प्रवृत्ति नसतां त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांचें मन आपल्या ताब्यांत घेऊन त्यास जादूगाराप्रमाणें वाटेल तसें वळविणारा--सामर्थ्यवान् दोन चार शतकांत या पृथ्वीवर एखादाच होतो. अशा लोकांची गोष्ट सोडून दिली पाहिजे. बाकीच्या लोकांत चांगले कोण हें पाहावयाचें. तर असें म्हणावयास चिंता नाहीं कीं, ज्यास आपल्या परिस्थितीचें चांगलें ज्ञान झालें असून व आपल्या भोंवतीं असलेल्या सामुग्रीचा योग्यायोग्य दूरवर विचार करून त्यायोगें आपली टिकणारी इमारत बांधतो व आपल्या कल्पनेचा नकाशाही काढून ठेवतो, तो श्रेष्ठ पुरुषांत बसावयास लायक आहे. अकबर, शिवाजी वगैरे लोक याच वर्गांतले होत. या लोकांस परिस्थिति अनुकूल असल्यानें त्यांचें कार्य यशस्वी झालें. पुढें परचक्रें आलीं, हा भाग निराळा. बाकी, त्यांनीं घालून दिलेल्या मार्गास (नकाशास) आजही नांवें ठेवावयास फारशी जागा नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेतां, त्यांची जेवढी म्हणून स्तुति करावी, तेवढी ती थोडीच होणार आहे. बाळाजीचीही योग्यता वरील राजकीय पुरुषांच्या तोडीचीच आहे. पण त्याच्या वेळची परिस्थिति ही शिवाजीच्या परिस्थितीपेक्षां भिन्न

असल्यामुळें त्यास अनायासें सामुग्री मिळाली नाहीं. हा बाळाजीचा दोष खचित नव्हे. बाकी, त्यानें त्या वेळच्या परिस्थितींत जो मार्ग घालून दिला, त्यावरून त्यालाही फार वरच्या कोटींतच ठेवलें पाहिजे. झालें. आमच्याकडील राजकीय श्रेष्ठ लोकांची संख्या जवळ जवळ संपली. बाकीचे लोक प्रवाहाबरोबरच वाहणारे! अशा स्थितींत वरील अद्वितीय लोकांचे गुण या बाईंत शोधणें इतकेंच काय, पण त्यांची अपेक्षा करणेंही चुकीचें होईल. कारण, वरील गुण-मंडित मंडळी आमच्याकडे बोटांवर मोजण्याइतकी सांपडणार. तेथें ते गुण विवक्षित व्यक्तींत नाहींत, हा दोष त्या व्यक्तीचा नव्हे. पण तसे गुण जर कोणांत सांपडले, तर मात्र ती गोष्ट अभिमानास्पद समजली पाहिजे. वरील मंडळींनीं आमच्यांत नवीन कल्पनांचें बीजा-रोपण केलें, व त्याचा इष्ट परिणाम बराच कालपर्यंत झाला. पण बोलून चालून हा खडकाळ प्रदेश असल्यानें इकडे विचारांची उत्क्रांति कोठें होत होती? पण या वेळीं युरोपमध्यें विचारांची उत्क्रांति होत होती. तिकडे 'राजा' ची उत्क्रांती तर फारच विलक्षण होत होती. पण आमच्याकडे चहूंकडे चलनविरहित जीवित होतें. आमचें सारें लक्ष जुन्याकडे होतें. आह्मांला नवीन कल्पना पथ्यकर वाटत नव्हत्या. आमच्याकडे पौराणिक कालच्याच कल्पना उत्तम वाटत होत्या, व त्यांचा परिणाम अजूनही आहे. पण आम्ही त्या कल्पनांनाही प्रामाणिकपणें चिकटून राहिलेलों नाहीं! तें पौराणिक कालचें राजकीय ध्येय हें त्या वेळीं उत्कृष्ट समजलें गेलें होतें. राजाला आपल्या प्रत्येक कृतीबद्दल परमेश्वरा-जवळ जाब द्यावा लागतो, व प्रजेचा योगक्षेम चालवणें हें त्याचें आद्य कर्तव्य होय, या आमच्या कल्पना होत्या. त्या अहल्याबाईंत पूर्ण-पणें दिसून येतात. **राजा** ह्मणजे कोण, राज्य कशानें चिरकाल

टिकेल, असा विचार करणारे तेव्हां फारच थोडे लोक होते. तेव्हां या नवीन दृष्टीनें तिची योग्यता ठरवतां येत नाहीं. पण प्राचीन कल्पना व शिवाजी, बाळाजी यांनीं बसविलेल्या नवीन कल्पना, यांचा विचार केला तर अहल्याबाईचें राजकारण—त्यास राजकारण हा शब्दही लावणें चुकीचें होईल!—दुसऱ्या प्रतीचें होतें, हें उघड आहे. पण त्याबद्दल ती दोषास पात्र नाहीं. अहल्याबाईनें अन्नछत्रें व यासारख्याच इतर दानधर्मांत जो पैसा खर्च केला, त्याचीही मीमांसा करतांना वर सांगितलेल्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. रस्त्यांतून हिंडणाऱ्या उद्यम-जीवनविरहित देहास पोसणारीं अन्नछत्रें निर्माण करणें चांगलें, कीं ज्ञानदान देणारे अथवा स्वतःच्याच पायावर उभे राहण्यास शिकवणारे इतर व्यवसाय काढणें चांगलें. या व अशाच इतर विचारांचा त्या काळीं जन्मही न झाल्याकारणानें तिला अन्नछत्रासारख्या गोष्टींत केलेल्या दानधर्माबद्दल नांवें तर ठेवतां येतच नाहींत, पण स्वतःस जो धर्ममार्ग दिसतो त्या मार्गानेंच ती गेली, ह्मणून तिची जेवढी थोरवी गावी तेवढी थोडीच होणार आहे.

वास्तविक पहातां, कोणचीही गोष्ट आपल्यापुढें आली, तर तिचा सर्व बाजूंनीं विचार करून, तिची तसु तसु पूर्ण माहिती करून घेऊन मग त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. एखादा प्रश्न आपल्यापुढें आला, तर त्याचें कायमचें अस्तित्व कशांत आहे, याचा सांगोपांग विचार करून, त्याच्यांत कांहीं दोष असल्यास ते काढून तो सर्व प्रकारें निरोगी करावयाचा, हा खरोखर थोर व दूरदृष्टि विचार झाला. आतां दुसरा प्रकार असाः एखादी गोष्ट पुढें आली, तर तिचा सर्व बाजूंनीं विचार न करतां तात्पुरती तिची दुरुस्ती करावयाची. याचें उदाहरण असेंः एका गांवापासून दुसऱ्या गांवास गाडी

निघाली असतां वाटेंत तिच्या चाकाचा खिळा निघाला तर तेथें दुसरें कांहीं घालून गाडी सुरू करावयाची. पुनः तें निघालें तर तसेंच कांहीं घालून गाडी चालू करावयाची. हा आमचा हिंदुस्वभावच आहे. आम्ही कोणच्याही गोष्टीच्या मागें लागून तिचा 'सूड' उगवत नाहीं. या आमच्या अर्धवट स्वभावानें आमचें कायमचें नुकसान झालें आहे. उन्नतीची किल्ली म्हणजे कसाही प्रसंग आला तरी हातीं घेतलेलें काम पूर्णपणें तडीस नेणें होय. पण आम्ही लोक तात्पुरता विचार करून ती वेळ मारून नेतो व रोज अनेकदां म्हणतों, आजचा दिवस गेला, आतां उद्यां राम आहे!' हा जोंपर्यंत आमचा स्वभाव आहे, तोंपर्यंत आम्ही असेच रडे राहणार. या लोकांत जो चांगला वर्ग असतो, तो कोणाशीं भांडण, कलह द्वेष वगैरे न करतां, सुखानें राहतो. पण तो आपणास व विशेषतः आपल्या पुढील पिढीस, अधिक सुखानें राहतां कसें येईल, याचा मुळींच विचार करीत नाहीं. या वर्गांत कांहीं तर फारच तात्पुरते काम करणारे व आळशी असतात. अहल्याबाई ही दुसऱ्या वर्गांत पहिल्या प्रतीची होती. त्या वेळचे चांगलें राज्य करणारेही 'तात्पुरते' काम काढून घेणारे होते. वास्तविक पाहतां प्रवास चालला असतां आपल्या गाडीचा खिळा मध्येंच हरवला, तर चाकाची रचनाच बदलावयाची, हा विचार डोक्यांत येणारे शिवाजी किंवा अकबर हे आपणाकडे अपवादादाखल सांपडतील. हा प्रकार पाश्चात्यांमध्येंच पहावा. ते चाकाची रचना बदलतील, किंवा प्रसंग पडला तर गाडीचीही रचना बदलतील, पण खिळा हरविण्याची मागची कटकट कायमची काढतील. हाच प्राच्य व पाश्चात्य यांच्यांत मोठा भेद आहे. व तो अहल्याबाई आणि इलिझाबेथ यांच्यांत होता. आपल्याकडचे अर्धवट

लोक त्यांची राज्यकर्त्या या नात्यानें तुलना करून अहल्याबाईस इलिझाबेथच्या वरच्या पायरीवर बसवून–'असें इंग्लिश इतिहासकारांचेंही मत आहे,' असें सांगून मोकळे होतात! पण ही फारच मोठी चूक आहे. जे लोक राज्यकर्त्र्या या नात्यानें त्यांची तुलना करतात, त्यांना त्या दोघींच्याही राज्यांतलें वर्मच कळलें नाहीं. दोघींचेही राज्य करण्यांत हेतु निराळे, त्यांची राज्य करण्याची पद्धत निराळी, असें असतां त्यांची तुलना करणें हें मोठें चुकीचें आहे. कारण, तुलना करावयाची तर त्या दोहोंत साम्य तरी पाहिजे.* पण तें या राज्यकर्त्या स्त्रियांत नाही. दोघींचें प्रजेवर प्रेम होतें, दोघींना आपली प्रजा सुखी झालेली पाहिली कीं तें त्यांस आवडे, दोघींनीं सुमारें चाळीस वर्षें राज्य केलें, दोघी स्त्रिया होत्या, दोघींचाही आपल्या प्रजाजनांवर सारखाच दाब होता, दोघींनाही पूर्वाधांत दुःखांत सारखेच दिवस काढावे लागल्यानें त्यांना त्यापासून एक प्रकारचें शिक्षण मिळालें, मृत्युसमयीं दोघींचेंही वय साधारणपणें सारखें होतें,–हे व असेच इतर साम्यतेचे

---

* सर रोपर लेथब्रिज यांनीं ह्या दोघा बायांची तुलना करतांना म्हटलें आहेः—

In one particular she far excelled our celebrated Queen Elizabeth in as much as she was utterly insensible to flattery. परंतु ही तुलना राज्यकर्त्री या नात्यानें केली नसून ती नुसत्या स्तुतिप्रियतेबद्दल आहे. त्याचप्रमाणें रा० पारसनीस यांनीं एका प्रख्यात आंग्ल लेखकाच्या दिलेल्या–

'That which Akbar is among male sovereigns, is **Ahalia Baie** among female sovereigns.'—

या उताऱ्याविषयींही तसेंच म्हणतां येईल. यांत अकबर आणि अहल्याबाई यांची तुलना केलेली नाहीं. ती इकडील राज्यकर्त्या स्त्रियांत मुकुटमणि होती, हें मात्र अगदीं निर्विवाद आहे.

प्रकार त्यांच्यांत आढळतील; पण राज्यकर्त्या या नात्यानें पाहिलें, तर हे मुद्दे गौण आहेत. या दोघीही राण्यांत फारच फरक होता. अहल्याबाईच्या राजतत्त्वास धर्माचें जीवन होतें. तिनें आपले हेतु कुटिल नीति आचरून कधींही तडीस नेले नाहींत. पण इलीझाबेथ-विषयीं असें कधींही म्हणतां यावयाचें नाहीं. अहल्याबाईनें आपलें राज्य राखलें. तिला तें वाढविण्याची कधींही हांव सुटली नाहीं. पण इलिझाबेथनें आपला कारभार राज्यविस्तार करावयाच्या पद्धतींवर ठेविला. इलिझाबेथचें राज्य राष्ट्रीय दृष्टीनें चाललें होतें; पण त्या दृष्टीचा आमच्याकडे तेव्हां फारसा उदयही झाला नव्हता. त्यांची व्यक्ति या दृष्टीनें तुलना करतां, अहल्याबाई फारच श्रेष्ठ होती. तिनें आपल्या सदाचरणाच्या बळावर राज्य केलें, इलिझाबेथनें तें ज्ञानाच्या बळावर केलें. त्यांची राज्य करण्याची जी पद्धत होती, तींत दक्षिण उत्तर ध्रुवांप्रमाणें अंतर होतें. आपल्या राज्यास कायमची बळकटी कशानें येईल, याचा विचार करून त्याप्रमाणें इलिझाबेथनें उपाय अमलांत आणले. अहल्याबाईनें ह्या दृष्टीनें राज्यच केलें नाहीं. आपल्या हातीं राज्य आलें व तें चालविणें हें आपलें कर्तव्य आहे, या दृष्टीनें तिनें—त्या सात्त्विक स्त्रीनें—आपलें राज्य चालविलें. हें मघाचेंच उदाहरण देऊन सांगावयाचें ह्मणजे, एका गांवाहून दुसऱ्या गांवास गाडी निघाली असतां, तिच्यांत जी थोडी बहुत मोडतोड झाली, ती तिनें काढून आपल्या मृत्यूपर्यंत तो शकट सुरळीतपणें चालविला. इलिझाबेथच्या मार्गांत जर कोठें विघ्न आलें, तर तिनें तें दुसरा मुक्काम होईतोंपर्यंत तात्पुरतें काढलें. ( पण हा प्रश्न मुख्य नाहीं. कारण प्रसंगवशात् असें तात्पुरतें काम करावें लागतें. प्रत्येक वेळीं व स्थळीं कायमची दुरुस्ती होईतोंपर्यंत थांबतां येत नाहीं, हें उघड आहे. ) पण

गाडीचा दुसऱ्या ठिकाणीं मुक्काम होतांच अथवा गाडींतच, तिनें विचार करून ही वारंवार उपस्थित होणारी आपल्या मागची अडचण दूर करून आपल्या शकटांतील विघ्न कायमचें काढून टाकलें. त्याप्रीत्यर्थ आपल्या आसपासचे राज्य करणारे कसे आहेत, त्यांच्याशीं आज किंवा आपल्यानंतर वागण्याचा प्रसंग आला तर आपलें राज्य कायम कसें राखतां येईल, याचा तिनें विचार केला. कांहीं राजे लोक तर फारच निराळ्या प्रकारचे असतात. आपल्याला एका राजाची पुढें भीति आहे व दुसऱ्याच एका राजाला बुडवून पूर्वोक्त राजाशीं जर टक्कर मारतां येते, तर हे लोक त्याला खुशाल बुडवून टाकतात! मग ज्याची आपणास उद्यां भीति वाटेल, त्याला ते आजच बुडवून टाकतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. अशा राजकीय भानगडींचा विचार करून तदनुरूप आपल्या राज्यास चलन देणें, ह्मणजे आपल्या आसपास कलियुग माजलें आहे, असें समजून त्या युगास साजेसें वर्तन केलें पाहिजे. पण अहल्याबाईचें राज्य सत्ययुगास शोभणारें आहे. आपल्या आसपास काय चाललें आहे, याचें निरीक्षण तिनें अशा रीतीनें कधींही केलें नाहीं. मग शत्रूस बुडविण्याचें तर लांबच राहो. अशा संधि तिला आल्या नाहींत असेंही नाहीं, पण तिनें आपलें वर्तन सर्व प्रसंगीं निरिच्छ व निर्लोभ ठेविलें. प्रसंगीं तिनें न्यायनैष्ठुर्य दाखविलें, पण त्याप्रीत्यर्थ तिनें चाणक्यनीतीचें कधींही अवलंबन केलें नाहीं. राज्य चालविणें, त्याच्या कटकटी करणें या गोष्टी आपण हिंदु लोक आधिभौतिक समजतों. मग जिचें जीवनरहस्य धर्मांत असे, जिचें सारें लक्ष पारमार्थिक गोष्टींकडे असे, तिचें लक्ष अशा राजकारणांत जाऊं नये, यांत काय आश्चर्य? आमच्याकडे राज्यविभागणीची कल्पना फक्त शिवाजीमहाराज यांसच

सुचली होती. बाकी सर्व राजे आपलें एकछत्री राज्य समजून प्रजेवर आपली अमर्याद सत्ता आहे, असें समजत. राजा हा प्रजेपेक्षां कोणी फारच मोठा मनुष्य असून, त्यास आपल्या प्रजेचें वाटेल तें करावयाचें सामर्थ्य आहे, अशी इकडील लोकांची व राजांची अनादिकालापासून समजूत असे. याप्रमाणें आपल्याकडे राजांचें व्यक्तिसामर्थ्य समजलें गेलें आहे. पाश्चात्य देशांत राज्य चालविण्यांत बहुमतसामर्थ्य असतें. आमच्याकडे जर राजा चांगला असला, तर त्याचें व्यक्तिसामर्थ्य त्याच्या आयुष्यभर समाजास सुखदायक होवो, पण पुनः प्रजेचें हित व्यक्तीवरच अवलंबून असल्यानें तिच्या सुखाची—व त्यामुळें राज्याच्या सुखाची—स्थायिकता फारच डळमळीत असते. त्या वेळच्या बहुतेक व्यक्तींनीं स्वतःच्या इच्छा तृप्त करण्याकडेच लक्ष दिलें व प्रजेस वाटेल तसें वागविलें. अशा परिस्थितींत तिनें स्वतःच्या गुणांच्या बळावर सुव्यवस्थित रीतीनें राज्य चालविलें व इतर लोकांप्रमाणें पेशव्यांशीं भांडून त्यांचें व त्याबरोबर आपलें सामर्थ्य कमी केलें नाहीं, ही लहान सहान कां गोष्ट? आपल्याभोंवतीं वाईट मंडळी असतां आपण त्यांच्यासारखें न वागणें हें फारच मोठेपणाचें लक्षण आहे. व तें अहल्याबाईच्या अंगीं पूर्णपणें दिसून येतें. अहल्याबाई ही स्वतः पौराणिक कालांत शोभणारी राणी. पण तिचा जन्म कलियुगांत झाल्यानें तिच्या धोरणाचा परिणाम तिच्या मृत्यूनंतर फार टिकला नाहीं. तशांत व्यक्तिप्रभावामुळें आमच्या राजकीय पद्धतींत दोष असल्यानें तिच्या संस्थानावर पुढें लवकरच जे प्रसंग ओढवले त्यांबद्दल तिला दोष देतां येत नाहीं.

भाग दहावा.

# लढाया व राज्यांतील बंदोबस्त.

नष्टासि नष्ट योजावे । वाचाळासि वाचाळ आणावे ॥
आपणावरी विकल्पाचे गोंवे । पडोंचि नेदी. ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परि ते कळों न द्यावी ॥
कळकटपणाची पदवी । असों द्यावी. ॥
अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते ॥
याकारणें विश्रांतीतें । घेतांचि नये. ॥

दासबोध, दशक १९, समास ९.

अहल्याबाईच्या संस्थानावर परराज्यांतून कोणींही स्वारी केली नाहीं असें म्हटलें आहे, पण त्याचा अर्थ शब्दशः करावयाचा नाहीं. तिच्या संस्थानावर कोणींही स्वारी केली नाहीं, याचा अर्थ इतकाच कीं, तिच्या संस्थानावर कोणी लोभानें अथवा मत्सरबुद्धीनें स्वारी केली नाहीं. तशांत तिच्या कारकीर्दींत एक दोन लढाया झाल्या आहेत, पण त्यांचीं कारणें अगदीं

स्वतंत्र असून तीं फारच भानगडीचीं आहेत. या लढायांचा व इतर कांहीं गोष्टींचा समावेश या भागांत करावयाचें योजलें आहे.

चंद्रावताशीं जीं युद्धें झालीं त्यांचा इतिहास सांगण्यापूर्वी त्यांचीं युद्धें उपस्थित कां झालीं, हें आधीं सांगितलें पाहिजे. व त्यासाठीं आपल्यास राजपुतान्याच्या इतिहासांत थोडेंसें शिरलें पाहिजे. चंद्रावत हे चंद्रवंशांतले म्हणून त्यांस चंद्रावत असें म्हणतात. सुमारें सव्वासहाशें वर्षांपूर्वी उदेपुरच्या घराण्यांत भुन्सी या नांवाचा एक फारच शूर राणा झाला. याला चंद्र या नांवाचा एक मुलगा होता. त्यानें रामपुर भानपुर येथें आपलें राज्य स्थापिलें. तेथें चंद्रावत म्हणून रजपूत स्थापन झाले. नंतर या घराण्यांत अतोनात फेरफार झाले. चंद्रावत हे उदेपुरच्या घराण्यांतले असल्यानें तेही अर्थातच सिसोदिया वंशांतले म्हणजे श्रेष्ठ कुलांतले होते. व त्यांचा संबंधही अजून उदेपुराशींच होता. उदेपुरच्या घराण्यानें दिल्लीपतीपुढें आपलें डोकें कधींही नम्र केलें नाहीं, अथवा त्यांच्याशीं आपली सोयरीक केली नाहीं. पण राजपुतान्यांतील जयपुर, जोधपुर वगैरे जीं इतर संस्थानें होतीं, त्यांच्यासंबंधानें मात्र अशी गोष्ट नव्हती. त्यांनीं मोगलाशीं आपली सोयरीक केली होती. यामुळें उदेपुरकर त्यांस आपल्यापेक्षां कमी प्रतीचे समजत. त्या वेळीं जयपुर, जोधपुर वगैरे संस्थानांनीं असें ठरविलें कीं, सिसोदिया (उदेपुर) वंशांतली मुलगी जर आपल्या घराण्यांत आली, तर त्या मुलीचा मुलगा अन्य राणीच्या (सिसोदियाव्यतिरिक्त) मुलापेक्षां जरी लहान असला, तरी जेष्ठ मुलाचा मान सिसोदिया राजपुत्रासच दिला जाईल. अर्थात् दुसऱ्या राणीचा मुलगा जरी वयानें ज्येष्ठ असला, तर ज्येष्ठपणाचे सारे हक्क उदेपुरकर मुलीच्या मुलास प्राप्त

व्हावयाचे. या करारामुळें त्यांचा आपसांत बेटीव्यवहार सुरू झाला. जयपुरचा राजा सवाई जयासिंग हा इ० स० १७४३ त वारला. त्या वेळीं त्यास दोन पुत्र होते. त्यांपैकीं इसरीसिंग अथवा ईश्वरी-सिंह हा वयानें मोठा असून माधवसिंग हा वयानें लहान होता. परंतु माधवसिंग हा सिसोदिया वंशातला असल्यानें जयसिंगामागें जयपुरच्या गादीवर बसण्याचा मान माधवसिंगाचाच होता. माधव-सिंग हा लहानपणापासूनच उदेपुरास आपल्या आजोळीं-राहात असे. त्याचा मामा संग्रामसिंह यानें आपल्या भाचाचा इतमाम चांगला राहावा ह्मणून त्यास इ० स० १७२९ त रामपुऱ्याची जहागीर दिली. माधवसिंग हा आपल्या आजोळींच लहानाचा मोठा झाला. पुढें जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें जयसिंग वारला, तेव्हां त्याच्या पश्चात् माधवसिंग हा गादीवर बसावयाचा; पण जयपुरास ईश्वरी-सिंहाचा पक्ष प्रबळ असल्यानें तो स्वतःच आपल्या पित्यामागें जय-पुरचा राजा झाला. अर्थात् माधवसिंगाचा हक्क त्या वेळीं बाजूलाच राहिला. या वेळीं (इ० स० १७४३ त) उदेपुरच्या गादीवर संग्रामसिंहाचा मुलगा जगत्सिंग हा होता. त्यानें मल्हारराव होळकर यास आपल्या मदतीस्तव बोलावून त्याच्याशीं अशी कबूलात केली कीं, "ईश्वरीसिंहास गादीवरून दूर केल्यास मी तुह्मांला या काम-गिरीप्रीत्यर्थ चौसष्ट लक्ष रुपये देईन." राण्याची ही तयारी ईश्वरी-सिंहाला कळतांच आपली पुढें जी प्रतिष्ठा व्हावयाची, त्या कल्पने-च्या भीतीनेंच त्या बिचाऱ्यानें विषप्राशन केलें! यामुळें माधव-सिंगाला जयपुरचें राज्य व होळकराला कबूल केलेली रकम ही आयतीच मिळाली! हा प्रभाव त्या एका विषाच्या पेल्याचा झाला! आपली गादीवर चांगली स्थापना झाली, हें पाहून माधवसिंगानें होळ-

करास रामपुऱ्याचा भाग बहाल करून दिला!* वास्तविक पाहातां त्यास असें करावयाचा काडीभरही अधिकार नव्हता! इतकेंच नव्हे, तर त्यानें हें कृतघ्नपणाचें काम केलें. हा प्रकार पाहून चंद्रावतास परम दुःख झालें. कारण माधवसिंगानें त्याच्या जहागिरीवर तुळशी-पत्र ठेवलें.! पण त्या बिचाऱ्यास कांहीं बोलतां येईना. कारण, मल्हारीबावाच्या मनगटांत भारी जोर होता. या देणगीमुळें माधव-सिंगाचें कांहींच नुकसान झालें नाहीं. कारण, तो प्रांत उदेपुरचा होता! आतां भांडणें झालींच, तर उदेपुर, चंद्रावत व होळकर यांचीं व्हावयाचीं! पण उदेपुरकरांनींही या गोष्टीकडे त्या वेळीं कानाडोळा केला. चंद्रावताच्या मनांत हा अन्यायाचा प्रकार धुमसत होता. पण सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं, तसा प्रकार झाला. या गोष्टीस पुष्कळ वर्षे लोटलीं. मल्हारजी होळकर वारले. मग दिलीपानंतर रघूस राज्य प्राप्त झालें असतां—

दिलीपान्तरं राज्ये तं निशम्य प्रतिष्ठितम् ।
पूर्वं प्रधूमितो राज्ञां हृदयेऽग्निरिवोत्थितः ॥ २‡

रघुवंश—सर्ग ४.

असा ज्याप्रमाणें त्याच्या शत्रूंचा प्रकार झाला, त्याचप्रमाणें मल्हार-

* हा भाग टॉडनें चंद्रावताची माहिती सांगतांना व्हॉ० १, पा. २०८ (अबलाकांत सेन यांनीं प्रसिद्ध केलेल्या नव्या आवृत्तीं) त दिला आहे. त्याचा थोडक्यांत पण बरोबर असा सारांश रा. लोकहितवादी यांनीं आपल्या "राजस्थानचा इतिहास-उदेपुर" ( २ आवृत्ती ) ७१ पानांत दिला आहे. टॉड यानें उदेपुरचा इतिहास देतांना ही हकीकत पान ३३४ यांत दिली आहे. पण याचा तर्जुमा करतांना रा. लोकहितवादी यांनीं हें गांव देण्याचें पातक बिचाऱ्या राण्यावरच लादलें आहे! (पान ३२०. )

‡ वीरश्रेष्ठ दिलीपनंदन रघूमागें पित्याच्या स्वतां ।
राज्यीं हा बसला, असें परिसतां राजे तई तत्त्वतां, ॥

रावानंतर अहल्याबाईस अधिकार प्राप्त झाले असतां चंद्रावताचा प्रकार झाला. मल्हारराव होळकरास जाऊन पांच सहा वर्षें झालीं, तथापि हा बोलूनचालून जुलमाचा रामराम. तशांत अहल्याबाईचा अंमल मल्हाररावाप्रमाणें कडक नव्हता. अर्थात् मल्हारराव जातांच चंद्रावतांच्या उरावरची धोंड खाली पडली व त्यांचा क्रोध इतकीं वर्षें दबून असल्यानें त्याचा उद्रेक फारच जोरानें झाला. त्यांनीं रामपुऱ्यांत बंड उभारलें. या वेळीं उदेपुरच्या गादीवर राणा अरिसिंह ‡ हा होता. त्यानें चंद्रावतांच्या साह्यास आपलें कडवें सैन्य पाठविलें होतें. व तो स्वतःही चितोरपर्यंत आला होता. ही लढाई इ. स. १७७१ त जानेवारीपासून तों मार्चपर्यंत ह्मणजे तीन महिने चालली. याच वेळीं थोरले माधवरावांनीं उत्तर हिंदुस्थान सर करण्याकरतां विसाजी कृष्ण बिनीवाले यांच्याबरोबर जें मोठें सैन्य

---

**संतापाग्नि दिलीप कालिं धुरपे, तो वाढुनी संप्रती ।**
**झालासे भडका हृदीं नाचि तई तो सोसवे त्यांप्रती ॥**

**गणेशशास्त्री लेले.**

‡ या राण्याला कोणी 'अर्सी' म्हणतात, तर त्यास कोठें हरशी असेंही संबोधिलें आहे. रा. नातू यांनीं त्यास हरशी असेंच म्हटलें आहे. (मा. शिंदे. पा. ९७.) टॉडनें त्यास Ursi 'अर्सी' असें म्हटलें आहें. पण लोकहितवादी त्याचा उच्चार 'उरसी' करतात. मालकम साहेबानें त्यास Ulsee 'अळशी' म्हटलें आहे. व 'र' चा 'ल' हेंही एक वेळ बरोबर आहे. मात्र उच्चार बदलतां बदलतां मूळचा सिदोदिया रजपूत वीरसिंह तो मात्र अळशी झाला !! रजपुतांचे कांहीं प्रांत खालसा केले. त्या वेळीं त्या घालमेलींत तेथील एका शास्त्र्याची दानधर्मांत मिळालेली जमीन खालसा झाली. ती आपणास परत मिळण्याचा त्यानें अहल्याबाईकडे अर्ज केला होता, त्यांत शास्त्रीबोवांनीं या राण्याचा 'अरिसिंह' या नांवानें उल्लेख केला आहे. इंपिरिअल गॅझेटिअर (Vol. XXIV, P. 91,) यांत त्यास 'अरिसिंग' म्हटलें आहे.

पाठविलें होतें, त्यांत तुकोजी होळकर गुंतला असल्याकारणानें त्यास चंद्रावतांचें बंड मोडावयास येतां येईना. पण अशा प्रसंगीं अहल्याबाई स्वस्थ बसून आपल्या पुत्रवत् प्रजेस दुःखांत लोटणारी थोडीच होती ! मोरोपंतांनीं–

जो शुभ निज प्रजांचें देशाची वृद्धि इच्छतो राजा ॥
तेणें पर जिंकावे न उपेक्षावें कदापि या काजा ॥१॥

हें जें शहाण्या राजाचें वर्णन केलें आहे, त्याचप्रमाणें तिनें या समयीं आपलें वर्तन केलें. या प्रसंगीं तिच्याजवळ फौजही धडपणें नव्हती. पण तिनें आपली हिम्मत मुळींच खचूं न देतां लागलीच लोकांची जमवाजमव केली आणि त्यांचें सैन्य उभारून, आपल्या पहाऱ्यावरील शूर शिपाई शरीफ भाई याच्या हाताखाली तें सैन्य दिलें आणि त्यास चंद्रावतांवर पाठविलें. ही लढाई मंदोसरच्या उत्तरेस पळसुडा ह्मणून एक गांव आहे, तेथें झाली. या लढाईंत अहल्याबाई स्वतः होती. ती प्रत्यक्षपणें समरांगणावर न येवो, तथापि युद्धाचीं सर्व सूत्रें तीच हालवीत होती. या युद्धांत पहिल्या पहिल्यानें होळकरांच्या सैन्याचें रजपुतांच्या कडव्या लोकांपुढें कांहीं चालेना. तें मागें हटलें. पण या पिछेहाटीनें त्या बाईनें मुळींच माघार घेतली नाहीं. इतकेंच नव्हे, तर शेवटीं तिनें या लढाईंत चंद्रावतांचा पराभव केला. हें पाहून राण्यानें तहाचें बोलणें लावलें.

याप्रमाणें त्या वेळीं चंद्रावतांचें बंड मोडलें खरें, पण ते मधून मधून होळकरास उपद्रव देतच असत. याबद्दल महेश्वरच्या बातमी-

१ या लढाईची हकीकत मालकम साहेबानें दिली आहे. पण तिचा उल्लेख कैफियतींत नाहीं; व पुढील युद्धाची हकीकत कैफियतींत आहे, तर ती मालकम साहेबाच्या पुस्तकांत नाहीं !

पत्रांतही मधून मधून उल्लेख सांपडतो. बाईनें अशा प्रकारचा उपद्रव बऱ्याचदां बंद केला आहे. याबद्दल केसो भिकाजींचें एक लहानसें पत्र देतों.

'भोपाळवाले पठाण मुख्य टिकाईत, त्याचा चुलतभाऊ कादरखान, त्याचा धाकटा भाऊ अशक महमदखान, शंभर स्वारांनिशीं भोपाळच्या सरदेस उमेदवार होते. त्यास कृष्णाजी तानदेवांचे पुत्र लक्ष्मणराव कृष्ण हे चंद्रावत वगैरे मवासावर गेले होते. दोनशें स्वार हजार पायदळ याजसांगातें होतें. इंदुरींहून दोन तोफा नेल्या होत्या. परंतु मवासाचा जोर अधिक, यास्तव भोपाळवाले हे पठाण सरदेवर होते. लक्ष्मणरायांनीं आपल्याकडे बोलाविले. ते दोनशें लोकांनिशीं पठाण यांस सामील झाले. मवासाचें पारिपत्य करून पठाणांनीं कामकाज चांगलें केलें, यास्तव लक्ष्मणरायांनीं या पठाणास पंचवीस लोकांनिशीं येथें चंद्र ३ मिनहूस घेऊन आले. लक्ष्मणरायांनीं बाईजवळ पठाणाचे मर्दुमीची तारीफ फार केली. बाईंनीं त्यास मेजमानी दुरोजा पाठविली. आणि चंद्र ६ रोजीं त्रितीय प्रहरीं पठाणास भेटीस वाड्यांत घेऊन आले. बाई आंत समोर बसली. अलीकडे दालनांत यांनीं आपले लोक व मुत्सद्दी बसविले. पठाणाकडे आणायास राजश्री मुकुंदराव हरि व वासुदेव चिमणाजी पाठविले होते. दहा पंधरा खाशांनिशीं पठाण आले. दालनांत येऊन बसले. दुरून बाईस मुजरे केले. दोन घटका बसले होते. विडे देऊन बिदा केलें.'

भाग २ रा. पृष्ठ १२.

या पत्रावरून लोकांस आपल्याकडे वळविण्याची कला बाईस कशी साध्य होती, हेंही दिसून येणार आहे. याप्रमाणें अहल्याबाईनें

चंद्रावतांचा वारंवार बंदोबस्त केला. परंतु त्यांच्या अंतःकरणांत जी गोष्ट सलत होती, तिचें शमन अजून न झाल्यानें त्यांचा द्वेषवन्ही सारखा धुमसत होता. वर सांगितलेलें युद्ध झाल्यानंतर सुमारें पंधरा सोळा वर्षांनीं त्याचा पुनः मोठा भडका झाला. इ. स. १७८७ सालीं रजपुत लोकांनीं महादजीचा लालसोट येथें मोठा पराभव केला व पाटीलबोवास पळतां पळतां भुई थोडी केली. या विजयामुळें रजपुत लोक फारच शेफारले. त्यांनीं होळकरांचा निंबाहेडा म्हणून महाल होता, तो खालसा केला आणि तेथें मराठ्यांची फौज होती, ती हाकलून जावद शहर घेतलें. निंबहेडा येथें शिवाजी नाना या नांवाचा होळकरांकडून एक सुभेदार होता. तो राण्यास शरण गेला, म्हणून त्यानें त्यास सोडलें. हा प्रकार पाहून रामपुऱ्याचे जहागिरदार चंद्रावत, यांना स्वस्थ बसवेना. त्यांचा उदेपुराशीं फार पुरातन काळचा ऋणानुबंध होता. होळकरांनीं त्यांचा संबंध तोडला होता खरा, पण रक्ताकडे रक्त वाहतें, हें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. रजपुतांचें रक्त जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें खेळूं लागलें, तेव्हां चंद्रावतांचा ओढा तिकडे वाढूं लागला. ते वरवर दिसण्यांत होळकरांच्या छत्राखालीं बसले होते खरे, पण ज्याप्रमाणें जमिनींतून पाण्याचे पाट वाहातात, त्याप्रमाणें त्यांच्या मनांतून तिकडेच ओढा वाहात होता. रजपूत लोक चकरड्या व चलदू गांवापर्यंत येऊन थडकले, हें पाहतांच चंद्रावतांच्यानें राहवेना. ‘ आम्ही सिसोदिया वंशांतले आहोंत. होळकर हे आमच्यापेक्षां हीन जातीचे असल्या-कारणानें, आम्ही त्यांचे ताबेदार रहाणें हें ठीक नव्हे.’ अशी त्यांनीं कुरापत काढली. इतके दिवस आंतून वाहात असलेल्या प्रवाहाचा याप्रमाणें उद्रेक झाला, व ते रजपुतांस उघड रीतीनें जाऊन

मिळाले. त्या उभयतांनीं होळकराविरुद्ध बंड उभारलें. या वेळीं अहल्याबाईस आपली प्रजा—

धेनु ह्मणे, "स्वामी! त्वां पालन केलें, करी न बाप तसें।
कां मज उपेक्षिलें हो! मी खळदंडें उदंड तापतसें" ॥

या धेनुवाक्याप्रमाणें आपल्यास गाऱ्हाणें सांगत आहे, असें वाटलें. त्या प्रसंगीं या हरिभक्तींत दंग असणाऱ्या व ब्राह्मणाप्रमाणें आचरण करणाऱ्या महिषीनें—

मी ब्राह्मण क्षमावान् माते! रडतीस तूं कशाला गे? ॥

या महर्षिवाक्यानें उत्तर न देतां उदेपुरकरांची व चंद्रवतांची चांगली रग जिरवण्याचा निश्चय केला. हें रजपुतांचें वर्तन पाहून ती संतापून गेली. तिनें आबाजीपंत, राघोरणसोड इत्यादि लोकांबरोबर आपलें सैन्य युद्धास पाठविलें. पण राण्याच्या सैन्यानें तिच्या सैन्यावर चकर्ड्या मुक्कामीं छापा घातला. त्यांत अंबाजीपंत मारले गेले. त्यामुळें होळकरांची फौज जावदेस जमा झाली. हें वर्तमान अहल्याबाईस समजतांच तिनें मागील युद्धाचा नायक शरीफभाई याला बोलाविलें; व त्यास मेजवानी व वस्त्रें देऊन त्याचा गौरव केला. त्या शूर स्त्रीनें त्यास युद्धावर पाठवितांना सणसणीत रीतीनें सांगितलें कीं, "मेले हो! तुम्ही मला जर तोंड दाखवावयास लढाईतून परतून आलांत, तर मेखसूं घालून ठार मारून टाकीन! मेवाड होतें कीं नव्हतें असें करून टाका." ¶

याच वेळीं बाईच्या प्रसंगावधानाची व दूरदर्शीपणाची एक गोष्ट घडली. ती येथें सांगितली पाहिजे. रामपुऱ्याकडे जेव्हां वरील गडबडी उडाल्या तेव्हां ¶ "उज्जनीस शिंद्यांकडील कुटुंबें होतीं. त्यांचें

¶ होळकरांची कैफियत.

कै. म. म. द. वा. पोतदार,

धैर्य हत होऊन महेश्वरास बाईसाहेबांस पत्रें आलीं कीं, ‘ आम्ही आपलेजवळ येतों.’ त्यास बाईसाहेबांनीं उत्तर लिहिलें कीं,– “ **आल्यास तुमचें घर आहे. परंतु नक्षास बाध घडतो. तसाच प्रसंग पडल्यास तीन प्रहरांत तुमचेपाशीं दाखल होईन, घाबरूं नये.**” असें उत्तर लिहून खाजगत डेरा बाहेर दिला. तेथें रोज फौजेची हजरी. शंभर स्वार आले ते रवाना केले. पन्नास आले ते रवाना केले. पांचशें आले ते रवाना केले.”

असो. याप्रमाणें बाईनें युद्धास * लोक पाठविण्याची तयारी चालविली. रजपुतांनीं निंबाहेडा शहर घेतलें. पण यामुळें त्यांच्यावर आणखी एक संकट उपस्थित झालें. कारण, त्यांनीं विनाकारण अहल्याबाईचा आपणावर रोष उत्पन्न करून घेतला. व त्यांच्या दुर्दैवानें ती या स्थळापासून फार लांब नव्हती. ही रजपुतांची लाट परतून द्यावयास्तव तिनें शिंद्याशीं एकत्र व्हावयाचें ठरविलें. शिवाजी नानाचा वर सांगितल्याप्रमाणें पराभव झाला होता, ह्मणून तिनें त्याच्या साह्यास तुळाजी शिंदे[1] व ‘शरीफभाई[2] यांस पांच हजार स्वारांसह पाठविलें. शिवाजी नानानें मन्दोसर किल्ल्याचा आश्रय धरून तेथें फौजबंदी केली होती. रजपुतांनीं शिवाजी नानाशीं जो तह केला होता,

* या युद्धाचें वर्णन आम्ही टॉडच्या आधारें केलें आहे. हें वर्णन होळकरांच्या कैफियतींतील वर्णनाशीं ताडून पहावयाजोगें आहे. दोघांनीं आपआपल्या संस्थानच्या कागदपत्राधारें हकीकत लिहिली आहे. व त्या हकीकतींत फार साम्य आहे. यामुळें अर्थात् त्या वर्णनाच्या खरेपणास अधिक बळकटी येते. या युद्धाचा उल्लेख म. द. बातमीपत्रें, भाग दुसरा, यातील लेखांक १५४–५६ व १५९ यांतही आहे.

१ हा बाईच्या माहेरच्या ‘ शिंदयां ’ पैकी होता. २ यास टॉड श्रीभाई म्हणतो.

त्यांत ठेवावें तितकें धोरण न ठेविल्यानें तो स्वतंत्र रीतीनें वागावयास मुखत्यार होता. या उभय सैन्यांची गांठ माघ शुद्ध ४ वि. सं. १८४४ (इ. स. १७८८) त पडून त्यांची मोठी रक्तपाताची लढाई झाली. तींत राण्याच्या सैन्याची फार कत्तल होऊन त्याचा पराभव झाला. या कत्तलींत राण्याचा प्रधान मालदास मेथा मारला गेला. त्याचप्रमाणें कनोर व सांद्री येथील ठाकूर व पुष्कळसे लोक जखमी झाले. त्यांत सांद्रीच्या ठाकरास कैद केलें. या ठाकरानें दोन वर्षांनंतर आपल्या राज्यांतलीं उत्तम अशीं चार गांवें जेव्हां मराठ्यांस दिलीं, तेव्हां त्याची सुटका झाली. असो.

याप्रमाणें रजपूतांची वाताहत केल्यावर होळकरांचें सैन्य दुसरे दिवशीं कूच करून जावद, निंबाहेडा, राणीपुरा वगैरे किरकोळ महालांत ठाणीं बसवून रामपुऱ्याकडे आले. रामपुराही साताविसा दिवशीं आम झाला. चंद्रावत पळून आमदेस गेले. आमदेस मोरचे लागले· ज्वाळा* तोफ रामपुऱ्यास होती ती आणली. (मग) मोरचे जमवून ज्वाळा जाया होती, (ह्मणून) निमेबार भरून येक गोळा मारला. (तो) इकडील अलंग फोडून भवानी-सिंग, चंद्रावत निजला होता, त्याचे वरील खपरेल उडून पलीकडील सफेल फोडून (मग तो) गोळा पार झाला. त्यांतच त्याचे टाके ढिले झाले. दुसरे दिवशीं हल्ला करावा असा आबाजी रणसोड शरीफभाई यांचा विचार ठरल्यावर हें वर्तमान चंद्रावतास समजलें. त्यांनीं मार्गांत दारू बिछाऊन दिली कीं, हल्ला येतांच बत्ती द्यावी, ह्मणजे माणसें उडून जातील. अशा भावीं (त्यांनीं) दगा केला.

* रा० पारसनीस 'जवाळा' असा पाठ देऊन पुढें प्रश्नचिन्ह देतात. ज्वाळा हा बंदुकीचा एक प्रकार आहे, पण तें येथें तोफेचें नांव असावें असें वाटतें.

( पण ) इकडे मार्तंड साध्य, हल्ला आला नाहीं तों अगोदर भवानी-सिंगाचे बंधु सोभागसिंग किल्ल्याबाहेर जाग जागां माणसें बसविण्यांत आलीं. त्यांतून तोड्याचा गुल पडून दारूचा भडका उडाला. तों पन्नास माणूस जळून जातीनें सोभागसिंग चंद्रावत ( हाही ) फार जळाला. इतक्यांत हल्ला जाऊन पोहोंचला. त्याजला उचलून नेण्याचें किल्लेवाल्यांस न बनतां (तो) किल्ल्यांत सांपडला. परंतु किल्लेवाल्यानीं हल्ला मारून काढला. सोभागसिंगास घेऊन आले. त्यानें रदबदली फार केली. परंतु न ऐकतां सोभागसिंग चंद्रावत यास तोफेच्या तोंडीं देऊन उडवून दिला. ( सोभागसिंह हा ) चंद्रावतांत शुरत्वाचा व कर्तृत्वाचा ( होता ) तोही खर्चीं पडला, तेव्हां भवानीसिंगाची हिंमत न पुरतां (तो) तीनशें स्वारांनिशीं रात्रौ पळून गेला. चहोंकडे जलुषे[१] वाढून पूर्ववत् बंदोबस्त ( झाला ). राज्यास राज्य, प्रजेस चैन. याप्रमाणें चोहोंकडे आनंद झाला. व बाईनें आपली फत्ते केली. ( बाईच्या शौर्याच्या व चातुर्याच्या ) पुण्यास खबरा गेल्यात. ( तिच्या विजयाचें ) नानाफडणीस यांस वर्तमान समजून ( आनंद प्रदर्शित करावयास्तव ) तोफा सोडून शिरे दरबार बाईसाहेबांचें स्तुतिस्तोत्र सहा घटका पर्यंत केलें. “ शापादपि शरादपि ” असें बायकांत अहल्याबाई दिसण्यांत आली. आज पावेतों ( बाईची ) स्नानसंध्या धर्माची प्रवृत्ति ऐकण्यांत आली होती. आज पराक्रमाची ही गोष्ट मोठीच केली. पुण्याचा दरवाजा म्हणजे माहेशमती नर्मदा तीरचे, आम्हांस आज समजलें.” संपूर्ण मानकरी सरदार यांनीं माना डोलविल्या. ¶

याप्रमाणें या युद्धाची समाप्ती झाली. अहल्याबाई खंडेरावाच्या मृत्यूनंतर मल्हारजी बरोबर ज्या लढायांत होती, त्या लढायांची या लढा-

१ मूळ अर्थ प्रवाह. जोर, रबाब, ¶ होळकरांची कैफियत.

यांशीं तुलना करावी व अहल्याबाईची योग्यता ठरवावी. या लढाई-बद्दल पुणें दरबारांत बाईची जी स्तुति झाली, ती अयोग्य आहे असें कोण म्हणेल ?

अहल्याबाईचें पेशव्यासंबंधीं जें प्रेम होतें, तें फारच अवर्णनीय होतें. पेशव्याबद्दल तिचा जो आदर असे, त्याबद्दलचे तिचे उद्गार महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत पुष्कळ ठिकाणीं आढळून येतात. त्यापैकीं कांहीं उतारे येथें दिल्यावांचून रहावत नाहीं.

'सरकारचे रविसंक्रमणाचे तिळगुळ इकडे आले नाहींत; यास्तव बाईनीं दोन तीन वेळां स्मरण केलें कीं, ' यंदां सरकारचे तिळगुळ आम्हांस कां आले नाहींत! तस्मात् आमचें विस्मरण पडलें!' मीं उत्तर केलें कीं, ' या फौजेच्या रवानगीमुळें दोन दिवस अधिक लागले आहेत, परंतु स्मरणपूर्वक येतील.' त्यास चंद्र १५ रोजीं कासीदजोडीबरोबर सरकारचे व आपले व तात्यांकडील तिलशर्करा पत्रेंसहित आली, ती बाईस दिली. बहुत संतोष पावली. फार स्तव केला;

म. द. बातमीपत्रें, भाग १, पान ९.

श्रीमंतांचें लग्नाचा निश्चय केसो भिकाजीनें बाईस सांगितला. तें ऐकून:—

"( बाई ) संतोष पावली. सदय हृदय फार ते दिवशीं पाहिलें. 'कैलासवासी नानासाहेब या प्रांतीं आले होते, ते समयीं मालजी होळ-कर भेटावयास गेले, त्यास आपले जवळ पालखींत घेऊन बसले. बहुत ममता केली. श्रीमंतांची ममता आम्हांवर फार' वारंवार स्मरण करून नेत्रास उदक आणिलें कीं, "ईश्वर रावसाहेबांस सलामत राखो."

मातुश्री बाईसाहेब गंगापुरीं आहेत. मोठें कठिण चित्त केलें कीं, श्रीमंतांस हा कालवर पाहिलें नाहीं! आतां लग्नासाठीं येतील किंवा नाहीं? ऐसें बहुत प्रकारें बोलली. लग्नाचा निश्चय माघ शुद्धांत असें असल्यास, मागतीं बातमी आणून मजला सांगावें, म्हणून बहुत वेळ सांगितलें. याप्रमाणें वर्तमान जालें, तें सेवेसीं लिहिलें असे. लग्नाचा नेम जाल्यावर बाईस आग्रह करून येण्याविषयीं स्वदस्तुर पत्रें लिहावीं. कदाचित् आली तर फारच लौकिक उत्तम आहे. म्हातारपण ममता तो श्रीमंतांचें चरणीं विदित जाली आहे. आपण लिहिल्यास येतील."

म. द. बा. पत्रें, भाग २ रा, पान ८.

ह्या लग्नाबद्दलचा* संवाद फारच मनोरंजक आहे. पण तो वाचकांनीं मुळांतच पहावा. त्यापैकीं कांहीं भाग मात्र येथें घेतला आहे. लग्नाच्या अहेराबद्दल व इतर गोष्टींबद्दल बराच वाद झाला.

"तदोत्तर बाईनीं विचारलें जे, 'श्रीमंतास आहेर काय काय पाठवावा?' यांनीं ( विसाजी शामराज लांबहाते ) उत्तर केलें जे, 'बादली वस्त्रें व कंठी, शिरपेंच, मोत्यांचा तुरा हे दागिने आपल्या स्वरूपानुरूप पाठवावे. घोडें एकादें चांगलें, श्रीमंतांस बसाया योग्य, पाठवावें. बाई म्हणाली कीं, 'घोडें चांगलें नामी नाहीं.' हरकूबाई व विसाजीपंत बोलले जे, 'वस्त्रांस व जवाहिरास श्रीमंतांस काय कमी आहे? परंतु घोटें चांगलें पाठविल्यास, जेव्हां बसतील तेव्हां श्रीमंतांस आपलें स्मरण होईल.' इतकें बोलणें जालें."

म. द. बा. पत्रें, भाग १ ला, पान १७६.

---

* ह्याविषयीं व इत्तर मुद्यांविषयीं दोन्ही भागांत वृत्तांत आहे तो ताडून पाहाण्याजोगा आहे. त्यावरून त्या वकीलांच्या लिहिण्याच्या पद्धतीबद्दल व निरीक्षणशक्तीबद्दल बरेंच सुचण्यासारखें आहे. १. भाग २, लेखांक ८१ इ०.

या लग्नाबद्दल पुण्यांतून बाईस ममतापुरस्कर पत्रें पाठविलीं होतीं. तीं:—

'फडणीसांनीं वाचून दाखविलीं. ऐकून बहुत समाधान पावली. सर्वत्रांनीं आपला स्तव फार केला. " श्रीमंतांच्या पायाशीं एकनिष्ठ कायम मिजाज असा दुसरे कोणाचा पाहिल्यांत आला नाहीं. शाबास याच ब्राम्हणांनीं गेलें राज्य संभाळलें. त्यांच्या एकनिष्ठ प्रमार्जनीं कैलासवासी श्रीमंत नानासाहेबांनीं दानधर्म, ईश्वरआराधाना जी केली, ती ये समयीं कामास आली जे, जगताचा स्वामी कुलदीपक ईश्वरें लावला. नानांच्या एकनिष्ठतेस त्रैलोकीं उपमा नाहीं. उभयतांही कारभारी चांगले ". श्रीमंत दादासाहेबांच्याही गोष्टी काढल्या होत्या. बाई आपलेंही तापत्रय बोलली कीं, " कैलासवासी सुभेदार होते त्यांनीं एकनिष्ठतेनें श्रीमंतांची चाकरी करून उत्तम परिणाम करून गेले. अलीकडे आमच्या कपाळास हे ढगढग आली. एक झाड वंशीं असतें तर इतकी फजिती कशास होती? आमचें दैव!" श्रमी जाली. तदोत्तर केसोपंतांनीं उभे राहून, बाईस विनंती केली कीं, " श्रीमंतांनीं ममतापुरस्कर लिहिलें आहे. हा उत्साह, देवांब्राह्मणांचा आशीर्वाद व श्रीमंतांचे पदरीं तुम्हांसारखीं मनुष्यें दानधर्म तपश्चर्या करितां, या योगें कडून हा शुभदिवस प्राप्त जाला आहे. सांप्रत तुह्मी वडील. या प्रसंगीं आपण अगत्यरूप चालावें." बाईही बोलली कीं, " आह्मांसही या संतोषापेक्षां दुसरें काय आहे? परंतु पूर्वसूचना नाहीं व लग्नतीथ फार समीप आली." इतकें बोलणें झालें.

बाईला लग्नास चलण्याचा पुष्कळ आग्रह केला, पण तिनें उत्तर केलें:—

कै. म. म. द. वा. पोतदार, ग्रंथ संग्रह

'इतकें कांहीं करूं नये. शुभकार्य होतें तें होऊं द्यावें. तोच आह्मांस उत्साह आहे. तेथें तुकोजीबावाही आहेत, तेथें आह्मीच आहों. नवी फौज जमा करावयास महिना दीडमहिना पाहिजे. सांप्रत जें होत आहे तें फार उत्तम आहे.'

बाईस श्रीमंताकडून अहेर नेला त्याबद्दलचें पत्र फारच हृदयंगम आहे. त्यावरून पेशव्यांबद्दल तिला काय वाटत होतें, हें स्पष्ट दिसून येतें. त्याचप्रमाणें त्या वेळच्या दरबाराचें चित्रही चांगलेंच डोळ्यांपुढें उभें रहातें. तें पत्र अमळ मोठें आहे, पण फार महत्त्वाचें आहे.

'सांप्रत श्रीमंतांच्या लग्नाचीं वस्त्रें व बहुमान सरकारच्या हुजऱ्याबरोबर स्वामींनीं चंद्र १२ रजबीं रवाना केलीं, ते चंद्र ८ साबानीं दो प्रहरां येथें सेवकाजवळ दाखल झालीं. सेवकासही आज्ञापत्रें होतीं. त्यांत आज्ञा कीं श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लग्नाचीं वस्त्रें व बहुमान गंगाजलनिर्मळ अहल्याबाई होळकर यांस येणेंप्रमाणें:—

१ माळ मोत्यांची मोतीं सुमार एकशें अठरा ११८

४ कापड सणगें:—

१ पातळ जरी पैठणी

१ व चोळी पैठणी

२ व शाल फर्द सफेत

———

४

———

५

एकूण चार वस्त्रें व एक माळ मोत्यांची पाठविली आहे. पावती करून उत्तर घेऊन पाठवणें ह्मणून आज्ञा. त्यास, पुण्यांत लग्नाचा समारंभ जाला, तो ऐकून श्रवणद्वारें फारच तृप्तता झाली. सांप्रत उत्साहाचीं

वस्त्रें व बहुमान येथें आलीं, तेंही समारंभें करूनच पावावीं या अर्थी राजश्री **बा**जीराव **व**र्वे मंडळीसुद्धां बोलाविलें. **बा**ईकडून तबक व परात रुप्याची आणवून, त्यांत वस्त्रें घालून व पानसुपारी तबकांत घालून, वाजंत्री कर्णेकरी ताफे बोलावून सिद्धता केली. वाड्यांत **बा**ईकडेस सांगून पाठविलें कीं, "श्रीमंतांकडून आपणास वस्त्रें आलीं आहेत, तीं घेऊन येतों." **बा**ई दरबार करून बसली, व आम्हांस 'या' ह्मणून सांगून पाठविलें.

पांच घटका दिवस शेष राहातां, समारंभेंकरून वाड्यांत गेलों. हा समारंभ, गृहस्थमंडळी व वाजंत्री हें पाहून **बा**ईही बहुत संतोष पावली. मुत्सद्दी वगैरे दरबार भरलाच होता. तबकें **बा**ईपुढें ठेविलीं. सरकारचीं पत्रें हुजऱ्यांनीं पुढें ठेविलीं. तदोत्तर पातळ व चोळी **बा**ईच्या हातीं दिली, शालजोडी पांघरविली, व मोत्यांची माळही सेवकांनींच **बा**ईच्या गळ्यांत घातली. **बा**ईनीं बहुत संतोषानें वस्त्रें बहुमान घेतला. सर्वांस विडे दिले. **बा**ई बोलली, 'आम्हांस व सर्व जगतास अलभ्य लाभ, सूर्योदय झाला, त्या प्रभूच्या प्रकाशेंकडून सर्वां सर्वत्र आम्हांस आनंद झाला. हे दिवस दृष्टीं पडतील, असा कोणासही भरंवसा नव्हता. परंतु कैलासवासी श्रीमंतांच्या पुण्योदयें व जगताच्या भाग्येंकडून ईश्वरें जगत्कुटुंबी प्रभु उत्पन्न केला.' दोन चार पंडित समागमें घेऊन गेलों होतों. त्यांनीं व सर्व सभामंडळीनीं श्रीमंतांचे गुणानुवाद वर्णन केले. पंडितांनीं आशीर्वादपर स्तुति केली.

तदोत्तर **बा**ईनीं हुजऱ्यास वर्तमान विचारलें. हुजऱ्यांनीं श्रीमंतांच्या शब्दरत्नाचें व सगुणपणाचें वर्णन व स्वामीच्या कर्तृत्वाचा बयान फार केला. त्याचें **बा**ईस व सर्व मजलीस आश्चर्य वाटलें.

बाईंनीं तदोत्तर राजकी वर्तमान विचारलें. बिदरूर इंग्रजांनीं घेतलें होतें, तें परतून टिपूनें इंग्रजांचें पारिपत्य करून संस्थान हस्तगत केलें. त्यावर ' इंग्रज मुंबईहून फिरून जमाव करून टिपूवर जात होते. ते मधेंच धोलपांनीं समुद्रांत पारिपत्य करून जहाजासुद्धां सरदार धरले. इंग्रज शरण आले. ' असें बहुत वर्तमान सांगितलें. चार घटका-पर्यंत वर्तमान ऐकत बसली होती. फारच संतोष पावली. तदोत्तर संध्येचा समय होत आला ह्मणून विडे देऊन बिदा केलें. याप्रमाणें श्रीमंतांच्या पुण्यप्रतापेंकरून समारंभ येथें झाला. '

बाईची पेशव्यांच्या ठिकाणीं असलेली निष्ठा अर्वणनीय होती. आपलें काम नंतर झालें तर चिंता नाहीं पण पेशव्यांचें काम आधीं झालें पाहिजे, याबद्दल तिचे उद्गार जागोजाग आढळतात. ही राजनिष्ठा पुरातन कालापासून आमच्या परिचयाची असल्या कारणानें त्यांतील स्वारस्य प्रत्येकाच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. यावरून पेशवे जी सांगतील, ती तिला पूर्व दिशा होती अशांतला मुळींच भाग नाहीं. तिच्या राजकारणांत विनाकारण जर कोणीं हात घातला, तर ही पाणीदार बाई तें अगदीं सहन करीत नसे. याबद्दलचें विवेचन मागें आलेंच आहे. ही साध्वी दानधर्मांत, बिदागी करण्यांत इतका पैसा खर्च करीत असे, पण पुणें दरबारच्या वकीलांस ती क्वचित्काळीं कांहीं देत असे! याबद्दल त्या उभयतां वकीलांनीं आपल्या पत्रांत ठिक-ठिकाणीं उद्गार काढले आहेत. विठ्ठल शामराजानें तर आपलें इतकें दैन्य प्रकट केलें आहे कीं, तो पक्का मारवाडी असावा, अथवा पुणें दरबार फारच निष्ठुर असावें असें वाटतें. ह्या वकीलाच्या मारवाडी-पणाची बराबर कल्पना यावयासाठीं पुढील उतारा दिला आहे:—

' हरी बाबाजीबरोबर लुटला गेलों. एक वस्त्रानशीं येथें आलों. त्यावर धन्याचे आज्ञेप्रमाणें आज साडेपांच वर्षें येथें चाकरीवर आहें.

मजवर गरीबावर इतकी इतराजी जाली, तर, सेवक गरिबाचा वाली धन्याव्यतिरिक्त कोण? स्वामींनीं परमार्ष न केला, तर माझा येथें कोणी वाली नाहीं. अबरू धन्याची आहे. बाईस वारंवार हटकायाची सीमा जाली. आतां कोठवर ग्लान सांगावी? या संकटांतून काढणार धनी कृपाळू समर्थ. फार दिवस जाले, धन्याच्या चरणदर्शनाची खंत वाटते. घरीं मातुश्रीचें पंच्याऐशीं नव्वद वर्षांचें वय. त्यांची भेट नाहीं! मुलें मनुष्यें अशा सवंगाईत अन्नवस्त्रावांचून हैराण तेथें ते श्रम आहेत; येथें मी अशा संकटांत आहें!"[1]

पण हा दैन्य प्रकट करण्याचा प्रकार दुसऱ्या वकीलाच्या पत्रांत फारच कमी दिसतो. त्याला जेव्हां बाईनें "दोनशें रुपये दीडमाही आम्हांस द्यावयास अनुकूल पडत नाहीं. पन्नास रुपये दरमहा देऊं. पाहिजे तर घ्या," असा निरोप पाठविला, तेव्हां त्यानें मोठा अभिमानाचा व थोरपणाचा जबाब दिला तो असाः—"सांप्रत असें उत्तर केलें तरी चिंता नाहीं. श्रीमंतीं उणें आम्हांस केलें नाहीं. तुम्हांपासोन पन्नास रुपये घेऊन निर्वाह नाहीं. हजारों रुपयांचे खर्च श्रीमंताचे कृपेकरून चालतात. तेथें आपण संकटांत पडूं नये. जे समयीं बाईंची मर्जी होईल, ते समयीं खर्चास द्यावें."[2]

यावरून वरील वकीलाच्या[3] दैन्याचा कोठपर्यंत खरेपणा समजावा हा मोठा प्रश्न आहे. त्यानें आपलें संधान बाईकडे अनेकदां लाविलें, तेव्हां तिनें मोठीं चोख उत्तरें करावीं. त्यांपैकीं एक उत्तर येथें देतों.

---

१ म. द. बातमीपत्रें, भाग १, पान १८५. २ म. द. बा. भाग २, पान ६७.

३ या वकीलाचा एक मासला वर दिलाच आहे. पण पुढील उताराही पहावा—

आपण ह्मणतील कीं, बाई इतकी ममतापुरस्कर तुह्मांशीं बोलतात, तेव्हां कांहीं परामर्ष करीत असतील. त्यास एक कवडी बाईकडून मजला प्राप्त असेल

" आपल्या धन्याकडून खर्चास आणवावें नी बसून खावें. खर्चास पाठवीत नाहींत, तर यांस कशास येथें ठेविलें आहे ! आह्मांजवळ कांहीं नाहीं." [१]

श्रीमंतांनीं ठेवलेल्या वकीलास सर्व हिंदुस्थानांत दानधर्म करणाऱ्या बाईनें कांहीं देऊं नये यांत कांहीं अतिशयोक्ति व कांहीं तिचा करारीपणा असावा. याचप्रमाणें जासुदाच्या सोयीची गोष्ट आहे. एकदां एक जासूद बाईस, लग्नपट्टीच्या ऐवजास फार दिवस लागले ह्मणून रागें बोलला. तेव्हां त्या मानी बाईनें विठ्ठल शामराजास लागलेंच सांगितलें, " आमचे येथें दरबारांत अधिक उण्या गोष्टी कोणी बोलाव्या नी आह्मीं ऐकून घ्याव्या, असा पथ नाहीं. तुमच्या अंगांनीं जरी ताठून बोलले, तें देखील आम्हांस सहन होणार नाहीं मग तुम्हीं कशास बोलावें ? असाच श्रीमंत आमचा लाड बाळगीत आले आहेत

---

तर आपल्याच पायांची शपथ ! कर्ज खात येथें बसलों आहें. बाहेरील खर्च काय काय लिहूं ? आज पांच वर्षांत एक गवताची काडी अगर घर छावून दिलें असेल तर शपथ ! वरकडांचीं घरें छावून देतात; खर्चासही देतात; परंतु आमचा व बाईचा ऋणानबंध असा आहे ! ( म. द. बातमीपत्रें, भाग १, पा. २१४–१५. )

'बाईचा दानधर्मांत लौकिक फार, पण ती आपणास कांहीं देत नाहीं ' याप्रमाणें या वकीलाचे किती तरी उद्गार सांपडतील. या गोष्टीबरोबरच आह्मीं मागें(पा. ११०) दिलेलें ' उदार ह्मणोन गवताची पेंढी अथवा पावशेर तेल आज्ञेशिवाय कोणास प्राप्त होईल, इतकी मुखत्यारी कोणाकडे नाहीं, ' हें कैफियतींतील वाक्य वाचावें व तो सारा भाग लक्षांत आणावा, ह्मणजे बाईच्या शिस्तीचें, करारीपणाचें व आपल्या संस्थानाच्या कळकळीचें कौतुक वाटेल. बाईनें आपला पैसा संस्थानाबाहेरच्या फुकट्या लोकांस कधींही दिला नाहीं. तिच्या औदार्याची कल्पना आजला उत्तम न वाटो; पण तिनें आपल्या विचाराप्रमाणें आचरण ठेवलें व त्यांत शेवटपर्यंत एक प्रकारची शिस्त होती, हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं.

१ महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग १, पा. १८६.

आणि आम्हांसही त्याशिवाय दुसरें दैवत नाहीं. अतःपर तुम्ही आपल्या जासुदास सांगा, दरबारांत अधिकउणें बोलूं नको. कारकून जाबसाल करितात; आम्ही त्यांशीं बोलतच आहों. जासुदाचें बोलावयाचें कारण काय? आम्ही तुमचे शिलेदार नाहीं. शिपाई आहों." $

बरसात वगैरे दिवसांत जासुदाचे निरोप आणतांना मोठे हाल होतात—

यास्तव (**विठ्ठल शामराजानें**) **बाईकडे** जाऊन विनंती केली जे, 'हा पर्जन्यकाळ आहे. कासिदांस, गांव—गांववाल्यास ताकीद करवून, एक एक छपर करून देवावें. इतके दिवस उन्हाळा होता. कशीही गुजराणी केली. आतां आसरा पाहिजे. यास्तव एक एक छपर करून देवावें. आणि दुकानांत राहूं देत नाहींत. कोठें चावडी देऊळ तेथें उतारकऱ्यांचा उपद्रव. निखालस असलें ह्मणजे बरें.' ह्मणून बोललों. ते रागें भरली. 'कोठवर उपद्रव सोसावे? वरसानुवरीस यांची डांक बसली तर आम्हीं कोठवर यांस काय द्यावें? साफ आमच्यानें कांहीं देववत नाहीं. तुम्ही आपल्या धन्यास लिहून पाठवा.' मीं उत्तर केलें जे, 'हा धाकटा बोभाट धन्यास काय लिहावा? आपण धनीच येथें आहेत. उभयपक्षीं आम्ही चाकर. इकडील काय सुक्त असुक्त वर्तमान काय येईल, तें आपल्यासच विनंती करावी.' त्यास रागें भरून साफ बोलली जे, 'आमच्यानें होत नाहीं. कासीद रोजमुरे खातात. त्यांनीं आपलें करून घ्यावें.' असें **बाईनीं** उत्तरें केलें. यावर **विठ्ठल शामराजानें** असा शेरा दिला

$ महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग १, पान १९९. २ म. द. बा., भाग १, पान २०२.

आहे कीं,—' त्यास मी असें लिहिलें ह्मणून बोभाट लिहिला, असें यांस कळल्यास रागें भरतील. लहान मोठे जाबसालास झटावें लागतें. आधींच तो सेवक यांचे इतराजींत आहे. '

यावरून बाईच्या बाणेदारपणाची, करारीपणाची व मानीपणाची पुष्कळच कल्पना होईल असें वाटतें.

बाराभाईच्या कारस्थानास अहल्याबाईचा पूर्ण पाठिंबा होता. तिचें आणि राघोबाचें कसें काय होतें हें मागें सांगितलेल्या हकीकतीवरून कळणारच आहे. हे बाराभाई जेव्हां राघोबाच्या मागें लागले, तेव्हां त्यांनीं एकदम माळव्यांतच भरारी मारली. त्यांचा असा विचार होता कीं, आपण अहल्याबाईकडे गेल्यास आपल्यास त्या साध्वीचा कांहीं आश्रय मिळेल. या प्रकरणासंबंधीं होळकरांच्या कैफीयतींत म्हटलें आहे—

' दादासाहेबांचा विचार महेश्वरास जाऊन होळकरास आपलेंसें करावें असा होता. अशा बेतानें ( ते ) कसरावदेवर गेले. तों बाईसाहेबांनीं कृष्णाजी मुरार यांजबरोबर फौज देऊन [ त्यांस ] दादासाहेबांचे मुकाबल्यास पाठविलें. ( कृष्णाजी मुरारांनीं त्यांस अहल्याबाईचा निरोप सांगितला कीं ) " ह्या प्रसंगीं आपलें येणें अप्रशस्त. आपणास प्रतीकूल कोण आहे; पण प्राप्त प्रसंगीची हवा पाहिली असतां, आम्ही मारले जाऊं ! यास्तव आपणांस नरमदा उतरणेस सल्ला नाहीं. " तेव्हां अली मोहनच्या राज्यांतून महीचे सुमारें गेले. '

अहल्याबाईचें धोरण पेशव्यास अनकूल असेंच होतें. महेश्वरच्या बातमीपत्रांत (भा. १ पा. २१९ ) तिचा दादासाहेबांबद्दल एक संवाद दिला आहे, तोही येथें सांगितला पाहिजे.

वकीलसाहेब बाईचे भेटीस गेले असतां, बाईनें त्यांस दादासाहेबांकडील वर्तमान विचारलें, "राजश्री हरिपंत तात्या फिरून पुण्यास गेले व तुकोजी होळकर वाफगांवास गेले म्हणून (आम्हीं) ऐकतों. तुम्हांकडे कांहीं पत्रें आलीं कीं काय? दादासाहेबांचा बंदोबस्त कसा झाला? तुम्हास कांहीं लिहून आलें असेल?" यावर वकीलांनीं उत्तर केलें, "आतांशीं तात्या पुण्यास आले आहेत. कुंभारी धरणगांवाजवळ गंगा उत्तरतीरीं तामसवाडी म्हणून एक लहान गांव आहे तेथें दादासाहेब आहेत. नवा वाडा राहण्यास करवितात. तात्यांनीं श्रीमंतांची दोन तीन महिन्यांची खर्चाची बेगमी करून राजश्री विसाजी आप्पाजी आठवले व कांहीं फौज त्यांजवळ ठेवून आपण पुण्यास गेले. तेथें श्रीमंतांचे मर्जीनुरूप काय बंदोबस्त कर्तव्य तो करतील. आम्हाकडे अद्याप याबद्दल कांहीं पत्रें आलीं नाहींत, परंतु असें वर्तमान ऐकलें आहे."

हें भाषण ऐकून अहल्याबाई म्हणाली,–'ईश्वर करो, त्यांची त्यांची घरांत समजूत पडो, नी दुनियेचा कांच तुटो. यांत सर्वांचें बरें आहे. पेशजी श्रीमंत राजश्री नानासाहेबांनीं आम्हांस दादासाहेबांचें वर्तमान लिहिलें होतें. तुम्हांसही पत्रें आलीं होतीं?'

**वकीलः**—आतांशीं तात्या पुण्यास गेले आहेत. यानंतर श्रीमंतांचीं आणि त्यांचीं भाषणें होतील. मग पक्केपणें काय निश्चय होईल तो आपल्यास लिहून कळवितील.

**बाईः**—नाना कृपा करितात. तेवढे आमचे तिळी आहेत. पण तात्यांची ममता आम्हांकडे नाहीं!

**वकील**:—हा आपल्यास भास आहे. कारण ते उभयतां शरीर-मात्र दोन आहेत पण प्राण एकच आहे. केवढ्या मसलती गाढ पडल्या, तितक्या निवारण करून राज्याचा बंदोबस्त करितात. त्यांमध्यें कित्येक सम विषम जाबसाल पडत असतील, नाहीं असें नाहीं. पण तेथें कोठें तीव्र कोठें सौम्य, असें पैं दर पैं जाबसाल करणें प्राप्तच आहेत. त्याअर्थीं ज्याचे जसें कामावर बोलणीं स्थूल सूक्ष्म होतात, तसे आपलाले भावी भावितात. परंतु उभयतांत द्वैताचा लेश नाहीं. आपणही लहानमोठा राज्यभार करितां. सांप्रत आपल्यास सावकाश वाटत नाहीं. परंतु अशांतही कारभार करणें कंपेश कोणाशीं बोलणें प्राप्त आहे कीं नाहीं?

**बाई**:—तुम्ही म्हणतां ही खरी गोष्ट आहे. जेथें पोंहच नाहीं तेथेंच विस्कळीत होते. शाबास. त्यांचीच छाती! त्यांस उपमा द्यावयास दुसरा नाहीं. **दा**दासाहेबांनीं इतकी घाण केली!

या विषयावर येथें दोन शब्द लिहावेसे वाटतात. **दा**दासाहेब हे स्वतः दुहीची परिस्थिती उत्पन्न करण्यास कारण मात्र झाले. पेशवाई जावयास ते अथवा त्यांचे पुत्र हे मूळ कारण नव्हत, हें कधींही विसरतां कामा नये. **दुर्योधनाच्या** वेळेपासून तों **दा**दासाहेबांच्या वेळेपर्यंतच काय, पण आतांपर्यंतही मोठमोठ्या लोकांची अशी समजूत आहे कीं, त्या त्या काळीं जी वाईट परिस्थिति उत्पन्न झाली, ती व्यक्तीनें उत्पन्न केली. पण हा निवळ भ्रम आहे. एक व्यक्ति जर असे अनर्थ करते, तर मग एकीचें महत्त्व तें काय? **दुर्योधनास शकुनि, कर्ण** इत्यादिकांसारखे त्याचे हितचिंतक सामील होतेच; पण **भीष्म, द्रोण** यांच्यासारखे महाभगवद्भक्तही त्याचीच सेवा (पण अप्रामाणिकपणें!

तो अप्रामाणिकपणाही फारच निंद्य! त्याच्या वर्तीनें लढावयाचे व पांडवांस सल्ला प्रामाणिकपणें द्यावयाच्या!!! त्यापेक्षां हे लोक पांडवांस मिळते तर पुढचा अनिष्ट प्रकार एवढा अनर्थकारक तरी न होता!) करीत होते! सखारामबापूनें तरी काय हेंच केलें! नारायण-वधासारखें ज्यानें पातक करावयाचें त्यास " देहांतप्रायश्चित्त " सांगणारा सारा एकच रामशास्त्री मिळावा, यासारखी लज्जास्पद, अधोगतीप्रत नेणारी निंद्य गोष्ट कोणती आहे! पण त्या वेळेस दादासाहेबांस साह्य करावयास आमचे लोक तयारच! ही पोट जाळावयाची वृत्ति आमच्यांत जोंपर्यंत होती, तोंपर्यंत नुसतें दादासाहेबांस नांवें ठेवून काय उपयोग? संभाजीच्या वेळचा इतिहास व या वेळचा इतिहास ह्या दृष्टीनें मनन करण्याजोगा आहे. त्या वेळीं एकीकडून संभाजीसारखा अविचारी व क्रूर राजा आणि दुसरीकडून अवरंगजेबासारखा पाताळयंत्री, रसातळास नेणारा व महत्वाकांक्षी सार्वभौम बादशहा! पण या दोहोंच्या कचाट्यांतून मराठेशाही तीस वर्षें झुजून सुरक्षितपणें वर आली! पण या वेळीं तसा प्रकार नसतानांही मराठी राज्यशकट उतारासच लागला! याचें एक कारण हेंच कीं, शिवाजी महाराजांनीं सामदाम करून आधीं सुराज्य केलें, त्यांस साधु संतांचें सात्विक जीवन मिळालें. त्यामुळें रोपें चांगलीं जोमदार निघून तीं खडतर आघात सहन करूं लागलीं. हें सात्त्विक शिक्षण पेशवाईंत नव्हतें. त्यामुळें चोहोंकडे स्फोटक द्रव्यें तयार झालीं. रामशास्त्री, नानाफडणीस, हरिपंततात्या, महादजी, अहल्याबाई यांच्या सारखीं जीवंत जीवनाची मंडळी निघाली तर सभोंवतालचें वातावरण दमट होऊन मोठा भडका उडावयास मध्यें थोडा विरंगुळा पडे. पण त्यांतल्या त्यांत दादासाहेबांसारखे

दिवटे निघाले, कीं ते जिकडे जातील तिकडे सपाटून भडका उडावयाचा! असा प्रकार शेवटीं शेवटीं सर्व मराठेशाहींत माजला! शिवाजी महाराजांचा--मराठी राज्याचा--प्राण वांचविण्यासाठीं अहोरात्र झटणारे बाजीप्रभू, तानाजी मालुसरे, इत्यादि शूर सात्त्विक महात्मे कोणीकडे व ब्रह्महत्येचें पातक केलें असतांही त्यास साह्य करणारे स्वार्थी, पोटार्थी, अधमाधम चांडाळ कोणीकडे!

असो. याप्रमाणें हा विषय वाढून विषयांतर फारच होऊं लागेल. पण वरील विचार सांगावयाचें कारण हें कीं, आमची त्या वेळची परिस्थिति किती शोचनीय होती ती कळावी. या परिस्थितींतून वर काढावयास शिवाजीसारखा महात्मा एखादाच होतो. त्या वेळीं दादासाहेबांविरुद्ध जी थोडीबहुत मंडळी होती त्यांतच ही बाई होती. पेशव्याशीं जूट राखून कामकाज करावें याबद्दल तिनें जे उद्गार[१] काढले आहेत, ते फारच मननीय आहेत:—

'केवळ धनी पै दर पै चाकरीस बोलवीत असतां न जावें आणि घरांतच रामायण कथीत बसावें, हें कोणास पुरवणार नाहीं. कामगारांनीं चाकरीच करावी. चाकरीचे....धंदा काढून बसावें हे काय गोष्ट आहे? आम्ही त्यास नित्य हेंच म्हणतों कीं, तुम्ही चाकरीस रुजू असा. धन्यावर मसलत पडली आहे. हा समय घरीं बसायाचा नव्हे. त्यांणीं हे कजिये उपस्थित केले आहेत त्यास सेवक लोकांनीं वल्गना मनास येईल तशा कराव्या, आणि सर्वांनीं तमाशे पाहत असावें. आपले कजिये लोकांचे येथें गेल्यास मग काय महत्त्व राहिलें?' *

---

१ म. द. बातमीपत्रें भा. १, पा. ८५.

* हे बाईचे विचार वाचून महाभारतांतील घोषयात्रेचें स्मरण होतें. चित्रसेन गंधर्वानें दुर्योधनास पकडलें, तेव्हां त्याच्या मंत्रिजनांनीं हें वृत्त धर्मरा-

श्रीमंताचे कामाबद्दल अहल्याबाईस काय वाटे तें:—

'मुख्य गोष्ट स्वामिकार्य आधीं. त्यांनीं पुण्यास श्रीमंताकडेस जावें. स्वामिकार्य करून मग येथें यावें. आह्मी त्यांचेच आहों. धन्याचा संतोष राखून यावें हें उचित आहे. मग आह्मांसही भेटावें[२].'

श्रीमंतांबद्दल बाईचे असे अनेक ठिकाणीं उद्गार आहेत. बाईची श्रीमंतांच्या ठिकाणीं किती निष्ठा होती याचे उल्लेख दोन्ही वकीलांच्या पत्रांत आहेत. व त्यांपैकीं कांहीं उतारे या पुस्तकांत आलेच आहेत. तथापि येथें दोन लहान उतारे दिल्यावांचून रहावत नाहीं.

येथील मानस पाहतां, **येथील लक्ष धन्याच्या पायांशीं खचित आहे.** मजला वारंवार पुसतात कीं, पुण्याकडून कांहीं तुमचीं पत्रें येत नाहींत, तें कां? डांकेबरोबर छ १ मिहूनचें पत्र आलें तें परभारा बाईजवळीच गेलें. त्यांनीं लाखोटा फोडून पाहिला त्यांत मजकूर हाच होता जे, 'तुम्हीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. वर्तमान विदित जालें. यावरही बारीक मोठें वर्तमान लिहित जाणें.' पत्र लहान होतें. चार पांच ओळी होत्या. त्यावरून हांसूं लागली जे, 'इतकें लांबचें पत्र एवढेंसें! कोऱ्या कागदाची चौकशी फार आहे,' असें बोलली.+

---

जास सांगितलें. त्यानें सुयोधनास मुक्त करावयाची आपल्या भावास आज्ञा केली. पण बंधुराज कांकूं करतात हें पाहून धर्मराज म्हणाले—

> ते शतं हि वयं पंच परस्पर-विवादने ॥
> परैस्तु विग्रहे प्राप्ते वयं पंचाधिकं शतम् ॥

२ म. द. बा. पत्रें, भाग १, पान ६०.

+ म. द. बातमीपत्रें, भाग १. पा. ६५,

हे वकिलाचे उद्गार आहेत. आतां स्वतः बाईचे सांगतों—

**आमचे वडिलांपासून आजपर्यंत श्रीमंतांच्या पायाशीं अवज्ञा घडली नाहीं. श्री सर्वोत्तम पुढेंही आम्हांजवळून अन्यथा विचार त्यांच्या पायाशीं घडवणार नाहीं***.

याप्रमाणें अहल्याबाईची राजभक्ति प्रदर्शित करणारे अनेक उद्गार सांगतां येतील. अहल्याबाई आपल्या धन्यास डाली पाठवित असे. त्यांत निष्ठावंत भावापेक्षां दुसरा उद्देश होता, असें समजणेंही हीन मनाचें द्योतक होईल असें वाटतें. या डालीचा उल्लेख गमतीचा वाटल्यावरून तो येथें देतों.

'गंगाजलनिर्मल अहल्याबाई होळकर यांणी मेवे जात नासपरतीं सुमारें सहा हे पेशजीं डाकेबरोबर सेवेसीं पाठविलीं आहेत. पावले असतील. प्रस्तुतही बाईनीं मेवा श्रीमंतांकारणें पाठविला आहे. आंगुरे पेटारी, व दाळिंबें बेदाणा ५, व नासपाती २, व शेव १ एकूण सुमारे नऊ डालींत घाळून सफेद गळेफानें मढून, लाखी मोहर करून बाईनीं सेवकाकडे पाठविली कीं, डाकेबरोबर श्रीमंतांचे सेवेसी लवकर पावते करून उत्तर आणवणें. म्हणून रुबरू सांगितलें. त्याप्रमाणें डाकेबरोबर डाली सेवेसी पाठविली आहे. सेवेसी पावली यावर अहल्याबाईच्या पत्राचें मेवा पावलीयाचें उत्तर लेखकास आज्ञा करणार धनी समर्थ.' §

असो. ही राजनिष्ठा आमच्या अंगीं अनादिकालापासून पूर्णपणें खिळल्यामुळें त्याचें आणखी विवरण येथें नको. आतां बाईच्या स्वतःच्या संस्थानांतील अत्यंत महात्त्वाच्या गोष्टींकडे वळूं.

---

* म. द. वा. भा १. पा. ७८.

§ म. द. वा. भा. १. पान १०५.

अहल्याबाईच्या राज्यकारभारांतली अत्यंत महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे भील, गोंड, रामोशी इत्यादि ज्या गुन्हेगार जाती आहेत त्यांचा तिनें योग्य बंदोबस्त केला ही होय. या लोकांनीं त्या काळीं मोठा धुमाकूळ उडवून दिला होता. त्यांच्यापासून प्रजेस मोठा त्रास होत असे. या लोकांचा चोरीचा धंदा पिढीजाद होता. हा धंदा ते उघडपणें व मोठ्या संभावितपणें करीत. धाडा टाकणें, मारामारी करणें इत्यादि कामें ते लोक आपलें आद्यकर्तव्यच समजत. त्यांपैकीं कोणी ह्मणत कीं, "मी महादेवाचा चोर आहें. 'पृथ्वीवर लोक फार झाले आहेत, त्यांचा संहार करावा' अशी आम्हांस देवाची आज्ञा झाली आहे." एकंदरींत सांगावयाचें तें हेंच कीं, दरोडा घालणें हें त्यांच्या धर्मकृत्यांतलें एक कलमच होऊन गेलें होतें. सुधारणेच्या शतकांतला एखादा तरतरीत सुशिक्षितही आपलें कर्तव्य काळजीपूर्वक करणार नाहीं, इतक्या काळजीपूर्वक हे लोक आपला धाडा घालावयाचें कर्तव्य करीत! अशा लोकांपासून आपल्या प्रजेचें संरक्षण करणें, हें राज्ञी या नात्यानें तर तिचें कर्तव्य होतेंच, पण तिनें त्यांच्याशीं दंडेली न करतां प्रेमभाव संपादून त्यांस कायमचे सन्मार्गीं लावलें, हें त्याहून अधिक हितकर, प्रशंसनीय व पुण्यमय कृत्य आहे. लोकांची इतके दिवस चालत आलेली पूर्वपरंपरा मोडून त्यांस दुसऱ्या मार्गीं नेणें हें काम किती कठीण आहे, हें सुधारक लोकांस विचारावें! कांहीं सुधारकांस तर स्वतःच पसंत केलेल्या मार्गानें जातां येत नाहीं, व ते त्या मार्गाच्या आरंभींच आंधळे व पांगळ्यासारखे पडून राहातात, मग ते दुसऱ्यांस त्या मार्गानें कसे नेणार! आपल्या; स्वतःजवळ जर कांहीं भांडवल नाहीं, दुसऱ्याचें उसनें घेतलेलें भांडवल; तर त्या भांडवलावर फायदा मिळवून स्वतः तो सर्व

फायदा आपलाच आहे, असें जर कोणी लोकांत भासवूं लागला, तर त्यापासून त्याची श्रीमंती कितीशी वाढणार! व या बेगडी श्रीमंतीच्या बळावर लोकांस तो काय देणार! अशांचा सर्वच तोंडी व्यवहार! पण अहल्याबाईचें भांडवल इतकें मोठें होतें कीं, त्यायोगें ती स्वतःच श्रीमंत झाली नाहीं, तर तिनें कित्येक लोकांस श्रीमंत केलें व तिचें भांडवल आजलाही लोकोपयोगी पडत आहे! तेव्हां तिची केवढी बरें धन्यता वर्णावी? एखाद्यास द्रव्यसाह्य करून श्रीमंत करणें हें फार सोपें आहे, पण अशिक्षित व धर्मवेड्या लोकांतील दुष्ट चाली काढून त्यांस सन्मार्गीं लावणें, हें अधिक कठीण आहे—आणि म्हणूनच अत्यंत पुण्यमयही आहे. मोरोपंतांनीं—

**चुकल्या जनास कोणी सांगुनि निजहित, पथासि जो लावी।**
**धनदेंहि उपकृतीशीं त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥**

हे जे उद्गार काढले आहेत, तें कांहीं उगीच नव्हेत. असे जे अत्यंत थोडे परोपकारी लोक आहेत, त्यांतच या बाईची गणना केली पाहिजे.

अहल्याबाईस या लोकांचा पहिल्यांदां नीटसा बंदोबस्त करितां येईना. याचें कारण तिच्या अंगीं चातुर्य अथवा सामर्थ्य कमी होतें अशांतला कांहीं भाग नाहीं. हे गुण तिच्या अंगीं होते. पण तिला अत्यंत अडाण्यांशीं वागावयाचें होतें. त्यांतून ती खस्ता खाऊन निघाली, म्हणून—

**विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥***

---

*केलें जरी बहुत जर्जर विघ्नघातें ।
प्रारब्ध उत्तमजनीं न विसंबिजेतें ॥

वामन.

या भर्तृहरीच्या न्यायानें तिची 'उत्तम पुरुषां'तच गणना केली पाहिजे. लुटारूपणा करावा ही जर त्यांना धर्माची आज्ञा होती, अर्थात् ती जर त्यांची प्रामाणीक समजूत होती, तर मग त्यांनीं हा आपला धोपट मार्ग इतक्या सुलभतेनें सोडावा तरी कसा? एकदां तर ह्या लोकांनीं तिच्या राज्यांत अत्यंत धुमाकुळ उडवून दिला. तेव्हां तिनें त्यांस सामदामाच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या. पण हा सारा प्रकार 'गांवढ्यापुढें वाचली गीता आणि रात्रीचा गोंधळ बरा होता' अशापैकींच होत असे. त्या लोकांपैकीं कांहीं लोकांनीं होळकरांच्या संस्थानांत मोठा दरवडा घातला. तेव्हां तिनें त्या लोकांपैकीं मनरूपसिंग इत्यादिकांस पकडलें, व अगदीं इलाज नाहीं असें पाहून, केलेली नुकसानीं मनांत आणून आणि लोकांत चांगला वचक राहावा ह्मणून त्यांच्या पुढाऱ्यास तोफेच्या तोंडीं दिलें! याप्रमाणें तिनें प्रथम कांहीं कडक उपायांची योजना अगदीं निरुपायानें अमलांत आणली. पण या कामीं तिचें वर्तन—

**सर्वत्र क्रोध जसा तैसी सर्वत्र न क्षमा साजे, ।**
**ते कैसे न वधावे, तोडिति परघातदक्ष मासा जे ?॥ ५० ॥**
**(येऊंद्या कोप मनीं ) एकिकडे संप्रति क्षमा राहो ।**
**कां गोष्पदांत बुडतां ? यश रक्षा, खळ विपक्ष मारा हो ! ॥५१॥**
**क्रोध असावा समयीं, केवळ वश चित्त न क्षमेला हो ! ।**
**कोप त्यजितां जरि जमदग्नि धनुर्वेददक्ष, मेला हो! ॥ ५२ ॥**

मोरोपंत, वनपर्व अ० २

या द्रौपदीच्या मताप्रमाणें होतें. कांहीं लोकांस अहल्याबाईची ही कृति क्रौर्याची वाटेल, पण मालकम साहेबांसारख्या, संपन्न राष्ट्रां-

तल्या सुशिक्षित तरवारबहाद्दरास जेव्हां या लोकांशीं झगडण्याचा प्रसंग आला तेव्हां, त्यांची जी स्थिति झाली तें व त्यावर ते काय म्हणतात तें, हें त्यालोकांनीं पाहावें, म्हणजे मग त्यांस आपलें म्हणणें मागें घ्यावें लागेल असें वाटतें. मालकम म्हणतो, "**मनरूपसिंग या चोरट्या सरदाराच्या वंशजाचा दंगा मोडावयास मला सारखा तीनवर्षें त्रास झाला, त्यामुळें अहल्याबाई सारख्या शांत माणसासही आपली शांति कशी सोडावी लागली, हें माझ्या फारच चांगल्या रीतीनें लक्षांत आलें.**"

हे **गोंड** लोक धाडे घालून त्यावर आपली उपजीविका करीत. त्यांचे धाडे बंद करावयास तिनें जागोजाग नाकीं घातलीं, व ते धाडे पडावयाचें बंद केले. परंतु त्यांना नीट वाटेवर आणावयास तिला पुष्कळच खटपट करावी लागली. आसपासच्या लोकांचा माल जेव्हां या **गोंड** लोकांच्या हद्दींतून जात असे, तेव्हां त्या जाणाऱ्या येणाऱ्या लोकांचा कांहीं कर असे, त्यास **भील-कवडी** ह्मणत. त्या कराबद्दल तिनें त्यांचा अधिकार मान्य केला. पण त्यांची ही एक गोष्ट मान्य करून तिनें आपला–व मुख्यतः त्यांचाही फार फायदा केला. अशा गोष्टी करावयास जें एक धोरण लागतें, तें तिच्यांत होतें. तिनें त्या लोकांस पडत जमिनी हकावयास दिल्या. शिवाय त्यांना कांहीं हद्द नेमून देऊन त्यांस ताकीद केली कीं, जर कोठें चोरी झाली, अथवा माल गेला तर त्याचा तपास लावून द्यावा. हा करार त्यांनीं मान्य केला. हें काम म्हणजे चोराचा माग काढावयास चोरांचीच नेमणूक करणें होय! अशा युक्तीनें तिनें आपलें कार्य उरकून घेतलें. तिचें करणें म्हणजे—

**चोर भांडारी करावा । घसरतांची सांभाळावा ॥**
**गोंवा मूर्खपणाचा काढावा । हळू हळू ॥**

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवी करवावें ॥
कित्येक खलक उगवावें । राजकारणामध्यें ॥
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ॥
सज्जना परीस आळवावे । महत्व देऊनी ॥
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ॥
याकारणें ते वाट । बुझून टाकावी ॥

दासबोध, दशक १९, समास ९.

या समर्थ–तत्त्वानुरूप होतें. तिनें आपले धाडे पाडण्यांत काय युक्ति योजली ती ह्याही लोकांच्या लक्षांत आली नाहीं. ते स्वतः चोरच होते. पण आपल्या लोकांस साह्य करावयाचें ह्मणून ते एकमेकांच्या हद्दींत धाडा टाकीनातसे झाले. याप्रमाणें या मोहनीमंत्राच्या योगानें त्या भोळवट भस्मासुरांनीं आपण आपल्या डोक्यावर हात ठेवून आपल्या वृत्तीस जाळलें व आपण विभूति जाहले. वरील योजनेनें या लोकांचा फारच चांगला बंदोबस्त लागला. तिनें त्या लोकांस जी शिस्त लावून दिली, ती त्यांस फारच हितावह झाली. त्यायोगें ते लोक फारच संतुष्ट होऊन आपल्या मालकिणीशीं प्रामाणिकपणें वागूं लागले. या लोकांस अनंतफंदी सांपडला होता. पण फंदीबोवांस * अहल्याबाईकडे जावयाचें आहे, हें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां त्यांनीं त्यास अहल्याबाईकडे पोहोंचते केले! अहल्याबाईचा हा गुन्हेगार जातीचा बंदोबस्त पाहून मालकम अत्यंत कौतुकानें म्हणतो, " **या लोकांचा बंदोबस्त मला याच रीतीनें करावा लागला. डोंगरांतील अत्यंत रानटी भीलसुद्धां ' मला अह-**

* या फंदीबोवांची गोष्ट " आख्यायिकेंत " दिली असून त्यांचा महेश्वरचा कटाव पुरवणी ' इ ' दिला आहे.

त्याबाईनें जें दिलें तें चालवा. त्यापेक्षां आम्हांला अधिक नको! असे उद्गार काढतो! या बिकट राज्यव्यवस्थेच्या प्रसंगीं तिनें शहाणपणाचें वर्तन केलें, त्यास नांव म्हणून ठेवावयास जागा नाहीं."

सुधारलेल्या राष्ट्रांतील अत्यंत निष्णात मनुष्याचे व ज्याचा तिच्या राज्यव्यवस्थेशीं प्रत्यक्ष संबंध आला अशा मनुष्याचे हे तिच्यासंबंधीं उद्गार आहेत. अशा स्थितींत कांहीं तरी तर्क रचून तिच्या राज्यव्यवस्थेस नांव ठेवणें किती बरें धोक्याचें आहे? मालकम साहेबाचें राजकार्यधुरंधरत्व तर प्रसिद्धच आहे. असा मनुष्य प्रत्यक्ष अनुभवानें प्रेमळपणें तिचे गुणानुवाद गातो व साडेतीन शहाण्यांतले संबंध शहाणे जे देवाजीराव ते तिच्यासंबंधीं तिला बाधक असें * मत देतात!

---

* ह्या देवाजीरावाच्या पत्रावरून व इतर गोष्टींवरून रा० पारसनीस बाईच्या कारकीर्दीचें पर्यालोचन करतात — "ह्या चरित्रावरून अहल्याबाईच्या कारकीर्दीचा मराठी राज्यावर इष्ट किंवा अनिष्ट परिणाम काय झाला, हें विशेष शिकण्यासारखें आहे. मराठी राज्याची इमारत केवळ आपसांतील गृहकलहामुळें रसातळास गेली हें दाखविण्याकरितां हें चरित्र केवळ आरशाप्रमाणें उपयोगी पडेल ... तुकोजी व त्याचे पुत्र आणि त्याचे मुत्सद्दी ह्यांच्यामध्यें अहल्याबाईच्या **सर्व कारकीर्दीभर** जे झगडे चालले होते ते सांगूं गेलें तर एक ग्रंथ होईल. ह्या गृहत्रासामुळें तिला आपला जीव अगदीं नकोसा झाला होता. परंतु तिच्यामध्यें स्त्रीजातीस भूषण परंतु व्यवहारास दूषण अशी जी एक सौम्य, कोमल, मृदु किंवा प्रेमळ अंतःकरणवृत्ति अथवा दया होती, ती तिच्या **सर्व कारकीर्दींत** जागोजाग नडत असे...... ह्या वेळीं (१७९४ च्या सुमारास) होळकरदरबारची स्थिति देवराव महादेव हिंगणे यांनीं जी वर्णन केली आहे ती पराकाष्टेची शोचनीय आहे. सर्व राज्यामध्यें बाईवांचून एकही चांगलें व समजूतदार मनुष्य नाहीं असें त्यांत स्पष्ट लिहिलें आहे. (वि. ज्ञा. विस्तार, वर्ष ३८, पान १६६-१६८). असें होतें तरी रा० पारसनीस तिच्या संबंधीं "तथापि राजकर्त्री ह्या नात्यानें तिची योग्यता कमी प्रकारची होती

देवराव सबंध शहाणे खरे, पण त्यांनीं महेश्वरास अल्पकाळ राहून पुण्याचें धोरण पाहून मग मत दिलें. मालकम साहेबानें अत्यंत बारकाईनें चवकशी करून व कांहीं गोष्टींचा तर प्रत्यक्ष अनुभव घेऊन मग मत दिलें. यांत खरें काय, खोटें काय तें ज्यांनें त्यानें पाहावें. देवराव हे साडेतीन शहाण्यांत आधींच विराजमान झाल्यानें त्यांच्या शहाणपणाचा लौकीक होणें नाहीं. पण मागचा पुढचा संबंध व दुसरी बाजू न पाहातां आम्हीही तीच री ओढूं लागणें बरें नव्हे.

अहल्याबाईचा लौकीक सर्व दूर पसरला असल्या कारणानें तिला लांबलांबचे विद्वान लोक भेटावयास येत. असे पाहुणे लोक कधींही विन्मुख जात नसत. याचे दाखले जितके द्यावे तितके ते थोडेच होतील. ती सर्वांस ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें बक्षिसें देऊन त्यांचा सन्मान करी. ती लांबलांबच्या हरिभक्ति परायण लोकांस व विद्वानांस आपल्या राज्यांत बोलावीत असे.

---

असें कदापि मानतां येणार नाहीं." असेंही ह्मणतात! वरील विधानांचें खंडण करावयास रा० पारसनीस यांच्याच लेखांत भरपूर साधनें आहेत.

भाग अकरावा

# स्वरूपवर्णन व दिनचर्या.

गरुडध्वजचरणाश्रित चरितश्रवण त्रिताप संहरितें ।
भगवत्प्रेम वसाया करितें हृदयासि पिटुनि अंह रितें ॥
मोरोपंत, शल्यपर्व, अ. १.

अहल्याबाईचें बहुतेक चरित्र आतांपर्यंत सांगण्यांत आलेंच आहे. त्याचप्रमाणें तिची राजकर्त्री या नात्यानें योग्यता किती आहे, याचेंही विवेचन करण्यांत आलेंच आहे. या भागांत तिचें स्वरूपवर्णन, दिनचर्या या व अशाच इतर कांहीं गोष्टी सांगावयाचें योजलें आहे.

अहल्याबाईचा बांधा मध्यम, सडपातळ व सुटसुटीत होता. तिचा वर्ण सांवळा असून केंस काळे भोर होते. तिचा चेहरा पाणीदार असून त्यावर भावीकपणाचें तेज तळपत असे. ती दिसण्यांत फार सुंदर नव्हती, तरी ती अत्यंत तेजस्वी दिसे. हें तिच्या तोंडावरील तेज शेवटपर्यंत तसेंच होतें. तिच्या तोंडावर तिच्या सोज्वल चरित्राचा ठसाच वठला आहे, असें वाटे. तिचीं वस्त्रें

पांढरीं शुभ्र पण साधीं असत. ती बसावयास पांढऱ्या घोंगड्यांची आसनगादी घेई, असें तिचें वर्णन केलेलें आढळतें. तिची वृत्ति सदा शांत असे. पण तिला असत्याचा अत्यंत तिटकारा असल्यानें जेव्हां कोणी कधीं तिच्याशीं असें आचरण करी, तेव्हां तिला इतका कोप चढे कीं, तिच्या कृपेंतली मंडळीही तिच्यापुढें जाण्यास धजत नसत. अशा वेळीं लोक तिच्यापुढें जावयास चळचळ कांपत. तिचा राग फार अनिवार असल्यानें ती त्यावेळीं अपराध्यास कडक शासन करी, पण त्यावेळची शासनपद्धति पाहतां ती जें शासन करी तें कडक होतें, असें ह्मणतां येणार नाहीं. लोकांनीं आपल्या अपराधापासून परावृत्त व्हावें, अशा प्रकारचें ती शासन करी. तिचें उतार वय झालें होतें, तरी या स्वभावांत फरक पडला नाहीं. तुकोजीरावाचा मुलगा मल्हारराव हा बराच हूड असून पुंडाई करूं लागला होता. त्यासंबंधानें बाई व चौघे पांचजण कारभारी गोष्टी बोलत बसले होते. सायंकाळची वेळ होती. इतक्यांत त्याचा खासबरदार बातमी काढावयास म्हणून किल्लयांत आला, तो मंडळी बसली होती तेथें येऊन उभा राहिला. इतर कांहीं जवळच होते, त्यांनीं बाईस सांगितलें कीं, "हा खासबदार चिरंजीवांकडील असून तो बातमी काढावयास येथें आला आहे." हें ऐकतांच त्या बाईनें त्याला जासुदाकडून काठ्यांखालीं मारलें. त्यांत त्याचा हात मोडला. नंतर कैदेंत घातलें. * याप्रमाणें तिला राग येत असे खरा, पण ती एकंदरींत वाजवीपेक्षांही ज्यास्त क्षमाशील असल्यानें असे रागावण्याचे प्रसंग फारच क्वचित येत. ती नेहमीं शांत, सौम्य व प्रेमळ अशीच असे. तिच्याविरुद्ध असणाऱ्या वकिलानेंही ' सक्रोधता जी लिहिली ती प्रसंगानुरूप, त्याप्रमाणें

* महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें भाग २ पान १५७.

चित्तांत नाहीं ¶' असे अनेकदां उद्गार काढावे. यावरून आम्ही म्हणतों त्याची साक्ष सहज पटेल.

दादासाहेबांची पत्नी आनंदीबाईही जेव्हां धारेस आली, तेव्हां तिच्या कानावर अहल्याबाईची कीर्ति स्वाभावीकपणेंच गेली. ती ऐकून आनंदीबाईस मत्सर उत्पन्न झाला. या प्रसंगाची मालकमसाहेबानें एक गमतीची गोष्ट सांगितली आहे. ती गोष्ट येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. आनंदीबाईनें अहल्याबाईची कीर्ति जेव्हां सर्वतोमुखीं ऐकली, तेव्हां, ही बाई आहे तरी कशी, हें जाणावयाची तिला प्रबल इच्छा उत्पन्न झाली. पण स्वतः तिची भेट घेऊन ती इच्छा पूर्ण करावयाची कांहीं सोय नव्हती, म्हणून तिनें आपली एक दासी महेश्वरास पाठविली. ती दासी आपल्या यजमानणीच्या इच्छेप्रमाणें अहल्याबाईस पाहून परत धारेला आली, व आनंदीबाईस सांगूं लागली कीं, " अहल्याबाई रूपानें इतकी सुंदर नाहीं खरी. पण तिच्या तोंडावर देवाचें तेज झळकत आहे." हें ऐकून आनंदीबाईला वाईट वाटलें. तथापि आपण तिला निदान एका गोष्टींत तरी मागें टाकिलें, असें वाटून ती मोठ्या डौलानें आपल्या दासीस म्हणाली कीं, " तुझें पुरे! पण ती सुंदर तर नाहींना!"

अहल्याबाईविषयीं श्रीमंतांचे मनांत अत्यंत पूज्यभाव असल्यानें त्यांनीं तिची तसबीर काढावयाचें मनांत आणलें. * पण, ' तसबीर

---

¶ म. द. बा. भाग २, पान ३.

* हें जें काम श्रीमंताला करतां आलें नाहीं, तें काम मुंबईचे रा. धुरंधर यांनीं केलें आहे! त्यांनीं अहल्याबाईसंबंधानें कांहीं कल्पना बसवून तिचें एक चित्र काढलें आहे. येथपर्यंत ठीक आहे. पण त्यांत या बाईचे अलीकडील काळास शोभेसे उफराटे केस काढले आहेत!! म्हणजे तें चित्र ' कल्पनामय-' खऱ्या

ही देवादिकांची काढावी, मनुष्याची काढूं नये' या सबबीवर तिनें त्यांस आपलें चित्र काढूं दिलें नाहीं. काय ही लीनता! असें जरी होतें, तरी तिनें जयपुरच्या एका कारागिराकडून आपल्या मूर्ति करविल्या व त्या इंदूर, अलहाबाद, नाशिक, गया, अयोध्या, महेश्वर इत्यादि ठिकाणच्या मंदिरांत ठेवल्या. तिनें ह्या मूर्ति पसंत केल्याचा उल्लेख कागदोपत्रीं आढळतो. त्या सर्व मूर्तींत एक प्रकारची साम्यता आहे. त्यांपैकीं कांहीं मूर्ति तर फारच उत्तम साधल्या आहेत. या मूर्ति करविण्याचें व त्या मंदिरांत ठेवण्याचें प्रयोजन हेंच कीं, आपण एक ईश्वरभक्त आहोंत, व ईश्वराची प्रार्थना करीत आहोंत, असा आपला मार्ग लौकिक राहावा. त्या मूर्ति मंदिरांत स्थापावयाच्या हेतूनें ठेवल्या नसून ती ईश्वरसेवा करीत आहे, हें दाखविण्यासाठीं त्या तेथें ठेवल्या आहेत. ह्यापेक्षां त्या मूर्ती घडविण्यांत तिचा दुसरा हेतु कोणताच नव्हता. आतां हिंदुलोक मालकम ह्मणतो त्याप्रमाणें तिला रामाच्या मूर्तीजवळच बसवितात, हा भाग निराळा. + आह्मीं हिंदु-

नव्हे अशा-अहल्याबाईचें झालें आहे! अलीकडे चित्रें काढावयाचा सुळसुळाट झाला आहे. पण या चित्रकारांनीं कांहीं तरी भराभर व चोरून चित्रें न काढतां ज्याचें चित्र काढावयाचें त्याच्या चरित्राचें चांगलें मनन करून मग त्याचें चित्र काढावें. या चित्रकलेबद्दल सुप्रसिद्ध गृहस्थ डॉ. कुमारस्वामी यांचें "मॉडर्न रिव्ह्यु" या उत्तम मासिकांत व इतर ठिकाणींही पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले आहेत, ते चित्रकारांनीं अवश्य मनन करावे. याच मासिकांत मागील कालाबद्दल किती सुंदर चित्रें येतात! पण आमच्याकडे सारें अर्धवटच दिसतें. या गोष्टीचा रा. धुरंधर व इतर चित्रकार शांत चित्तानें विचार करोत!

+ अहिल्याबाईच्या मंदिरासंबंधीं 'मॉर्डन हिस्ट्री ऑफ इन्डियन चीफस राजास, झमीन्दारस इ०' या पुस्तकांतील एक उतारा वाचण्यांत आला आहे तो—

Like some of the females of the heroic ages **Ahalya** Bai possessed many noble qualities, and has

लोकांनीं तिला सीतेशेजारीं बसविलें नसतें तर मात्र आश्चर्य होतें खरें. प्रतिमापूजन हा आमचा युगानुयुग जडलेला स्वभाव आहे. यामुळें या लोकोत्तर स्त्रीला आमचे लोक भक्तिभावानें देवाशेजारीं बसवोत, पण ती साध्वी आपणा स्वतःला फारच कमी प्रतीची समजत असे. तिचा जर कोणी बडेजाव केला, तर तें तिला मुळींच खपत नसे. मोठे लोक स्वतःला नेहमींच लहान समजतात व लीनता हा त्यांच्या थोरवीचा मोठा कस आहे.

---

rendered her name immortal by the erection of magnificient temples at Indore, Hymalya, Set Bandyo, Remeshwar—Gaya, Benares, Jogannâth and other religions places. The architecture of **Nat-mandir** and that of the temple at Gaya known as Bishnupad, i. e. place containing the foot-prints of Bishnu, is indeed so very pleasing that it attracts the eye of all spectators. The very beautiful image of Rám and Janoki as also that of **Ahalya Bai** who, as their most faithful devotee is standing before them in a true worshipping posture are even now to be seen in a temple at Gaya. and create strong impressions upon the minds of Hindu pilgrims tending towards the systematic adoration of their Gods.

या मूर्ति स्वतः अहिल्याबाईनें करविल्या होत्या, हें माल्कम साहेबांस माहित नव्हतें, असें त्यांच्या लिहिण्यावरून वाटतें. साहेब मजकूरच्या या भागांचें भाषांतर करताना रा. ब. किर्तने यांनीं त्यावर टीप देऊन म्हटलें आहे कीं, ती मूर्ति गौतमऋषींची भार्या अहिल्या हिची आहे. पण हें म्हणणें चुकीचें आहे, हे वरील लिहिण्यावरून तर दिसून येईलच, पण हें बरोबर नाहीं असें म्हणण्याचें दुसरें असेंही कारण आहे कीं, गौतमाच्या भार्येस मंदिरांत स्थल मिळालेलें ऐकिवांत नाहीं.

अहल्याबाईच्या धर्मसमजूतीबद्दल महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत पुष्कळच उल्लेख सांपडतात. त्यांपैकीं येथें कांहीं देण्याचा विचार आहे. तिचा शकुनापशकुनावर पूर्ण विश्वास असून ती बाहेर कोठें निघतांना, अथवा कामें करतांना शकून अपशकून पाहत असे. तिचें वय फार झालें होतें, तरी तिचे उपासतापास सारखे चालू असत. बाईचे उपवास फार खडतर असत. तिचें उतार वय झालें होतें; पण कशीही प्रकृति असो, ती आपले नित्यनेम नेमानें पाळीत असे. विठ्ठल शामराजानें एके ठिकाणीं लिहिलें आहे *—

'सांप्रतचा मजकूरः मातुश्री अहल्याबाई यांस शैत्य—उपद्रव होऊन पांचसात दिवस बेताब होती. आतांसा कांहींसा आराम आहे. अद्याप बाहेर तों निघत नाहींत. परंतु वद्य नवमी व्यतिपातीं स्नान केलें. कांहीं दानधर्म केला. खंडेराव होळकराचा पक्ष होता, तो केला.'

त्याचप्रमाणें केसो भिकाजीनें लिहीलें आहे † —

भाद्रपद वद्य ३० स प्रातःकालापासून बाईंस हगवणीचा उपद्रव जाला तो बहूतच. तीस चाळीस वेग तेच दिवशीं जाले. (पण) आमावास्या ह्मणून औषध घेतलें नाहीं.

अहल्याबाईस एकादशीचें मौन असे. ती गाईची पूजा करी. ती आपल्या वयाच्या ६९ वर्षी गौतमाचे दर्शनास गेली होती, त्याबद्दलचा उल्लेख ¶ असा आहेः—

---

* हें पत्र इ. स. १७८३ चें आहे. म. द. बा. पत्रें, भा. १, पान २१८.

† म. द. बा. पत्रें, भाग २, पान ६५. ¶ ह्या पत्रास रा० पारसनीस यांनीं १५ जुलै इ० स० १७९४ ही तारीख लावली आहे.

' मातुश्री अहल्याबाई प्रातःकाळीं पायीं खडाव घालून गौतमीचे दर्शनास जात होती. त्यांत खडावसुद्धां पाय सरकला. त्यामुळें जरबेंत येऊन मोचलें. दुखापत झाली. '

मालकम साहेबांच्या कृपेमुळें आज आपणाला अहल्याबाईची दिनचर्या उपलब्ध झाली आहे. ती त्या इतिहासकारानें मोठ्या काळजीनें व कौतुकानें दिली आहे, ती अशी:—

अहल्याबाई ही सूर्योदयापूर्वी घटका अडीच घटका उठून स्नान करी व नंतर पूजा अर्चा करी. यानंतर ती नियमित कालपर्यंत पुराणश्रवणास बसे. नंतर दानें देऊन ती आपणासमक्ष ब्राह्मणांस भोजनें घाली. हें होत आहे न होत आहे तोंच तिचें ताट वाढून येई. तिच्या भोजनास सारे शाकभाज्यांचे पदार्थ असत. आपल्या जातींत मद्य-मांसाचा निषेध नसतांही तिनें असल्या प्रकारचे प्रत्येक पदार्थ सर्वथैव वर्ज केले होते. ती आपलें भोजन आटोपल्यावर पुनः कांहीं वेळ परमेश्वरस्तव करून थोडा वेळ वामकुक्षी करी. नंतर ती पोषाख करून सरकारी कामकाज करावयास दरबारांत जात असे. हिंदुलोकांत स्वभावतः पडद्याचें वेड नाहीं. पण ही चाल त्यांनीं मुसलमानांपासून घेतली. हें वेड ब्राह्मणेतर जातींत पुष्कळसें सांपडतें. पण अहल्याबाईचें वर्तन ब्राह्मणासही लाजविणारें असल्यानें तिनें ही चाल अमलांत आणली नाहीं. असो. ती जेव्हां दरबारांत जाई, तेव्हां बहुधा दोनप्रहर होत. तेथें ती सूर्यास्तापर्यंत म्हणजे सुमारें सहासात वाजेपर्यंत बसे. यानंतर दोनतीन तास पूजाअर्चा, फराळ वगैरे कृत्यांत जात. मग ती नऊ वाजावयाचे सुमारास सरकारी काम पुनः पाहूं लागे. तें ती अकरा वाजेतोंपर्यंत पाही. यानंतर ती निजावयास जात असे. निकडीचेंच सरकारी कामकाज असलें तर गोष्ट

निराळी, नाहींतर हा तिचा क्रम अबाधित असे. त्या बाईचें लक्ष निराहार, उपास, सणवार या गोष्टींकडे विशेष असे. तिचें वर्तन म्हणजे समर्थ म्हणतातः—

[ ओंव्या. ]

**मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ॥**
**तिसरें तें सावधानपण । सर्वविषयीं ॥ ४ ॥**
**चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ॥**
**अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ ५ ॥**
**जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ॥**
**नीतिन्यायास अंतर । पडोंच न द्यावें ॥ ६ ॥**
**संकेतें लोक वेधावा । ऐकून अनेक बोधावा ॥**
**प्रपंचही सांवरावा । यथाशक्त्या ॥ ७ ॥**
**प्रसंग समय वोळखावा । धीर बहुत असावा ॥**
**संबंध पडों न द्यावा । अति परिचयाचा ॥ ८ ॥**

दासबोध दशक ११ समास ५.

त्याप्रमाणें होतें, व तिचें चरित्र पाहिलें असतां आमच्याप्रमाणें इतर वाचकांसही वाटेल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

बाईस पंचायतनांतील बाणांची परीक्षा फार चांगली होती. याबद्दल येथें एक गोष्ट सांगावीशी वाटते. ती अर्थात् त्या काळवेळोंच्यां मानानें पाहावयाची. विठ्ठल शामराज तात्यास लिहितोः—

'बाणांचा मजकूर पेशजीं लिहिला. त्यास, आपले पसंतीस त्यांतून बाण आला नाहीं. येथें तों रेवामहात्म्यांत आहे कीं, चर्पट त्रिकोण कसाही बाण श्री ओंकारक्षेत्रींचा असल्यास त्याची भावेंकरून पूजा केल्यास श्रेयस्कर आहे. चांगले सलक्षण बाण कोठें निघत नाहींत.

तथापि, निघाला तर येथील भिल्ल ब्राह्मण मनास येईल तसा रुपया सांगतात. पाऊणशें, शंभर, चाळीस, पन्नास, असें मोल सांगतात. कित्येक ब्राम्हणांस चटक लागली आहे. ते कांहीं चांगले, त्यांत कांहीं कृत्रिम, असे पुण्याकडे घेऊन जातात. तिकडे त्यांस रुपया मिळतो. फार चांगला तो कृत्रिम घांसून करितात, असें आहे. असो. प्रस्तुत एक बाण पूजेस बाईजवळून मी मागून घेतला आहे. पंचायतनांत पुजायास ठेवला होता. आपण दोनचार वेळां लिहिलें. प्रस्तुत चांगला बाण कोठें मिळत नाहीं ह्मणून तोच बाण पाठविला आहे. बाईजवळ बाणाची परीक्षा फार आहे. त्यांजवळील परीक्षेचा बाण चांगला आहे. पंसतीस ये असाच आहे. पूजेंत ठेवावा. कोणास देऊं नये.'

म. द. बा. पत्रें, भा. १, पा. १९१.

अहल्याबाईच्या कारकीर्दीवर प्रभाकर या नांवाच्या एका प्रसिद्ध ऐतिहासिक कवीनें पोवाडा रचला आहे. तो पोवाडा म्हणजे तिची एक प्रकारची दिनचर्याच होय. अलीकडे कोणी उगीच कोणच्याही दृष्टीनें किंचित् मोठा झाला, कीं त्याचें भलें लांबलचक गुणवर्णन प्रकाशांत येऊं लागतें. मग ती स्वतः स्वारी कशीही कां असेना. व पुष्कळसे लक्ष्मीची इच्छा करणारे सरस्वतीभक्त आपलें ज्ञान त्याचें वर्णन करण्यांत खर्च करतात. पण सारीं शिफारसपत्रें तो असतांना किंवा त्याच्या पश्चात् कांहीं दिवस लोकांच्या डोळ्यापुढें राहातात, पण त्यांना इतर कांहीं आधार नसल्यानें तीं सारी लवकरच रसातळास जाऊन पोहोंचतात. यामुळें मनुष्याच्या गुणाची परीक्षा व्हावयास कांहीं काळ लोटावा लागतो. पण लोकांसमोर लवकर पुढें यावयाची ही कला त्यावेळेस प्रचलित नव्हती. यामुळें गुणी लोकांशिवाय इतरांस भाराभर लेखक आजच्यासारखे तेव्हां मिळत नसत. मनु-



देवी श्री अहल्याबाई.

ष्यानें आपल्या गुणानेंच लेखकास मोहवलें तर मात्र गोष्ट निराळी. बाकी पैशाच्या मोहानें असें असत्य लिहिण्याचें पाप करणारे त्या वेळीं फारच विरळा होते. प्रभाकर कवीचा पोवाडा कीर्तिनें लुब्ध झालेल्या वर्गापैकीं आहे. शिवाय त्याच्या सत्यपणाबद्दल मालकम साहेबांच्या पुस्तकांत तर दाखले सांपडतातच, पण रा. पारसनीस यांचे "चित्र-गुप्त" जे महेश्वर दरबारचे वकील त्यांच्याही पत्रांत बाईच्या असामान्य सद्गुणांबद्दल जागोजाग उल्लेख आढळतात. अर्थात् त्या प्रमाणांत या पोवाड्याच्या खरेपणास आणखी बळकटी येते. प्रभाकर कवि म्हणतो:—

*[पद]

सति धन्य धन्य कलियुगीं अहिल्याबाई ।
गेलि कीर्ति करुनियां भुमंडलाचे ठायीं +॥ धृ० ॥
महाराज अहिल्याबाई पुण्यप्राणी ।
संपूर्ण स्त्रियांमधिं श्रेष्ठ रत्नखाणी ॥
दर्शनें मोठ्या पापाची होइल हानी ।
झडतात रोग पापाची होइल हानी ॥
वर्णिती कीर्ति गातात संत ते गाणीं ।
झालि दैववशें ती होळकराची राणी ॥

---

* या पदाची चाल "भूपती खरे ते वैभव" या धर्तीवर कांहींशी आहे.

+ अहल्याबाईची कीर्ति तिच्या समोरच झाली. याबद्दलचा उल्लेख म. द. बातमींपत्रें यांत असा आहे —

आपण काशीस जाऊं म्हणतां, परंतु चौ देशांत तुमचीं जागां जागां छत्रें, कोठें तळीं, बावड्या व देवळें, धर्मशाळा असे जागां जागां धर्मकीर्ति फैलली आहे. सांप्रत तुम्हांजवळ कांहीं नाहीं. परंतु लौकिक लोपणार नाहीं. (भा. १ पा. १५८)

चाल ॥ उद्धार कुलाचा केला । पण आपला सिद्धीस नेला ।
महेश्वरास जो कुणि गेला ॥ चाल पहिली ॥
राहिला तेथ जो जाउन घेउन बाप भाई ।
संसार चालवी दीन दुबळ्यांची आई ॥ १५ ॥
प्रत्यहीं द्यावीं ब्राह्मणास दश दानें ।
ऐकावि पुराणें बहूत आनंदानें ॥
शोभती होमकुंडें द्विज वृंदावनें ।
टाकिती हजारों नेमांत अवदानें ॥

* * * * * *

॥ चाल ॥ कधीं कोटी लिंगें[1] करवावीं । वधुवरें कधीं मिरवावीं ॥

---

१ श्रावण मासाच्या उत्सवाचे उल्लेख महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत पुष्कळ आहेत. त्यांपैकीं दोन उतारे येथें देतों.

येथील वर्तमानः-सांप्रत श्रावण मासाचा उत्साह आहे. नित्य अडीच तीन हजार ब्राह्मणभोजन होत आहे. दोन तीनशें ब्राह्मण लिंगाच्या अनुष्ठानास लाविले आहेत. शें दोनशें ब्राम्हण शिवकवचास लावले आहेत. दीडशें ब्राम्हण शिवनामस्मरणास लावले आहेत. शें पन्नास सूर्य नमस्कारास लावले आहेत. शिवाय पंचवीस सारे ब्राम्हणांस दक्षणा दिली. पुढें जाणारे ब्राम्हण गेले. आतां तीन साडेतीन हजार ब्राम्हण आहेत. छत्रांत अडीच तीन हजार जेवतात. चार पांचशें ब्राह्मणांस शिधा नित्य देतात. भोजन दक्षणा रोज दोन तीन पैसे देतात. जन्म अष्टमीस एक एक रुपया देतील. आतां अनुष्ठानाचे ब्राह्मणांची दक्षणा मात्र राहिली आहे. लिंगेवाल्यास आठ रुपये, जपवाल्यांस पांच, शिवकवचास आठ नऊ, नमस्काऱ्यांस नऊ दहा, देतील अशी पद्धत आहे. प्रत्येक पदार्थ पक्वान्न करितात. थोडें थोडें करितात नित्य दक्षणा दोन पैसे. मध्यें एकदां एक एक रुपया देतील. याशिवाय शिध्याचे दोनतीनशें ब्राह्मण. नित्य शिधा श्रावणमासपर्यंत चालतो. संतर्पणही मासभर होईल. ब्राह्मणांचीं भोजनें जाल्यावर चार घटका दिवस राहतां, बाई स्नान करून घटका दोन घटका दिवस राहतां भोजन करितात. तेथेंही पंगतीस

अर्भका दुधें पुरवावीं ॥ चाल पहिली ॥
पर्वणी पाहुनी दान देतसे गाई ।
जपमाळ अखंडित हातीं वर्णूं काई ॥ १६ ॥
जेथें जोतिर्लिंग जेथें तीर्थें महाक्षेत्रें ।
घातलीं तेथें नेहमीं अन्नछत्रें ॥
ज्यासि आली जरा झाली कांहीं विकळ गात्रें ।
पुरवावीं त्यास औषधें वस्त्रें पात्रें * ॥
कितिकांनीं घेतलीं स्मार्त अग्नि होत्रें ।

---

पंचवीस तीस ब्राह्मण असतात. याप्रमाणें सांप्रतचें वर्तमान. श्री महाकाळेश्वर उज्जनीस पंचवीस ब्राह्मण श्रावण मासाचे अनुष्ठानास व श्री ओंकारेश्वरास पंचवीस ब्राह्मण प्रतीवर्षी जातात. आतांहि गेले आहेत. सेवेसीं श्रुत होय. (हें १७८३ चें पत्र आहे.)

म. द. बा. पत्रें, भाग १ ला, पा. २१३-२१४.

त्याचप्रमाणें:—

चंद्र २९ मोहरमीपासून चंद्र २ सफरपर्यंत बाईंबीं दक्षणा ब्राह्मणांस श्रावणमासची अनुष्ठानाची दिली. तीन सहस्र ब्राह्मण मिळाला होता. एक मासपर्यंत भोजनास सुंदर घातलें. दक्षणा पंचवीस हजारापर्यंत वांटली. गुदस्तापेक्षां यंदा अधिक दिल्ही. ब्राह्मण थोडाच मिळाला होता. शिवाय भोजनाची रोजची दक्षणा, याप्रमाणें होऊन लक्ष भोजनाची समाप्ति जाली. (हें १७९४ सालांतलें पत्र आहे.)

म. द. बा. पत्रें, भाग २ रा, पान २५७.

* याबद्दल महेश्वरच्या बातमीपत्रांत अनेक पुरावे आहेत. पण येथें एक लहानसा उतारा देतों 'व्यंकटरमण शास्त्री यांस देवाज्ञा जाली. हें वर्तमान पूर्वी डाकेबरोबर सेवेसीं लिहिलें होतें. त्यांस समाधान नव्हतें. तेव्हां बाईंनीं दोनशें रुपये औषधाउपायास दिल्हे होते. क्रियेसाठीं तीनशें रुपये दिल्हे. तेरावे दिवशीं त्यांच्या घरास जाऊन मुलास वस्त्र, एक शेला दिल्हा.'

म. द. बातमीपत्रें, भाग १, पान २०८.

ही वेदमूर्ती दादासाहेबाबरोबर सुरतेस होती. दादासाहेब शास्त्रीबोवांस कांहीं देईनात म्हणून ते तेथें राहून राहून कंटाळले, व महेश्वरास आले. दादासाहेबांच्या भानगडीबद्दल या वेदमूर्तीचें मत वाचनीय आहे. (भा. १, पान ७२.)

दिली स्वहस्तें करून त्या भटास क्षण मात्रें ॥
चाल॥ आधिं इच्छाभोजन द्यावें। उपरांतिक तीर्थ घ्यावें।
वाटून ताट वर मग न्यावें॥ चाल पहिली ॥
जेविल्या सर्व मग आपण अन्न खाई ।
रघुवीरचरित्रें ती रात्रीस गाई ॥ १७ ॥
आली यात्राकऱ्याला पंचे जोडे ।
कोणास आंगरखे कोणास धोतरजोडे ॥
कोणास दुशाला कोणास बट्टु घोडे ।
गवयास मिळावे सुवर्ण कंठी तोडे ॥

× × × × × × × ×

घाली गिऱ्याशाचे पायांत बेडे खोडे ॥
॥ चाल ॥ बांधिले घाट मठ फार। कुठें शिवास संतत धार।
कुठें ठेवतां पाणी गार॥ चाल पहिली ॥
त्यासाठीं मुशाफर कार्यें धांवत जाई ॥
विश्रांत पावती पाहुन आमराई ॥ १८ ॥
किती ग्रहण संधींत तीलतुला * त्या केल्या ।
कधिं कनक रौप्य आणि कधीं गुळाच्या केल्या ॥

---

१ मालकम साहेबाचा पुढील उतारा (भाग १, पान १८८. १८२४ ची प्रत) पहा—

During the hot months of the year persons were stationed on the roads to supply travellers with water; and at the commencement of the cold season she gave clothes to great numbers of her dependants, and to infirm people.

* बाईनीं श्रीसूर्यग्रहणास एक लक्ष रुपायांचा संकल्प करून हत्ती दान दिला. ३५ तुला केल्या. एक तुला मुख्य सुवर्ण व रुपये १६ हजार आपण व नातवास

सांभाळ करुनि काशीस यात्रा नेल्या ।
कावडी शतावधी रामेश्वरीं गेल्या ॥
संसारीं असून तिच्या वासना मेल्या ।
तिजपुढें सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या ॥
(चाल) कवि गंगु हैबती ह्मणती। पुण्याची कोण करील गणती।
राज्यास होती पडपण तीं । चाल पहिली ।
महादेव गुणीचें लक्ष तिचे पाईं ।
कवनांत प्रभाकर करीतसे चतुराई ॥ १९ ॥

यावरून बाई ही आपल्या प्रजेची खरी आई होती हें सहज दिसून येईल असें वाटतें. असो. आतां बाईच्या पुढील इतिहासाकडे वळावयाचें. पण त्यांत हृदयद्रावक भाग फार असल्यानें त्याची योजना या भागांत करणें बरें नव्हे. त्यासाठीं एक निराळाच भाग केलेला बरा.

---

घेऊन केली. याप्रमाणें दान धर्म केला. राजश्री रामराव त्रिंबक व राजश्री केसो गणेश कुंटे यात्रा घेऊन येथें पौष्य वद्य १२ आले. दीड हजार यात्रा आहे. बाईनीं सर्व यात्रेस मेजवानी रामकुंडावर सर्वांस भोजनास बोलाविलें...बाईनीं तेथेंच भोजन केलें....वरकड मोठी यात्रा घेऊन राजश्री मोरो बापूजी परभारें हुसंगाबादेवरून देशास गेले. ...सांप्रत बाईस अराणुक, यात्रेची रवानगी व दानधर्माचा विनियोगाच्या हर्षामुळें क्षणभर अवकाश नाहीं.

म. द. बातमीपत्रें, भाग २ रा, पान ११५.

भाग बारावा.

# मुक्ताबाईचें सहगमन.

**दे मज अग्नि स्वर्गीं पतिसह सुकृतें तुझ्याचि जाईन ।**
**बाई! न दया टाकीं! तेथें मी त्वद्गुणासि गाईन ॥**

मोरोपंत, आदि० अ० २०.

अहल्याबाईचें चरित्र पहातां तिच्या कारकीर्दीस ज्याप्रमाणें आधिभौतिक दुःखापासून प्रारंभ झाला, त्याचप्रमाणें तिच्या कारकीर्दीचा शेवटचा भागही अशा प्रकारच्या दुःखांतच समाप्त झाला. अहल्याबाईनें आपलें मन शेवटपर्यंत हरिपदीं अढळ ठेवलें, तें बर्फाच्छादित हिमालयाप्रमाणें निर्मळ होतें, ती आपल्या कर्तव्यापासून केव्हांही च्युत झाली नाहीं, हा सारा तिच्या चरित्राचा धार्मिक भाग झाला. त्या दृष्टीनें पहातां तिचें चरित्र दिवसें-दिवस उन्नत मार्गाकडेच होतें यांत शंका नाहीं; परंतु तिचें संसारमय जें जीवित होतें, तें फारच हृदयद्रावक होतें, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. तिचे दोघे भाऊ तिच्या उतारपणींच गेले. त्यापैकीं महादजीच्या मृत्यूबद्दल महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांत (भाग २, पान ४५) म्हटलें आहे:—

बाईचे बंधु महादजी शिंदे येथें कुटुंबासुद्धां होते. ते देशीं माघ मासीं घरास गेले. त्यांचा काल चैत्र शु० ९ मीं झाला. त्यामुळें

बाई बहुत श्रमी झाली कीं " मीच काळतोंडी वाचलें कशी ? सारीं मजदेखत गेलीं ! " तीन चार रोज शोक फारच केला.

या उद्गारावरून तिला विरहाचे चटके कसे बसत होते, त्याची कल्पना होते. एकंदरींत तिला गृहसौख्य फारच बेताचें होतें, असें म्हणावें लागतें. व जें थोडें बहूत होतें नव्हतें, तेंही लवकरच नाहींसें झालें. तिला पुत्रसुख फारच थोडें–पण छेः तेंही नव्हतें. कारण तो होता, तेव्हां तरी त्यानें तिला सुख व्हावें असें काय केलें ! पण तोही तिला फार दिवस लाभला नाहीं. मालेरावबावा गेल्यामुळें तिचा मुलीचा मुलगा जो नथ्याबा यावर तिचें प्रेम स्वाभाविकपणें फारच बसलें. त्यास होळकराची गादी द्यावयाची असाही तिचा बेत होता. अहल्याबाईस मुक्ताबाई या नांवाची एक मुलगी होती तिचा हा मुलगा. या उभयतांची हकीकत मागें दुसऱ्या भागांत थोडीशी आली आहे. धोंडीबाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं. मुक्ताबाई ही बहुतेक महेश्वरांतच राहत असे. या बाईचीही फारशी माहिती उपलब्ध नाहीं. मागें आनंदीबाई निंबाळकरणीच्या भेटीचा प्रसंग सांगितला आहे, तसे कांहीं प्रसंग आल्यास ती बाईकडून पेशवाईस जात असे. अहल्याबाईच्या स्वतःच्या मालकीचा तराणा परगणा होता. येथें बाईनें तिलभांडारेश्वर नांवाचें देऊळ बांधलें असून पुष्कळसे वृक्षही लावले होते असें ह्मणतात. पुढें मुक्ताबाईचें जेव्हां लग्न झालें, तेव्हां बाईनें हा तराणा परगणा आपल्या मुलीस दिला. तो तिच्या वंशांत इ. स. १८४९ पर्यंत होता. या बाईच्या मुलाचें लग्न * वैशाख शुद्ध ३ शके १७०२ ( इ. स. १७८० )

---

* या लग्नाबद्दल महेश्वर येथील पेशव्याच्या वकिलानें आपल्या पत्रांत असा उल्लेख केला आहे—

अहल्याबाईच्या नातवाचें लग्न अक्षयत्रितियेचे दिवशीं जाहलें. शरीरसंबंध बाईचे भाऊ शिंदे, त्याच्या लेकाच्या लेकीची लेक केली आहे. बाईस चोळी पातळ व फणशाकडे चार सनगें व शिंदाकडे चार सनगें असें सर्वत्रा मिळालें. त्याप्रमाणें मीही अहेर केला. म. द. बातमीपत्रें, भाग १, पान १८–१९.

रोजीं झालें. त्या वेळीं तो अवघा तेरा वर्षांचा होता. हा तिचा आवडता नातू तिच्या ह्मातारपणीं—पांसष्टाव्या वर्षी—ह्मणजे १९ नवंबर इ. स. १७९० त क्षयानें वारला. याच्या मृत्यूसंबंधानें केसो भिकाजी लिहितो—

'राजश्री यशवंतराव फणशे यांचे चिरंजिवास समाधान नव्हतें ह्मणून पेशजीं लिहिलें होतें. हल्लीं कार्तिक शुद्ध ७ स दानें, हत्ती वगैरे केलीं. दहा सहस्र रुपये धर्म केला. शेवटीं कार्तिक शुद्ध ९ सोमवारीं तृतीय प्रहरीं देवाज्ञा जाली. ( त्यांच्या ) **उभयतां स्त्रिया लहान होत्या. त्यांत एक वर्ष अठरांची व एक वर्ष दहांची; त्यांनीं धैर्य मोठें करून सहगमन केलें.** संपूर्ण अलंकार अंगावर घालून, अंबारींत बसून, बहुत समारंभेंकरून सती गेल्या. समागमें बाईही पायाउतारा चरणचाली स्मशानास गेली. अवघा विधि करून, सहा घटका रात्रीस माघारें आली. त्यानंतर दोन घटकांनीं प्रहररात्रीचे समयीं, सौभाग्यवती आनंदीबाई, राजश्री काशीराव होळकर यांची स्त्री, तिजला समाधान नव्हतें, तिचा काल प्रहर रात्रीस जाला. तेव्हां मागतीं तिचा सरंजाम करून, दोन प्रहर रात्रीं दहन केलें. दोहीं दुःखांचा परिहार मास पक्ष होत नाहीं. समाधान बहुत करितात. आम्ही समयास समाधानाच्या गोष्टी सांगितल्या. परंतु बाईची चित्तवृत्ति दुःखार्णवींच आहे. फार श्रमी होतात. येणेंप्रमाणें वर्तमान जालें. ‡'

‡ या पत्रावर रा० पारसनीसांनीं २० डिसेंबर इ० स० १७८७ अशी नजरचुकीनें तारीख लिहिली आहे. त्यांनीं याच भागांत जी इतर पत्रें छापलीं त्यांपैकीं दोन पत्रांत या मुलाच्या मृत्यूचा उल्लेख आहे. त्यांपैकीं एकांत म्हटलें आहे, " चिरंजीव **मुक्ताबाईचा गतवर्षी** मृत्यु पावला.:. " (पान १९९ ). या पत्रास त्यांनीं तारीख ९ डिसेंबर १७९१ ही दिली आहे. दुसऱ्या पत्रांत

तिच्या भावांस जाऊन फार वर्षें झालीं नव्हतीं. तशांत हा मृत्यु म्हणजे ज्यानें आपल्यानंतर वास्तविक पाहतां जावयाचें त्याचा झाला! अशा प्रकारचें दुःख म्हातारपणीं होणें म्हणजे तें एक प्रकारचें दुर्दैवच होय यांत शंका नाहीं. पण ही दुःखसमाप्ति येथेंच झाली नाहीं! ह्या प्रिय नातवाच्या दुःखांतून तिचें दुःख कमी होतें न होतें तोंच तिचा जांवई **यशवंतराव फणशे** हा ता० ३ डिसेंबर इ. स. १७९१ रोजीं वाऱ्यानें चार तासांत वारला! जे लोक तडक फडक जातात त्यांना अशा मृत्यूपासून सुख असो, पण पाठीमागच्या मंडळीस त्यायोगें जो धक्का बसतो, त्याचें वर्णन करणें कठिण आहे.

**यशवंतरावाच्या** मृत्यूमुळें * तिची मुलगी **मुक्ताबाई** हिला अपरंपार दुःख झालें. कारण तिचा तर सौभाग्यरवीच अस्तास गेला. ती **अहल्याबाईची** मुलगी, तशांत तिच्या दोन सुना सती गेल्या अशा लौकिकाची स्त्री होती. ती अशा प्रसंगीं घरीं स्वस्थ बसून मुळुमुळु का रडत बसणार? तिनें मोठ्या उत्साहानें पतीबरोबर सहगमन करावयाची तयारी चालविली. म्हणजे **अहल्याबाईच्या** दुःखांत आणखी भर! आपल्या मुलीनें सती जाऊं नये याबद्दल तिनें पुष्कळ खटपट केली. तिनें—त्या वृद्ध व पुण्यात्म्यानें--**मुक्ताबाईस**, 'तूं सती जाऊं नकोस' म्हणून राणी या नात्यानें, व आई या नात्यानें सामदामाचे पुष्कळ शब्द सांगितले. आपल्या मुलीस प्रस्तुत प्रसंगापासून परावृत्त करावयाचे

---

आहे, "पूर्वी **गतवर्षी धों**डीबा **फ**णशे मृत्यु पावले, त्या समयीं सौभाग्यवती **र**खमाबाई आली नाहीं." या पत्राचे वाटे ता० १९ डिसेंबर १७९१ ही तारीख आली आहे. अर्थात् **गतवर्षी** म्हणजे १७९० हें साल आलेंच.

* हा प्रसंग आपल्या काव्यांत आंग्ल कवयित्री जी **जोना बेली** हिनें फारच सुरेख वठवला आहे. पुरवणी **ई** पहा.

तिला जितके म्हणून उपाय सुचले, तितके तिनें सर्व करून पाहिले. तिनें मुक्ताबाईपुढें आपलें मस्तक नम्र केलें, साष्टांग नमस्कार घातला, आणि तिला अत्यंत काकुळतीनें विनविलें कीं, " मुली, परमेश्वराच्या ठायीं तुझी जर खरोखर भक्ति असली, तर मला—तुझ्या आ-ईला—म्हातारपणीं या संसारांत एकटी व निराश्रित अशी सोडूं नकोस! "

मुक्ताबाई हीही आपल्या आईप्रमाणेंच ममताळू व पाप-भीरू होती. आपल्या आईच्या ठायीं तिची अत्यंत भक्ति होती. मागें जेव्हां अहल्याबाईवर असाच प्रसंग आला होता, तेव्हां तिला मल्हारजीची आज्ञा व प्रजाहित हें आपलें कर्तव्य वाटलें. यासाठींच तिनें स्वर्गीचें सुख घ्यावयास एकटें न जातांना स्वकर्तव्य करावयास जगांतल्या दुःखाचे आघात सहन करावयाचें पसंत केलें! पण मुक्ताबाईची स्थिति अशी कोठें होती ! तिनें कोणासाठीं व कशा-साठीं मागें राहावयाचें बरें! तशांत पति हेंच आपलें दैवत ही त्या बाईची मनोभावानें समजूत, व सहगमन करणें हा पतिव्रता स्त्रियांचा श्रेष्ठ धर्म हा तिचा परम विश्वास; अशा स्थितींत आपल्या निश्चया-पासून ढळणें म्हणजे कांहीं तरी वर्तन करणाऱ्या एखाद्या प्राकृत बाईप्रमाणेंच वागणें होय. पतिसहगमन करणें व अहल्याबाईच्या म्हणण्यास रुकार देणें, यांत तिला सहगमन करणें हेंच श्रेष्ट कर्तव्य वाटून तिनें आईबद्दल आपणास वाटत असलेला मोह दूर केला व ती निर्धारानें अहल्याबाईस म्हणाली, "आई, * आतां तुझें म्हातारपण

* हा जो वर संवाद दिला आहे त्यांत आणि खालीं जें संभाषण दिलें आहे त्यांत किती विलक्षण साम्य आहे, तें पहावें. आह्मांस तर असें वाटतें कीं, ग्रंथकर्त्यानें मुक्ताबाईचें भाषणच रमाबाईच्या तोंडीं उतरून दिलें आहे.

**रमा.**—आई, आतां मी येथें राहात नाहीं. माझ्याशिवाय घटकाभर कर-मत नव्हतें. मलाही करमत नव्हतें. यासाठीं......मी सहगमन करत्यें. माझें

झालें. हें तुझें पुण्यमय आयुष्य आणखी थोड्याच दिवसानी संपणार. माझें एकुलतें एक बाळ गेलें! पति गेले!! व आई, तूंही मला सोडून गेलीस म्हणजे मग मी कोणाकडे पाहूं! हें असलें तोंड मग मी कोणास दाखवूं! तूं गेलीस म्हणजे मग माझा जीव मला नकोसा होईल! मग माझें हें आयुष्य मला जड वाटून नकोसें होईल. मग मी त्याचें काय करूं? पण आज कशी सोन्यासारखी संधी आली आहे. ही जर मी आज दवडली, तर मग मला पुनः आजच्यासारखें उजळ्या तोंडानें जातां येणार नाहीं!"

---

अवयव मात्र येथें आहेत. जीव सगळा त्या शरीरांत घुटमळला आहे. झाला हाच माझा निश्चय. मी बरोबर जाणार. करा, माझी तयारी करा.

**आई**--नको नको. मग माझा प्राण कसा राहील? घरधनी गेले तेव्हां तुह्मी दोघें होतां. आतां त्यांनींही सोडिलें. माझे आई, तूं तरी सोडूं नको. तूं तरी राहा. तुमच्या सर्वांच्या दुःखाचा भार मी ह्मातारी कसा वाहूं. ऐक–ऐक-पुरे! नको हट्ट धरूं!

**रमा.**—आई, असें भलतेंच सांगूं नको. तुझें ह्मातारपण झालें आहे. ससारांतील दुःखांतून तूं लवकरच मुक्त होशील; परंतु माझें आतांसें तारुण्य आहे. मी जर आतां तुजकरितां राहिल्यें तर मग एक दोन वर्षांनंतर तूं गेलीस ह्मणजे मग हे पाय तर अंतरलेच; पण तूंही अंतरशील. मग निराधारी, निराश्रित, हें काळें तोंड घेऊन, वैधव्य पदरीं बांधून लपण्यास देखील जागा उरणार नाहीं. आतां गेल्यें तर लोकांत कीर्ति करून जाईन. मग गेलें तर मजकरितां कुत्रा देखील रडणार नाहीं. आई, या मायापाशांत तूं पडूं नको, करा माझी तयारी करा. आणा गे, माझें पांढरें पातळ आणून मला नेसवा. माझी दागिन्यांची पेटी आणून सर्व अलंकार मजवर घाला. माझा कुंकवाचा डबा आणून मला मळवट भरा. ओंटीचें तबक आणून माझी ओंटी भरा. मला जाऊन लवकर भेटूं द्या. जलदी करा, माझी वाट पहाणें होत आहे. अंबाबाईनें विमान पाठविलें आहे. (तिला विमान दिसूं लागतें.) बरोबर गंधर्व आहेत. विमान माझीच वाट पहात आहे.

थोरले माधवराव पेशवे, नाटक पान ५७–५८.

मुक्ताबाई आतां मुक्तच झाली होती. तिचें वरील उत्तर म्हणजे माद्रीनें सहगमन करतांना "दे मज अग्नि" इत्यादि या भागाच्या शिरोभागीं असलेलें कुंतीस जसें उत्तर दिलें, तसेंच होतें. तिला मागें कशाचाच पाश न राहिल्यानें, आपल्या निश्चयापासून तिला च्युत करणें शक्य नव्हतें. अहल्याबाईनें आपल्या मुलीची पुष्कळच मनधरणी केली. पण आपल्या म्हणण्याचा काडीमात्र उपयोग होत नाहीं, असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां मात्र ती उगी राहिली. अहल्याबाईस त्या वेळीं आपल्या मुलीला शक्तीच्या बळावर सहगमनापासून मागें खेंचतां आलें असतें, पण आपली मुलगी सदाचरणच करीत आहे, अशी तिची पूर्ण खात्री असल्यानें तिनें तिला बळजबरीनें मागें ओढलें नाहीं. ती तें असह्य दुःख गिळावयास तयार झाली. पण किती झालें, तरी ती दयामय अंतःकरणाची अबला! तिच्यानें आपल्या मुलीचा देहयज्ञ निमूटपणें कसा बरें बघवेल? जानकीविरहानें कृश झालेल्या रामास पाहूनच जनकासारख्या ब्रह्मज्ञानी पुरुषास मुर्च्छा येते, त्याचप्रमाणें "परक्यांचें धन" देतांनाही भगवान् कश्यपासारख्या अरण्यवासी आजन्म ब्रह्मचारी महामुनींच्या मुखांतूनः—

यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कण्ठया
कंठः स्तंभितबाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनम्।
वैक्लव्यं मम तावदीदृशमपि स्नेहादरण्यौकसः
पीड्यन्ते गृहिणः कथं नु तनयाविश्लेषदुःखैर्नवैः?॥*

---

*जाते आज शकुंतला म्हणुनियां माच्चित्त उत्कंठित,
चिंतेनें नयनांसही जडपणा आला घसा कुंठित।
झाला अश्रुबळें, वनस्थ असतां माझी दशा ही अशी,
संसाऱ्यास सुतावियोग घडतां व्हावी अवस्था कशी!॥
कृष्णशास्त्री राजवाडे.

असें अंतःकरण खळबळवून सोडणारें उद्गार बाहेर पडतात, मग प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यास होमांत पडतांना पाहून या सदय अंतःकरणाच्या अबलेस काय वाटलें असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. तशांत असले पुत्र–अथवा कन्या–विरहाचे प्रसंग म्हातारपणीं ओढवले, म्हणजे पाहणारासही राहून राहून अशा म्हाताऱ्याची कींव येऊन वाटतें, 'यापेक्षां हा स्वतःच कां बरें गेला नाहीं! मग ज्याच्यावर हा प्रत्यक्ष प्रसंग येतो, त्याची काय बरें स्थिति होत असेल? पण—

**चारी खाणी चारी वाणी। चौऱ्यांशीं लक्ष जीवयोनी ॥**
**जन्मा आले तितुके प्राणी। मृत्यु पावती ॥ ३७ ॥**
**मृत्युभेणें पळोनि जातां। तरी मृत्यु सोडिना तत्त्वता ॥**
**मृत्युस नये कीं चुकवितां। कांहीं केल्या ॥ ३८ ॥**
**मृत्यु न म्हणे सान थोर। मृत्यु न म्हणे हरिहर ॥**
**मृत्यु न म्हणे अवतार। भगवंताचे ॥ ३९ ॥**

दासबोध, दशक ३, समास ९.

याप्रमाणें मृत्यूपुढें प्रत्यक्ष अमर देवांसही हात टेकावे लागतात! मग आम्ही बोलून चालूनच जे मर्त्य मानव, त्यांचा त्या सर्वभक्षकापुढें काय बरें पाड!

यशवंतरावाचें शव जेव्हां बाहेर निघालें, तेव्हां अहल्याबाईही त्या यात्रेबरोबर निघाली. ती स्मशानांत आपल्या–पण ती अहल्याबाईची आतां कोठें राहिली!–मुलीजवळ उभी राहिली. त्या वेळीं दोघां ब्राह्मणांनीं त्या वृद्ध माउलीस सांवरून धरलें होतें. तिनें मोठ्या संकटानें आपला जीव मुठींत धरून ठेवला होता. पण तिनें जेव्हां समोर चिता पेटलेली पाहिली, तेव्हां तिचें देहभान गेलें

व तिला मूर्च्छा आली. इतका वेळ तिनें आपलें मन कसें-बसें आवरून ठेविलें होतें. पण आतां तिच्या दुःखाचा आवेग प्रचंड झाल्यानें हा वेळपर्यंत असलेलें तिच्या छातीवरचें दडपण उडालें व तिला दुःखाचे उमाळे येऊं लागले. सीतेला लक्ष्मणानें अरण्यांत सोडली असतां तिची जी स्थिति झाली, तीच हुबेहुब अहल्याबाईची या वेळीं स्थिति झाली. रामाचा संदेश ऐकून सीता एकदम मुर्च्छित पडली. या प्रसंगाचें वर्णन करतांना कालिदास ह्मणतात—

**जेव्हां मूर्च्छित ती पडे तंव तिला पीडा न कांहीं कळे।**
**ये शुद्धीवर ती तई मन तिचें तापाप्रती पावलें ॥**
**केलें सावध लक्ष्मणें जरि तिला मोठ्या प्रयासें तरी।**
**मूर्च्छेहूनिहि तो प्रबोधचि तिला दुःखास दे अंतरीं ॥ ***

हाच प्रकार अहल्याबाईचा झाला. सीतेने झालेल्या प्रकाराबद्दल रामाला दोष दिला नाहीं. तर ती थोर मनाची साध्वी पतिव्रता ह्मणाली—

**" आहें पापिण मीच, यास्तव अशीं दुःखें मला पातलीं+ "**
तीच स्थिति अहल्याबाईची होती. सतीसमारंभाचा तो सारा हृदय-भेदक पण शुभ प्रकार पाहून मंडळींनीं एकच गजर केला. पण ती माउली आपल्या मुलीसंबंधानें ज्या किंकाळ्या फोडीत होती, त्यामुळें त्या गजरांत आणखीही भर पडली. अहल्याबाई आपल्या अंगाला असे आळोखे पिळोखे देई कीं, जणूं काय ती ब्राह्मणांच्या हातून सुटून

---

* सा लुप्तसंज्ञा न विवेद दुःखं प्रत्यागतासुः समतप्यतान्तः।
तस्याःसुमित्रात्मजयत्नलब्धो मोहादभूत्कष्टतरः प्रबोधः ॥

+ आत्मानमेव स्थिरदुःखभाजम्॥

जाऊंच पाहत आहे. शेवटीं चिता जळून भस्म झाली. तिनें ज्या मुलीस नऊ महिने उदरांत वागविली, तिला देहयज्ञांत प्रत्यक्ष आहुति देतांना पाहावयाचा प्रसंग यावा, ही दैवाची अपूर्व व क्रूर लीला होय. मुक्ताबाईबरोबर यशवंतरावाच्या आणखी दोन स्त्रिया सती गेल्या. याप्रमाणें यशवंतराव आपलें मागचें सर्व यश घेऊन जातां जातां ह्या साध्वीस कायमचा चटका देऊन चालते झाले!

दहनविधि आटोपल्यावर ती सर्व मंडळी नदीतीरीं स्नानास आली. तेथें अहल्याबाईचा स्नानविधि झाला. नंतर ती वाड्यांत आली. या दुःखाचा तिजवर असा परिणाम झाला कीं, तिनें धडपणें खाल्लें नाहीं व भाषण तर मुळींच केलें नाहीं. यशवंतरावाच्या मरणानंतरच्या हकीकतीचें केसो भिकाजीचें एक पत्र उपलब्ध झालें आहे. तें येथें देणें अवश्य आहे. तो म्हणतो—

सेवेसीं विनंति सेवक केसो भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र १२ माहे रविलाखर पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः—येथील वर्तमान चंद्र ७ रविलाखरी विनंतिपत्रें लिहून सेवेसीं रवाना केलीं आहेत. मार्गशीर्ष शु. ८ सह नवमी शनिवारीं, यशवंतराव फणसे यांचा काळ जाला. त्यांजमागें सौभाग्यवती मुक्ताबाईसुद्धां तिघी स्त्रियांनीं सहगमन केलें. हें वर्तमान पूर्वीं लिहिलें. दुसरे दिवशीं त्यांचे घरची वस्तभाव त्यांजकडील कारकून बोलावून शोध केला. कापड, द्रव्य वगैरे त्याच्या यादी सांभाळून घेतल्या. त्यास घाट व छत्री बांधावी, कांहीं द्रव्य क्रियेस लावावें, क्षेत्रोक्षेत्रीं पाठवावें, ही विवंचना केली आहे. आपण उदास होऊन, श्रीमहायात्रेस जाण्याचा उद्योग आपले ठिकाणीं व समागमीं कारभारी यांस सल्ला विचारून राजश्री सुभेदार यांजकडे

पत्रें चंद्र १० व ११ रबिलाखरीं, दोन पत्रें लागोलाग पाठविलीं कीं, तुम्हीं पत्र देखतांच स्वार होऊन येणें. आम्हीं महायात्रेस जातों. अशीं निकडीचीं त्यांजकडे पत्रें पाठविलीं. नंतर एक पत्र रा० दादाजी गंगाधर यांस लिहून चंद्र ११ रविखाखरीं पाठविलें. त्यांत मजकूर कीं, हें वर्तमान श्रीमंतास निवेदन करून, उत्तर चांगलें घेऊन पाठऊन द्यावें. स्वामींच्या नांवें पत्र लिहिलें त्यांत, दादाजी विनंति करतील ते ध्यानास आणून उत्तर पाठवावें. असें वर्तमान येथील अम्हांस कळलें होतें. सरकारांत विनंति पत्रें लिहितात किंवा नाहीं, यास्तव अगोदर लिहिलें नव्हतें.* कालचे तारखेस त्यांचीं पत्रें गेलीं हें कळलियावर सेवेसीं विनंति लिहिली आहे. यांचा निग्रह श्रीस जावें. याउपर दुःखाचे पर्वत पहाणें काय राहिले आहेत! रा. सुभेदारांचें वृद्धपण, अखंड त्यांच्या शरीरास समाधान नसतें. ते आहेत तोंवर त्यांच्या गळां दौलत घालून आपण वेगळें व्हावें. आमचें दैव तर दुःखेंच पहावीं. त्यामुळें मागें पुढें कांहीं विश्रांत राहिली नाहीं. यांस बरें वाईट झालें तर मग तोंड दाखवावयास जागा नाहीं. जहर खाऊन प्राण द्यावा. अशी भावी कल्पना मनांत आणून, रा० सुभेदारांस बोलाऊं पाठविलें. दररोज एक पत्र डांकेस लिहून द्यावें अशी ताकीद कारभारी यांस केली. सात रोज सात पत्रें वेगळीं तारीखवार जाऊं द्यावीं. त्यावरून चंद्र १० व चंद्र ११ दोन रोज पत्रें गेलीं! आजही जातील. याप्रमाणें येथील वर्तमान.

म. द. बा. पत्रें, भाग २ रा, पृष्ठ १९७–१९८.

अहल्याबाईचा समकालीन इंग्लडांतील प्रसिद्ध वक्ता जो बर्क १७२९-१७९७) याचा जेव्हां एकुलता एक मुलगा वारला (१७९४

* पण ही वकीलसाहेबांची वकिलीच असावी!

तेव्हां त्या वृद्ध तत्ववेत्त्यानें जे उद्गार काढले ते सर्वथैव या बाईस लागू आहेत. तो ह्मणतो—

"The storm has gone over me, and I lie like one of those old oaks which the late hurricane has scattered about me. I am stripped of all my honours; I am torn up by the roots and lie prostrate on the earth. ...I am alone. I have none to meet my enemies in the gate....I live in an inverted order. They who ought to have succeeded me, have gone before me. They who should have been to me as posterity, are in the place of ancestors."

अज्ञान मनुष्याचें समाधान करणें फार सोपें आहे. पण जो जाणता आहे, त्याचें समाधान होणें फारच दुर्घट काम आहे. या वर सांगितलेल्या शोककारक प्रसंगीं तुकोजी तेथें नव्हता. त्याला ही सारी हकीकत समजली. अहल्याबाई ही तोंडांत पाणीही घालीत नाहीं, हेंही त्याला समजलें. तो सारा प्रकार ऐकून त्यालाही अतोनात वाईट वाटलें. त्यानें महेश्वरास एक मोठें हृदयभेदक पत्र पाठविलें. व त्याबरोबर आपल्या मुलासही रवाना केलें. अहल्याबाईनें पूर्ववत् वागूं लागावें ह्मणून तिच्याशीं कसें वर्तन ठेवणें योग्य आहे, हेंही त्यानें सांगितलें. त्यानें काशीरावास पत्र लिहून कळविलें कीं, "ती जेवीत नसली, तर तुह्मीही जेऊं नका. तुह्मी तिच्याशीं अगदीं लगट करून असा. सारांश, ती जसें करील, तसें तुह्मी करा. ती आपल्या जिवास जो त्रास करून घेत असेल, तो त्रास तुह्मीही आपल्या जिवास करून घ्या. अशा वागण्यानें ती पूर्ववत् वागण्याची आशा आहे."

यासंबंधानें केसो भिकाजीचें पत्र § असें आहे:—

'रा० सुभेदार यांचीं पत्रें बहुत समाधानीचीं आलींत कीं, आम्हीं लवकर यावयाचें करतों. राजाची भेट व्हावी इतका गुंता आहे; त्यास राजेही बाहेर डेरेदाखल जाले. पौष शु० ५ चा करार भेटीचा जाला आहे, यास्तव येतां येत नाहीं. भेटी जाहल्यानंतर लवकरच वडिलांचे भेटीस येतों. आपण उदास होऊं नये. श्रीमहायात्रेस जावयाचें न करावें; येथील कारभारी आहेत, त्यांस पत्रें पाठविलीं कीं, तुम्हीं मातुश्रीचें समाधान राखून (त्या) उदास न होत तें करावें.' आम्ही लवकरच येतों.

नंतर तो अहल्याबाईसंबंधीं म्हणतो—

'गंगाजलनिर्मळ अहल्याबाई यांचेंही समाधान सर्वांनीं केलें आहे. कारभार करावयास लागलीं आहेत. दोन चार दिवस जाले, दरबार करूं लागली. मामलेदार जमा जाले. त्यांस निरोप, हिशोबाचा निर्गम करून देणार.

महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग २, पान १८०–१८१.

इंदुमती राणी मृत्यु पावली त्या वेळचा अजविलाप प्रसिद्धच आहे. त्या वेळीं त्या घराण्याचे कुलगुरूंनीं अजाला जो निरोप पाठविला, तो फारच चिंतनीय आहे. पण त्या 'शोकानें भरल्या नृपालहृदयीं त्याला रिघावा नसे'! अहल्याबाईची स्थिति या उलट होती. तिचें नंतरचें वर्तन पाहिलें ह्मणजे जणूं काय वसिष्ठ मुनीचा हा उपदेश

§ या पत्रास रा० पारसनीसांनीं ७ जानेवारी १७९१ ही तारीख लाविली आहे. व त्याप्रमाणें त्यांनीं त्या पत्राची स्थापना २१३ लेखांकांत केली आहे. प्रस्तुतच्या पत्रांतील मजकुरावरून पाहातां तें २३१ या लेखांकापुढें, म्हणजे यशवंतरावाच्या मृत्यूचा ज्यांत उल्लेख आहे, त्यापुढें पाहिजे असें वाटतें.

गेली प्राणसखी कसी मम, विभो चित्तांत नाणी असें ।
जन्मा जो नर येई मृत्यु नियमें त्याच्या कपाळीं असे[1] ॥
आतां तूं प्रतिपाळ योग्य रितिनें भूपा यया भूमितें ।

गणेशशास्त्री लेले.

तिच्या हृत्पटलावर बिंबला होता, असें वाटतें. असो. अहल्याबाईचें दुःख जसजसें हलकें होऊं लागलें, तसतसें ती इतर व्यवसाय करूं लागली. हा मुलीच्या मृत्यूचा आघात ' आह्मी विष्णुदास कठीण वज्रास भेदूं ऐसें ! ' अशा भगवद्भक्त बाईवर आपला अमल किती चालवणार ! असो.

तिनें आपल्या मुलीच्या स्मरणार्थ अतिशय सुंदर व बारीक काम केलेलें देऊळ बांधलें. असें सुंदर देऊळ अर्वाचीन काळीं क्वचितच बांधलें गेलें असेल. मालकमसाहेबानें या देवळाची फारच वाखाणणी केली आहे.

अहल्याबाईवर दुःखाचे इतके भयंकर आघात आले कीं, त्या खालीं साधारण मनुष्य तर चिरडूनच जावयाचा. पण त्या बाईनें ते आघात मोठ्या खंबीरपणानें व शांततेनें सहन केले, व हळू हळू आपला राज्यकारभार पहावयास प्रारंभ केला. या वेळची तिची मनःस्थिति ही सीतात्यागानंतर–

अनिर्भिन्नगभीरत्वादन्तर्गूढघनव्यथः
पुटपाकप्रतीकाशो रामस्य करुणो रसः ॥*

उत्तररामचरित.

---

१ तदलं तदपायचिन्तया विपदुत्पत्तिमतामुपस्थिता ।
वसुधेयमवेक्ष्यतां त्वया..............................॥ ८३

रघुवंश, सर्ग ८.

* न दिसे गंभीरपणें परि तद्हृदयीं घनव्यथा बाढ
पुटपाकासम ज्याचा करुणारस जाहला असे गाढ ।

परशुरामपंत गोडबोले.

अशी जी रामचंद्राची स्थिति झाली होती, त्याप्रमाणें होती. हा प्रकार पाहिला कीं, तिची निरिच्छा व निर्ममत्व हीं चांगलींच दृष्टोत्पत्तीस पडतात. जे स्वतः प्रतिभासंपन्न आहेत, त्यांचा प्रकार असाच दिसून यावयाचा. वरुणानें किती जरी विचार केला, तरी त्याची शक्ति प्रतापवान् सूर्यासमोर कितीशी चालणार! पण परप्रकाशावर अवलंबून राहणाऱ्या इन्दूची गोष्ट निराळी. या दोहोंत अहल्याबाईस कोणची उपमा साजते, तें वाचकांनींच पाहावें. या सर्व प्रसंगांत तिचें धैर्य मेरुपर्वताप्रमाणें अचल होतें. कविकुलगुरु म्हणतातः—

**न पादपोन्मूलनशक्तिरंहः। शिलोच्चयेमूर्च्छति मारुतस्य $ ॥**

$ जरीहि वायू उपडी तरुशीं। चाले कसें तद्बल पर्वताशीं॥

गणेशशास्त्री लेले.

भाग तेरावा.

# अवतार-समाप्ति.

क्षुत्क्षामोपि जराकृशोपि शिथिलप्रायोपि कष्टां दशा-
मापन्नोपि विपन्नदीधितिरपि प्राणेषु गच्छत्स्वपि ।
मत्तेभेंद्रविभिन्नकुंभकवलग्रासैकबद्धस्पृहः
किं जीर्णं तृणमत्ति मानमहतामग्रेसरः केसरी ॥ *

नीतिशतक.

नामधारी राजे लोकांची गोष्ट निराळी; बाकी जो खरोखर राजा या नांवास पात्र असून अधिकारारूढ-राजा-आहे, त्याचें जीवित फारच कष्टप्रद, यांत शंका नाहीं. त्याच्या डोक्यावर ' केसास लटकविलेली तलवार असते' असें म्हणतात, तें शब्दशः बरोबर आहे. त्यांत काडीमात्र अतिशयोक्ति नाहीं. इतर

* झाला क्षीण बहु क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्धकें ।
आली कष्टदशा घडो मरणही कीं तेज गेलें निकें ॥
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो भक्षील कीं काय हा ।
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक शुभग्रासींच ज्याला स्पृहा ॥

वामन.

लोकांस आयुष्य कष्टमय वाटूं लागतांच 'राजीनामा' देऊन घरीं हरि हरि म्हणत बसावयास मोकळीक तरी आहे, पण राजे लोकांनीं कोणास 'राजीनामा' द्यावयाचा! जो आपल्या प्रजेची–सर्वांची–काळजी वाहणार, त्याच्यामागें संसारमय दुःखें लागलीं, तर त्यानें कोठें जावयाचें! हा सर्व व्याप सहन करून जो आपलें कर्तव्य पूर्ववत् करावयास उद्युक्त होतो, तो किती बरें धन्य म्हणावयाचा! अहल्याबाईचें चरित्र पाहातां तिची गणना अशाच लोकांत करावी लागेल, असें वाटतें. तिच्यामागें मागें सांगितल्याप्रमाणें दुःखें लागलींच होतीं, पण राजकीय दुःखें हींही आपआपल्या परी तिला त्रास देत होतीं. आतां तिच्या वांट्यास फारसे दिवस राहिले नव्हते. पण तेही पूर्णपणें शांततेंत जावे असा ईश्वरी नेमानेम नव्हता, व राजे लोकांच्या चरित्रांत अशा सुखांची अपेक्षा करणेंही कांहीं बरोबर होणार नाहीं. असो. तिच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं एक दोन लढाया झाल्या. या लढायांत ती स्वतः नव्हती. पण त्यांत तिचें पुष्कळच अंग असल्यानें त्यांची हकीकत येथें सांगणें गैरवाजवी होणार नाहीं असें वाटतें.

मागील भागांतील हृदयद्रावक प्रसंग आटोपल्यानंतर लवकरच म्हणजे इ. स. १७९२ सालीं, जे सरदार आतांपर्यंत एकोप्यानें एकाच कारणासाठीं तिऱ्हाइताशीं झुंझत होते, जे मराठ्यांच्या राज्याचे आधारस्तंभ होते, त्या सरदारांचें सैन्य आपसांत लढावयास उद्युक्त झालें! या उभयतांच्या सैन्यांची गांठ लाखेरी * येथें पडली. त्या वेळीं अहल्याबाईचें

* या युद्धाचें वर्णन होळकरांच्या कैफियतींत आहे, व तें मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, (संपादकः ज. र. घारपुरे, ना. कृ. गद्रे, वा. रा. जोशी, व वि. का. राजवाडे) खंड सातवा, यांत गोविंदराव काळे यांनीं जीं पत्रें छापलीं आहेत, त्यांतही आहे. हीं दोन्हीं वर्णनें मिळवून पाहावयाजोगीं आहेत.

अगदीं उतारवय झालें होतें, पण तिची तेजस्विता व असाधारण शौर्य हे गुण चांगलेच प्रकट झाले. मागें एका भागांत (पान १२१)सांगितल्याप्रमाणें महादजी हा जेव्हां दक्षिणेंत आला, तेव्हां त्यानें गोपाळराव चिटणीस यास सुभेदार नेमलें. हा मनुष्य अनुभवहीन तशांत गर्विष्ठ होता.त्यानें सुभेदाराशीं बेशिस्त वर्तन केलें. त्यामुळें तुकोजी कंटाळला. तशांत त्यास जयपूर प्रांतीं खंडणीही गोळा करावयाची असल्यानें तो तिकडे निघून गेला. इतक्यांत होळकराकडील सरदार खुशाल कुवर यानें शिंद्याच्या प्रांतांत मुक्काम केला. गोपाळराव चिटणिसाचे मनांत कांहींही करून होळकराशीं फूट पाडावी असें होतें. तुकोजी या वेळीं जयपूर प्रांतांत आहे, ही संधी साधून त्यानें खुशाल कुवर यावर लखबादादा यास फौज देऊन पाठविलें. त्यानें आपणावर चाल केली हें पाहून होळकराच्या सरदारानें त्यास तोंड दिलें. ही लढाई सत्तावीस दिवस चालली. ही लढाई चालली असतां खुशाल कुवर हा आपल्या दुष्कृतीनें मारला गेला. त्यामुळें होळकराचे लोक तुकोजीकडे जयपूर प्रांतीं गेले. इकडे तुकोजी आपल्या कामांत गुंतला होता. जयपूरकरांनीं त्यास पैशा ऐवजीं प्रतापसिंगावर वरात दिली. तो पैसा गोळा करावयास बापू होळकर गेला. पण त्यास गोपाळरावानें निरोप पाठविला कीं, " आमचे प्रतापसिंगाकडे दहा लाख रुपये घेणें आहेत. ते वसूल होईपर्यंत तुम्हीं आपला पैसा त्याच्याकडून तगादा करून घेऊं नये." गोपाळरावाचें वर्तन म्हणजे फारच तऱ्हेवाईक होतें. त्याला कसेंतरी करून युद्धच करावयाचें होतें, म्हणून खुशाल कुवर मेला तरी तो स्वस्थ बसला नाहीं; तर पुनः जयपुरकरांत त्यानें तक्रार उपस्थित केली, व त्याप्रमाणें आपलें सैन्य घेउन तो पुढें आला. इतक्यांत दोन्ही पक्षांकडील पेंढाऱ्यांत मारामारीचा प्रसंग

येऊन युद्धास आरंभ झाला. सुभेदारांनीं जयपूरकराचा कारभारी दौलतराम हळदे यास ताव दिला कीं, " ऐवजास इल्लबिल्ला दाखविला व आमचा आपसांत कलह मात्र उत्पन्न केला ! " कारभारी साहेबांनीं कानावर हात ठेवून सांगितलें कीं, " ही तुमची लढाई, तुमची तुम्ही जाणा. आम्ही त्यांचेही देवाळ व आपलेही देवाळ! जबरदस्त असेल तो घेईल ! " याप्रमाणें त्यानें नारद नारद म्हणावयास प्रारंभ केला. याच वेळीं गोपाळरावानें बापूस सोडलें व सुभेदार गांठले. तेव्हां पाराशर दादाजी सुभेदाराचा हात ओढून म्हणाला, " कसचें कपाळाचें बोलणें बोलतां ! इकडे शत्रु तर उरावर बसला आहे ! " असें म्हणून त्यानें सुभेदारांस घोड्यावर बसवून पुढें काढून दिलें. याप्रमाणें सुभेदार बनास नदीपार झाले.

शिंद्याची तरी फौज त्यांच्या मागेंच लागली होती. त्या ठिकाणीं होळकराचें मागें राहिलेलें सैन्य व गोपाळराव यांची चकमक झाली. इतक्या अवसरांत तुकोजीचा व यांचा चार पांच कोसांचा फासला पडला. याच वेळीं बापू होळकर हाही येऊन सामील झाला. तुकोजीनें आपल्या प्रांतांत एक चांगली गढी पाहून द्वारावती येथें तळ दिला व महेश्वरास पत्रें पाठविलीं कीं, 'येथें प्रसंग असा गुदरला ! इतःपर खर्चाची व फौजेची मदत झाली पाहिजे.'

हें वर्तमान अहल्याबाईच्या कानीं पडतांच तिचा अभिमान एकदम जागृत झाला. तिच्या पायाची आग मस्तकास गेली. ती म्हणाली, 'तुकोजी होळकर मारला असता तरी चिंता नव्हती. परंतु म्हातारपणीं ( खुद्द सरदाराच्या नव्हे, तर तेंही त्याच्या चाकराच्या हातून ) बदनक्षीची गोष्ट ! ' असो. 'जीवन्नरोभद्रशतानि पश्येत्' असा धैर्याचा विचार करून पांच लक्ष रुपयांच्या हुंड्या सुभेदाराकडे पाठवून

त्यास पत्र लिहिलें कीं, 'हिंमत न सोडतां हरामखोराचें पारिपत्य करावें. खर्चाचा व फौजेचा श्वेत बांधतें. म्हातारपणीं जरब खाली असल्यास लिहून पाठवावें. मी डेरेदाखल होतें.' हा सारा प्रसंग कविचूडामणि मोरोपंत यांनीं पाहिला असता, तर त्यांनीं आपल्या महाभारतांतल्या—

**विदुला म्हणे, 'अहारे क्लीबा! मंदा! कसा पळालास?।**
**कां वांचलासि? अयशस्कर ऐसा तूं न कां गळालास? ॥**
**अरि हरिल राज्य, मग तूं वरिशिल वृत्त्यर्थ काय माधुकरी?।**
**सुखकर सुकर्म टाकुनी, असुखकर कुकर्म कोण साधु करी?॥**
**जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सहपूर्वजें तुज्या तातें।**
**परमानुचित पलायन कैसें केलें तुवां कुजाता तें? ॥**
**मरण विहित, न पलायन, भीती धर्मज्ञराजकन्या या।**
**अन्या याहुनि अधिका घडल्याही न गणितीच अन्याया ॥**
**अधमा! तुवां मरावें, क्षणहि न बुडवूनि मान, वांचावें।**
**काळा! यासम अन्यहि जे असतिल, त्यांहि मानवा चावें ॥**

मोरोपंत–उद्योगपर्व, अध्याय १०.

ह्या ओळी त्या साध्वी पण मानी स्त्रीच्या तोंडीं घातल्या असत्या. असो. हें युद्ध लाखेरीच्या घाटावर झालें. त्यांत अहल्याबाईनें चांगली कुमक पाठविली. ह्या लढाईसंबंधानें शिंद्याचा सुप्रसिद्ध सेनापति जो डुबॉईन यानें ह्मटलें[1] आहे, "मी आजपर्यंत जितकीं युद्धें पाहिलीं त्या सर्वांत हें फारच निकराचें व रक्तपाताचें झालें." या युद्धांत होळकरांचा फ्रेंच सरदार डुडुनेक यानें शिकस्त केली. पण शेवटीं

1 Indore State Gazetteer, Vol II. P. 18.

मल्हाररावाच्या फाजीलपणानें, तांतडीनें व अत्याचारानें होळकरांचा पराभव झाला[२]. हे आपसांतील कलह भावी पतनाचे द्योतकच होते. या कलहामुळें पाटीलबोवावर मोठा टपका आला. पण या युद्धांत त्याचें मुळींच अंग नव्हतें या आपसांतील भाऊबंदकीची आमच्या लोकांस कांहीं शरम वाटावयाची. पण त्यांपैकीं एका स्वारीनें याजबद्दल तोफा सोडण्याची पाटीलबोवांजवळ परवानगी मागितली!या युद्धामुळें पाटील-बोवास फार दुःख झालें. यामुळें आपली काय हानि झाली हें तो चांगलें समजत होता. तो आबा चिटणिसास कांहीं बोलला नाहीं. पण त्यानें जेव्हां दोनतीनदां तोच प्रश्न केला, तेव्हां महादजी त्यास झिडकरून म्हणाला, "आपसांत कटकट करून जन्माचे भाऊपणांत पाणी घातलें! तोफा सोडाव्यात असें मला वाटत नाहीं. यापुढें सुभेदाराची व माझी भेट होणें नाहीं!" असें बोलत असतां त्यांच्या डोळ्यांस पाणी आलें. त्यांनीं या युद्धाचा सूत्रधार जो गोपाळराव त्यास कैद करून भेलशास पाठविलें. यानंतर लवकरच पाटीलबोवांचा अंत झाला. थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर माधवराव अलिजाबहादूर याचा मृत्यु म्हणजे मराठेशाही इमारतीचा मोठा आधारस्तंभच गेला! मराठ्यांची बहुतेक बाजूंनीं अधोगति होत होती. पण ज्यांनीं आम्हांस उर्जित दशेप्रत न्यावयाचें ते लोक जाऊं लागले म्हणजे:—

---

२ मालकम साहेब या पराभवाबद्दल टिपेंत म्हणतो—

This, like all Mahratta defeats, is imputed to treachery; and in the manuscript given me by Tantia Jogh, no less persons are accused than Caseerao Holkar and Bapoo Holkar, the son and nephew of Tukajee. ( p. 172 ).

**अनुकूल काळ होतो, तेव्हां बळ, बुद्धि, तेज, यश देतो; ।**
**प्रतिकूल तोचि होउनि ( होतां ) माघारें दत्त सर्वही घेतो. ॥**
**मोरोपंत–मौसलपर्व, अ. २.**

असे उद्गार आपोआप तोंडांतून बाहेर पडतात.

अहल्याबाईच्या कारकीर्दींत इंदूर संस्थानांतील प्रजेचा फार उत्कर्ष झाला. या संस्थानच्या इतिहासांत सर्वांत अधिक उत्पन्न अहल्याबाईच्या कारकीर्दींतच होतें. तिच्या कारकीर्दींतील उत्तरार्धाची ( १७६६–९५ ) सरासरी जर काढली, तर त्या मागसलेल्या काळीं-ही तिच्या संस्थानचें एक वर्षाचें उत्पन्न एक कोटी साठ लक्ष तीस हजार सातशें चौतीस रुपये सात आणे नउ पै इतकें होतें. त्या वेळीं ह्या संस्थानचे एकंदर सहा भाग असून सत्यांऐशीं तालुके होते. तिची प्रजाही सुखी असून बहुतेक सर्वदूर आबादीआबाद होती.

अहल्याबाईचा अवतार केवळ प्रजाहितासाठींच झाला. त्यासाठीं तिनें लहानपणापासून तों वृद्धावस्थेपर्यंत सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षें सर्व प्रकारचीं संकटें सहन करून तिनें आपलें आयुष्य काढलें. प्रजा ही तिची संतती व ती प्रजेची माता. तिचें आपल्या प्रजेवर अत्यंत प्रेम होतें. तिनें प्रजाकारणीं आपलें सारें आयुष्य वेंचलें. ती स्वतःही आपला जन्म प्रजाहितासाठींच समजे. तिला ऐहिक दुःखें पुष्कळ झालीं खरीं. पण तिची प्रजा–जीवर तिचें पुत्राप्रमाणें प्रेम होतें, ती प्रजा–तिच्या समोर अत्यंत आनंदानें राहिली, हें तिचें लहान-सहान का भाग्य ! प्रजा सुखी असणें हा त्या राणीचा जगण्यांत जो मुख्य हेतु, तो चांगल्या रीतीनें तडीस गेला. ह्या दृष्टीनें पाहातां ती मोठी सुखी होती. तिला स्वतःला आप्तांच्या मृत्यूमुळें ज्याप्रमाणें धक्के बसले, त्याचप्रमाणें मराठी सत्तेला अहल्याबाईसमोरच मोठे

धक्के बसले. सोनपत पानपत, नानासाहेब पेशव्याचा मृत्यु, व या सर्वांवर कळस करणारी गोष्ट म्हणजे तरुण माधवराव जे रावसाहेब यांचा मृत्यु ही होय. माधवरावाच्या मृत्युमुळें तर मराठेशाहीस पूर्ण क्षयाची भावना झाली. इ० स० १७९५ मार्च महिन्यांतील सर्वप्रसिद्ध खरड्याचें युद्ध म्हणजे मराठी सत्तेचा पावसाळ्यांतील तेजःपुंज सूर्यच होय! या युद्धास अहल्याबाईकडून अर्थात् तुकोजी गेला होता. अहल्याबाईनें तुकोजीस जेव्हां युद्धास पाठविलें, तेव्हां ऱ्याच भानगडी उपस्थित झाल्या होत्या. त्याचें वर्णन महेश्वरकर वकीलानें केलें आहे. त्याच्यापैकीं कांहीं भाग येथें देणें अवश्य आहे. तो म्हणतो*—

---

* याचबरोबर होळकरांच्या कैफियतींतील (पा. ६५) पुढील मजकूर वाचण्याजोगा आहे.—

होळकरांस पत्रें आलीं कीं तुम्हीं सरंजामसुद्धां येऊन सामिल व्हावें. ह्मणून येथें फौज मनस्वी (तिच्या) हिशोबाचा राडा पडला होता (तो) निवटून सुभेदार महेश्वरीं आले. पुढें श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें हाजर होण्याचा विचार; तावत्कालपर्यंत दिवाणगिरीचें (काम कोणास द्यावें हें) मोहोगम होतें. पाराजीपंत (व) खंडोपंत हे काम करीतच होते. (पण कामकाजांत) असें (हवें) असें नाहीं, (इतकें) म्हणावयास पाराजीपंत बावा. परंतु मातुश्री बाईसाहेबांचा व सुभेदारापासून शिलशिला (निरंतरचा) लोभाचा व ऋणानुबंधही रावजी महादेव पारनेरकर फडणीस यांचे घरावर. यांतील वास्तविक अर्थ व निदर्शनें बाईसाहेब कारभारांत अव्वल अखेर माहितगारी त्यांची; व सुभेदारही तोंडापुढेंच होते. (त्यांना आपलें मत नव्हतें.) त्यांजलाही ठाऊक. त्या ओघावर सुभेदार मातुश्री एखादें बारीक मोठें विचारणें, तें खंडोपंतास विचारीत असावें, त्या धोरणावर ओघ चालावा, असा क्रम होता. त्या प्रसंगीं खंडोपंत यांनीं विचार केला कीं, श्रीमंताचे हुजूर जाणें. समयसमर्पक द्रव्याचा, राजकारणाचा, (व) लढाईचा प्रसंग (पडला); तेव्हां मुकत्यार कोणी असावा ह्मणजे धन्यास पुसावयास व आपल्यासारखे गोरगरी-

त्या दिवशीं सारवान उंट घेऊन येईनात, डेरे खोलीनात व खर्चास कांहीं नाहीं म्हणून अडून बसले. तेव्हां तुकोजीनें कपाळास हात लावला व हा सारा मजकूर बाईकडे सांगून पाठविला. तेव्हां बाईनीं आपले खिजमतगार, जासूद पाठवून डेरे देवविले. दिवाण-गिरीचा कारभार नारो गणेश यांच्या मुलाकडे सांगावा, असें बोलणें लाविलें होतें. फौजेचें जें मागील देणें होतें त्याची आड पडली होती. शेवटीं लोकांचें जें मागील देणें राहिलें होतें, त्याचे फडशे करावे, असें कबूल केलें. पांच सात लक्ष रुपयेपर्यंत जो ऐवज खर्चास लागले, तो सध्यां ऐवज मोबदल्यास घ्यावा. यास कोटें संस्थानचा व बुंदी महाल, कोच वगैरे ऐवज लावून द्यावा. पुढें स्वारी खर्चास वगैरे वीस लक्षपर्यंत ऐवज खर्च करून श्रीमंतांजवळ जावें. ते जी मोहीम सांगतील ती मसलत मारावी, याप्रकारें करार केले. दुसरें, त्यांनीं चार कलमें लिहिलीं होतीं कीं, पंचपहाड महाल सोडावा, आंबाडची फडणवीसीची असामी द्यावी, दरसालचा आमचा ऐवज आम्हांस पूर्ववत्प्रमाणें मिळावा व पोतनीशीची असामी आमची आह्मांकडे चालवावी. बाईनीं इतक्या कलमांस रुकार देऊन शिवाय आंतून सर्वस्वी खातरजमा केली. नारो गणेशाच्या मुलाकडे कारभार सांगावा अशी तुकोजीची मर्जी नव्हती. तशांत त्यास पारनेरकर हे बुद्धिभ्रंश करीत होते. परंतु बाईनीं

---

बाचे बचावास नीट. यास्तव नारो गणेश बहुतां दिवसांचे पदरचे (असूनही) भविष्यानुरूप धण्याचे लक्षास न जपतां कंबेशी ( नुकसानी ) आली न आली त्याचें फळ पावून प्राणास मुकले, ( व जे पक्षीं हा प्रकार आपला होऊं नये ) ते पक्षीं त्यांचेच मुलास वस्त्रें देऊन बाळाजी लक्ष्मण व त्यांचे मुतालक श्रीपतराव मैराळ रांजणगांवकर यांनीं उभयतांनीं कारभार करावा ही सल्ला खावंदास देऊन नमूद सिद्ध केला.

राधी वगैरे हातीं निरोप पाठवून त्यांना कळविलें कीं, मी जी गोष्ट करीन ती तुम्हांला निभवली पाहिजे. शेवटीं बाईचा आग्रह पाहून तुकोजीनें रुकार दिला.

सरदारांचे बाईस वरचेवर निरोप येत गेले कीं, " एकवेळ जर मजला आज्ञा होईल, तर मी वडिलांचे पाय पहावयास येईन. " त्यावरून बाईनीं त्यांस चंद्र १६ आषाढ वद्य २ सोमवारीं निरोप पाठवून अलीकडे बोलाविलें. ह्मणून तुकोजीराव अठरावे घटकेस रेवा उतरून बाईजवळ आले. उभयतांची भेट होउन दोन घटका बोलणें झालें. कारभाराचीं वस्त्रें आजच द्यावयाचीं असा बाईचा बेत असल्यानें त्यांनीं जोशास बोलावून त्यास मुहूर्त विचारला. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, "मागील सहा घटका दिवस राहतां वस्त्रें द्यावीं." परंतु हा मुहूर्त तुकोजीरावांस पसंत नसल्यानें ते जोशीबुवावर रागावले व त्यास म्हणाले, " जोशीमहाराज ! आपण आम्हांला हा बुधवारचा मुहूर्त कोठला पाहून दिला ! त्यायोगें आमची नुकसानी झाली ! " त्यावर बाई म्हणाली, " ह्या गोष्टी जोशीबोवाच्या हातच्या का आहेत ! याला कोणाचा इलाज नाहीं. होणार तें चुकत नाहीं."

या उपरांत कांहीं वेळ आराम करण्यांत गेला. नंतर सव्वीस घटका भरल्यानंतर बाई, सरदार व कारभारी वगैरे मंडळी जमली. बाईचें पहिलें बोलणें तुकोजीशीं होऊन मग सर्वांचे समक्ष वस्त्रें देण्याचा समारंभ झाला. गणपतराव नारायण यांस दिवाणगिरीचीं साडेतीन वस्त्रें ( पैठणी लाल पोशाख, तिवट शेला अष्ट गोली किंमत रुपये पाऊणशें पर्यंत, किनखाप अर्धठाण, महमुदी एक ) मिळालीं. बाळाजी लक्ष्मण यांस मुतालकीचीं वस्त्रें ( जैनाबादी पोषाख, तिवट शेला रुपये पन्नास पर्यंत ) मिळालीं. बाईनीं सरदारापासून पायांवर

हात ठेवून कबूल करून घेतलें कीं, " यासीं दुसरी गोष्ट न करावी. माझे जिवांत जीव आहे, या अवधींत एखादी गोष्ट चुकेल, नाहीं असें नाहीं. पण असें झाल्यास त्याबद्दल मला लिहावें. उपरांतिक मी तुम्हांला जसें सांगेन, तसें आचरण करावें. परभारें तुम्हीं एखादी दुसरी गोष्ट करूं नये." याप्रमाणें शपथ प्रमाण करून त्यांचे आपसांत हातांत हात दिले. सरदारास याप्रमाणें सांगितलें व इकडे यांस सांगितलें, " तुम्हीं तुकब्रास विचारल्याखेरीज आपल्या जबाबदारीवर कोणताही कारभार न करावा. " नंतर पारनेरकर, राजश्री शिवाजी गोपाळ, खंडो महादेव वगैरे मंडळीस सांगितलें कीं, " तुम्हीं दप्तरचें काम करावें; कारभारांत बोलूं नये. दिवाणांनीं दप्तरी दाखला झाडून द्यावा. तुह्मीं आपलें कागदपत्र झाडून मागितला, तो दिवाणास समजावीत जावा. वरकड दरखदारांनीं आपलीं कामें करावीं." याप्रमाणें होऊन बाईनीं एकमेकांशीं बोलणें केलें कीं ' **कोणी कोणाचा द्वेष करूं नये. सर्वांनीं एकचित्तानें राहून, आपलालीं कामें करून दौलत सांभाळावी. मागील गोष्ट झाली, ती झाली; तिचें वैभाव मनांत स्मरूं नये. 'वाहिला गंगा राहिलें तीर्थ' असें आचरण असावें"** असें बोलून कचेरी बरखास्त झाली.

याप्रमाणें होऊन चार घटका दिवस राहातां बाईनीं सरदारांस भोजनास घालून शकुनाचीं दोन वस्त्रें देऊन मागील चार घटका दिवस राहातां त्यांस निरोप दिला. सरदारांनीं बाईचे पायांवर डोकें ठेविलें. नंतर चंद्र सन्मुख घेऊन नावेंत बसून ते डेरेदाखल झाले.

या पत्रांवरून योग्य निरवानिरव करण्यांत बाईंचा हातखंडा किती होता हें स्पष्ट दिसून येतें. त्याचप्रमाणें तिचा उपदेश साधूपणास

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

किती शोभेसा आहे, हेंही दिसून येतें. तुकोजी होळकर महेश्वराहून निघतांना काय प्रकार झाला, तोही गमतीचा आहे, म्हणून त्याबद्दलही येथें थोडें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. महेश्वरकर वकील म्हणतो—

'राजश्री सुभेदार रेवा दक्षिण तीरीं आपला मुक्काम करून होते. पर्जन्य भारी, वीस दिवस झाले पण अजून उघडत नाहीं. त्यामुळें चिखल फार झाला. म्हणून ते फारच त्रासले. तथापि त्यांनीं त्याच त्रासांत ता. २२ रोजीं रविवारीं कूच करून ते येथून चार कोंसावर खरगोण तालुक्यांतील एका गांवास मुक्कामास गेले. त्यांना पोहोंचवावयास नवे जुने कारभारी गेले होते. स्वारीबरोबर स्वार प्यादे देखील नव्हते. सडे गेले. आटाल्यांत ऊंट नाहींत, अशी अवस्था कठीण. गेले ते दिवशीं हत्ती एक मेला. घोडीं खाशीं मातबर मेलीं. ढाल पडली, तिचे दोन तुकडे जाले. या प्रकारचीं चिन्हें! भावी काय असेल तें न कळे.'

खर्ड्याचें युद्ध सुप्रसिद्धच आहे. त्यावरून वकीलास जीं दुश्चिन्हें वाटत होतीं तीं व्यर्थ होतीं, इतकेंच नव्हे तर तीं सुचिन्हेंच झाली असें ह्मणावयास चिंता नाहीं. मराठ्यांच्या या शेवटल्या लढाईबद्दलची हकीकत येथें सांगण्याचें कारण नाहीं. तथापि विषयपूर्ततेसाठीं त्याची माहिती येथें दिली पाहिजे. या युद्धाचें होळकरांच्या कैफीयतींत थोडक्यांत वर्णन आहे, तेंच येथें सांगतों. तींत म्हटलें आहे.—

याप्रमाणें बंदोबस्त होऊन पुण्यास यावयाकरितां सुभेदार नर्मदा उतरले. पुणें मुक्कामीं दाखल जाहले. श्रीमंत भोंसले, शिंदे, होळकर व किरकोळ सरदार मानकरी मिळोन असंख्य सैन्य जालें. दहा कोसांत तळ रहात होता. तसाच मोंगलही असंख्य सैन्य मिळवून

तीन वर्षांचा सरंजाम भार बरदारी करून आले होते. त्यांत श्रीमंतांचे प्रतापें करून एक्याच लढाईंत मसलत सिद्ध जाली. लौकिक शिंद्याकडील तोफखाना व भोसल्याकडील बाण, यांचा फार जाला. परंतु तरवारींशीं गांठ परशरामभाऊ पटवर्धन, मिरजकर व होळकरांशींच पडली. यांतील दर्याप्तीनें ज्या प्रसंगीं हिंडण्यांत वागण्यांत त्यास आहे. * नानासाहेब यांस पूर्तें उमजलें होतें.

या युद्धानंतर सृष्टिक्रमानुसार लवकरच चोहोंकडे काळे–कुट ढग पसरून सर्वदूर अंधार झाला. मराठी राज्यांत बेबंदशाही माजली. शेवटले सवाई बाजीराव हे 'बापसे बेटा सवाई' या नात्यानें दादासाहेबांचे अपूर्ण हेतु पूर्ण करावयास या धुमधडाक्यांत—

**शक्ति असेल तरि तुम्हीं रक्षा, मी आपुली प्रतिज्ञा ती।**
**संरक्षितों, कराया स्वर्गीं संतृप्ति संप्रति ज्ञाती ॥ १७ ॥**

असा टाहो फोडीत दिवटी घेऊन सारखे नाचूं लागले! हें त्याचें अचाट कृत्य पाहून बापू गोखल्यासारखे—

**(रिपु) शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती,।**
**किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळती ॥१८॥**
**जाणों त्या अत्युग्रा मूर्तश्रीनारसिंहमंत्रास।**
**पाहोनि पावले ते (रिपु) भट भूपाळभूत संत्रास ॥ १९ ॥**
**म्हणति, 'मनुष्य नव्हे हा; राक्षस कीं काळ हा खवळला हो!।**
**कीं आमुची कराया मूर्त प्रळयाग्नि राख वळला हो' ॥ २० ॥**

मोरोपंत-कर्णपर्व, अ. ४५.

---

* याचा भावार्थ हाच कीं, ज्यास या प्रकारांतील बारीक माहिती आहे. तो आमच्या सांगण्यास बळकटी आणील.

हें पाहून ' पुत्रादिच्छेत् पराभवम् ' या न्यायानें रघुनाथरावाचे डोळे स्वर्गांत तृप्त झाले असतील! हे प्रळयकाळचे दुर्दिन अहल्याबाईनंतर लवकरच आले. पण ते पाहावयास ती साध्वी वांचली नाहीं, हें तिचें केवढें तरी भाग्य! तिनें पहिले पेशवे खेरीज करून सर्वांस पाहिलें. त्यांत शेवटचे दिवटेही पाहिले! पण त्यांचा पराक्रम मात्र पाहिला नाहीं. त्याचे चाळे दिसावयापूर्वीं हा पुण्यात्मा इहलोकची वस्ती सोडून गेला, हें फारच चांगलें झालें. जिचा प्रजाहितासाठीं जन्म, जिचा श्रीमंत प्रभूचे ठायीं व मराठी राज्यासंबंधीं अत्यंत पूज्यभाव, तिला पुढील प्रलयकाळ पाहावयास देवानें ठेवलें नाहीं, हे त्याचे तिच्यावर महदुपकार झालें.

घरांतल्या मंडळीचे मुत्यु, तशांत म्हातारपण, शिवाय उपासतापास, यामुळें अहल्याबाई फारच खंगली. तरी पण तिच्यांत पूर्वीप्रमाणेंच धमक होती. तिचें शरीर म्हातारें झालें होतें, पण तिचा जीव म्हातारा थोडाच झाला होता! तो तरुण असल्यानें तिचा नित्यक्रम अगदीं पूर्वीप्रमाणेंच चालू असे. तिचें वय इतकें झालें होतें, तरी ती पुराणाश्रवण, देवदर्शन वगैरे सर्व नित्यनियमानें करी. याचें वर्णन गेल्याचे मागील भागांत केलेंच आहे. महेश्वर दरबारांतील तिच्या कारकीर्दींतलें जें शेवटचें पत्र उपलब्ध आहे तें वाचण्याजोगें आहे. केसो भिकाजी लिहितो—

श्री. ६ फेब्रुवारी इ. स. १७९५.

सेवेसीं विनंती सेवक कचो जनार्दन नि ॥ केसो भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १५ माहे रजब भृगुवासर प्रात:कालपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष .... गंगाजलनिर्मळ मातुश्री अहल्याबाई यांचे नांवाचा लाखोटा होता. पाव-

तांचक्षणीं जाऊन वर्तमान कानावर घातलें. सायंकाळचें स्नान करून जपांत होती. खुणेंकरून सांगितलें कीं, भोजनोत्तर पत्रें श्रवण करीन. ते दिवशीं ग्रहणाची कर होती. स्नानें करून, दानें करून श्रमली होती. दिवसभर उपोषण. रात्रीं भोजन जाल्यानंतर कांहीं कचेरी जाली होती. ती बरखास्त करून, बिछान्यावर एकलीच बसून, कारभारीयांपैकीं राजश्री विनायक बाजीराव व बाळाजी कृष्ण यांस बोलावून, त्यांजकडून पत्रें अक्षरशा श्रवण केलीं. सरकारचें पत्र एक व नबाबाकडील वकिलाचे पत्राची नकल एक होती. मजकूर, प्रेमसुक जोहरी याचा होता. तो ध्यानास आणून, सरकारआज्ञेप्रमाणें तेच क्षणीं, सवा प्रहर रात्रपर्यंत बसून, जागां जागां घांटनाकें येथील कमाविसदार यांस पत्रें लिहून रवाना केलीं, व आसपासचे जवळ होते, त्यांस समक्ष बोलावून ताकीद करून बंदोबस्त करविला. दक्षण उत्तर पहाडाचे घांट, व नाके, चोरवाटा व उभय रेवातीर येथील नाव घांट पायउताराचे तर नेमावरपर्यंत, यांजकडील जिल्ह्यांतील झाडून बंदोबस्त करविला. राजश्री रघुनाथपंत यांस बऱ्हाणपुर येथें पत्रें पाठविलीं.... येथील कमाविसदार यांस व जमीदार भूमे वगैरे यांस ताकिदी सांगून पाठवून, नंतर सवा प्रहर रात्रीस निद्रा केली.

ह्यावरून अहल्याबाईची कामकाज करावयाची किती तयारी होती, तें स्पष्ट दिसतें. अहल्याबाई ही फार दिवस आजारी नव्हती असें वाटतें. कारण, तिच्या मृत्युसमयीं तुकोजी होळकर व इतर जवळच्या आप्तांपैकीं जवळ कोणीं नव्हतें. यावरून असें वाटतें कीं, ते कोणी तिच्याजवळ येऊंही शकले नाहींत! अहल्याबाईच्या ठिकाणीं सर्व मंडळीचा आदरभाव विलक्षण असल्यानें तिच्या अंतसमयीं ते न येणें हें अगदीं अशक्य आहे. एका पोवाड्यावरून असें वाटतें कीं,

बाई आजारी झाल्याची बातमी तुकोजी होळकराकडे पाठविली असावी. व तो कामकाजांत फारच गढून गेला असल्यास काशीराव वगैरे कोणी येईल या विचारानें "भेटीच्या पक्षामधीं प्राण राहिला डोळ्यांत[1]" अशी स्थिति झाली असावी. पण तिच्याजवळ येण्यास त्यास अवसरच राहिला नाहीं! तिच्या शेवटच्या दिवसासंबंधानें होळकरांच्या कैफियतींत[2] ह्मटलें आहे—

'हा अध्याय[3] संपल्यावर श्रावण वद्यांत चतुर्दशीस[4] बाईसाहेबांचा काळ जाहला. प्राणोत्क्रमण बहुत सावधानीनें जालें. श्रावणमासचा महिमा. बारा तेरा हजार पात्र जेवण्याचें. त्याचा संकल्प सोडून, आसन्नकाळीं मोक्ष धेनु उत्क्रांत धेनु धर्माची प्रवृत्ति होऊन, नामस्मरणाचे घोषांत देहावसान जालें. त्याच समयीं प्रातःकाळीं दर्शनीं गाय होती तिनें हामडोन प्राण सोडला. त्या समयीं (देहावसान प्रसंगीं) सुभेदारांचे कनिष्ठ बंधु संताजी होळकर किल्ले सेदव्याचे जिम्मेस होते, ते समयास येऊन हजर जाले. उत्तरकार्य त्यांनीं केलें.'

अहल्याबाईच्या मृत्यूमुळें होळकर–संस्थानचें अतोनात नुकसान झालें, हें अगदीं उघड आहे. अहल्याबाई होळकर हीं होळकरशाहीचा आत्माच होय. तेव्हां तिच्या मृत्यूमुळें प्रजेंत अत्यंत हाहाकार उडावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सूर्य क्षितिजाकडे जाऊं लागला ह्मणजे ज्याप्रमाणें आरक्त होऊन मोठमोठा होत जातो, त्याचप्रमाणें अहल्याबाई कैलासवासाप्रत जात असतांना तिची

---

१. हा पोवाडा पुरवणीं 'उ'त दिला आहे. २ पुढील उताऱ्यांतील कैफियतींतलें दुसरें व तिसरें वाक्य उताऱ्याचे शेवटीं जोडलें आहे. ३. खडर्यांची लढाई. ४ इ. स. १७९५, आगष्ट, ता १३.

प्रतिभासंपन्न कीर्ति विशाल व आल्हादकारक झाली. सूर्य क्षितिजापलीकडे गेला, पण त्याचीं किरणें व आरक्त प्रकाश अजूनही दिसत आहे व तो नेहमींच दिसणार !

ह्या बाईच्या पुण्यमय जीवनाचे गुणवर्णनासाठीं स्वतंत्र प्रकरणाची योजना पाहिजे. त्या विषयाची याच भागांत गर्दी करणें बरें नव्हे. पण हा भाग संपविण्यापूर्वीं मिसेस **जोन बेली** हिनें '**अहल्याकाव्या**'चे शेवटीं जे उद्गार काढले आहेत, ते येथें दिल्यावांचून राहावत नाहीं. ती बाई ह्मणते—

For thirty years–her reign of peace–
The land in blessings did increase;
And she was bless'd by every tongue,
By stern and gentle; old and young.
And where her works of love remain,
On mountain pass, on hill or pain,
There stops the traveller a while,
And eyes it with mournful smile,
With mutt'ring lips, that seem to say,
" This was the work of Ahalya Baee. "

The learned sage, who loves to muse,
And many a linked thought pursues,
Says to himself and heaves a sigh
For things to come and things gone by,
O"that restless chiefs, by misr'y school'd,
Would rule their State as that brave
woman rul'd ! "

Yea, even children at their mothers' feet,
Are taught such homely rhyming to repeat:—
"In better days from Brahma came,
To rule our land, a noble Dame;
Kind was her heart, and bright her fame,
And Ahalya was her houour'd name."

### भाग चौदावा.

# आख्यायिका.

**सत्पुरुषकथा अद्भुत रसदा; ह्मणतों हिलाच सुरभी मी ॥**

मोरोपंत-द्रोणपर्व, अध्याय १२.

या भागांत बाईसंबंधी प्रसिद्ध असलेल्या आख्यायिका द्यावयाच्या आहेत.

## १. अहल्याबाई.

थोरले मल्हारराव यांची सून अहल्याबाई होळकरीण ही विधवा असतां तिनें सन १७६८ पासून १७९६ इसवीपर्यंत एकच्छत्री राज्य केलें. हिची न्यायाची व रयतेस सुख देण्याची इतकी कांहीं चमत्कारिक खुबी होती कीं, अद्याप तिच्या पदरचेच नाहीं, पण राज्यांतील भिल्ल वगैरे लोक तिचे पोवाडे गात आहेत. ती स्वतः न्यायासनावर बसून धर्मराजाप्रमाणें कारभार करीत असे. तिचा धर्महीं मोठा असल्यामुळें हिंदुस्तानांतील कोणतेही लांबचे प्रदेशांत तिचें नांव सांपडणार नाहीं असा देशच नसेल. त्याप्रमाणेंच तिनें उच्छेद झालेल्या अनेक धर्मांच्याही स्थापना केल्या होत्या.

**लोकहितवादी.**

## २. मोरोपंत आणि अहल्याबाई.

'सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति।'[1]

भवभूति.

मोरोपंत काशीला गेले तेव्हां त्यांनीं पुष्कळ लोकांच्या वतीनें गंगेपुढें व विष्णुपदापुढें वकीली केली. तींत त्यांनीं आपले सारे इष्टमित्र व गांवचे न्हावी, परीट, सुतार लोहार, इत्यादिकांच्या तर्फेनें-ही वकीली केली. या लोकांविषयीं त्यांनीं वकीली करावी यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण, घर ही अजब चीज आहे. त्यांतल्या निरुपयोगीही गोष्टीचें स्मरण तिऱ्हाईत स्थळीं चित्तास आनंदकारक होतें! या वकीलींत बाहेरच्या लोकांत अहल्याबाईस अर्थात् मान मिळाला होता. पंत या बाईविषयीं गंगेस ह्मणतात—

देवि! अहल्याबाई यावी भेटावयास सत्वर ती।
तूं पुण्यकीर्ति हेही, गंगे दोघीजणीहि सत्त्वरती॥

पुण्यकीर्ति व सत्त्वरती अहल्याबाईचें, तिच्या लोकोपकारित्वादि गुणांमुळें पंतांनीं गंगेशीं जें सादृश्य कल्पिलें आहे, तें अत्यंत मनोहर आहे.

या गोष्टीवरून पंतांचें अहल्याबाईविषयीं किती चांगलें मत होतें व त्यांच्या मनांत तिच्याविषयीं किती थोर आदरभाव वसत होता, हें दिसून येईल. पंत आपल्या देशीं परत जातांना या साध्वीची भेट घ्यावयाची म्हणून महेश्वर मुक्कामीं मुद्दाम गेले. तेव्हां आपल्या गांवीं एक मोठा जाडा पंडित आला, अशी गोष्ट तिच्या कानीं तात्काळ गेली. तिनें त्यांना पालखींतून भेटावयास घरीं आणलें. पंतांनीं

१ सतांचा संतांशीं परम सुकृतें संग घडला।

परशरामपंततात्या.

तेथेंच * स्तवनपर कांहीं आर्या करून त्या अहल्याबाईस अर्पण केल्या. ह्या आर्या बहुतेक सर्वतोमुखीं आहेत पण ह्या चरित्राची पूर्वता व्हावयास त्या येथें अवश्य दिल्या पाहिजेत.

## आर्या.

श्रीहरिहरभक्ता तूं देवि[1] अहल्ये वरा धराभूषा[2] ।
पूषां[3] तुज साधु म्हणे ख्याता तुजसम न बाणतनुभूषा ॥ १ ॥

देवी अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
न न्यायधर्मनिरता अन्या कालिमाजि ऐकिली कन्या ॥ २ ॥

धर्मार्थ गोत्रजन्या[5] किंवा झालीस तूं धरा-जन्या[6] ।
तुज देवि भेटली जी सत्कीर्ति कधींच हे न राजन्यां[7] ॥ ३ ॥

जाणे धर्म करीना त्या स्तवितो कोण पंडितं मन्या ।
न न्याय धर्मनिरता अन्या कालिमाजि ऐकिली कन्या ॥४॥

न त्यजिसी नर्मदेतें देवि ! तुझी ती बहु प्रिया आली ।
गंगेचीहि सखी हो कीं उभयमनांत सत्क्रिया आली ॥ ५ ॥

श्री विष्णुपदा ! स्तविली त्वद्भक्तां हें तुला हि मानावें ।
विश्व जिला वानितसे कां न मयूरेंहि तीस वानावें ॥६॥

---

* रा० पांगारकर आपल्या मोरोपंताच्या चरित्रांत म्हणतात, पंतांनीं ह्या कविता गयेस केल्या ( पा. १७६ ). रा० हंस हे आपल्या मोरोपंताच्या चरित्रांत, ह्या कविता महेश्वरास केल्याचें सांगतात ( पा. ७१ ) व रा० ओक हे चोळी महेश्वरास केल्याचें लिहितात ( हिं. कथारस, पृष्ठ २५९ ).

१ श्रेष्ठ. २ भूषण. ३ सूर्य. ४ बाणासुराची मुलगी, उषा. ५ पर्वतकन्या, पार्वती. ६ सीता. ७ राजाला.

या आर्या पाहून त्या निरहंकारी बाईला बरें वाटलें नाहीं. ( हंस आपल्या मोरोपंताच्या चरित्रांत ह्मणतात ' या आर्या पाहून बाईस फार संतोष झाला.' पान ७). तिला वाटे, एक देवच काय तो स्तुतीस पात्र असल्यानें, मनुष्यानें मानवाची कधींही स्तुति करूं नये. व हेंच तिनें मोरोपंतांस बोलून, दाखविलें. मोरोपंत तरी कोठें मानवस्तुतिप्रिय होते ! कारण,त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष यजमानासाठींच तर साऱ्या दहाबारा काय त्या आर्या केल्या होत्या. पण अहल्याबाईची कीर्ति आधींच भरतखंडांत दुमदुमत होती. ती आपल्या मृत्यूपूर्वींच पुण्यश्लोक समजली गेली होतीं. अशा थोरांचें दर्शन घेण्यापलीकडे त्यांचा कांहीं उद्देश नव्हता. ज्यानें बाजीरावाच्या आश्रयाचाही धिक्कार केला, तो ऐहिक संपत्तीचा किती अभिलाष धरणारा असेल, हें वाचकांनींच ताडावें. ह्या कविता ह्मणजे तिच्याविषयीं त्यांच्या मनांत जो आदरभाव होता, त्याचें तें फळ होय. तें फळ लक्ष्मीच्या लालसेचें नव्हे, तर तो सरस्वतीचा प्रसाद होय. मोरोपंत हा पहिल्या प्रतीचा निस्पृह व निरिच्छ मनुष्य आहे, त्यानें मानवस्तुतींत आपली जिव्हा कधींही बाटवली नाहीं, ही गोष्ट अहल्याबाईस समजतांच ती तिच्या गळीं उतरली. तिनें त्यास सालीना पांचशेंवर राहावयाचा पुष्कळ आग्रह केला, पण त्याचें यजमानावर अत्यंत प्रेम असल्यानें अहल्याबाईच्या म्हणण्यास त्यानें अनुमोदन दिलें नाहीं. अहल्याबाईनें त्याचा फार सन्मान करून त्यास एक शालजोडी बाक्षिस दिली.

## ३. अनंतफंदी व अहल्याबाई.

चरित्रें साधूंचीं अकपट विशुद्धोंचे असती ॥

वामन.

अनंतफंदी घोलप ह्या नांवाचे एक यजुर्वेदी ब्राह्मण संगमनेरीं राहत असत. त्यांच्या पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा असून त्यांची थोडी बहुत दुकानदारीही होती. हे कवि लावण्या रचून तमाशे करीत असत. अनंतफंदीनें अहल्याबाईची कीर्ति ऐकिली,म्हणून ते एकदां आपल्या साथीदरांसह होळकरशाहींत महेश्वरीं गेले. महेश्वराकडे येतांना वाटेंत सातपुडा लागतो.तेथें भिल्लांचा भारी उपद्रव असे.फंदीबोवा आपल्या अनुयायांसह सातपुड्याच्या मध्यभागीं येतात न येतात, तोंच त्यांच्या भोंवतीं भिल्लांनीं गराडा दिला व त्यांच्या जवळचा सारा ऐवज लुटला. इतकेंच नव्हे, तर फंदीबोवांस बंदींत घालून घेऊन जाऊं लागले ! पण त्या प्रसंगीं बोवांनीं मोठें प्रसंगावधान दाखविलें. त्यांनीं लागलींच त्या भिल्लांवर एक लावणी रचून ती त्यांस ह्मणून दाखविली. ती लावणी ऐकून भिल्लांस व त्यांच्या नाइकास फार आनंद झाला. त्यांनीं त्यांस त्यांचें सर्व द्रव्य देऊन शिवाय वर एक पोषाख व दोनशें रुपये दिले. नायकानें जेव्हां फंदीबोवांची हकीकत ऐकिली, तेव्हां त्यास कळून चुकलें कीं, फंदीबोवा हे संगमनेराहून अहल्याबाईकडे चालले आहेत. अहल्याबाईचें नांव ऐकतांच त्यांनीं त्यांस बरोबर पांच भिल्ल देऊन महेश्वरच्या हद्दीपर्यंत पोंचते केले !

त्या वेळीं तमासगीर वगैरे जे लोक त्या गांवीं जात, ते कधींही विमुख जात नसत. त्यांनीं आपलें कसब दाखविलें ह्मणजे त्यांना योग्यतेनुरूप कांहीं ना कांहीं तरी प्राप्ति होईच. त्याप्रमाणें एके दिवशीं राजवाड्यांत अनंतफंदीचाही खेळ झाला. खेळ झाल्यानंतर बाईनें त्यांस एकीकडे बोलावून उपदेश केला कीं, "तुह्मी ब्राह्मण

असून अशीं कवनें करण्यांत आपलें कवित्व खर्च करतां, त्यापेक्षां तें स्वार्थ आणि परमार्थ साधेल अशा तऱ्हेनें खर्च कराल, तर आपल्याबरोबर जनांचेंही हित होईल. ”

या भाषणावरून अहल्याबाईची परमार्थदृष्टि आणि गुणग्राहकता कशी होती, हें स्पष्ट दिसून येतें. अनंतफंदी हाही संगतीनेंच थोडाबहुत बिघडला होता. तो मूळचा चांगला असल्याकारणानें त्याच्या मनावर त्या साध्वीच्या उपदेशाचा परिणाम तात्काल झाला व त्याची वृत्ति पालटली. त्यानें आपल्या डफावर बुक्की मारून तो फोडून टाकला व अहल्याबाई आपल्या तमाशांची बिदागी देत असतां, ती न घेतां तो संगमनेरीं परत आला. तेव्हांपासून त्यानें तमाशा करावयाचें सोडून दिलें.

या गोष्टीस कांहीं दिवस लोटून गेले. संगमनेरीं स्वामी अनंत यांचा दरसालाप्रमाणें उत्सव सुरू झाला. त्या प्रसंगीं गांवच्या पाटलानें व इतर मंडळींनीं फंदीस तमाशा करावयास सांगितलें. त्यानें या गोष्टीस पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु ग्रामस्थांचा इतका आग्रह पडला कीं, तो अनंतफंदीस मोडवेना. शेवटीं त्या भिडस्त गृहस्थानें तमाशा करण्याचें मोठ्या संकटानें कबूल करून तो करावयास प्रारंभ केला. कर्मधर्मसंयोग! अहल्याबाईची स्वारी त्याच वाटेनें त्याच वेळीं पुण्यास जात होती ! तिला रस्त्यावर माणसांची खूपच गर्दी दिसली. तें पाहून ही गर्दी कशाची आहे, असा तिनें प्रश्न केला. तेव्हां तिला कळलें कीं, तो तमाशा चालला आहे. ह्या साध्वीस तमाशांचा मुळापासूनच कंटाळा असल्यानें, तिनें एका चाकरास तमाशा कोण करीत आहे व करवीत आहे याचा शोध करावयास पाठवलें व आपण पुढें निघाली. इतक्यांत त्या चाकरानें तातडीनें बातमी आणिली कीं, तो तमाशा अनंतफंदी करीत आहे!

अनंतफंदीचें नांव ऐकतांच अहल्याबाईस मागल्या गोष्टीचें स्मरण होऊन फार वाईट वाटलें. तिनें त्यास स्वतः भेटून शिक्षा करावयाची असें मनांत आणलें. ती पुढें जावयाचें सोडून तमाशा चालला होता त्या स्थलाकडे निघाली.

अहल्याबाई आपणाकडे येत आहे, ही गोष्ट फंदीबावास व तेथील शिष्ट मंडळीस कळली. असले प्रकार तिला मुळींच आवडत नसत. तशांत तिनें फंदीबोवास ताकीद केलेली. यामुळें त्यांची भीतीनें गाळण उडाली. परंतु अनंतफंदीच्या अंगीं समयसूचकता व धूर्तता हे गुण विशेष असल्यानें, त्यानें एक टाळकरी खेरीज करून मागील मंडळीस व नर्तकास खालीं बसविलें. आणि मध्व मुनीच्या—

पद.

हरी तुझी मुरलीधर घेणी ॥ धृ० ॥

मुरलीनें कसें लाविलें पिसें गोपि विचरता
विसरली वेणी॥ हरी० ॥ वृंदावनीं धीट झालों
आह्मी नीट लोकलाजेवरी सोडियलें पाणी ॥२॥
मध्वनाथ स्वामी,भाग्यवंत आह्मी, हेचि मागतसे
शेवटली घेणी॥३॥तुझी मुरलीधर घेणी॥हरी०॥

या भक्तिरसपरिपूर्ण पदावर कीर्तन चालविलें. अहल्याबाई तेथें येऊन पाहते, तों गोपींच्या अढळ भक्तीवर फंदींचें कीर्तन चाललें आहे. अनंतफंदी हा आधींच वक्ता उत्तम, विषय भक्तीचा, व अहल्याबाई-सारखी भक्त श्रोती. तेथें कीर्तन चाललें आहे,हें पाहून तिला आनंद झाला. तिला कीर्तनाची गोडी असल्यानें ती तें ऐकत बसली. फंदी-बोवावर कीर्तनाचा हा पहिलाच प्रसंग ! परंतु त्यानें कीर्तनास असा

रंग आणला कीं, तेणेंकरून सर्व श्रोते मंडळीस व अहल्याबाईस फार आनंद झाला. त्या स्वारींनीं असें भासविलें कीं, आपण कसलेले हरिदास आहोंत. अहल्याबाईनीं तें कीर्तन ऐकून हरिभक्तिपरायण अनंतबोवास भरजरीचा पोषाक व सुवर्णाचीं कडीं इनाम दिलीं.

## ४. बाईचा बाणेदार स्वभाव.

विठ्ठल शामराज यास श्रीमंतासाठीं कांहीं धोतरजोडे पाठवावयाचे होते. त्याप्रीत्यर्थ आपणास कांहीं बाईची मदत मिळावी, ह्मणून तो केसोपंताबरोबर दरबारास गेला. त्या वेळीं ब्राह्मण संतर्पणाचा हजूम होता. तेथें कांहीं वेळ बसल्यानंतर केसोपंत बाईस बोलले " सरकारची फर्मास धोतरजोड्याची आली आहे. यास्तव पांचसात मारू बोलावून, त्यांस धोतरजोडे तयार करायास सांगितले आहेत. जोड्यांच्या लांबीरुंदीची आज्ञा सरकारची आली होती, त्याप्रमाणें मारूंस प्रमाण सांगून प्रस्तुत पांचसात करविले आहेत. धोतरजोड्याचें मोल पंचवीस रुपये पासून वरते पसतीस चाळीसपर्यंत करावयास सांगितले आहेत. त्यास मारूंनीं खर्चास मागितलें. यास्तव दोनचारशें रुपये आह्मांकडेस तसलमातीस द्या, जसा खर्च होईल तसें लिहून ठेवूं. सरकारांत लिहून पाठवूं. ऐवजाची जिकडे आज्ञा येईल तिकडून आपला भरणा करूं, अगर आपल्याकडेच आज्ञा आली तर तसेंच होईल. "

यावर बाईंनीं उत्तर केलें, " धोतरजोडे तुह्मी कोणत्या मारूंस सांगितले आहेत? ते कसे करितात ? उतरून येऊं द्या. पाहूं. त्याचें मोल करूं. सरकारांत पसंत पडतील तसे घेतले पाहिजेत. मोल चौकशीनें केलें पाहिजे. येथें घेऊन या. पाहून, चौकशी करून रुपाया जो लागेल तो देऊं. मजकूर काय ? असेंही करितां पांचशें

रुपये लागतील. त्यास तसलमात कशास पाहिजे? तत्रापि धोतरजोडे पाठविणें. त्याचा मजकूर तेथें लिहिणें कशास? रुपाया आह्मीच देऊन माफजतीनें रवानाही करूं."

यावर वकील ह्मणाले, "श्रीमंतांनीं आह्मांसच लिहिलें आहे. आह्मी चौकशीनें मोल करून खरेदी करूं. आपल्यासही दाखवूं. परंतु आह्मीं पाठविले पाहिजेत. रुपायांविषयीं तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें तुमचा भरणा करूं."

हें भाषण ऐकून बाई ह्मणाली, 'तुमच्या चित्तांत आपणच परभारां घेऊन पाठवून द्यावे. आपला मुजरा व्हावा. त्यास फार चांगलें आहे! त्यापक्षीं आम्हांस दाखवितां कशास, आणि रुपायाही आम्हांस कशास मागतां? तुम्हीच आपले खरेदी करून पाठवून द्या. रुपाया आम्ही देणार नाहीं.'

बाईची मर्जी कडवी झाली व ती लागलींच उठून ब्राह्मणांकडेस गेली.

या गोष्टींत बाईचा चौकस स्वभाव, श्रीमंताबद्दल आदर, व दुसऱ्याचा वरचष्मा न सहन करण्याचा गुण, ह्या गोष्टी स्पष्ट दिसून येतात.

---

## ५. अहल्याबाईची लीनता.

**मिथ्या भगल[1] वाढविती। आपुली आपण पूजा घेती।**
**तुका ह्मणे धाकुटें व्हावें। निजवस्तूसी मागुनि घ्यावें॥**

एके वेळीं एका शास्त्र्यानें अहल्याबाईसंबंधीं एक स्तुतिपर ग्रंथ केला व तो तिला अर्पण करावयास तिच्याकडे घेऊन गेला. तिनें तो

---

१ ढोंग.

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

ग्रंथ पाहिला व ती त्या शास्त्र्यास कांहीं एक न देतां त्यास ह्मणाली "तुह्मी माझ्यासारख्या दीन पामराची व्यर्थ स्तुति केली. कारण मी अबला व पापी स्त्री आहें. यापेक्षां तुह्मी आपला काळ परमेश्वर स्तुतींत घालवितां, तर त्या काळाचा सद्व्यय होता व तुह्मांला त्याचें पुण्यही लागतें."

ह्यावरून तिला आत्मस्तुतीचा किती कंटाळा असे हें व तिला गर्व कसा तो ठाऊक नसे हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल.

## ६. अहल्याबाई व दादासाहेब.

**बापा ! कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं ॥**

मोरोपंत—आदिपर्व अध्याय, ३१.

मल्हारराव होळकर कैलासवासी झाले, तेव्हां खजिन्यांत सुमारें १६ कोट रुपये होते! या वेळीं राघोबा भरारीची स्वारी माळव्यांत होती. त्यानें अहल्याबाईस निरोप पाठविला कीं, 'आम्हांला सैन्यासाठीं रुपयांची फार नड आहे. सबब आपण कांहीं रुपये द्यावे.' हा निरोप ऐकून बाईनें उत्तर पाठविलें कीं, 'मीं तें सारें द्रव्य दानधर्माप्रीत्यर्थ काढून ठेविलें आहे, म्हणून मला तें इतर कामांत देतां येत नाहीं. मी आपल्याला तें दान देतें. मग आपण तें खुशाल घ्यावें, कारण मग तें आपलेंच आहे.'

हें प्रत्युत्तर ऐकून दादासाहेबानें जरा कडक निरोप पाठविला कीं, 'तुम्ही म्हणतां ती गोष्ट आम्हांस मान्य नाहीं. पण तुम्हीं जर आमचें म्हणणें ऐकिलें नाहीं, तर आह्मांला हातीं शस्त्र धरावें लागेल. म्हणून बऱ्या बोलानें द्रव्य द्यावें, तें चांगलें.' तिनें या उत्तराचा जाबही मागें न घेतां पाठविला, 'मला तें द्रव्य धर्मादायाखेरीज इतर कामांत खर्च करतां येत नाहीं. आतां आपण

लढाई करूं ह्मणतां, तर त्यास माझा नाइलाज आहे. मीही लढाईस सिद्ध आहें. मी लढाईंत पडल्यावर द्रव्य आपलेंच आहे. खुशाल न्यावें.’

याप्रमाणें त्यास उत्तर पाठवून तिनें आपल्या लोकांस सांगितलें कीं, “ आपणास लढाईची कांहीं तयारी करावयाची नाहीं. मात्र कुळंबिणींस हत्यारें द्या व माझा घोडा कसा. मी त्यावर बसून जाईन. पुढें काय होईल तें पाहून घेऊं. ”

दुसऱ्या दिवशीं दादासाहेबांची स्वारी रणांगणावर जाऊन पाहाते, तों अहल्याबाईकडे एकही पुरुष नसून जिकडे पाहावें तिकडे बायका दिसूं लागल्या! हा प्रकार पाहून दादासाहेबांकडील शिष्ट लोकांनीं त्यांस सांगितलें कीं, “ स्त्रियांशीं युद्ध करणें हा क्षत्रियधर्म नव्हे. भीष्माचार्यांवर जेव्हां शिखंडी चालून आला, तेव्हां त्यांनीं आपलें धनुष्यबाण खालीं टाकून त्याच्याकडे पाठ केली! याप्रमाणें पूर्वींपासून क्षत्रिय वर्तत आले आहेत. तशांत आपण लढत असलां तर खुशाल लढावें; पण आह्मी कधींही स्त्रियांवर शस्त्र उपसणार नाहीं ! ” हें ह्मणणें दादासाहेबांसही पटलें. ते बाईकडे येऊन तिला ह्मणाले, “ तुमची फौज कोठें आहे ? येथें तर सर्वदूर बायकाच दिसतात ! ”

यावर बाईनें उत्तर केलें कीं, “ मी स्त्री राज्य करीत आहें. माझी हीच फौज. माझा आपण पराभव करा व द्रव्य घेऊन जा. मला जास्त फौज ठेवून करावयाचें काय ? ”

हें उत्तर ऐकून दादाची खात्री झाली कीं, आपला खटाटोप फुकट आहे. पण इतक्या थरास गोष्ट आणली असतां आतां निमूटपणें जावें तरी कसें, म्हणून त्यांनीं बाईची क्षमा मागितली व ते तीस म्हणाले, “ तुम्हीं मनसोक्त खुशाल दानधर्म करावा. आम्हीं आणखी कोठेंही जाऊं व द्रव्य मिळवूं.” असें बोलून दादांनीं पाय मागें काढला.

---

# ७. बाई व तुकोजी.

तुकोजीराव होळकर व अहल्याबाई यांची आपसांत दिलसफाई नव्हती. त्या प्रसंगीं मध्यस्तीचें काम सुलतानजी लांबहाते करीत होते. त्यांच्याबरोबर बाईनीं तुकोजीस निरोप पाठविला कीं, ‘ प्रथम तुम्ही स्वामिकार्यास जातां, ते जाऊन सरकारचाकरी करून येणें; अगर चित्तांत समाधानी असेल तर सडे भेटीस येणें. ’ यावर तुकोजीबाबा मध्यस्थास म्हणाले कीं, ‘ आपण कोणावर इतराजी करणार नाहीं, याबद्दल बाईचें पुर्तेपणें वचन; दुसरें, त्यांच्या आमच्या भेटींत व बोलण्यांत पाटीलबावांचा संदर्भ कांहीं असूं नये. ’ मध्यस्थ त्याप्रमाणें बाईस जाऊन बोलले. तेव्हां बाईनें जें उत्तर केलें, तें मोठें मार्मिक असून तिच्या तें अभिमानाचें पूर्ण द्योतक आहे. ती म्हणाली, “ आम्हांजवळ वचन कशाचें मागतां? **आपल्या घरास यावयास वचनें कशास पाहिजेत ? आम्हीं कोणास वचन दिलें नाहीं. आतांही देत नाहीं.** येणें तर यावें व तुमच्या चित्तांत जर कांहीं विकल्प असेल तर येऊं नये. ” दुसऱ्या मुद्यावरही बाईनें असेंच साफ उत्तर दिलें कीं, “ इतके दिवस तुह्मी पाटीलबावांच्या आंगें उडत होतां. त्यांचे आज्ञेशिवाय कांहीं करूं नये, असें तुमचें त्यांचें होतें. मग आतां पाटिलबावा कां नकोत ? ही गोष्ट कार्याची नाहीं तुमच्या आमच्या जाबसवालास मध्यें अवश्यमेव पाटिलबावा असले पाहिजेत ! ”

या प्रसंगीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, तुकोजीबोवांचें ह्मणणें ह्मणजे नारो गणेशाचेंच होतें.* या गोष्टीवरून बाईचा निष्कपट व करारी स्वभाव स्पष्ट दिसून येत येतो.

---

* पान १५७ पहा.

# ८. अहल्याबाईचें प्रजावात्सल्य.

खेमदास या नांवाचा सिरोंज येथें एक धनाढ्य सावकार रहात असे. तो निपुत्रीक असतांनाच वारला. तेव्हां तेथील कमाविसदारानें त्याच्या बायकोपाशीं तीन लक्ष रुपये मागितले! व तीस अशी धमकी दिली कीं, "मला जर तूं ही रक्कम दिली नाहींस, तर मी तुझी संपत्ति सरकारांत जप्त करीन!"

अशा प्रसंगीं तिनें आपल्या आप्तांचें मत विचारलें. तेव्हां ते सारे तिला म्हणाले कीं, "तूं दत्तक खुशाल घे. परंतु कमाविसदार मागत असलेला हा पैसा फार होतो!" पण कमाविसदार नांव मात्र ऐकेना! तो म्हणे 'तूं मला मागितलेला नजराणा दिल्याशिवाय दत्तक घेण्यास मी मुळींच परवानगी देणार नाहीं.'

कमाविसदार मुळींच बधत नाहीं असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां ती आपल्या पुतण्यास (त्यास ती दत्तक घेणार होती) व इतर सोयऱ्यांस घेऊन महेश्वरीं गेली. तिनें अहल्याबाईच्या कानीं सर्व हकीकत घातली. "आतां काय निकाल होणार," या काळजींत अहल्याबाईनें तिला एक दिवसभरही ठेविलें नाहीं. तिनें लागलीच त्या कमाविसदारास कामावरून दूर केलें व तिचा दत्तक कबूल केला. ती बाई अहल्याबाईस नजराणा देत होती, पण तिनें तो मुळींच घेतला नाहीं! इतकेंच नव्हे, तर तिनें दत्तक घेतलेला मुलगा आपल्या मांडीवर घेतला, त्यास वस्त्रें व पालखी दिली आणि आपल्या गांवीं परत पाठविलें. ह्या निरपेक्षतेमुळें तिच्यावर तिच्या प्रजेचें प्रेम वृद्धिंगत झालें.

## ९. सोमनाथाच्या मूर्तीची स्थापना.

प्रभासपट्टण ह्मणून जुनागड संस्थानांत एक गांव आहे. तेथील सोमनाथाची मूर्ति महंमदानें इ. स. १०२४ सालीं फोडली हें प्रसिद्धच आहे. अहल्याबाईनें त्या भग्न केलेल्या देवळापासून सुमारें १००० फुटांवर एक मंदिर बांधलें व तेथें सोरटी सोमनाथाची पुन्हा स्थापना केली. त्याची कथा खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

एकदां सोमनाथ अहल्याबाईच्या स्वप्नांत आले व त्यांनीं तिला असा दृष्टांत दिला कीं, "मी प्रस्तुत मुसलमानाच्या मशीदींत पडलों असून सध्यां माझे मोठे हाल आहेत. त्यास माझी कांहीं व्यवस्था करावी." असें सांगून आपण सध्यां कोठें पडलों आहोंत, त्याचें नेमकें ठिकाण सांगितलें, व आपण अदृश्य झाले. अहल्याबाईचा तरी मूर्ति स्थापन करण्यासाठीं अवतारच होता. तेव्हां ती अशी घरीं चालून आलेली संधी वांया कशी जाऊं देणार? तिनें आपणास दृष्टांत झाल्याप्रमाणें त्या मूर्तीचा शोध लावून ती हुडकून काढविली. त्या दिवसांत या गोष्टीस किती प्रयास पडले असतील! पण ती बाई अशा अडचणींस कशी जुमानणार! तिनें तेथें नवीन मंदिर बांधवून त्यांत सोमनाथाच्या मूर्तीची स्थापना केली. आतां ती मूर्ती चांगल्या स्थितींत असून तिची व्यवस्थाही चांगली आहे.

---

## १०. प्रजाप्रेम.

आईची ज्याप्रमाणें आपल्या मुलावर प्रीति असते, त्याप्रमाणें अहल्याबाईची आपल्या प्रजेवर मेहेरनजर असे. त्यांत ती इंदुरावर तर विशेषच असे. एके दिवशीं देवीचंद या नांवाचा एक धनाढ्य सावकार इंदूरांत मरण पावला. त्याला मूलबाळ कांहींएक नव्हतें. याच

वेळीं तेथें तुकोजीरावाचा तळ पडला होता. त्याच्या मनांत कित्येक आपमतलबी मनुष्यांनीं भरवून दिलें कीं, या सावकाराची संपत्ति आपण सरकारजमा करावी. तुकोजी होळकरास स्वतःचें मत असें कांहींच नव्हतें. त्यानें दूरवर विचार न करतां आपल्या उपदेशकांच्या सांगण्याप्रमाणेंच वागावयाचा विचार केला.

हें अरिष्ट पाहून देवीचंदाची बायको तात्काल महेश्वरीं गेली. तिनें अहल्याबाईच्या कानीं ही सारी हकीकत घालून ती तिची करुणा भाकूं लागली. अहल्याबाईनें तिचें सारें बोलणें ऐकून घेतलें व शेवटीं ठरविलें कीं, "ही बाई आपल्या नवऱ्याच्या धनदौलतीची सर्वस्वी मालकीण आहे." इतकेंच नव्हे, तर तुकोजीस आज्ञा केली कीं, 'तुम्ही इंदूरापासून जरा दूर उतरावें. माझ्या प्रजेवर जुलूम करून तिला त्रास देऊं नये.

हा प्रकार पाहून तुकोजीस फार पश्चात्ताप झाला. त्यानें अहल्याबाईची आज्ञा सर्वस्वी वंद्य मानून आपल्या चुकीचें प्रायश्चित्त घेऊन क्षालन केलें. ह्या गोष्टीमुळें ती इंदूरकरांस प्रिय व्हावी यांत नवल तें काय ?

## ११. शिष्टाचार.

दिल्लीहून कांहीं मंडळी बादशहाचा परवाना घेऊन दक्षिणेस जात होती. बादशहानें राजेरजवाडे व तहद औरंगबादेपर्यंत मातबर संस्थानिकांस पत्रें दिलीं होतीं कीं "मार्गीं कोणी मुजाहीम[1] न होतां या मंडळीस हद्दपार करून देणें." ही मंडळी महेश्वरपर्यंत आली. बादशहाचा बाईसही इनाईतनामा होता कीं, "यांस समागमें लहबार देऊन आपल्या हद्दींतून पार करणें." बादशहाचें पत्र घेऊन

१ हरकत.

एक भला मुसलमान मनुष्य वाड्यांत आला. तो ह्मणाला, " पातशाही पत्र—उभें राहून, पुढें जाऊन घेतलें पाहिजे. " हें ऐकून बाई ह्मणाली, " ज्या श्रीमंतांच्या लोकांनीं पातशहाची तगीरी बहाली[1] केली आहे, त्यांच्या पत्रास इतकी आडेस नाहीं. यांस कोण पुसतो ! " त्या समयीं जवळचे लोक ह्मणाले " पातशाही कैदकानू आहे. असे शिष्टाचार आपण मान्य न कराल तर आणीक कोण करील ? " हें ह्मणणें बाईसही पटून ती मुकुंदराव दिवाणास ह्मणाली " उभें राहून पत्र घ्या. "

बाईनें त्यांच्या जवळील परवाना पाहिला. त्यांच्याजवळ देवराव हिंगणे यांचेंही याच साहित्याविषयीं पत्र होतें. तीं पत्रें पाहून तिनें विचारिलें, " पावसाळ्यांत चौमाशाची छावणी कोठें करतां ? " यावर त्यांनीं तेथेंच छावणी करावयाचा मनोदय सांगितला. तो ऐकून बाई ह्मणाली, " उज्जनीस अगर पिंढाव्यास छावणी करा. बादबरसातींत या. आह्मी आपली हद्द पार करून देऊं. " इतकें सांगून त्यास विडे देवविले. एक घोडा व आठ माणसें त्यास समागमें होतीं. त्यांस शिधा सामुग्री दिली. मुनशीस पातशहाच्या पत्राचें उत्तर द्यावयास सांगून त्यांस निरोप दिला.

---

## १२. राणोजी शिंदे चोंढीकर.

राणोजी शिंदे चोंढीकर या नांवाचा अहल्याबाईचा एक भाचा होता. त्याच्याकडे पांचशें स्वाराचें पथक होतें. तो जरा शूर, तशांत बाईसाहेबांचा नातेवाईक, यामुळें त्यानें नारो गणेशास व त्याचे धनी तुकोजी यांसही दुरुत्तरें केलीं ! ही गोष्ट जेव्हां अहल्या-

---

१ स्थापणें. २ शिष्टाचार.

बाईचे कानीं गेली, तेव्हां तिनें त्यास बोलावून आणलें व ती त्यास रागें भरून म्हणाली कीं, 'असा मलाईखोर * आहेस, तर मला तोंड दाखवूं नकोस!'

राणोजी शिंदे यानें विनंतींत तिला सांगून पाठविलें कीं, "धनगराचे घरावर ईश्वर सुवर्णाचा पाऊस पाडतो आणि इतर सरदार मेले असे नाहीं! तुझे आसिरवादें करून चाकरी मिळवितो कीं नाहीं तें पहावें."

अहल्याबाईसही त्याची प्रतिष्ठा नसल्यानें तिनें त्यास त्यावेळीं जाऊं दिलें. तो नागपूरकर भोंसले याजकडे चाकरीस राहिला. या गोष्टीस बरींच वर्षें झालीं. आपले चांगले लोक दुसरीकडे जाणें बरें नव्हे व त्यास झालें इतकें शासन पुरे, असें समजून बाईसाहेबांनीं त्यास परत बोलावून आणलें.

---

## १३. प्रजेच्या संपत्तीचा विनयोग,

इंदूर व महेश्वर यांच्या दरम्यान जामघाट लागतो. तेथील देखावा अत्यंत प्रेक्षणीय आहे. या घाटांत एक दरवाजा आहे. हा दरवाजा सुमारें २९ यार्ड लांब, २२ यार्ड रुंद व ४० ते ५० फूट उंच आहे! या

---

* रा. पारसनीस यांनीं 'मळइखोर' असा पाठ दिला आहे. आमच्या प्रतींत 'मलाईखोर' हा पाठ आहे. मलाई=साय. मलाईखोर=साय तेवढी घेणारा, उत्कृष्ट भाग लाटणारा. "मलईचे मालक तुह्मीं" असें होळकरांच्या कैफियतींतच (पान ४४) एक वाक्य आहे. मलईचा अर्थ, बळवंत राव कमळाकरांचे कैफियतीस आरंभीं जें टिप्पण दिलें आहे, त्यांत बरोबर दिला आहे.

१ कैफीयतींत "३७ वर्षें" ह्मटलें आहे. पण हा आंकडा चुकला आहे, हें महेश्वर दरबारच्या बातमीपत्रांवरून व इतर अंतःप्रमाणावरून सहज सिद्ध करतां येईल.

दरवाजाच्या दोहों बाजूस भव्य खांब आहेत. दुसऱ्या मजल्यावर सज्जे आहेत. दक्षिणेकडील भिंतीस तीन खिडक्या असून त्यांतून खालीं दोन हजार फुट नर्मदा वहात असलेली दिसते! या दरवाजाच्या माथ्यावर एक चौरस ओटा असून त्यावर शामिआना लावतां यावा म्हणून त्यास भोंकें केली आहेत. या ओट्यावरून विंध्या आणि सातपुडा या पर्वताच्या पसरलेल्या भिंती, घनदाट अरण्यें, हिरवीगार शेतें, नर्मदा नदीचें वहात असलेलें पवित्र पाणी वगैरे फारच उत्तम देखावे दिसतात. या दरवाजावर पुढील लेख आहे.—

**श्री गणेशायनमः स्वस्ति श्री विक्रामर्कस्य संवत् १८४७ सप्ताब्धि नागभूशके १७१२ युग्म कुसप्तैकामिते द्रुमाति वत्सरे, माघे शुक्लत्रयोदश्यां पुष्यार्के बुधवासरे; स्नुषा मल्हारिरावस्य, खंडेरावस्य वल्लभा शिवपूजापरा नित्यं ब्राह्मणधर्मतत्परा अहल्याख्या बबंधेदं मार्गद्वारं सुशोभनम् ।**

या दरवजास गवाक्षें आहेत. त्याच्याजवळ एक तलाव* असून तो अहल्याबाईच्या नांवानेंच प्रसिद्ध आहे. या दरवाजासबंधीं एक गमतीची गोष्ट सांगतात. पण ती कितपत खरी आहे याची शंकाच आहे. ती गोष्ट अशीः—गणपतराव या नांवाचा एक मराठा गृहस्थ तेथें रहात असे. त्यानें या वाटेनें ज्या गाडया घोडीं जात त्यांपासून कर घ्यावा. या कराचें नांव 'हातझुलाई.' या करापासून त्याला बरीच प्राप्ति झाली. मग हे गोमाजी गणेश तो पैसा घेऊन अहल्या-

* या तलावाबद्दल महेश्वर दरबारच्या बातमींपत्रांत (भाग २ पा. ४८) असा उल्लेख आहेः—

गंगाजलनिर्मल अहल्याबाई होळकर ही जमावसुद्धा जांबेस तलावाचे उद्यापनाकरितां आलीं आहेत. येथून महेश्वरीं जावयासी आठ दाहा रोज लागतलि. आम्ही समागमें आहों.

बाईकडे गेले व तीस तो पैसा देऊं लागले. पण तिनें तो पैसा घ्यावयाचें नाकारलें. ती म्हणाली ' हा लोकांपासून घेतलेला पैसा लोकोपयोगी सत्कार्यांत खर्च झाला पाहिजे. हा गोमाजी गणेशानें जमविलेला पैसा दरवाजा बाधण्यांत खर्च झाला.

## १४. अहल्याबाईचें शहाणपण.

अहल्याबाई राज्यावर असतां एक सावकार मेला. त्याचे बायकोची एके दिवशीं अशी अर्जी आली कीं, ' माझी दौलत फार असून त्याचा वारस करण्याकरितां दत्तक घेण्याची मला परवानगी द्यावी. ' तेव्हां अहल्याबाईजवळ चार कारभारी बसले होते; त्यांनीं असें बोलणें सुरू केलें कीं, ' बाईच्या अर्जीप्रमाणें दत्तकाची परवानगी द्यावी, परंतु नजरेचा ठराव करून घ्यावा. कारण मयत सावकाराजवळ द्रव्य पुष्कळ आहे.' तें सर्व बोलणें ऐकून घेऊन बाईनें उत्तर दिलें कीं, दत्तकाची परवानगी द्यावी असें मला वाटतें. परंतु नजर कशाकरितां घ्यावी हें माझ्या लक्षांत येत नाहीं. नवऱ्यानें मेहनत करून द्रव्य मिळविलें व तो मेला; तेव्हां त्याची बायको पुत्र घेण्याकरितां परवानगी मागते. याचें कारण इतकेंच कीं, शास्त्रमार्गें तिला पुत्र घेण्याचा अधिकार आहेच. परंतु आम्ही थोर व राजे कदाचित् शास्त्र सोडून तिला आडवें लावूं कीं, तूं कोणास विचारून दत्तक घेतलास? या भयानें तिनें ही अर्जी केली. तर तिला अभय द्यावें कीं, तुम्हांस शास्त्राप्रमाणें चालण्यास आमची कांहीं हरकत नाहीं. खुशाल पुत्र घेऊन दौलतीचा उपभोग घ्यावा. असें सांगण्याचा आमचा धर्म आहे. आतां तिला असें सांगण्याकरितां तिजजवळून हा नजररूप दंड घेतला तर तो ती देईल. परंतु हें

---

१ पान १४२ टीप पहा.

द्रव्य चोरीचें झालें, अथवा जबरदस्तीनें संपादन केल्यासारखें झालें. याजकरितां नजर कांहीं घ्यावयाची नाहीं. तर या अर्जीचा जाब इतकाच लिहावा कीं, तुह्मी दत्तक घेणार हें ऐकून आह्मांस फार संतोष झाला. पूर्वींपासून तुमचा लौकिक चालत आहे, तो सांभाळून चालावें. ह्मणजे सरकारास त्याहून अधिक संतोष होईल. व तुमचे द्रव्याचे तुह्मी मालक यास्तव आह्मी तुह्मांपासून विनाकारण कांहीं एक नजर घेत नाहीं. अशाप्रकारें द्रव्य जमा करण्याची सरकारास कांहीं अडचण पडणार नाहीं. याप्रमाणें जाब लिहून दिला. ह्यावरून या बाईचें शहाणपण पहावें.

ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती पान, ११५.

भाग पंधरावा.

# अहल्याबाईचें धर्मजीवन.

अहल्या सर्वधर्मज्ञा संमता सत्सुभासुरा ।
वाङ्मनःकायसंशुद्धा बहुश्रोतृ परायणा ॥ ३६ ॥
विष्णौ समर्पिका नित्यं त्रिविधोपात्तकर्मणा ॥
जितेंद्रिया च सकलप्राणिनां हि हितैषणी ॥ ३७ ॥

खुशालीराम

अहल्याबाईचें चरित्र संपलें, पण तिचा चरित्रप्रभाव कांहीं संपला नाहीं. व तो सांगून कधीं संपावयाचाही नाहीं. सूर्य अस्तास गेल्यावर त्याची आरक्त प्रभा अनुरागकारक असते. पण ती कांहीं काळ रहाते. अहल्याबाई अस्तास गेली, पण तिची प्रभा सूर्यप्रभेप्रमाणें अल्पावकाशी झाली नाहीं. असा तिचा विलक्षण महिमा मागें राहिला आहे. तिचा देह गेला पण कीर्ति अजरामर आहे. कारण तिला जीवंत धर्मजीवन मिळाल्यामुळें तिचा कीर्तिवृक्ष चांगला फोंफावून तो माजलेल्या आम्रवृक्ष प्रमाणें विस्तीर्ण असा वाढला. त्या विशाल वृक्षाच्या विस्तृत शीतल

छायेखालीं तिची सर्व प्रजा आनंदानें बसली. त्यांना ह्या वृक्षाचीं मधुर फळें यथेच्छ चाखावयास मिळालीं, याचें कारण त्या वृक्षाचें पालन त्या पुण्यदेहाकडून झालें हेंच होय. तिनें ह्या वृक्षाचें पालन पूर्ववयांत एखाद्या ऋषिकन्येप्रमाणें व उत्तरवयांत एखाद्या तापसी-प्रमाणें पुत्रवत् केलें. ह्या वृक्षाच्या गार छायेखालीं नुसत्या तिच्याच प्रजाजनाला आश्रय मिळाला नाहीं, तर त्याव्यतिरिक्त इतर प्रांतां-तील लोकांनाहीं मिळाला आहे, व तो अजून मिळत आहे. या माउलीचें विश्वकुटुंबकत्व सुधारणाशतकांतील आपल्याकडील बहु-तेक अग्रगण्य सुधारकासही खालीं पहावयास लावील. विश्वकुटुंबक-त्वाचें तत्त्व नुसते जे उराशीं घेऊन बसतात, अशा बोलघेवड्यांनीं हें लक्षांत आणून अहल्याबाईचें चरित्र नेहमीं डोळयापुढें ठेविलें पाहिजे. ‘ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ’ हें साधुचें जें लक्षण, तें तिच्यांत उत्तम प्रकारें होतें. ’

अहल्याबाईनें लोकांच्या सोईसाठीं जागोजाग अन्नछत्रें, धर्मशाळा, तलाव, विहिरी व रस्ते बांधले आहेत. त्या काळीं दळणवळणाच्या सोई मुळींच नसल्यानें वाटसरांस अशा सार्वजनिक कामांचा किती उपयोग होत असेल, हें कांहीं सांगावयास नकोच. हीं कार्यें तिनें आपल्याच प्रांतांत केलीं आहेत असें नव्हे, तर इतर प्रांतांबद्दल आपपर भाव नष्ट करून त्या प्रांतांतही अशीं कामें केलीं आहेत. हर-प्रसाद शास्त्री, एम्.,ए., यांनीं म्हटलें*आहे. ‘तिनें काशीविश्वेश्वराचें मंदिर व गया येथील विष्णुपदाचें मंदिर पुनः नवें बांधलें आणि

*She renewed the temples of Vis'ves'vara at Benares and Vishnu pada at gaya, and constructed the Grand Trunk Road from Calcutta to Benares.
A School History of India (p. 184.)

कलकत्यापासून तों काशीपर्यंत भला थोरला रस्ता बांधला.' याप्रमाणें आसेतु* हिमाचल तिनें असलीं पवित्र कार्यें करून आपलें नांव अजरामर केलें. तिनें कोणचें काम कोठें करून ठेवलें आहे, याची संपूर्ण माहिती तिच्या संस्थानांत सांपडत नाहीं, तर मग ती अन्य ठिकाणीं एके जागीं कशी सांपडणार? कारण, तिनें कित्येक गुप्त दानें दिलीं आहेत तर कित्येक ठिकाणीं जीं लोकोपयोगी कामें केलीं आहेत त्यांचा दानधर्माचा संबंध त्याच गांवीं लावून दिला. यामुळें त्याची दाद संस्थानापर्यंत येतच नाहीं. तिनें कित्येक ठिकाणीं देवळें, अन्नछत्रें इत्यादि नित्य खर्चाचीं कामें केलीं आहेत. त्याचा खर्च निर्विघ्नपणें चालावा ह्मणून तिनें त्याच गांवीं कांहीं घरें बांधून दिलीं आहेत. त्या घराचें जें भाडें उत्पन्न व्हावयाचें तें त्या खर्चीं घातलें आहे. अथवा त्या गांवाच्या आसपास जमीन घेऊन ती त्या खर्चास देऊन टाकली आहे. अशा देणग्या दिल्यानें दोन हेतु साध्य झाले आहेत. त्यांपैकीं पहिला. त्या कार्यांचा खर्च वारंवार संस्थानावर पडावयास नको. दुसराः आपल्या पश्चात् हे दान धर्म कोणींही बंद करूं नये. यामुळें तिनें उभारलेलीं धर्मकार्यें तिच्या पश्चात् आज सुमारें सव्वाशें वर्षें अव्याहत चाललीं आहेत! आपल्या हातून शक्य तितका दानधर्म करून दुसऱ्याच्या हद्दींत दानधर्म करण्याचा प्रसंग आला असतां तिनें असे प्रसंग कधीहीं वाया जाऊं दिले नाहीं. याबद्दल तिनें आपला शब्द पेशव्यापाशीं खर्च केला आहे. त्या संबंधीं केसो भिकाजीचें एक पत्र पाहण्यांत आलें आहे तें वाचनीय असल्यावरून येथें देण्यांत येत आहे.

* खुशालीरामानें अहल्याबाई संबंधानें स्तुतिपर उद्गार काढले आहेत ते पुरवणी 'ऊ' त पहावे.

श्री.

८ आगष्ट इ. स. १७८३.

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसीं:--

विनंति सेवक केसो भिकाजी दातार कृतानेक सा।। नमस्कार विज्ञापना तागाईत चंद्र ९ रमजान पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:--वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिवभट जोशी संगमनेरकर नि ।। अहल्याबाई होळकर यांचे आश्रित यांनीं कसबे संगमनेर येथें श्री रामजीच्या मूर्ति पंचायतनासुद्धां ठेविल्या. एक स्थळ तेल्याचें, दोन तीनशें पावेतों खरेदी केलें.त्यास्थळीं देवालय बांधून श्रीच्या मूर्तीची नित्य कीर्तन पूजा चालवावी असा मनोभाव ह्मणून विनंतिपत्रें सेवेसीं भटजीनीं लिहिलीं आहेत व समक्ष बाईनीं विनंतिपत्र लिहावयास सांगितलें कीं, " भटजी आमचे आश्रित. यांचा हेतु वतनाचे स्थळीं देवालय करावें. तर, सरकारचें आज्ञापत्र तेथील कमाविसदारास कीं, भटजींनीं स्थळ जागा घेतली, त्या जागेची महजर, खर्च न पडतां करून देऊन, बिनदिक्कत श्रीच्या देवालयाचें निर्विघ्न शेवटपर्यंत होय तो अर्थ करावा. " त्यावरून विनंतिपत्र लिहिलें आहे. त्यास स्वामी कृपाळू होऊन भटजींचे कार्याविषयीं कमाविसदार यांस पत्र, महजर करून देण्यासाठीं आज्ञा करणार धनी समर्थ, व भटजीचे पत्राचीं उत्तरें यावीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

तिच्या देणग्यांचा आणि संस्थानाचा पुष्कळ ठिकाणीं संबंध तुटल्यानें त्या देणग्यांची मोजदाद संस्थानांत नाहीं. व ती कोठें एकत्र सांपडण्याचा संभव नाहीं. याशिवाय, लोकांनीं आपल्या खर्चानें जीं मंदिरें बांधिलीं आहेत, त्यांसही तिनें उत्पन्न करूनच दिलें आहे. या सर्वांची जर कोणी याद करूं ह्मणेल, तर त्याचा एक मोठा ग्रंथ होईल.

---

1 कबाला.

त्या काळीं पुष्कळसे लोक नर्मदाप्रदक्षिणेसाठीं जात व अजूनही जातात. या लोकांच्या सोईसाठीं तिनें नर्मदेकाठीं पाणपोया व अन्नछत्रें घालून ठेविलीं आहेत. पूर्वी जीं मंदिरें अपूर्ण बांधलीं होतीं, त्यापैकीं तिनें बरींचशीं पूर्ण केलीं आहेत. गौतमाबाईनें गौरीसोमनाथाचें एक मंदिर बांधलें होतें, ते अहल्याबाईनेंच पूर्ण केलें. याप्रमाणें अनेक दाखले देतां येतील. काशीविश्वेश्वर, सोरटीसोमनाथ इत्यादि इतिहासप्रसिद्ध पवित्र देवालयांतील मूर्ति प्रसिद्ध हिंदुद्वेष्ट्यांनीं फोडल्या. त्या मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठा इतरांच्या हातून न होतां याच बाईच्या हातून व्हाव्या हा दैवयोग मोठा अपूर्वच समजला पाहिजे. यापैकीं सोरटीसोमनाथ व इतर देवालयांसंबंधीं केसो भिकाजीच्या पत्रांत पुढें लिहिल्याप्रमाणें उल्लेख आहे—

३१ आक्टोबर इ. स. १७८५.

राजश्री गोविंद रघुनाथ गानू, निसबत बाई यांजकडील खाजगी कारभारी, श्रीस जावयास निरोप घेऊन, आश्विन वद्य सप्तमीस स्वार होऊन गेले. कुटुंबसुद्धां व खर्चास रुपये दहा हजार दिले. व विश्वनाथभट मालवी ब्राह्मण तेही कुटुंबसुद्धां गेले. त्यास तीन हजार रुपये दिले. व मनकर्णिकेचा नूतन घाट बांधावयास बाईनीं कारकून व पंचवीस हजारांच्या हुंड्या देऊन श्रीस पाठविला, व दशाश्वमेधींचा घाट व गयेस विष्णुपदाचें देवालय सिद्ध जालें. त्याचा वास्तु, गोविंद रघुनाथ जाउन करितील. त्यास सांगितलें. सोरटी सोमनाथ येथील देवालय नूतन करविलें. तेथें दहा हजारांच्या हुंडया देऊन कारकून नूतन पाठविला. दोन्ही कारकुनांची रवानगी आश्विन शुद्धांत केली.

म. द. बा. पत्रें भाग २ रा पृष्ठ ८६–८७.

मालकमसाहबानें या बाईच्या चरित्राच्या धार्मीक अंगाचें जें वर्णन केलें आहे, तें अत्यंत मार्मीक मुद्देसूद व मनोहर असून तें त्यानें

फारच काळजीपूर्वक व अत्यंत परिश्रमानें लिहिलें आहे. तें विवेचन सर्वमान्य असल्यानें आम्हींही पुढें त्याचाच अनुवाद केला आहे.

अहल्याबाईचा पत्रव्यवहार हिंदुस्थानांत अत्यंत दूरवर असे. हा तिचा पत्रव्यवहार बहुतेक ब्राह्मणांच्या करवींच होत असे. तिनें जो एवढा प्रचंड दानधर्म केला, तोही त्यांच्याच द्वारें केला. तिचें औदार्य अमर्याद असे. 'तिचिया धर्मौदार्यासी उपमाच नाहीं,' असें म्हटलें असतां, मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. होळकरांचा खाजगी खजीना जेव्हां तिच्या हातीं आला, तेव्हां ब्राह्मणाकडून संकल्प ह्मणवीत असतां तिनें त्याच्यावर तुळशीपत्र ठेविलें, व तो सारा पैसा धर्मकार्यांत खर्च करावयाचा, ह्मणून तिनें तो एकीकडे काढून ठेविला. अहल्याबाईनें कित्येक किल्ले बांधवले. जाम किल्ल्यापाशीं विंध्याचा मोठा कडा तुटला आहे, तेथें तिनें घाट बांधला. तिनें महेश्वरांत व आपल्या सर्व संस्थानांत देवळें, धर्मशाळा व तळीं बांधलीं आहेत. या कामीं तिनें मनस्वी पैसा खर्च केला. अहल्याबाईच्या औदार्याचा मासला तिच्या संस्थानांतच पाहावयास मिळत नाहीं, तर तो सर्व हिंदुस्थानांत, ह्मणजे **पूर्वेस** कटक प्रातांत जगन्नाथपर्यंत, **पश्चिमेस** गुजराथ प्रातांत द्वारकेपर्यंत, **उत्तरेस** हिमालय पर्वतांत बद्रीकेदारनाथपर्यंत * व **दक्षिणेस** कन्याकुमारी-जवळ रामेश्वरापर्यंत सर्व बाजूस पहावयास मिळतो. या सर्व

---

* मालकमसाहेब ह्मणतो कीं, " माझा 'पोलिटिकल असिस्टंट कॅप्टन टी. डी. स्टुअर्ट हा इ.स.१८१८ सालीं केदारनाथास गेला होता. अहल्याबाईच्या नांवाबद्दल त्या टोंकास असलेल्या प्रांतांतही किती विलक्षण आदर आहे, हें तो मला वारंवार सांगे. तेथें अजूनही चांगल्या स्थितींत दगडी धर्मशाळा व एक पाण्याचें कुंड आहे. तीन हजार फूट उंच असलेल्या ठिकाणीं, जेथें मनुष्यव-स्तीचें किंचितही चिन्ह दिसत नाहीं, तेथें प्रवाशांसाठीं व यात्रेकरूंसाठीं हीं कामें त्या राणीनें आपल्या खर्चानें केलीं आहेत. "

ठिकाणीं प्रतिवर्षी धर्मादायाबद्दल पैसा पाठविला जातो. यापैकीं पुष्कळ ठिकाणीं तिचीं अन्नछत्रें अजून आहेत. तिनें बांधलेल्या देवळांपैकीं कांहीं कांहीं तर फारच प्रेक्षणीय आहेत. हर्दाहंडिया जवळ नेमावरांत तिनें जें एक देऊळ बांधिलें आहे, त्याची रचना अत्यंत नेत्रमनोहर असून तें मालकमसाहेबास सर्व देवळांत अतिशय आवडलें. तो काळ कोणचा होता, आजही कांहीं लांब वाटणारे प्रांत त्या काळीं किती लांब वाटत असतील, तेथें सामान कसें पोचविलें असेल, या व अशाच इतर गोष्टींचा विचार केला, ह्मणजे तिच्या कामाचें तर महत्त्व वाटेलच, पण तिच्या जिवंत कळकळीचें फारच आश्चर्य वाटून या साध्वीबद्दलचा आदरभाव दुणावेल यांत संशय नाहीं. आज सुधारणेच्या कालांतही असलीं कामें उभारूं ह्मटलें ह्मणजे माणसेंच मिळावयाची मारामार! पण त्या निश्चयी व लोकहितासाठीं सदैव तत्पर असणाऱ्या बाईनें या सर्व अडचणी तेव्हांच दूर करून आपले सर्व हेतु तडीस नेले. मग ती यच्चयावत् आर्यावर्तांतील लोकांच्या आदरास पात्र व्हावी, यांत नवल तें काय?

हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य ठिकाणीं अन्नच्छत्रादि कारखाने चालविण्यास जो खर्च होत असे, त्याशिवाय ती प्रसंगानुसार आणखीही धर्म करी. त्याचे अनेक प्रकारचे उल्लेख मागें आलेच आहेत. याशिवाय ती लहान–सहान क्षेत्रांतही त्या त्या मानानें पैसा पाठवी. दक्षिणेंतील ठिकठिकाणच्या देवांना ती अभिषेकास्तव गंगेचें पाणी पाठवी. तिनें रामेश्वराच्या कावडी बद्रिकेदारेश्वरीं पाठवाव्यात. आम्ही असें ऐकलें आहे कीं, तिच्या नांवानें कांहीं कावडे अजूनही गंगेचें पाणी दक्षिणेंतील ठिकठिकाणच्या देवांस नेतात. या कार्यापासून तिचें नांव सर्व हिंदुस्थानांत रावापासून तों रंकापर्यंत यच्चयावत् लोकांच्या तोंडीं झालें. असा विलक्षण लौकिक मागें कधीं कोणाचा

झाला नाहीं व तो पुढें फारसा कोणाचा होईल असें वाटत नाहीं. आतांच सांगितलेल्या गोष्टीवरून तिची धर्मश्रद्धा किती जळजळीत होती, व त्यासाठीं तिनें अडचणीच्या काळांतही किती अकटोविकट प्रयत्न केले, तें फारच लक्षपूर्वक मनन करण्याजोगें आहे. असें काम करण्यास " पाहिजे जातीचें," तें " येरा गबाळाचें काम नाहीं."

अहल्याबाईची भूतदया विलक्षण होती. ती दररोज गरीब लोकांस अन्न देई. विशेष सणावाराच्या दिवशीं अत्यंत कनिष्ठ जातींतल्या लोकांसही मेजवानी मिळे. उन्हाळ्याच्या दिवसांत माळव्यांत लोकांचे फार हाल होतात. या लोकांचे हाल होऊं नयेत, त्यांस पाणी प्यावयास मिळावें, म्हणून तिनें जागोजाग लोक ठेविले होते. तिच्या दानधर्मांत आपपर-भाव नसे. हा तिचा दानधर्म पाहिला म्हणजे—

**जे कां रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले॥ १ ॥**
**तोचि साधू ओळखावा। देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥**

हा तुकाराम महाराजांचा अभंग सहजगत्या आठवतो. इतकेंच नव्हे, तर या अभंगांतील:—

**मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥**
**ज्यासि आपंगीता नाहीं। त्यासि धरी जो हृदयीं॥४॥**
**दया करी जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ॥५**
**तुका ह्मणे सांगूं किती। तोचि भगवंताची मूर्ति ॥ ६॥**

ह्या ओळीही तिला पूर्णपणें लागू पडतात.

अहल्याबाईच्या दानधर्मांत विश्वकुटुंबकत्वाची कल्पना आहे, हें मागेंच सांगितलें आहे. आतां, ही कल्पना तिनें प्रत्यक्ष अमलांत कोठपर्यंत आणली होती, हें सांगतों. तिच्या विश्वकुटुंबकत्वाची

पायरी पशुपक्ष्यांपर्यंतही पोंचली होती. तिची भूतदया विलक्षण होती. तिच्या भूतदयेचा वांटा वनांतील पशु, हवेल्या वृक्षादिकांवर आश्रय करणारे पक्षी, नद्यांत राहाणारे मासे, इत्यादि सर्व ठिकाणच्या जीवांसही मिळाला होता. ह्या प्राण्यांचीं भक्ष्यें त्यांस नित्य नियमानें पाठविलीं जात. तिचे चाकर बैलांस पाणी पाजावयासाठीं जागोजाग हिंडत. शेतकरी लोक पक्ष्यांस शेतावर बसूं न देतां हाकलून देत. यास्तव तिनें अशा पक्ष्यांसाठीं मुद्दाम शेतें राखून ठेवावींत ! अशा शेतांवर पक्ष्यांचे थवेच्या थवे बसलेले दिसत.

अहल्याबाईच्या या दानधर्मास पुष्कळ लोक हंसतील. **मालकम-साहेबानेंही** त्यास पहिल्यापहिल्यानें नांवें ठेविलीं होतीं. पण त्याला जेव्हां पुण्यांतील वाकिलानें या वादांत निरुत्तर केलें, तेव्हांपासून त्या सत्यप्रिय भल्या साहेबानें आपलें मत बदललें. त्यानें त्या ब्राह्मणाचें भाषण शब्दशः उतरून तें आपल्या पुस्तकांत दिलें आहे. तें भाषण येथें देणें अत्यंत आवश्यक असल्यानें आह्मी तें येथें समग्र उतरून घेतों. **मालकम** ह्मणतो :—

We may smile at such universal sympathy and perhaps censure the bigotry which bestowed on Brahmins the largest share of her charity, and wasted the treasures of a state in the erection and maintenance of edifices in distant lands; but it was well asked by an intelligent Brahmin, ( to whom this remark was addressed,) " whether Ahalya Bate by spending double the money on an army that she did in charity and good works, could have preserved her country for above thirty years in a state of profound peace, while she rendered her subjcts happy and her self adored. No person (he added)

doubts the sincerity of her piety; but if she had merely possessed worldly wisdom, she could have devised no means so admirably calculated to effect the object. I was (this person concluded) in one of the principal offices at Poona during the last years of her administration, and know well what feelings were excited by the mere mention of her name. Among the princes of her own nation, it would have been looked upon as sacrilege to have become her enemy or, indeed, not to have defended her against any hostile attempt. She was considered by all in the same light. The Nizam of the Deccan and Tipoo Sultan granted her the same respect as the Peishwa, and Mahomedans joined with Hindus in prayers for her long life and prosperity.

(अर्थ–हा विश्वकौटुंबिक कळवळा पाहून आपणाला हंसू येईल; आणि तिनें आपल्या संपत्तीचा मुख्य भाग ब्राम्हणांस दानधर्मांत दिला हें तिचें धर्मवेड पाहून, आणि दूरदूरच्या देशीं इमारती बांधण्यांत व त्यांचें उत्पन्न चालविण्यांत तिनें आपला खजीना खाली केला हें पाहून आपणास तिला दोष द्यावासा वाटेल. अशा प्रकारचें भाषण मीं एका ब्राम्हणापाशीं केलें, त्या वेळीं त्या विद्वान् मनुष्यानें मला उलट रास्त सवाल केला कीं, 'अहल्याबाईनें दानधर्मांत व सत्कृत्यांत जो पैसा खर्च केला, त्याच्या दुप्पट पैसा ती जर सैन्य वाढविण्यांत खर्च करती, तर आज तीस वर्षें तिचा देश शांततेचा जो अनुभव घेत आहे व जें सुख उपभोगीत आहे, तें तिच्या प्रजेस मिळालें असतें काय? व ती आज जी पूजनीय वाटत आहे, ती तशी वाटली असती काय? तिच्या धार्मिकपणाबद्दल कोणीही संशय प्रकट करीत नाहीं. पण या दानधर्माऐवजीं तिच्यांत नुस-

ताच व्यवहारांतला शहाणपणा असता तर तिला आपला उद्देश इतक्या विलक्षण रीतीनें सिद्धीस न्यावयाचा दुसरा मार्ग सांपडला नसता. मी तिच्या कारकीर्दीच्या उत्तरभागांत--शेवटील कांहीं वर्षे-पुण्यांत मोठ्या हुद्याच्या जागीं होतों. तेथें तिचा नुसता नामोच्चार केला असतां लोकांचें अंतःकरण किती उचंबळून येत असे, तें माझ्या अगदीं डोळ्यांपुढें आहे. तो सारा भाग मी चांगल्या रीतीनें जाणतों. तिच्याशीं वैर करणें अथवा परराष्ट्राकडून तिच्यावर स्वारी होण्याचा प्रसंग आला असतां तिला साह्य न करणें, ह्या ज्या गोष्टी आहेत त्या आमच्या राजेरजवाड्यांत--देवतादूषण केल्यासारख्या--पापकारक समजतात! अशाच प्रकारचा आदरभाव सर्व लोकांत होता व तिच्या संबंधीं हीच सर्वांची दृष्टि होती. दक्षिणचा निजाम व टिपूसुलतान हेही तिला पेशव्याप्रमाणेंच मान देत. आणि **तिला दीर्घायु प्राप्त होऊन तिची भरभराट व्हावी, अशा प्रकारची देवाजवळ प्रार्थना करावयास हिंदु बरोबरच मुसलमान लोकही सामील होत.**

हें सारें वर्णन वाचलें, म्हणजे कालिदासानें रघूचें—

**मनुप्रभृतिभिर्मान्यैर्भुक्ता यद्यपि राजभिः ।**
**तथाप्यनन्यपूर्वेव तस्मिन्नासीद्वसुंधरा[1] ॥ ७ ॥**

रघुवंश, सर्ग ४.

हें जें वर्णन केलें आहे, तें अहल्याबाईस शब्दशः लागतें, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

अहल्याबाईनें सुरू केलेल्या देणग्या तिच्यामागें बंद करण्यांत

---

१ मन्वादिकांनींहि पुरातनांनीं ही भोगिली मान्य नराधिपांनीं ।
तरी पती हा पहिलाच आहे, असी धरा त्या समजोनि राहे ॥
गणेशशास्त्री लेले.

आल्या नाहींत. अहल्याबाईची कारकीर्द लोकांस इतकी सुखावह झाली होती व तिच्याबद्दल लोकांच्या मनांत इतका आदरभाव वसत होता कीं, तात्या जोग×—सवाई मल्हाररावाचा कारभारी-हा मालकम साहेबास एके प्रसंगीं म्हणाला कीं, ‘ अहल्याबाईच्या कारकीर्दीस इतकें यश कां आलें, हें आम्ही जाणतों. आम्हीही तिचेंच वळण पुढें ठेवून तो मार्ग आक्रमीत आहोंत.’ त्या काळीं जेव्हां कधीं एखादा प्रश्न उपस्थित होई, तेव्हां ‘ अहल्याबाईनें अशा प्रसंगीं असें असें वर्तन केलें ’ असा दाखला दिला, म्हणजे त्या प्रश्नाचा लागलाच निकाल लागे ! असा विलक्षण तिला मान असे. यशवंतरावाचें राज्य म्हणजे-आज आहे तर उद्यां नाहीं,--असें होतें. पण त्या ऐन यादवींतही, तिनें जो दानधर्म लावून दिला होता, त्यांत त्यानें खळ ह्मणून पडूं दिला नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर त्यानें एक कोटी पसतीस लक्ष रुपये खर्च करून महेश्वरास एक सुंदर छत्री व घाट बांधला. तिनें धर्मार्थ जीं गांवें, जमिनी व इतर देणग्या लावून दिल्या त्या परत घेणें हें तर पाप समजतच, पण धाडेती लोकही तिनें लावून दिलेल्या देणग्यांवर धाडे घालीत नसत. कारण, त्यांना असा मोठा धाक वाटे कीं, जर आपण अशा रीतीनें तिच्या वाटेस गेलों, तर त्यापासून आपला नाश होईल. असा विलक्षण वचक तिनें आपल्या धार्मिक आचरणानें लोकांच्या मनांत उत्पन्न केला होता. असा परिणाम हिंदूंवर होणें

× विठ्ठल महादेव ऊर्फ तात्या जोग ( १७८०–१८२६ ) हा किब्यांच्या घराण्याचा मूळ पुरुष होय. हा सुप्रसिद्ध पुरुष राजकार्यधुरंधर असून त्याचें विस्तृत चरित्र लिहिल्यास त्याची वाङ्मयांत चांगली भर पडेल. रा० पारसनीस हे या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र लिहिणार म्हणून ग्रंथमालेंतील एका निबंधांत प्रसिद्ध झालें होतें. त्यास एक तप झालें ! पण अजून तो सुयोग घडून आला नाहीं.

स्वाभाविकच आहे, पण तो मुसलमानांवरही झाला होता. तिच्यासंबंधीं हैदर, टिपू, निझाम, अयोध्येचा नबाब यांसारख्या परधर्मीयांच्या मनांतही आदर होता. ह्यासंबंधीं एक गमतीची गोष्ट सांगतों. तुकोजीरावाचा मुलगा मल्हारराव हा तिच्या समोरच भारी उनाडपणा करी व प्रजेस लुटी. पुढें, त्यास अहल्याबाईचा धाक वाटून तो पुण्याकडे निघून गेला, व तिकडे आपला धंदा निवांतपणें करूं लागला. कारण, लोक अहल्याबाईचा लौकिक मनांत आणून त्याच्याकडे दुर्लक्ष करीत. 'वडिलांच्या पुण्याईचा हा प्रभाव आहे' असें जें ह्मणावयाचें तें अशाच प्रसंगीं! मल्हाररावाचें हें गैरवर्तन नानांनीं अहल्याबाईस कळविलें. तेव्हां तिनें त्यांस लागलीच कळविलें कीं, "तुह्मीं त्याला पकडून खुशाल कैदेंत टाकावें!" ही गोष्ट जेव्हां मल्हाररावास समजली, तेव्हां त्याला तेंही ठिकाण सुरक्षित न वाटून तो निजामाचे राज्यांत गेला व तेथें लुटालूट करूं लागला. हा प्रकार निजामाच्या कानीं गेला, तेव्हां त्यानें त्याच्याबद्दल होळकराच्या वकिलाकडे विचारणा केली. तेव्हां वकीलसाहेबांनीं त्यास सांगितलें कीं "जसा आपला मुलगा, तसाच हा आपणाला आहे. तो मेवेखोरी (मुलाची आगळीक) करीत आहे. आपण त्याला मूल समजून वागवावें." असें ह्मणून त्यानें त्यास तो कोण आहे हें समजावून सांगितलें. निजामानें त्याचें व अहल्याबाईचें नातें मनांत आणून प्रजेच्या नुकसानीची भरपाई करून दिली. यावरून लोकमत तिच्याबद्दल काय होतें तें दिसतें. तिनें आपल्या सात्त्विक आचरणानें हें लोकमत आपणास अनुकूल करून घेऊन त्यायोगें आपल्या राज्यास जी स्थाइकता आणली होती, ती तत्कालीन इतर राज्यांस नव्हती, असें इतिहासावरून ह्मणावें लागतें.

अहल्याबाईची दानधर्मांत इतकी विलक्षण कीर्ति झाली कीं, इतर राजस्त्रियाही तिची बरोबरी करूं लागल्या. यशवंतराव होळकराची बायको कृष्णाबाई ऊर्फ केसराबाई, हिनें अहल्याबाईचाच मार्ग उचलला. त्यांत तिलाही बरेंच यश आलें. अहल्याबाईच्या मागें याच बाईचें नांव होळकर संस्थानांत फार झालें. यशवंतरावासमोर व त्याच्यानंतर इंदूर संस्थानावर अतोनात संकटें आलीं, पण त्यांतून तें सुरक्षितपणें पार पडलें, तें ह्या अलौकिक स्त्रीमुळेंच होय. तिला माणसाची परीक्षा चांगली असे. इंदूरचा सुप्रसिद्ध मुत्सद्दी तात्या जोग याची निवडणूक याच बाईनें केली. इंदूरचे अत्यंत लोकप्रिय महाराज तुकोजीराव होळकर यांचीही होळकरांच्या गादीवर ह्याच बाईनें निवडणूक केली. हिनेंही आपला खाजगी पैसा दौलतीच्या कामांत खर्च करून राज्य सांवरून धरलें. केसराबाईनें दानधर्मांत अतोनात पैसा खर्च केला.

अहल्याबाईच्या सत्कार्याचें अनुकरण करण्याची इच्छा करणारी दुसरी प्रसिद्ध स्त्री झटली ह्मणजे बायजाबाई शिंदे ही होय. हीही बाई मोठी कारस्थानी होती. पण हिचा स्वभाव फारच जलाल असे. या बाईस अहल्याबाईच्या दानधर्माचा ‘ हेवा ’ उत्पन्न होऊन तिनेंही तिचा मार्ग उचलावयाची फार खटपट केली. अहल्याबाईनें जेथें जेथें देवळें बांधलीं, तेथें तेथें साधारणपणें बायजाबाईनेंही बांधलीं आहेत. तिनें जेथें जेथें अन्नछत्रें ठेवलीं, तेथें तेथें बायजाबाईनेंही बहुतेक ठेवलीं आहेत. अहल्याबाईचा हेतु निर्मळ असून तिची कळकळ जिवंत होती. ती स्वतः मार्गदर्शक होती. बायजाबाईचा स्वभाव अत्यंत कडक असून ती त्या मार्गानें जाणारी होती. मागें दिलेल्या उताऱ्यांत जो ‘ संसारी शहाणपणा ’ सांगितला आहे, तो

बायजाबाईच्या अंगीं असल्यानें तिला अहल्याबाईची बरोबरी नीटपणें करतां आली नाहीं. पण तिचा मार्ग बोलूनचालून सदाचरणाचा असल्यानें तिचा तिखट स्वभाव पुढें पुढें फारच कमी झाला. साधुलोकांचा मार्ग जितका मनोवेधक व सात्त्विक भाव जागृत करणारा असतो, त्यापेक्षां तो आचरण्यास कठिण आहे !

आमच्याकडे जुन्या लोकांत सामाजिक व धार्मिक बाबतींत अजूनही अंतर मानण्यांत येत नाहीं, मग तें त्या वेळीं मुळींच मानण्यांत येत नव्हतें, हें उघड आहे. तशांत अहल्याबाईचें जीवित सर्वस्वी धर्ममय असल्यानें तिनें तो भेद राजकीय गोष्टींतही मानूं नये, हें स्वाभाविकच आहे. बाकीवसूल, न्याय देणें, परराज्यांतील लोकांस सल्लामसलत देणें, हीं सारीं कामें ह्मणजे तीं आपल्या धार्मिक कृत्यांचा एक भागच आहे असें ती समजे. याचा ऊहापोह मागें योग्य स्थळीं केलाच आहे.

अहल्याबाईचें जीवन धर्ममय होतें व हीच तिच्या राजकारणाची किल्ली होय, असें मागें सांगण्यांत आलें आहे. यावरून तिच्यांत किंवा तिच्या राज्यांत आपपर भाव मुळींच नव्हता, माझें तें तुझें व तुझें तें माझें, अशी स्थिति होती असें मात्र नव्हे. हरिण, वाघ, साप, मुंगूस, वगैरे एकत्र सुखानें नांदत आहेत-असा स्वर्गीय आनंद तिच्या राज्यांत होता अशांतलाही भाग नाहीं. पुनः हेंही लक्षांत ठेविले पाहिजे कीं, हीं वर्णनेंही आदर्शरूप होत. असे प्रकार कोठें पाहण्यांत तर येतच नाहींत, पण ते कल्पनेंतही मोठेसे मनोवेधक दिसत नाहींत. अशी स्थिति जर खरोखरच प्राप्त झाली, तर या जगांत सर्वत्र यंत्रासारखी स्थिति होऊन त्यांतील ' राम ' तेव्हांच निघून जाईल. पण हें विवेचन येथें विषयांतरास नको. आम्हांस जें सांगावयाचें तें हेंच कीं,

तिच्या सर्व कृतींत मुख्यत्वेंकरून धर्म उतरला होता. तथापि त्यांतही आपल्या कुलाचा योग्य अभिमान, स्वाभिमान, आपल्या प्रजेच्या हितासाठीं प्रसंगीं बेफामही होणें, शौर्य, क्वचित् प्रसंगीं न्यायनैष्ठुर्य, हे सारे मनोरम भाग तिच्या चरित्रांत दिसतात. तिच्या संबंधांत " तिजला मोठा गर्व कीं, मी शहाणी व सुभेदारामागें एकनिष्ठ, अथवा दौलत केली ती मीं केली, व दानधर्म आचरण तें माझें, हा अभिमान." असें एका चित्रगुप्तानें आपल्या एका अस्सल पत्रांत गुप्त रीतीनें लिहिलें आहे. * महेश्वरकर वकिलानें हें अर्थात् लावून लिहिलें आहे. तेवढा भाग काढून टाकल्यास बाईचा अभिमान मोठा वाखाणण्याजोगा असून तो सर्व खरा आहे. अहल्याबाईची कारकीर्द एखाद्या बेफाम वाहणाऱ्या व आसपासचा प्रदेश उद्ध्वस्त करणाऱ्या नदीसारखी नव्हती; किंवा अगदीं स्थिर व संथ वाहणाऱ्या किंवा अचल दिसणाऱ्या नदीसारखी कंटाळवाणीही नव्हती. तिच्यांत मधून मधून नेत्रमनोहर लाटा उद्भवत असत; पण ती क्षुब्ध नव्हती. तिनें बेफाम होऊन आसपासच्या प्रांतांस त्रास दिला नाहीं अथवा आपल्याच प्रदेशांत राहाणाऱ्या जीवांचें तिनें नुकसान केलें नाहीं. कांहीं नद्या पावसाळ्यांत पुष्कळ वाहातात व इतर नाले, तलाव, विहिरी इत्यादिकांचें पोषण करतात. पण तेंच एकदां आवर्षण पडलें, म्हणजे त्यांना स्वतःलाच सुकण्याची पाळी येते! मग आपल्यावर उपजीविका करणारांस ते कोठचा पुरवठा करणार! पण या बाईच्या कारकीर्दींत असाही प्रकार झाला नाहीं. त्या बाईचें पाणी जीवंत होतें. कारण, त्याचा उगम भागीरथीप्रमाणें उच्च ठिकाणाहून, स्वर्गांतून—परमेश्वरापासून—अनंतापासून-झाला होता. त्याचा अंत कोण

* महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें. भाग २, पान ८.

पाहाणार ? उन्हाळ्याच्या तापांत इतरत्र कोरड पडते, पण ज्यांच्या जीवनाचा उगम प्रत्यक्ष भगवंतापासून झाला आहे, त्यांना कशाची म्हणून वाण नाहीं. भागीरथीचें पाणी इतर ऋतूंपेक्षां उन्हाळ्यांतच अधिक वाढूं लागतें. त्याचप्रमाणें ह्या बाईचें होतें. तिच्यावर जे अवलंबूनअसत, त्यांच्यावर ‘ उन्हाळा ’ झाला कीं, ती त्यास त्या तापापासून मुक्त करून संतृप्त करी. या आनंदाचा उपभोग तिनें स्वतः घेतला व तो दुसऱ्यांसही दिला.

अहल्याबाईचें चरित्र तिच्या सती जाण्याच्या बेतापासून तों म्हातारपणापर्यंत पाहिलें कीं—

स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः ।
प्रतिदिनमथवा ते वृत्तिरेवंविधैव ॥
अनुभवति हि मूर्ध्ना पादपस्तीव्रमुष्णं ।
शमयति परितापं छायया संश्रितानाम् ॥

शाकुंतल.

असे उद्गार स्वाभाविकपणें प्रत्येकाच्या तोंडांतून बाहेर आलेच पाहिजेत. तिच्यावर एकापेक्षां एक असे सारे वरचढ आघात पडले. तथापि अशा प्रसंगीं तिनें आपलें मनोधैर्य मुळींच ढळूं दिलें नाहीं. हा त्या अबलेंतला असामान्य गुण होय. आपलें ‘होमरूल’ गडबडलें हें पाहतांच पुत्राचा मृत्युशोक एकीकडे झुगारून देणारा म्हातारा

---

१. तूं सोडुनी स्वसुख दुःख परार्थ घेशी, ।
अत्यंत सौख्यचि समस्त जनांस देशी ॥
हा त्वत्स्वभाव, तरु मस्तकिं ताप घेतो,।
छाया निजाश्रित जनास सदैव देतो ॥

कृष्णशास्त्री राजवाडे.

पण तरुणापेक्षां तरुण असा राजर्षि ग्लॅडस्टन जो मटकन् खालीं बसला, तो त्या झटक्यांतून पुनः उठला नाहीं; आपल्या वक्तृत्वानें सर्व पार्लमेंट हादरून सोडणारा हिंदुस्थानचा खरा मित्र व साधु बर्क, त्याला पुत्रशोकाचा धक्का बसतांच त्यास पुनः पूर्वस्थितीवर येतां आलें नाहीं; पण या **बाईवर अगदीं ऐन तारुण्यापासून तों वृद्धावस्थेपर्यंतही संकटांनीं व शोकांनीं एकच गर्दी केली असतां ती त्या सर्वांस पुरून उरली!** शेवटीं तिच्याजवळ तिच्या जिव्हाळ्याचें कोणीही राहिलें नाहीं. तरीही ती स्त्री कशालाही न डगमगतां आपलें काम शेवटपर्यंत पहात होती. हा तिच्यांत सोशिक शक्तीचा जो अद्भुत गुण आला, याचें कारण तुकाराममहाराजांच्या—

**निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म। निर्धार हें वर्म चुकों नये ॥**
**निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास। पाहों नये वास आणिकांची ॥**
**तुका ह्मणें ऐसा कोण उपेक्षिला। नाहीं ऐकिला ऐसा कोणी ॥**

या एका अभंगांत सांगतां येईल. या अभंगावर आख्यान लावावयास तिच्या चरित्रांत पुष्कळ दाखले आहेत. अहल्याबाईवर संसारांतील संकटें वावटळीसारखीं आलीं, पण त्यांपुढें पतन पावण्यास ती एखादा प्रचंड वृक्ष नसून त्यांपुढें अढळ रहावयास ती मेरुपर्वताप्रमाणें खंबीर होती. धर्माचरण करणें हें तिचें ध्येय होतें व त्याकडेच तिचे डोळे होते. मग ती अशा संसारमय संकटाकडे लक्ष देणार कशी? ज्याचें लक्ष ऐषआराम, धनसंपत्ति किंवा प्रांत पटकवण्याचा हव्यास इकडे असावयाचें, अशा लोकांवर संकट प्राप्त होतांच त्यांचें धाबें दणाणावयाचें! पण अहल्याबाईत तसा प्रकार नव्हता. आपलें कर्तव्यकर्म करीत असतां तिच्यावर

ज्या वेळीं आपत्ति आल्या, त्या वेळीं तिला त्या भासल्या नाहींत असें नाहीं. नाहीं तर मनुष्य आणि यंत्र यांत फरकच न राहता. तुकाराम-महाराजांनींही " शिणलों दातारा करितां येरझारा । आतां सोडवी संसारापासोनिया ॥ " असें वाटेल तितक्यांदा ह्मटलें आहे. त्याचप्रमाणें, राज्यकारभारांत—हाच तिचा संसार त्यांत—जेव्हां अडचणी उत्पन्न झाल्या, तेव्हां तिनें असे निराशेचे उद्गार काढले आहेत. त्यांपैकीं एक लहानसा उतारा येथें देतों—

' राज्याचा प्रकार एक रीतीचा जाला आहे. धनी प्रबुद्ध नाहीं. दरबारांत कोणी समविषम गोष्टी सांगतो तेंच प्रभूस सत्य भासतें. खऱ्या लटक्याची छान नाहीं. तेही काय करतील ? युगधर्म असाच आला आहे. दोन तीन वर्षें पाहिलीं; परंतु कोणतेही गोष्टीचा ठिकाण लागत नाहीं. आदिपश्चादीचा विचारही महानस्थळीं राहिला नाहीं. अब्रूच्या मनुष्याची अब्रू राहणें कठीण आहे. असत्य सत्य नी सत्य असत्य भासूं लागलें. खऱ्या मनुष्यानें आपलें सुखदुःख कोणाजवळ सांगावें ? कांहीं ताळ राहिला नाहीं. याउपर महायात्रेस उठून जावें, हें उत्तम दिसतें. अतःपर येथें राहण्याचें युक्त नाहीं. महायात्रेस जाणें हेंच उचित आहे. दिवसेंदिवस शरीरही जेर जेर जालें. काय हयाती बाकी असेल ते, ते स्थळीं अखेर होय तर उत्तम आहे[1].

हें राज्यविषयक झालें. त्याचप्रमाणें दैवविषयक—

'अलीकडे आमच्या कपाळास हे ढगढग आली. एक झाड वंशीं असतें तर इतकी फजिती कशास होती ! आमचें दैवें !'[2]

यापेक्षांही जास्त निराशाकारक तिचे उद्गार असतील. पण तिची परमेश्वरविषयक प्रीति जाज्वल्य असल्यानें, तिचा सात्त्विक स्वभाव

१ महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें, भाग १, पा. १५७. २ कित्ता, पान १७७.

कैलासपर्वताप्रमाणें अचल असल्यानें तिनें कसल्याही संकटास जुमानलें नाहीं. मनुष्यमात्र बहुधा आपलें धर्मनैमित्त नित्यनियमानें करीत नाहीं. तशांत अनुकूल स्थिति असल्यास शेंकडा शंभर लोक हा सर्व भार (!) उपाध्यावरच लोटतात! मग एखादें संकट उत्पन्न झालें कीं पोथ्या अथवा प्रार्थना 'पाहावयास' लागतात! पण यायोगें परिस्थितींत बदल तो काय होणार? व्हावयाचें तेंच होतें. मग तें अनिष्ट असलें कीं, देवास 'पुष्पांजली' करावयाची तयारी होते! वास्तविक पहतां धर्माचरण व हीं सांगितलेलीं संकटें यांचा संबंध अजून लागलेला दिसत नाहीं. धर्माचरणाचा मनाशीं संबंध आहे. मनास स्वस्थता प्राप्त व्हावी, परमेश्वरगुण–पृथ्वीची रचना–मनुष्यमात्राची घटना–यांचें स्मरण करीत ब्रह्मानंदांत मग्न व्हावें. हाच प्रकार अहल्याबाईत दिसतो. अहल्याबाई आपल्या धर्मसमजुतीप्रमाणें नेहेमीं पूजा अर्चा, राज्यकारभार, दानधर्म, जप स्नानसंध्या यांत मग्न असे. हे प्रकार तिनें ऐदी श्रीमंताप्रमाणें दुसऱ्यावर कधींही सोंपविले नाहींत. कसाही प्रसंग असो, कोणीही भेटावयास येवोत, त्यासाठीं तिनें आपली पूजा अर्चा दुसऱ्यावर तर टाकली नाहींच, पण ती लांबणीवरही टाकली नाहीं. हाच खरा भक्तपणा होय. तिचा 'निष्काम निश्चल विठ्ठलीं विश्वास' होता. ह्मणूनच आप्तांच्या, नातवांच्या, मुलांच्या, पतीच्या मृत्यूमुळें व इतर संकटांपुढें—

**भगवत्प्रसाद सुकवच ल्याला जो साधु काय तो मरतो?**

**मोरोपंत.**

यावरून ती पाषाण अंतःकरणाची होती कीं काय? तर तसेंही नव्हे, हें आपण तिच्या चरित्रावरून पाहिलेंच आहे. अशा लोकांविषयीं **भवभूति** ह्मणतो—

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति ॥ [१]

हें या साध्वीविषयीं किती बरें खरें आहे! ज्याप्रमाणें रामाचें ध्येय प्रजाहित हें होतें, त्याचप्रमाणें तें अहल्याबाईचेंही होतें. रामचंद्र प्रजाहिताबद्दल ह्मणतात:–' फार काय सांगूं, मला त्यापायीं—

स्नेहं दयां तथा सौख्यं यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकानां मुञ्चते नास्ति मे व्यथा [२] ! ॥

उत्तर रामचरित नाटक.

हीच स्थिति अहल्याबाईची होती. रामचंद्रानें प्रजासंतोषासाठीं आपली पत्नी सोडली, अहल्याबाईनें आपलें सौभाग्य–पतिसहगमन-सोडलें. अहल्याबाई ही अबला होती. श्री रामचंद्र तिचे देव होते, व ती त्यांची भक्त होती. रामचंद्रानें सीतात्यागानंतर एखाद्या ऋषीप्रमाणें विरक्त होऊन राज्यकारभार पाहिला. त्याचप्रमाणें तो अहल्याबाईनें पाहिला. श्री भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें तिनें फलाची आकांक्षा न धरतां केवळ कर्तव्यासाठीं आपलें कर्तव्य केलें.

आर्यावर्तांत ज्या राजकारणी स्त्रिया झाल्या, त्या सर्वांत या बाईची योग्यता फारच अधिक होती. रजपूत लोकांत सात्त्विक, पतिनिष्ठ, व मृत्यूंस न भिणाऱ्या अनेक स्त्रिया झाल्या, त्यांपैकीं कोणच्याही स्त्रीस व कोणच्याही गुणांत अहल्याबाई हार जाणारी नव्हे.

---

१ वज्रापेक्षांहि कठिणें, पुष्पाहूनि मृदू अशीं ।
लोकोत्तरांचीं चरितें कोणा जाणवतील तीं ॥

२ जनरंजनाहुनि मला स्नेह दया सौख्य हें अधिक नाहीं ।
किंबहुना जानकिही टाकलिया मज नसे व्यथा कांहीं ॥

परशरामपंत गोडबोले.

आमच्याकडे ज्या राजकारणी स्त्रिया झाल्या त्यांत जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, आनंदीबाई या प्रसिद्ध स्त्रिया आहेत. त्याचप्रमाणें सुलताना रझिया ( इ. स. १२३६--३९ ) हीही एक नांव घेण्याजोगी विधर्मी बाई झाली. ही दिल्लीपती अल्तमशची कन्या, आपल्या दुर्वृत्त व विलासी भावानंतर गादीवर बसली. हिचा बाप जेव्हां दूर भागांत जात असे तेव्हां ही त्याचे मागें राज्याचा कारभार पाही. ही बाई फार पराक्रमी असून तिच्या अंगीं राजाला अवश्य असणारे सर्व गुण होते. ती स्त्री होती, बाकी बुद्धीनें, अंतःकारणानें व इतर सर्व गुणांनीं ती पुरुषच होती. तिनें पूर्वींच्या कायद्यांत सुधारणा करून मागल्या वाईट चाली बंद केल्या. ती पुरुषाप्रमाणें पोशाख करून दरबारास रोज जात असे, व प्रत्येक काम जातीनें पाहून त्याचा निवाडा करी. ती अत्यंत न्यायी, उद्योगी व कर्तृत्वाची होती. तिनें आपले प्रजाजन फार संतुष्ट ठेवले. येथपर्यंत तिची आणि अहल्याबाईची योग्यता बरीच सारखी आहे. पण येथून त्या दोघींचा मार्ग दक्षिण उत्तर ध्रुवाप्रमाणें परस्पर विरूद्ध झाला. यौवन व प्रभुत्व हीं सुफलदायी व्हावयास त्यांच्या जोडीस नेहमी विवेक लागतो. पण या गोष्टींत ही सुलताना अगदीं घसरली. आम्ही शहाण्या राजाचे जे गुण मागें सांगितले आहेत, त्यांतील " प्रथम स्वेंद्रियजेता " हा मुख्य गुण तिच्यांत नव्हता. यामुळें तिचें पतन फार लवकर होऊन ती त्या पायीं मारली गेली! येसूबाईची तुलना मागें आलीच आहे. ताराबाईची आणि अहल्याबाईची तुलना करावयाचें फारसें कारण नाहीं. ताराबाईची पद्धत येसुबाईप्रमाणें मिलाफ्याची नसून दुही माजवण्याची होती. ही बाई फार महत्त्वाकांक्षी, विलक्षण स्वार्थसाधु व मोठी खबरदार असून धैर्याची होती. पण तिचें आयुष्य दुही वाढवण्यांत

गेलें! या स्त्रियांना परमेश्वरानें आयुष्यही भरपूर दिलें! पानपत मुक्कामीं पेशव्यांचा (वास्तविक पाहतां मराठ्यांचा) अगदीं पाडाव झालेला पाहून मग तिनें आपले डोळे सुखानें मिटले! अहल्याबाईची आणि आनंदीबाईची तुलना करावयाचें मुळींच कारण नाहीं! इंद्रियदमन नसल्याकारणानें—

आधीं दुनयेमध्यें चांगलीं माणसें थोडीं निपजतात; त्यांत राजेरजवाडयांच्या कुळांत तर फारच कमी. इतिहासाकडे पाहावें तों क्रूर, दुष्ट, दुराचारी, मत्सरी, लोभी अशा पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडतात. समुद्राच्या काळ्या रेतीच्या अफाट मैदानामध्यें जशीं पांच चार मोत्यें मध्यें चमकावीं, तशीं चांगलीं व थोर माणसें ह्या पृथ्वीमध्यें क्वचित् आढळतात. त्यांपैकीं हें एक मोतीं परमेश्वराच्या कृपेनें आमच्या हिंदुस्थान देशांत पैदा झालें होतें, व त्याच्या नांवानें आमच्या देशाच्या इतिहासास शोभा आली आहे हें पाहून कोणाही स्वदेशाभिमानी पुरुषास अत्यानंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

हिंदुस्थानकथारस, पान २६०.

हें या अलौकिक स्त्रीचें जें वर्णन केलें आहे, तें शब्दशः खरें आहे. आतां अहल्याबाईची इतिहासमंदिरांत स्थापना होणें योग्य आहे किंवा नाहीं, या एका व शेवटल्या गोष्टीचा विचार करून या पुस्तकाची समाप्ति करावयाचा विचार आहे. कोणचीही व्यक्ति ज्या वेळीं इतिहासमंदिरांत शिरते, त्या वेळीं त्या व्यक्तीचें वय, जात अथवा लिंग हें कोणी पाहत नाहीं, तिचें बाह्य सौंदर्य पाहत नाहीं, श्रीमंती पाहत नाहीं, अथवा त्या व्यक्तीच्या हयातींत किती स्तुतिपाठकांनीं तिच्यासाठीं काळ्याचे पांढरे केले अथवा स्तुतिसुमनांजली अर्पण केल्या, हेंही पाहत नाहीं. ह्या बाह्य औपचारिक गोष्टींस तेथें

रिघाव नाहीं. त्या वेळीं जें पाहावयाचें तें हेंच कीं, तो मनुष्य विवक्षित परिस्थितींत व विवक्षित ठिकाणीं झाला नसता, तर त्या परिस्थितींत त्या ठिकाणीं त्या व्यक्तिविरहित काय नुकसान झालें असतें, तेथील लोक किती मागें राहिले असते, वगैरे गोष्टींचा विचार करतात. ह्या दृष्टीनें पाहातां या बाईची इतिहासमंदिरांत स्थापना करावयास कांहींच चिंता दिसत नाहीं. कारण, ह्या पुण्यशील आत्म्याचा अवतार जर न होता, तर होळकरशाहीचा ऱ्हास मल्हारजीच्या मृत्यूबरोबरच होऊं लागता, असें त्या परिस्थितीवरून ह्मणावें लागतें. शिवाय, गुन्हेगार जातींस तिनें सन्मार्गास लाविलें, तें काम फार लांब पडलें असतें. तसेंच तिच्या दानधर्माच्या शीतल छायेखालीं जे लोक बसले आहेत, त्यांची स्थिति काय झाली असती कोणास ठाऊक! पण ह्या बाईच्या अलौकिक जीवनक्रमानें ह्या साऱ्या गोष्टी दबल्या. तेव्हां तिची स्थापना इतिहासमंदिरांत करावयास काय चिंता आहे?

याप्रमाणें बाईची इतिहासमंदिरांत स्थापना केल्यावर आतां वाचकांचीं रजाच घ्यावयाची. ह्या मूर्तीचें चित्र मला जसें रेखाटतां आलें तसें तें रेखाटलें आहे. त्यांत जर कांहीं भाग बेढब दिसला तर तो दोष जिचें चित्र काढावयाचें तिच्यांतला नसून तो चित्रकाराचा आहे, हें सुज्ञ वाचकांस कांहीं सांगावयास नकोच. पण जातां जातां मालकम साहेबाच्या हातानें थोडीशी सफाई करून मग मी ही लेखणी खालीं ठेवतों:—

It is..an extraordinary picture:–a female without vanity, a bigot without intolerance, a mind imbued with the deepest superstition, yet receiving no impressions except what promoted the happiness of those under her influence; a being exercising in the most

active and able manner, despotic power, not merely with sincere humility, but under the severest moral restraint that a strict conscience could impose on human action; and all this combined with the greatest indulgence for the weakness and faults of others.

[ अर्थ—हें चरित्र अत्यंत अलौकिक आहे. ती स्त्री असून तिच्यांत अहंमन्यता मुळींच नव्हती. तिला धर्माचें वेड विलक्षण होतें; पण असें असूनही तिच्या ठायीं परधर्मसहिष्णुता तितकीच होती. तिच्या देवभोळेपणाची शिकस्त झाली होती; तथापि आपल्या हाताखालील लोकांस जेणेंकरून सुख होईल त्याशिवाय दुसरे विचार तिनें मनास शिवूं दिले नाहींत. तिनें अनियंत्रित अधिकाराचा उपयोग फारच दक्षतेनें व काळजीपूर्वक केला. ह्या कामीं तिची नम्र वृत्ति कायम असून मनुष्यानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे आदेश पाळणें जितकें शक्य होतें, तितकें तिनें पाळले. तिचें स्वतःचें आचरण इतकें जाज्वल्य होतें, पण तें स्वतःपुरतेंच असून ती दुसऱ्याच्या दोषांबद्दल-दुर्बलतेबद्दल-क्षमावृत्तिच धारण करी. ]

समाप्त.

# पुरवण्या.

## 'अ.'

## अहल्याबाईच्या सौभाग्यावर घाला!

एके दिनीं करित पौरुष देत वेढा।
खंडूजिराव असतां रणवीर गाढा॥
तोफेंतुनी सुटुनि शत्रुकडील गोळा।
लागोनि त्यास हृदिं तो पडला भुईला॥ २॥
भासे तदा सकलिकां पडला अकालीं।
हा वीर काय अभिमन्युच अन्य खालीं॥
मल्हारजी त्यजुनि शुद्धिस ह्या कुवार्ते।
खालीं पडे गळुनि कीं गिरि वज्रपातें॥ ३॥
वेढा त्यजूनि मग तेथुनि सर्व वीर।
घेऊनि मूर्च्छितचि होळकरप्रवीर॥
म्यानांत घालुनि तसा युवराजदेह।
गोटांत शीघ्र अपुल्या रिघले समोह॥ ४॥
हो बायकांमधि अकांत; किती बरें तें।
होणार दुःख जननीस! किती स्त्रियेतें!!॥
मल्हारजी हळु हळू उठुनी अशांत।
होऊनि सावध विलाप करी बहूत॥ ५॥
"हे बालका! मम करा किति थंडगार।
हा लागतो कर तुझा जणुं शीत नीर!॥

जी उष्णता रणिं चढे रिपुमर्दनें ते ।
गेली कुठें अजि करांतुनि सांग मातें ?॥ ६ ॥
ऐसा तुझा अचल कां पडला सुकाय !।
चांचल्य त्यांतुनि कुठें रणजन्य जाय ? ॥
हो काय भाजुनि दशा तरि ह्या मुखाची !।
गेली तयावरिल कांति कुठें यशाची ?॥ ७ ॥
जी घाय घेउनि अनेक रणीं सदाही।
छाती तुझी डगमगे न पुरा जराही ॥
ती आज भग्न कशि होय ! कुठें तियेचें।
सामर्थ्य जाय? मज सांग मुखें स्वतांचे ॥ ८ ॥
येतां रणांतुनि तुझें मुख शौर्यगोष्टी।
सांगूनि देत अज कां मजला न तुष्टी ?॥
कां नेत्र आज मिटले? रणकष्ट होतां ।
आहेस काय तरि निद्रित गाढ आतां !॥९ ॥
हा तात दीन तव मारित तूस हाका।
आहे, तयासहि न उत्तर देशि तूं कां?॥
आक्रोश फार पडुनी धरणीवरीही।
माता करी तव, तिशीं तरि बोल कांहीं ॥ १० ॥
ही स्त्री सती तव अचेतन भूमिभागीं।
आहे, तिला तरि उठीव उठूनि वेगीं ॥
हा लाडका सुत तुझा रडतो पहा कीं ।
घेऊनि त्यास तरि तूं समजीव अंकीं ॥ ११ ॥
आतां मदीय गुणि बोलत हा न पुत्र !।
आतां मदीय कसला तरि ! मी अपुत्र ! ॥

आतां गुणीहि कसला! गुण लुप्त सारे! ।
देवा! कसा दिवस हा अणिला तुवां रे! ॥ १२ ॥
आतां असे विफल जीवित हें मदीय।
दीपाविना सदन जेवि, तसेंच होय ॥
आतां असे मजपुढें तम सर्व भागीं ।
जाऊं कसा तरुनि ह्यांतुनि मी अभागी! ॥ १३ ॥
आहे किती कठिण दुःसह कीं पित्यानें ।
द्यावी तिलांजलि सुता अपुल्या करानें! ॥
काळीज हें करपतें मम हे गिरीशा! ।
भस्मूनि त्यासच करा मम शीघ्र नाशा ॥ १४ ॥
अंकीं स्वकीय शिशुंच्या धरुनी स्वशीर्ष ।
पंचत्व पावति सुखामधिं जे सहर्ष ॥
ते तात धन्य किति होत! किती सुखी ते! ।
आतांच मारुन विभो मज सौख्य दे तें ॥ १५ ॥
हें राज्य हें सदन काय करावयाचें? ।
हें व्यर्थ जीवितहि काय करावयाचें?" ॥
मल्हारजी वदुनि ह्यापरि खिन्न राहे।
होत्या स्त्रिया करित शोक बहूत मोहें ॥ १६ ॥
शास्त्रज्ञ पोक्त शुचि शंकरभट्ट नाम ।
होता पुरोहित तिथें सुविचारधाम ॥
तो ह्या क्षणीं, जरि मनामधिं खिन्न, वाचे ।
लागे करूं प्रथम सांत्वन बायकांचें ॥ १७ ॥
माता वदे "कुलगुरो! कशि सांडुं दुःख? ।
गेला किं हो सुत बरोबरिचा सुरेख! ॥

आह्मां कधीं दुखविलें न कुभाषणानें।
वृद्धां अह्मां त्यजुनि जाय कसा त्वरेनें?॥ १८ ॥
आणूनि आजच वनामधुनी शिकार।
ठेवूनियां मजपुढें वदला कुमार॥
'आई! हिला करुनि ठेव, तुझ्या कराचें।
लागे मला बहुत भोजन गोड साचें॥ १९ ॥
येतां रणामधुनि जेविन सावकाश'।
गेला असें वदुनि तो मजला रणास॥
हा वेळ पाहत बसें तव वाट बाळा!।
मातें कसें फसविलें पण तूं? कपाळा!॥ २० ॥
आतां कुणास तरि भोजन तें समर्पूं!।
हातास ह्या यश न, काय तयास कापूं?"॥
दाटूनि कंठ तिजला मग बोलवेना।
तों स्त्री तदीय वदली अतिशोकपूर्णा॥ २१ ॥
" आतां तुम्हांस म्हणतें दुसरें न कांहीं।
जातें सती पतिसवें मज धीर नाहीं॥
ह्या सासुबाइ जननीसम, मामुजी हे।
संभाळतीलच मुला वदणें नको हें"॥ २२ ॥
शोकार्णवांत असतां सगळे असे ते।
बोले पुरोहित "घडे भवितव्य जें तें॥
होणार काय तरि शोक करूनि आतां।
जो प्राणि जाय नच तो मिळणार हाता॥ २३ ॥
व्हावा रणांत मृत तो प्रभुचाच होता।
हा नेम; त्यास आपुला न उपाय आता॥

विद्युद्विपत्ति अवचीत शिरीं जगीं या।
ऐशाच कोसळति! ही प्रभुचीच माया!॥ २४॥
जन्मे जगीं मनुज तो मरतोच तेथ।
आहे जरी खचित हें तरि भेद त्यांत॥
आहे असा, मनुज जे मरतात कांहीं।
सत्कारणींच, मग ते मृत हो कदाही॥ २५॥
त्यांचाच मृत्यु अति धन्य, मरोनियांही।
पृथ्वीमधीं अमर ते असती सदाही॥
तारेच होत पृथिवीवरचे महा ते।
रत्नेंच होत तिचिया गळिंचीं जणो ते!॥ २६॥
ह्या कोटिंतीलच खरा तुमचा सुपुत्र।
जो ठोकित स्वरिपु चालवित स्वशस्त्र॥
जो मुक्त देश करण्या निघतां स्वकीय।
पावे रणीं मरण तो नच रत्न काय?॥ २७॥
आहे किती मरण गोड तरी अहा! हें,
चित्तास मोहुनि किती तरि हर्ष दे हें॥
ह्याच्या पुढें खचित तुच्छ असे स्वर्गेंहीं।
बैसूनि कोट्यवधि वत्सर वांचणेंही॥ २८॥
घेऊनि राज्य परके घुसतां स्वदेशीं।
जो प्राण दे समरिं घालविण्यांत त्यांशीं॥
देशाभिमानयुत तोच उदार भारी।
स्तुत्यर्ह तोच नर तोच परोपकारी॥ २९॥
जो देशमुक्तिकरिनां पडतो रणांत।
त्याचाच तो सफळ जन्म असे बहूत॥

त्या स्वर्गवास चिर, उद्धरुनी कुला तो।
निभ्रांत उत्तम गती पितरांस देतो॥ ३० ॥
पोटीं असें उपजणें सुतरत्न साचें।
हें फार थोर तरि भाग्य असे कुणाचें? ॥
ज्याच्या असे पदरिं पुण्य तदीय पोटीं।
रत्नें अशीं निपजतात अमोळ मोठीं॥ ३१ ॥
पुत्रें रणांत मरुनी स्वपित्या यथार्थ।
सर्वांमुखीं म्हणविणें चिर वीरतात॥
मातेप्रती ह्मणविणें चिर वीरमाता।
स्वस्त्रीप्रती ह्मणविणें चिर वीरकांता॥ ३२॥
हें थोर भूषण मनोज्ञ परस्परांस।
आहे किती! न वदवे! उपमा न त्यास॥
तो धन्य तात! सुत धन्य! तशीच माता।
ती धन्य! त्यापरिच ती अतिधन्य कांता"॥ ३३॥
हे गोड बोल परिसोनि पुरोहिताचे।
शांती गमे मनिं जरा सगळया जणांचे॥
शिंदे जयाजि सुमती, रघुनाथपंत।
मल्हारजीस मग शांतविती बहूत॥ ३४ ॥
जाऊं सती न दिधली अपुल्या सुनेस।
हें सर्व दुःख गिळुनि मथुरापुरीस॥
पुत्रक्रियेस करण्यास्तव फार खिन्न।
मल्हारजी त्वरित जाय पुढें तिथून॥ ३५ ॥

---:o:---

# ' आ. '

खुशालीरामानें अहल्याबाईचें सती न जाणें हें चांगलें व धर्मास अनुसरून आहे, असें प्रतिपादिलें आहे. तो म्हणतो—

ननु साऽहल्याभिधा धर्मपत्नी पतिव्रतेत्युक्तम्। तथा स धर्मपत्नी पतिव्रता चेद्भर्त्रा साकं लोकांतरं कथं न गता। तदुक्तं, स्त्रीणां पतिव्रताधर्मो भर्त्रा सहगमनं स्मृतम्। स्त्रीणां स एव परमो सतीधर्मो निगद्यते। इत्यादि बहुधा शास्त्रेषु सतीधर्मत्वं श्रूयते। तदपि सत्यम्॥ परं त्वत्र विवेचनं कार्यम्। शरीरदहनमात्रं साहसमेव। यावज्जीवं तावद्देहधारणे विधवानां बहुधा श्रमश्च दृश्यते। तथा हि। सद्धर्मस्यांगीकारेण निषेधस्य त्यागेनैवं विधिनिषेधकारणे महान्कष्ट इति शास्त्रतो लौकिकेऽपि दृश्यताम्। परंतु देवतीर्थतपोव्रतादिसमाराधनैर्यमनियमादिना च श्रीभगवत्परिचर्यया च दिनानि निगमयेदिति विधवादेहधारणपर्यंतं व्यवस्था। तदुक्तं।

**सहगमनाधिकं कष्टं स्त्रीणां सद्धर्मपालनम्।**
**तद्दुःखं क्षणमात्रं हि यावद्देहं तथा परम्॥**
**विधवानां महान्कष्टो यमनैयामिके विधौ॥**

उक्तम्। धर्ममकुर्वाणा नरकं प्रतिपद्यते। इति स्मृत्युक्तत्वात्सहगमनादपि देहधारणपर्यंतं विधवानामुक्तधर्मपालने विशेषफलं भवतीति ज्ञायते यस्मात्स्वभर्तृबुद्ध्या निवेशेन सर्वधर्मदेवश्रीहरिं समाराधयेदित्यादिश्रवणात् सापि मल्लाररावस्नुषा विध्युक्तं सतीधर्ममाचरिष्यमाणा श्रीभगवत्परिचर्यापरायणा बभूव। पुनश्च स वीरसूः सा सहगमनं न कुर्यादित्यपि चोक्तम्।

**ससुतायाः स्त्रियो यश्च भर्ता मृत्युमवाप्नुयात्।**
**पालयेत् सा सुतं सम्यङ् न चानुगमनं स्मृतम्॥**

इति मनुस्मृतिस्मरणात् । तथा च स्मृत्यन्तरे ।

**बालं त्यक्त्वा न कुर्वीत भर्त्रा सहगमनं खलु ॥**

इति अत्राक्षराधिक्ये वार्ये एवं विधवायाः पुत्रवत्याः भर्तुः सहगमनं न स्मृतम् । किन्तु तदुत्पन्नस्वपुत्रपालनमेव सहगमनाधिकफलमित्यर्थः । बृहस्पतिवाक्यं च ।

**बालसंवर्धनं मुक्त्वा बालापत्या न गच्छति ।**
**बालं सा पालयेत् सम्यक् तदुत्पन्नं स्वधर्मतः॥**
**विधवाऽपि गृहं चैवं वसेत् संजीवती मुने ।**
**व्रतोपवासनियता हरिमाराधयेत् सदा ॥**

इति स्मरणात् तल्लालनपालनादिपराऽपि सद्धर्ममाचरिष्यमाणा प्रावर्तत ।

---

## 'इ.'

नर्मदा ह्या भव्य व विशाल नदीची गणना हिंदुस्थानांतील अत्यंत पवित्र नद्यांत होते. मध्यहिंदुस्थानांतील लोक पवित्र नद्यांत ह्या नदीला अग्रमान देतात. फार काय, पण प्रत्यक्ष गंगानदीही काळ्या गाईच्या रूपानें ह्या पवित्र नदीच्या स्नानास येते, व स्नान होतांच पातक दग्ध झाल्यानें ती उज्ज्वल वर्ण धारण करून जाते, अशी एक दंतकथा सांगण्यांत येते. नर्मदेचें नुसतें दर्शन म्हणजे गंगेंत स्नान केल्याचें पुण्य लागतें. ह्या नदीचा महिमा इतका विस्तृत आहे कीं, तिच्या आसपासच्या तीस मैलांत ज्या नद्या व कुंडें आहेत, त्यांसही प्रत्यक्ष याच नदीचें महत्त्व आलें आहे! या नदीचें वर्णन वायुपुराणांत रेवाकांडांत आहे. ह्या नदीच्या घनघोर तपश्चर्येमुळें तिला प्रत्यक्ष शंकराच्या देहापासून निघतां आलें. ह्या नदीनें सदर

स्त्रीच्या वेशानें देवांसही आपल्या पायीं लोळावयास लाविलें. ही देवांची स्थिति पाहून भगवानाला हसूं आलें व त्यानें तिला नर्मदा असें नांव दिलें.

**तस्याश्चक्रे ततो नाम हास्यदानात् पिनाकधृक्।**
**भविष्यासि वरारोहे सरित्श्रेष्ठा तु नर्मदा ॥**
**स्वरूपावशितो देवः प्राप्तो हास्यमतो भुवि।**
**नर्मदा तेन चोक्तेयं सुशीतलजला शिव ॥**

या नदीला रेवा असें नांव आहे. ह्या नदीचा प्रवाह खडकाळ प्रदेशांतून उड्या मारीत जातो, ह्मणून तिला रेवा (रेव = उडी मारणें) असें नांव मिळालें आहे.


**यत्त्वमेसि प्लुतगती रेवा नाम्ना भविष्यसि।**

ह्या नदीचा उगम शंकरापासूनच झाला असल्यानें ती त्याला प्रिय असावी हें योग्यच आहे. ह्मणून तिला शांकरी ह्मणतात. इतकेंच नव्हे, तर नर्मदेंत जितके गोटे सांपडतात, तितके शंकर-सांबबाण होत. 'नर्मदाके शंकर उत्ते शंकर' ही ह्मण तर सर्वप्रसिद्धच आहे. या बाणांना मागणी* अजूनही फार असून त्यांना किंमतही तशीच पडते. ह्या नदीचा उगम अमरकंटक पर्वतांत झाला असून तिकडील प्रांतासही तिचेंच नांव "रेवा" (संस्थान) असें मिळालें आहे. नर्मदा ही परम पवित्र नदी ह्मणून अहल्याबाईनें आपलें लक्ष महेश्वरशहराकडे लाविलें. महेश्वर हें रामायण महाभारत पौराणिक काळापासून प्रसिद्ध आहे. या नगरीचें नांव जुन्या बौद्ध ग्रंथांतूनही आढळतें. कार्तवीर्यार्जुन येथेंच राहत असे. तेथील

---

* पान २३९ पहा.

वस्तीला ‘ सहस्रबाहूची वस्ती ’ असें अजूनही ह्मणतात. रावणानें नर्मदेस अवरोधून ठेवण्यासाठीं या गांवाजवळच आपल्या शक्तीचें प्रदर्शन केलें. पण ती नदी वाहण्याचें बंद होणें तर एकीकडेच राहून उलट ती सहस्र धारांनीं वाहूं लागली. हें ठिकाण सहस्रधारा या नांवानें प्रसिद्ध असून येथील देखावा अत्यंत प्रेक्षणीय आहे. याप्रमाणें हें शहर पौराणिक कालांत प्रसिद्ध होतेंच, पण ऐतिहासिक कालांतही त्याची प्रसिद्धि कमी नाहीं. या शहराचा उल्लेख विदेशीय प्रवाशांच्या लेखांत आढळतो. या शहराचा हैहय घराण्याशीं असलेला संबंध प्रसिद्धच आहे. पुढें माळव्यांत परमार घराणें जेव्हां प्रबळ झालें, तेव्हांही या शहरास फार महत्त्व होतें. नंतर मुसलमानी अमलाखालीं याचें महत्त्व कमी झालें. परंतु अकबर बादशहाच्या अमलाखालीं यास पुनः महत्त्व आलें. पुढें हें शहर इ. स. १७३० च्या सुमारास मल्हाररावाच्या हातीं आले. मल्हारराव निरंतर फिरतीवर असल्यानें त्याच्या कारकीर्दींत अमुक एक शहर ह्मणून होळकरांचें ठाणें पुढें आलें नाहीं. पण त्याच्या मृत्यूनंतर अहल्याबाईनें महेश्वर हें आपलें मुख्य स्थान केलें. हें गांव नर्मदेच्या अगदीं किनाऱ्यावर असून तेथील घाटांसारखे प्रचंड घाट साऱ्या हिंदुस्थानांत इतरत्र क्वचितच असतील. बाईचें राहावयाचें ठिकाण अगदीं घाटाला लागूनच आहे. तिनें आपल्या तुळशीवृंदावनाची अशी रचना केली काहे कीं, तेथून नर्मदेचा देखावा उत्तम रीतीनें दिसावा. अहल्याबाईनें या शहराची सुधारणा फार केली व त्या शहराला पौराणिक कालाचें महत्त्व पुनः प्राप्त करून दिलें. पण आतां त्याचें तें महत्त्व पुनः गेलें. या शहरीं अहल्याबाईचें एखादें उत्तम स्मारक झालें तर ती गोष्ट किती तरी चांगली होईल. अहल्याबाईची सत्कीर्ति



महेश्वर येथील अहल्याबाईची छत्री.

हेंच तिचें खरें स्मारक व तें तिनें स्वतः उत्तम प्रकारें केलें यांत शंका नाहीं. पण आपणही या विख्यात बाईचें स्मारक तिच्या आवडत्या शहरीं करणें अगत्याचें आहे. एखाद्या शहराचें महत्त्व जाणें अथवा त्यास महत्त्व येणें हा कालाचा प्रभाव होय! कालांतरानें मोठमोठ्या शहरांचा मागमूस नाहींसा होऊन ध्यानीं मनीं नसतां तीं हजार दोन हजार वर्षांनीं पुनः उदय पावूं लागतात! अशीं हीं जुनाट व लोकोत्तर शहरें पाहिलीं कीं मुखांतून—

**सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामंतचक्रं च तत्**
**पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः।**
**उद्वृत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बान्दिनस्ताः कथाः।**
**सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः॥**

भर्तृहरि.

अहल्याबाई जर आतां हें शहर पाहवयास आली, तर जनस्थान पाहून रामचंद्राला जें वाटलें तेंच तिला वाटेल, यांत शंका नाहीं. असो. घाटाला लागूनच बाईची अत्युत्तम छत्री आहे. यांत शिवालय असून शिवामागें बाईचा मोठा पुतळा आहे. हा घाट व ही छत्री बाईच्या स्मरणार्थ यशवंतराव होळकरानें बांधली. या कामास संवत १८५६ ला प्रारंभ झाला. व हें काम कृष्णाबाईनें वि. सं. १८९० ( इ. स. १८३३ ) त समाप्त केलें. या स्मारकास सुमारें दीड कोट रुपये खर्च करण्यांत आले! आमचे लोक तिला प्रत्यक्ष देवाचा अवतार मानित. तेव्हां त्यांनीं तिचें जें स्मारक केलें तें यथार्थ केलें, असेंच म्हटलें पाहिजे. या छत्रीस मध्यहिंदुस्थांनातील ताज-महाल म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. असो. अशा या विख्यात शहराबद्दल फंदीबोवा म्हणतात—

# कटाव महेश्वरचा.

नर्मदातट निकट घाट, बहुत अफाट, पायऱ्या दाट चिरेबंदी वाट, मुक्तीचीं शिवालयें ॥ कैलास साम्यता, नाना परिची रचना, रचली रामकृष्णमंदिरें ॥ बहुत सुंदरें बांधिलीं घरें रम्य रमकूक हवेल्या ॥ नयनीं पाहिल्या, नूतन घाट, प्रताप अहल्या, किल्ल्यावर तळवटी ॥ शहर गुलजार, बहुत बाजार, हजारों दुकानें ॥ लक्षापति सावकार, भारी भारी माल खजीना, रस्ता ॥ स्वस्ता सुकाळ, नाहीं दुष्काळ, बालवृद्ध प्रतिपाळ करीती ॥ गरिब गुरिब कंगाल, गांजले, अडले, भिडले त्या देखोनियां अन्नछत्र ॥ सर्वत्र सारिखे, नाहीं पारखे पाहिलें नयनीं ॥ महेश्वर क्षेत्रपूर ॥ १ ॥

दान धर्म करी, नित्य शिवार्चन सत्त्वशील ऐकून धांवती देशोदेशींचे ॥ कर्नाटक, तैलंग, द्राविड, वऱ्हाड, कऱ्हाड, कोल्हापुर, कृष्णातीर, गंगातीर, कोंकण, काशीकर ॥ गयावळ, माळवे, विरांगडे, येति कावडे, वेडे बागडे, गुजराथी, मैथुली, पुरी भारती दिगांवर जटाधारी ॥ बैरागी, योगी, कानफाडे दर्शना येती हरिदासाचे प्रेमळ भक्त, सांप्रदाय पुष्कळ पाहिले नयनीं सर्व ॥ महेश्वर क्षेत्रपूर ॥ २ ॥

## ' ई. '

" O Mother, do not grieve me so,
My lot is cast, and I must go.
Shall Jeswant Row, my noble mate,
On pyre be laid in lonely state,
While I, who was the only flow'r,
He watch'd and cherish'd in his bow'r,
A craven wife shall from the brink
Of love's last trial meanly shrink ?
Forbid it Brahma, Lord above !
Forbid it, faithfulness and love, !"—
" And dost thou think that Brahma's will
I did not righteously fulfil.
When I, bereft and sad, did strive
Thy noble father to survive ?
And was not his high blessing pour'd
On one so sever'd from her Lord ?
And characters, distinct and fair,
Did his approval well declare,
When flourishing beneath my sway
My people and my kingdom lay.
Yes; though a widow, so bereft,
My heart had other blessings left.
But still, as cell'd within my breast,
Thou wert my dearest and my best;
Thou wert as my own youngling still,
Who didst my first affections fill.
And wilt thou leave me sad and lone ?
How shall I live when thou art gone?
Whom shall I fondly love and trust ?
O, do not bow me to the dust ! "—

" O no ! committed to thy care,
Thou hast thy children everywhere,
Their daily benefits will be
The comfort Brahma sends to thee.
And, dearest Mother ! thou art old—
Thy grains of life will soon be told;
And what to me will then remain ?
My lost will ne'er return again !
I through these lonely rooms shall roam
A living thing, whose heart hath with the dead its home.
Then, best and dearest, to my passion bend,
And let my sorrows have an honour 'd end."—
"An honour'd end will close her life ,
Who was a good and faithful wife;
Die when she will, funeral-flame
Gives but a fruitless fleeting fame"—
" I seek not fame, O say not so !
O, add not agony to woe !
Life would be death to me, and worse :
The inward working of remorse
Would make my day as darkness seem,
My haunted night a fearful dream.
For then he would be ever near,
And his upbraiding eyes appear
To glare upon a wife, whose love
Could not one moment rise above
Base fears, but from her last sad duty started
And left his lonely bier unhonour'd and deserted."
All interchange of words were vain—
The Ranie answer'd not again;

But long fix'd looks of anguish fell
Upon her Daughter's face, and well
Spoke that which language could not tell;
While actions too did piteously entreat,
The Mother kneeling at her Daughter's feet:--
But all in vain; nought may arrest
The purpose of her wounded breast.
The parent bent her to the cruel blow,
And left the dismal chamber sad and slow,
And, closely shut within her secret bow'r,
With humble penitence and pray'r
Did her afflicted soul prepare
For the approaching, dreadful hour:
Her pray'rs were heard, and mercy gave
A stinted strength the dreadful hour to brave.
That hour is come; and from the palace-gate
There issues forth, in melancholy state,
A gorgeous pageant.-Standards borne on high,
Mov'd by the fanning air, arrest the eye,
On which devices, trac'd in colours gay
Emblems of ranks and races make display.
First portly Brahmins, sombre and profound,
Walk, loosely rob'd, with eyes cast on the ground.
Next turbna'd chiefs, with fierce and warlike mien,
Cinctur'd with shawls and flashing arms are seen;
Then high authorities, the letter'd scribe,
And mission'd men from many a different tribe,
Move slowly on, all rang'd in sad array,
Proceeding on their mournful destin'd way,
With heavy steps, that from the ground
Send up a muffl'd sullen sound.

Then doth from portal-arch appear,
Circl'd by friends, the stately bier,
On which the princely corhse is laid,
In rich and splendid robes array'd.
Whose features, like to chisl'd stone,
Do still an awful beauty own.
The crowd on him intently gaze
And deeply murmur words of praise.
Anon they drop their eyes to find
The youthful Widow, close behind.
She mov'd with brow and step sedate,
As one who of her lifeless mate
Alone had conscious thoughts, and she
Worthy appear'd his mate to be.
But when by priestly Brahmins stern and strong
They saw their own lov'd Ranie led along,
On her at once all eager eyes were turn'd
And grateful sympathy within each bosom burn'd,
Their inward sorrow broke through all restraint
And all around a loud and mingl'd wailing sent.:

Now onward as the long procession goes,
A diff'rent mournful harmony arose
From many instruments, whose mingl'd sound
Is floating on the air and rising from the ground.
But when it reach'd the fatal spot,
All soft excitement was forgot:
A deep and solemn pause ensu'd,
Silence with strange mysterious awe embu'd.
Alas ! what measur'd words can tell
The anguish of their last farewell ?

When that young Widow with that Mother
parted ?
From the intense embrace the younger started.
As if afraid. Her failing steps sustain'd,
The bier of death she has already gain'd,
Hath on her lap with gentle kindness plac'd
The lifeless head, and its cold form embrac'd.

To the heap'd pile the torch hath been applied.
And from between the faggots are descried
Pale curving streams of smoke, that wind and
sweep,
Coil and uncoil, like serpents wak'd from sleep,
Then broad'ning and ascending hang on high,
A dusky, fearful canopy;
While pointed tongues of flames below
Burst forth; and soon one gen'ral glow
Involves in fierce consuming fire,
Roaring and red, the funeral pyre.
Then drum and trumpet, cymbal, gong
And stringed viols, harsh and strong,
Discordant minstrelsy, begin
To raise a loud and deaf'ning din:
While faintly comes to fancy's ear
Shrieks from the burning bier.
Aye, there are dismal shrieks, I wot,
But from the flames proceeding not.
'Tis Ahalya in despair,
Who, though by friendly force restrain'd
Convulsively hath freedom gain'd,
And beats her breast and tears her hair

Her gnashing teeth and bleeding hand.
Too plainly show that self-command
Is from her princely spirit taken,
Of all its wonted power forsaken.
And pause we hear ! That noble mind
To dull unconsciousness was for a while consign'd.

But heaven's all merciful and potent Lord
To health of mind the Ranie soon restor'd.
He rais'd again her drooping head:
From him receiv'd, as from the dead
The people saw their noble Dame,
And bade her hail with loud and long acclaim.

Still wasteful war, though raging round,
Within her precincts was not found.
The hasbandman scarce turn'd his ear
Some far--off tale of blood to hear,
How bandits, on the distant border
With bandits strove in wild disorder;

Where sordid chiefs to robbers turn'd,
Made might their right, and justice spurn'd:
What cares he for their ceaseless coil ?
She lives and reigns who will protect his toil.

In sooth,o'er all the watch she kept,
And wak'd, and thought, when others slept.
When early dawn appear'd, she rose,
Nor longer would indulge repose,
But to herself ( for she could read )
Grave books perus'd. Then would succeed
Hours of reflection and of pray'r
That clear'd her mind and sooth'd her care;
And oft her day, so well begun,

An easy, prosp'rous course would run.
Herself sagacious, firm, and just,
She put in others gen'rous trust;
And when their merit well was prov'd,
Her ministers she ne'er remov'd.
With all the Rajah pow'rs of ev'ry Nation,
From time to time, she held communication.
Could points of policy with art contest,
But ever lov'd the simple method best.
And in good sooth, to reason cool,
The simplest was the wisest rule.
For who would venture to gainsay
Or doubt the faith of **Ahalya Baee ?**

---

## 'उ.'

### अहल्याबाईचा पोवाडा.

अहिलेचा अवतार अहिल्याबाई झाली स्वर्गवास करी रयत रोदनापुढें जगदीश होईल कैसें ॥ धृ० ॥ पुण्यश्लोकी जगा ठावकी कीर्त तुमची देशांतरीं। देशोदेशीं तीर्थाचे ठायीं कीर्त केली नानापरी ॥ अन्नसत्र घाट देवळें बांधलें कळाकुसरी । महारव्य कोकं ठाणें घडिविल्या बाखा विहिरि ॥ नित्यदक्षिणा इच्छाभोजन ब्राह्मणास पुजन करी। धर्मनीत अवतार केवळ किर्ति वाढवी कोठवरी। सुखवस्तीनें हेत तयाचा दया वाढतो वनवास । गेला वृक्ष मोडून पक्षी बसती कोणा ठायास ॥ अहिलेचा अवतार ॥१॥ गोविंदपंतदादा खासे गडे बाईसाहेबांचे दिवाण । खासगी खर्चाचें दप्तर अवघें ज्याच्या स्वाधीन ॥ धर्मनीत अवतार कोणाची कवडी लाच नाहिं घेन । हे मुत्सद्दी कारभारी कुठवर सांगूं आख्यान ॥ आप्पाशाम घ्यावे भवानी घ्यावे महिपति ऐकून ।

जामदारखान्यामधीं तिथे राहतील एका नेमान ॥ दक्षिणा देयाचा हूकूम केला खंडोबाबूस । अनुष्ठाना ब्राह्मण बसविले प्रत्येक ज्योतिर्लिंगास ॥ अहिलेचा अवतार ॥ २ ॥

अन्नछत्रामधीं कारभारी एक राजेश्वर भट सुज्ञान । ब्राह्मणाच्या पंक्तीचा समाचार घडोघडी घ्यावा त्यान ॥ ब्राह्मणाची नित्य करी विनंति लागेल तें घ्या मागून । माझ्या पदरचें काय जातें बाई अहिल्लेचे पुन्न ॥ गरिबानगुरिबाची खबर घेतो तिंदा येऊन ॥ आणखी उरलें अन्न देतो मागताति घ्या उचलून अन्नछत्राचा कारभार एक शोभे राजेश्वरास ॥ जो कां जेवत नसेल द्यावा सरंजाम त्यास ॥ अहिले० ॥ ३ ॥

काशीराव दादासाहेबांवर मोठा बाईसाहेबांचा हेत । भेटीच्या पक्षामधीं प्राण राहिला डोळ्यांत ॥ आले काशीरावदादा पडली दुसमानाला धासत । बसविले गादीवर भेट मग घेती रयत ॥ झाली नजरानजर आले मागती धांवत । एकापासून दहापांच । अवघ्यांशीं झाली श्रुत ॥ धन्याशीं मुजरा करून गेली मग आपल्या घरास । झाला हुकूम खाशाचा खबर केली चौकीवाल्यांस ॥ अहि० ॥ ४ ॥

---

## 'ऊ.'

अहल्याबाईसंबंधी खुशालीरामानें स्तुतिपर उद्गार काढले आहेत ते:-

अथ अस्याः श्रीमत्या यथादृष्टं श्लाघावर्णनम् ।
नित्यं सा ददाति दानं देवब्राह्मणपूजकान् ।
कालं व्यतीयाति सम्यग् धर्ममार्गपरायणा ॥ १ ॥
कुरुक्षेत्रतीर्थे तुलादानमेवं सुवर्णात्मरौप्यादिकं वारवारम् ।
अहल्यापि सा संददौ दानशीला धरादेवताभ्यो गुणज्ञानशीला ॥

देशे देशे च नित्यं बहुविधमभितो दानमन्नस्य सम्यक् ।
पक्वापक्वं ददत्याः परमपि बहुधा दानमर्थानुरूपम् ।
दारिद्र्यं याचकानां बहुविधमपि यन्निर्गतं तत्प्रसंगात्
वांच्छाःपूर्णा बभूवुरथ शरणागतानामहल्याभिधायाः॥ ३ ॥
अयोध्यामथुरामायाकांचीकाशीस्थब्राह्मणान् ।
पुष्करस्थान् कुरुक्षेत्रद्वारिकाश्रितभूसुरान् ॥ ४ ॥
गयाप्रयागरामाद्रि ( सु ) क्षेत्रोत्तमसंश्रितान् ।
जंबूमार्गस्थितांश्चापि ताम्रपर्णीसमाश्रितान् ॥ ५ ॥
अवंतिकास्थितान्विप्रान्पूजयामास सर्वदा ।
तथैव दैवतान् साध्वी पूजयामास भक्तितः ॥ ६ ॥
स्कंदं श्रीवेंकटेशं च श्रीरंगेशमहाप्रभुम् ।
अनंतशायिनं देवं सेतुरामेश्वरं हरम् ॥ ७ ॥
कामनाथं तथोंकारेश्वरं दिव्यं महाप्रभुम् ।
महाकालेश्वरं देवं काशीविश्वेश्वरं प्रभुम् ॥ ८ ॥
जगन्नाथं स्वयं दिव्यं तथा च बदरीश्वरम् ।
श्रीमंत केशवं देवं जंबुमार्गेश्वरं शिवम् ॥ ९ ॥
पांडुरंगं विठ्ठलाख्यं गोकर्णेशशिवं तथा ।
गोवर्धनधरं नाथमेकलिंगाभिधं शिवम् ॥ १० ॥
दुर्गा लंबोदरं भानुं शिवं नारायणप्रभुम् ।
पूजयामास धर्मज्ञा सर्वत्र प्रतिमामयम् ॥ ११ ॥
येषु येषु च देशेषु यद्यत्तीर्थसमाश्रितान् ।
श्रीमन्मल्लारिरावस्य स्नुषा धर्मवती च सा ॥ १२ ॥
अहल्या पूजयामास भूसुरान्सर्वदा भुवि ।
भूदानै रत्नदानैश्च ग्रामैर्वर्षासनादिकैः ॥ १३ ॥

निरंतरमहादानैरनुष्ठानैरनेकधा ।
पारायणैः कथाभिश्च रामनामजपादिभिः ॥ १४ ॥
कृत्वा च जीविकां तेषां वेतनैर्वार्षिकीमथ ।
ब्राह्मणानाम् चकाराथ समाराधनमुत्तमम् ॥ १५ ॥
तीर्थे तीर्थे च सर्वत्र देवान्देवान्हि भूरिशः ।
प्रेषयामास सत्प्रीत्या वार्षिकं चाप्युपायनम् ॥ १६ ॥
तदाश्रितेषु विप्रेषु पूजापौराणिकेषु च ।
अंबारामाभिधस्त्वेको वाचया गीष्पतेः समः ॥ १७ ॥
आद्यः पुराणवक्ता यः सर्वशास्त्रावबोधकृत् ।
माधुर्यस्वाक्षरव्यक्तिः पदच्छेदादिसुस्वरः ॥१८ ॥
स्थैर्यार्थावबोधज्ञो नानायुक्तिविशारदः ।
सुमुखः सुकृतिः स्वच्छो वेदवेदांगपारगः ॥ १९ ॥
असंशयः संशयाच्छिन्निरपेक्षो महामनाः ।
ब्रम्हकर्मविशेषज्ञो सर्वधर्मावभासकः ॥ २० ॥
विस्पष्टमद्भुतं सम्यक् स्पष्टाक्षरपदार्थकृत् ।
कलस्वरसमायुक्तो रसभावसमन्वितः ॥ २१ ॥
बोध्यमानः सदाह्यर्थं ग्रंथार्थं कृत्स्नशः सदि ।
ब्राम्हणादिषु सर्वेषु सदोपकृतिकारकः ॥ २२ ॥
भगवत्परिचर्यायां सक्तो भक्तिमयात्मकः ।
एवं पुराणवक्ता यः साक्षाद्व्यास इवापरः ॥ २३ ॥
अंबारामाभिधो यस्याः पौराणिकश्च विश्रुतः ।
विश्रुतो देवपूजायामपरश्च सदाशिवः ॥ २४ ॥
भट्टो दयाशुची रम्यः परोपकृतिकारकः ।
मल्लारिश्च महादेवो भट्टो वेदपुराणवित् ॥ २५ ॥

भट्टगोपालनामेति गंगाराममनोहरौ ।
सखोभट्ट-भटंभट्ट-रामभट्टादयोपरे ॥ २६ ॥
अन्येपि देवपूजायामाश्रिता धर्मतत्पराः ।
वैदिकाः शुद्धकर्मज्ञास्तथा पौराणमांत्रिकाः ॥ २७ ॥
पुराणस्य च श्रोतारस्तथान्येपि बहुश्रुताः ।
सर्वोपकारकुशला केचित्सौम्या दयापराः ॥२८ ॥
केचिज्जपंतः कृष्णेति सदाशीवशिवेति च ।
स्तवपाठकरश्चान्ये भट्टाः पूजनकारकाः ॥ २९ ॥
अन्येपि सर्वतः शुद्धा मान्या विप्रा दयालवः ।
सर्वार्थकुशला दिव्या सदासत्कर्मकारकाः ॥ ३० ॥
ज्योतिःशास्त्रविदः केचित्केचिद्वैद्यचिकित्सकाः ।
धर्मशास्त्रार्थतत्त्वज्ञाः केचिन्नानार्थसूचकाः ॥ ३१ ॥
हरिदासास्तथान्ये च गायका विष्णुवल्लभाः ।
सभासदस्तथा ये च नानाज्ञानकथाकराः ३२ ॥
तथान्ये पंडिता रम्या राज्यभारवहोचिताः ।
यदाश्रिताः प्रकुर्वाणा जनताहितमुत्तमम् ॥ ३३ ॥
ख्यातस्तेषां प्रवक्ता यो धर्मतत्त्वं सुधीमताम् ।
सदाचाररतो नित्यं शीलसंपन्नमानसः ॥ ३४ ॥
साक्षात्सद्ब्रह्मवर्चस्वी पूर्वोक्तो यः पुराणवित् ।
तन्मुखात्सा प्रसन्ना हि कथाशुश्रूषणे रता ॥ ३५ ॥
अहल्या सर्वधर्मज्ञा संमता सत्सुभासुरा ।
वाङ्मनःकायसंशुद्धा बहुश्रोतृपरायणा ॥ ३६ ॥
विष्णौ समर्पिका नित्यं त्रिविधोपात्तकर्मणा ।
जितेंद्रिया च सकलप्राणिनां हि हितैषिणी ॥ ३७ ॥

देव–ब्राह्मणपूजार्हा ब्राह्मणेषु दयापरा ।
सदाचारवती नित्यं विध्युक्तं कर्मकारिणी ॥ ३८ ॥
व्यवसायात्मिका बुद्धिर्यस्या हि नियमात्मिका ।
युक्ताहारविहारा च युक्तस्वप्नावबोधिका ॥ ३९ ॥
सर्वभूतस्थमात्मानं सर्वं भूतानिचात्मनि ।
दयार्द्रशुद्धभावेन सर्वत्र समदर्शना ॥ ४० ॥
स्वयं श्रीपतिसद्भक्त्या श्रीमद्भागवतामृतम् ।
रामायणं पुराणानि महाभारतमेव च ॥ ४१ ॥
धर्मशास्त्राणि चान्यानि प्रीत्या श्रुतवती सदा ।
कथामृतात्परं लाभं मन्यते नाधिकं हि सा ॥ ४२ ॥
श्रद्धाप्रेमविवेकार्द्रा महाभागवती सती ।
तस्या मल्लारिरावस्य स्नुषाया गुणकर्मणा ॥ ४३ ॥
यंत्रितो रचयिष्यामि ग्रंथं तन्नामद्योतितम् ।

गणेशं गजास्यं सदाविघ्ननाशं
प्रणम्यादि पूज्यं महासिद्धयेऽहम् ।
अहल्याभिधां कामधेनुं प्रवक्ष्ये
प्रबंधक्रमाध्यायवत्साभिरामाम् ॥ ४४ ॥

श्रीमत्केशवसत्प्रसादसुधिया सच्छास्त्रवक्ता पुरा
भट्टः कौशिकगोत्रजन्मविदितः श्रीभास्कराख्यो ह्यभूत् ।
तद्वंशे शुभशीलनिष्ठसुतपा यो देवदत्ताभिध-
स्तज्जो जीवनरामनामविदितो भट्टः सदाचारवित् ॥ ४५ ॥
सम्यक्पुराणवक्तारो तत्पुत्रौ प्राणवल्लभौ
खुशालीरामरायोऽहं लक्ष्मीनाथस्तथापरः ॥ ४६ ॥
खुशालीरामरायेण मयायं क्रियते मुदा ।
अहल्याकामधेन्वाख्यः सद्ग्रंथो निर्णयात्मकः ॥ ४७ ॥

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | ४ | चौगल्यांची | चौगुल्यांची |
| १० | १२ | दूरदृष्टीपणा | दूरदर्शीपणा |
| १६ | १७ | सागरपुर | सारंगपुर |
| १७ | २ | भडकली | थडकली |
| २६ | ६ | धन संपातिः | धनसंपत्तिः |
| ३६ | ७ | जोडी | जोड |
| ,, | ११ | नाहीं. | नाहींत. |
| ५० | ९ | गनोमी | गनीमी |
| ५६ | ५ | प्राणोत्क्रामण | प्राणोत्क्रमण |
| ५८ | २६ | –निष्फम् । | –निष्फलम् । |
| ६० | १९ | ( मुरती ? ) | ( मुरती ) |
| ८२ | २६ | मालेरावबाचें | मालेरावबावाचें |
| ८६ | २२ | राज्यकर्त्रींची | राज्यकर्त्रींची |
| ९२ | २३ | अहल्याबाई | हरकूबाई |
| ९६ | १६ | राज्यकारणाविरुद्ध | राजकारणाविरुद्ध |
| ,, | १८ | मसल | मसलत |
| १०० | १२ | कषाय | काषाय |
| १०५ | १७ | वंशाजाशीं | वंशजांशीं |
| १२८ | १० | मल्हारजी | महादजी |
| १२८ | ५ | सिंहशिशुरपि | सिंहः शिशुरपि |
| ,, | २१ | हिसा | हिस्सा |
| १४४ | १५ | प्रजजनांस | प्रजाजनांस |
| १६५ | २ | श्रमात | भ्रमात |
| १६७ | ११ | कायावाचेंमनें० | कायावाचामनें० |
| १६८ | २३ | गीत त्या, | गति, त्या |
| १६९ | ३ | बााईच्या | बाईच्या |
| ,, | ५ | सफाय | सफाई |
| १७२ | ५ | धारणशक्ती | धारणाशक्ती |
| १७५ | १ | दोनदां | दोघां |

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १७५ | १९ | इतिसांत | इतिहासांत |
| १७६ | २० | बाराव्या | अकराव्या |
| १८८ | १७ | कोणत्याही मनुष्यांची | कोणत्याही दोन मनुष्यांची |
| १८९ | २४ | शिवाजीच्या | शिवाजीच्या वेळच्या |
| १९१ | २१ | दूरदृष्टि | दूरदृष्टीचा |
| २०१ | २१ | सिदोदिया | सिसोदिया |
| २२४ | १० | नासपरतीं | नासपातीं |
| २३० | १० | संबंध | सबंध |
| २३२ | ३ | ०श्रित चरित | ०श्रितचरित० |
| २३३ | १७ | खासबदार | खासबरदार |
| २३६ | ११ | religions | religious |
| २५६ | ४ | रविरवाखरी | रबिलाखरीं |
| २५८ | २० | हा उपदेश | — |
| २५९ | २ | येई | येइ |
| २५९ | ५ | तिच्या हृत्पटला | हा उपदेश तिच्या हृत्पट० |
| २७१ | १६ | वैभाव | वैरभाव |
| ,, | १७ | वाहिला | वाहिली |
| २७३ | १२ | संतृप्ति | संतृप्त |
| २७४ | १६ | पुराणाश्रवण | पुराणश्रवण |
| २७७ | १४ | Pain | Plain |
| २८१ | ७ | देवी | देवि ! |
| ,, | १३ | त्यजिसी | त्यजिसि |
| २८३ | ८ | साथीदरां० | साथीदारां० |
| २८५ | १७ | स्वामा | स्वामी |
| २९० | २३ | येत येतो. | येतो. |
| २९६ | ५ | विंध्या | विंध्य |
| ३०१ | १९ | नाहीं. | नाहींत. |
| ३१७ | १९ | झाले | झालें |
| ३२० | ८ | अंतःकारणानें | अंतःकरणानें |
| ३३१ | २१ | बसूव | बभूव |
| ३३३ | १५ | शंकर | कंकर |

# अभिप्राय.

न्यायमूर्ती दामोदर विनायक कीर्तने, Bar-At-Law,
यांचा अभिप्राय—

Of all the manuscripts competing for Her Highness Maharani Saheba's prize that came under my examination, this short memoir of "देवी श्री अहल्याबाई" I think takes the palm. The name of Ahalyabai is surrounded with a halo of glory and is held in revered and affectionate memory, not only by the Maharashtra community, but also by other communities in all parts of India, and it is natural, that an account of her chaste and saintly life and of her 30 years' illustrious reign should have a perennial interest to Indian readers. The manuscript before me appears to be written by a trained penman who is in keen sympthy with his subject and who has delineated the lights and shades of the picture with excellent skill. The style and diction are racy, crisp and piquant and there are several passages in the book where sharp satire and delicate irony have attained a felicitous charm of expression which evokes one's admiration. There is much excellence of expression and thought in this little book and it is with great pleasure that I commend it to the favourable notice of Her Highness Maharani Saheba.

Indore,
Dated, 29-10-12.

**D. V. Kirtane.**

**डा० गोपळ रामचंद्र तांबे** M. A., L. M. & S, B. Sc., **स्टेट सर्जन इंदूर,** यांचा अभिप्राय—

A handy biography of a model and ideal Indian lady...it is well arranged and worded in a simple and instructive language. A splendid book in the hands of men and women, of all ages.

Dated, 7 th: August 1912. Sd/-G. R. Tambe.

---

**रावबहादूर बळवंतराव पांडुरंग वागळे,** नायबदिवाण खाजगी यांचा अभिप्राय—

सदर ग्रंथाचे गुणांचें विवेचन परीक्षकांचे अभिप्रायांत आलें आहेच. तथापि हें लिहिणें जरूर दिसतें कीं, अशा ग्रंथास अत्यंत परिश्रमानें माहिती मिळवावी लागते. तसे परिश्रम रा० ...... यांनीं घेतल्यामुळें महाराष्ट्र वाचकवर्गास या ग्रंथापासून मागील माहितीचा फार फायदा होईल अशी उमेद आहे.

बळवंतराव पांडुरंग.

---

**डॉ. सर रा. गो. भांडारकर** C. I. E., Ph. D., L. L. D.

Mr. ......... has read to me forty pages out of the one hundred and ten pages of his "Life of **Ahalya Bai Holkar.**" What I principally look to in such books compiled by our vernacular authors is whether the statements made by them are supported by reliable evidence, and whether they have clear ideas as to what constitutes reliability. Tried by this test Mr...'s book appears to be satisfactory. The language, style, and the arrangement of matter seem to be very good.

Indore, 17th November 1912. } **R. G. Bhandarkar.**

---

रा० ब० मुंतजीमबहादूर रावजी जनार्दन भिडे बी. ए. डे. पोलीटिकल सेक्रेटरी, ग्वाल्हेर यांचा अभिप्रायः—

1 have read through the greater portion of Mr....'s "Life of Shri Ahalya Bai." The work reflects great credit upon its young author. In India, the meagreness of biographical material is the despair of writers. The difficulty is seriously felt even in respect of contemporary subjects, not to mention one removed by more than a century. It is all the more creditable therefore to Mr...that he has succeeded in bringing out a solid volume of (about) 400 pages of the most readable matter. The story is told in a chaste, nervous style and its interest is sustained from first to last, with the critical and suggestive reflections of the author and with a wealth of apt quotaions and allusions all of which shows how thoroughly the writer had equipped himself, for his task, by the necessary reading and thinking. Ahalya Bai's life abounds in thrilling episodes and pathetic inincidents & Mr...has depicted these in passage after passage that hold the reader spell-bound and affords the best specimens of Marathi prose. The book fully deserves the patronage of the reading public

31-3-1913. **R. J. Bhide.**

---

रा० रा० दामोदर गणेश पाध्ये एम् ए., प्रिन्सिपाल गोकुळदास तेजपाल हायस्कूल, यांचा अभिप्रायः—

नित्यस्मरणीय "पंचकन्यां" प्रमाणें जिची कीर्ति महाराष्ट्रांतील आबालवृद्धांत अद्यापि जागृत आहे व हिंदुस्थानांतील अलौकिक गुणांच्या स्त्रीरत्नांत जिची गणना सर्व इतिहासकार करितात त्या **देवी श्री अहल्याबाई होळकर** यांविषयीं असलेली सर्व उपलब्ध माहिती संकलित करून व त्यांत स्वकीय शोधांची भर घालून तयार केलेलें सदरहू साध्वी पतिव्रता आणि यशस्वी राज्यकर्त्रीचें हें चरित्र ग्रंथकर्त्यास भूषणावह झालें आहे, व महाष्ट्रवाङ्मयांत त्यायोगें एक उपयुक्त भर पडली आहे, यांत संशय नाहीं. ग्रंथकर्त्याची सत्यासत्याची परीक्षा करून फक्त साधार गोष्टीच नमूद करण्याची ऐतिहासिक दृष्टि व प्रवृत्ति

ग्रंथांत जागोजागीं दिसून येते; आणि त्यामुळेंच ह्या ग्रंथाची किंमत विशेष आहे. भाषा सरळ व सोपी आहे. विचारांची दिशा पायाशुद्ध आहे. सत्यासत्याच्या किंवा मतभिन्नतेच्या वादविवादाचा भाग मुख्य चरित्रांत येतो तितक्या विस्तारानें येऊं नये व केवळ नित्युपदेशक भागही आहे त्याहून कमी असावा असें मला वाटतें. तथापि एकंदर पुस्तकरचना प्रशंसनीय झाली असून ग्रंथ लोकादरास योग्य असा झाला आहे.

**दा. ग. पाध्ये.**

---

प्रो. हरी महादेव भडकमकर, बी. ए. संस्कृत प्रोफेसर विल्सन कॉलेज, यांचा अभिप्रायः—

रा० ....................यांनीं लिहिलेलें '**देवी श्री अहल्याबाई**' नांवाच्या चरित्रात्मक ग्रंथाचा कांहीं भाग मी वाचून पाहिला ग्रंथ पुरा झाला आहे. हा ग्रंथ बोधप्रद व मनोरंजक वठला आहे. कोठेंही निर्मूल विधान आढळत नाहीं. इतिहासलेखकाला आवश्यक असणारी सत्याप्रियता या पुस्तकांत ठिक-ठिकाणीं व्यक्त होते भाषा बहुतेक सरल व सुबोध आहे...... .........
......... हें चरित्र वाचून अहल्याबाईची खरी योग्यता व तिचें राजकारण यांची ओळख चांगली होणेसारखी आहे. तिचें आचरण आजच्या सुधारणेच्या परिस्थितींतही पुष्कळ राज रजवाड्यांस अनुकरणीय आहे. निदान तरी हें ध्येय पुढें राखिल्यानें तिच्या कुळांतील राजांस चिरंतन औदार्य व व्यवहार यांची सांगड घालून उच्च स्थिति मिळविणें शक्य आहे, व तें त्यांना सन्मार्गप्रवृत्त करील यांत शंका वाटत नाहीं. सतीचा महिमा पुराणांतरीं फारच वर्णन केलेला आढळतो. परंतु या वर्णनांत अतिशयोक्तीची रेलचेल असते. ह्मणून पुराण वाचनानें इष्ट हेतू पूर्णपणें सफल होत नाहींत. सबब ऐतिहासिक सतीचरित्राचें वाचन व मनन यांत विशेष श्रेय आहे. तें सर्व रसिक मराठी वाचकांना हातीं आणून देण्याची खटपट रा०...........यांनीं करून तें साध्य करून दिल्या-बद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे.

चौपाटी, मुंबई.<br>ता. ३ एप्रील १९१३. } **हरी महादेव भडकमकर बी. ए.**

---

Printed by V. B. Pandit at his "Laxmi Naryan Press." 402 Thakurdwar Bombay. And Published by A. A. Moramkar, 402, Thakurdwar Bombay No. 2.

डॉ. ए. म. द. दा. पोतदार,